Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**March -2022**

ISSUE No- (CCCXLI) 341

## The Relevance of The Feminism Movement in the Twenty -First Century



**Chief Editor**
**Prof. Virag S. Gawande**
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Executive-Editors**
**Dr. Vinod S. Sonawane**
I/C Principal,
Arts, Commerce and Science College, Onde,
Tal. Vikramgad, Dist. Palghar

**Editors**
**Dr. Chetana Yogesh Patil**
Convener & Vice Principal , Head,
Women Development Cell
Arts, Commerce and Science College,
Onde, Tal. Vikramgad, Dist. Palghar

**Editors**
**Dr. Basweshwar Pandagale**
Co-Ordinator
HOD, Department of Political Science
Arts, Commerce and Science College,
Onde, Tal. Vikramgad, Dist. Palghar

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

**Impact Factor – 8.575** **ISSN – 2278-9308**

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

# March-2022

**ISSUE No- (CCCXLI ) 341**

# The Relevance of The Feminism Movement in the Twenty -First Century

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. Vinod Sambhaji Sonawane**
**Executive Editor**
I/C Principal,
Arts, Commerce and Science College, Onde, Tal. Vikramgad, Dist. Palghar

**Dr. Chetana Yogesh Patil**
**Editors**
Convener & Vice Principal , Head,
Women Development Cell

**Dr. Basweshwar Pandagale**
**Editors**
Co-Ordinator
HOD, Department of Political Science

**Aadhar International Publication**
For Details Visit To : **www.aadharsocial.com**
© **All rights reserved with the authors & publisher**



**Hon'bleShri. V. G. Patil**

President, S.G.V & S.S.P. Onde Tal.Vikramagad, Dist. Palghar.

***Message…***

The National e-Conference on "The Relevance of Feministic Movement in the 21st Century" is yet another feather in the cap of Arts, Commerce and Science College. This e-conference reflects the honest endeavors of the college. The subject of the conference is extremely relevant to the present times and I am glad and proud that such a conference has been organized on a virtual platform which is in the remote and inaccessible tribal area of Vikramgad in Palghardistrict where academicians, scholars, and students can share their ideas and knowledge of this subject. One thing that I have observed is that how college continues to work hard in order to bring academic excellence in the college.

What I personally feel that there is a need of hour to discuss and ponder over the relevance of feministic movements in the present era. And hence, this conference will definitely educate people about feminismin a broader sense.

I am extremely glad to be part of the book of the conference and eager to see academicians and scholars take the benefit of this gathering. I congratulateDepartment of History and Political Science, Woman Development Cell, IQAC and Teaching and Non- teaching staff of the college for making painstaking efforts for the success of the conference. I wish them all the success for the conference.

Mr. V. G. Patil



**Dr. Vinod Sambhaji Sonawane**
I/C Principal,
Arts, Commerce and Science College, Onde,
Tal. Vikramgad, Dist. Palghar.

***Editorial…***

Arts, Commerce and Science College, run by Sanjivan Gramin Vaiyakiya and Samajik Sahayata Pratishthan, was established in 2002 in the remote and inaccessible tribal aera of vikramgad tehsil of Palghar district. Our college offers B.A., B. Com. and B. Sc. at undergraduate level and M. Sc. In Chemistry at post-graduation level for the local populace of this tribal area. The college faced NAAC was assessed and accredited 'C' in the first cycle in 2018. The college has ISO certificate also.

It is a proud moment for me to host this National e- Conference on "The Relevance of the Feministic Movement in the 21st Century" that brings us back to where we focus on research activities. Department of History, Political Science, Women Development Cell and Internal Quality Assurance Cell of our college are jointly organizing this conference. First, I would like to express my gratitude towards the President of the Institution i.e.,SanjivanGramin and VaidyakyaSamajikSahayataPratishthan Hon'ble Shri. V.G. Patil, Acting president Shri. Suresh Kanoja, Secretary Shri. Milind Patil and director Dr. Chetna Patil for supporting and encouraging us. Also, I would like to congratulate all departments and cells for organizing this event. I would like to extend a warm welcome to the resource persons, Dr. A.D. Sawant, Dr. Sunita M. Sarkar, Prof. Ajay Waghmare, Dr. Chandrakant Chavan, Dr. Salvin Paul, Dr, Sandesh Wagh, Dr. Savita Tayde and Dr. Priya Mittal, researchers and delegates.

I believe that this conference will bring different perspectives from the resource persons, academicians and research scholars on the contributions of women who are working in various fields. This conference has been organized with the hope that it will bring a positive change in the society and higher education.

I congratulate and thank all the concerned persons who have made this conference possible. I wish it all the best and I sincerely hope that this conference will be beneficial to everyone.

Dr. Vinod Sambhaji Sonawane

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, 341 (CCCXLI)
ISSN : 2278-9308
March, 2022



Dr. Chetana Yogesh Patil
Convener & Vice Principal
Head, Women Development Cell



Dr. Basweshwar Pandagale
Co-Ordinator
HOD, Department of Political Science

## *Editorial..*

Feminism is on interdisciplinary approach to issues of equality and equity based on gender identity. Feminism has evolved from the critical examination of inequality between the sexes and focused on equal rights and opportunities. Feminism is most discussed but yet to be awaiting to be implemented issue from last few decades. Every concept arise with new dimensions according to the change of time , so it is applicable in case of feminism also. Though we entered in 21st century and almost reached to its quarter, at this point the movement of feminism, which is not yet reached its destination of equilibrium, makes us more introspective about its relevance and implementation. One- Day National E-conference on **The Relevance of The Feministic Movement in the 21st Century** on 10th March 2022 was organized by Dept of History, Political Science, Women Development Cell and IQAC of Arts , Commerce and Science College, Onde to deliberate upon the overall relevance of Feminism, Feministic movement in India and worldwide, Feminism in the context of Social, political, economical, historical, educational, liberal, Marxist, tribal, scientific, environmental, social media, literature and Human Rights etc.

This National e-conference was inaugurated by Honorable Shri V. G. Patil, President SanjivanGraminVaidyakiya and SamajikSahayyataPratishthan, Onde. Dr. Arun Sawant, Vice Chancellor, Jaipur University Rajasthan, was the Keynote Speaker of this Conference. Prof.Sunita Mitra Sarkar Department of Political Science, Sarang SajanikantaMahavidyalayaLutunia, West Bengal. Prof. Ajay Waghmare from Government Degree College, Nirmal Telangana State was the resource person, Dr Savita Tayade from Mumbai Chairperson. Dr. Chandrakant Chavan from Solapur was the resource person and Dr. Sandesh Wagh the Chairperson. Selected Paper presentation was in the session Dr. Priya Mittal was the chairperson. Dr. Salvin Paul from Sikkim University was the chief guest for the valedictory function.

The response to our call was huge, various writers from all over India sent their papers to this conference, the number of papers received were 96 and the national e-conference was attended by 176 participants. In spite of being situated in tribal area of palghar district, the response of our researchers, professors, teachers and even students is so massive and more than our expectations. This response itself is the answer for the need of feminism to be discussed and researched. This one day National e - conference was conducted under the chairmanship and guidance of Dr. Vinod Sonawane, Principal of the college.

Thank you..

# Editorial Board

**Chief Editor -**
**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi ,**Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji,
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro. Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Professor Dr. P. D. College of Law, Amravati]
- **Dr. Sandip B. Kale,** Head, Dept. of Pol. Sci., Yeshwant Mahavidyalaya, Seloo, Dist. Wardha.
- **Dr. Hrushikesh Dalai** , Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responicible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

\- **Executive Editor**

**Published by -**
**Prof.Virag Gawande**
**Aadhar Publication ,**Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati
( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com
**Website :** www.aadharsocial.com **Mobile :** 9595560278 /

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महिलांचे योगदान प्रा.डॉ.कोंडेकर आर.एस. | 1 |
| 2 | स्त्रीवाद : लिंगगुणोत्तर प्रमाणातील विशमता व स्त्रीभ्रूण हत्या प्रा. डॉ. रोहित सुधाकर गायकवाड | 5 |
| 3 | सणगर समाजातील स्त्रीयांचे प्रश्न व स्त्रीवाद प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | 9 |
| 4 | भारतीय संविधान आणि महिला सक्षमिकरण सहा. प्रा. लक्ष्मन बाबाराव यादव | 17 |
| 5 | पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा राजकीय सहभाग एक चिकित्सक अध्ययन डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 20 |
| 6 | स्त्रीवाद आणि आदिवासी महिला डॉ. अजय पेत्रस बोरकर | 26 |
| 7 | महिला सक्षमीकरण: सामाजिक, साहित्यिक चळवळीच्या संदर्भातून प्रा.संदिप चपटे | 32 |
| 8 | आधुनिक मनू आणि स्त्रीमुक्ती बील डॉ.पौळ भावन श्रीपती | 38 |
| 9 | साधना साप्ताहिकातून स्त्रीवादी चळवळीचा आढावा डॉ. वाईकर शोभा बबन | 43 |
| 10 | एकविसाव्या शतकात महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रियांची स्थिती. डॉ.संतोष हनुमंत जाधव | 46 |
| 11 | ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग प्रा. डॉ. प्रमोद मा. आचेगावे | 50 |
| 12 | ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांच्या समोरील आव्हानांचा अभ्यास **Mr. Sante Lalchandra Ramchandra** | 52 |
| 13 | बहुजनांची स्फूर्तिनायिका: सावित्रीआई फुले डॉ.शिंदे आर. डी. | 57 |
| 14 | पंचायतराज : ७३ वी घटनादुरुस्ती आणि महिला सबलीकरण डॉ. तानाजी संभाजी माने | 63 |
| 15 | भारतातील स्त्रीवादी चळवळ प्रा. डॉ. आर. डी. मांडणीकर | 68 |
| 16 | मानवी हक्क आणि महिलानांचे कायदेविषयक अधिकार प्रा. लक्ष्मण मारोती घोटेकर | 73 |
| 17 | महिलाचा राजकीय सहभाग : एक दृष्टिक्षेप प्रा.डॉ.बसवेश्वर पांडागळे | 78 |
| 18 | भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील डॉ. ॲनी बेझंट यांचे योगदान **Dr.Madhukar Vithoba Jadhav** | 82 |
| 19 | महिला सबलीकरण आणि ऐतिहासिक परीप्रेक्षातील स्त्रियांचे जीवन प्रा.डॉ. अब्दुलसमद बादशाह शेख | 85 |

| | | |
|---|---|---|
| 20 | शिवरायांची नातसून जिजाबाई साहेब: एक ऐतिहासिक अभ्यास<br>डॉ. विनोद संभाजी सोनवणे | 88 |
| 21 | मार्क्सवादी स्त्रीवाद : संकल्पना आणि स्वरूप प्रा .डॉ.वृषाली लक्ष्मीकांत फुके | 92 |
| 22 | लिंगभाव आणि स्त्रीवाद डॉ. चांदोजी सोपान गायकवाड | 96 |
| 23 | राष्ट्रउभारणीत स्त्री मुख्यमंत्र्यांचे योगदान एक चिकित्सा प्रा.सुनिलदत्त गोडसे | 101 |
| 24 | मार्क्सवादी स्त्रीवादी: एक आकलनडॉ. सूर्यकांत लक्ष्मणराव शेळके | 104 |
| 25 | शाश्वत विकासात पद्मश्री तुलसी गौडा व पद्मश्री राहीबाई पोपरे यांचे योगदान.<br>प्रा.बनसोडे राहुल प्रकाश | 109 |
| 26 | शिवकालीन स्त्री जीवन डॉ. श्रेया संजीव दाणी | 113 |
| 27 | सक्षमीकरण महिलांच्या सर्वांगीण विकासाचे साधन डॉ. सोमा पी. गोंडाणे | 116 |
| 28 | स्त्रियांचे समाजातील स्थान – काल आणि आज<br>डॉ. रवींद्र भा. घागस / प्रा. प्रकाश विष्णू घरत | 120 |
| 29 | स्त्रिवाद: समस्या, आव्हाने व उपाय कल्पना राजेश कनके-सिद्धेवाड | 123 |
| 30 | स्त्रीवाद आणि प्रसार माध्यमे (संजना भट : स्त्री आणि भारतीय कौटुंबिक संस्कृती)<br>प्रा स्वाती हरिभाऊ काटे | 128 |
| 31 | स्त्रीवाद : सिद्धांत आणि व्यवहार प्रा .डॉ . अर्जुन येरगे | 130 |
| 32 | स्त्रीवाद आणि प्रसारमाध्यमे : दैनिक प्रजावणी वृत्तपत्राची भूमिका<br>प्रा.अंकुश सुर्यवंशी | 134 |
| 33 | स्त्रीवाद आणि आदिवासी महिला - विशेष संदर्भ पालघर जिल्हा प्रा. जी.एम.घुटे | 138 |
| 34 | स्त्रीवाद आणि प्रसारमाध्यमे प्रा.संजय महेबूब तडवी | 143 |
| 35 | स्त्रीवाद आणि स्त्री – पुरुष समता डॉ.राम पांडूरंग साबदे | 146 |
| 36 | स्त्रीवाद व आदिवासी महिला<br>प्रा.सौ. आशिषा आशिष म्हात्रे (सुप्रज्ञा)/सौ. अपुर्वा अमित पाटील (स्नेहल) | 149 |
| 37 | स्त्रीवाद: समस्या आव्हाने व उपाय दत्ताजी हुल्लप्पा मेहत्रे | 152 |
| 38 | स्त्रीवादाचा उदय व विकास: समाजशास्त्रीय अध्ययन डॉ. श्रीनिवास पीलगुलवार | 155 |
| 39 | स्त्रीवादी चळवळ आणि घरगुती हिंसा प्रा. दर्शना अतुल भोईर | 163 |
| 40 | स्त्रीवादी परिप्रेक्षातून लिंगाधारित अर्थसंकल्पाचा अभ्यास प्रा. संतोष भावार्थे | 167 |
| 41 | स्त्रीवादी साहित्य चळवळ व स्त्रीवादी साहित्य समीक्षा प्रा. आर. एस. शनवार | 170 |

| | | |
|---|---|---|
| 42 | स्त्रीवादी चळवळींचा इतिहास **Mr. Ramdas Yede** | 173 |
| 43 | स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग : महिला सबलीकरणाचा एक प्रयत्न **प्रा.डॉ.दयानंद माधवराव गुडेवार** | 177 |
| 44 | स्त्रीवाद आणि महाराष्ट्रातील आदिवासी स्त्री **श्री. भोये दत्तात्रेय रघुनाथ** | 181 |
| 45 | स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांचा सहभाग **प्रियांका विनायक पाटील** | 185 |
| 46 | मार्क्सवादी आणि समाजवादी स्त्रीवाद **डॉ. मनीषा काशिनाथराव पाटील** | 187 |
| 47 | स्त्रीवादाची ओळख **डॉ. शिल्पा शेटे** | 190 |

ISSN : 2278-9308
March, 2022

# हैद्राबाद मुक्ती संग्रामातील महिलांचे योगदान

प्रा.डॉ.कोंडेकर आर.एस.
प्रोफेसर, इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड, ता.मुदखेड, जि.नांदेड

**प्रस्तावना :**

ब्रिटिश राजवटीच्या काळात भारतात ५६३ च्या वर संस्थाने होती. दक्षिण भारतात हैद्राबाद, कोल्हापूर व नागपूर ही तीन संस्थाने होती. इ.स. १७२४ ते १९४८ या कालखंडात हैद्राबाद संस्थानात "आसफिया घराण्याची" सत्ता होती. हैद्राबाद संस्थानाचा व आसफिया या घराण्याचा संस्थापक "मीर कमरुद्दीन उर्फ निजाम–उल–मुल्क" हा होता, त्याने इ.स. १७२४ साली हैद्राबाद या ठिकाणी स्वतंत्र राज्याची स्थापना केली. या राज्यात मराठवाडा, तेलंगणा आणि कर्नाटक या प्रदेशाचा समावेश होता. या संस्थानाच्या गादीवर वंश परंपरेने येणाऱ्या सत्ताधिशाला "निजाम" या नावाने ओळखण्यात येत असे.

दि.१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाला परंतु निजामाने आपले राज्य स्वतंत्र ठेवण्याची घोषणा केली. निजाम अन्यायी व अत्याचारी होता. याशिवाय देशाच्या मध्यभागी असलेले हैद्राबाद राज्य स्वतंत्र रहाणे देशाच्या आणि जनतेच्या हिताचे नव्हते. त्यामुळे हैद्राबाद राज्याच्या विलीनीकरणासाठी या राज्यातील जनतेने संघटीतपणे आंदोलनास सुरूवात केली.

दि.१३ सप्टेंबर १९४७ रोजी भारत सरकारने लष्करी कारवाई केली. परिणामी १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने भारतीय लष्करांपुढे शरणागती पत्करली अशा रीतीने हैद्राबादचे राज्य भारतीय संघराज्यात विलीन झाले.

हैद्राबाद मुक्ती संग्रामात हैद्राबाद संस्थानातील जनतेने मोठ्या प्रमाणात योगदान दिले. हा लढा स्वामी रामानंद तिर्थांच्या नेतृत्वाखाली लढला गेला तसेच या लढ्यात शिक्षक, पत्रकार, व्यापारी, सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, मजूर व महिलांनी सहभाग घेतला.

हैद्राबाद संस्थानात मोगलाई होती. हैद्राबाद संस्थानातील परिस्थिती लक्षात घेतली तर बाहेरच्या ब्रिटिश हिंदुस्थानच्या तुलनेत येथील स्त्रियांनी स्वातंत्र्य आंदोलनात भाग का घेतला नाही हे जसे उमजते तसेच ज्या स्त्रियांनी परिस्थितीची तमा न बाळगता कार्य केले त्यांच्या धाडसाविषयी व त्यागी वृत्तीविषयी आश्चर्य वाटल्यावाचून ही राहत नाही. हैद्राबाद संस्थानात दोन्ही अर्थाने मोगलाई होती. राज्यव्यवस्थेत मोगलाई व एकूण जीवनात कमालीची जातीयता म्हणजेच मोगलाई, पुरूषांना जेथे आपापल्या गावात व भागात मोकळेपणाने हिंडणे, फिरणे व सार्वजनिक कार्य करणे अवघड होते. तेथे स्त्रियांना काय सोसावे लागत असेल याची कल्पना न केलेली बरी. असे असतानाही मराठवाड्यात महिला कार्यकर्त्यांनी सेना संख्या आणि गुण या दोन्ही दुपटींनी बऱ्यापैकी उभी राहिली. या महिलांमध्ये तरूण तसेच वयस्कर अशा स्त्रियांचाही समावेश होता. स्वातंत्र्यांचा संग्राम इ.स.१९३८.१९३८ पासून सुरू झाला. तेव्हापासून सार्वजनिक जीवन जगणाऱ्या व सातत्याने कार्य करणाऱ्या आशाताई वाघमारे, लातूरच्या सुशीलाबाई दिवाण, बीडच्या कै. पानकुंवर कोटेचा आणि जालन्याच्या माई अंबडकर या काही मोजक्या स्त्रिया होत्या.

हैद्राबाद मुक्ती संग्रामात महिलांनी विविध स्वरूपाची कामे केली आहेत. काही महिलांनी प्रत्यक्ष स्वातंत्र्य चळवळी सहभाग नोंदविले तर काहींनी अप्रत्यक्षपणे आपले योगदान दिले आहे. हैद्राबाद मुक्ती संग्राम हा सशस्त्र लढा होता. अनेक महिलांनी मोलाची कामगिरी बजावली. या लढ्यात काही महिलांनी संस्थानाबाहेरून शस्त्रास्त्राची ने–आण करीत असत. अनेक वेळा रझाकार संघटनेकडून घरांची झडती होत असत. अशा प्रसंगी ती शस्त्रे लपविण्याची जबाबदारी ही महिला पार पाडीत असत. शस्त्रास्त्र खरेदीसाठी निधी जमा करणे ते चालविण्याचे प्रशिक्षण केंद्र सुरू करणे इत्यादी कामात महिलांनी मोठ्या प्रमाणात योगदान दिले.

ताराबाई परांजपे व गीताबाई चारठाणकर यासारख्या स्त्रियांनी शस्त्रास्त्र आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. निधी गोळा करणे, क्रांतीकारकांना निरोप देणे, भूमिगतांना सहकार्य करणे या कार्यात सहभाग घेतल्यामुळे आशाताई

वाघमारे व ताराबाई परांजपे यांना तुरूंगवास भोगावे लागले. त्या हर्सूल व चंचलगुडा तुरूंगात होत्या. औरंगाबादच्या करूणाताई चौधरी यांनी कापड गिरणी कामगारांच्या संपात सहभागी झाल्या होत्या. त्यामुळे त्यांना अटक करून दोन वर्ष नऊ महिने तुरूंगवासाची शिक्षा झाली.

**आशाताई वाघमारे :—**

या आरंभी सरकारी शाळेत शिक्षिकेची नौकरी करीत असत. त्या बालविधवा होत्या, सार्वजनिक कार्याची ओढ असल्याने त्या गणेशोत्सव आणि शैक्षणिक कार्य आदीमध्ये भाग घेत असत. त्यामुळेच त्यांचा व आनंद कृष्ण वाघमारे यांचा परिचय झाला व पुढे दोघेही विवाहबध्द झाले. त्या काळात झालेला हा पुनर्विवाह होता. आशताईंनी इ.स.१९३८ पासून कामास प्रारंभ केला. महाराष्ट्र परिषद व स्टेट कॉग्रेस यांच्या कार्यात त्यांनी हिरीरीने भाग घेतला. सत्याग्रहींना आश्रय देणे, त्यांच्या पश्चात त्यांच्या कुटुंबाची काळजी घेणे इत्यादी कामे त्यांनी मोठ्या चिकाटीने व हिमतीने केली.

**पानकुंवर कोटेचा :—**

पानकुंवर कोटेचा औरंगाबादमध्येच माणिकचंदजी पहाडे यांच्या घरी येऊन राहिल्या होत्या. त्यांनी उघड—उघड राजकीय कार्यासच प्रारंभ केला. औरंगाबादमध्ये त्या काळी मोठमोठ्या प्रभात फेऱ्या निघत त्यात मुलीचाही भरणा असे. मुली व महिला संघटित करण्यात पानकुंवरबाईचा फार मोठा वाटा होता.

**सुशीलाबाई दिवाण :—**

या आरंभी हिप्परग्याला स्वामीजींच्या ग्रामीण शाळेत आल्या तेथून त्या राघवेंद्रराव दिवाणांशी विवाहबध्द होऊन लातूरला आल्या. लातूरला इ.स.१९३६ मध्ये त्यांनीच पहिली मुलीची शाळा "महिला विद्यामंदिर" म्हणून काढली. पुढे जसजसे राजकारण तीव्र होत गेले तसतसे त्यांनी आपली अन्य क्षेत्रे सोडून राजकारणात उडी घेतली. इ.स. १९३९ मध्ये लातूरला महिला मंडळाची स्थापना करण्यात आली. पोलीसांनी अटक केलेल्यांपैकी मराठवाड्यातील वाघमारे या पहिल्या महिला तर सुशीलाबाई पहिल्या पूर्णवेळ कार्यकर्त्या.

**काशीबाई किर्लोस्कर :—**

मराठवाड्यातील महिलांच्या कार्याला संघटित आरंभ झाला. ते इ.स. १९४४.४५ मध्ये या आधी इ.स. १९३८ मध्ये लातूरला महाराष्ट्र परिषदेचे दुसरे अधिवेशन झाले होते. त्याला लागूनच महिला संमेलन भरले होते. हैद्राबादच्या काशीबाई किर्लोस्कर या संमेलनाच्या अध्यक्षा होत्या. स्टेट कॉग्रेसची बंदी उठत नाही हे दिसून आल्यानंतर मराठवाड्यात महाराष्ट्र परिषदेच्या सर्वांनी आश्रय घेतला. महाराष्ट्र परिषदेच्या कार्याचा भाग म्हणून शेतकरी कामगार विद्यार्थी या वर्गातून संघटना बांधण्याचा जसा प्रयत्न झाला तसाच प्रयत्न महिला वर्गातही झाला.

**महिला परिषद सेलू व महिला संमेलन संघटनेची स्थापना :—**

इ.स.१९४५ मध्ये फार मोठ्या प्रमाणावर सेलू येथे महिला परिषद झाली. ही परिषदही महाराष्ट्र परिषदेच्या अधिवेशनाला जोडूनच घेण्यात आली होती. महिला शिबीरात तयार झालेल्या कार्यकर्त्यांनी मराठवाडाभर प्रचार दौरे केले. परिणामी प्रथमत:च सेलूच्या महिला परिषदेच्या अध्यक्षा सुशिलाबाई दिवाण होत्या. तर स्वागताध्यक्षा गीताबाई चारठाणकर होत्या येथेच महिला संमेलन या नावाची स्वतंत्र संघटना कायम झाली. संमेलनाचे कार्यालय नांदेडला ठेवण्याचे ठरले. चिटणीस म्हणून नांदेडच्या शकुंतलाबाई झाल्या, यांची निवड झाल्यावर कार्यालय चिटणीस कावेरीताई बोधनकर झाल्या. यातूनच पुढे मराठवाडा महिला मंडळ व महिला शिक्षण समिती या संस्था निर्माण झाल्या. आता जवळजवळ सर्व जिल्ह्यांतून स्वतंत्रपणे महिलांचे कार्य करण्याच्या कार्यकर्त्या तयार झाल्या होत्या. पहिल्या मराठवाडा महिला मंडळाचे कार्यकारी मंडळ पुढीलप्रमाणे होते. शकुंतलाबाई साले, विमलाबाई डोइफोडे, लताबाई बोधनकर, सीताबाई किवळेकर, सुलोचनाबाई बोधनकर, कावेरीताई बोधनकर, कृष्णाबाई आंबेकर, सरस्वतीबाई सरदेशपांडे, गोदावरीबाई बोधनकर, लक्ष्मीबाई हरकारे, अन्नपूर्णाबाई दननाईक व रमाबाई गांजवे.

**राजकूंवर काबरा :—**

या लढवय्या महिलेने गोवर्धन शिरोळ सारखे गाव रझाकारांच्या तावडीतून मुक्त करण्यात महत्वाची भूमिका बजावली. आपल्या भाषणातून ती लोकप्रबोधन करीत असे. मराठवाड्याच्या बाहेरील पुणे, बिकानेर व जबलपूर इत्यादी ठिकाणाहून त्या एकटीच विविध शस्त्रास्त्रे क्रांतीकारकापर्यंत आणित असत.

**दगडाबाई शेळके :—**

या महिलेने हैद्राबाद मुक्ती संग्रामात सशस्त्र कार्य केले आहे. तलवारबाजी, पिस्तुल चालविणे व जंबियाचे वापर करणे, याचे तिने प्रशिक्षण घेतले होते. लोकांना लढ्यात सहभागी करून घेण्यासाठी भाषणे देत असत. तसेच रेल्वे रूळ उखडणे, पोलीस चौक्या व शासकीय दफ्तर जाळणे, बॉम्ब हल्ला करणे इत्यादी कामे अतिशय धैर्याने दगडाबाई करीत असत. त्या पॅन्ट, शर्ट, बूट व कोट घालून फिरत असत. परमपूज्य स्वातंत्र्य सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांनी ०७ ऑगस्ट १९४७ रोजी झेंडा दिवस साजरा करण्याचे संस्थानातील जनतेला आदेश दिले होते. त्यानुसार दगडाबाई ०७ ऑगस्ट १९४७ रोजी कोलते टाकळीला तिरंगा झेंडा फडकावून झेंडा दिवस साजरा केला.

**गोदावरी मेटे :—**

उस्मानाबाद जिल्ह्यातील 'इट' या गावची गोदावरी किशनराव मेटे नावाच्या तरूणीने इट गावात घुसलेल्या रझाकारांशी दोन हात केले. यात सात रझाकारांना ठार करून ती स्वत: हुतात्मा झाली. याबरोबरच राधाबाई व लक्ष्मीबाई देशमुख यांनी महत्वाचे योगदान दिले. भूमिगत महिलात करूणाबेग चौधरी यांनी मोठा पराक्रम केला होता. बीड जिल्ह्यातील श्रीमती शाताबाई कोटेचा, पानकुंवरबाई फिरोदिया यांनी चळवळीचे नेतृत्व केले.

**विद्यार्थीनींचा सहभाग :—**

इ.स.१९४७ मध्ये स्वातंत्र्याचा अखेरचा संग्राम सुरू झाला. हैद्राबाद शहरात सूर्यपेठ अत्याचाराच्या विरूध्द विद्यार्थ्यांनी मोर्चा काढून निदर्शने केली. त्यात प्रथमत:च विवेकवर्धिनी हायस्कूलच्या ५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. हे निदर्शने संघटित करण्याचे काम तारा परांजपे व त्यांच्या सहकारी मुलींनी केले होते.

हैद्राबादमध्ये शरयू अपासिंगेकर, कुसुम हमिने, शांता कुलकर्णी, काशी मराठे, आदी मुली पत्रके वाटणे, सत्यागृहींची व्यवस्था करणे इ. कामे करीत असत. हळूहळू शहरात महिलांचा एक चांगला गट तयार झाला होता. आरंभापासून ग्यानकुमारी हेडा आणि नवजीवन महिला मंडळाच्या यशोदाबेन राजकीय कार्यात होत्या. त्यांच्या बरोबरीने आता प्रतिभा वैशंपायन, तारा परांजपे, विमलाबाई मेलकोटे, उषा पांगरीकर, सीताबाई नांदापूरकर या महिला राजकीय क्षेत्रात उतरल्या होत्या. स्टेट कॉंग्रेसच्या आदेशानुसार महिलांनी सत्याग्रह करावयाचा होता. हैद्राबादहून चार तुकड्या सत्याग्रहात होत्या. यशोदाबेन यांना पोलीसांनी आपण होऊन अटक केली. या यशोदाबेन पुढे कम्युनिस्ट पक्षाच्या सदस्य झाल्या. ग्यानकुमारी मेलकोटे यांच्या नेतृत्वाखाली गेलेल्या महिलांच्या तुकडीत उषा पांगरीकर, सीताबाई नांदापूरकर आणि अहिल्याबाई या महिला होत्या. विमलबाई आणि उषा पांगरीकर यांच्यासमवेत त्यांनी लहान मुलेही होती. इकडे मराठवाड्यात करूणाबेन चौधरी या भूमिगत झाल्या. त्यांना पकडण्यासाठी पोलिसांनी शर्थ केली परंतु त्या सापडल्याच नाहीत.

औरंगाबाद शहरात १ ऑक्टोबर १९४७ ला शभरावर महिलांनी उघड मिरवणूक काढून निजाम सरकारच्या विरूध्द घोषणा दिल्या. परभणी, नांदेड, बीड, लातूर, औरंगाबाद आणि हैद्राबाद येथे महिलांनी जाहीर उपोषणे केली तर ते वकील न्यायालयांवर बहिष्कार टाकण्यास तयार नव्हते त्यांच्या घरासमोर धरणे धरले. ग्रामीण भागात जागृतीचे हे लोण खेड्यापाड्यात पोहोचले.

नांदेड जिल्ह्यातील हंगिरगा या गावी पुंडलिक पाटील हंगरगेकर यांच्या आई तान्हूबाई एखाद्या वाघिणीसारख्या चवताळून उठल्या व हातात तिरंगी झेंडा घेऊन त्यांनी महिलांची प्रभात फेरी काढली. तर मौजे इटे, ता.कळंब येथे लक्ष्मीबाई व राधाबाई देशमुख यांनी तिरंगी ध्वज उघडपणे फडकविला.

वाशिम ते मुंबई दरम्यान गीताबाई चारठाणकर, शांता पेडगावकर, कुसुम अंबादास जोशी तर सोलापूरकडे सुशीलाबाई दिवाण, शकुंतला चाकूरकर, कावेरीबाई बोनकर या महिलांनी फार मोलाची कामगिरी बजावली. लातूरला कावेरीबाई बोधनकर शस्त्रानिशी पकडल्या गेल्या. त्यांना पोलीस कोठडीत ठेवले गेले. त्यांनी स्थानिक कार्यकर्त्यांच्या मदतीने एक कुलूप मागून घेतले व पोलीस कोठडी आतून बंद केली. नंतर त्या सुटल्या. मनमाड स्टेशनवर गीताबाई चारठाणकर ही काडतुसे व शस्त्रास्त्रे यांच्यासह पकडल्या गेल्या. त्यांच्यावर रीतसर खटला चालला, पुढे त्या सुटल्या. मुंबई, बंगळूर व मद्रासहून तारा परांजपे व प्रतिभा वैशंपायन या साहित्य पोहोचवण्याचे काम करीत असत.

औरंगाबाद जिल्ह्यात कोलता पिंपळगावच्या संग्राम फार गाजला. रझाकारांशी ज्या सैनिकांनी दोन हात केले त्यात दगडाबाई शेळके या ग्रामीण महिला आघाडीवर होत्या. त्यांनी प्रत्यक्ष लढाईतच भाग घेतला व चार तास बंदूक हातात घेऊन रझाकारांना पिटाळून लावले.

मुंबईसह सेवा दलाच्या व इतर अनेक महिलांनी हैद्राबादच्या लढ्याला मदत केली. पृथ्वीराज कपूर यांनी यांची नाटके हैद्राबादच्या मदतीसाठी दिली होती. त्यांची तिकिटे विकून निधी गोळा करण्याच्या कामी मुंबईच्या प्रमिला करंडे यांनाही फार मदत झाली. प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मराठवाड्याच्या महिलांनी स्वातंत्र्य संग्रामातील आपली कर्तव्ये मोठ्या जिद्दीने व धैर्याने पार पाडली. अशी इतिहासातील नोंद करावी लागेल.

**सारांश :—**

हैद्राबाद मुक्ती संग्रामात काही महिलांनी अप्रत्यक्षरित्या कार्य करून योगदान दिले. या संग्रामात कोणाचे भाऊ, कोणाचे पती, कोणाचे वडील, कोणाचा मुलगा यापैकी कोणी ना कोणी सहभागी झाले होते. काही पुरूष तुरूंगात होते. अनेकजण भूमिगत झाले होते. अशाप्रसंगी मराठवाड्यातील महिलांनी आपल्या कुटुंबाची जबाबदारी सांभाळीत चळवळीला सहकार्य करीत असत. भूमिगतांची घरे चालविणे सांभाळीत चळवळीला सहकार्य करीत असत. भूमिगतांची घरे चालविणे, त्यांना जेवण देणे, निरोप देणे इ. कामे महिलांनी उत्तम पध्दतीने केले.

हैद्राबाद मुक्ती संग्रामात महिलांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला आहे. वैचारिक प्रबोधन, शैक्षणिक कार्य, संमेलनात सहभाग देणे, परिषदा घेणे, प्रत्यक्ष चळवळीत सहभागी होणे, सशस्त्र लढ्यात भाग घेणे इत्यादी कामे मराठवाड्यातील महिलांनी मोठ्या प्रमाणात केले. हैद्राबाद मुक्ती संग्रामात पुरूषांबरोबरच महिलांचा सहभाग व योगदान मोठ्या प्रमाणात होता.

**संदर्भ ग्रंथ :—**

१.अनंत भालेराव,(पहिली आवृत्ती, १७ सप्टेंबर १९८७), हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा, मुंबई, मौज प्रकाशन.
२. डॉ.शुभदा भालेराव, (१९९८), मराठवाडा मुक्तीसंग्राम सुवर्ण महोत्सव विशेषांक, औरंगाबाद.
३. परांजपे नागनाथ (संपा.), तेजोनिधी, नांदेड
४. डॉ.सोमनाथ रोडे (१९९९), मराठवाड्याचा इतिहास, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स.
५.विजयेंद्र काबरा, अजिंठा—मराठवाडा मुक्तीसंग्राम सुवर्ण महोत्सव विशेषांक
६. डोईफोडे सुधाकर, हिंदुस्थानातील संस्थानाचे विलिनीकरण कसे झाले? संगत प्रकाशन, नांदेड २०१७.
७. डॉ.देव प्रभाकर (१९९९), हैद्राबाद मुक्तीसंग्राम, नांदेड, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ.
८. मराठवाडा दिवाळी अंक, १९७२, डॉ.ताराबाई परांजपे, नांदेड, सौ.सुनिताबाई दिवाण लातूर, आशाताई वाघमारे औरंगाबाद, सौ.गीताबाई चारठाणकर सेलू यांची टिपणे आणि सीताबाई नांदापूरालिखित सीताराम.

ISSN : 2278-9308
March, 2022

# स्त्रीवाद : लिंगगुणोत्तर प्रमाणातील विशमता व स्त्रीभ्रूण हत्या

प्रा. डॉ. रोहित सुधाकर गायकवाड

सेनोपंत दांडेकर कला, वा श्री आपटे वाणिज्य व एम.एच. मेहता विज्ञान महाविद्यालय, पालघर

**प्रस्तावना:**

ज्या काळात महिला घराबाहेर पडत नव्हत्या त्या काळात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी लोकांच्या शिव्याशापांचा सामना करीत मुलींच्या शिक्षणासाठी अहोरात्र मेहनत घेतली. त्या फुले दांपत्याच्या अथक प्रयत्नांमुळे आज महिला विविध क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करताना दिसत आहेत. शिक्षणाने क्रांती होते व स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो हे आजच्या महिलांनी शिक्षणाने सिद्ध केले आहे. असे असूनदेखील लैंगिक अत्याचाराच्या बाबतीत मात्र देश सर्वांत मागासलेला आहे. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे महिलांची कमी होत असलेली संख्या, बाल लिंग गुणोत्तर प्रमाण होय.

भारत सरकारच्या सांख्यिकीय आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाद्वारे ;डपदपेजतल वि ॆजंजपबें – त्तवहतंउउम पउचसमउमदजंजपवदद्ध 2017 मध्ये प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार जन्मवेळच्या लिंग गुणोत्तरामध्ये मुलींची संख्या सातत्याने प्रतिवर्षी कमी होताना दिसून येत आहे या आकडेवारीनुसार भारतात दर हजारी मुलांमागे मुलींचे प्रमाण अनुक्रमे 2011– 909, 2012 –908, 2013 – 898, 2014–887, 2015 – 881 असे कमी होताना दिसते. ही अधिक चिंताजनक बाब आहे.

विविध जनगणनानिहाय दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण

(० ते ६ वयोगटातील)

| अ.क्र. | सन / स्तर | 1981 | 1991 | 2001 | 2011 |
|---|---|---|---|---|---|
| 01 | भारत | 962 | 945 | 927 | 914 |
| 02 | महाराष्ट्र | 956 | 946 | 913 | 883 |

(Source - Ministry of Staticas & Programme implementation)

तसेच निती आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळ वरिल आकडेवारीनुसार २०१३-१५ या दोन वर्षांमध्ये दर हजार मुलांमागे भारतात ९०० तर महाराष्ट्रात ८७८ इतके मुलींचे प्रमाण होते. नंतर २०२० मधील अधिकृत आकडेवारी नसलीतरी ढोबळमानाने हा जन्मदर आणखीन खालावला आहे असे प्रसारमाध्यमातून दुजोरा मिळत असल्याचे दिसून येते. मुलगाच हवा या हव्यासापोटी देशाच्या लिंग गुणोत्तरांची घसरण झाल्याचे दिसून येते.

ISSN : 2278-9308
March, 2022

महाराष्ट्रातील कमी लिंग गुणोत्तर प्रमाण असणारे पाच जिल्हे – (0 ते 06 वयोगटातील) 2011[7]

| अ. क्र | जिल्हा | लिंग गुणोत्तर प्रमाण | ग्रामीण | शहरी |
|---|---|---|---|---|
| 01 | बीड | 801 | 789 | 848 |
| 02 | जळगाव | 829 | 830 | 827 |
| 03 | ⍰हमदनगर | 839 | 837 | 848 |
| 04 | बुलढाणा | 842 | 841 | 847 |
| 05 | कोल्हापूर | 845 | 842 | 852 |

आजही भारतीय समाजात पुरुषप्रधान संस्कृतीची बीजे नष्ट झालेली नाहीत. स्त्री आणि शूद्रांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे पहिले द्रष्ट्ये समाजसुधारक हे महात्मा फुले आहेत. त्यांनी म्हटले आहे की, पुरुषसत्ताक व्यवस्थेतील हुकूमशाही व स्त्रियांची गुलामगिरी संपुष्टात आणल्याखेरीज स्त्री–पुरुष विषमता नष्ट होणार नाही. स्त्री–स्वातंत्र्याचे आग्रही प्रतिपादन करणारे महात्मा फुले हे कृतिशील समाजसुधारक होते. फुले दाम्पत्याने स्त्री–शिक्षणाची ज्योत पेटवली पण धर्माचा पगडा समाजाअंतर्गत खोलवर रुजल्याने आजदेखील स्त्री पूर्णपणे स्वतंत्र नाही. भारतात धर्मनिरपेक्ष कायदा ब्रिटिश राज्यकर्त्यांनी आणला. तत्पूर्वी धर्मशास्त्र हाच कायदा होता. आणि धर्मशास्त्री हेच न्यायाधीश होते. त्यामुळे कायद्यांमध्ये देखील कमालीची विषमता होती. धर्मांध लोक आजही 'मुलगाच वंशाचा दिवा', 'काठीचा आधार' 'मुलांनी अग्नी दिला तरच मोक्ष प्राप्ती होते', या खुळचट कल्पनांतून समाज बाहेर पडला नाही. समाजाला पोखरून टाकणाऱ्या या धार्मिक रुढी–परंपराचा अंत आज आधुनिक जगातदेखील पूर्णपणे झाला नाही.

एकविसाव्या शतकातदेखील निर्भयासारख्यांचा बळी जात आहे. भारतीय घटनेची निर्मिती करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले. त्याचबरोबर स्त्री स्वातंत्र्याबाबतीतही त्यांची आग्रही भूमिका होती. त्यांनी भारतीय स्त्रियांच्या गुलामगिरीचे विश्लेषण करून तिला कायद्याने न्याय, हक्क मिळवून देण्याचे तसेच वर्ण, वर्ग आणि जातिसंस्था यांमुळे स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्याचे काम करणाऱ्या हिंदू कोडबिलाची निर्मिती करुन केले. स्त्री–हक्काचा कायदेशीर जाहीरनामा या कोडबिलाद्वारे त्यांनी निर्माण केला. मुळात हे कोडबिल राव कमिटीने तयार केले होते. पण डॉ. आंबेडकरांनी घटना समितीचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर या बिलात आमुलाग्र बदल करुन सादर केले. मुळात याची पुनर्मांडणी करताना एकंदरीत भारतीय स्त्रियांची परिस्थिती आणि धर्म, वर्ण, जात या सर्व व्यवस्थांमध्ये तिची होणारी पिळवणूक थांबावी आणि तिला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार प्राप्त व्हावेत हा उदात्त दृष्टिकोण डोळ्यांसमोर ठेवला होता. यात प्रामुख्याने स्त्रीला घटस्फोटाचा अधिकार, घटस्फोटीत स्त्रीला पोटगीचा अधिकार, स्त्रीयांना दत्तक पालकत्वाचा अधिकार, वडिलोपार्जीत मालमत्तेत समान अधिकार इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण बाबी स्त्रियांसाठी या बिलात होत्या. या बिलाविषयी आपले मत मांडताना नलिनी पंडित यांनी म्हटले आहे की, "या कायद्याने दोन प्रकारचे विवाह अधिकृत ठरवले जातील. विधिपूर्वक लावलेले लग्न, दुसरा विवाह शासकीय कार्यालयात नोंदणी पध्दतीने या दोन पद्धतीने केलेले लग्न समाजातील स्त्रीविषयक कायद्यांमध्ये सुसूत्रता यावी "भारतीय समाज घटनेने जो समानतेचा अधिकार स्त्रियांना दिला आहे. त्याचा संकोच होऊ नये म्हणून हिंदू कोडबिलाची निर्मिती केली गेली. परंतू हिंदू धर्मात ज्या–ज्या वेळेस सुधारणेचा प्रश्न निर्माण होतो त्या–त्या वेळेस हिंदू धर्म संकटात आहे असा कांगावा हिंदू सनातणी करत असतात. त्याप्रमाणे मुस्लिम

धर्मातदेखील आढळते. अनेक सनातन्यांनी हिंदू कोडबिलाला विरोध केला. या बिलामुळे कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त होईल, हिंदू धर्म नष्ट होईल असा सनातणी कांगावा करु लागले. आणि विशेष म्हणजे एका दलित व्यक्तीने हिंदू धर्मात ढवळाढवळ करावी हे हिंदू सणातन्यांना पचण्यासारखे नव्हते.

सुरुवातीला पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंनी याला संपूर्ण पाठिंबा दिला होता परंतु राजकीय क्षेत्रातील वल्लभभाई पटेल, राजेंद्र प्रसाद यांसारख्या व्यक्तीकडून विरोध होत असल्यामुळे त्यांच्यावर राजकीय प्रवृत्ती प्रभावी ठरली. त्यामुळे हिंदू कोडबिलाला स्थगिती द्यावी लागली. बिलाला स्थगिती मिळताच आंबेडकरांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. या बिलामुळे हिंदू कायद्यांमध्ये एकसूत्रता येऊन स्त्री–पुरुष समानतेचे ध्येय गाठता येण्यासाठी मदत होईल हा उदात्त हेतू आंबेडकरांचा होता. पण पुराणमतवादी सनातनी लोकांचा प्रभाव व पगडा जास्त असल्यामुळे या गोष्टी साध्य होऊ शकल्या नाहीत. आजदेखील भारत प्रगतिपथावरील देश असूनही रुढी, प्रथा, परंपरांचा पगडा कमी झाला नाही. काही मंदिरांत आजही स्त्रियांना प्रवेश नाही. या संदर्भातील एक घटना ऐकूण मन खिन्न होते. एकाच दिवशी वर्तमानपत्रातील दोन बातम्या, त्याही महिला व मंदिर प्रवेशाबाबतच्या आहेत. शनी शिंगणापूर हे प्रसिद्ध शनी देवाचे मंदिर आहे. या मंदिरातील चौथऱ्यावर महिलांचा प्रवेश निषिद्ध मानला जातो. असे असूनदेखील कधी नव्हे ते प्रथमच त्या मंदिराच्या विश्वस्त सभासदात महिलांना संधी मिळाली. केवळ विश्वस्त म्हणूनच नाही तर अनिता शेटे यांना अध्यक्षपदाची संधी मिळाली. यावरून आपल्याला असे वाटते की, महिलांना योग्य मान मिळाला. परंतु शनी शिंगणापूरचा चौथरा महिलांना दर्शनासाठी खुला करण्यासाठी महिला आंदोलन करण्यासाठी निघाल्या असताना त्यांना शनी शिंगणापूरातच येऊ दिले जाणार नाही असे जेव्हा शेटे म्हणतात तेव्हा त्यांचा दृष्टिकोण पाहिला तर महिला अजून ही पुरुषी वर्चस्वातून बाहेर पडायला तयार नाहीत, हे स्पष्ट दिसून येते. राज्याच्या तत्कालीन ग्रामविकास महिला मंत्री यांचे आणि शेटे यांचे याबाबतचे वक्तव्य एकाच मानसिकतेतील असल्याचे निर्दशनास आले यावरून असे म्हणता येईल की, वर्षानुवर्षे पिंजऱ्यात डांबून ठेवलेल्या पोपटासाठी पिंजऱ्याचा दरवाजा अचानक खुला केला तर आपल्याला अस वाटत की, आता पोपट उंच भरारी मारेल. पिंजऱ्याच्या जवळपासही फिरकणार नाही. परंतू वस्तुस्थिती तशी नसते. पोपटाला आपल्या पंखातील बळावर विश्वासच राहिलेला नसतो. तो उडायचे विसरतो. महिलांचेही तसेच झालेले दिसते. पद मिळालेल्या महिला पुरुषी वर्चस्वाच्या मानसिकतेतून अजूनही बाहेर पडायला तयार नाहीत.

मानवाचा जसजसा विकास होत गेला तसतसे त्याचे सामाजीकरण झाले. तो सर्वांसमोर टोळ्यांनी गटांगटांत राहू लागला. त्याला आता समाज निर्माण करण्याची गरज भासू लागली. पण तो समाज धर्माला अभिप्रेत असणारा हवा म्हणून त्याने ही भूमिका डोळ्यांसमोर ठेवूनच धर्माच्या नीती नियमांचे पालन करत समाजव्यवस्था निर्माण केली. पण बळी तो कान पिळी या उक्तीप्रमाणे समाजातील वर्चस्ववादी व्यक्तीच पुढे आल्या. त्यांनी आपल्या स्वतःसाठी सुकर असे नियम तयार केले. प्रबळ गट बलहीन गटाचे शोषण करतो हा नियम असलातरी मानवाने मात्र या नियमाचा त्याच्या बुद्धीचातुर्याने अतिरेक केल्याचे चित्र प्राचीन कालखंडापासून धर्माच्या बाबतीत दिसून आले आहे. एके काळी संरक्षक असलेला धर्म मानव समाजातील मोजक्याच लोकांचे हित जोपासणारा असल्याचे मानव समाजाच्या हळूहळू आता लक्षात येऊ लागले आहे.

समाज म्हटला की, त्यात स्त्री–पुरुष हे दोन्ही घटक आलेच पण मानवसमाजच असा अपवाद आहे की, जेथे स्त्री–पुरुष समानता आपल्याला दिसून येत नाही. त्याचे कारण म्हणजे पुरुषाचे स्वार्थीपण हे होय. कुणालातरी कमी लेखून आपले श्रेष्ठत्व सिद्ध करण्याची वृत्ती मानव समाजातील पुरुषवर्गाच्या ठिकाणी मानवीसंस्कारातून आलेली दिसून येते. ही वृत्ती अतिरेकी स्वरुपाची आहे. हेही आपण ध्यानात घेतले पाहिजे. मानव समाजातील स्त्रीच्या स्थितीच्या संदर्भात लिहिताना डॉ. आ. ह. साळूंके म्हणतात, "जगातील सर्व पुरुषप्रधान समाजामध्ये स्त्रीला अत्यंत हीन दर्जा देण्यात आला होता. आणि आता काळ बदलला असलातरी अजूनही बहुतेक समाजात तिचे स्थान गौणच आहे.'' मानवसमाज उत्क्रांत होत गेला

तसा त्यात स्त्री आणि पुरुष हा भेद वाढतच गेला. वर्चस्व भावनेच्या प्राबल्यामुळे पुरुषानी स्त्रियांवर आपली सत्ता गाजवण्यास सुरुवात केली. मालकी हक्क दाखवण्यास सुरुवात केली. तरीदेखील पितृसत्ताक कुटुंबपद्धतीचे श्रेष्ठत्व कमी झाले नाही. स्त्री ही सुंदर आहे, नाजूक आहे. निसर्गातील अमोघ असे लावण्य तिच्यात आहे. समाजव्यवस्था सुव्यवस्थित चालावी म्हणून पूर्वी जे सर्वांसाठी नियम तयार केले होते त्यात अधिक ताठरपणा निर्माण करत त्याने सर्वाधिक बंधने स्त्रीवर लादण्यास सुरुवात केली. तिथपासूनच पुरुषप्रधानता मूळ धरु लागली. यास कारणीभूत असलेली पुरुषांची वर्चस्ववादी वृत्ती, आडदांडपणा तसेच स्त्रियांची निसर्गतःच पुरुषांपेक्षा वेगळी असलेली शरीर रचना या बाबींमुळे स्त्री–पुरुषाच्या बंधनात फसत गेली. नंतरच्या काळात तर तिला फक्त चूल आणि मूल एवढेच कार्यक्षेत्र राहिले. तिच्यातील क्षमतांचा लोप होत गेला. त्यामुळे ती पराधीन, परावलंबी, पुरुषांची गुलाम, भोगवस्तू बनत गेली. समाजाचा जसजसा विकास होत गेला तसे धर्माचे समाजावरील प्राबल्य वाढत गेले.

वैदिक काळात स्त्रियांना मानाचे स्थान होते. त्यांना उच्च दर्जा दिला जात असे. पुरुषांप्रमाणे त्या मनमोकळे वागत असत. तसेच हिंदू धर्मामध्ये स्त्रीला देवता मानले जात. सिंधू संस्कृती ही स्त्रीप्रधान संस्कृती होती. मानवी संस्कृतीचा इतिहास सांगतो. मातृसत्ताक पद्धती ही आदर्श पद्धती होती. स्त्री ही पृथ्वीप्रमाणे निर्मितीक्षम असून तिच्यात अलौकिक सामर्थ्य सिद्ध झाले होते. तरीही धर्मग्रंथांनी मात्र स्त्रीला दुय्यम महत्त्व दिले. हिंदू धर्मातील सोळा संस्कार हेच पुरुषांच्या श्रेष्ठतेशी निगडित आहेत. अनेक धर्मग्रंथ, धर्मविधी, धर्मशास्त्र यांमध्ये पुरुषाचे श्रेष्ठत्व दिसून येते. विविध धर्मशास्त्राने स्त्रियांना शूद्रांइतके हीन मानले आहे. वैदिक मंत्रांचा जप, होम–हवन यामध्ये स्त्रियांना निषिद्ध ठरविले.

भारतीय संस्कृतीमध्ये धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष अशी चार उद्दिष्टे आहेत ज्यांना पुरुषार्थ म्हटले जाते त्यातून पुरुषप्रधानत्व स्त्रियांचे दुय्यमत्व सिद्ध होते. शिवाय यज्ञ, पूजा, अर्चा, वृत्ते, श्रद्धा ही पुण्यकर्मे करताना स्त्री सोबत असणे म्हणजे तिला साधन म्हणून वापरणे एवढेच काय ते महत्त्व तिला दिले गेले. याचा अर्थ प्राचीन काळापासून समाजात पुरुषांचे वर्चस्व निर्विवादपणे दिसून येते. हा विचार समाजमनात इतका खोलवर रुजला आहे की, त्याचे परिणाम आजतागायत दिसून येत आहेत. त्याचेच द्योतक म्हणजे आजही भारतात मोठ्या प्रमाणात स्त्री भ्रूणहत्या सारखे पातक कार्य घडत आहे. याचाच अर्थ समाजमनावरील धर्माचा पगडा पूर्णपणे नष्ट झाला नाही हे निर्विवादपणे दिसून येते.

भारताने तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती केली. त्याच अनुषंगाने वैद्यकीय क्षेत्रातदेखील प्रगती झाली आणि त्याचे द्योतक म्हणून सोनोग्राफीसारख्या यंत्रांचा शोध लागला. या यंत्रांद्वारे डॉक्टरांना मानवी शारीरिक व्याधींचे तसेच आईच्या गर्भात असलेल्या अर्भकाचे विविध व्याधीपासून सुटका करण्याचे तंत्र गवसले, त्यामुळे मानवजातीची मान उंचावली. परंतु अर्थप्राप्तीच्या हव्यासापोटी काही धंदेवाईक डॉक्टर त्याच तंत्रज्ञानाचा (सोनोग्राफी मशीनचा) दुरुपयोग करताना दिसून येतात. या मशीनद्वारे वैदय बहुतांश प्रमाणात गर्भवती स्त्रीच्या गर्भाची लिंगचिकित्सा करत आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे 'वंशाला दिवा हवा' या कुटुंबाच्या मानसिकतेचा गैरफायदा घेऊन अवैध मार्गाने बेसुमार अर्थाजन करण्याच्या हव्यासातून झालेला दिसून येतो. याचा ज्वलंत प्रत्यय बीड जिल्ह्यातील परळी येथील डॉ. सुदाम व सरस्वती मुंढे दाम्पत्यांच्या गर्भातील मुलींची भ्रूणहत्या करण्याच्या अनैतिक आचरणातून दिसून येतो.

संदर्भ ग्रंथः

१. शोभा चाळके, भारतीय स्त्रियांचे स्वातंत्र्य, निर्मिती विचारवंत कोल्हापूर.
२.डॉ. स्मिता म्हेत्रे, भारतीय स्त्री आणि मानवाधिकार, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.
३.डॉ. ज्योती व्हटकर, महाराष्ट्रातील कर्तबगार स्त्रिया, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
४. .मंजुळा चक्रवर्ती, लिंगभेद निर्मुलनाच्या योजना, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर
५. हाकारा, स्त्रियांचा सामाजिक दर्जा, जुलै, डिसें. १९९८
६.डॉ. आशा परुळेकर, आधुनिक स्त्रियांच्या समस्या, मेहता प्रकाशन, पुणे. महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद, स्मरणिका, जुलै २००७.
७. Bharat Jhunjhunwala, ꞔAs Women Vanishing Statisticsꞓ, Indian Express, २०th October, १९९८.
८. Gongarde K.D. (१९९८), ५२ k Determination Critique Journal of Social Change, Vol. - १८ No. ३, P.P. ६३-७०.

# सणगर समाजातील स्त्रीयांचे प्रश्न व स्त्रीवाद

प्रा. डॉ. सुनिलदत्त एस. गवरे
शिवळे महाविद्यालय शिवळे,तत्त्वज्ञान विभाग प्रमुख

सणंग म्हणजे घोंगडी विणणारा समाज, याला सणगर असे म्हणतात. सन्नकी म्हणजे मेंढी, मेंढपालन हे धनगर लोक करतात. 'सणगर' ही धनगराची पोटजात आहे. त्यांचा पारंपारिक व्यवसाय घोंगडी विणकाम करणे हा आहे. शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा व पर्यटन विभाग क्र.सी.बी.सी.१०/९(२०३)/मा.व.क्र ५, दि. ५ मे १९९० रोजी महाराष्ट्र शासनाने 'सणगर' ऐवजी 'सनगर' असा शब्द वापरला आहे. जो जन्माने आणि कर्माने घोंगडी विणणारा आहे, शिवाय जो उभ्या व आडव्या धाग्यांनी विणकाम करतो त्यास विणकर म्हणतात. सन्नग म्हणजे तागा, सणगर म्हणजेच लोकरीच्या सुताचा तागा (घोंगडी) तयार करणारा. सणगरांचा इतर व्यवसायाशी मुळीच संबंध नव्हता. सणगर समाज हा सरळ, गरीब, प्रामाणिक, मनमिळावू व दुसऱ्यावर आक्रमण न करण्याच्या प्रवृत्तीचा असून तो अठरा आलुतेदारांपैकी एक आहे.

प्राचीन काळी मानवी गरजातून बारा बलूतेदार व अठरा आलूतेदार अशी समाज रचना झाली. सणगर ही अठरा आलूतेदारमधील उघडा हाडांचा सापळा, अर्धा अगोदरच खड्यात ठेवून अर्धपोटी सर्व कुटुंबासह दिवसभर घाम गाळून घोंगडी विणकामाच्या व्यवसायावर कसाबसा उदरनिर्वाह करून जगणारी ही जमात.

**उद्दिष्टे**

१. सणगर समाजाची ओळख होण्यासाठी.
२. सणगर समाजातील स्त्रीयांच्या समस्या जाणून घेणेसाठी.
३. महाराष्ट्रातील एक समाज आहे याची तोंडओळख करून घेणे.
४. सणगर समाजातील स्त्रीयांचे स्थान व त्यांचा उत्कर्ष.
५. सणगर समाजातील प्रश्न व त्यातून निर्माण झालेल्या स्त्रीवादी जाणीव.

**संशोधन पद्धत**

समाजातील काही महिलांची प्रत्यक्ष मुलाखत घेऊन मांडणी करून स्त्रीवाद समजावून घेऊन त्यातून समस्याची उकल करणे. सामाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब करून स्त्रीवादी जाणीवांचा परामर्श घेणे.

**प्रस्तावना**

सणगर समाजातील स्त्रीया यांच्या समस्या अनेक प्रकारच्या आहेत. मग ती महिला उच्चशिक्षित असो किंवा घरकाम सांभाळणारी असो,या समस्या आहेतच, पण स्वरूप वेगवेगळे आहे. प्राचीन काळी या समाजातील महिलांच्या समस्याचे वेगळे स्वरूप होते. कारण या समाजाचा परंपरागत व्यवसाय घोंगडी तयार करणे असल्यामुळे या महिलांना दिवसभर काम करावे लागत होते. पण कालांतराने हा व्यवसाय बंद पडू लागला कारण घोगड्यांची जागा चादरी, ब्लँकेटस यांनी घेतली. या सर्व समस्यांचा विचार मी या ठिकाणी करण्याचा प्रयत्न करणार आहे. सर्वच समस्या या ठिकाणी मांडता येणे शक्य नाही काही मर्यादा आहेत.

सणगर समाजाच्या स्त्रीयांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या क्षेत्रातील म्हणजे नोकरदार, शेतमजुर, उच्चशिक्षित, गृहिणी, व्यवसाय (उद्योजिका) असे एकूण पाच गटात वर्गीकरण केले आहे. ते वर्गीकरण पुढीलप्रमाणे आपणास पाहता येईल.

**नोकरी करणाऱ्या सणगर महिलांच्या समस्या**

या महिला सर्व उच्च शिक्षित आहेत, परंतु वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या या महिला आहेत. त्यांच्या बरोबर चर्चा करतांना काही महिला या इंग्रजी माध्यमामध्ये शिक्षण घेतलेल्या होत्या. या महिलांची मुले ही इंग्रजी माध्यमामध्ये शिक्षण घेत होती. यातील काही महिलांचे मत असे होते की, मुलींच्या व स्वतःच्या शिक्षणाला व त्यांच्या खाजगी क्लासला पाहिजे असे प्रोत्साहन मिळत नाही. मुलींना शिक्षणासाठी बाहेरगावी पाठवत नाहीत. त्यामुळे मुलींचे शिक्षण मागे पडले आहे. तर काही महिलांचे मत आहे की, मुलींच्या शिक्षणाकडे पहाण्याचा दृष्टिकोन घरच्यांचा चांगला आहे. काही महिलांच्या मते, तिच्या योग्यतेनुसार जोडीदार मिळण्यास अडचणी निर्माण होतात, त्या मुलीस तिच्यापेक्षा कमी योग्यतेचा जोडीदार स्वीकारावा लागतो. महिला नोकरी करत असली तरी उत्तम स्वयंपाक, भरतकाम, साफसफाई इ. गोष्टीत ती पारंगत असावी. काही महिलांच्या मते जरी आम्ही नोकरी करीत असलो तरी आम्हाला एका चौकटीत बांधून ठेवले जाते, त्या चौकटी बाहेर आम्हांस जाता येते नाही. घरामध्ये कामवाली किंवा घर कामासाठी महिला ठेवून दिल्या जात नाहीत किंवा आमच्या घरी अशी पद्धत नाही असे सांगितले जाते. त्यामुळे सर्व जबाबदारी आमच्यावर येऊन पडते. कौटूंबिक व सामाजिक विरोधाबरोबरच ज्याठिकाणी या महिला नोकरी करतात अशा ठिकाणीही त्यांना बहुअंशी दुय्यम स्थान किंवा वागणूक मिळते. त्याठिकाणी त्यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. पद्उन्नती व इतर अन्य लाभ दिला जात नाहीत.

या महिलांना समानतेची वागणूक मिळते असे काहीचे मत आहे. पण बऱ्यांच अशी महिलांना समानतेची वागणूक दिली जात नाही. त्यांच्या मतांचा आदर केला जात नाही. त्यांचा स्वाभिमान जपला जात नाही व त्यांना टोचून बोलले जाते. तसेच सणासमारंभाला पाहिजे असा वाव मिळत नाही. या महिलांचे मासिक उत्पन्न त्यांच्या खात्यावर जमा होते, परंतु खर्च करताना घरामध्ये विचारून खर्च करावा लागतो. तिची कमाई कोणत्याही कारणाने किंवा जबरदस्तीने तिच्याकडून घेतली जाते. काही महिलांचे मत आहे की आम्ही आमचे वेतन घरातच द्यावे लागते. त्यांना आर्थिक स्वातंत्र नसते. तसेच काही महिलांच्या मते, आम्ही नोकरी करीत असलो तरी आम्हांस आमच्या आई—वडिलांना मदत करण्याची परवानगी नसते किंवा आर्थिक मदत करण्याची परवानगी नसते. तसेच आधुनिक कपडे वापरण्यास बंदी आहे. काही स्त्रियांच्या मते घरामध्ये पती आणि घरातील माणसे घरकामात मदत करीत नाहीत. नोकरी आणि घरकाम दोन्ही आम्हांलाच करावे लागते. काही महिलांच्या मते, आम्हांला घरातील इतर स्त्रियांकडून जर योग्य प्रकारे सहाय्य व प्रोत्साहन मिळाले तर आम्हीं योग्यप्रकारे आमचे वैवाहिक जीवन जगू शकतो व कुटुंब सांभाळू शकतो व भविष्यात नवीन येणाऱ्या संकटांना सामोरे जाऊ शकतो. म्हणून घरातील व बाहेरील महिलांनीही आम्हांस समजून घेऊन प्रोत्साहन द्यावे.

आधुनिक काळात कौटुंबिक जबाबदारी संभाळणाऱ्या या महिला उदरनिर्वाहसाठी नोकरीचा मार्गही स्वीकारतात पण नोकरी करतांना आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या, घरकाम, मुलांचे संगोपन, त्यांचे शिक्षण इत्यादी कामेही त्या नाकारत नाहीत. नोकरी म्हणून पैसे मिळविण्याचा मार्ग जरी त्यांनी निवडलेला असेल पण आर्थिक उपयोजन करतांना त्यांना काही बंधने येतात. खटाव तालुक्यातील कै. ताराबाई दत्तात्रय कारंडे, पुणे जिल्ह्यातील सौ. सुलोचना दत्तात्रय खामकर व सौ. पुष्पा पितांबर कुर्ले यांनी या महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणाच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत.

**उच्च शिक्षित सणगर महिलांच्या समस्या**

या गटातील महिलांसोबत चर्चा करतांना असे दिसून आले की, बऱ्याच महिलांनी पदव्युत्तोर पर्यंत शिक्षण घेतलेले आहे. कोणी डॉक्टर, कोणी प्राध्यापक तर कोणी शिक्षिका होण्यास पात्र असतांनाही त्यांना काम करून दिले जात नाही किंवा व्यवसाय करू दिला जात नाही. या गटातील महिला जरी उच्च शिक्षित असल्या तरी त्यांचे घरात कमी प्रमाणात ऐकले जाते. मुलींना उच्च शिक्षित करण्यात त्यांना अडथळे निर्माण होतात. या महिला उच्च शिक्षित असून देखील यांचे काही घरात चालत नाही. महिला उच्च शिक्षित असली तरी उत्तम स्वयंपाक, भरतकाम, साफसफाई इ. गोष्टीत ती पारंगत असावी असे मत असते.

कुटुंबामध्ये काहींना समानतेची वागणूक मिळते. पण बऱ्यांच अंशी त्यांच्या मताशी कोणीही सहमत होत नाहीत. काहींना घरातील समारंभामध्ये किंवा निर्णयामध्ये कोणतेही स्थान नसते. या महिला जरी उच्च शिक्षित असल्यातरी काही महिलांचे मत असे आहे की, आम्हांला घरात योग्य प्रकारची वागणूक मिळते तर काहीच्या मते आम्हांस घरात योग्य वागणूक मिळत नाही. काही महिलांच्या मते, जरी आम्ही उच्च शिक्षित असलो तरी आम्हाला एका चौकटीत बांधून ठेवले जाते, त्या चौकटी बाहेर आम्हास जाता येते नाही. आधुनिक कपडे वापरण्यास बंदी असते. जेवण करतांना आम्हांला नंतर जेवावे लागते. बाहेर जातांना विचारून जावे लागते. काहीच्या मते, आम्ही उच्च शिक्षित असूनही आम्हास स्वत:चा जोडीदार निवडण्यास स्वातंत्र्य नाही. तसेच काही महिलांचे असे मत आहे की, आम्हांस रोजगार मिळविण्यास घरातील पती किंवा मोठ्या व्यक्ती परवानगी देत नाहीत. तसेच काही कार्यकर्त्या महिलांना सामाजिक कार्य करण्यास घरातील मान्यवर मदत करत नाहीत किंवा परवानगी दिली जात नाही.

उच्च शिक्षणाचा आधार घेत या समाजातील महिलांनी औपचारिक रीत्या उच्च शिक्षण घेतले आहे. मात्र या शिक्षणाने त्यांना उच्च पदस्थ कार्य करण्यास फारशी मुभा नाही. या दृष्टीने पहाता उच्च पदावर कार्यरत नसणाऱ्या महिलांचे प्रमाण बहुसंख्य आहे. एव्हाना त्यांना फारसे निर्णय स्वातंत्र्य नाही. या संदर्भात कोल्हापूरच्या महिल्या कार्यकर्त्या श्रीमती रेखाताई बाबुराव परमाळे (सणगर समाज महिला मंडळ संस्थापिका व अध्यक्ष), श्रीमती आशाताई आनंदराव कारंडे (सणगर समाज महिला मंडळ सचिव), सौ. रत्नमाला बाळकृष्ण नाळे (सणगर समाज महिला मंडळ उपाध्यक्ष), सौ. राजश्री विलास लिमकर (सणगर समाज महिला मंडळ खजनिस) सौ. योगिता नरेंद्र कारंडे तसेच खटाव ताल्युक्यातील कै. ताराबाई दत्तात्रय कारंडे, सातारा जिल्ह्यातील सौ. अनुराधा किसन मोहळकर यांनी महिलांना व्यवसायाचे व इतर समस्यांचे मार्गदर्शन करत आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे व करत आहेत. तसेच सणगर समाज महिला मंडळ यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करते.

**शेतमजुर करणाऱ्या सणगर महिलांच्या समस्या**

या महिलांचे शिक्षण जेमतेम झालेले असते म्हणजे जास्तीत—जास्त ९ वी तर काही महिला अशिक्षित असतात. आर्थिक दुर्बलतेमुळे शिक्षण घेता आले नाही. शिक्षणास बाहेर गावी पाठविले जात नाही. घरातील सर्व आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे शेतमजुर म्हणून काम करावे लागते. यांना घरामध्ये समानतेची वागणूक फार कमी प्रमाणात मिळते. यांच्या विचाराला घरात कोणीच स्वीकारत नाही. काही स्त्रीयांच्या मते समाजामध्ये एक समस्या जाणवते ती म्हणजे मासिक पाळीमध्ये आम्हाला दुय्यम वागणूक दिली जाते. याकाळात त्यांना अस्पृश्य असल्यासारखे वागविण्यात येते. आम्हांस नोकरी करून दिली जात नाही किंवा इतर व्यवसाय किंवा कोर्स करू दिला जात नाही. सर्व घरातील अधिकार हे पती किंवा घरातील मोठ्या व्यक्तीकडे असल्यामुळे निर्णय क्षमता आमच्याकडे असत नाही.

या सर्व महिला शेतमजुर असल्याने त्या सर्व घरातील पतीवर किंवा मोठ्या व्यक्तीवर अवलंबून असतात. पैसे खर्च करण्याचा कोणताही हक्क रहात नाही किंवा अधिकार असत नाही. कपडे आणि दागिने यांना कधी वेळेवर मिळत नाहीत. येथे पुरूषप्रधान संस्कृती मोठ्या प्रमाणात अढळून येते. पुरूषप्रधान संस्कृतीमुळे यांना समस्या फार असतात.

**घर सांभाळणाऱ्या सणगर महिलांच्या (गृहिणी) समस्या**

या महिलांचे शिक्षण पदवी पर्यंत किंवा त्यापेक्षा ही अधिक झालेले असते. येथे मात्र आपणास पुरूषप्रधान संस्कृती थोड्याफार प्रमाणात दिसून येते. काही महिलांचे मते, आम्हास समानतेची वागणूक दिली जात नाही. शिक्षणासाठी बाहेरगावी पाठविले जात नाही. त्यांच्या विचाराला किंवा सल्ल्याला काही किमंत नसते. या महिला पतीवर किंवा मोठ्या व्यक्तीवर पूर्णपणे अवलंबून असतात. खर्च करावयाचा असले तर तो कशासाठी व का? याचे कारण द्यावे लागते स्वइच्छेने खर्च करता येत नाही किंवा खरेदीही करता येत नाही. काही महिलांच्या मते, शिक्षणात आम्हांस पुढे जाण्यास मनाई असेल तर दुसरे जे काही कोर्स आहेत त्यामध्ये शिक्षण घेण्यास ही परवानगी नसते. काही महिलांचे असे मत आहे की, आम्हाला नोकरीची गरज नाही किंवा इतर कोर्स करण्यास आम्हांस आवड नाही. तसेच आवड असेली तरी आम्हांस नोकरी किंवा कोणताही कोर्स करू दिला जात नाही.

य समाजाचा व्यवसाय घोंगडी व जेण (वंश परंपरागत व्यवसाय) तयार करणे असल्यामुळे या महिलांना सकाळपासून कामास लागावे लागते. मुले, संसार सांभाळत या परंपरागत व्यवसायासाठी झटावे लागते. मासिक पाळीमध्ये आम्हांला दुय्यम वागणूक दिली जाते. आम्हांला अस्पृश्य असल्यासारखे वागविण्यात येते. काही महिलांच्या मते उच्चशिक्षित महिलांशी तुलना नात्यातील दुसऱ्या महिलेशी करून आम्हांला टोचून बोलले जाते.

शेतमजुर आणि घर संभाळणाऱ्या स्त्रीयांच्या बाबतीत परंपरागत चालत आलेला व्यवसाय व शेती तसेच कौटुंबिक वातावरण यापुरतेच या स्त्रीयांचे भावविश्व सीमित आहे. पारंपरिक काही प्रथा, परंपरा, हुंडापद्धती, अंधश्रद्धा, कुप्रथा, कौटुंबिक अत्याचार, शोषण आणि त्यातून उद्‌भवणारे आरोग्य विषयक प्रश्न आणि त्यांचा होणारा मानसिक कोंडमारा या सर्वांतून त्या व्यवस्थेला सामोरे जातात. या महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी सातारा जिल्ह्यातील सौ. रंजना आनंदराव नवाळे, कोल्हापूर जिल्ह्यातील सौ. आश्विनी अतूल कारंडे यांनी बचत गट व जिल्हाधिकारी कार्यालयातील काम असेल तर त्यासाठी त्या मदत करतात. सौ. राजश्री विलास लिमकर महिलांना व्यवसायाचे व इतर समस्यांचे मार्गदर्शन करत आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे व करत आहेत. तसेच सांगोला जिल्ह्यातील सौ. प्रतिभा शिवाजीढोबळे, सातारा जिल्ह्यातील सौ. अनुराधा किसन मोहळकर यांनी महिलांना व्यवसायाचे व इतर समस्यांचे मार्गदर्शन करत आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला आहे व करत आहेत. सणगर समाज महिला मंडळ व अन्य जिल्हा पातळीवरील सणगर समाज संस्था काम करत असतात.

**व्यवसाय/उद्योजिका करणाऱ्या सणगर महिलांच्या समस्या**

यातील महिला १२ वी ते उच्चशिक्षित आहेत. एका बाजूला संपूर्ण स्वातंत्र्य यांना दिले जाते. व्यवसायासाठी पूर्ण मुभा दिली जाते. शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले जाते. पण सर्वच महिलांच्या बाबतीत हे घडते असे नाही. काही महिलांचे मते, त्यांना व्यवसाय करत असून ही आम्हांस घरात समानतेची वागणूक दिली जात नाही. पैसे कोठे खर्च करावयाचे?, कोणी खर्च करायचे?, का खर्च करावयाचे? हे सर्व कुटुंबाला सांगून पैसे खर्च करावे लागतात. म्हणजे या महिला व्यवसाय करत असून सुद्धा त्यांना पैसे खर्च करण्याची परवानगी नाही. महिला व्यवसाय करीत असली तरी उत्तम स्वयंपाक, भरतकाम, साफसफाई इ. गोष्टीत ती पारंगत असावी. काही

महिलांच्या मते, जरी आम्ही व्यवसाय करीत असलो तरी आम्हाला एका चौकटीत बांधून ठेवले जाते, त्या चौकटी बाहेर आम्हास जाता येत नाही.

तसेच इतर काही महत्त्वाचे कोर्स व्यवसायासाठी घ्यावयाचे असतील तर आम्हांस परवानगी मिळत नाही. काही महिलांच्या मते, व्यवसायासाठी नविन शिक्षण घ्यावयाचे असले तर बाहेरगावी जाऊन घेण्यास आम्हांस मनाई आहे. हे सर्व करत घरकाम करावेच लागते. काही महिलांच्या मते, आम्हांला घरातील इतर स्त्रियांकडून जर योग्य प्रकारे सहाय्य व प्रोत्साहन मिळाले तर आम्हीं योग्यप्रकारे आमचे वैवाहिक जीवन जगू शकतो व कुटुंब सांभाळू शकतो, तसेच व्यवसाय ही वाढीस उत्तेजन मिळेल. म्हणून घरातील व बाहेरील महिलांनीही आम्हांस समजून घेऊन प्रोत्साहन द्यावे. तसेच काही कार्यकर्त्या महिलांना सामाजिक कार्य करण्यास मदत केली जात नाही किंवा परवानगी दिली जात नाही. घरामध्ये कामवाली किंवा घर कामासाठी महिला ठेवून दिल्या जात नाहीत किंवा आमच्या घरी अशी पद्धत नाही असे सांगितले जाते. त्यामुळे सर्व जबाबदारी आमच्यावर येऊन पडते.

यातील काही महिला बचत गटांच्या माध्यमातून लघूउद्योग आदी छोटे—मोठे व्यवसाय करतांना दिसतात. या संदर्भात समाजाचे विविध जिल्ह्यातील सणगर समाज महिला मंडळ स्त्रीयांना संघटित करून त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याचबरोबर कोल्हापूरच्या महिल्या कार्यकर्त्या श्रीमती रेखाताई बाबुराव परमाळे, श्रीमती आशाताई आनंदराव कारंडे, सौ. रत्नमाला बाळकृष्ण नाळे, सौ. योगिता नरेंद्र कारंडे तसेच खटाव तालुक्यातील कै. ताराबाई दत्तात्रय कारंडे, सौ. सुचिता गवरे, यांनी महिलांना व्यवसायाचे व इतर समस्यांचे मार्गदर्शन करत आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केले आहेत व करत आहेत.सातारा जिल्ह्यातील सौ. रंजना आनंदराव नवाळे (स्वीय सहाय्यक मा. जिल्हाधिकरी —(पी.ए.)) व कोल्हापूर जिल्ह्यातील सौ. आश्विनी अतूल कारंडे (जिल्हाधिकारी कार्यालय —अव्वल कारकून) जिल्हाधिकारी कार्यालयातील व्यवसायाबाबत उदा. कर्ज प्रकरणे किंवा इतर आवश्यक कागदपत्रे असे काही काम असेल तर त्यासाठी त्या मदत करतात आणि त्यांना योग्य ते मार्गदर्शन करतात. तसेच राज्य, जिल्हा पातळीवरील सणगर समाज संस्था कार्य करीत असतात.

वरील समस्यांचा किंवा प्रश्नांचा विचार केला तर हे सर्व प्रश्न सर्व महिलांचे आहेत फक्त एका समाजाचे आहेत असे नाही, तर जागतिक पातळीवर ही हेच प्रश्न उपस्थित होतात. पुष्कळ वेळा स्त्रीया बोलत नाहीत पण त्यांच्या वागण्यातून आणि देहबोलीमधून भेदभाव सतत जाणवत राहतो. उदा. घरीच बसलेली असते ती! तिला काय उद्योग आहे!, किती जाड आहे ना ती!, लग्न जमतच नाहीये तिचे एवढे वर्ष!, शिक्षण कमीच आहे!, कसे कपडे घालते ती!, अगदी काकूबाईच आहे ती!, अशी वाक्ये कितीतरी वेळा आपण ऐकतो. मग खरेच त्या स्त्रीवादी आहेत काय? स्त्रीवादाचा खरा अर्थ कळला आहे का त्यांना, मी खूप शिकलेली आहे, मी काम करून पैसे कमावते, मी उत्तम स्वयंपाक करते, मी स्वतंत्र आहे, मी सासू आहे, मी ननंद आहे इ. असा बडेजाव हे म्हणताना इतर स्त्रीया कमी आहेत असे का म्हणावेसे वाटते? स्वत:च्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगतांना इतर स्त्रीया कशा कर्तृत्ववान नाहीत हे सिद्ध का करावेसे वाटते? याचा अर्थ आत्मविश्वासाची कमी असा घ्यावा की अहंकारी वृत्ती असा घ्यावा?

प्रत्येक स्त्री ही एक स्वतंत्र व्यक्ती आहे. तिला तिचे आयुष्य तिच्या मनाप्रमाणे जगण्याचा अधिकार आहे. काय शिकावे, नोकरी करावी की नको, लग्न करावे की नाही आणि केले तर कोणाशी करावे, मूल होऊ द्यावे की नाही आणि कधी होऊ द्यावे, काय खावे, काय प्यावे, कोणते कपडे घालावे हे सगळे प्रश्न तिचे वैयक्तिक प्रश्न नाहीत का? मग त्यावर टीकाटिप्पणी करण्याचा कोणाला काय अधिकार आहे? तिच्याकडे असलेल्या किंवा नसलेल्या गोष्टींवरून

भेदभावाने वागण्याचा काय अधिकार आहे? ज्याप्रमाणे वैयक्तिक निर्णय घ्यायचा प्रत्येक स्त्रीला अधिकार आहे, त्याचप्रमाणे तिचे प्रश्नसुद्धा आहेत. त्या प्रश्नांशी कदाचित ती एकटीच लढा देत असेल. तिचे प्रश्न माहित नसतांनाच जजमेंटल होण्याचा तरी कोणाला काय अधिकार आहे?

स्त्रियांनीच स्त्रीयांना जर असे कमी लेखले तर मग खरा स्त्रीवाद कधीच रूजणार नाही. मग पुरूषांकडून तरी स्त्रीयांनी का म्हणून अपेक्षा ठेवायची? सर्व स्त्रिया समान आहेत मग त्यांचे गुण—अवगुण तितकेसे महत्त्वाचे नाहीत, ही भावना जेव्हा प्रत्येक स्त्रीच्या मनात रूजेल तेव्हाच स्त्रीवादाचे खरे सौंदर्य कळायला मदत होईल. स्त्रीवादाची व्याख्या केवळ स्त्री—पुरूष भेदभाव न बाळगता मिळालेल्या किंवा दिलेल्या संधीचे नव्हे तर स्त्रीयांनी (आणि पुरूषांनी) स्त्रीत्वाचा आणि इतर स्त्रीयांचा केलेला सन्मानसुद्धा या व्याख्येमध्ये अध्यारूत असायला हवा.

वरील सर्व गटातील महिलांच्या प्रश्नांचा विचार करता आपणांस असे म्हणता येईल की, स्त्री पुरूष असा नैसर्गिक लिंगभेद असला तरी येथे प्रश्न उपस्थित होतो की, नीतिमत्तेत लिंगभेद कुठे असतो? पूर्वीच्या काही तत्त्ववेत्यांनी पुरूषापेक्षा स्त्रीया कमी बुद्धिमत्तेच्या असतात असे म्हटले आहे. परंतु त्यांचे हे म्हणणे नीतिमत्तेला आधारभूत ठरते का? सामान्यतया असे आढळून येते की पुरूषापेक्षा स्त्रीयांमध्ये नैतिक विकास कमी होतो. वॉलस्टोन क्राफ्टचा या विचाराला विरोध आहे. त्याच्या मते स्त्री पुरूषांमध्ये नैतिक विकास समान होतो. जरी त्यांच्यात लिंगभेद असला तरी बौद्धिक क्षमता व नैतिक विकास सारखाच होतो. स्त्रीमध्ये बुद्धिमत्ता कमी असते. याचे वॉलस्टोन क्राफ्टच्या मते स्त्रीयांना दिले गेलेले चुकीचे शिक्षण होय. स्त्री—पुरूषांमधील लिंगभेद, वांशिकभेद दूर ठेवून स्त्री—पुरूष समतेची सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञांनी मांडणी केली पाहिजे असे मत कॅरोल गिलीगन यांचे आहे. (विभिन्न आंतरिक आवाज, १९८२)

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीच्या दृष्टिकोनातून जीवनाच्या सर्व पैलूंवर टाकलेला दृष्टिक्षेप. स्त्री ही एक जाणीव आहे. ते एक जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे. तो एक सैद्धांतिक दृष्टिकोन आहे. त्याचप्रमाणे ती संघटित कृतीसाठी साददेखील आहे. त्यामुळे स्त्री—पुरूषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार आणि पुनर्रचना, म्हणजे स्त्रीवाद.

'स्त्रीभोवती एक गूढ वलय आहे. स्त्रियांच्या वर्तनाच तार्किक स्पष्टीकरण देता येत नाही. स्त्री ही लहरी आहे. स्त्री हे कोडे आहे.' अशा स्वरूपाची विधाने साहित्यिकांपासून मानसशास्त्रज्ञानांपर्यंत आणि बुद्धिवाद्यांपासून तत्त्वज्ञांपर्यंत अनेकांनी केली आहेत. मात्र स्त्री—स्वभावाविषयी अस्पष्टीकरणात्मक वर्णन ही पुरूषांची एक खेळी आहे, असे सिमॉन दी बोएला वाटते.

दोन वर्ग, दोन देश, दोन जाती, दोन धर्म या लढायांप्रमाणे स्त्री—पुरूष लढाई नाही. कारण अशा लढाईत एकाची हार व दुसऱ्याची जीत अपेक्षित नाही. इथे दोघांचे हितसंबंध एकच आहेत. कुटुंबातील सदस्यत्व व मुले यांच्या संबंधाने दोघांची कर्तव्ये सारखीच आहेत. म्हणून सत्तेचे हस्तांतर हा स्त्रीवादात मुद्दाच नाही. उलट शांततापूर्ण सहअस्तित्व व सामंजस्य अधिक महत्त्वाचे आहे. परस्परांचा सन्मान राखून व समतेच्या पायावर आधारलेल्या नात्याने हे घडू शकते.

स्त्रीवाद हा आंदोलनातील वा लेखनातील काही स्त्रियांपुरता मर्यादित नाही आणि केवळ 'स्त्रीवादी' या विशेषणापुरताही सीमित नाही. तळागाळातील स्त्रीयांच्या स्तरापर्यंतचा त्याचा विस्तार आहे. स्त्रीवादाला अपेक्षित असलेला भगिनीभाव देश, काल, जाती, धर्म, वर्ग यांच्या पलीकडे निर्देश करतो. स्त्रियांचे भावनिक, मानसिक, नैतिक, आर्थिक, भाषिक आणि अस्मितेसंबंधीचे प्रश्न जगात सगळीकडे सारखेच आहेत.

वरील स्त्रीयांच्या समस्यांचे उत्तर आपणास जे. एस. मिल्लच्या स्त्री विषयक भूमिकामध्ये दिसून येतात. जे. एस. मिल्लने समाजामध्ये स्त्रीयांवर होणारा अन्याय जाणला. मिल्ल स्त्री व पुरूषांमधील संपूर्ण समानतेचे समर्थन करतो. मिल्लने स्त्रियांचा स्वत:चा रोजगार निवडण्याचा तसेच त्यांचा राजकीय हक्कांची मागणी केली. मिल्लने असे प्रतिपादन केले की स्त्रीयांचे सध्याचे स्थान पुरूषप्रधान समाजाने निर्धारित केलेले म्हणजे कृत्रिम आहे.

एकूणच पाश्चात्य आणि भारतीय स्त्रीवादी विचारसणीत स्त्रीच्या व्यक्तित्वाचा मानसन्मान, सर्व प्रकारची स्वातंत्र्ये आणि समानता यांवर भर देण्यात आला आहे. स्त्रियांच्या उद्धाराचे प्रयत्न राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, आगरकर, न्या. रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महर्षी कर्वे इ. पुरूषांनी मोठ्या प्रमाणात सुरू केले. व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा व्यापक समाजहितासाठी त्याग करण्याची परंपरा भारतात असल्याने स्त्रीवादाची भूमिका भारतीय परिप्रेक्ष्यात पाश्चात्यांच्या विचारांपेक्षा वेगळी करण्याची गरज भासते. तरी अंतिमत: स्त्रीवादाचा साकल्याने विचार केल्यास, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्री—पुरूष समता व आत्मनिर्भरता या गोष्टी स्त्री उद्धारासाठी अपरिहार्य ठरतात.

**सारांश**

पारंपरिक समाज व्यवस्था आणि पुरूषसत्ताक पद्धती यांचा थोडाफार परिणाम या समाजातील स्त्री जीवनावर दिसून येतो. या स्त्रीयांच्या वरील समस्या आणि प्रश्नांचा आढावा घेतांना त्यांचे आत्मभान, जागृतता, स्त्रीवादी जाणीवही अनुभवयाला मिळते. त्यांचा जीवनसंघर्ष अधिक तीव्र न होता आपल्या प्रापंचिक जबाबदाऱ्यांचा सतत भान ठेवून अभिव्यक्त होतो.

सणगर महिलांच्या समस्यांचा विचार करतांना असा निष्कर्ष निघतो की, यातील प्रत्येक गटातील विचारानुसार असे निदर्शनास आले की, नोकरी करणाऱ्या व उच्च शिक्षित महिलांना फार नाही पण थोड्या प्रमाणात मानाचे स्थान आहे. ते आपल्या मुलामुलींना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन देतात. ज्या महिला अशिक्षित आहेत त्या स्त्रीया आपल्या घरातील पतीवर किंवा घरातील मोठ्या व्यक्तींवर अवलंबून आहेत. त्यांना कोणताही निर्णय हा पतीला विचारून घ्यावा लागतो. कुटुंबात सन्मानाचे स्थान त्यांना असत नाही.

आजची स्त्री आत्मनिर्भर आहे. स्वत:च्या मार्गाने जाणारी, स्वत:चे निर्णय स्वत: घेणारी म्हणूनच तिचे समाजातील, कुटुंबातील स्थान उंचावत आहे. ज्या घरात महिला नोकरादार, व्यवसायिक आहेत, करिअर करतांना दिसताहेत, त्या घरातील पुरूष अधिक जबाबदारीने वागताहेत. हे चित्र अत्यंत सुखावह आहे. समजुतदारपणा, सोशिकता आणि उच्च जाणीवा ही स्त्रीची मुलभूत शक्तीस्थाने मानल जातात आणि हे मानसशास्त्रीय कसोट्यावरही सिद्ध झालेले निष्कर्ष आहेत. हे सर्व विचारात घेता सणगर समाजमध्ये महिला वर्गास अधिकतेने सामावून घेणे हाच समाजाच्या सर्वांगिण उन्नतीचा खरा पाया आहे. स्त्रीयांनी सुद्धा उत्स्फूर्तेने पुढे येऊन या समाज कार्यात आपले योगदान द्यावे.

हळूहळू या समाजातील स्त्रिया उच्च शिक्षण घेऊन उच्च पदावर किंवा आपला व्यवसाय करण्याकडे झुकत आहेत. या समाजातील अनेक महिला या डॉक्टर, इंजिनिअर, प्राध्यापक, पोलीस, वकिल अशा मोठ्या पदावंर गेल्या आहेत. हा पारंपारिक समाज आता बदलत चालला आहे. स्त्रीपुरूष समानता येत आहे, मुलींना उच्च शिक्षण दिले जात आहे, जोडीदार निवडण्याचा अधिकार दिला जात आहे, महिलांचा आदर केला जात आहे, सुशिक्षित वर्ग वाढत आहे आणि त्याच्या परिणाम भविष्यकाळात चांगलाच होईल असे म्हणवयास हरकत नाही.

ISSN : 2278-9308
March, 2022

संदर्भ
१) सं. सुमती लांडे, श्रुती तांबे, स्त्रीवाद, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.
२) सं. वंदना भागवत, अनिल सपकाळ, संदर्भासहित स्त्रीवाद, निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट.
३) सणगर समाजातील स्त्रीयांच्या मुलाखती व केलेला वार्तालाप.(सौ. सारिका राऊत, डॉ. योगीता गवरे, प्रा. डॉ. वंदना बदडे, सौ. वैशाली हिंगसे, सौ. सिमा नाळे, सौ. दिपाली बल्लाळ, डॉ. दिपाली गोंजारी, सौ. शुभांगी गवरे, श्रीमती जयश्री गवरे, श्रीमती छाया खुळपे, सौ. राजश्री राऊत, सौ. अनिता गवरे, सौ. साधना सासणे, सौ. गायत्री सासणे, सौ. परमाळे, सौ. विजया पिचके, सौ. सुनिता भोंगाळे, सौ. मंजुश्री सनगर, सौ. गीता गवरे, सौ. शितल खुळपे, सौ. मिनाक्षी राऊत, सौ. प्रतीभा ढोबळे, सौ. मंगल गवरे, श्रीमती मंजुषा सनगर, सौ. कमल गवरे, सौ. शितल खामकर, सौ. जयश्री ढोबळे, सौ. अनुजा धुकटे, सौ. धनश्री खामकर, सौ. उज्वला गवरे, सौ. कल्पना गवरे, सौ. सुवर्णा कारंडे, सौ. सिमा कारंडे सौ. हेमलता मेहत्तर, सौ. मनिषा कारंडे, सौ. अरूणा गवरे, सौ. विजया कारंडे, सौ. माधुरी सनगर, सौ. संगिता सोळसे, सौ. मनिषा कमले, सौ. आशा सनगर, सौ. ऐश्वर्या सनगर)
https://mr.wikipedia.org/wiki/L=hokn
https://mr.wikibooks.org/wiki/
https://www.loksatta.com/lekha-news/society-feminist-and-feminist-literature-1193410/
https://marathivishwakosh.org/3579/

ISSN : 2278-9308
March, 2022

# भारतीय संविधान आणि महिला सक्षमिकरण

सहा. प्रा. लक्ष्मन बाबाराव यादव

बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालय पारवा, ता. घाटंजी जि. यवतमाळ

**प्रस्तावना :**

जगामध्ये कोणत्याही राष्ट्राची उन्नती किंवा अद्योगती हे त्या राष्ट्रातील स्त्रियांच्या स्थितीवर अवलंबून असते. स्वतंत्र भारताचे पंतप्रधान स्व. पंडीत नेहरू म्हणतात की 'भारताची प्रगती महिलांच्या स्थितीवरुन ठरविल्या गेली पाहिजे' प्रसिध्द पाशचिमात्य विचारवंत प्लेटो म्हणतो की, 'ज्या जगामध्ये महिलांना सार्वजनीक कार्य करण्यापासून वंचीत ठेवले जाते, तो कधीही आदर्श समाज बनु शकत नाही' भारताच्या इतिहासात स्त्रियांचे स्थान आदर्श सन्मान व पुजनिय आहे. हयाबाबत दुमत नाही आज देशाला स्वातंत्र्याची जी सुवर्ण संधी मिळाली आहे त्यात देखील स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे. महिलांनी आपल्या कर्तृत्वाच्या माध्यमातून देशाला सुसंस्कृत करण्याचे कार्य केले आहे. नव्हे तर देशाला विकासाच्या सुवर्ण पहाटेकडे नेण्याचे विधायक कार्यसुध्दा त्यांनी केले आहे. फ्रान्सचा सम्राट नेपोलियन बोनापार्ट स्त्रियांचे महत्व सांगतांना असे म्हणतो की, 'तुम्ही मला योग्य मत द्या मी तुम्हाला एक योग्य राष्ट्र देतो.' १९ वे शतक हे भारतीय समाज आणि राजकारणात विभाजन लेख म्हणुन सिध्द झाले. विदेशी वर्चस्व पुर्व इंग्रजी भाषा आणि मिशनरी यांच्या माध्यमातून भारतीय समाजरचनेत बाहेरील शक्तीचा प्रभाव, सूत्र संचालन आणि दखल सुरु झाली तेव्हापासून भारतीय स्त्रीयांचा प्रश्न प्रभावीत झाला. ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन इत्यादी संस्था आणि संघटनांची भारतीय समाजात सुरू असलेल्या स्त्री—पुरुष विषमतेला आव्हान देऊन विषमता मिटविण्याचा प्रयत्न केला. १८८७ मध्ये स्थापन झालेल्या नॅशनल सोशल कॉन्फरन्सचे योगदान राष्ट्रीय स्तरावरील परिवर्तन प्रक्रयेत उल्लेखनिय होते. यावेळी स्त्रियांच्या हिताच्या दृष्टीने सामाजिक कायदे निर्माण करण्याकरिता संघर्ष करण्यात आला. त्यात राजा राम मोहनरॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, केशवचंद्र सेन, डी. के. कर्वे, महादेव गोविंद रानडे, गोपालकृष्ण गोखले आणि अेनी बेझंट यांचे योगदान लाभले. शिक्षणाच्या क्षेत्रात ज्योतिबा फुले, रामगोपाल घोष, केशवचंद्र सेनू, पंडिता रमाबाई, सवित्रीबाई फुले इत्यादीचे योगदान होते. महात्मा गांधीच्या राष्ट्रीय आंदोलनात सरोजिनी नायडू, हंसा मेहता, विजया कृपलानी यांनी भाग घेऊन समांतर महिलांच्या प्रश्नावर संघर्ष सुरु केला.

भारत स्वातंत्र झाल्यानंतर राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेची बांधनी समता, स्वातंत्र, न्याय व बंधुता या मुल्यावर करुन मानव निर्मीत विषमता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. हजारो वर्षापासून स्त्रियात लादलेली आर्थिक सामाजिक गुलामी कायद्याने नष्ट केली. घटनेनुसार समानतेचा अधिकार बहाल करण्यात आला व स्त्रियांचे हितसंर्वधन करण्यात आले. आज संविधानाने शैक्षणिक, राजकिय व प्रशासकिय क्षेत्रात आरक्षणाची तरतुद करून स्त्रियांचे स्थान सक्षम करण्यात आले आहे.

प्रस्तुत शोध निबंधात भारतीय संविधानातील तरतुदी व महिला सक्षमिकरणासाठी साहयभूत ठरतात याचा परामर्श देण्यात आलेला आहे.

**विभिन्न काळातील स्त्रियांची स्थिती :**

**वैदिक काळ** :— हा काळ प्रदिर्घ चार हजार वर्षाचा असावा इ.स. पूर्व ६००० वर्षा पर्यंतच फक्त याच काळात स्त्रियांची स्थिती केवळ चांगलीच नाहीतर अंत्यत प्रगत होती. कारण या काळात समानता होती. पत्नीच्या रूपात तीचा दर्जा श्रेष्ट होता, ते घर नाही ज्या दारात पत्नी

ISSN : 2278-9308
March, 2022

नाही गृहीनी विरहीत हे घर असतेल ते जंगल आहे. स्त्री पुरुष संयुक्तपणे यज्ञ करीत होते. स्त्रीयांना उपनयन संस्कर पुरुषांप्रमाणे आपत्यक मानला जाई. म्हणजेच एकमेकांचे पूरक मानले जात होते.

**उत्तर वैदिक काळ** :– वैदिक काळातील चांगला व प्रगत दर्जा फार काळ टिकला नाही. इ.स. पूर्व ७०० ते इ.स. ६०० वर्ष हा काळ मानल्या जाते. इ.स. ३०० नंतर झालेल्या सामाजीक बदलांमुळे स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला. रामायण महाभारताचा हा काळ समजण्यात येतो. विवाहाला दैविक बाब मानन्यात येऊ लागले आणि स्त्री चारीत्र्यावर अधिक संवेदनशिलता निर्माण झाली. तीच्या शिक्षणात बाधा निर्माण झाली वेद पठानाचे ज्ञान शक्य झाले नाही. तीला धार्मीक कार्यात संधी नाकारण्यात आली. पुत्र पत्नीला महत्व दिला जाऊ लागले, आणि स्त्रीयांचा दर्जा आणखी खालावत गेला.

**स्मृतीकाळ** :– इ.स. ६०० ते १००० वर्षा पर्यंतचा काळ या काळात स्त्रीचा दर्जा वेगाने ढासळू लागला जो मान मानसन्मान होत होता. तो फक्त मातेच्या रूपातच पत्नीच्या भुमीकेला तुच्छ मानले जाऊ लागले. स्मृतीकारांच्या निर्देशनानुसार स्त्रीयांना स्वतंत्र सोडण्यास मनाई होऊ लागली. स्त्रीचे परम कर्तव्य पतीची सेवा स्त्री ही मानसीक दृष्ट्या पूरूषापेक्षा कनिष्ठ ही धारण निर्माण झाली.

**मध्ययुगीन काळ** :– या काळातही स्त्रीयांची अधीकच अवनती झाली. ब्राम्हनांनी हिंदू धर्माचे रक्षन स्त्रियांचे सातेत्व आणि स्वत:ची शुध्दता राखण्यासाठी स्त्रियाबंदीचे नियम आणखी कठोर केलेत. उच्च जतीतील स्त्रियांचे शिक्षणसुध्दा बंदे केले देवदासी बालविवाह, कुमारीविवाह पध्दती याच कालावधीत ९ वर्षाच्या रमाबाईचे लग्न ४५ वर्षाच्या पूरषाशी झाले होते. एकंदरति याकाळात हिंदूची स्त्रीला जन्मापासून मृत्यूपर्यंत पुरुषाच्या स्वाधीन केले. आणि स्त्रियांचे स्वातंत्र्य हिरावल्या गेले.

**ब्रिटीश अथवा आधुनिक काळ** :– या काळातही स्त्रीयांची स्थिती दयनीय होती. परंतू ब्रिटीशांच्या उदारवादी धोरणामुळे स्त्रीयांची स्थिती सुधारत असल्याचा खुणा सापडतात. ब्रिटीशांनी सती पध्दत कीती अमानुष आहे हे पटवून दिले. याच कालावधीन अनेक समाज सुधारकांनी स्त्रीयांच्या सुधारना आनन्याचा प्रयत्न केला. स्त्रीयांमध्ये जागृती निर्मान होऊ लागली पण पाहीजे त्या प्रमाणात सुधारणा होऊ शकली नाही. त्या काळात जी स्थिती होती ती आजही आहे. आदिवासी स्त्रीयांच्या दर्जासंबंधी सुशिक्षितांमध्ये एकमत आढळून येत नाही.

या समाजात स्त्रियांना कनिष्ठ दर्जा दिला जात असून तिला गुलामासारखे किंवा एखाद्य ओझे वाहनाचा जनावरासारखे वागविण्यात येत असते म्हटले जाते. तर काही आदिम समाजात ती घरची स्वामीनी समजन्यात येऊन तीला पूरूषासारखी समानतेची वागणूक दिली जाते.

असेही काहीचे मत आहे. दोन्ही प्रकारच्या मतात भीन्नता आहे. कारण वंश परंपरेनूसार अशी वागणूक बघायला मीळते. मातृवंश परंपरेतही जर स्त्रिला मानाची वागणूक मिळत नसेल तर त्या परंपरेला काय महत्व आदिम समाजातील स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा खालावलेला आहे.

**स्त्रियांचे घटनात्मक हक्क व कायदेशीर तरतुदी** :

भारतीय संविधानाने स्त्री–पुरूष समानता हे तत्व समोर ठेवून स्त्रीयांचे घटनात्मक हक्क मान्य केले व त्याला संरक्षण प्रदान करण्याच्या हेतूने कायद्याची निर्मिती केली.

कलम १४ नुसार स्त्री अथवा पुरूष या आधारावर कोणताही भेदभाव केला जाणार नाही. कायद्यापुढे सर्व समान आहे.

कलम १५ (1) नुसार धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या आधारावर कोणत्याही कारणांवरून भेदभाव केला जाणार नाही.

कलम १५ (3) नुसार कोणत्याही गोष्टीमुळे स्त्रिया, बालके यांच्या करीता कोणतीही विशेष तरतुद करण्याचा राज्याला प्रतिबंध होणार नाही.

कलम ३६ (क) उपजिविकेचे पर्याप्त साधन मिळविण्याचा अधिकार स्त्री व पुरूषांना सारखाच असेल.

कलम ३६ (घ) पुरुष व स्त्रिया या दोघांनाही समान कामासाठी समान वेतन मिळावे.

७३ व ७४ व्या संशोधनांमुळे स्त्रियांसाठी पंचायत राज योजनेत ५० टक्के भागीदारी मिळविली संसदेने वेळोवेळी कायदे करून स्त्रियांचे घटनात्मक अधिकार सुरक्षित केले ते पुढीलप्रमाणे —

1. हिंदू विवाद अधिनियम १९५५
2. हिंदू वारस कायदा १९५५
3. हिंदू दत्तक ग्रहण कायदा
4. पोटगी कायदे १९५६
5. मुलीचा अनैतीक व्यापार विरोधी कायदा १९६६
6. हुंडा बंदी कायदा १९६१
7. हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १९८३
8. गर्भजल परिक्षा कयादा १९८८
9. कौटुंबीक हिंसाचार संरक्षण कायदा २००५

अशाप्रकारे कायदे निर्माण करून समाजव्यवस्थेतील अडथळे दूर केले.

**निष्कर्ष :—**

वरिल विवेचनावरून असा निष्कर्ष काढता येतो की, भारतीय संविधानाच्या माध्यमातून हजारो वर्षापासूनची स्त्रियांवर लादलेली अर्थिक, सामाजिक व राजकीय गुलामी कायद्याने नष्ट केली, सर्व नागरिकाला समान मुल्यानुसार आनले कलम १४ ते १८ मध्ये स्त्री आणि पुरुष यांच्यात कोणताही भेद न करता समानता आणली. स्त्री—पुरुष भेद राजकीय प्रक्रियेत नष्ट करुन मतदानात समान मुल्य दिली. समाजातील वाईट चाली रितीवर त्यांनी घटनात्मक प्रतिबंध टाकले. समानतेचा अधिकार प्रदान करण्यात आला व स्त्रियांचे हितसंर्वधन करण्यात आले. यासाठी डॉ. बाबासाहेब यांचे योगदान अत्यंत महत्वाचे लाभले. आजची स्त्री ही शिक्षणातच नव्हे तर, अर्थाजन स्वावलंबनामुळे सक्षम होतांना दिसत आहे. एवढेच नव्हे तर आज महीला सक्षमीकारणा अंतर्गत महीलांच्या विकासाच्या अनुषंगाने राष्ट्र—राज्य आणि स्थानीक पातळीवर अनेक प्रयत्न होत असल्याचे दिसुन येतात.

**संदर्भ ग्रंथ सुची :—**

प्रकाश नारायण महिला जागृती और पब्लिकेशन डिस्ट्रीब्युटर, नागनी, नागपूर, संस्करण — २०१२
योजना मासिक ऑक्टोबर — २००६
बाबर सरोजीनी स्त्री शिक्षणाची वाटचाल मुंबई १९६८
देव. वि. रा. स्त्री चळवळीची वाटचाल सुगावा प्रकाशने पूणे—२००५
भारतीय संविधान (लेखक — ॲड. एम. के. दिवकर)

# पंचायत राज व्यवस्थेत महिलांचा राजकीय सहभाग एक चिकित्सक अध्ययन

**डॉ. सुभाष दौलतराव उपाते**
सहयोगी प्राध्यापक राज्यशास्त्र विभाग प्रमुख
आदर्श कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, देसाईगंज (वडसा), जि. गडचिरोली
Email ID : subhashupate05@gmail.com

सारांश:

स्वातंत्र्यपूर्व काळापासून तर आजपर्यंत महिलांच्या राजकारणातील सहभागाबद्दल संशय कायमच आहे. समाजसुधारक 'रामास्वामी पेरियार यांनी स्त्री–पुरुष समानता अधोरेखीत करताना राजकारण व शिक्षण या क्षेत्रात महिलांना समान संधी मीळावी असे स्वातंत्र्यपूर्व काळातच म्हटले होते. समाजवादी विचारवंत राममनोहर लोहिया यांनी प्रशासन व राजकारणात महिलांचा ६० टक्के सहभाग असावा असे म्हटले. पण आज गरज आहे ती महिलांच्या इच्छाशक्तीची. ''महीला संवेदनशील असल्याने सर्व प्रश्नांवर आपले कर्तृत्व सिद्ध करू शकते. आज स्त्री–पुरुष समानतेची भाषा करीत असताना भग या क्षेत्रात आरक्षणाची मागणी कशासाठी? खुल्या जागांवरच महिला उमेदवारांना उमेदवारी मिळावी यासाठी महिला आघाड्यंनी प्रयत्न करावे. पण यासाठी गरज आहे ती महिलांच्या इच्छाशक्तीची''[१] जात, जमात व धार्मिक ओळख उल्लंघन महिलांना सर्व, सुविधांचा समान फायदा मिळावा यासाठी संविधानातील तरतुदिंचा योग्य न्याय सन्मान व्हावा. पंचायत राज व महानगर पालिका यामध्ये कलम २४३D;३) आणि कलम २४३ ;३) नुसार महिलांना एकुण आरक्षीत जागांपैकी १/३ पेक्षा कमी नसेल एवढ्य जागा राखीव ठेवाव्यात. अशी तरतुद घटनेत केलेली आहे. आणि हे रोटेशन पद्धतीने प्रत्येक मतदार संघासाठी लागु केलेले आहे. तसेच कलम २४३(३)(४)ज(४) यानुसार पदधिकारी व अध्यक्ष पदासाठी एकुण राखीव जागेच्या १/३ पेक्षा कमी नसेल एवढे स्त्रीयांना आरक्षण दिलेले आहे. त्यामुळे निश्चितच महिलांचा राजकीय सहभागातील सक्षमीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. (स्त्रोत : नॅशनल कमीशन फॉर वूमेन)

प्रास्ताविक:

१९ व्या शतकातील स्त्री–पुरूष समानतेचा वृत्तपत्राद्वारे इस १८३२ मध्ये बालविवाह, सतीप्रथा, स्त्रीयांवरील अन्याय या विरोधात समाज जागृतीचे कार्य केले. त्यानंतर क्रमाने लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा जोतीराव फुले यांचे क्रांतीकार्य स्त्रियांच्या आत्मसन्मानाला व स्त्रीसाहित्याला प्रेरणादायी ठरले. ''महात्मा गांधी म्हणतात, जिला आपण अबला म्हणतो ती ज्याक्षणी सबला होईल त्याक्षणी जे कोणी असहाय आहेत ते सर्व शक्तिमान होतील. गांधीजींनी या विचारधारेला अनुसरुनच स्त्री स्वातंत्र्य, स्त्री शिक्षण आणि स्त्री सबलीकरणाचा पुरस्कार केला.''[२] लोकशाहीच्या स्वातंत्र्य, समता या तत्वांचा परिपोष ''भारतीय समाज सुधारक इ.स. १९५० पर्यंतचे विभावरी शिरुरकर, ताराबाई शिंदे आदिंचे लेखन व विचारकार्य आधुनिक युगाचा मूळधर्म ठरलेला वास्तववाद, मार्क्सवादी विचारधारा, दलित साहित्याची चळवळ, साक्षरता मोहीम, स्त्रीयांना ३० टक्क्यांवरून महाराष्ट्रातील महिलांना ५० टक्के आरक्षण अशा अनेक विचार व घटनाक्रमांच्या प्रेरणने मराठी वाङमयात नवा स्त्रीवाद अवतरला'' असेच म्हणावे लागेल. याच अनुषंगाने संविधानातील तरतूदीनुसार महिलांचा राजकीय सहभाग अभ्यासने क्रमप्राप्त ठरते.

मुळ शब्द: संविधान, पंचायत राज, राजकीय सहभाग, स्त्रीशक्ती.

संविधानात्मक आशय :

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महिलांना संविधान कलम १५ नुसार लिंगा च्या आधारावर भेदभाव होणार नाही, कलम १५ नुसार धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान या आधारावर नागरिकांमध्ये भेदभाव होणार नाही, कलम १६ नुसार सरकारी नोकरीत सर्वांना समान संधी दिली जाईल. कलम १६(१) व १६(२) नुसार कामाच्या ठिकाणी लिंगभेदावर विभेदीकरणात थारा उरणार नाही. कलम १७ नुसार समता हक्क व अस्पृश्यता निवारण, कलम २१ नुसार ''कोणत्याही व्यक्तीचे जीवित किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य कायद्याच्या विरोधी जाऊन हिरावून घेतले जाणार नाही, कलम २३ प्रमाणे मनुष्याचा क्रय–विक्रय करता येत नाही, कलम ३९ नुसार स्त्री–पुरुष यांना जीवनावश्यक साधनांचा योग्य व समान पुरवठा, कलम ३९(ब) नुसार समान कामासाठी समान वेतन, कलम ३९(क) नुसार स्त्री–पुरुष कामगारांच्या आरोग्याचे रक्षण करणे, व महत्वाचे म्हणजे कलम ५१ अ(क) अन्वये कोणीही स्त्रीयांची अप्रतीष्ठा, अपमान होईल असे वर्तन करू नये, या संविधानाकीत तरतुदीनुसार स्त्रीच्या वाट्यला माणुस म्हणुन जीवन जगता येईल अर्थात स्त्री ही पुरुषांच्या खांद्याला खांदा लावुन राजकारणात प्रवेशीत होऊन आपला राजकीय सहभाग निश्चितच सक्रीयरित्या भुमीकेतुन पार पाडेल अशीच शास्वती संविधानाने दिल्याचे दिसते.''[३] संविधानानुसार कायद्यापुढे समानता अर्थात, "Among equals, law should be equal and should be equally administered means like should be treated alike" म्हणजेच समान व्यक्तींसाठी समान कायदा असावा त्याची अंमलबजावणी समान व्हावी.''[४]

राजकारणात महिलांचा सहभाग:

भारतात स्त्रियांना संपत्तीच्या आधारे मतदानाचा अधिकार १९२१ ला मिळाला. इ. स.१९२७ ला कायदेमंडळ सदस्य म्हणून मान्यता, मद्रास प्रांताने मुथ्युलक्ष्मी रेड्डी यांना कायदेमंडळात नियुक्त सदस्य म्हणुन घेतले. ''इ.स. १९३६ च्या प्रतिक कायदेमंडळात ५४ स्त्रीया निवडून आल्या. विजयालक्ष्मी पंडित या उत्तरप्रदेश मंत्रिमंडळात मंत्री बनाल्या, नागपूरच्या अनुसयाबाई काळे या मध्यप्रदेश सरकारमध्ये उपाध्यक्ष तर मुंबई सरकारमध्ये हंसा मेहता यांना सचिव म्हणुन नियुक्त केले. याच निवडणुकीत अनुस्वामी नायन, सरोजनी नायडू या महिला निवडून आल्या होत्या.''[५] २६ जानेवारी १९५० पासुन प्रौढ मताधिकाराच्या तत्वानुसार 'एक व्यक्ती एक मत' मुल्य रूजु झाले. संसदेतील लोकसभा सभागृहातील महिलांची संख्या २२ होती तर इ. स. २०१४ ला ती ६२ झाली तर राज्यसभागृहातील महिलांची संसद सदस्य संख्या ७.३ टक्के तर २०१४ मध्ये ७ महिला सदस्य झाल्या. देशाच्या मंत्रिपरिषदेत महिलांचे प्रतिनिधत्व इस. २०१४ ला नरेंद्र मोदी सरकारमध्ये सुषमा स्वराज, मेनका गांधी, स्मृती इरानी, नजमा हेपतुल्ला, उमा भारती, हरसीमरत कौर बादल आणि राज्यमंत्री म्हणून निर्मला सितारामन यांचा सहभाग राहीला आहे. यावरून असे स्पष्ट होते की, निर्णय प्रक्रियेत आणि सत्तापदाबाबत महिलांना उपेक्षीत ठेवण्यात आले आहे. असे असले तरी वास्तविक प्रमुख म्हणुन श्रीमती इंदिरा गांधी व महामहिम राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील या नामधारी पदावर कार्यरत होत्याच.

महिला सहभागाची जागतिक स्थिती आणि भारत:

द्वितीय महायुध्दानंतर तीसऱ्या जगातिल देशात सर्वच पीडित आणि शोषित समाजामध्ये एक नवी लोकशाहीवादी जागृती निर्माण झाली. जागतिक स्तराचा विचार करता महिलांना मतदानाचा अधिकार अमेरिकेत इ.स. १९१८ नंतर मिळाला. स्वित्झलंडमध्ये १९७० मध्ये मिळाला, खऱ्या अर्थाने राजकारणात महिलांचा सहभाग १९५० नंतरच वाढीस लागला. जागतिक पटलावर प्रभाव पाडणाऱ्या महिलांमध्ये सीरीमाओ भंडारनायके, इंदिरा गांधी, मार्गारेट थ्रेचर, बेनझीर भुट्टो, चंद्रिका कुमारतुंगा, शेख हसीना वाजेद, बेगम खालीदा झिया, सोनिया गांधी व अमेरिकेतील

कॉलिन पॉवेल, ब्रिटन पंतप्रधान थेरेसा मे, ''आंतरसंसदीय संघाच्या पाहणी नुसार अमेरिकेत स्त्रियांचे संसदेतील प्रमाण १२.७ टक्के, युरोपात १२.६ टक्के, पॅसिफिक देशात ११.६ टक्के, सहारा व आफ्रिका खंडात १०.४ टक्के, आशिया खंडात १३.१ टक्के, अरब राष्ट्रांत ३.३ टक्के इतके आहे. जगात सर्वात जास्त स्त्री सदस्य संख्या क्रमशः स्वीडनमध्ये ४० टक्के, न्युझीलंड मध्ये २९.२ टक्के, अर्जेटिनात २५.३ टक्के, चीनमध्ये २१ टक्के आहे. पण भारतात मात्र भारतीय संसदेत महिलांचे प्रमाण ११.३८ टक्के इतके अत्यल्प आहे.''[६] नवी दिल्ली दि. ८ मार्च २०११ ला प्रकाशित जीम भ्पदकन या दैनिकात आंतरराष्ट्रीय महिला दिन निमित्य जागतिक स्तरावर महिलांची राजकारणातील सांख्यिकीय माहिती (Inter Parlimentary Union – IPU) त्यामध्ये भारतातील महिला सहभागाची ९८ व्या क्रमांकावर क्रमवारीत आहे.

भारतागत घटक राज्यातील महिलांचा राजकीय सहभागः

महाराष्ट्रासारख्या प्रगत आणि पुरोगामी राज्यात महिलांचा विधानसभेतील सहभाग कमी होताना दिसते. वर्तमान राजकीय पक्ष स्त्रियांचा प्राधान्याने विचार करीत नाहीत. २२ फेब्रुवारी २०१७ ला महाराष्ट्राच्या विधानपरिषदेत एकुण ७८ सदस्यांपैकी ४ महिला सदस्य होत्या. महिलांचे राजकीय सामाजिकरणानंतर सक्षमता निर्माण होऊनही फक्त आरक्षणापुरतेच, जिल्हा व शहर पातळीपुरतेच मर्यादित ठेवल्याचे जाणवते आणि कोणत्याच राजकीय पक्षाने त्यांच्या क्षमतांना संधी दिला नाही असे प्रकर्षाने दिसते. ''स्त्रियांच्या मतदानाच्या जागरूकते विषयी दृष्टीक्षेप टाकल्यास स्त्रीया उदासीन दिसतात. स्त्रीच्या कौटुंबीक जबाबदाऱ्या, पुरुषप्रधान संस्कृती, स्वतःकडे पाहण्याचा दृष्टिकोण, समाजाचा दृष्टीकोण, तिची समाज भूमिका, शिक्षण यामुळे स्त्री ही मतदानाच्या बाबतीत उदासीन दिसते. खेड्यांतील स्त्रीया वडिलधारी मंडळी, नवरा, कुटुंब व कौटुंबीक जबाबदारी, परंपरागत मानसिक जडण–घडण कुटुंबाचा पाश त्यामुळे ती स्वतः घराबाहेरील निवडणुकींसारख्या बाबींसबंधी जागरूक नसते. मग ती श्रीमंत असो वा गरीब, सुशिक्षीत असो वा अशिक्षीत असो.''[७] अशाप्रकारे भारताच्या संदर्भात, जागतिक स्तरावरील, प्रादेशिक स्तरावरील महिला सहभागाचा विचार करतानाच स्थानिक स्वराज्य संस्थांचा विचार करता येईल.

महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायत राजमधील सहभागः

संविधान कलम ४०, राज्यघटनेच्या ९ व्या भागात महात्मा गांधीजीच्या स्वप्नातील भारताला अधोरेखीत केले. पंडित नेहरूनी पंचायत राज असे नाव दिले आणि खऱ्या अर्थाने ७३ राव्या व ७४ राव्या घटनादुरूस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त करून दिला. इ.स. १९५२ ची पंचवार्षिक योजना अपयशी का ठरली याचा अभ्यास करण्यासाठी इ.स. १९५७ ला बलवंतराय मेहता समिती पंडीत नेहरूंच्या काळात नेमली होती. त्या समितीने महिला प्रतिनिधी नियुक्त करण्याची तरतूद केली. नंतर महिलांना ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद मधील राजकारणात हक्काने सहभाग मिळाला. नंतरच्या काळात ''संयुक्त राष्ट्र संघाने इ.स. १९७५ ला महिला वर्ष आणि १९७५ व १९८५ या दशकाला महिला दशक म्हणून जाहीर केले व त्याचा परिणाम महिलांच्या विकासाच्या बाबींना चालना मिळाली. या संदर्भाने मॅक्सीको परिषद, कोपनहेगन परिषद, नैरोबी परिषदेने महिलांच्या प्रश्नांबाबत वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. याचाच परिणाम म्हणून इ.स. १९८८ ला कॉंग्रेस सरकारने महिलांसाठी राष्ट्रीय दुरगामी योजनेचा मसुदा तयार केला. त्यात महिलांच्या विकासाचा एक धोरणात्मक निर्णय म्हणजे महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ३३ टक्के आरक्षण हे होय.''[८]

आरक्षणासंबंधी खेळखंडोबा आणी मंजुरी :

स्थानीक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना आरक्षण संदर्भात १० ऑगस्ट १९८९ ला ६४ वी घटनादुरुस्ती विधेयक मांडले. लोकसभेने मंजूर केले व राज्य सभेने नाकारले. ७ डिसेंबर

१९९० ला पुन्हा नव्याने मांडले पण लोकसभा बरखास्त झाली होती. नंतर तत्कालीन पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळात २२ डिसेंबर १९९२ ला लोकसभेने आणि २३ डिसेंबर १९९२ ला राज्यसभेने ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीला अखेर मंजूरी दिली. २४ एप्रिल १९९३ ला राष्ट्रपतींची स्वाक्षरी होऊन ते ७३ रावी ७४ रावी घटनादुरुस्ती अस्तीत्वात आली. यानुसार ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद तर शहर पातळीवर नगरपालीका, महानगरपालिका यामध्ये ३३ टक्के जागा आणि अधिकारपदे महिलासाठी आरक्षीत करण्यात आली. त्यात अनुसूचित जाती, जमाती, भटक्या विमुक्त जमाती आणि इतर मागासवर्गीय महिलांना आरक्षण रोस्टर पद्धतीने मान्य करण्यात आले. तसेच सरपंच, पंचायत समितीचा सभापती व उपसभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष, विविध समित्यांवरील पदाधिकारी, तत्वतच महानगरपालीकेचा महापौर, उपमहापौर आणि इतर पदाधिकारी, नगर परिषदेचा अध्यक्ष आणि विविध समित्यांवरील पदाधिकारी या सर्व स्तरावर महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्यात आले.

महिला आरक्षणामुळे संपूर्ण देशान महिलांसाठी सुमारे १३ लाख राखीव जागा उपलब्ध झालया आहेत. ''महाराष्ट्रात १९९७ च्या निवडणुकीत २९ जिल्हापरिषदांमधुन निवडुन आलेल्या १७६२ सदस्यांपैकी ५८७ महिला आहेत. ३१९ पंचायत समितींच्या ३५२४ सदस्यांपैकी १९७४ महिला होत्या. तर ग्रामपंचायतीवर ४३ हजार गावातील २७६५६ ग्रामपंचायतींवर ८० ते ८५ हजार महिला निवडून आल्या. महाराष्ट्रात १० महिला जिल्हा परिषद अध्यक्षा, पंचायत समिती सभापती १०६ महीला, ९००० हुन अधिक महिला सरपंच झाल्या. परिणामी सत्तेच्या राजकारणाशी सातत्याने संबंध असलेल्या महत्वाकांक्षी पुरुषी मनोवृत्तीचा पंचायत राज व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधेयकातील महिलांच्या सक्रिय सहभागाला विरोध झाला होता.''[९] २००३ च्या निवडणूकीत ग्रामपंचायतीत १ लाखाहून अधिक जागांवर महिला निवडून आल्या. यापैकी ३३ टक्के महिला सरपंच झाल्या, ३३ टक्के महिला पंचायत समिती सभापती झाल्या, ३५ जिल्हापरिषदेतून १२ महिला अध्यक्षा होत्या. कधी घराचा उंबरठा न ओलांडणाऱ्या महिला निवडणूक लढवून प्रचार करून गावाचा, तालूक्याचा आणि जिल्ह्यचा कारभार करतात ही घटना अभूतपूर्व व क्रांतीकारीच म्हणावी लागेल.

संशोधन लेखाची उद्दिष्टे:

१. भारतीय संविधानातील पंचायत राज व्यवस्था.
२.७३ रावी व ७४ रावी घटनादुरुस्तीचे योगदान.
३.स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्त्रियांचा राजकारणातील सहभाग.

गृहीत कृत्ये :

१. पुरुष प्रधान संस्कृतीने महिलांचे राजकारणात सहभागीत्व वाढविले.
२.संविधानाने महिलांना राजकारणात प्रवेश करण्यासाठी कायदेशीर अधिष्ठान प्राप्त करून दिले.
३.स्वातंत्र्य प्राप्तीनंतर महिलांचा राजकीय सहभाग वाढीस लागला.
४.७३ राव्या व ७४ राव्या घटनादुरुस्तीने दिलेल आरक्षण उपयुक्त ठरले.

संशोधन पद्धती :

तथ्य संकलनाचे स्त्रोत:

तथ्य संकलन संशोधन कार्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडते. विश्लेषणासाठी मुळ तथ्य जर उपलब्ध झाले नाही तर संशोधनात अचूकता येत नाही. या संशोधन लेखातील तथ्य संकलन मूळ तथ्य व दुय्यम तथ्यातून पूर्णत्वास आणलेले आहे.

१. ग्रंथालय संशोधन पद्धती.

ISSN : 2278-9308
March, 2022

२.विविध जर्नल्स व संदर्भग्रंथ.
3- Wikipedia
4- Wikaspedia

महिला सक्षमीकरणाची आवश्यकता व उपयोगिता :

''मानवसमूहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांना हतोत्साहित करणारे वर्तन करून, त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हीनत्वाची वागणूक स्त्रीजातीला मिळत रहिली आहे'' ॅपापचमकपं. ''एखाद्या स्त्रिला मानसिक दृष्ट्या सक्षम करणे तिचे शरीरसुद्धा या सुदृढ असणे गरजेचे आहे, शिक्षण, व्यायाम, खेळ यात सहभागी व्हावे.'' ''आज स्त्रिने औद्योगिक शिक्षण आणि तंत्रज्ञान यात प्रगती केली आहे.'' अविकसित व विकसनशील देशांतील स्त्रियांच्या व्यथा आणि हक्क, शैक्षणीक समस्या, सामाजिक मागसलेपणा इ. विषयांची दखल व चर्चा करण्यास्तव युनोने कोपेनहेगन येथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महिला परिषद भरवली होती. सामाजिक विषमता ही जात, धर्म आणि लिंग या तीन घटकांवर आधारित असून स्त्रिला उपभोग्य वस्तू समजल्या गेले. ''स्त्री ही आई आहे, ती ताई आहे, ती मैत्रीण आहे, ती पत्नी आहे, ती मुलगी आहे, ती जन्म आहे, ती माया आहे, मी सुरुवात आहे आणि तिच नसेल तर सार काही व्यर्थ आहे. स्त्री म्हणजे वास्तव्य, स्त्री म्हणजे मांगल्य, स्त्री म्हणजे मातृत्व, स्त्री म्हणजे कर्तृत्व.'' (विकिपीया) यावरून स्त्रीचे महत्त्व चिरकालीन टिकणारे आहे हे पूर्णत: सत्य आहे. ''महिला घरगुती हिंसाचार कायदा २०० मध्ये घटनेत अनेक तरतुदी असून समाजात अत्याचार, लिंग भेदभाव विरुद्ध सामाजिक लढा देण्यास्तव ३३ टक्के आरक्षण ७३ रावी व ७४ रावी घटनादुरूस्ती करून महिलांना सत्तेत सहभागी करून घेणे काळाची व समृद्ध मानवी समुदायाची नितांत गरज आहे. मातृदिनाला व्यापक प्रमाणावरील प्रचारात 'बेटी बचावो बेटी पढाओ', सुकन्या समृद्धि योजना, महिलांच्या नावे करातून सूट यासह अनेक प्रशंसनीय पावले उचलली गेली आहेत.

निष्कर्ष :

आपल्या देशात पूर्वी राजकारण हे फार धकाधकीचे पुरुषी वर्चस्वाचे व गुंडपुंडाईचे क्षेत्र आहे. म्हणून ते स्त्रिला झेपणार नाही या भितिपोटी स्त्री राजकारणात सहभागी होत नव्हती. पण १४ एप्रिल १९९३ च्या ७३ राव्या व ७४ राव्या घटनादुरुस्तीने ३३ टक्के आरक्षणातून नवसंजीवनी मिळाली. गावपातळीपासून तर केंद्रपातळीपर्यंत स्त्रीया क्रियाशील होऊन राजकारणात, सात्ताकारणात आपला सहभाग नोंदवत आहे. १४ एप्रिल २०११ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मदिनी महाराष्ट्र शासनाने एकमताने ३३ टक्के वरून ५० टक्के महिलांसाठी आरक्षण पंचायत राज व स्थानिक स्वराज्य संस्थेत मान्य केले. केंद्रसरकारने २००९ ला संसदेत ११० व्या घटनादुरुस्ती प्रस्तावाला मान्यता दिली व ४ फेब्रुवारी २०१६ पासून पंचायत राजमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण केले. तरी पण स्त्रियांच्या नेतृत्वाच्या प्रश्नाला अनेक पैलू आहेत. काही महिला स्वकर्तृत्वावर पुढे येत आहेत.

स्त्री राजकीय सहभाग वृद्धीसाठी उपाययोजना :

- पुरुषांनी स्त्रिला अधिकारांचा वापर करण्याक सक्षम बनवावे.
- स्त्रीच्या कामकाजातील सहभाग वृद्धींगत करावा व त्यांची संख्या वाढवावी.
- महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण वाढण्यास सर्व स्तरावरून वाजवी प्रयत्न व्हावे.
- महिलांनी नेतृत्वाची पकड घट्ट करण्यास यथोचित प्रयत्न करावे.
- विकास कामात जसे महिला व बालविकास, माता व शिशु संगोपन, पिण्याच्या पाण्याची समस्या, आरोग्य केंद्र, दारूबंदी,व्यसनमुक्ती यासाठी संघटित व संघर्षासहीत सहभाग घेणे.

- राजकीय पक्षांनी निवडणूकीत महिलांचा सन्मान करून सहभाग वाढवावा.
- राजस्थानातील गरीब कष्टकरी, दलित, घुंगटधारी स्त्रियांनी घुंगटाच्या आडून आपल्या अधिकारासाठी आवाज उठविला तो सार्वत्रीक स्वरूपाचा सिद्ध होणे काळाची गरज आहे.

संदर्भसूची :

१. निर्गुण नयना : महिलांच्या इच्छा शक्तिची गरज — दैनिक सकाळ, नागपूर, रविवार सप्तरंग पुरवणी, दि. २३ ऑगस्ट,
२. विविपिडिया :
३. विकासपीडिया :
४. देशमुख प्रा. .बी. टी. : भारतीय संविधान, पिंपळापुरे ॲंड कं. पब्लिशर्स, नागपूर, पृ.क्र. ५२ ते ५४
५. कुलकर्णी प्रा.पी.के : मानवी हक्क आणि सामाजिक न्याय, डायमंड पब्लिकेशन, प्र.आ. २०१३, पृ.क्र. १५१, १५२
६. प्रसाद कमलकांत : भारत में महिलांओंकी राजनितीक अपेक्षाए — समाज कल्याण, केंद्रीय समाजकल्याण मंडळ, दिल्ली, ३९
७. चोरमारे विजय : स्त्री सत्तेची पहाट, एक्सप्रेस पशिंग हाऊस, कोल्हापूर, ०३,पृ.क्र.१३
८. नाडकर्णी डॉ.सुलोचना : निवडलूकीतील स्त्रिची भुमीका, दैनिक लोकमत, नागपूर, दि. ८ जानेवारी, २००६. प्रभादेवी, मुंबई २५, पृ. १
९. चोरमारे विजय : स्त्री सत्तेची पहाट, एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस,कोल्हापूर,०३,पृ. २९
१०.त्रैमासिक जनजागर : प्रकाशक निरंतर प्रौढ शिक्षण आणि विस्तार विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर, अंक मार्च २००१, पृ. ६ व ८

# स्त्रीवाद आणि आदिवासी महिला

डॉ. अजय पेत्रस बोरकर
(कार्य.प्राचार्य)सिध्दार्थ महाविद्यालय चिचपल्ली

**सारांश** :—

स्त्रीवाद चळवळ ही मानवतावादी चळवळ आहे. स्त्रीवाद ही एक परिवर्तनवादी आणि राजकीय विचारप्रणाली आहे. स्त्रियांचे प्रश्न फक्त स्त्रियांचे नाहीत तर समाजाच्या प्रश्नांशी ती निगडीत आहेत. ज्याप्रमाणे पाण्याविना जिवन शक्य नाही त्याप्रमाणे स्त्रीवीना समाजाची कल्पना करणे शक्य नाही. स्त्रिंयाचे सगळे प्रश्न समाजाशी गुंतले गेले असल्यामुळे आणि समाजव्यवस्था पुरूषप्रधान असल्यामुळे स्त्रीवादाल सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थितीचे विश्लेषण करावे लागते.स्त्री ही ही मानवी विश्वाची केंद्रबिंदू असून जीवनाच्या प्रत्येक अवस्थेत ती वेगवेगळी भूमिका बजावत असते. स्त्रीवादी चळवळीचा संबंध फक्त स्त्रियांशी नाही तर स्त्रियांच्या मानवी अधिकारांचे रक्षण  या चळवळीद्वारे व्हावे यासाठी स्त्रीवाद पुढे आला. विज्ञानाचा उदय आणि शिक्षणामुळे मिळालेला आत्मविश्वास यामुळे आपला दुर्बल व पराधीन आयुष्याची तिला जाणीव झाली आणि समानतेचे वारे वाहू लागले. इथून स्त्रीवादी चळवळ सुरू झाली. स्त्रीवादी चळवळीचे अनेकजण वेगवेगळे अर्थ काढतात. कुणी म्हणतात पुरूषांच्या विरोधात चर्चा करण्याचे ठिकाण किंवा स्त्रीवाद म्हणजे पुरूषांपासून फारकत घेवून स्वत:चा पक्ष तयार करणे होय. '' संस्कृतीचा हजारो वर्षाच्या इतिहासाचे बाईचे मानवपण नाकारून तिला जी पशुतुल्य अवस्था प्राप्त करून दिली त्यातून बाहेर पडून आपले हक्क प्रस्थापित करून घेण्यासाठी निर्माण केलेले हे व्यासपीठ आहे.'' ज्यावेळी स्त्री ही खुलेपणाने श्वास घेवून पुरूषापइतके स्वतंत्र जीवन जगू लागले त्यावेळी स्त्रीवादी गरज भासणार नाही.

**बीजशब्द** :— स्त्री जीवन चळवळ, हक्क, शिक्षण, व्यासपीठ, श्वास, गरज.

**प्रस्तावना** :— पाश्चात्य देशात १८ व्या शतकापासून स्त्रीवादी चळवळ सुरू झाली. १९६० नंतर मात्र या चळवळीला मानवतावादाचे भान येवू लागले. १९७५ हे  वर्ष युनोने स्त्री — दशक म्हणून जाहिर केले. त्यानिमित्ताने संपूर्ण जगात स्त्रीप्रश्नावर विचार मंथन सुरू झाले. जगभरातील स्त्रियांचे आत्मभान जागृत झाले. १९७५ नंतर भारतातही स्त्रियांच्या सामाजिक स्थानाचा शोध सुरू झाला. स्त्रीवादी चळवळीचा एक वेगळा असा इतिहास आहे. त्या देशातील धर्म, संस्कृती, राजकीय, समाजकारणात असलेल्या विविधतेमुळे इतरदेशापेक्षा भारतीय स्त्रीप्रश्नांमुळे फरक पडलेला दिसतो. त्यामूळे भारतीय स्त्रीवादी मांडणी करतांना भारतीय सामाजिक परिस्थितीचा विचार करतांना धर्म, संस्कृती, वर्ण, वर्ग, जात या सर्व संकल्पनांचा विचारा करावा लागतो. भारतीय स्वांतन्त्र्यानंतर स्त्रीपुरूष समानता कायद्याने मान्य झाली पण प्रत्यक्षात ते अधिकार स्त्रिला मिळाले नाही. कारण स्त्रियांच्र्ा प्रश्नांची गुंतागुंत वाढत गेली. भारतात निर्माण झालेल्या स्त्रीवादी चळवळीचे प्रणेते सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले होय. त्यांनी स्त्रियांचे प्रश्न केवळ कागदावर न मांडता प्रत्यक्ष कार्याची मुहूर्तमेढ रोवली. ब्राम्हण स्त्रियांपासून  दलित उपेक्षित स्त्रियांपर्यंत सर्वासाठी शाळा सुरू करून यासर्व स्त्रियांमध्ये मानवी अधिकाराविषयी जाणीव जागृती निर्माण केली. गोपाळ गणेश आगरकारांनी देखील स्त्रियांच्या मानवी अधिकारचा पुरस्कार केला. यांनंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय स्त्रियांच्या परिस्थितीचा अभ्यास करून स्त्री हक्क कायदेशिर जाहीरनामा हिंदू कोड बिलाद्वारे निर्माण केला. त्यानंतर १९२० ते १९९५ या काळात

महात्मा गांधीची भूमीका भारतीय राजकारणात महत्वपूर्ण ठरली आपल्या अहिंसात्मक राजकिय चळवळीत त्यांनी स्त्रियांना सहभागी करून घेतले असे जानवते

वर्तमान स्थितीत लिंगभेद समानता हा एक परावलीचा शब्द असून प्रगत समाजात तो अधिक उग्र होत असल्याचे दिसून येते. मात्र आदिवासींच्या बाबतीत त्याची तिव्रता बरीच कमी आहे. कोटुंबिक जीवनात व आदिवासी समाजात महिलांचे स्थान अनन्यसाधारण आहे. आर्थिक क्षेत्रात आदिवासी महिलांचे प्राबल्य आहे. इतर प्रगत समाजातील महिलांपेक्षा आदिवासी महिलांचे आर्थिक क्षेत्रातही अधिक प्राबल्य असून त्या पुरूषांपेक्षा तसूभर पुढेच आहेत. संपूर्ण कुटुबांची पालणपोषण करण्याची जबाबदारी ती स्वत:च्या खांद्यावर घेते. कबाडकष्ट करतांना ती मागे हटत नाही. म्हणूनच शिक्षण, आरोग्य या क्षेत्रात ती मागे पडते. आरोग्याची पर्वा करीत नाही हया समस्यांचे निराकरण करून त्यांच्या सबलीकरणाची धुरा कशी सांभाळता येईल हा खरा प्रश्न आहे. हया प्रश्नाचे उत्तर शोधून ज्याप्रमाण्रे त्या आर्थिक क्षेत्रात अग्रक्रमी आहेत त्याचप्रमाणे शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व अग्रक्रमी आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणेही काळाची गरज आहे.

**आदिवासीविकासाची संकल्पना :**

विकास ही सज्ञा इच्छित असा बदल दर्षवणारी आहे. म्हणून सर्वसाधारणपणे विकासाचा अर्थ इच्छित सामाजिक उद्दिष्टांचा संचा असा केला जातो. त्यात वास्तविक दरडोई उत्पन्नात वाढ, उत्पन्नाचे समान व न्याय वितरण, साधनसंपत्तीतील वाटा, शिक्षणात वाढ, आरोग्य सोयीत ग्रामीण कृषी व संलग्न व्यवसाय, ग्रामीण व कुटीर उद्योग, ग्रामीन कला, हस्तकला, सामाजिक — आर्थिक सुविधा, सामुदायिक सेवा, व याहून महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण भागातील नैसर्गिक व मानवी साधनसंपत्ती विकास या बाबींचा समावेश होतो. ग्रामीण क्षेत्रातील लोकांना अधिक चांगला आहार, वस्त्र, घरे, शिक्षण, सुरक्षित जीवन आणि गुलामगिरीपासून स्वातंत्र्य या सर्व गोष्टी बहाल केल्याशिवाय ग्रामीण क्षेत्राचा वा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास साध्य होऊ शकत नाही.

भारतासारख्या विकसनशिल देशात ग्रामीण अर्थव्यवस्थेला अतिशय महत्व आहे. कारण भारत हा खेडयां देश आहे. ६ लाखापेक्षा जास्त खेडी असणाऱ्या या देशात ८३.३ करोड ग्रामीण जनसंख्याा ही ग्रामीण भागात तर ३७.७ करोड जनसंख्या शहरी भागात वास्तव्य करते. त्यात ४०.५१ करोड महिला व ४२.७९ करोड पुरूष सामाविष्ट आहेत. ग्रामीण भागातील प्रमुख व्यवसाय कृषी असून येथील जनतेचा विकास कृषी क्षेत्राचा विकासावर अवलंबून आहे. शेतीचा२०१३ —१४ मध्ये स्थून राष्ट्रीय उत्पादनातील वाटा १४ टक्के होतो. तर रोजगारातील वाटा जवळपास ५०टक्के होता. कृषी क्षेत्राचे वर्चस्व हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मुख्य वैशिष्टे आहे. एकंदर राष्ट्राचा विकासात देशाच्या विकासाला केंद्रस्थानी माने तरी शाश्वत ग्रामीण विकासाचा विचार अपरिहार्य ठरतो. ज्याप्रमाणे ग्रामीण भागाचा विकास हा कृषी क्षेत्राच्या विकासावर अवलंबून आहे त्याचप्रमाणे कुषीचा विकासही अनेक घटकांवर अवंबून आहे. आणि यामध्ये ग्रामीण भागातील महिला श्रमिक फार महत्वाचा घटक आहे.

महिला कृषी श्रमिकांमध्ये काम करण्याच्या बाबतीत एक अनिश्चितता आढळून येते, कृषी उत्पादन प्रक्रियेमध्ये धान्य पेरणे, खुरपणे, पिकांची निगा राखणे, पाणी देणे, खत घालणे, धानाची कापणी करणे, धान्याची साठवणूक करणे इत्यादी कामे ग्रामीण महिला श्रमिक करताना दिसून येतात. कृषी संलग्न व्यवसायामध्ये पशूपालन, कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय इतयादींचा समावेश होतो. जनावरांची निगा राखणे, चारा आणने, जनावरांच्या विश्ठेची विल्हेवाट लावणे इत्यादी कामे स्त्रीयांना करावी लागतात. याव्यतिरिक्त कुटुंबात गृहिणी व माता म्हणून असणारी भूमिका वेगळी

वटवावी लागते. याप्रमाणे ग्रामीण विकासाच्या प्रक्रियेमध्ये आदिवासी महिला मोलाची भूमिका बजावत असते.

**आदिवासी स्त्रीचे वास्तव्य :—**

बहुसंख्य आदिवासींचे वास्तव्य जंगली भागात असते. त्यामुळे जगंलातुन प्राप्त होणाऱ्या वनउपज वस्तुंची माहिती त्यांना असते. ही वनउपजे गोळा करणे हे त्यांचे नित्य नेमाचे काम असते. जळावू लाकूड गोळा करणे, डिंक, मोहफुले, चारोळ्या मध, तेंदुपत्ता संकलन इत्यादी कार्यामुळे त्यांना आर्थीक लाभ मिळते. अलिकडे वनहक्क कायद्याचा अस्तित्वामुळे त्यात अधिक भर पडली आहे. या कायद्यामुळे त्यांना गौण वनौपजे गौळा करण्याचा अधिकारच प्राप्त झाला आहे. गौण वनौपजे म्हणजे इमारती लाकूडाच्या व्यतिरिक्त लाकूड (बांबू ब्रषवूड, खोडे) त्याचबरोबर वेत, सट, कोब, मेण, लाख, औषधी वनस्पती, कंद, मुळे वनस्पतीजन्य वस्तू औषधी वनस्पती इत्यांदीचा समावेश आहे.

ग्राम पातळीवर असलेल्या वनहक्क समित्यांच्या मदतीसाठी तलाठी, ग्रामसेवक आणि इतर शासकीय कर्मचारी यांची सेवा उपलब्ध करण्यात येऊ लागली.

जंगलावर आणि वनजमिनीवर हक्क प्रस्थापित करण्यात आल्यामुळे आदिवासी महिलांना अर्थोत्पादनात मदत झाली. वनातील सर्व वनउपज गोळा करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. आदिवासांचे वास्तव्य अधिकार जंगलातच असल्यामुळे आदिवासी महिला शेतीच्या कामातून मुक्त होताच जंगलातील वनउपज वस्तु गोळा करतात. वस्तुंच्या विक्रीतून आलेला पैसा कुटूंबाच्या उपजीविकेसाठी वापरतात. त्यामुळे शेतीव्यवसायाच्या खालोखाल वनावरील अवलंबित्व हे आदिवासी महिलांचे एक प्रमुख वैशिष्टे दिसून येते.

थोडक्यात आदिवासी महिला कृषीक्षेत्रातच नव्हे तर वनउपज गोहा करण्यातही अग्रस्थानी आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दृष्टीने व आदिवासीच्या सबलीकरणाच्या दृष्टीने ते एक अमुल्य व धाडसी पाऊल आहे.

**आदिवासी महिलांची शैक्षणिक स्थिती :—**

१९०६ च्या शिक्षणविषयक राष्ट्रीय धोरणात मान्य करण्यात आले की आदिवासी लोक हे शिक्षणाच्या क्षेत्रात उर्वरित लोकसंख्योच्या तुलनेने नि:शंषयपणे फारच मागे आहेत. आदिवासी विद्यार्थी मोफत शिक्षण, पाठ्यपुस्तक, गणवेष, लेखनसामुग्री, विद्यावेतन इ. चा लाभ घेतात. आदिवासी मुलींना वरील सुविधाशिवाय उपस्थिती भत्ताही देण्यात येतो. महाराष्ट्रात आश्रमशाळांनील आदिवासी शिक्षणासाठीफार मोठे कार्य केले आहे. त्यात त्यांना मोफत शिक्षणाशिवाय भोजन, निवारा, पाठ्यपुस्तके, गणवेष, इत्यादीच्या स्वरूपात बऱ्याचषा सुविधा व प्रोत्साहनाची तरतूद करण्यात येते. आदिवासी विभागच्या चालू अटी व शर्तीनुसार प्राथमिक शाळेमध्ये ४० विद्यार्थ्याकरिता एक शिक्षक ४१ ते ८० विद्यार्थ्यांकरिता दोन शिक्षक आणि ८१ ते १२० विद्यार्थ्यांकरिता तीन शिक्षक नियुक्त करण्यात येतात. महाराष्ट्रात माध्यमिक शिक्षण हे साधारणत: खाजगी संस्थामार्फत चालविले जाते व अनुदानापात्र संस्थांना विहित सूत्रानूसार अनुदान दिले जाते. १९९४—९५ पर्यंत परवानगी दिलेल्या माध्यमिक शाळांना १०० टक्के अनुदान प्राप्त होते. आदिवासी उपयोजनांतर्गत शाळांना चौथ्या वर्षापासून १०० टक्के अनुदान प्राप्त होते.

राष्ट्रीय साक्षरता प्रचारक संघटना/भारत सरकार यांनी ठरविलेल्या आर्थीक आकृतीबंधानुसार साक्षरतेचे शिक्षण घेणाऱ्या प्रौढामध्ये रू. ४० असा दर ठरविलेला आहे. त्यात २/३ वाटा केंद्र शासन व १/३ वाटा राज्य शासन करते. आदिवासी भागात केंद्र शासनाचा हिस्सा ४/५ व राज्याचा १/५ असा आहे. शिक्षण या उपषिर्शातर्गत येणाऱ्यां बहुतांष योजना योजनेवर झाल्यामुळे सन २०१४—१५ साठी रू. ३६९९.५६ लाख इतकाच निधी मागणीनुसार

ठेवण्यात आला आहे. विख्यात समाजशास्त्रज्ञ आणि विचारक कार्ल मार्क्स यांचे मतानुसार स्त्रीचा कोणताही वर्ग होत नाही. जगाची अर्धी जनसंख्या वर्गविहीन आहे., स्त्रीयांच्या वर्गाचे निर्धारण पुरूषांच्या वर्गानुसार होते. स्त्रीवादी विचारक सिनोनने आपल्या जीम मबवदक मग या पुस्तकामध्ये म्हटले आहे की, 'नारी जन्म घेत नाही, घडविले जाते' यावरून स्पष्ट होते की, स्त्रीयाच्या या अवस्थेला पितृसत्ताक पध्दतीच जबाबदार आहे. बहुसंख्य आदिवासी मुलींचे शिक्षण केवळ प्राथमिक शिक्षणापर्यंत होत असते. एकतर कमी वयात त्यांचे लग्न केले जाते अथवा सामाजिक बंधनामुहे किंवा साधनांच्या अभावामुळे त्यांना पुढचे शिक्षण सोडावे लागते. महात्मा गांधी शिक्षकांवर जोर देतांना म्हणतात, महिलांचे सषक्तीकरण तेव्हाच होऊ शकते की जेव्हा त्यांना त्यांचे कार्य आणि अधिकाराची जाणिव होईल आणि याकरिता शिक्षण हेच फार मोठे शस्त्र आहे.

आदिवासी महिलांच्या शिक्षणाची ही अवस्था पाहिल्यानंतर त्यांच्या अल्पशिक्षीत किंवा अशिक्षीतपणाचे कारण स्पष्ट होते. परिणामतः बहुतांश आदिवासी स्त्रीया केवळ वन उपज वस्तू गोळा करणे, मजूरी करणे किंवा कृषीचे काम करणे यामध्येच आपले जीवन व्यतीत करतात.

**आदिवासी महिलांची आरोग्यविषयक स्थिती :—**

आदिवासी समाजव्यवस्थेमध्ये अजूनही बालविवाह पध्दती अस्तीत्वात आहे. लवकर विवाह करण्याच्या रीतिरीवाजामुळे आदिवासी मुलींचे लग्न कमी वयात होत असतात. शिक्षणाचे महत्व उमगले नसल्यामुळे प्राथमिक शिक्षणानंतर माध्यमिक किंवा उच्च शिक्षण घ्यावे अशी भावनाच त्यांच्यामध्ये दिसून येत नाही. माता होऊन मुलांचे संगोपन करणे, कुटुंबाची सर्व जबाबदारी पेलणे येवढेच ध्येय निश्चित असते. कमी वयात लग्न होत असल्यामुळे त्यांच अरोगयावर विपरीत परिणाम होते याची जाणीव मात्र आदिवासी स्त्रियांना होत नाही. कुटुंबाचे पालनपोषन करण्यासाठी त्या जीवाचे रान करतात. कबाडकष्ट करतात. शेतीमध्ये राबराब राबतात. जंगलातन सरपन, वन उपज वस्तू, कंद, मुळे, मोहफुले, डिंक, औषधी वनस्पती गोळा करण्यातच जीवन व्यतीत करतात. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन आदिवासी महिलांचे पराकोटीचे नुकसान होते. अनेक जडलेल्या आजारावर उपचार म्हणून त्या डॉक्टरचा सल्ला न घेता गावातील वैद्याकडे धाव घेतात. बहुसंख्य स्त्रीया अल्पआजाराने दीर्घकाळापर्यंत ग्रस्त राहातत. परिणामी त्यांचे आरोग्य धोक्यात येते व अकाली मृत्यूचा संकटाला सामोरे जावे लागते.

**आदिवासी महिला चे उपजिविका व रोजगार :—**

आदिवासी स्त्री च्या कौटूंबिक, सामाजिक, आर्थीक, राजकीय व सांस्कृतिक जीवनाचा आधार निसर्ग आहे. म्हणूनच महिलांसाठीचे धोरण ठरवतांना आदिवासी महिलांचा निसर्गाधीष्ठीत जीवन पध्दतीवर आधारीत विशेष तरतूदी करणे गरजेचे आहे. म्हणूनच त्यातील...

- पर्यावरण, शेती, नैसर्गिक संसाधने (जल, जंगल, जमिन) उपजीविका व रोगजार, शिक्षण — आरोग्य व संस्कृती या क्षेत्रात आदिवासी महिलांसाठी विशेष तरतूदी केल्या जातील.
- वनाधिकार कायदा २००६ नुसार नियमित केल्या जाणाऱ्या शेतजमिनीचे हस्तांतरण हे पती—पत्नीच्या नावं संयुक्तपणे करण्यासंदर्भात असलेल्या तरतूदीची सक्तीने अंमलबजावणी केली जाईल.

१. राष्ट्रीय आजिविका अधिकार अभियांनाअंतर्गत आदिवासी क्षेत्रात अंमलबजावणी करतांना बचत गटांचा आग्रह न धरता सामूहिकपणे पुढे येणाऱ्या महिलांना गट प्रशिक्षण, अनुदान व बीजभांडवल पुरविण्यात येईल.

२. आदिवासी विकास महामंडळावर महिलांना ३३% प्रतिनिधीत्व व विशेष राखीव निधीची तरतूद करण्यात येईल.

३.रोजगारासाठी हंगामी स्थलांतर करणाऱ्या आदिवासी महिलांना रोगगाराच्या ठिकाणी सुरक्षा, निवारा, स्वच्छ पाणी व आरोग्याच्या सुविधा पुरविण्याबाबत काटेकोर अंमलबजावणी व्हावी व त्यावर नियमित देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र सक्षम यंत्रणा निर्माण करण्यात येईल.

**९. स्वयंसहाय्यता बचत गटाविषयीच्या सूचना.**

१.महिला स्वयंसहाय्यता बचत गट तयार करतांना बीपीएल, एपीएल असा भेदभाव न करता सर्व महिलांचा समावेश करून त्यांचे बचत गट स्थापन करण्यास मंजूरी देण्यात येईल.

२.राज्यातील बचत गटाची माहिती व नोंदणी करण्याच्या राज्यस्तरावर महिला आर्थीक विकास महामंडळामार्फत स्वतंत्र व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात येईल. त्यांच्या मुल्यामापन व सनियंत्रण व्यवस्थापनासाठी महिला आर्थीक विकास महामंडळालला आर्थीक सहाय्य उपलब्ध करून दिले जाईल.

३.व्यवस्थापन कक्षाव्दारे महाराष्ट्रील सर्व बचन गटांची सर्व माहिती (नांव, पत्ता, योजनेचे नांव, त्यांचा घटक, त्यांचा व्यवसाय, उत्पादने, संपर्काचे माध्यम इ. संकेतस्थाळवर (वेबसाईटवर) प्रसिध्द करण्यात येईल व अद्यावत ठेवण्यात येईल तसेच ग्रामीण भागात वृत्तपत्रांद्वारे प्रसिध्दी दिली जाईल.

४.शहरी व ग्रामीण भागातील विस्कळीत व बंद पडलेल्या बचत गटांना पुनर्जिवित केले जाईल.

**१०) स्वयंसहाय्यता बचत गटांना औद्योगिक प्रशिक्षण पूरक कायदे व शासन स्तरावर अमंलबजावणी**

१.राज्य सरकारच्या बजेटमध्ये रोजगार, आरोग्य याप्रमाणे बचत गटांचा वेगळा वित्तिय लेखा शिर्ष असावा, याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

२.बचत गटातील महिलांना सामूहिक/व्यक्तिगत उद्योग संचालनामार्फत तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत आरक्षीत ठेवण्यात येणाऱ्या भूखंडामध्ये ५०% भूखंड विशेषकरून एकटी रहाणारी महिला/विधवा/घटस्फोटीत/परित्यक्ता महिलांना उद्योग निर्मितीसाठी उपलब्ध करून देण्यात येतील.

३.स्वयसहाय्यता बचत गटाबाबतचा (स्वतंत्र) कायदा तयार करण्यात येईल यासाठी इतर राज्यांच्या कायद्याचा अभ्यास करून, शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

**निष्कर्ष :—**

स्त्रीवादी चळवळ ही भारतीय राजकारणात राजकीय चळवळीत सहभाग होऊन विविध अंगाने जाणीव जागृती होत आहे. कारण स्त्रीवादी चळवळ ही एक मानवतावादी चळवळ आहे. आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्षीच्या निमित्याने १९७५ पासून स्त्रियांच्या स्वांतन्त्र्यांची चळवळ सुरू असूनही ही मध्यमवर्गापूरतीय मर्यादित आहे. तरी सुध्दा स्त्रियांचे शोषण, हुंडावली, बलत्कार, साक्षरता, समाजकाम, समानवेतन, अर्थयोजनाची गरज विथलांग कुटूंब पध्दती, दुभगलेले घर, वारसा हक्क कायदे, इत्यादी प्रश्नाच्या निमित्याने स्त्रियांचे विविध प्रश्न समाजासमोर या ना त्या स्वरूपात येण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. त्यामूळे ही सामाजीक जागृती जितली प्रभावी होईल तितकी अशाा प्रकारे चळवळ प्रभावी ठरत असल्याचे जानवते.

त्याच प्रमाणे आदिवासी महिला हे पूर्वी पासूनच त्याचे वास्तव्य जंगलात असल्याचे दिसते. शासकीय योजनेच्या अंतर्गत या आदिवासी महिलांना साक्षर करण्या करीता त्यांच्या आरोग्य करिता विविध सोयी सुविधा शासन करित आहे.

आदिवासी महिलांचे आरोग्य विषयक हित लक्षात घेउन शासनाने या महिलांना आरोग्याचे प्रशिक्षण दिल त्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्याच्यात सामाजिक, राजकीय, व शैक्षणिक आर्थीक विकासाचे अधिक प्रयत्न करण्यात आले.

तसेच शासकीय रोजगार योजने अंतर्गत व महिला बचत गट अंतर्गत त्यांना व्यवसाय करण्या करीता महिलांना रोजगार निर्माण करून दिला. शैक्षणिक दर्जा अधिक वाढविण्याकरीता शासन योजना आदिवासी महिला पर्यंत पोहचवून त्यांना योजनेचा भरपूर लाभ भरून देण्याचे शासन सतत प्रयत्नशील असल्याचे जानवते.

**संदर्भ :–**

१) स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपायोजना – डॉ. अश्विनी धोंगडे
२) आदिवासी स्त्रीजीवन सुमन गुढे सुगावा प्रकाशन पुणे – २००१
३) स्त्रीवाद आणि मराठी साहित्य डॉ. वंदना महाजन, विजय प्रकाशन नागपूर.
४) लोकसाहित्यातील स्त्रीप्रतीमा – भवाळकर सुगावा प्रकाशन पुणे.
५) स्त्रीवाद आणि समाज परिवर्तन – डॉ. वंदना महाजन, अर्थव पब्लीकेशन धुळे

# महिला सक्षमीकरण: सामाजिक, साहित्यिक चळवळीच्या संदर्भातून

**प्रा.संदिप चपटे**
शांतारामभाऊ घोलप कला, विज्ञान व गोटी रामभाऊ पवार वाणिज्य महाविद्यालय शिवळे,ता. मुरबाड, जि. ठाणे, ४२१४०१

**प्रास्ताविक:**

स्त्रियांचे सक्षमीकरण किंवा सबलीकरण या संकल्पनेचा उदय १९७० च्या स्त्रीचळवळीतून झाला. स्त्री संघटनांमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आणि स्त्रीचळवळींचा अभ्यास करणाऱ्यांनी आता अंतर्मुख होऊन कठोर आत्मपरीक्षण करण्याची वेळ आली आहे. स्त्रीचळवळीत काम करणारे कार्यकर्ते आणि संघटना यांनी केलेल्या तळमळीच्या आणि नि:स्वार्थी कार्याचा आपण जरूर अभिमान बाळगला पाहिजे, पण त्याच वेळी एक व्यापक समूह स्त्रियांच्या जाणिवा जाग्या करण्याचे काम वर्तमानकालीन स्त्रियांच्या चळवळीला जमलेले नाही, हे कठोर वास्तवही आपण लक्षात घेतले पाहिजे. संस्थात्मक किंवा संघटनात्मक स्वरूपाचा विश्वासार्ह, खात्रीशीर आणि सहज सोपा असा पाठिराखेपणा स्त्रियांना मिळवून देणे, मुख्य प्रवाहातल्या राजकीय पक्षांचे कार्यक्रम आ
ण राजकारण यांना अनुकूल वळण लावणे तसेच पक्षबाह्य राजकीय कृतिगटांना आपल्याला हवे तसे वळण देणे या बाबतीत आजही स्त्रीचळवळ कमी पडत आहे. म्हणून स्त्रियांच्या अस्मितेबद्दलच्या जाणिवा उंचावण्याकरिता आणि सार्वजनिक निर्णयप्रक्रियांवर प्रभाव पडण्यासाठी परिणामकारक राजकीय आणि सामाजिक वजन कमावण्याकरिता आपण आपले लक्ष यथोचित संघटनात्मक चौकटी, गाभ्यांच्या मागण्या आणि अनुरूप संघटनांचे जाळे उभारण्याकरिता केंद्रित केले पाहिजे, असे वाटते.

सामाजिक चळवळीच्या संदर्भातूनअगदी अलीकडच्या दोन चार वर्षांकडे नजर टाकली, तर जाणवते की स्त्रियांची, स्त्रियांच्या समस्यांची आणि काही प्रमाणात स्त्री प्रश्नांची एका विशिष्ट प्रकारे का होईना पण राज्यकर्ता वर्ग आणि विशेषत: माध्यमे मोठ्या प्रमाणात दखल घेत आहेत. म्हणजे एकीकडे स्त्रीप्रश्नाचा बोलबाला वाढतो आहे, तर दुसरीकडे रस्त्यावर येऊन निषेध नोंदवणारी स्त्री चळवळ क्षीण स्वरूपात अस्तित्वात आहे. बिगर शासकीय संघटना म्हणून किंवा विविध राजकीय पक्षांच्या आघाड्या म्हणून स्त्रियांची चळवळ आजही अर्थपूर्ण योगदान करीत असली, तरी एकूण नागरी समाजातून स्त्रियांच्या उत्स्फूर्त उठावाचा काळ आता मागे पडला असे जाणवते. माध्यमांतून, विशेषत: छापील आणि इलेक्ट्रॉनिक, दिसणाऱ्या स्त्रिया ऐश्वर्या राय छाप झगझगीत तरी दिसतात किंवा गुडीया रूपात दडपलेल्या एका अल्पसंख्याक समाजाचा केवळ बळी या प्रतिमेत दिसतात. या प्रक्रियेत स्त्रियांचे झगझगीत असणे किंवा दडपले जाणे हे दोन्हीही जणू काही बाईपणाचे मूलभूत सारतत्त्व आहे, असे भासवले जाते, वर्ग, धर्म या चौकटीप्रमाणेच स्त्रीप्रश्नही समाजव्यवस्थेत, अर्थव्यवस्थेत, इतिहासात घडविला जातो, याकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत आहे.

---

१९९१ साली आपल्या देशाने नवे आर्थिक धोरण स्वीकारून खुल्या अर्थव्यवस्थेच्या बाजारपेठेत प्रवेश केला. त्यामुळे काही मूलभूल बदल झालेले आपल्याला दिसतात. अधिकाधिक व्यापक होत जाणारे सेवाक्षेत्र, जाहिरातबाजीतून उभारली जाणारी नवी उपभोगवादी संस्कृती यामुळे स्त्रीदेह आणि स्त्रियांची जडणघडण याला साचेबंद अर्थ मिळू लागले आहेत. परंपरागत पुरुषसत्ताक व्यवस्था आता चलाख रीतीने वावरत आहे, असे दिसते, एकीकडे आकडेवारीतून दिसणारी, स्त्रियांच्या परिस्थितीची विपरीतता समोर येते. परिणामत: स्त्रियांचे पुरुषांच्या तुलनेत प्रमाण घटते, गर्भजल परीक्षा करून मुलींचे गर्भपात करणे, त्यामुळे ० ते ६ वयोगटातील मुलींचे अदृश्य होणे, त्यांच्या आयांचे आरोग्याचे प्रश्न व अकाली मृत्यूचे प्रमाण यात वाढ होणे, मारहाण, टाकले जाणे, लहान मुलाबाळांना वाढवीत एकट्याने घर चालविणाऱ्या स्त्रिया, तसेच त्यांच्या वाट्याला येणारे आया, मोलकरणी या स्वरूपाचे काम कंत्राटी, कमी पगाराचे होणे, रात्रपाळ्या, दिवसाची राबवणूक असे एक भारतीय स्त्रीजीवनाचे वास्तव, आपल्याला पावलोपावली अनुभवास येत असते. स्त्रियांकडे एकाचवेळी 'आकर्षण' आणि 'स्वस्त श्रमशक्तीचे भांडार' या दृष्टीने बघितले जात आहे. पुरुषांना जेव्हा अपुऱ्या पगाराच्या अस्थिर नोकऱ्या मिळतात, तेव्हा स्त्रियांना घराबाहेर काम शोधणे अत्यावश्यकच होते हे वास्तव आहे.

स्त्री देहाचे विकृत प्रदर्शन एका विशिष्ट वयोगटात तर अधिक प्रमाणात केले जाते. परंतु स्वस्त, लवचीक, हंगामी, हौशी, जन्मजात आवड म्हणून अर्धवेळ नोकरी (अर्धवेळ घरकाम) करणाऱ्या, श्रमिक म्हणून स्त्री कामगारांकडे पाहिले जाते. अशी ओळख या नवभांडवलशाहीत जेव्हा स्त्रियांच्या वाट्याला येते, तेव्हा आणखी एक नवा धोका संभवतो, तो म्हणजे घरकामाचे ओझे निमूटपणे वाहणाऱ्या स्त्रियांना सार्वजनिक काम घरबसल्या दिले जाईल. म्हणजे स्त्रियांचे काम अधिकच घरगुती आणि अदृश्य बनेल. स्त्रीजीवन वंचित, ओरबाडलेले होईल.महाराष्ट्रामध्ये तमिळनाडूसारख्या राज्याप्रमाणे जातीच्या अंगाने स्त्रीजीवनाची वाढती गुंतागुंत आपण अनुभवतो आहोत. दलित जातीतील पुरुषांना आधुनिक शिक्षण, नवे व्यवसाय आणि त्यामागे येणारी सुस्थिती प्राप्त झाली, की जीवनशैलीचे ब्राह्मणीकरण सुरू होते. अशा वेळी स्त्रियांवरील नियंत्रण वाढते, इतकेच नाही तर हुंडा घेणे ही प्रतिष्ठेची बाब होते. विवाहसंस्थेचे वाढते बाजारीकरण होत आहे, स्त्रियांची कोंडी अधिकच वाढत आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

भारतातील उदासीनता केवळ गरिबी आणि रोगराईमुळेच निर्माण झाली नसून स्त्रिया आणि शूद्र यांना म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या तीन चतुर्थांश भागाला दडपून राजकारणापासून दूर ठेवून झालेली आहे.तसेच भारतीय समाजातील विवाहसंस्था, कुटुंबसंस्था अधिकाधिक क्रूर झाली आहे; कारण पापपुण्याच्या कल्पना, वैधअवैधतेच्या कल्पना बदलत्या काळानुसार न बदलता त्यामध्ये चिखल साठला आहे, भारतीय पुरुष आणि विशेषत: स्त्रिया अत्यंत सक्रियपणे जातिभेद व लिंगभेद या दोन तुरुंगांमध्ये सहभागी होतात.पश्चिम आशियात, युरोपातही स्त्रियांचे स्थान शिल्लक आहे. परंतु भारतीय स्त्रीची अवस्था मात्र खूप बिकट आहे.भारतीय स्त्री भिन्न वर्गांतून भिन्न पद्धतीने जगण्याचे मार्ग शोधत असतात. तरीही सर्व भारतीय स्त्रियांमध्ये समानता असेल तर सर्व वर्गातील स्त्रिया, सर्व श्रेणीतील स्त्रियांना दुर्गा, भगवती, काली असे काहीही म्हटले गेले तरी मुळातच दुबळा पदार्थ, म्हणून त्या वाढवल्या गेलेल्या असतात. समाजाची प्रस्थापित चौकट व्यापक दृष्टीने मोडण्याचा प्रयत्न स्त्रिया करूच शकत नाहीत. भारतातील स्त्रिया प्रस्थापित समाजव्यवस्था मोडण्यासाठी सामूहिक प्रहार करण्याऐवजी व्यक्तिगत स्वरूपात, चोरूनमारून शेकडो प्रकारांनी रूढींविरुद्ध वागतात. परंतु त्याचा काही फायदा होत नाही.

भारतीय संस्कृतीत गार्गी, मैत्रेयी यांसारख्या द्रष्ट्या आणि द्रौपदीसारख्या तेजस्वी स्त्रिया असूनही दुतोंडीपणा माजला आहे. त्यामुळे स्त्री दर महिन्याला नवीन होते, हे सूत्र संस्कृतीत असतानाही स्त्रीजीवनाचे सारे नियम, उपनियम यांचा केंद्रबिंदू योनिशुचिता हाच मानला गेला असल्याने अवघे स्त्रीजीवन मलिन आणि निर्जीव बनले आहे.बहुसंख्य स्त्रियांना पीडणाऱ्या प्रश्नांकडे मध्यमवर्गीय, शहरी, तोंडपाटीलकी करणाऱ्या वरिष्ठ जातींचे दुर्लक्षच होते. स्त्रियांना शिक्षण द्या, हुंडा नको; आणि घटस्फोट नको, एवढ्यापुरतीच या मंडळींची मजल जाते. स्त्रीस्वातंत्र्य ही संकल्पनाही त्यांच्या मनात येत नाही. म्हणूनच समान स्थान, समान संधी या गोष्टी भारतीय स्त्रीच्या संदर्भात दूरच्या ठरतात.कष्टकरी स्त्रीची खालावणारी प्रकृती, पाणवठ्यावर पाणी भरण्यासाठी करावे लागणारे कष्ट यांकडे मध्यमवर्गीय स्त्री पुरुष इतके दुर्लक्ष करतात की त्यांची माणुसकीची व्याख्या त्यांच्या छोट्या वर्तुळापुरतीच सीमित राहते. अशा कष्टकरी, चोवीस कोटी बायकांना स्त्रियाच न मानण्याचे धोरण वरिष्ठ वर्ग अवलंबतो. बायकांना होणारी कुटुंबांतर्गत मारहाण, शिक्षणाच्या प्रसाराने आपोआप दूर होईल असे या वर्गाला वाटते.

भारतीय कुटुंबांमध्ये आणि समाजामध्ये स्त्रीला दुबळी आणि परावलंबी बनवून क्रौर्य आणि अन्याय यांचे चक्र फिरत राहते. अशा परिस्थितीतील पुरुषही भेकड होऊन आपल्यापेक्षा लहान, दुबळ्या माणसाला (समाजाला) दडपत, त्रास देत राहतो.भारतीय स्त्रिया पतिव्रताधर्माचे प्रतीक मानताना पुरुषांना मात्र तसे नियम लावले जात नाहीत. मर्यादा, नीतिनियम यांचे पालन करणारा, संयमित राहून राजकारण करणारा राम सीतेचा त्याग करतो याचेही कारण आपल्या समाजातील चुकीच्या पतिव्रताधर्माच्या संकल्पनेत आहे. त्याचा निषेध केला पाहिजे.भारतीय स्त्रिचे प्रतिनिधित्व द्रौपदीसारख्या असामान्य स्त्रीला दिले पाहिजेत्र तिचे कृष्णाशी असणारे नाते, सखा–सखीभावाने घडलेले स्वातंत्र्यशील नाते आहे. द्रौपदी ज्ञानी, हजरजबाबी, समज आणि धैर्य असलेली स्त्री होती. दरबार, मैदान, जंगल सर्व क्षेत्रे समान क्षमतेने हाताळणारी होती. द्रौपदीसारख्या संपन्न आणि गुंतागुंतीचे आयुष्य जगलेल्या स्त्रीला भारतीय नारीचे प्रतीक करणे आवश्यक आहे. त्यातून भारतीय स्त्री–पुरुषांचे मानसिक परिवर्तन शक्य होईल असे वाटते.

भारतातील पुरुषसत्ता स्त्रियांना परतंत्र ठेवून तेजस्वी बनवू पाहते. आपली पत्नी ज्ञानी असावी; पण ती आपल्या ताब्यात असावी अशा परस्परविरोधी भावना मनात बाळगणे चुकीचे आहे. थोडक्यात, भारतातील सर्व वर्चस्ववादी गटांतील स्त्री पुरुषांना खऱ्या अर्थाने आधुनिक होऊन बुद्धीची पुनर्रचना करावी लागणार आहे. तसे केले तरच गार्गी, मैत्रेयी, लीलावती, महादेवी अक्का, सावित्रीबाई फुले यांच्या जगण्याचे खरे अर्थ समाजाच्या तळापर्यंत पोहोचविता येतील यात शंका नाही.स्त्रियांच्या सौंदर्याविषयीचे पारंपरिक विचार गोऱ्या रंगाशी जोडून भारतातील बहुसंख्य कृष्णवर्गीय स्त्रियांना सौंदर्य या संकल्पनेतून बाद केले आहे. द्रौपदीसारख्या स्त्रियांचे सौंदर्य त्यांच्या अफाट विद्वत्तेत सामावलेले असते तर आसाममधल्या स्त्रियांचे स्वातंत्र्य, श्रम आणि सौंदर्य यांची फारकत करता येत नाही. सर्व स्त्रियांची दडपणूक करण्यामध्ये काळ्या गोऱ्यांमधील भेदभाव हा एक मोठा भाग असतो.

स्त्रीवादी शब्दाचा अर्थ काटेकोर पद्धतीने पाहिला, तर स्त्रीवादी चळवळीने समाजाच्या मूलभूत आणि सम्यक परिवर्तनाचाच विडा उचलला पाहिजे. खासगी, सामाजिक, राजकीय, आर्थिक या सर्व पातळ्यांवर असणाऱ्या पुरुषप्रधानतेला शह देऊन संरचनात्मक बदलासाठी पावले उचलणे, या सामाजिक संरचनांची स्त्रीवादी मूल्यांनुसार बांधणी करणे, तसेच खऱ्या अर्थाने लोकशाही विकेंद्रीकरण ही तत्त्वे राबविण्याचा आणि तसे संस्कार करण्याचा अविरत प्रयत्न करणे हे महत्वाचे आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला स्त्रियांना शिक्षणाची समान संधी मिळावी किंवा त्यांना मतदानाचा हक्क मिळावा अशा मागण्या करणाऱ्यांना तरी अशा सम्यक परिवर्तनाचा ध्यास नव्हता. आजही कितीतरी स्त्रिया स्त्रीप्रश्नाच्या सोडवणुकीसाठी काम करताहेत, पण आपण 'स्त्रीवादी' नाही आहोत असे त्या जाहीर करताना दिसतात. महाराष्ट्रातील स्त्री संघटनांत, फोरम अगेन्स्ट ऑप्रेशन, वीमेन्स सेंटर, स्त्री मुक्ती संघटना, मैत्रिणी, नारी समता मंच, क्रांतिकारी महिला संघटना, श्रमिक मुक्ती संघटना, मोलकरीण संघटना, फोरम अगेन्स्ट रेप, मनस्विनी, तलाक मुक्ती मोर्चा समिती या आणि अशा अनेक संघटना स्त्रियांच्या विकासाचे काम करत आहेत.

वरील संघटनांमधून स्त्रिवादी चळवळ उभी राहिली आहे. मधूनमधून सामूहिक पातळीवर आणि बहुतांश वेळी स्वतंत्रपणे या संघटना कार्यरत आहेत. त्यांनी स्त्रियांवरील अत्याचाराचा प्रश्न या संदर्भात बायकांना केली जाणारी मारहाण, बलात्कार, हुंड्यापायी होणारे खून, मुलींचे गर्भपात, सक्तीने वेश्या व्यवसाय, सती या प्रश्नांवर आवाज उठविला. स्त्रियांचा आर्थिक प्रश्न या संदर्भात कामाच्या ठिकाणी समान प्रतिष्ठा, कार्यालय वा कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेची हमी, समान कामाला समान दाम, पाळणाघरासारख्या खास सोयींची मागणी, बाळंतपणाच्या रजेची काटेकोर अंमलबजावणी वा त्यात मुदतवाढ इत्यादी प्रश्न हाती घेतले. स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न स्त्रियांना स्वत:च्या शरीराच्या रचनेचे, प्रक्रियेचे भान करून देणे, आरोग्य शिक्षण, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आंतरराष्ट्रीय औषधांचे मार्केट नियंत्रित करून तिसऱ्या जगातर लादलेल्या औषधांचे स्त्रियांच्या शरीरावर होणारे वाईट परिणाम असे अनेक प्रश्न हाती घेतले. स्त्रियांचे कायदेशीर आणि घटनात्मक हक्क वारसा आणि संपत्तीचे हक्क, पोटगी, हुंडाविराधी चळवळ, सती, जुबानी तलाक, देवदासी यांसारख्याअनिष्ट प्रथांच्या विरोधात स्त्री संघटना 'जाणीव जागृती'ला महत्त्व देतात आणि त्यातून पुरुषप्रधानतेची संरचना खिळखिळी करावी असा काही वेळा हेतू असतो. एरवी स्त्री मुक्ती प्रचारयात्रा किंवा 'मुलगी झाली हो' सारख्या कार्यक्रमामधून स्त्री चळवळीचा प्रसार केला जातो. विविध संघटनांचा इतिहास, परीघ, व्याप्ती आणि परिणाम पाहता आपल्याला पुढील निष्कर्ष काढता येतील.

१) या संघटनांच्या कामाचा परीघ खूप व्यापक दिसतो. पण नुकताच झालेला सतीविरोधी निदर्शनांचा प्रयत्न वा धर्मांतराविरोधी परिषदा वगळता स्त्री संघटनांचे बरेचसे कार्यक्रम उत्स्फूर्त, प्रासंगिक पद्धतीने घेतले जातात. यामुळे स्त्री चळवळीची एक परंपरा निर्माण होणे कठीण जाते. स्त्रियांच्या चळवळीत परिणामत: तेच तेच परिचयाचे चेहरे ठिकठिकाणी दिसतात.

२) विशिष्ट गरजा, विशिष्ट समस्या किंवा दु:ख निवारण्यावर स्त्री–संघटनांनी लक्ष केंद्रित केल्याने या समस्यांचा वापर स्त्रीची नवी प्रतिमा घडविण्यासाठी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न दिसत नाही.

३) अजुनही दोन किंवा तीन अत्यंत कळीचे प्रश्न घेऊन त्याभोवती स्त्रियांची चळवळ बांधणे शक्य झालेले नाही. हुंडाबळींची संख्या किंवा बलात्काराच्या घटना १९७५ पासून आजपर्यंत कमी झाल्या आहेत असे दिसत नाही. बहुतांश स्त्रिया पुरुषांच्या अरेरावीमुळे घाबरून एकाकी निराधार आयुष्य जगत आहेत. स्त्रियांवर होणारे हिंसाचार अजूनही मोठ्या

प्रमाणावर चालू आहेत, पण संघटनांची सभासदसंख्या थोडीच दिसते. त्यांना व्यापक जनसंघटनेचा पाया निर्माण करता आलेला नाही.

४) मोठ्या पक्षांवर आधारलेल्या संबंधित स्त्री संघटना आणि चळवळी साधारणत: त्या त्या पक्षांच्या सैद्धांतिक आणि वैचारिक चौकटीत वावरत असतात. माझा असा अंदाज आहे की काही व्यक्तींचा अपवाद सोडल्यास बऱ्याच वेळा एखादे प्रत्यक्ष काम किंवा समस्या किंवा आंदोलन हाती घेतले जाते तेव्हा त्यामागचे परिवर्तनाचे अंतिम उद्दिष्ट काय आहे, त्यामागचा विचार काय आहे, याकडे फारसे लक्ष पुरविले जात नाही.

५) त्यामुळे वस्तुनिष्ठपणे पाहिले तर स्त्रियांच्या संघटना आणि चळवळी बऱ्याच वेळा सुधारणावादी किंवा कल्याणकारी संस्था बनू लागतात. कोणती मूल्ये, आदर्श डोळ्यांसमोर आहेत, यासारख्या प्रश्नाचे त्यांना विशेष महत्त्व वाटत नाही. लैंगिक भेदभाव, पक्षपात व दडपणुकीच्या संदर्भात लोकशिक्षणाच्या व संघटनात्मक उभारणींच्या कामाकडे सतत दुर्लक्ष होत जाते.

६) स्त्रियांच्या संघटनांमध्ये बहुतांशी उच्च वर्गातील, जातीतील, उच्चशिक्षित आणि शहरी पार्श्वभूमी असलेल्या स्त्रिया जास्त आहेत. त्यांची समाजात वावरण्याची क्षेत्रे मर्यादित असतात. अजूनही समाजाच्या तळागाळात स्त्री चळवळ पोहचली नाही. अगदी दलित आणि डाव्या चळवळीही दलित आणि असंघटित कष्टकरी स्त्रियांपर्यंत पोहचल्या नाहीत ही खेदाची बाब आहे.

वास्तविक पाहता मानवी जीवनातील प्रत्येक पाऊल लिंगभावातून घडत असते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे, बाई आणि पुरुष म्हणून आपण जन्मलो तरी समाजव्यवस्थेमध्ये आपल्या बाईपण आणि पुरुषपणाचा अर्थ घडत असतो आणि अशा अर्थामधून जातीव्यवस्थाही घडवली जाते. लिंगभेदावर आधारित प्रत्येक समूह आपली अस्मिता, भूमिका, गोतावळा यांविषयीचे व्यवहार आणि नीतीनियम ठरवत असतो. आपल्या कुटुंबात, गोतावळ्यात, जातीला, आईला पवित्र, शुद्धतेचे प्रतीक मानणारी मंडळी दुसऱ्या जमातीला शिव्या देताना आई–बहिणी वरूनच का देतात, हे सहज लक्षात येईल. राजकारणातही स्त्रियांना सत्तेचा, पदाचा त्याग करूनच काही कमाई व अधिकृतता मिळवता येते. स्त्री जीवनाची आताच्या काळातील ही गुंतागुंत लक्षात घेऊन आपण आता स्वतंत्र भारताच्या विकास प्रक्रियेमध्ये बहुसंख्य स्त्रियांचे जगणे कसे घडते आणि विशेषत: आत्ताच्या काळातील सक्षमीकरण खऱ्या अर्थाने प्रत्यक्षात येण्यामध्ये कोणते अडथळे आहेत हे शोधने गरजेचे आहे.

स्त्रियांचे सक्षमीकरण किंवा सबलीकरण या संकल्पनेचा उदय १९७० च्या मध्यावर स्त्री चळवळीतून झाला. सेन आणि ग्रोन या अभ्यासकांनी नैरोबी येथील परिषदेसाठी १९८५ साली जे पुस्तक प्रसिद्ध केले ते नैरोबी येथील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी होते. तेव्हापासून या शब्दाचा आंतरराष्ट्रीय वापरही सुरू झाला. 'विकास कोंडी आणि पर्यायी दृ ष्टी', 'तिसऱ्या जगातील स्त्रियांची परिप्रेक्ष्ये' अशी सार्थ शीर्षके असलेल्या या पुस्तकात स्त्रियांनी आपल्याला सक्षमीकरण म्हणजे नेमके काय म्हणायचे आहे आणि त्यातून लिंगभावनाविषयक (स्त्री पुरुष सत्तासंबंध) परिवर्तन कसे घडले, याविषयी स्पष्ट मांडणी केली आहे. सक्षमीकरण ही संकल्पना, विकासविषयक चर्चाविश्वात गेल्या १०–१५ वर्षात सतत वापरली जाते. या शब्दाची एकच एक अशी अधिकृत व्याख्या नाही. परंतु दुर्बल किंवा ओरबाडले गेलेले समाजातील गट पुन्हा एकदा संसाधने आणि निर्णयशक्ती यांवर नियंत्रण मिळवून आणि वाटा मिळवून सक्षम होणे असा अर्थ त्यामागे आहे. दडपलेल्या वर्गामध्ये स्त्रियांचे दुर्बल होणे अधिकच तीव्र असते हे सत्य सर्वांनी स्वीकारायला सुरुवात केली आहे. त्यामुळे स्त्रियांचे सक्षमीकरण या शब्दाला आता सामाजिक न्यायासाठी, समतेसाठी आणि पुरुषाच्या जन्मजात श्रेष्ठत्वाच्या कल्पनांविरुद्ध स्त्रियांनी दिलेला झगडा किंवा सबलता असा अर्थ प्राप्त झाला आहे. सत्ता किंवा सबलता या संकल्पनांच्या केंद्रस्थानी निवड करण्याची क्षमता असते. परंतु तरीही केवळ एकेका सुट्या व्यक्तीमध्ये निवड करण्याची क्षमता येत नाही वर त्यासाठी योग्य परिस्थिती असावी लागते. हे लक्षात घेतले पाहिजे. जी निवड स्त्रिया करतील, त्या निवडीला परिवर्तनाच्या दृष्टीने अर्थ असला पाहिजे आणि त्यातून सामाजिक विषमतेला शह देण्याची क्षमता असली पाहिजे.

सामाजिक संरचनांमधून व्यक्तीच्या कर्तृत्वाला आकार मिळतो. उदाहरण घ्यायचे झाले तर जागतिकीकरणाच्या झंझावातात स्त्रिया जेव्हा एक आकर्षक मालमत्ता ठरतात, तेव्हा वेगवेगळ्या मार्गांनी वेश्या व्यवसाय स्वीकारणे अथवा काही स्त्रियांनी गृहिणी होऊन संस्कृती रक्षणाची चौकट स्वीकारणे या दोन्ही निवडीच्या स्वातंत्र्यामध्ये सक्षमीकरण नाही.

तसेच स्त्रियांना फक्त कर्ज मिळण्याची हमी अथवा राखीव जागातून राजकीय सहभाग किंवा समान शिक्षणाची संधी दिली, तर तेवढे सक्षमीकरणासाठी सहज पुरेसे आहे असे मानणेही चूक आहे. कोणत्याही संसाधनाचे आणि संधीचे प्रत्यक्षात रूपांतर करणे आणि समाजानेही ते स्वातंत्र्यशील मानणे ही प्रक्रिया महत्त्वाची आहे. यासाठी वेगवेगळ्या थरांतील, जातींतील, धर्मांतील स्त्रिया आपल्या अस्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा अर्थ कसा लावतात, ते समजून घेणे महत्त्वाचे आहे. थोडक्यात सक्षमीकरणाचा तयार फॉर्म्युला करणे घातक ठरते. विशेषत: खुल्या बाजारपेठेमध्ये जेव्हा जुगारी पैसा आणि हिंसाचार यांनाच मान्यता मिळू लागली आहे, अशा काळात विवाह करणे न करणे, परित्यक्ता असणे वा एकटे राहणे, कोणत्याही अर्थाने स्थावर मालमत्ता नसणे व असली तर त्या नात्यातीलच पुरुषांच्या धाकटपटशाला बळी जाणे अशा अनेक आंतरविरोधात भारतीय स्त्री–जीवन चिरफाळले जाते आहे. म्हणूनच अशा वेळी राज्यसंस्था, दमदार इच्छाशक्ती असणारी आणि चिकित्सक दृष्टी असणारी तसेच सर्वसामान्य माणसांशी इमान सांगणारी असली पाहिजे. लिंगभाव संवेदनक्षम राज्यसंस्था आणि तसाच नागरी समाज निर्माण करण्यासाठी जागतिक बाजारपेठेच्या झंझावातात उखडून न जाण्याची काळजी घेण्यासाठी, भारतातील 'स्त्रीप्रश्ना'ची जडणघडण समजून घेणे महत्त्वाचे आहे.

भारतासारख्या अपरिमित विविधता आणि विषमता असलेल्या देशात परिवर्तन घडवू पाहणाऱ्या कुठल्याही चळवळी जेवढ्या प्रमाणात यशस्वी होतात तेवढ्याच प्रमाणात त्या अपयशाच्याही धनी होतात. स्त्रीवादी चळवळी तरी या वस्तुस्थितीला अपवाद ठरतील असे आपण कशाच्या बळावर म्हणायचे? शिवाय भारतातील स्त्रीवादाची चळवळ इतक्या वेगवेगळ्या स्तरांवर चालवावी लागणारी चळवळ आहे की तिचा समान आशय एका चौकटीत बंदिस्त करून मांडता येणे जवळजवळ अशक्य आहे याची जाणीव आज आपल्याला झालेली आहे. त्यामुळे स्त्रीवादाचा किमान सर्वसाधारण असा संकल्पनात्मक आशय निष्पन्न करण्याचा प्रयत्न आपण करू नये हेच श्रेयस्कर ठरणार आहे. आपल्या समाजात जेवढे म्हणून थर आपल्याला दिसतात त्या प्रत्येक थरातील स्त्रियांचा वर्ग आपल्या डोक्यावर आपापल्याला प्रश्नांचे ओझे घेऊन उभा असलेला दिसतो. या डोक्यावरच्या प्रत्येक गाठोड्याचे संदर्भ वेगळे, सापेक्षता निराळी आणि हव्या असलेल्या किमान उत्तराचे स्वरूपही निराळे आहे. ही उत्तरे त्यांच्या रोजच्या जगण्यातल्या किमान गरजांशी निगडित आहेत त्याचप्रमाणे त्यांना अस्मितेचे नवे क्षितिज उपलब्ध करून देण्याविषयीही आहेत. असे असले तरी भारतीय स्त्रीशी निगडित असलेल्या सर्वसामान्य असा घटक म्हणजे कुटुंबसंस्था. ही संस्था एकाच वेळी मारक आणि निर्वाहक अशा स्वरूपाची आहे. मात्र या कुटुंबव्यवस्थेने जन्माला घातलेल्या प्रश्नांशी आणि त्यातील अनेकानेक घटकांशी असलेल्या संबंधातून जन्मलेले एक समान गाठोडे प्रत्येक भारतीय स्त्रीच्या डोक्यावर दिसते. त्या गाठोड्यात भारतीय रुढी–परंपरा आणि धर्म–संस्कृतीने दिलेला ऐवज अगदी खच्चून भरलेला आहे. अशा अवस्थेतून स्त्रीवादी चळवळीला मार्ग काढावा लागतो आहे. त्यामुळे या चळवळीची भविष्यातली नेमकी दिशा कोणती असायला हवी हा प्रश्न पडतो.

आपल्या आजच्या वर्तमानाने आपल्या पुढच्या प्रवासाच्या दिशाच हरवून टाकलेल्या आहेत. कुठे जायचे? कुणाला सोबतीला घ्यायचे? या सर्वच प्रश्नांच्या उत्तरांविषयीचा संभ्रम आज निर्माण झालेला आहे. जगण्याच्या भीषण चढाओढीमागे काही म्हणता काही तार्किकता उरलेली आहे असे जाणवत नाही. त्यामुळे जगण्याचा सारा व्यवहारच कलंकिल झाल्यासारखे वाटू लागले आहे. या कालखंडात स्त्रीवादाने कोणत्या आशयाशी स्वत:ला जोडून घ्यायचे? माणसाची 'माणूस' म्हणून ओळख पुसून टाकून केवळ 'ग्राहक' म्हणून त्याला शिल्लक ठेवणाऱ्या या व्यवस्थेत स्त्रीवादाला कोणकोणत्या स्तरांवर मूलगामी विचार करावा लागणार आहे याची जाणीव झाली की ही रुखरुख अधिकच व्यापक होवू लागते.

जागतिकीकरणाने उदारीकरण या प्रक्रियांच्या परिणामी गरजांचे कृत्रिमरीतीने निर्मिती केली जात आहे. गरजा वाढविण्यासाठी व त्या भागविण्यासाठी जो व्यापार उभा झालेला आहे, त्यात स्त्रीची प्रतिमा मलिन झालेली आहे. यामुळे भारतीय स्त्रीवादाच्या संकल्पनेला याही पातळीवरून विचार करण्याची गरज आज निर्माण झालेली आहे, असे संशोधकाला वाटते.

संदर्भग्रंथ:

१) वरखेडे मंगला, '**स्त्रीवादी समिक्षा: संकल्पना व उपयोजन**', प्रकाशक: का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे, पहिली आवृत्ती १जाने १९९९.

२) भागवत विद्युत, '**स्त्री–प्रश्ना'ची वाटचाल: परिवर्तनाच्या दिशेने**', प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती ८मार्च २००४.

३) देशमुख अरूणा, '**स्त्रीवाद: साहित्य आणि संस्कृती**', आकांक्षा प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती १५ सप्टे २०१०.

४) कसबे रावसाहेब, (संपा) '**भारतातील स्त्री चळवळ: समतेच्या संदर्भात**', जुलै २०००.

५) कांबळे उत्तम, (संपा), '**सामाजिक न्याय आणि स्त्री**', डिसें २०१५.

# आधुनिक मनू आणि स्त्रीमुक्ती बील

डॉ.पौळ भावन श्रीपती
के.के.वाघ वरिष्ठ महाविद्यालय, भाऊसाहेब नगर ,पिंपळस (रामाचे) ता,निफाड जि.नाशिक

---

जगाच्या इतिहासावर ज्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा चिरंतन उमटविला आणि आपल्या आलोकिक बुद्धिमत्तेच्या जोरावर संपूर्ण भारतीय समाज व्यवस्थेला नवी दिशा दिली असे महामानव म्हणजे युगपुरुष, धम्म प्रवर्तक, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, दलित, शोषित, प्रज्ञावंत, पंडित, कायदेतज्ञ आणि अर्थतज्ञ महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी जे जे रंजले गांजले होते त्या सर्वांचा त्यांनी कैवार घेतला दलित, पीडित, शोषित, आदिवासी यांच्यासंबंधी त्यांच्या उत्थानासाठी जसे त्यांचे चिरंतन चिंतन केले आणि लढे दिले त्याच प्रमाणे त्यांनी या देशातील शेतकरी भूमिहीन, शेतमजूर, स्त्रिया, कामगार, कष्टकरी यांच्यासाठीही लढे दिले . या सर्व घटकांना केंद्रस्थानी ठेवूनच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी संपूर्ण "एकात्म भारताचे" स्वप्न पाहिले नव्हे तर, एकात्म भारत निर्माण होण्यासाठी भारतीय राज्यघटनेत अशा तरतुदी ही केल्या तरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे 'एकात्म भारताचे' स्वप्न अजूनही पूर्ण झाले नाही कारण बाबासाहेबांचा सामाजिक न्यायाचा लढा या देशातील प्रस्थापित व्यवस्थेच्या पालकांनी त्यावेळीही आणि आजही समजून घेतला नाही आणि सर्वसामान्यांनाही तू समजू दिला नाही फार मोठे षडयंत्र रचले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना फक्त दलितांचे कैवारी ठरविले त्यांच्या उत्तुंग कार्याकडे दुर्लक्ष केले परंतु सूर्याचे तेज कधीच झाकता येत नाही ते कितीही झाकण्याचा प्रयत्न केला तरी झाकत नसते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीतही तसेच घडले संपूर्ण भारतीय समाजाच्या उत्थानाच्या क्रांतिकारी चळवळीचे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव नेते ठरले.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना जातीच्या, धर्माच्या, राज्याच्या सीमा कधीच लागू पडत नाहीत. ते या देशाच्या सर्व प्रश्नांची सर्व चळवळीशी, सर्व आंदोलनांची आणि सर्व समाजाशी एकरूप झालेले महान नेते आहेत. या देशातील अनेक सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक समस्यांचा गुंता सोडविण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान फार महत्त्वाचे आहे. आजही त्यांचे कार्य तत्त्वज्ञान आणि कार्यक्रम सुंदर समाज निर्मितीसाठी आवश्यक आहे. त्यांनी जे कार्य केले ,ज्या चळवळी केल्या, जे विचार दिले, त्या कार्याला, विचाराला अनंत पैलू आहेत त्याचे हे सर्व पैलू भारतीय समाजाच्या उत्थापनाचे आहेत. त्यापैकी हिंदू कोड बिल त्यांच्या जीवनातील अत्यंत महत्त्वपूर्ण गौरवशाली संघर्षाचे पर्व आहे. हिंदू कोड बिल हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक न्यायाच्या चळवळीतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे, भारतीय हिंदू स्त्रियांना हजारो वर्षांच्या भीषण अंधकारातून बाहेर काढण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल तयार केले या बिलाच्या माध्यमातून त्यांनी या देशातील प्रत्येक स्त्रीला विवाह, वारसा याबरोबरच दत्तकविधान, उत्तराधिकारी, पोटगी, घटस्फोट यासंबंधीचे महत्त्वाचे अधिकार मिळवून दिले, म्हणून डॉक्टर बाबासाहेबांचे हिंदू कोड बिल म्हणजे भारतीय स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाचे क्रांतीसूत्र आहे स्त्री मुक्ती संग्रामाचा मौलिक दस्तावेज आहे. आधुनिक भारतातील अत्यंत मोठे भौतिकबंड आहे श्री परिवर्तनाचा तो आमूलाग्र विचार आहे.

भारतीय स्त्री ही पुरुषाच्या इतकीच समाजाचा महत्त्वाचा घटक आहे. हे जाणून बाबासाहेबांनी स्त्रियांना विवाह, घटस्फोट, वारसा दत्तक विधान, एकत्र कुटुंबाची मिळकत आधी संदर्भात अधिकार मिळावेत. स्त्रियांना पोटगी मिळावी, स्त्रीला समाजात सन्मानाने जगता यावे, तिला तिचे हक्क मिळावेत. यासाठी हिंदू कोड बिल तयार

केले. हे हे कोड बिल नऊ भागात 139 कलमात आणि 7 परिशिष्टात विभागलेले होते[1] . त्यात प्रामुख्याने आंतरजातीय विवाहास मान्यता, एक पतीनित्वाचे बंधन, पुरुषाप्रमाणे स्त्रीला सुद्धा घटस्फोट मागण्याचा अधिकार, What पद्धतीतील वारसाहक्क मुला इतकाच मुलीला सुद्धा बापाच्या मालमत्तेचा अधिकार आणि दत्तक विधानाच्या सुधारणा इत्यादीच्या बाबींचा समावेश केलेला आहे. हा कायदा सर्व जाती संप्रदाय, वीर शैव व प्रार्थना समाज, आर्य समाज, ब्राम्हण लिंगायत, बौद्ध, जैन आणि शीख या सर्वांनाच लागू होतात. त्यामुळे हिंदू कोड बिल म्हणजे तत्कालीन समाजात सामाजिक असमानता भेदभाव विषमता पसरविणाऱ्या आणि स्त्रियांना बंदिस्त ठेवणाऱ्या चालीरीतींवर बाबासाहेबांनी केलेल्या एक प्रकारचा प्रहार होता. स्त्री परिवर्तनाचा तो एक लढा होता. हा लढा बाबासाहेब कायदेशीर स्वरूप देऊन साकार करू पाहत होते. "स्त्रीला जागृत करून, तिला अधिक संरक्षण देऊन, पुरुषांच्या जाचातून मुक्त करण्यासाठी तिला समानता, आर्थिक, राजकीय, सामाजिक स्वातंत्र्य एका विशेष कायद्याने द्यावे असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मनात होते, म्हणून त्यांनी हिंदू कोड बिलाला चा आग्रह धरला होता" परंतु जीर्ण मतवाद्यांनी धार्मिक, मानसिकतेचा त्याग न करता, मानवी मूल्यांचा वस्तुनिष्ठपणे विचार न करता बाबासाहेबांच्या हिंदू कोड बिलाला विरोध केला.

बाबासाहेबांनी मांडलेल्या हिंदू कोड बिलाला सर्वसामान्य माणसापासून ते देशाच्या राष्ट्रपती पर्यंत विरोध झाला. अनेकदा त्यांना मारण्याच्या धमक्या येऊ लागल्या त्यांच्या विरोधात हिंदू कोड बिल विरोधी मोर्चा हि काढण्यात आले. पोलीस संरक्षणामुळे ते बचावले. बाबासाहेबांना वाटत होते की स्त्रीया तरी आपल्या पाठीशी उभ्या राहतील. परंतु स्त्रिया ही त्यांच्या विरोधात गेल्या धार्मिक संस्थांचा सनातन्यांचा विरोध होताच परंतु काही जीर्ण मतवादी विचारांचे पुढारीही विरोध करत होते. श्याम प्रसाद मुखर्जी, पंडित मदन मोहन मालवीय, स्वामी करपात्री, श्रीमती शांतीदेवी, ब्रिजेशवर प्रसाद, डॉक्टर राजेंद्र प्रसाद, शंकराचार्य ब्रह्मानंद सरस्वती, डॉ. पट्टाभि सीतारामय्या, जी.डी,भट्ट , वल्लभाई पटेल, पंडित मुकुंद बिहारीलाल भार्गव, दर्भाग्याचे महाराज, ठाकूरदास भार्गव, एस एन सहाय, आणि अनेक मुसलमान, ख्रिस्ती, जैन ,शीख यांनी विरोध केला. तरी बाबासाहेब डगमगले नाहीत. कारण हिंदू कोड बिलाला जसे विविध विरोधक होते. तसेच काही समर्थकही होते. त्यामध्ये पंडित जवाहरलाल नेहरू, कुमारी राजश्री, श्रीमती पद्मजा नायडू, पंडित हृदयनाथ कुंजरू, के.एल.झांगरे , मोहनलाल शास्त्री, पंडित धर्मदेव विद्यावाचस्पती, डॉ. पा.वा काणे, जमनादास मेहता, पु.म.लाड, श्रीमती मिटन लाम , जी. जी. दळवी,सौ लीलावती मुंशी, दिवान बहादुर जव्हेरी, एच .व्ही कामत, डॉ. पंजाबराव देशमुख, के संतनाम, कृष्णचंद्र शर्मा, सिताराम जाजू ,आचार्य कृपलानी, अल्लादी कृष्णस्वामी, अय्यर, पि.के सेन, कमला चौधरी, बक्षी टेकचंद्र, के.टी. शहा, वि. स खांडेकर इत्यादी पुरोगामी विचारांची मंडळी होती. पण तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी 'हिंदू कोड बिल पास झाले तर मी राजीनामा देईल' अशी धमकीवजा कठोर भूमिका घेतली आणि हिंदू कोड बिलाच्या विरोधात पंडित नेहरूंना दिनांक 21 जुलै 1948 रोजी व दिनांक 24 जुलै 1948 रोजी दोन पत्र लिहिली. आणि या पत्रातून स्पष्ट नकार वादी भूमिका दर्शवली, ते म्हणतात "मी जुन्या मताचा आहे. पूर्वपार चालत आलेल्या गोष्टीवर माझी श्रद्धा आहे, माझी मते तुम्हाला प्रतिगामी वाटतील. पण महात्माजींच्या शिकवणुकीप्रमाणे वागणारा मी आहे असत्याच्या आवरणाखाली न मिरवता हे जग आपल्याला जसे वाटते व भासते तसेच घेऊन चालावे असे महात्मा गांधींनी आपणाला सांगितले आहे. हिंदू कोड बिलाला पाठिंबा देण्याचे अभिवचनही देऊ शकत ऐकत नाही"[2] डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे हे वक्तव्य म्हणजे प्रतिगामी रूढीवादी विचारांची साक्ष आहे. त्यामुळे बाबासाहेबांना सुशिक्षित आणि अशिक्षित अशा दोन्ही विरोधकांशी हिंदू कोड बिलासाठी संघर्ष करावा लागला. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाच्या विरोधकांना भयंकर धारेवर धरले परंतु ज्यांच्यासाठी हे कोड बिल आहे त्या स्त्रियांनी की त्यांना साथ देऊ नये याचे मात्र त्यांना तीव्र दुःख वाटले. "स्त्रियांच्या दुर्बलतेमुळे बीलाचा घात झाला.

स्त्रियांच्या पायात ताकद असती तर बिल कधीच बारगळले नसते. पार्लमेंट मध्ये निवडून आलेल्या स्त्रियांनी देखील या बिलाबाबत काही जागृत जागृत दाखविली नाही. बाबासाहेबांना ना स्त्रियांनी साथ दिली ना समाजाने परंतु अशा घायाळ मन स्थितीतही बाबासाहेब हिंदू कोड बिल यासाठी लढत होते . या कामात त्याने स्वतःच्या प्रकृतीकडे लक्ष दिले नाही. स्वतःच्या मुलाबाळांसाठी आई-वडिलांची जी तळमळ असते तशीच तळमळ बाबासाहेबांची हिंदू कोड बिलसाठी होती.

कायदे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात बाबासाहेब होते ते केवळ हिंदू कोड बिलासाठी होते. त्यासाठी त्यांनी 10 ऑगस्ट 1951 मध्ये पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंना पत्र लिहले . पत्रात नेहरूंना विनंती केली हिंदू कोड बिल विधेयक लोकसभेत पुढे ठेवण्याची .परंतु नेहमी त्यांना "तुम्ही धीराने घ्यावे. हिंदू कोड बिलाला आत आणि बाहेर असा दोन्ही बाजूंनी विरोध असल्यामुळे ते लोकसभेच्या विचारासाठी सप्टेंबरच्या आरंभी घ्यावे असे मंत्री मंडळाने ठरविलेआहे," [4] असे पत्राने कळविले आणि शेवटी 26 सप्टेंबर 1951 ला 'हिंदू कोड बिल स्थगित केले' असे जाहीर केले. पंतप्रधान पंडित नेहरू मी हिंदू कोड बिल स्थगित केल्याचे जाहीर करताच बाबासाहेबांनी 26 सप्टेंबर 1951 ला आपल्या कायदा मंत्रिपदाचा राजीनामा दिला. बाबासाहेब कायदा मंत्रिपदाचा राजीनामा देण्याची पुढील पाच कारणे सांगतात.[3]

1. "पंतप्रधान पंडित नेहरू यांनी मंत्रिमंडळात बोलवून विधी मंत्री म्हणून जबाबदारी सोपविली त्यावेळी पुढे नियोजन खाते देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु नियोजन खाते दिले नाही. मंत्रिमंडळाच्या एकाही समितीवर त्यांनी त्यांना घेतले नाही.

2. अस्पृश्यांच्या प्रश्नाबाबत सरकार उदासीन होते. अस्पृश्यांच्या प्रश्नांना नेहमीच गौण स्थान दिले गेले.

3. कश्मीरबाबत पंडित नेहरूंनी चुकीचे धोरण अवलंबिले. बाबासाहेबांचे असे मत होते की 'काश्मीरला भारतात ठेवण्यासाठी सरकार मिलिटरीवर जो प्रचंड खर्च करीत आहे त्याचा विनियोग योग्य विनियोग देशोन्नतीच्या विधायक कार्यासाठी करावा. काश्मीरची फाळणी करून हिंदू आणि बौद्ध लोकवस्ती असलेला भाग भारतात समाविष्ट करावा, आणि मुसलमान लोकवस्ती असलेला भाग पाकिस्तानाला जोडावा असे केल्याने लष्करावर होत असलेला प्रचंड खर्च तर वाचेलच, परंतु पाकिस्तान व भारत यांच्यात पुढे काश्मीर प्रश्नावरून वाद होणार नाहीत व सालोखाही प्रस्थापित होईल'.

4. पंतप्रधान पंडीत नेहरुंचे परराष्ट्र धोरणे चुकीची असल्याने भारताला जगात मित्र राष्ट्रांपेक्षा शत्रू राष्ट्रात जास्त निर्माण होतील.

5. पाचवा वा मतभेदाचा मुद्दा म्हणजे हे हिंदू कोड बिल पंडित नेहरूंनी हिंदू कोड बिल पास करून घेण्याच्या मोठ्या गर्जना केल्या, पण आपल्या शब्दाप्रमाणे ते वागले नाहीत. ते बिल पास करून घेण्यासाठी नेटानेसंमत करून घेण्यात त्यांनीजितकी कळकळ आणि जिद्द दाखवायला हवे होते दाखविली नाही". यावरून हिंदू कोड बिल हे बाबासाहेबांच्या दृष्टीने किती महत्त्वाचे होते हे लक्षात येते. 1951 मध्ये हिंदू कोड बिल पास होऊ शकले नाही परंतु कालांतराने हिंदू कोड बिलाचे महत्त्व लक्षात घेऊन हिंदू कोड बिलाच्या काही भाग पुढे मंजूर करण्यात आला. (1955 विशेष विवाह कायदा) (1955 विशेष विवाह हिंदू विवाह कायदा) (1956 हिंदू उत्तराधिकारी कायदा) (1956 हिंदू दत्तक ग्रहण आणि निर्वाह कायदा) अशा वेगवेगळया कायद्यांच्या स्वरूपात हिंदू कोड बिलाच्या तरतुदीत बराच फेरबदल करून उपरोक्त कायदे पास करण्यात आले 7 दिवसांच्या प्रदीर्घ चर्चेनंतर ते मंजूर झाले.[5]

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी राजीनाम्याची कारणे सादर करताना आपल्याला मिळालेली वागणूक प्रामुख्याने सांगितलेली आहे. यावरून पंतप्रधान नेहरूंनी बाबासाहेबांना मंत्री असताना कशी वागणूक दिली ते यावरून स्पष्ट होते नेहरूंच्या वृत्तीचा बाबासाहेबांनी निषेध केला, बाबासाहेबांनी आपली मते ही निर्भीडपणे

मांडली. भारताच्या प्रजासत्ताक राज्यपद्धतीत एका विद्वान मंत्राची कशी पद्धतशीर गळचेपी करण्यात आली. हे खेदजनक दृश्य बाबासाहेबांच्या रूपाने आजही दिसते. परंतु असे असले तरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी मंत्रिमंडळात राहून केलेले कार्य फार मोठे आहे त्यांची संसदेतील भाषणे बिलेही जितकी अभ्यास पूर्ण व्यवस्थित असत तितकी अन्य कोणत्याही नेत्याची अथवा मंत्र्याची नसत . त्यांनी मंत्री झाल्यावर उद्घाटनाचे वा अनावारनाचे असे समारंभ फारसे कधी साजरे केले नाहीत. अनेक वेळा त्यांनी खऱ्या महाराष्ट्रीयन मराठी माणसाचा बाणा दाखविला.नि:स्पृहता व निर्भयता दाखविली . त्यांनी निर्मिलेल्या ज्ञानाचे आणि कार्यकर्तृत्वाच्या स्मारक म्हणून आजही राज्यघटना आणि हिंदू कोड बिल या दोन गोष्टींचा उल्लेख करता येतो.[6]

बाबासाहेबांचे हिंदू कोड बिल नामंजूर झाले. या नामंजुरीनंतर चार वर्षांनी परिस्थितीची आवश्यकता लक्षात घेऊन बाबासाहेबांच्या हिंदू कोड बिल यात बदल करून काही भागांचे कायद्यात रूपांतर करण्यात आले. तेही सरदार वल्लभाई पटेल सारखे विरोधकांच्या मृत्यूमुळे होऊ शकले. तरी ही काही कायद्यांची कागदपत्र कागदावरील तडजोड होती. कारण भारतीय मानसिकता यांचा स्वीकार करण्यास कानाडोळा करते स्त्रीमुक्तीच्या अधोगतीला पुरुषांची मानसिकता कारणीभूत आहे हे नाकारता येत नाही. या मानसिकतेवर बाबासाहेबांचे हिंदू कोड बिल म्हणजे वज्रघात होता, प्रहार होता. विषमतेचा स्वीकार करणाऱ्या व्यवस्थेने समतेचा स्वीकार करणाऱ्या आणि स्त्री उन्नतीचा मार्ग मोकळा करणाऱ्या बाबासाहेबांच्या हिंदू हिंदू कोड बिलास नाकारले. पण पेशवे काळानंतर प्रथमच महात्मा ज्योतिबा फुले, पेरियार रामस्वामी आणि नंतर बाबासाहेब आंबेडकर तीन महापुरुषांमुळे स्त्री सर्व दृष्टीने स्वतंत्र झाली आहे, सत्य कुणालाही नाकारता येणार नाही. बाबासाहेबांच्या स्त्री-स्वातंत्र्य विषयक विचारांची भारताला आज गरज आहे. आज स्त्री नोकरी करते स्त्री समाज सुधारकआहे स्त्री वैज्ञानिक क्षेत्रात दिसते स्त्रिया आज सर्वच क्षेत्रात कार्य करतात आणि पुरुषांच्या बरोबरीने बौद्धिक दृष्ट्या प्रगत आहेत . पण पुरुषी मनावर रुजलेले अहंकाराचे संस्कार जसे गेलेले नाहीत तसेच स्त्री मनावर रुजलेलेरूढी परंपरेचे विचारही संपूर्णपणे संपलेली नाहीत . ती कायद्याने स्वतंत्र असली तरी आजही बहुतांशी स्त्रिया मानसिक रित्या स्वतः स्वतः मुळे गुलाम आहेत त्यामुळे या मागासलेल्या आहेत, बाबासाहेबांच्या भारतीय राज्यघटनेनेस्त्रीला पूर्णपणे स्वातंत्र्य न्याय दिले आहे. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व मार्ग मोकळे केले आहेत तरीही स्त्रियांच्या अनेक समस्या आहेत हे नाकारता येत नाही म्हणून तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री प्रश्नाची सर्व बाजूंनी कायद्याच्या माध्यमातून सोडवणूक करण्यासाठी हिंदू स्त्रीला पुरुषांप्रमाणे समान दर्जा प्राप्त करून देण्यासाठी समान दर्जाची तरतूद असलेले कायदे तयार करण्याची योजना हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून आखली होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री पुरुष समानतेच्या सिद्धांताचे व व्यवहाराचे कट्टर समर्थक होते. म्हणूनच त्यांनी हिंदू समाजातील स्त्री-पुरुष विषमता समाप्त करण्याकरता हिंदू कोड बिल निकडीची मानले. त्याचा कायदा समग्र हिंदू स्त्रियांना होणार होता. समाजातील पुरुष प्रधान स्वरूप व स्त्रीदास्य संपणार होते. लक्षावधी स्त्रिया आपल्या पतीच्या क्रूर व अमानवी दडपणापासून मुक्त होणार होत्या. म्हणून तर बाबासाहेब म्हणतात **"मला भारतीय राज्यघटना निर्माण केली त्यापेक्षा हिंदू कोड बिल माझ्या हातून झाले याचा आनंद होतो"** [7] बाबासाहेबांच्या तत्वज्ञानात व विचारात पुरुष आणि स्त्रियांना समान अधिकार आहेत . भारतीय स्त्रियांच्या अस्मितेसाठी व जागृतीसाठी त्यांनी चे अभूतपूर्व कार्य केले त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही परंतु त्याची जाणीव आजच्या भारतीय स्त्रीला कितपत आहे हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

**संदर्भ टिपा :-**

1. बसाखेत्रे राम,( 1992)बायजा द्विमासिक, संपादक सौदामिनीराव,पुणे, पृ.24
2. गणवीर रत्नाकर,(1987 )डॉ.आंबेडकर आणि हिंदू कोडबिल, खंड पहिला,नागपूर,पृ.47

3. सूर्या अनिल,(2010 )प्राचीन अर्वाचीन भारतीय स्त्री आणि हिंदू कोडबिल,सुगावा प्रकाशन पुणे,पृ.22

4. आंबेडकर सविता ,(2012) डॉ. आंबेडकरांच्या सहवासात आत्मचरित्रपर ग्रंथ, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, पृ. क्र. 164

5. कित्ता, पृ.179 -80

6. खैरमोडे चांगदेव भवानराव, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर खंड-10, सुगावा प्रकाशन पुणे, 1989, पृ.क्र.107

7. कीर्ती विमल (संपा),(1982 ) हिंदू कोडबिलासंबंधी :डॉ.बी,आर.आंबेडकर ,नागपूर, पृ.14

# साधना साप्ताहिकातून स्त्रीवादी चळवळीचा आढावा

**डॉ. वाईकर शोभा बबन**
सुभाष बाबुराव कुल महाविद्यालय,केडगाव, ता. दौंड, जि. पुणे

**प्रस्तावना**

‘साधना’ साप्ताहिकाचे सामाजिक कार्य अभ्यासताना समाजामधील अनेक घडामोडीचे वास्तववादी दर्शन आपल्याला ‘साधना’ साप्ताहिकामध्ये दिसते. ‘साधना’ साप्ताहिकाचे समाजातील स्थान व दर्जा दखलपात्र ठरला आहे. विविध स्तरावर या साप्ताहिकाचे प्रबोधन कार्य दिसून येते. विशेषत: विविध विषयावरील लेख, चर्चा, टीका, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय विषयावरील माहितीपूर्ण लेख वैचारीक मंथन घडवून आणण्यासाठी ‘साधना’ साप्ताहिकाची भूमिका अग्रेसर राहिली. साने गुरुजींनी सुरु केलेले हे साप्ताहिक म्हणजे त्यांची वैचारिक ‘साधना’च होय.

१९ व्या शतकात सुधारकांचा एक वर्ग निर्माण झाला. त्यात देशी पाश्चात्य सुधारकांचा समावेश होता. देशी सुधारक वर्गात लोकहितवादी महात्मा ज्योतिबा फुले, गणेश आगरकर, महर्षी कर्वे, विष्णुशास्त्री पंडीत, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले इ. सुधारक वर्गाने स्त्री समस्याबाबत आत्मपरिक्षण करुन आपले विचार वृत्तपत्र, मासिके, नियतकालिकातून प्रकट केले. दर्पण, ज्ञानोदय, प्रभाकर, ज्ञानप्रकाश, इंदुप्रकाश, केसरी इ. वृत्तपत्रामधून स्त्री समस्यांची चर्चा करण्यात आली.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. ‘साधना’ साप्ताहिकातून स्त्रीसुधारणाचा अभ्यास करणे.
2. ‘साधना’ साप्ताहिकातून विविध लेखकांच्या लेखांच्या माध्यमातून स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास करणे.
3. ‘साधना’ साप्ताहिकातून स्त्रियांच्या विविध प्रश्नांचा व समस्यांचा अभ्यास करणे.

**स्त्रीवादी चळवळीचा आढावा**

‘साधना’ साप्ताहिकाने इ.स. १९४८ पासून स्त्रियांनी ज्या चळवळी केल्या त्याचा आढावा या ठिकाणी घेण्याचा प्रयत्न केला गेला आहे. समाजसुधारणेचा केंद्रबिंदु असणारी स्त्री यांच्या संदर्भात ‘साधना’ साप्ताहिकातून स्त्रियांच्या विविध प्रश्नांची व समस्याची मांडणी केली. एक स्वतंत्र व्यासपीठाच्या माध्यमातून त्यांच्या विचाराला चालना देण्याचे काम ‘साधना’ साप्ताहिकातून झाले. इ.स. १९४८ पासूनच्या काही निवडक महत्त्वाच्या लेखांचा समावेश या ठिकाणी करण्यात आला आहे. स्त्रीवादी चळवळ गतीशील करण्याचे त्यांना प्रोत्साहन देण्याचे, त्यांच्या विचारांचे खुल्यामनाने स्वीकार करुन ‘साधना’ साप्ताहिकाने त्यांच्या विचारांची दखल घेतली आहे. काही निवडक लेखांचा येथे समावेश केला आहे.

‘महिला, चळवळीची नवी दिशा’ या नावाने प्रसिध्द झालेला लेख १९५० मधला दशरथ पाटील यांनी हा लेख लिहीला आहे. ते खानदेशातील राष्ट्रसेवा दलाचे संघटक होते. त्यांनी वरील लेख सेवादलातील भगिनींकडून कोणत्या अपेक्षा आहेत ते मांडले. स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम केले. समाजवादी सरकार आल्याने आर्थिक समृध्दी येईल परंतु स्त्रियांवरील अन्याय दूर होतील किंवा नाही याबाबत शंका आहे. समाजातील सापत्नभाव समजून घेताना हुंडा देणे म्हणजे सर्व स्त्री जातीचा अपमान आहे. “आजही सुशिक्षितांच्यातच जास्त हुंडा घेणे हे

जास्त प्रतिष्ठेचे लक्षण समजले जाते. ही अत्यंत दु:खद घटना आहे. सामाजिक अन्यायाने स्त्रियांचा फार मोठ्या प्रमाणात कोंडमारा होत आहे तर काही स्त्रियांना आपला कोंडमारा होत आहे याची जाणीवही नाही."[१] याला वाचा फोडण्याचे काम 'साधना' साप्ताहिकातून केले गेले.

केशव मोरे यांनी 'भारतीय महिलांपुढील समस्या' या त्यांचा लेखात विवाह संस्थेबद्दल विवेचक लेख लिहिला होता. त्याला पुरक असे काही विचार त्यांनी या लेखात व्यक्त केले आहेत. आधुनिक काळातील भारतील महिलांपुढील समस्यांची चर्चा केली होती. त्यात स्त्री—पुरुषांच्या तौलानिक विकास या संदर्भात "निसर्गाने स्त्री—पुरुष संख्येतील समता सामान्यत: साधली असली तरी त्यांचे त्यांच्यावर टाकलेल्या जबाबदारीत मात्र ही समता पाळलेली नाही. वंशवृध्दी हे समाजाचे आद्य कर्तव्य मानले तर संतती निर्मितीतील स्त्रीच्या जबाबदारीचा वाटा मोठा व स्त्रीला डोईजड असा आहे."[२] या विषयी सखोल मांडणी केली. तसेच या विषयी सविस्तर लिहिताना केशव गोरे यांनी आपल्या लेखात म्हणतात की, "समाजामध्ये स्त्रियांबद्दल जाणीवेचा अभाव आहे. स्त्रिया आजही ही स्त्री दास्यात आहे. स्त्रियांना आपल्या हक्कांसाठी आवाज उठविला पाहिजे. स्त्रियांनी समाजक्रांतीत बरोबरीने भाग घेतले पाहिजे तरच त्या स्वत:साठी स्वतंत्र विश्व निर्माण करु शकतील."[३] या विषयी जनजागृती 'साधना' साप्ताहिकातून झाली.

आचार्य दादा धर्माधिकारी स्वतंत्र प्रज्ञेचे विचारवंत म्हणून महाराष्ट्राला सुपरिचीत झाले आहेत. स्त्रीजीवनाबद्दल ही त्यांनी खूप विचार केला होता. आजच्या स्त्री जीवनात क्रांती केल्याशिवाय स्वतंत्र लोकशाहीत भारताचा घटक म्हणून योग्य जबाबदारी स्त्रिया उचलू शकणार नाहीत. तसेच स्त्री जीवनात बदल करण्याची आवश्यकता सर्वांना पटत असली तरी हा बदल कोणत्या प्रकारचा असावा याबद्दल निश्चित विचार सहसा पुढे मांडले जात नाहीत. या विषयाला अनुसरुन आचार्य धर्माधिकारी यांनी जळगाव येथील वुमेन्स ट्रेनिंग कॉलेजातील विद्यार्थिनीची अभ्यास सहल नागपूर येथे आले असताना त्यांच्यापुढे झालेले भाषण प्रकाशित केले. या लेखात दादा धर्माधिकारी यांनी स्त्रियांनी आपले जीवन जगत असताना पुरुषाच्या आधाराशिवाय आपले अस्तित्व सिध्द केले पाहिजे. या संदर्भात त्यांनी स्त्री जीवनाची पाच सुत्रे या लेखात अत्यांत स्पपणे मांडलेली आहेत.

1"स्त्रीला जर व्यक्ती म्हणून जीवनाचा आनंद मिळवावयाचा असेल तर पुरुषनिरपेक्ष जीवन जगण्याची तिची तयारी असली पाहिजे व तो हक्क तिने प्रस्थापित केला पाहिजे.

१णजर पुरुष निरपेक्ष जगवावयाची तयारी करावयाची तर मातृत्त्वखेरीज स्त्रीला समाजात किंमत असली पाहिजे.

२शरीर हे आपले सर्वस्त्र आहे. धन आहे हे मानण्याचे स्त्रीने सोडावे.

२ण ज्यांचे मन खंबीर तो सबळ याचा अर्थ अब्रुसाठी जो शरीरत्याग करायला तयार असतो तो बलवान.

३ मनाची ताकद मिळविणे अब्रु शरीरात नसते मनांत असे. मनुष्य शरीराने भ्रष्ट होत नाही तो मनाने भ्रष्ट होते."[४]

अशा विचाराची शिदोरी दादा धर्माधिकारी यांनी आपल्या भाषणात समस्त स्त्रियांना दिली. आचार्य दादा धर्माधिकारी याच विषयाला धरुन दादरच्या अमर हिंद मडळाच्या वसंत व्याख्यानमालेत स्त्री जीवनाची मुलभूत समस्या या विषयावर ३० एप्रिल १९५२ रोजी भाषण केले. या व्याख्यानात त्यांनी स्त्री जीवनासंबंधी मुलग्राही नव सिध्दांत मांडणारे व्याख्यान केले. व्याख्यानाचा वृत्तांत अनेक वृत्तपत्रांत प्रसिध्द झाला होता. "दादांनी ह्या व्याख्यानात स्त्री जीवनासंबंधी जे नवे विचार मांडले ते आपल्या रुढ कल्पनांना धक्के देणारे अनेकांना वाटले.

ISSN : 2278-9308
March, 2022

त्यामुळेच त्यांच्या व्याख्यानासंबंधी वृत्तपत्रांमधून चर्चा झाली होती."[५] अशा विचार आपल्या भाषणातून मांडले होते. 'साधना' साप्ताहिकाने अशा अनेक विचारवंताचे विचार छापून आणले त्यातून समस्त स्त्री व समाजात जगजागृती घडवून आणली होती व आणत आहेत.

समाजवादी महिलांनी ४—५ ऑक्टोबर १९६९ रोजी सौ. अनसूया लिमये, प्रमिला दंडवते, मंगला पारीख, प्रभा तुळपुळे, नलिनी पाटकर, आवाबेन देशपांडे ह्यांनी मणीबेन करा यांच्या नेतृत्त्वाखाली **'साखरवाडी'** येथे अधिवेशन घेण्यात आले आणि याच ठिकाणी "आधुनिक स्त्रीच्या हक्कांची सनद संमत केली. ही सनद समाजातील महिला व पुरुष एकत्र सभेला असताना त्यांच्या समोर सर्व मताने मान्यता घेतली. महिलांमध्ये जागृती घडवून आणण्याचे कार्य या सनदेने केलेले दिसते."[६] ही सनद समस्त स्त्रीजातीसमोर आणण्याचे कार्य 'साधना' साप्ताहिकाने केले.

अशा प्रकारे 'साधना' साप्ताहिकाने समाजातील अत्यंत महत्त्वाच्या विषयावर विविध लेखांच्या माध्यमातून स्त्रीवादी चळवळीचा आढावा घेण्यात आला व त्याला नवीन दिशा दिली.

**संदर्भसूची**

**प्राथमिक साधने**

दशरथ पाटील, महिला चळवळीची नवी दिशा, 'साधना' साप्ताहिक, मुंबई २५ मार्च, पृ. ७.
1.केशव गोरे, भारतीय महिलांपुढील समस्या, 'साधना' साप्ताहिक, १३ जानेवारी १९५१, पृ. ८.
2.तत्रैव, पृ. ८.
3.दादा धर्माधिकारी (आचार्य), स्त्री जीवनाची पाच सुत्रे, 'साधना' साप्ताहिक, मुंबई, १४ एप्रिल १९५१, पृ. ६.
4.दादा धर्माधिकारी (आचार्य), स्त्री जीवनाची मुलभूत समस्या, 'साधना' साप्ताहिक, मुंबई, १० मे १९५२, पृ. ८.
5.अनसूया लिमये, स्त्रिया आणि राजकीय क्षेत्रे, 'साधना' साप्ताहिक, १८ एप्रिल १९५८, पृ. ३.
6.विद्युत भागवत, रिसेंट लिडींग फेमिनीस्टल इन द वेस्ट, डॉक्टरल थिसीस अनपब्लिशड्, पुणे विद्यापीठ १९८५, पृ. ११.

# एकविसाव्या शतकात महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रियांची स्थिती.

डॉ.संतोष हनुमंत जाधव
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा. जि. पालघर.

प्रस्तावना

संपूर्ण जगाच्या इतिहासात प्राचीन काळापासून स्त्रीला कौटुंबिक व सामाजिक जीवनात दुय्यम स्थान दिले गेले. स्त्रीला स्वातंत्र्य व समानता यापासून वंचित रहावे लागले आहे. स्त्री लहानपणी वडिलांच्या छत्राखाली तरुणपणी पतीच्या अधिकारात तर म्हातारपणी मुलाच्या आश्रयाने राहत होती; आजही खूप मोठ्या प्रमाणावर स्त्रियांची स्थिती तशीच आहे. विसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकापासून स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळाला. तिच्या अस्तित्वाचा विचार नियम व कायद्याने होऊ लागला, मात्र पुरुष प्रधान संस्कृती ही बाब उदार मनाने स्वीकारायला तयार नव्हती. म्हणून स्त्रीवादी संघटना आपल्या न्याय हक्कासाठी लढा देत आहेत, त्याला यश मिळताना दिसत आहे.

भारतीय स्त्रियांना प्राचीन कालखंडात सन्मानाचे स्थान होते. वैदिक कालखंडात तिला व्यक्तिगत स्वातंत्र्य बौद्धिक व आध्यात्मिक दृष्टीने ती बरोबरीचा दर्जाने काम करत होती. त्यानंतर सूत्रकाला मध्ये स्त्री जीवनावरती अनेक बंधने येत गेली, तीच बंधने मध्ययुगीन कालखंडात परंपरेने चालत राहिली. स्त्री ही सामाजिक परंपरा व त्यांचा बळी ठरली. आपणाला या बाबींचा अभ्यास करताना नागरी समाजातील, स्त्री मागासलेल्या समाजातील स्त्री व आदिवासी समाजातील स्त्री अशी विभागणी करावी लागते. सदर शोधनिबंधसाठी "२१व्या शतकातील महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रियांची स्थिती" असा अभ्यास विषय निवडला आहे.

**संशोधन पद्धती -**

सदर शोधनिबंध लिहीण्यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार आहे. आधुनिक काळात वंचितांचा इतिहास लेखन असा नवीन प्रवाह रूढ झाला आहे. स्त्री हा समाजव्यवस्थेतील वंचित घटक आहे. म्हणून २१ व्या शतकातील महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रियांची स्थिती या शोधनिबंधाची मांडणी करताना प्राथमिक, दुय्यम संदर्भ साधने आणि इंटरनेटचाही वापर केला आहे.

**साहित्याचे परिशीलन -**

आदिवासी म्हणजे भारतातील मूळचे रहिवासी मात्र ते आधुनिक प्रवाहापासून दूर राहिले आहेत. महाराष्ट्रात एकूण ११ जिल्ह्यांमध्ये आदिवासी समाज वास्तव्य करतो आहे. रायगड, ठाणे, पालघर, नाशिक, अहमदनगर, पुणे, धुळे, यवतमाळ, चंद्रपूर, अमरावती गडचिरोली येथे आदिवासींची संख्या मोठी आहे. महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवासी जमाती आहेत. या आदिवासींच्या सामाजिक जीवन, आर्थिक स्थिती, आरोग्य याविषयी अनेक शासकीय सर्वे झाले आहेत. प्रत्येक आदिवासी समाजातील स्त्रीची स्थिती कमी-अधिक फरकाने सारखीच आहे. या समाजाच्या आर्थिक सामाजिक व संस्कृतीवरती लेखन झाले आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील आदिवासी - शौनक कुलकर्णी, डायमंड पुणे. पगारे म.सू. पावरा - लोकगीतातील लोकसंस्कृती प्रशांत जळगाव.गारे गोविंद - सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी आदिम साहित्य पुणे.इंगळे जयवंत यांच्या लेखनातून सामाजिक व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण अंग असणारी स्त्रीयांच्यासमस्यांवर विशेष लेखन झालेले दिसत नाही. म्हणूनच या स्त्रियांची स्थिती नेमकी काय आहे. हे शोधण्याचा प्रयत्न या शोधनिबंधातून केला आहे.आदिवासी स्त्रियांच्या सामाजिक व कौटुंबिक दर्जाविषयी मांडणी केली आहे. त्यातील महत्त्वाचा भाग म्हणजे स्त्रियांना पाणी, बालविवाह, बालमाता, आरोग्य, उदरनिर्वाह, शिक्षण याच्याशी संबंधित अनेक समस्यांना सामोरे जाऊन जगावे लागते यासंबंधी लेखन केले आहे, तसेच या समस्यांवर कोणत्या उपाययोजना केल्या जातात, त्यामध्ये सरकारी योजना त्यांच्यापर्यंत पोहोचताना लागणारी गळती, त्याचा

स्त्रियांच्या जीवनावर कसा थेट परिणाम होतो. अशा परिणामातून स्त्रीची सुटका करण्यासाठी काय करावे लागेल. यासंबंधी काही उपाययोजनाही सुचविल्या आहेत.

**आदिवासींचे वस्तीस्थान व लोकसंख्या –**

सर्वसाधारणपणे आदिवासी डोंगर - दऱ्यात, पर्वतराजी आणि जंगलात राहत आलेले आहेत. त्यामुळे ते इतर समाजापासून स्वतंत्र व वेगळे आहेत. त्यांच्या प्राथमिक गरजा निसर्गातूनच पूर्ण करतात महाराष्ट्र भौगोलिकदृष्ट्या तीन भागात आदिवासींचे वास्तव्य आहे. सह्याद्रीच्या पर्वतरांगेमध्ये महादेव कोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी जमातींचे लोक वास्तव्य करतात. सातपुडा पर्वतरांगेमध्ये भिल्ल, कोकणा, गावित, दुबळा,धणका या जमातींची वस्ती आहे, तर गोंडवन विभागातील विदर्भामध्ये चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, अमरावतीचा मेळघाट या परिसरात गोंड, माडिया, मोरया, कोरकू इत्यादी आदिवासी जमाती आहेत. महाराष्ट्रातील आदिवासींचे २०११च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या १०,५१०,२१३इतकी आहे. त्यामध्ये ५,३१५,०२५ एवढे पुरुष आहेत तर ५,१९५,१८८इतक्या महिला आहेत.अशा प्रकारे आदिवासी जमातींच्या लोकसंख्येत स्त्री-पुरुष प्रमाण जवळजवळ सारखेच आहे. ही बाब उल्लेखनीय आहे असे असले तरी आदिवासी समाजातील स्त्रियांना इतर अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

**आदिवासी स्त्री -**

आदिवासी समाज हा मूलतः मुख्य प्रवाहापासून राहिलेला समाज आहे. आधुनिक सुधारणा विज्ञान-तंत्रज्ञान यापासून तो वंचित आहे. अलीकडे या समाजाच्या उत्थानासाठी शासनाच्या माध्यमातून अनेक योजना राबवल्या जात आहेत तसेचअनेकस्वयंसेवी संस्था या समाजाच्या आरोग्य, शिक्षण, शेतीशी निगडित गरजा पूर्ण करताना दिसत आहेत. आदिवासी समाजातील स्त्रीला तिच्या सामाजिक जीवनात पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा मिळतो. सामाजिक व धार्मिक कार्यात त्या सहभागी होतात मात्र नैसर्गिक आपत्तीमुळे पावसाळा ऋतुमध्ये अतिवृष्टी तर उन्हाळ्यात कडक उन्हाळा यामुळे पावसाळयात पिण्यासाठी शुद्ध पाणी मिळणे अवघड असते तर उन्हाळयात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष असते.

**पाण्याची समस्या -**

आदिवासी स्त्री ही कुटुंबाचा मुख्य आधार असते. कुटुंब चालवण्यात त्यांचा मोठा वाटा असतो त्यात आदिवासी डोंगरदऱ्या व जंगलांनी व्याप्तप्रदेशात असल्यामुळे पाण्याची असुविधा होते. ज्या ठिकाणी आदिवासी वस्ती किंवा पाडे वसलेले आहेत. तिथून पिण्याच्या पाण्यासाठी १-२ किलोमीटर अंतरावर दरीत शासकीय योजनेतून विहिरी खोदलेल्या आहेत, तेथून स्त्रियांना पाणी वाहून आणावे लागते. यामध्ये पुरुषांचा विशेष सहभाग दिसत नाही. विहिरीतून पाणी काढण्यासाठी प्लास्टिकचा छोटासा पाच लिटरचा डबा वापरला जातो. त्याच्या सहाय्याने विहिरीतून पाणी शेंदून काढते. त्यानंतर दोन हंडे व कळशी अशी भांडी डोक्यावर घेऊन ही स्त्री १-२किलोमीटर उंच टेकडीकडे तिला पायी चालत जावे लागते. अलीकडे काही भागांमध्ये शासकीय योजना व स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून सुविधा झाल्या आहेत, मात्र काही भागात आणखी स्त्रीला पाण्यासाठी असाच संघर्ष करावा लागत आहे.

**बालविवाह –**

आदिवासी संस्कृतीत स्त्रीला कुटुंबात व समाजात महत्त्वाचे स्थान आहे. तरीही सामाजिक परंपरेनुसार मुलगा व मुलगी यांचे विवाहयोग्य वय होण्याअगोदरच म्हणजे बालवयातच विवाह करण्याचे प्रमाण अधिक आहे. शासनाने मुलीचे वय १८ वर्षे (आता नवीन कायद्यानुसार २१ वर्षे) तर मुलाचे वय २१ वर्षे असा कायदा असून सुद्धा तो नियम पाळला जात नाही. परंपरा टिकविण्यासाठी लहान वयातच लग्न केले जाते. त्यामुळे बालविवाहाचे प्रमाण मोठे दिसते. परिणामी एकविसाव्या शतकात सुद्धा स्त्रीला समाजव्यवस्थेचा बळी ठरावे लागत आहे.

**बाल माता व कुपोषित बालके-**

आदिवासी समाजातील मुलींचे कमी वयात विवाह झाल्यामुळे नैसर्गिक पद्धतीने विवाहित जोडपी बाळाला जन्म देतात. बाळाला जन्म देते वेळी मातेचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी असते. शारीरिक दृष्ट्या ती सक्षम होण्याअगोदरच अपत्याला जन्म देते. परिणामी त्या बाळाचे पोषण व्यवस्थित न झाल्यामुळे किंवा माता गरोदर असताना योग्य आहार व व्यवस्थित काळजी न घेतल्यामुळे ते बाळ कुपोषित जन्माला येते. त्यानंतर शासकीय योजनांच्या माध्यमातून सकस आहार देऊन त्या बाळाला कुपोषितमधून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला जातो. तरीही ते बाळ तेवढे सक्षम होऊ शकत नाही. म्हणून समाजातील परंपरा जपत असताना आधुनिक दृष्टीने लोकांचे प्रबोधन करून योग्य मार्गदर्शन केल्यास ही समस्या दूर होण्यास मदत होईल.

**स्त्रियांचे आरोग्य -**

आदिवासी समाजाची वस्ती फार दूरवर डोंगरदऱ्या आणि जंगलाच्या प्रदेशात आहे. तेथील नैसर्गिक वातावरणामुळे त्या प्रदेशात अतिवृष्टी होते. त्या दरम्यान आदिवासी समाज हा आपली गुरे - ढोरे आपल्या घराच्या शेजारील पडवीत बांधतात. त्यामुळे त्यांचे शेण व मुतारीचावास आणि पावसाळ्यात सूर्यप्रकाशाचा अभाव असतो.त्यामुळे वातावरण दूषित बनते याचा महिलांच्या आरोग्यावर परिणाम होतो.आदिवासी भागात पावसाळ्यात घरातील सर्वच लोक दरवर्षी आजारी होतात. याला स्त्रियाही अपवाद नाहीत स्त्रियांच्या आरोग्यावर जास्त परिणाम बालवयात व्यवहार होऊ नये. त्यामुळे बालमाता जास्त आहेत परिणामी स्त्रीला अनेक शारीरिक व्याधींना सामोरे जावे लागते. लोकसंख्या नियंत्रणाबाबत आदिवासी भागात आणखी जागृती झालेली नाही. त्यामुळे स्त्रियांना पाच-सहा अपत्यांना जन्म द्यावा लागतो. त्यामुळे स्त्रीची शारीरिक झीज होते व पुढील काळात अनेक शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागते.

**कुटुंबाच्या उदरनिर्वाहात स्त्रिची भूमिका –**

आदिवासी स्त्रीला कुटुंबाचा चरितार्थ चालवताना खूप मोठी भूमिका निभवावी लागते. शेतात पिकवलेल्या अन्नधान्य व कडधान्य यावर त्यांची उपजीविका चालते. हे धान्य गरजेपेक्षा कमी असते. सरकारी स्वस्त धान्य दुकानांची सोय सुद्धा झालेली आहे. तरीही घरखर्चासाठी लागणारे इतर वस्तू खरेदी करण्यासाठी त्यांच्याकडे क्रयशक्ती नसते. त्यामुळे स्त्रियांना आपल्या पतीबरोबर शहरांमध्ये कंपनीतव इतर भागात शेतीवर मजूर म्हणून काम करण्यासाठी जावे लागते. त्यावेळीस्त्रियांची खूप हेळसांड होते मात्र नाईलाज असतो. तिला उदरनिर्वाहाच्या खर्चासाठी गाव,पाडाकिंवा तांडासोडून बाहेर पडावे लागते. कारण त्याशिवाय त्यांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविणे अवघड होते. तिला ह्या बाबी सहन करण्याशिवाय पर्याय राहत नाही.

**आदिवासी स्त्रिची शैक्षणिक स्थिती –**

आदिवासी समाजापर्यंत आदिवासी विकास मंत्रालय शिक्षणाची सोय घेऊन गेले आहे. तरीही समाजात शिक्षणाविषयी विशेष प्रगती झाली नाही. सामाजिक परंपरा व शिक्षणाविषयी जागृती नसल्यामुळे आश्रमशाळांमधून असणारे विद्यार्थी फारतर माध्यमिक शिक्षणापर्यंत कसे बसेपोहोचतात.माध्यमिकशिक्षणापर्यंत मुलींचे गळतीचे प्रमाण जास्त आहे. त्या उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत पोहोचत नाहीत. परिणामी वरील सर्व समस्यांना आदिवासी स्त्रियांना केवळ शिक्षणाचा अभाव असल्यामुळे सामोरे जावे लागत आहे.

**उपाययोजना –**

1.आदिवासी समाजापर्यंत शिक्षणाची व्यवस्था केली गेली मात्र ते लोकांपर्यंत पोहोचले का याची सरकारी पातळीवर सुशिक्षित आदिवासी बांधव व इतर समाजाने तपासणी होण्यासाठी लक्ष घालण्याची गरज आहे.

2.पाण्याच्या शासकीय योजना पाड्यांपर्यंत पोहोचले आहेत . त्याचा योग्य वापर करावा याचे मार्गदर्शन केले पाहिजे तसेच जिथे पाण्याची व्यवस्था नाही तिथे पाण्याची व्यवस्था करावी म्हणजे पाण्यासाठी महिलांचा संघर्ष थांबेल.
3.बालविवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी आदिवासींची परंपरा जपणेबरोबरच त्यांच्या समाजातील शिक्षण घेणाऱ्या मुलींचे उदाहरण देऊन त्यांच्या आरोग्याची योग्य असे सदृढ आहे. हे पटवून द्यावे लागेल. त्यामुळे मालमत्ता व कुपोषण कमी होण्यास मदत होईल.
4.उदरनिर्वाहाच्या बाबतीत कुटुंबाचे आर्थिक नियोजन कसे करावे. याविषयी मार्गदर्शन केल्यास आदिवासी स्त्री कौटुंबिक जीवन व्यवस्थित सांभाळू शकेल व त्यांची होणारी फरफट थांबण्यास मदत होईल.

**सारांश –**

आदिवासी समाजातील स्त्री कौटुंबिक सामाजिक व धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान आहे. आदिवासी मुलींना लग्नावेळी हुंडा देण्याची पद्धत नाही. पतीचे अकाली निधन झाले तर स्त्रिला पुनर्विवाहाची मुभा आहे. पतिकडूनत्रास होत असल्यास ती काडीमोड घेऊ शकते. याबाबतीत ही स्त्रीचे जीवन प्राचीन भारतीय स्त्रीजीवनाप्रमाणे स्वतंत्र आहे. असे असले तरी आदिवासी संस्कृती पुरुषप्रधान आहे.

आदिवासी समाजातील स्त्रीच्या समस्याया नैसर्गिक, पारंपारिक आणि अज्ञानामुळे निर्माण झालेल्या आहेत. बालविवाह, बालमाता, कुपोषण, अनेक अपत्यांना जन्म देणे यामुळे स्त्रीला अनेक शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागते.पाण्याची व्यवस्था, कौटुंबिक उदरनिर्वाहाचा प्रश्न, शिक्षणसंबंधीच्या समस्या पूर्ण क्षमतेने सोडवण्याचा प्रयत्न केल्याशिवाय आदिवासी स्त्रीजीवन आनंददायी करता येणार नाही. त्यासाठी सामाजिक, सरकारी व स्थानिक पातळीवर प्रयत्न करूनच स्त्रियांचे जीवनमान सुधारण्यास मदत होईल.

**संदर्भसूची -**

1. जोशी महादेवशास्त्री,भारतीय संस्कृतिकोश, खंड–१०,तृतीय आवृत्ती, जुलै 2002.
2. खांडगे मंदा, स्त्रीसाहित्याचा मागोवा, खंड -१ डिसेंबर 2002 पुणे.
3. कुलकर्णी शौनक, महाराष्ट्रातील आदिवासी, डायमंड पुणे, पुनर्मुद्रण.२०११.
4. पगारे म.सु., पावरा लोकगीतातील लोकसंस्कृती, प्रशांत जळगाव, फेब्रुवारी,२००३.
5. गारे गोविंद,सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी, आदिम साहित्य, पुणे,२००७.
6. https://trti.maharashtra.gov.in, 24/02/2022, Time – 05:43 P.M.
7. Census2011.co.in 24/02/2022, Time – 05:43 P.M.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, 341 (CCCXLI)

ISSN : 2278-9308 March, 2022

# ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग

**प्रा. डॉ. प्रमोद मा. आचेगावे**

इंद्रप्रस्थ न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, वर्धा.

---

ग्रामिण अर्थव्यवस्था सुदृढ व स्वावलंबी, आत्मनिर्भर बनविण्याकरीता तसेच नागरिकांना सोयी सवलतीची पूर्तता, सत्तेचे विकेंद्रीकरण, ग्रामिण भागातील नागरिकांचा राजकारणात सहभाग वाढविण्याच्या अुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थेची व्यवस्था निर्माण करुन त्याला संवैधानिक मान्यता प्राप्त करुन देणे हे भारतीय शासन व्यवस्थेतील अत्यंत महत्वाची घटना आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद 40 अनुसार स्पष्ट केले आहे की राज्य ग्रामपंचायतोका गठन करने के लिए कदम उठाएगा और ऐसी शक्तीया और प्राधिकार प्रदान करेगा जो उन्हे स्वायत्त शासन की ईकायों के रुप में कार्य करने योग्य बनाने के लिए आवश्यक हो याच आधारावर भारतात .2 ऑक्टोंबर 1959 रोजी पंडित नेहरु यांच्या पुढाकाराने राजस्थानातील नागोर येथे पंचायतराज संस्थांची स्थापना करण्यात आली. भारतीय संविधानात 73 वी घटना दुरुस्ती करुन ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेला घटनात्मक दर्जा देण्यात आला. 1993 मधे संपुर्ण देशात त्यांची अंमलबजावणी झाली आहे. यात अनुसूचित जाती-जमाती बरोबरच महिला व ओबीसी करिता आरक्षणाची व्यवस्था करण्यात आली.

भारतात महिलांचे विश्व हे चुल आणि मूल पुरतेच मर्यादित होते. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात त्यांचे प्रमाण अल्प होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतरही त्याच्या राजकीय स्थितीत बदल झालेले नाही. त्याचा राजकीय सहभाग राष्ट्रीय व राज्य पातळीवर अल्पप्रमाणात आहे. देशात बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनंतर त्रि-स्तरीय पंचायतराज संस्थेची स्थापना झाली आहे. ह्या संस्थेत देखील त्याचा राजकीय सहभाग नव्हता. महाराष्ट्रात जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम लागू झाले आहे. तेव्हा संपूर्ण राज्यातून दोन महिला निवडणूकीला उमेदवार म्हणून अर्ज भरला होता. परंतू त्या दोन्ही महिला निवडणूकीत निवडूण येऊ शकल्या नव्हत्या. 1973 मध्ये पश्चिम बंगाल पंचायत अधिनियम लागू झाले आहे. तेव्हा त्या राज्यातून दोनच महिला निवडणूकीत विजयी झालेल्या आहेत. 1983 मध्ये कर्नाटक शासनाने महिलांना 25 टक्के आरक्षण व्यवस्था केले. तो अधिनियम 1987 मध्ये लागू झाला आहे. त्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत 30 हजार महिलांनी उमेदवारी अर्ज भरले होते . त्यापैकी 14 हजार महिला निवडणूकीत विजयी झाल्या आहे. 1988 साल 22 वर्षानंतर उत्तरप्रदेशात स्थानिक संस्थेच्या यात त्यात एकच महिला विजयी झाली आहे . 1991 साली उडिसात पंचायत समित्यात 1/3 सिटे महिला करिता आरक्षित ठेवली होती . 1992 मध्ये त्या राज्यात निवडणूका झाल्या. त्यात 22 हजार महिला निवडूण आल्या आहेत. त्याचे राजकीय सहभाग 35 टक्केपर्यंत गेले आहे. देशात 73 वी व 74 वी घटना या दोन्ही घटनादुरुस्ती झाल्या आहेत. या दोन्ही घटना दुरुस्ती नंतर स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांना 1/3 टक्के आरक्षण मिळाले. 1994 नंतर महिलांना राजकीय सहभागात वृध्दी होण्यास प्रारंभ झाला आहे .

तक्ता क्रमांक 1भारतातील पंचायत राज संस्थेमधील महिला नेतृत्वाची संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | वर्ष | पंचायत संस्था स्तर | महिला सदस्य संख्या | एकूण वर्ष निहाय संख्या |
|---|---|---|---|---|
| 1. | 2000 | जिल्हा परिषद | 4088 | 815177 |
| 2. | | पंचायत समिती | 38412 | |
| 3. | | ग्रामपंचायत (सरपंच) | 772677 | |
| 4. | 2004 | जिल्हा परिषद | 4923 | 890623 |
| 5. | | पंचायत समिती | 47455 | |
| 6. | एकूण ... | ग्रामपंचायत ( सरपंच ) | 838245 | 1705800 |

**स्त्रोत : डॉ . हिमांशू शेखर , कुरुक्षेत्र , हिंदी मासिक , जानेवारी 2014 प्र . क्र . 21**

तक्ता क्रमांक 1

| अ.क्र. | पंचायत संस्था स्तर | संख्या | एकुण सदस्य संख्या | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1. | जिल्हा परिषद | 33 | 1955 | 978 |
| 2. | पंचायत समिती | 351 | 3910 | 1951 |
| 3. | ग्राम पंचायत | 27896 | 197338 | 98669 |
| | एकूण ... | 28280 | 203203 | 101598 |

**स्त्रोत : जगदीश मोरे, लोकराज्य, मराठी मासिक, एप्रिल 2012, पू.क्र.56**

उपरोक्त दोन्ही तक्त्यांतील तपशिलावरुन असे निदर्शनास येते की, 73 व्या घटनादुरुस्ती नंतर पंचायतराज संस्थेत महिलांच्या राजकीय सहभागात वृध्दी होत आहे. केरळ राज्यात सर्वात अधिक महिलांचा पंचायतराज संस्थेत सहभाग आहे. त्यांचे प्रमाण 57.24 टक्के एवढे आहे . 24 मार्च 2011 रोजी पंचायत राज संस्थेमध्ये महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या कायद्यामुळे महाराष्ट्रात महिला पंचायत राज संस्थेने सहभाग 50 टक्के पेक्षा जास्त प्रमाणात वाढविले दिसते . कल्पना हजारे यांच्या मते स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये अगोदर 33 आणि नंतर 50 टक्के आरक्षणामुळे महिला मोठ्या संख्येने राजकारणात सहभागी होत आहे ते खरंही आहे.

स्वांतत्रोत्तर काळात भारतीय राजकारणातील महिला नेत्या म्हणून इंदिरा गांधी, सोनिया गांधी, जयललिता ममता बॅनर्जी, मायावती, प्रतिभा पाटील, सुप्रिया सुळे, शिला दिक्षित, वसुंधराराजे सिंदिया, निलीमा गोरे, इत्यादी नावे सुपरिचित आहेत. दोन दशकापासून पर्यावरण, बचतगट, सामाजिक चळवळी, दारुबंदी इत्यादीच्या माध्यमातुन अनेक महिला नेतृत्व समोर येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना राजकीय आरक्षणाचे कवच प्राप्त झाल्यानंतर व राजकारणात त्यांचा प्रमाण वाढले त्यानंतर महिला आत्मविश्वासाने बोलत आहेत. काहीतरी करुन दाखवण्याची महिलांमधील जिद्द वाढली आहे. महिलाच्या राजकारणातील सहभागाविषयीच्या वाढणा-या प्रतिकुलतेला महिलांनी एक शक्ती बनवण्यात यश मिळविले.

**संदर्भ ग्रंथ:-**

1) संपादित,डॉ. हिमांशू शेखर, कुरुक्षेत्र, हिंदी मासिक जानेवारी 2014, पृ.क्रं.21.
2) लोकप्रभा, साप्ताहिक मराठी मुंबई 14 मार्च 2014, पृ.क्रं.23.
3) डॉ.व्ही.एल. फाडिया, भारतीय प्रशासन प्रतियोगीता प्रकाशन.

# ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांच्या समोरील आव्हानांचा अभ्यास

**Mr. Sante Lalchandra Ramchandra**

Dept. of Economics Shantarambhau Gholap Art's, Science and Gotirambhau Pawar Commerce College, Shivle

**प्रस्तावना:**

भारत हा विविध जाती आणि विविध धर्म असलेला देश आहे. भारतात अनेक समाज वास्तव्य करतात. त्यात अनेक समाजापैकी एक समाज म्हणजे आदिवासी समाज होय.भारतातल्या जवळपास प्रत्येक राज्यांमध्ये आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात वास्तव्य करताना आपल्याला दिसतो.भारताप्रमाणे महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज वास्तव्य करतो. ठाणे जिल्ह्याचा विचार करता ठाणे जिल्ह्यात आदिवासी संख्या मोठी आहे.आदिवासी समाजाचा विचार करता त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.या समस्या आदिवासी पुरुष आणि आदिवासी स्त्री या दोघांना भेडसावतात परंतु यामध्ये आदिवासी स्त्रियांना जास्त समस्यांना सामोरे जावे लागल्याचे आपल्या निदर्शनास येते.जिल्ह्यामध्ये कातकरी, ठाकूर,वारली,कोकणा महादेव कोळी,मल्हार कोळी इत्यादी आदिवासी समाज वास्तव्य करताना दिसतो. या समाजातील स्त्रियांना मोठ्या प्रमाणात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. सरकारी योजनांचा फायदा या आदिवासी समाजापर्यंत कमी प्रमाणात पोहोचलेला आहे.स्वातंत्र्याला 75 वर्ष पूर्ण होऊन सुद्धा या आदिवासी स्त्रियांचा विकास फारसा झालेला नाही. आजही त्यांना मोठ्या प्रमाणात दारिद्र्याला सामोरे जावे लागते. मुंबईपासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या या ठाणे जिल्ह्याच्या आदिवासी स्त्रियांना या समस्येकडे फारसे पाहिले जाताना दिसत नाही.समाजातील प्रत्येक वर्गाकडून त्यांचे शोषण होताना आपल्याला दिसते.प्रत्येक घटक कोणत्या ना कोणत्या मार्गाने या आदिवासी समाजाला कमी लेखण्याचा प्रयत्न करतो. आदिवासी स्त्रियांच्या विकासाशिवाय आदिवासी समाजाचा विकास होणे अशक्य आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांच्या समोरील आव्हानांवर भाष्य करण्यात आले आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

1.ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजावर प्रकाश टाकणे.

2.ठाणे त्यातील आदिवासी स्त्री जीवनाविषयी माहिती मिळवणे.

3.ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांच्या समोरील आव्हाने जाणून घेणे.

4.आदिवासी सामोरे जावे लागणाऱ्या आव्हानांवर उपाययोजना सुचवणे.

**संशोधन पद्धती:**

"ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांसमोरील आव्हानांचा अभ्यास" या शोधनिबंध तयारकरण्यासाठी प्रमुखपणे दुय्यम स्त्रोतांमार्फत माहिती संकलित करण्यात आली आहे.यामध्ये विविध क्रमिक पुस्तके,नियतकालिके,संदर्भग्रंथ,मासिके,इंटरनेटचा वापर करून दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे.

**ठाणे जिल्ह्यातील आदिवासी:**

ठाणे जिल्ह्याचा विचार करता ठाणे जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वास्तव्य करते.२०११ च्या जनगणनेनुसार ठाणे जिल्ह्यात ८०७००३१ एवढी लोकसंख्या वास्तव्य करते.यामध्ये आदिवासी समाजाची लोकसंख्या ४ लाख २४ हजार ४४३ इतकी होती.यामध्ये पुरुष लोकसंख्येची संख्या २ लाख १६ हजार ९७४ तर स्त्रियांची संख्या २ लाख ७ हजार ४६९ इतकी होती.जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी अनुसूचित जमातीची ५.३६ टक्के इतकी होती. ठाणे जिल्ह्याचा विचार करता ठाणे जिल्ह्यातील ठाणे,भिवंडी,शहापूर,कल्याण,अंबरनाथ आणि

मुरबाड या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज वास्तव्य करतो. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी लोक हे प्रामुख्याने सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या डोंगर कपाऱ्यात वास्तव्य करताना दिसतात. ठाणे जिल्ह्यामध्ये आढळून येणाऱ्या आदिवासी जमातींमध्ये ठाकूर,कातकरी,वारली,कोकणा, मल्हार कोळी,महादेव कोळी या जमातींचा समावेश आहे. जिल्ह्यातील हे आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात जंगल संपत्तीवर अवलंबून असल्याचे दिसून येते.ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजावर अशिक्षितपणा,अंधश्रद्धा इत्यादी सामाजिक समस्या दिसून येतात.

**ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्री जीवन:**

स्त्रिया या प्रत्येक समाजाच्या जीवनाचा अभिन्न अंग असतात. आदिवासी समाजात सुद्धा स्त्रियांना विशेष स्थान आहे. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजात स्त्रीयांची संख्या इतर समाजापेक्षा जास्त आहे. आदिवासी समाजात प्रारंभापासून मातृसत्ता अस्तित्वात असल्याचे दिसून येते. आदिवासी समाजातील बरेच शोध हे स्त्रीयांनी लावले असल्याचे मत अनेक तज्ञांनी व्यक्त केले आहे. आदिवासी स्त्रियांचे विविध हस्तकौशल्य कलांचा आणि कल्पनाशक्तीचा विकास हा पूर्वीपासून होत गेला आहे.शिकारीसाठी दगडांच्या बनवणे,पशुपालन,दुग्ध पालन,विणकाम,हस्तकला,माती कला अशा कितीतरी कामांमध्ये आदिवासी स्त्रिया मोठ्या प्रमाणात सहभाग घेत असल्याचे आपल्याला दिसते.समाजात पुरुषांपेक्षा स्त्रिया हे जास्त काम करतात असे म्हटले तरी ते अतिशयोक्तीचे होणार नाही.आदिवासी स्त्रीची सौंदर्याची कल्पना श्रम करणारी आहे किंवा नाही एवढेच बघितले जाते.ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रिया या वीटभट्टीवर काम करण्यापासून,शेतमजुरी करणे,जंगलांमधून विविध सामग्री गोळा करून ते जवळच्या शहरांमध्ये विकणे यामध्ये स्त्रियांचा सहभाग हा मोठ्या प्रमाणात असतो. आदिवासी स्त्रिया या आर्थिक क्रियांमध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत असल्याचे विविध उदाहरणे आपल्याला दिसतात. फक्त गृहिणी हा शब्दप्रयोग आदिवासी समाजामध्ये फारसा दिसत नाही.कारण आदिवासी समाजातील सर्व स्त्रिया या आर्थिक उपक्रमांमध्ये भाग घेत असतात. जिल्ह्यातील आदिवासी स्त्रिया या जन्मापासून मरेपर्यंत काम करताना दिसतात.शारीरिक बौद्धिक दोन्ही पद्धतीचे काम या आदिवासी स्त्रिया करतात.

**ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांसमोरील आव्हाने:**

आदिवासी स्त्री ही कष्टाळू असते.ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रिया संघर्ष मधून आपले जीवन जगताना आपल्याला दिसतात.बदलते युगामध्ये आदिवासी स्त्रियांना अनेक संघर्ष यांना सामोरे जावे लागते. आदिवासी स्त्रिया समोरील आव्हाने पुढील प्रमाणे.

**शिक्षण:**

आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रसार फारसा झाला नाही.यामध्ये आदिवासी स्त्रियांची अवस्था तर अधिकच बिकट असल्याचे आपल्याला दिसून येते. बदलत्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये आदिवासी स्त्रियांसमोर शिक्षणाचे मोठे आव्हान समोर उभे आहे. जागतिक पातळीवर वाढत्या स्पर्धेमध्ये आदिवासी समाजात विशेषता स्त्रियांमध्ये शिक्षण पोहोचवणे गरजेचे आहे.लहान वयात लग्न,स्थलांतर बालकांचे संगोपन इत्यादी मुळे आदिवासी स्त्रिया शिक्षणा पासून वंचित राहिल्या आहेत.त्यामुळे येत्या काही काळामध्ये चांगले दर्जेदार शिक्षण घेण्याचे आव्हान या आदिवासी स्त्रियांच्या समोर आहे.सरकारने आदिवासींच्या शिक्षणासाठी अनेक उपाययोजना जरी केल्या असल्या तरी त्या उपाययोजना त्यांच्यापर्यंत पोहोचताना आपल्याला दिसत नाही.

**स्थलांतर:**

आदिवासी स्त्रियांना कामासाठी मोठ्या प्रमाणात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करावे लागते. त्यामुळे त्यांच्या जीवनामध्ये अनेक समस्या निर्माण होतात.जंगली क्षेत्राचे घटते प्रमाण, प्रकल्पामुळे होणारे विस्थापन

यामुळे आदिवासी समाजाला स्थलांतर करावे लागते.या स्थलांतरात मध्ये सर्वात जास्त प्रमाणात हानी ही स्त्रियांची होते.

**कमी वेतन दर:**

आदिवासी स्त्रियांना दिले जाणारे वेतनदर हे पुरुषांच्या वेतन दरापेक्षा फारच कमी असते. भारतात समान काम समान वेतन असा कायदा असतानासुद्धा आदिवासी स्त्रियांना फार कमी वेतन दिले जाते. आदिवासी स्त्रिया पुरुषांप्रमाणेच मोठ्या प्रमाणात शारीरिक श्रम करताना दिसतात.परंतु त्यांच्या आणि पुरुषांच्या वेतनामध्ये 20 ते 30 टक्के फरक दिसून येतो.वीट भट्टी शेतमजुरी,ऊस तोड, बांधकाम अशा अनेक क्षेत्रांमध्ये आदिवासी स्त्रियांना दिला जाणारा मोबदला हा पुरुषांपेक्षा फार कमी प्रमाणात असतो.तसेच आदिवासी स्त्रियांना दिला जाणारा मोबदला हा थेट त्यांच्या हातात न देता तो त्यांच्या नवऱ्याच्या हातात दिला जातो. त्यामुळे त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

**लैंगिक अत्याचार:**

ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांना मोठ्या प्रमाणात लैंगिक अत्याचाराला सामोरे जावे लागते. त्या ज्या ठिकाणी काम करतात त्या ठिकाणच्या पुरुषांकडून त्यांचे लैंगिक शोषण केले जाते.बलात्कार विनयभंग अशा घटनांना सुद्धा त्यांना सामोरे जावे लागते.यामध्ये लहान मुलींचा सुद्धा मोठ्या प्रमाणात समावेश आहे.आदिवासी स्त्रियांवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराला कोणीही वाचा फोडताना आपल्याला दिसत नाही. अशिक्षितपणा,लाजरेपणा,बुजरेपणा यामुळे आपल्यावर होणाऱ्या लैंगिक अत्याचारा विषयी कोणालाही सांगत नाही.काही वेळेला या लैंगिक अत्याचारामुळे त्यांना अनेक गुप्त रोगांचा सामना करावा लागतो. एड्स,गर्भधारणा इत्यादी समस्या त्यामुळे निर्माण होताना आपल्याला दिसतात. त्यांच्यावर होणारे हे लैंगिक अत्याचार रोखण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर उभे राहिले आहे.

**घरगुती हिंसाचार**

भारतीय समाजात स्त्रियांना घरगुती हिंसाचाराला सामोरे जावे लागते.जणू काही घरगुती हिंसाचार हे त्यांच्या पाचवीलाच पुजलेले दिसून येते.आदिवासी स्त्रिया सुद्धा या घरगुती हिंसाचाराचा सामना करताना आपल्याला दिसतात. कुटुंबातील सासू-सासरे नवरा,दीर यांच्याकडून मोठ्या प्रमाणात हिंसाचार होतो. ठाणे जिल्ह्यात यामध्ये ठाकूर आणि कातकरी जमातीतील स्त्रिया या हिंसाचाराचा जास्तच सामना करतात. या हिंसाचारामध्ये त्यांना मारझोड करणे, हत्याराने वार करणे, जाळणे इत्यादी प्रकार दिसून येतात. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजामध्ये घटस्फोटाचे प्रमाण कमी असल्याने या आदिवासी स्त्रिया बऱ्याच प्रमाणात गुपचूपपणे या घरगुती हिंसाचार सहन करताना आपल्याला दिसतात. या घरगुती हिंसाचारापासून मुक्ती मिळवण्याचे आव्हान या आदिवासी स्त्रियां समोर उभे ठाकले आहे.

**बालविवाह:**

भारतात बालविवाहाची प्रथा पूर्वीपासून अस्तित्वात आहे. आदिवासी वगळता इतर समाजामध्ये बालविवाहाचे प्रमाण हळूहळू कमी होत चालले आहे. परंतु आदिवासी समाजात आजही बालविवाहाची प्रथा मोठ्या प्रमाणात दिसून येते. आदिवासी समाजात बऱ्याच मुलींची लग्न ही दहा ते सोळा वर्ष वयोगटांमध्ये होताना आपल्याला दिसतात.अगदी लहान वयात लग्न होत असल्याने आदिवासी स्त्रियांना लहान वयातच मातृत्वाचा भार स्वीकारावा लागतो. त्याचा वाईट परिणाम त्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर होतो.कमी वयात मुलांना जन्म देताना आदिवासी स्त्रियांचा मृत्यू देखील होतो.बाल विवाह झाल्याने आदिवासी स्त्रियांचे सरासरी आयुर्मान हे

कमी असल्याचे आपल्याला दिसून येते.म्हणून बाल विवाह प्रथा बंद पाडण्याचे मोठे आव्हान आदिवासी स्त्रियांसमोर आहे.

**पुरुष प्रधान संस्कृती:**

भारताच्या इतर समाजाप्रमाणे आदिवासी समाज सुद्धा पुरुषप्रधान संस्कृती जपणारा आहे. आपल्या कौटुंबिक प्रश्नासंदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार ठाणे जिल्ह्यातील आदिवासी समाजामध्ये प्रामुख्याने पुरुषाला आहे. स्त्रियांना निर्णय प्रक्रियेत सहसा सामावून घेतले जात नाही. त्यामुळे पूर्वीपासून चालत आलेल्या पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये आपले स्थान बळकट करण्याचे आव्हान आदिवासी स्त्रियांसमोर आहे.

**व्यसन:**

आदिवासी स्त्रियांमध्ये व्यसनाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसते. आदिवासी पुरुषांप्रमाणे आदिवासी स्त्रिया सुद्धा मोठ्या प्रमाणात विडी,तंबाखू,दारू इत्यादी व्यसन करताना ठळकपणे दिसून येतात. या व्यसनामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम तर होतोच त्याचबरोबर त्यांची आर्थिक स्थिती सुद्धा खालावते. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी पुरुषांबरोबर स्त्रियासुद्धा व्यसन करत असल्यामुळे त्यांच्या उत्पन्नाचा बराचसा भाग हा या व्यसनावर खर्च होतो. परिणामी या व्यसनातून बाहेर पडण्याची मोठे आव्हान या आदिवासी स्त्रिया समोर उभे ठाकले आहे.

**वारसा हक्क न मिळणे:**

आदिवासी समाजामध्ये सुद्धा बऱ्याच प्रमाणात स्त्रियांना वारसाहक्क प्रमाणे आपल्या वडिलांच्या संपत्ती मध्ये हिस्सा दिला जात नाही. कुटुंबातील पुरुष हेच वारसाहक्काने आलेल्या संपत्तीचा ताबा घेतात. अज्ञानामुळे आदिवासी स्त्रियांमध्ये वारसा हक्काविषयी जागृती ही फारशी दिसत नाही. वारसा हक्क मिळत नसल्याने त्यांची आर्थिक स्थिती मागासलेल्या स्वरूपाची राहिलेली आपल्याला दिसते.परिणामी आपल्या कुटुंबामध्ये वारसा मिळवण्याचे मोठे आव्हान ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांसमोर उभे आहे.

**उपायोजना:**

वरील सर्व गोष्टींचा उहापोह केल्यानंतर आपल्याला असे दिसते की ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांसमोर मोठ्या प्रमाणात आव्हाने आहेत. या आव्हानांचा सामना करून हे आव्हान दूर केल्याशिवाय ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांचा विकास होणे शक्य नाही. आदिवासी स्त्रियांना ज्या सामाजिक, आर्थिक,सांस्कृतिक आव्हानांना सामोरे जावे लागते ती आव्हाने दूर करण्यासाठी पुढील उपाययोजनांचा अवलंब करता येईल.

- कायद्याची कडक अंमलबजावणी करणे.
- कायद्याविषयी जनजागृती करणे.
- स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे.
- योजनांचा प्रत्यक्ष लाभ पुरुषाने ऐवजी स्त्रियांच्या हातात देणे.
- व्यसन मुक्तीसाठी प्रयत्न करणे.
- योग्य वयात लग्न केल्यास आर्थिक मदत देणे.
- समान काम समान वेतन कायद्याची कडक अंमलबजावणी करणे.
- वनांचे संरक्षण करणे जेणेकरून त्यांचे स्थलांतर होणार नाही.
- स्त्री-पुरुष समानता भाव निर्माण करणे.
- लैंगिक अत्याचार प्रतिबंधित करणे.
- आदिवासी स्त्रीयांसाठी विशेष निधी देणे.
- आदिवासी योजनांच्या कार्यवाही वर विशेष लक्ष देणे.

**समारोपः**

वरील सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर आपल्याला असे दिसते की आजच्या आधुनिक युगामध्ये ठाणे जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांसमोर बरेच आव्हाने आहेत. आदिवासी स्त्रिया ह्या मूळ प्रवाहातून बाहेर पडताना आपल्याला दिसत आहेत. सरकारने वेळीच उपाययोजना करून आदिवासी स्त्रियांसमोरील असलेली वरील सर्व आव्हाने दूर करण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. सरकारने आदिवासी स्त्रियांसाठी सर्वसमावेशक योजना राबवून त्यांना पुढे आणण्याची गरज आहे. सरकारने वेळीच प्रयत्न केले नाही तर या आदिवासी स्त्रियांची अवस्था अधिक बिकट होईल. वरील उपाय योजना करून आपण आदिवासी स्त्रियांसमोरील आव्हाने बऱ्याच प्रमाणात कमी करू शकतो व त्यांना विकासाच्या मूळ प्रवाहात आणू शकतो. सरकार बरोबर इतर समाजाने सुद्धा आदिवासी स्त्रियांसमोरील आव्हाने दूर करण्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आपल्याला दिसून येते. भविष्यात आदिवासी स्त्रियांसमोरील आव्हाने दूर होऊन त्यासुद्धा इतर समाजातील स्त्रियांप्रमाणे आपले जीवन जगू शकतील यामध्ये काहीही शंका नाही.

**संदर्भग्रंथ सूचीः**

1.आगलावे प्रदीप, आगलावे सरोज,'भारतातील सामाजिक समस्या',श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर.
2.गारे गोविंद-'सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यातील ठाकुर(ठाकर) आदिवासी'श्रीविद्या प्रकाशन पुणे प्र. आ. २००२.
3.गारे गोविंद-'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती'कॉंटिनेंटल प्रकाशन पुणे प्र. आ. पुणे.
4.रोंगटे तुकाराम,'आदिवासी साहित्य:चिंतन आणि चिकिस्ता',दिलीपराज प्रकाशन,पुणे.
5.गावित माहेश्वरी, 'आदिवासी साहित्य विविधांगी आयाम', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
6.इंगले जयवंत शंकरराव, 'आदिवासींची आर्थिक व सामजिक स्थिती' लीलाशंकर प्रकाशन.
7.बोकील मिलिंद-'कातकरी :विकास की विस्थापन' मौज प्रकाशन गृह,मुंबई.
8.गारे गोविंद-'आदिवासी शिक्षण'साकेत प्रकाशन प्रा. ली. औरंगाबाद १९९७.
9.आपटे,रोडे,'भारतातील महिला विकासाची वाटचाल',डायमंड पब्लिकेशन पुणे.
१०. गोटे शुभांगी,'स्त्री परिवर्तनाची आव्हाने',साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लिकेशन, औरंगाबाद.
११. गंगणे वर्षा,'आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्या' ऋचा प्रकाशन,नागपूर.
१२ .जगदाळे कुंता,'नारी समस्या',नारायण जगदाळे प्रकाशन बार्शी.
१३.जाधव एन. एल.-'ववनवासी राजा'रराहुल बुक सेंटर.
१४. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2020 ठाणे जिल्हा
१५.www.wikipedia.com
१६.www.youtube.com.

# बहुजनांची स्फूर्तिनायिका: सावित्रीआई फुले

**डॉ.शिंदे आर. डी.**

लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड

**प्रस्तावना :**

वैदिक धर्मशास्त्राच्या समजुतीप्रमाणे भारतात आजही सर्वत्र बहुजनांची स्फूर्तिनायिका म्हणून सरस्वती पूजनाची परंपरा रूढार्थ आहे. विशेषतः विद्येच्या आणि कलेच्या क्षेत्रात प्रत्येक कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्फूर्तिनायिका म्हणून मोठ्या भक्तिभावाने सरस्वतीचे पूजन केले जाते. तेव्हा स्वाभाविकपणे कोणत्याही सामान्य व्यक्तीची अशी समजूत बनते की, सरस्वती हीच खरी विद्येची आणि शक्तीची देवता आहे. तथापि शास्त्रीय कसोटीवर उपर्युक्त समजूत ताडून पाहता सरस्वती ही एक मिथ्या चेतना असल्याचे स्पष्ट होते. ज्या वैदिक धर्मसंस्कृतीने हजारो वर्षापासून येथील बहुजन समाजाला 'ज्ञान' बंदी करून अज्ञानाच्या अंधकारात ढकलले होते. त्या बहुजन समाजाला प्रकाशाच्या वाटा दाखविण्यासाठी सरस्वतीने कोणतीही चळवळ, सभा-संमेलने आणि आंदोलने उभारून जागरहाट केल्याचे ऐकिवात नाही की कुठे शाळा आणि महाविद्यालये काढल्याची इतिहासात नोंद नाही. सरस्वतीने बहुजन समाजाला फुकट तर सोडाच पण विकतही शिक्षण दिल्याची कुठे लोक चर्चा झडलेली दिसत नाही.

भरत -रामायणांसारख्या कपोलकल्पित पुराण कथेच्या आधारे हिंदुस्थानात सर्वत्र 'ब्राह्मण्यवादा'चा अतिचार निर्माण झालेला असतानाही तो अतिचार असहाय्य मूक प्रेक्षक बनुन पाहत बसलेली सरस्वती ही बहुजनांची कुठल्याहि अर्थाने स्फूर्तिनायिका होऊ शकत नाही. याउलट अपार कष्ट झेलत बहुजनांना शिक्षण देणारी ,त्यांच्या उद्धारासाठी त्यांना प्रकाशवाटा दाखवणारी ,प्रसंगी त्यांच्यावरील अन्याय व अत्याचार दूर करण्यासाठी धर्ममार्तंडांनी निर्माण केलेल्या धगधगत्या सांस्कृतिक अग्निकुंडात स्वतः ला समर्पित करणारी सावित्रीआई फुले हीच खरी बहुजनांची स्फूर्तिनायिका ठरते.

त्यानुषंगाने सावित्रीआई फुले यांच्या प्रेरक जीवनकार्याची विशेष मांडणी करणारा हा छोटेखानी लेखन-प्रपंच....!

**बहुजनांची स्फूर्तिनायिका सावित्रीआई फुले :**

सावित्रीआई फुले हे देशाच्या आधुनिक सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासातील एक सोनेरी पान आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी स्त्री-पुरुष समता आणि सामाजिक न्यायाची चळवळ उभी करण्यासाठी सावित्रीआई फुले यांनी भ्रतार तथा थोर समाजसुधारक जोतीराव फुले यांच्यासोबत कडवी झुंज दिली. 'ज्ञान' ही एक फार मोठी 'सत्ता' असून स्त्रिया आणि दलित-बहुजन वर्गाची उन्नती ज्ञानाशिवाय होऊ शकणार नाही, हे ओळखून प्रत्यक्ष शिक्षण प्रसाराच्या कार्याला त्यांनी स्वतः आयुष्यभर वाहून घेतले. संपूर्ण देशात मुलींची शाळा आणि नेटिव्ह लायब्ररी सर्वप्रथम "सन 1848 मध्ये सुरू करण्याचे श्रेय या उभयदाम्पत्याकडेच जाते , असे तत्कालीन कागदपत्रांवरून स्पष्ट होते."[1]

भारतासारख्या स्थितिशील देशाला गतिशील करण्यासाठी प्रथमत: महात्मा जोतीराव फुले यांनी ज्यावेळी परिवर्तनाची चक्रे फिरविण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्यांना संपूर्ण साथ देणारी त्यांची पत्नी अवघ्या अठरा वर्षांची होती. "सन 1848 मध्ये सुरू करण्यात आलेल्या शाळेत धर्ममार्तंडांच्या भीतीपोटी अध्यापनाचे कार्य करण्यास कोणीच धैर्य दाखवीना हे पाहून जोतीरावांनी स्वतःच्या पत्नीला शिक्षण देऊन साक्षर,शिक्षित आणि सुशिक्षित केले व आपल्या शाळेतील शिक्षिकेचे आणि मुख्याध्यापक पदाचे काम सोपविले ,असे दिनांक 1 मे 1851 ते 30 एप्रिल

1852 च्या तत्कालीन शैक्षणिक अहवालात नमूद केले आहे."[2] यावरून भारतातील पहिल्या शिक्षिका व मुख्याध्यापिका होण्याचा मान सावित्रीआई फुले यांच्याकडे जातो.सावित्रीआईंनी जोतीरावांच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी घराच्या उंबरठ्याबाहेर टाकलेले पहिले पाऊल हीच आधुनिक भारतीय स्त्रियांच्या 'सार्वजनिक जीवनाची' सुरुवात होय, हे कुणालाही नाकारता येत नाही. सावित्रीआई यांचे हे शैक्षणिक कार्य म्हणजे भारतीय इतिहासातील परिवर्तनवादी क्रांतीची मुहूर्तमेढ होती. विशेष हे की,ही मुहुर्तमेढ एका शूद्र कुळातील स्त्रीने रोवली हेच एक फार मोठे धाडसाचे काम होते. पुणे हे सावित्रीआई यांचे कार्यक्षेत्र.तो सनातन्यांचा बालेकिल्ला. स्त्रियांना आणि त्यातही स्त्रीशूद्रातिशूद्रांना शिक्षण देणे सनातन्यांच्या दृष्टीने महाभयंकर पातक होते. त्यातच एका हिंदू बाईने शिक्षिकेचे काम करावे, ही त्याकाळी अत्यंत समाजद्रोही व धर्मद्रोही घटना मानण्यात आली. त्यामुळे पुण्यात संतापाची लाट उसळली. एका स्त्रीने समाजाची सर्व बंधने तोडून शिक्षिकेचे काम करावे ही गोष्टच त्यांना अपवित्र वाटली.म्हणून त्यांनी सावित्रीआई यांच्या शैक्षणिक कार्यात अडथळे आणण्यास सुरुवात केली. त्यांच्या अंगावर खडे ,चिखल आणि घाण फेकण्यात येऊ लागली .काही सनातन्यांची तर त्यांच्या अंगावर हात टाकण्यापर्यंत मजल गेली. परंतु सावित्रीआई आपल्या ध्येयापासून एक इंच भर सुद्धा मागे हटल्या नाहीत. उलट अशा टोळभैरवांना सावित्रीआई म्हणत, "मी माझ्या भगिनींना शिकविण्याचे पवित्र कार्य करीत असताना तुम्ही माझ्यावर शेण ,अगर खडे फेकीत आहात, ही मला फुलेच वाटतात, ईश्वर तुम्हाला सुखी ठेवो"[3] बळवंत राजाराम कोल्हे यांच्या ह्या आठवणी सावित्रीआई यांच्या धैर्यावर अगदी चपखलपणे प्रकाश टाकणाऱ्या आहेत. भ्रतार जोतीराव फुले यांच्या मदतीने कुणाचेही आर्थिक साहाय्य न घेता.

"1 जानेवारी 1848 ते 15 मार्च 1852 पर्यंत मुलींच्या शिक्षणाकरिता त्यांनी 'नेटिव्ह फिमेल स्कूल,पुणे' आणि 'दि सोसायटी फॉर प्रमोटिंग दि एज्युकेशन ऑफ महाराष्ट्र मांग्ज ॲण्ड एक्सेट्राज' अशा दोन शैक्षणिक संस्थांतर्गत पुणे तथा पुण्याच्या आसपास क्षेत्रात एकूण 18 पाठशाळा सुरु केल्याची नोंद तत्कालीन मुंबई सरकारच्या अभिलेखामध्ये सापडते."[4] सावित्रीआई -जोतीराव फुले या उभय दाम्पत्यांनी "आपल्या व्यापार -उद्योगातून मिळवलेली लाखो रुपयांची मिळकत या शाळेवर उदारपणे खर्च केली"[5], असे 2 फेब्रुवारी 1858 च्या अस्पृश्यांच्या शाळांच्या परीक्षेच्या अहवालात म्हटले आहे. यावरून सावित्रीआई यांनी अध्यापनाचे काम विनावेतन केल्याचे स्पष्ट होते. विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती बरोबरच इतिहास ,भूगोलाचे ज्ञान असावे.त्यांच्या अंगी व्यवहार चातुर्याचे कौशल्य विकसित व्हावे, त्यांना सत्य आणि असत्या मधील फरक लक्षात यावा हा उद्देश समोर ठेवून त्या आपल्या शाळेत विद्यार्थ्यांना इतिहास ,भूगोल गणित, व्याकरण नीतीबोध आणि बालबोध इत्यादी विषयांचे ज्ञानदान अगदी निष्ठापूर्वक करीत असत. त्यामुळे अल्पावधीतच जोतीरावांच्या शाळा आणि सावित्रीआई यांचे शैक्षणिक कार्य नावारूपाला आले. शाळेतील एका कार्यक्रमात बक्षीस वितरण प्रसंगी मिसेस ई.सी.जोन्स यांना एका विद्यार्थीनीने "Dont give us prize. Give us school Library "[6] अशी मागणी घातली. सावित्रीआई यांच्या शाळेतील विद्यार्थिनीने मिसेस जोन्स यांना घातलेली ग्रंथालयाची मागणी ही या देशातील भावी स्त्रीवाद आणि विज्ञानवादाची नांदी ठरली, हा इतिहास आहे. आणखी एक बाब अशी की, सावित्रीआई यांच्या शाळेत शिकणाऱ्या एका 14 वर्षाच्या मुक्ता साळवे नावाच्या मातंग समाजातील एका मुलीने सन 1855 साली आत्मकथन करणारा एक निबंध लिहिला. मराठी वाङमयातील एक श्रेष्ठ मानदंड ठरावा इतका तो महत्त्वाचा आहे. सदरील निबंध ज्ञानोदयाने अहमदनगरहून प्रकाशित होणाऱ्या आपल्या अंकात दिनांक 15 फेब्रुवारी व 1 मार्च 1855 रोजी दोन भागात छापला आहे .तत्कालीन मुंबई राज्याच्या शैक्षणिक अहवालामध्येही शासनाने तो छापला असून ना.वी. जोशी यांच्या 1868 मध्ये प्रकाशित 'पुणे शहराचे वर्णन 'या ग्रंथातही उपलब्ध आहे. ती आपल्या निबंधात लिहिते,"

लाडू खाऊ ब्राह्मण लोक म्हणतात की, वेद ही आमची मत्ता आहे. ब्राह्मणेतरांस वेदांचा अधिकार नाही . यावरून जर आम्हांस धर्मपुस्तक पाहण्याची मोकळीक नाही तर आम्ही धर्मरहित आहोत असे साफ दिसते की नाही बरे ? हे भगवाना, तुजकडून आलेला कोणता धर्म आम्ही स्वीकारावा ते लवकर कळीव म्हणजे तेणेप्रमाणे तजवीज करता येईल."[7] मुक्ता साळवे हिने लिहिलेला हा निबंध म्हणजे विद्रोही साहित्याची नांदी ठरते. सावित्रीआई यांच्या शैक्षणिक आणि वाचन संस्कृतीचा समाजमनावर झालेला हा दूरगामी परिणाम होय. त्यांच्या शैक्षणिक कार्याने सबंध देशातील कित्येक भावी पिढ्या मुखर झाल्या नि त्यांनी ब्राह्मणी धर्माच्या गुलामीचे साखळदंड मोठ्या त्वेषाने तोडून स्वातंत्र्याची फळे चाखण्यास सुरुवात केली. सबब सावित्रीआई फुले यांचे हे शैक्षणिक क्षेत्रातील वाखाणण्याजोगे काम पाहून तत्कालीन इंग्रज सरकारने "दिनांक 16 नोव्हेंबर 1852 रोजी पुणे येथील विश्राम बागेत गव्हर्नरच्या हस्ते सावित्रीआई व जोतीराव या उभयतांचा शाल व श्रीफळ देऊन सार्वजनिक सन्मान केला."[8] एका शूद्र कुळात जन्माला आलेल्या जोडप्याचा हा या देशातील पहिलाच सन्मान सोहळा होता. या अगोदर शिक्षा आणि दक्षिणा हि एका विशिष्ट समाजाची मक्तेदारी होती .ती परंपरा सावित्री -जोतीरावांनी मोडीत काढली. सावित्री - जोतीराव यांनी आपल्या शैक्षणिक व सामाजिक कार्याने दाहीदिशा उजळून टाकल्या होत्या. त्यामुळेच पुण्यात पंडिता रमाबाई,डॉ. आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे, ताराबाई शिंदे, रखमाबाई राऊत अशा मोठ-मोठ्या सुशिक्षित बाया बनल्या. पुढे त्यांनी स्त्रियांच्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली.

शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे ,हे ओळखून या उभय दाम्पत्यांनी आपल्या कार्याचा मोर्चा 1860 नंतर सामाजिकक्षेत्राकडे वळविला आणि काही रूढ पण क्रूर अशा परंपरांनाही आळा घातला. त्यावेळी बालविवाहाची अनिष्ट प्रथा रूढ होती. त्यामुळे बालपणीच लग्न झालेल्या अनेक मुली वयाच्या बारा-तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. पतीच्या निधनानंतर एकतर त्यांना सती जावे लागे किंवा त्यांचे केशवपन करून त्यांना कुरूप बनविले जाई. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुणातरी नराधमाच्या शिकार बनत. गरोदर विधवा म्हणून समाज छळ करणार, जन्माला येणाऱ्या मुलाला यातनांशिवाय काहीच मिळणार नाही अशा विचारांनी ग्रासलेल्या या विधवा पुढे चालून एक तर आत्महत्या करीत असत किंवा भ्रूणहत्या करीत असत. अशा समाजविघातक समस्येवर उपाय म्हणून जोतीरावांनी "सन 1863 मध्ये स्वतःच्या घरी 'घर नंबर 395' गंजपेठ, पुणे येथे बालहत्या प्रतिबंधक गृह स्थापन केले."[9] ते सावित्रीआई फुले यांनी 1884 पर्यंत म्हणजे वयाच्या उत्तरार्धापर्यंत अगदी समर्थपणे चालविले. या गृहात स्वतः

सावित्रीआईने एकूण 35 नवजात अर्भकाच्या नाळी तोडल्या .याशिवाय "केशवपन बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे (1890), पुनर्विवाहाचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न करणे , बहुपत्नीत्वाच्या पद्धतीला विरोध करणे, कर्मठ अशा जातीय सिद्धांताला मूठमाती देत आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे,"[10] अशी अनेक कामे सावित्रीआईंनी अतिशय कल्पकतेने पार पाडली. सावित्रीआई फुले यांना स्वतःचे अपत्य नव्हते .तेव्हा फुले दाम्पत्यांनी सारासार विचारांती बहुपत्नीत्वाची निष्ठुर प्रथेला अव्हेरून स्वतः चालवत असलेल्या अनाथ बालकाश्रमातील काशीबाई नामक ब्राह्मण विधवेच्या पोटी जन्माला आलेले अनौरस अपत्य दत्तक घेऊन समाजाला एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला . दत्तक पुत्र यशवंताचा मोठ्या लाडाने सांभाळ करत फुले दाम्पत्यांनी त्याला उच्चशिक्षण देऊन डॉक्टर बनविले. यशवंताने पुढे सैन्यात जाऊन चीन आणि अफगाणिस्तान या देशात नोकरी केली. सत्यशोधक चळवळीला अनुरूप राष्ट्रीय मनोवृत्तीच्या समाज बांधणीसाठी सावित्रीआई व जोतीराव फुले यांनी दत्तक पुत्र यशवंत यांचा "दिनांक 4 फेब्रुवारी 1889 साली वयाच्या सोळाव्या वर्षी आंतरजातीय विवाह लावून दिला व देशातील जातीयतेला कायमची मूठमाती दिली."[11]

यशवंताचा विवाह हा आधुनिक भारतातील पहिला आंतरजातीय विवाह ठरला. या सर्व कार्यात सावित्रीआई फुले ह्या मोठ्या उत्साहाने अग्रभागी होत्या. भारतीय पुरुषसत्ताक जीवनशैलीचे दमन करण्यातील सावित्रीआईंचे हे योगदान कालातीत असेच आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीआई फुले यांचा मोठा सहभाग होता. "सन 1877 च्या दुष्काळात गोरगरिबांच्या मुलांना जगविण्यासाठी सावित्रीआई फुले यांनी दोन हजार मुलांचा पुण्याजवळील धनकवडी येथे 'राणी व्हिक्टोरिया बालकाश्रम' चालविला."[12] त्यात सावित्रीआई फुले यांनी आपल्या मैत्रिणींसह स्वतः स्वयंपाक करून गोरगरीब मुलांचे जीवन वाचविले. "दिनांक 25 डिसेंबर 1873 रोजी सावित्रीआई फुले यांनी पुढाकार घेऊन ब्राह्मण पुरोहितविना पहिला सत्यशोधक विवाह लावला."[13]

बिनहुंड्याचा, डामडौल नसलेला, कमी खर्चातला ; परंतु अतिशय आनंदात साजरा केलेला हा विवाह महाराष्ट्रात एक पायंडा पाडून गेला. गेली दीडशे वर्ष महाराष्ट्रभर ही प्रथा चालू आहे. कोरोना महामारीच्या काळात तर शासनाने सत्यशोधक विवाह पद्धती वर जणू शिक्कामोर्तबच केले आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा सावित्रीआई फुले यांनी अतिशय समर्थपणे पेलली.

"28 नोव्हेंबर 1890 रोजी जोतीरावांच्या मृत्यूनंतर पुरुषसत्ताक संस्कृतीप्रमाणे जोतीरावांचा दाह संस्कार करताना दत्तक पुत्र यशवंताला जेव्हा भाऊबंद आडवे आले. तेव्हा सावित्रीआई फुले यांनी पुरुषसत्ताक संस्कृतीने घालून दिलेली सर्व बंधने झुगारून देऊन स्वतः जोतीरावांच्या चितेला भडाग्नी देत परंपरेने चालत आलेल्या वैदिक संस्कृतीचे ही दहन केले."[14]

जोतीरावांच्या मृत्युपश्चात सावित्रीआई फुले यांनी अतिशय कार्यक्षमतेने सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व केले. "सन 1893 साली पुण्याजवळील सासवड येथे आयोजित सत्यशोधक परिषदेचे अध्यक्षपदही सावित्रीबाई फुले यांनी अगदी समर्थपणे भूषविले होते."[15]

"सन 1896 मध्ये पडलेल्या भीषण दुष्काळात सावित्रीआई फुले यांनी समाजाला सत्कार्याचा आणखी एक नवा आदर्श घालून दिला. "पोटासाठी शरीर विक्रय करणाऱ्या बाया-बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबात आश्रयास पाठविले". तसेच सन 1897 साली पुणे व पुणे परिसरातील अनेक गावखेड्यांत प्लेगच्या साथीने धुमाकूळ घातला होता. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेऊ लागला. प्लेग हा संसर्गजन्य रोग आहे हे कळल्यावर ब्रिटिश सरकारने बाधित लोकांना खबरदारीचा उपाय म्हणून स्थानांतरित (Social Distancing ) करण्याचा बेत योजिला होता. सामाजिक विलगीकरणाची संकल्पना किती भयानक असते याची प्रचिती संपूर्ण जग कोरोना महामारीच्या काळात घेत आहे. अगदी तशीच परिस्थिती एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात निर्माण झाली होती. पारतंत्र्यात असलेला देश, आरोग्य क्षेत्रातील तोकडी प्रगती, औषधपाण्याचा तुटवडा आणि पुरेशा प्रमाणातील मानवी संसाधनांच्या अभावी पुणे व पुणे परिसरात प्लेगच्या साथीने एकीकडे मृत्यूचे तांडव सुरू झाले होते. तर दुसरीकडे स्मशानात चितांची अक्षरशः होळी पेटली होती. कुणीच कुणाचा वाली राहिला नव्हता. जणू त्याकाळी संपूर्ण माणुसकीच ओशाळून पडली होती . अशा संकटसमयी स्वतःला लोकमान्य व सुधारक म्हणून घेणाऱ्या मंडळींनी काहीतरी उपाययोजना समाजाला धीर देण्याऐवजी स्वतःलाच विलगीकरण करून घेण्यात धन्यता मानली. तथापि महात्मा जोतीराव फुले यांचा वारसा आणि वसा घेऊन सार्वजनिक जीवनात मुक्त संचार करणारी विरांगणा सावित्रीआई फुले मात्र याला अपवाद ठरली.सावित्रीआई फुले यांनी या महामारीच्या काळातही जीवाची पर्वा न करता स्वतःला सामाजिक कार्यात झोकून दिले. आपला डॉक्टर मुलगा यशवंत याला परदेशातून बोलावून घेतले व पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळरानावर प्लेगपीडितांसाठी दवाखाना सुरू केला. त्यावेळी अंबुलन्स अथवा स्ट्रेचरची कुठलीही व्यवस्था नव्हती. अशावेळी प्लेगची लागण झालेल्या रुग्णांचा शोध घेणे , त्याच्या कुटुंबातील अन्य सदस्यांना धीर देत रुग्णांना दवाखान्यात

आणण्याची व्यवस्था करणे,दवाखान्यात भरती झालेल्या रुग्णांची विनामूल्य सेवा सुश्रुषा करणे हा यशवंत आणि सावित्रीआई या दोन्ही माय- लेकरांचा स्थायिभावच बनला होता.अशातच "सावित्रीआई फुले यांना मुंढवा येथील पांडुरंग बाबाजी गायकवाड या दलित मुलांना वाचवताना प्लेगच्या आजाराने गाठले आणि त्यातच 10 मार्च 1897 रोजी त्यांचा करुण अंत झाला."[16]

सन 1848 ते अठराशे 1897 असे जवळजवळ अर्धशतक सावित्रीआई फुले ह्या समाजसुधारणेच्या उद्देशाने राबत होत्या. या काळात त्यांनी सामाजिक क्रांतीची मशाल कधीच मंद होऊ दिली नाही.

समाजाला आपल्या हक्क व कर्तव्याची जाणीव झाल्याशिवाय तसेच समाजात विज्ञानवाद रुजल्याशिवाय जोतीरावांनी पेटवलेली क्रांतीची मशाल अखंडपणे तेवत राहणार नाही, या उद्देशाने सावित्रीआई फुले यांनी आपल्या धारदार लेखणीद्वारे साहित्य सेवाही केली. "काव्यफुले (1854 ) , जोतिबांची भाषणे (1856 ), सावित्रीआईंची ज्योतिरबांस पत्रे,सावित्रीआईंची भाषणे (1892 ), बावनकशी सुबोध रत्नाकर (1892 ), या वाङ्मयीन कृतीहि सावित्रीआईंच्या नावावर आहेत."[17]

एकंदरीत साकल्याने विचार केला असता असे स्पष्ट होते की, सावित्रीआईंचे सामाजिक कार्य हे झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्यापेक्षा काही कमी नव्हते. किंबहुना त्यापेक्षाहि अधिक ते सरसच होते. झाशीची राणी लक्ष्मीबाई ही आपल्या संस्थांनासाठी , स्वार्थासाठी ब्रिटिश सरकार विरुद्ध लढत होती. तर सावित्रीआई फुले ही देशातील दीनदुबळयांच्या कल्याणासाठी काळाबरोबर कडवी झुंज देत होती. इथे झाशीच्या राणी पेक्षाहि सावित्रीआई यांची युद्ध प्रेरणा महान ठरते. पण समाजातील अध्वुर्य समजल्या जाणाऱ्या कपाळकरंट्या लोकांनी सावित्रीआईंच्या अस्तित्वाची व त्यांनी केलेल्या महान कार्याची योग्य ती दखल कधी घेतलीच नाही. त्यांनी मात्र या बेदखल अवस्थेची कधी खंत बाळगली नाही.सारे काही समाजार्पण अशा वृत्तीने त्या जगल्या आणि त्याच कृतार्थ भावाने त्यांनी जगाचा निरोप घेतला.

**सारांश:**

सावित्रीआई फुले यांनी आयुष्यभर जोपासलेल्या स्त्री-पुरुष समतेचा आणि शांततामय सहजीवनाचा आदर्श कालातीत असाच होता. त्यांनी शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रात केलेली भरीव कामगिरी इतिहास आणि वर्तमानाबरोबरच भविष्यालाहि उजळून टाकणारी आहे. कोणत्याही काल्पनिक वर्णनापेक्षा अस्सल दस्तऐवजांमधील हे 'सावित्री दर्शन' विलक्षण प्रत्ययकारी असेच आहे. एका क्रांतिकारी स्त्री जीवनाची सार्वजनिक कहाणी कशी होती व कशी असावयास हवी ह्याचा हा सुंदर कालपट आहे. म्हणून सावित्रीआई फुले हीच खऱ्या अर्थाने बहुजनांची स्फूर्तिनायिका ठरते, हे वादातीत सत्य नाकारण्याचे काहीच कारण नाही. जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये आज महिलावर्ग पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहे .काही क्षेत्रांत तर अग्रभागी आहे . त्यामागे सावित्रीआईंची पुण्याई आहे हे नव्याने सांगण्याची गरज नाही. परंतु आमच्या शोषकांनी आम्हाला खोटा इतिहास सांगून काल्पनिक अशा धार्मिक तत्त्वज्ञानाच्या दावणीला नेऊन बांधले. त्यामुळे आमचे अपरिमित नुकसान झाले.आता मात्र आमच्या मेंदूतील बौद्धिक गुलामीची जळमटे आम्ही जाळून टाकीत आहोत. त्यासाठी आम्हाला प्रतिके बदलावी लागतील. परंपरेपासून आमच्या मानगुटीवर बसलेल्या वैदिक प्रतिकांच्या ठिकाणी आम्हाला आता बुद्ध ,चार्वाक कबीर ,बसवेश्वर, राजमाता जिजाऊ ,अहिल्या, छ. शिवाजी महाराज ,महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, पेरियार, राष्ट्रसंत गाडगेमहाराज ,डॉ.बाबासाहेब आंबेडकर ,माता सावित्री, माता रमाई यांची प्रतिके बसवावी लागतील. कारण या सर्वांनी खोटे वैदिक तत्त्वज्ञान छाटून टाकण्यात अत्यंत कळीची भूमिका बजावली आहे. आता कोणी काहीही म्हणोत. आमच्या धडावर आमचेच डोके असेल. असे झाले तरच आमच्या जीवनाचा ,आमच्या भावी पिढ्यांचा उद्धार होईल .अन्यथा परंपरेने चालत आलेला काळोख ठरलेलाच आहे.

संदर्भसूची :-

1. कीर धनंजय, महात्मा ज्योतिराव फुले ,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती, 2012पृष्ठ 35, 31.

2. नरके हरी,महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, प्रकाशक प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन ,मुंबई, पाचवी आवृत्ती, पृष्ठ 23.

3. पूर्वोक्त, पृष्ठ 31.

4. जगताप मुरलीधर ,युगपुरुष महात्मा फुले, प्रकाशन ,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ 20.

5. नरके हरी ,महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, पृष्ठ 26.

6. उगले जी. ए., महात्मा फुले एक मुक्तचिंतन, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, 2000, पृष्ठ 3.

7. नरके हरी, महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, पृष्ठ 28.

8. जगताप मुरलीधर, युगपुरुष महात्मा फुले, पृष्ठ 47.

9. उगले जी.ए.,महात्मा फुले एक मुक्त चिंतन, पृष्ठ 38.

10. शिंदे रमेश, भारतीय स्त्रीवादाचे प्रणेते:महात्मा ज्योतिराव फुले, सायन पब्लिकेशन्स, पुणे ,प्रथमआवृत्ती, ऑगस्ट, 2018 पृष्ठ 51, 52, 59, 63.

11. नरके हरी, महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा,पृष्ठ 32.

12. नाईकवाडे अशोक, युगप्रवर्तक महात्मा फुले गौरव ग्रंथ, विद्याभारती प्रकाशन, लातूर, प्रथम आवृत्ती, दिनांक 15 ऑगस्ट 2012, पृष्ठ 236, 237.

13. कीर धनंजय, मालशे स. ग. आणि फडके य. दि.(संपा.), महात्मा फुले समग्रवाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती, नोव्हेंबर, 2006, पृष्ठ 206.

14. नाईकवाडे अशोक (संपा.), युगप्रवर्तक महात्मा फुले गौरव ग्रंथ ,पृष्ठ 237.

15. पूर्वोक्त,पृष्ठ 237.

16. पूर्वोक्त,पृष्ठ 237.

17. सौंदडकर सारनाथ, सावित्रीबाई फुले समग्रवाङ्मय, सारनाथ प्रकाशन, परभणी, प्रथम आवृत्ती, 12 जानेवारी, 2013, पृष्ठ 3.

# पंचायतराज : ७३ वी घटनादुरुस्ती आणि महिला सबलीकरण

**डॉ. तानाजी संभाजी माने**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जी - चंद्रपूर

**प्रस्तावना :-**

लोकशाही व्यवस्थेचा कणा असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था या भारतासाठी नवीन नसून त्या अत्यंत प्राचीन काळापासून अस्तित्वात असणाऱ्या संस्था आहेत. आजमितीस कल्याणकारी राज्याच्या विचाराचा मोठ्या प्रमाणात प्रसार होताना दिसतो. अशा परिस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्त्व अधिक पट्टीने वाढताना दिसत आहे. कारण कल्याणकारी राज्याच्या निर्मितीत या संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे.आधुनिक काळात लोकशाहीच्या संवर्धनासाठी, सत्ता विकेंद्रीकरणासाठी, स्थानिक लोकांच्या प्राथमिक आणि मूलभूत गरजा भागविण्यासाठी, लोकशाहीचे प्रशिक्षण देण्यासाठी आणि राजकीय नेतृत्वाच्या विकासासाठी अशाअनेक अंगाने या संस्थांची आवश्यकता असल्याचे दिसून येते. लोकशाहीच्या विकासात आणि स्थैर्यात या संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते. याबाबत प्रो.रिचर्ड पेस्टन म्हणतात की, "लहान-लहान संस्था या लोकशाहीच्या खऱ्या आधारस्तंभ आहेत व त्यांच्या अस्तित्वामुळेच लोकशाही अधिक प्रभावी व यशस्वी होते."*बंग, २००५,p.१०* यासोबतच असे म्हणता येईल की, लोकशाहीचा पाया हा सत्ताविकेंद्रीकरणावर आधारलेला असतो. सत्ता विकेंद्रिकरणासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास होणे अत्यंत आवश्यक आहे.

भारतातील स्थानिक प्रशासन संस्थेचा इतिहास हा अत्यंत प्राचीन व वैभवसंपन्न असा आहे. भारतात या संस्थांचा विकास हा प्राचीन, मध्ययुगीन, ब्रिटिश, स्वातंत्र्योत्तर अशाविविध कालखंडात झाला आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात पंचायतराजची सुरुवात पंडित जवाहरलाल नेहरू सरकारच्या काळात झाली. पंडित नेहरू स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महत्त्व याबाबत म्हणतात की, "स्थानिक स्वराज्य संस्था हा सरकारी यंत्रणेचा पाया असून तो जर भक्कम नसेल, तर त्यावरील इमारत डळमळेल. पंचायतीचे काम करणाऱ्या लोकांत कांही गुण असतात; तसेच काही दोषही असतात, हे मान्य केले पाहिजे... या संस्थांचे पदाधिकारी काही चुका करतील पण त्यांना काम करण्याची संधी दिली पाहिजे प्रशिक्षणही दिले पाहिजे." (*गोडबोले, २०१४* , p. *१७३* )स्वातंत्र्योत्तर काळात पंचायतराज संस्थांना बळकटी देण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावरून विविध प्रयत्न करण्यात आले. त्यातील महत्त्वाचा प्रयत्न म्हणून 73 व्या घटना दुरुस्तीच्या उल्लेख करता येईल. म्हणजेच ही घटनादुरुस्ती पंचायत राजच्या वाटचालीतील मैलाचा दगड मानली जाते. यामुळे पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. सोबतच राजकीय निर्णय प्रक्रियेतील सहभागापासून दूर राहिलेल्या घटकांना आरक्षणाच्या माध्यमातून सहभागाची संधी देण्यात आली. या संधीचा फायदा घेत महिलांचा पंचायतराज संस्थांमधील सहभागाचे प्रमाण वाढले आहे. तसेच महिलांनी पंचायतराजमध्ये आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवली आहे.

**मूळ संज्ञा :-**

स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायतराज, आरक्षण, महिला नेतृत्व, महिला सबलीकरण इत्यादी.

**अध्ययनाचे उद्देश :-**

i) 73 व्या घटनादुरुस्तीतील आरक्षणाच्या तरतुदीमुळे पंचायतराज संस्थातील वाढलेल्या महिलांच्या सहभागाचा अभ्यास करणे.

ii) पंचायतराज संस्थातील महिला नेतृत्वाचा निर्णय प्रक्रियेतील सहभागाचा अभ्यास करणे.

**अध्ययनाचे गृहीत कृत्ये :-**

i) 73 व्या घटनादुरुस्तीतील आरक्षणाच्या तरतुदीमुळे पंचायतराज संस्थामध्ये महिलांचा सहभाग वाढला आहे.

ii) पंचायतराज संस्थातील महिला नेतृत्व निर्णय प्रक्रियेत आपला ठसा उमटवित आहे.

**अध्ययन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक अध्ययन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. अध्ययनासाठी दुय्यम तथ्यसंकलन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी अध्ययन विषयाशी निगडित ग्रंथ, प्रकाशित लेख,विविध संकेतस्थळे इ.चा उपयोग करून पंचायतराज संस्थातील महिलांचा सहभाग व महिला सबलीकरणाचा अभ्यास केला आहे.

**तथ्याचे विश्लेषण:-**

**I) पंचायत राजव्यवस्था व 73 वी घटनादुरुस्ती :-**

स्थानिक स्वराज्य संस्था या घटक राज्यातंर्गत स्थापन करण्यात आलेल्या दैनंदिन प्रशासनाबाबत स्वायत्तपणे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्था आहेत. यात स्थानिक लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे सरकार असते. त्यामार्फत या संस्थेचा शासनकारभार चालवला जातो. मात्र या संस्था अंतर्गत दृष्ट्या स्वायत्त असल्या तरी बाह्यदृष्ट्या असार्वभौमिक असतात. भारतातील ग्रामीण समाज जीवनावर स्थानिक स्वराज्य संस्थांचा फार दूरगामी असा परिणाम झाला आहे. म्हणजे ग्रामीण जनतेचे जीवन सुखी आणि समृद्ध बनण्यासाठी आधुनिक भारतातील प्रयोग महत्त्वपूर्ण आहेत. त्यालाच आपण 'पंचायतराज' या नावाने संबोधतो. महात्मा गांधींजी 'पंचायत' हा शब्द खूप जुना आणि सुंदर आहे, असे म्हणत असत. त्यांच्या मते, पंचायत या संकल्पनेत विकेंद्रित सत्तेची आणि लोकशाहीची कल्पना अंतर्भूत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात पंचायतराज व्यवस्थेला मजबूत बनविण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यापैकी महत्त्वपूर्ण समिती म्हणजे 26 जानेवारी 1957 रोजी राष्ट्रीय नियोजन आयोगाने स्थापन केलेली बलवंतराव मेहता समिती होय. बलवंतराय मेहता समितीने पंचायतराज आणि लोकशाही विकेंद्रीकरणासाठी केलेली महत्त्वपूर्ण शिफारशी पुढीलप्रमाणे होती."लोकशाही विकेंद्रीकरण वास्तवात येण्यासाठी पंचायतराजची त्रिस्तरीय व्यवस्था असावी. त्रिस्तरीय व्यवस्थेत ग्रामस्तरावर ग्रामपंचायत, गटस्तरावर पंचायत समिती व जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद असावा. त्रिस्तरीय व्यवस्था एकाच वेळी कार्यान्वित करण्यात यावी." *(ठोंबरे, २००७, p. १६३)*

बलवंतराय मेहता समितीने सादर केलेल्या अहवालाच्या आधारे भारत सरकारने 1 एप्रिल 1958 चा कायदा पास केला. यानुसार भारतामध्ये लोकशाही विकेंद्रीकरणासाठी पंचायतराज संस्थाची स्थापना झाली. त्याचाच एक भाग म्हणजे 2 ऑक्टोबर 1959 रोजी राजस्थानातील नागोरयेथे पंतप्रधान पंडित नेहरूंच्या हस्ते पंचायत राज संस्थांचे औपचारिक उद्घाटन झाले. पंडित नेहरूंनी लोकशाही विकेंद्रीकरणाचा त्रिस्तरीय व्यवस्थेला 'पंचायतराज' हे नाव दिले. भारतातील पंचायतराजच्या महत्त्वपूर्ण योगदानाबाबत बलवंतराय मेहता म्हणतात, " जर आपणास पंचायतराज संस्था व तेथील ग्रामस्थ आणि त्यांच्यातील सुप्त गुणांचा उपयोग करण्याच्या क्षमतेवर विश्वास असेल तर यश नक्कीच त्यांच्या हाती असेल. आज पंचायतराजमध्ये अनेक दोषांचा शिरकाव झाला आहे, परंतु ही भविष्यातील महत्त्वाची शक्ती आहे. " *(राठौड, २०१०, p. २४&२५ )*

त्यानंतर पंचायतराज संस्थांचा अभ्यास करून शिफारशी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या महत्त्वाच्या समितीत अशोक मेहता समिती (1977) आणि डॉ. एल. एम. सिंघवी समिती (1986) यांचा उल्लेख करता येईल. या समितीने केलेल्या शिफारशी लक्षात घेऊन केंद्र सरकारने 64 वे पंचायतराज घटना दुरुस्ती विधेयक सादर केले. याप्रसंगी म्हणजे 15 मे 1989 रोजी पंचायतराजला घटनात्मक दर्जा देणारे घटना दुरुस्तीचे विधेयक मांडताना तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधींनी मत मांडले की, "भारतातील जनतेकरिता आपण कमाल लोकशाही आणि सत्तेचे कमाल विकेंद्रीकरण सुनिश्चित करूयात, चला आपण सत्ता दलालांना संपूयात, चला लोकांच्या हाती ताकद सुपूर्द करूयात." *(मॅथ्यू, २०११ , p. १५)*यावरून लोकशाही विकेंद्रीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या

पंचायतराज संस्थांना घटनात्मक संरक्षणाची व अधिकाराची आवश्यकतेची कल्पना येते. हे 64 वे घटना दुरुस्ती विधेयक संमत होऊ शकले नाही. 1991 साली सत्तेवर आलेल्या पी. व्ही. नरसिंहराव सरकारने पंचायतराज संस्थाबाबतचे 73 वी घटनादुरुस्ती विधेयक संसदेत सादर केले. या विधेयकाला संसदेच्या दोन्ही सभागृहांची व 17 घटकराज्याच्या विधीमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर 20 एप्रिल 1993 रोजी या विधेयकावर राष्ट्रपतीची अंतिम स्वाक्षरी झाली. या नवीन अधिनियमाच्या अंमलबजावणीस सुरुवात झाली.

या 73 व्या घटनादुरुस्तीने पंचायतराज संस्थासंबंधी विविध तरतुदी करण्यात आल्या. त्यात संस्थांना घटनात्मक दर्जा देणे, ग्रामसभे संबंधी तरतूद करणे आणि पंचायतराज संस्थेच्या कार्यकाल व संरचनेत एकसूत्रता आणण्याबाबत तरतुदी करण्यात आल्या. तसेच सामाजिक न्यायाचे तत्त्व प्रस्थापित करण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग आणि महिलांसाठी आरक्षणाबाबत तरतुदी करण्यात आल्या. आरक्षणाची तरतूद वंचित घटकाच्या राजकीय सहभागाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. सुरुवातीला महिलांच्या राजकीय अधिकाराच्या वापरासाठी सामाजिक व आर्थिक परिस्थिती अनुकूल नव्हती. मात्र बदलत्या परिस्थितीमुळे महिलांच्या प्रत्यक्ष सहभागाविषयी जाणीव वाढली, परिणामी 73 व्या घटनादुरुस्तीने महिलांसाठी आरक्षण जाहीर करण्यात आले.

**II) 73 वी घटनादुरुस्ती आणि महिला आरक्षण :-**

73 व्या घटनादुरुस्तीने महिलांना राजकीय सत्तेत वाटा मिळण्यासाठी आरक्षणाच्या माध्यमातून दरवाजे उघडण्यात आले. आरक्षण म्हणजे समाजातील दुर्बल घटकांना समान पातळीवर आणण्यासाठी त्यांना दिलेली विशेष संधी होय. "आपल्या इहलौकिक जीवनात काही जातींना विकासाची संधी मिळावी यासाठी देण्यात आलेली विशेष सवलत म्हणजे आरक्षण होय. " *(दत्ताभगत, २००८ , p. १०६ )*समाजाची अर्धीशक्ती असणारी महिला ही शतकानुशतके दुर्बल आणि दुर्लक्षित राहिलेली होती. तिचे कार्यक्षेत्र हे 'चूल आणि मूल' इतकेच मर्यादित होते. महिलांचा समाजातील दर्जा आणि राजकीय स्थान उंचावण्यासाठी आरक्षणाची आवश्यकता होती. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात महिलांना राजकीय अधिकार देण्यात यावेत. यासाठी विविध स्तरावरून प्रयत्न करण्यात आले. प्रामुख्याने सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रामीण विकासात ग्रामीण महिलांचा सहभाग महत्वाचा आहे, हा विचार मान्य करण्यात आला. यासोबतच असाही विचार समोर आला की महिलांना आरक्षणाद्वारे प्रतिनिधित्व देण्यात आले तर त्यांच्या सहभागाच्या बाबतीतील अडथळे दूर होतील.

वरील सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता 1993 साली 73 व्या घटनादुरुस्तीने पंचायतराज संस्थामध्ये कलम 243(D)नुसार महिलांना 33% आरक्षणाची तरतूद केली. या 33% जागा खुला प्रवर्ग, इतर मागास वर्ग, अनुसूचित जाती व जमातीतील महिलांसाठी राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली. 73 वी घटनादुरुस्तीनंतर महिलांच्या थेट राजकीय सहभागाला सुरुवात झाली. त्यानंतर 2011साली महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा राखीव जागेची मर्यादा 50% पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला. 2020 पर्यंत भारतातील 20 घटकराज्यात 50% आरक्षण जाहीर करण्यात आले. त्यामुळे महिलांच्या राजकीय सहभागाचा मार्ग आणखीन रुंदावत गेला. म्हणजेच परंपरेने 'पाळण्याची दोरी' असणाऱ्या महिलांच्या हातात 'गावाच्या विकासाची दोरी' आली असे म्हणता येईल.

**III) महिला आरक्षण व महिलांचे सबलीकरण:-**

73 व्या घटनादुरुस्तीतील आरक्षणाच्या तरतुदीमुळे साहजिकच महिलांच्या राजकीय सहभागाला चालना मिळाली. हा निर्णय म्हणजे महिलांच्या सबलीकरणासाठी टाकलेले एक भक्कम पाऊल म्हणता येईल. महिलांचे सबलीकरण म्हणजे तिच्यातील बुद्धिमत्ता, निसर्गदत्त शक्ती आणि सामर्थ्य उंचावणे; तसेच तिची स्वतःची ओळख, विचारस्वातंत्र्य, अभिव्यक्ती आणि कृती स्वातंत्र्य या सोबतच तिच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला हाताळण्याचे सामर्थ्य तिच्यात निर्माण करणे होय." महिला सबलीकरण म्हणजे महिलांचा सत्ता विभागणीत समान

वाटा, निर्णय प्रक्रियेत योग्य स्थान आणि सामाजिक, राजकीय तसेच आर्थिक जीवनात याबाबतची समानता प्राप्त होणे होय." *(भसीन, २०१६ , p. १९ )*पुढील तक्त्यावरून पंचायतराज मधील महिलांच्या सहभागाचे आणि त्यांना पुरुषांच्या बरोबरीने मिळालेल्या समान प्रतिनिधित्वाच्या प्रमाणाचे अध्ययन करता येईल.

**तक्ता:-**

| अ. क्र. | पंचायतराज संस्था | भारतातील पंचायतराज संस्थांची संख्या | पंचायतराज संस्थातील निर्वाचित सदस्यसंख्या | पंचायतराज संस्थातील निर्वाचित महिलांची सदस्य संख्या |
|---|---|---|---|---|
| 1 | ग्रामपंचायत | 253268 | 2903277 | 1292203 |
| 2 | पंचायत समिती | 6614 | 180000 | 75620 |
| 3 | जिल्हा परिषद | 630 | 17527 | 8091 |
| एकूण | -- | 260512 | 3100804 | 1375914 |

**स्त्रोत**:- www.panchayat.gov.in

वरील तक्त्याचे अवलोकन केल्यास (Ministry of Panchayat Raj Government च्या Basic Statistic of Panchayat Raj Institutions मध्ये प्रकाशित आकडेवारी) असे लक्षात येते की, पंचायतराज मधील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या संस्थातील निर्वाचित महिलांच्या सदस्यांची संख्या ही 1375914 इतकी आहे. यावरून असे सिद्ध होते की, महिलांना पंचायतराजमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतीनिधित्वाची संधी मिळत आहे. वरील तक्त्यातील आकडेवारी ही पंचायतराज मधील महिला प्रतिनिधींची आहे. मात्र व्यापक अर्थाने महिलांच्या सहभागाचा विचार केला तर सहभागाची संख्या ही प्रतिनिधीच्या संख्येपेक्षा अधिक असू शकते. म्हणजेच महिलांच्या राजकीय सहभागाचा विचार हा लोकप्रतिनिधीत्वा पुरता मर्यादित न करता तो निवडणूक लढविणे, राजकारणाबद्दल मत व्यक्त करणे, मतदान करणे आणि पक्षकार्यात सहभागी होणे या दृष्टीने केल्यास ही संख्या आणखी अधिक निघू शकते.

महिलांचा राजकीय सहभागात वाढ करणे, सामाजिक न्यायाचे तत्त्व प्रस्थापित करणे, स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे अशी विविध उद्दिष्टे ठेवून पंचायतराज व्यवस्थेत महिलांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम असा झाला की, पंचायतराज संस्थांमध्ये महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला. सुरुवातीला हा सहभाग संख्यात्मक, प्रतीकात्मक होता. आता तो दृश्यात्मक बनत चालला आहे. यात महिलांचे निवडून येणे दखलपात्र बनत चालले आहे. कारण आरक्षणामुळे सदस्यत्वाबरोबरच प्रमुख पदावर येण्याची संधी मिळत आहे. म्हणजेच महिलांना ग्रामपंचायतीचे सरपंच, पंचायत समितीचे सभापती आणि जिल्हा परिषदेचे अध्यक्ष या सारख्या महत्त्वाच्या पदावर विराजमान होण्याची संधी मिळत आहे. वरील तक्त्याचे अवलोकन केल्यास असे लक्षात येते की भारतातील ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या पंचायतराज संस्थांची संख्याही 260512 इतकी आहे. या संस्थातील सरपंच, सभापती आणि अध्यक्ष या प्रमुख पदावर महिला पुरुषांच्या बरोबरीने विराजमान होत आहेत. यामुळे पंचायतराज संस्थांमध्ये महिलांना आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखवण्याची संधी मिळत आहे.

अनेक महिला नेतृत्वाने राजकीय सहभाग हा सक्रियपणे नोंदविताना स्थानिक प्रश्नांचे रूढ अग्रक्रम बदलून मुलभूत गरजांना व सुविधांना प्राधान्य देत उपलब्ध संसाधनांचा योग्य तो उपयोग करण्याची एक वेगळी दृष्टी दाखविली आहे."स्त्रियांच्या पुढाकारामुळे पाणी, आरोग्य, सांडपाण्याच्या सुविधा, शिक्षण यासारख्या जिव्हाळ्याच्या बाबींना अग्रक्रम मिळत आहे.स्त्रियांचे औदासिन्य व संकुचित वृत्ती मागे पडून त्या हिरारीने पुढे येत आहेत. पर्यायाने स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण रित्या हातभार लागत आहे."*(शिरापूरकर, २०११ , p.*

२७२ )महिला नेतृत्वाने पंचायतराज संस्थांमध्ये पायाभूत गरजा पुरविण्याबाबत विविध महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. गावाचे सामाजिक स्वास्थ्य जपण्यासाठी दारुबंदी सारखे कळीची विषय पुढे आणले आहेत.तसेच विकासात्मक प्रश्नाबाबत ही महिला नेतृत्व पुढाकार घेताना दिसत आहे. त्यात निधीचा वापर योग्यरीतीने करणे, सामाजिक कार्यक्रम राबविणे, महिला व बालकांच्या आरोग्याचे प्रश्न व भ्रष्टाचार निर्मूलन इत्यादी. यासारख्या महत्त्वपूर्ण कार्यातून व निर्णयातून महिला नेतृत्व आणि आपला ठसा उमटविण्यास सुरुवात केली आहे. यावरून आपणास असे म्हणता येते की, 73 व्या घटना दुरुस्तीने महिलांना आरक्षणाच्या माध्यमातून राजकीय सहभागाची संधी दिली. या संधीचा फायदा घेत महिलांची सबलीकरणाकडे वाटचाल सुरू झाली आहे.

**निष्कर्ष:-**

i) पंचायतराज संस्थांच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे 73 वी घटनादुरुस्ती मानली जाते.

ii) 73 व्या घटनादुरुस्तीने महिलांना 33% आरक्षण देऊन राजकीय सहभागाची संधी दिली. भारतातील विविध घटकराज्यात आरक्षणाचे प्रमाण 50% पर्यंत वाढविण्यात आले आहे.

iii) पंचायतराज संस्थांमध्ये आरक्षणामुळे सहभागाची संधी मिळाल्याने महिलांचा राजकीय सहभाग वाढला आहे.

iv) पंचायतराज संस्थामध्ये महिलांनी राजकीय सहभागाबरोबरच विविध समाज उपयोगी व विकासात्मक निर्णय घेऊन आपल्या नेतृत्वाची चुणूक दाखविली आहे.

v) पंचायतराज संस्थातील सहभाग आणि नेतृत्वाची संधी यामुळे महिला सबलीकरणास चालना मिळत आहे.

**संदर्भ सूची:-**

गोडबोले, म. (२०१४ ). *जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व एक सिंहावलोकन* .पुणे : राजहंस प्रकाशन.

ठोंबरे, स. (२००७). *जिल्हा प्रशासन आणि स्थानिक स्वशासन* .औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स.

दत्ता भगत, न. क. (२००८ ). *आरक्षण विषयक चळवळीत बहुजनांचे योगदान-आरक्षण सत्य व विपर्यास* .औरंगाबाद : चिन्मय प्रकांशन.

बंग, क. आ. ( २००५). *भारतातील स्थानिक स्वशासन विशेष संदर्भ – महाराष्ट्र राज्य.* नागपूर: श्री मंगेश प्रकाशन.

भसीन, क. (२०१६ , सप्टेंबर --). भारताच्या संदर्भात महिला सक्षमीकरण. *महिला सबलीकरण*, p. १९ .

मॅथ्यू, ज. ( २०११ , फेब्रुवारी --). पंचायतीराजसंस्था करिता नवीन व्यवस्था-काळाची गरज . *ग्रामसभा : लोकशाहीचे लोकशाहीकरण*, p. १५.

राठौड, म. (२०१०). *पंचायती राज और महिला विकास.*जयपूर : पोइन्टर पब्लिशर्स .

शिरापूरकर, त. ज. (२०११ ). *भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया* .पुणे : दयुनिक अकॅडमी.

# भारतातील स्त्रीवादी चळवळ

**प्रा. डॉ. आर. डी. मांडणीकर**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,कोल्हापूर

**प्रास्ताविक :**

स्त्रीवादी चळवळ ही एक स्त्रियांच्या संदर्भातील सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्काची मागणी करणारी विचारसरणी आहे. समानता समजाऊन घेत असताना स्त्रियांची भूमिका महत्त्वाची आहे. स्त्रीवादी चळवळ ही स्त्रियांच्या प्रश्नासंबंधी लैंगिक व लिंगभावाचे सामाजिक संरचना मांडण्याचा प्रयत्न करीत आहे. स्त्रीवादी चळवळीतील महिलांनी कायदा, मालमत्ता राजकीय सहभागासारख्या हक्काविषयीच्या मागण्या करीत आहेत. स्त्रीवादी विचारसरणीला निश्चितपणे एक दिशा आहे. स्त्रियांच्या खाजगी, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पातळीवर होण्यार्या दडवणूकीबद्दल जाणीव होणे आणि त्याबरोबचर या दडपणूकीविरोधी लढण्याची तयारी असणे म्हणजे स्त्रीवादाचा अंगीकार करणे होय. आज अनेक स्त्रीवादी व्यक्ती दिसतात. पण स्त्रीवादी चळवळ व संघटना मात्र फारच कमी प्रमाणात आढळताना दिसतात. स्त्रीवादी चळवळीने समाजाच्या मूलभूत प्रश्नाचा विडा उचलला पाहिजे. समाजव्यवस्थेतील सामाजिक, आर्थिक व राजकीय पातळीवर पुरूषांचे असलेले वर्चस्व याला शह देऊन संरचनात्मक बदलासाठी पावले उचलणे गरजेचे आहे. सामाजिक संरचनांची नवी बांधणी करणे, लोकशाही विकेंद्रीकरण ही तत्वे राबविण्याचा आणि तसे संस्कार करण्याचा प्रयत्न स्त्रीवादी चळवळीत दिसून येत आहे.

भारतीय समाजव्यवस्था स्वातंत्र्य, समता आणि बंधूता या तत्वांनी ज्या वेळी चालते त्या वेळी ती खऱ्या अर्थाने सुखकर होते असे भारतीय संस्कृतीत मान्य केले गेले आहे. याच चिंतनातून स्त्री पुरूष समानतेचे तत्व आपण जेव्हा विचारात घेता त्यावेळी पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी कुंचबणा या विषयी विचारमंथन होणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रियांना निसर्गाने काही बाबी दिल्या आहे आणि समाजाकडून काही बाबी तीला प्राप्त झाल्या आहेत. निसर्गाने दिलेल्या बाबी बदलणाऱ्या नाहीत. समाजाने प्रदान केलेल्या बाबींमध्ये काही बाबी सन्माननीय आहेत तर काही बाबी अन्यायकारक आहेत. या बाबी काढून टाकणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवाद ही एक मानवी संबंधाच्या मूळापासून वेध घेणारी राजकीय विचारप्रणाली आहे. स्वातंत्र्य, समता व बंधूता या मूल्यावर आधारित नवसमाज निर्मितीच्या आड येणारी शोषणाची कारणे शोधणे आणि स्त्री अस्मितेची जाणीव करून देणे हे स्त्रीवादाचे स्वरूप आहे.

19 व्या आणि 20 व्या शतकाच्या पूर्वार्धात ज्या स्त्रीवादी चळवळी झाल्या त्यास स्त्रीवादाचा पहिला प्रवाह म्हटला जाते. यात प्रामुख्याने इंग्लंड आणि अमेरिका येथून मताधिकार व लैंगिकता, प्रजनन आणि आर्थिक हक्काची मागणी या विषयी स्त्रीवादी चळवळीची सुरूवात झाली म्हणजा येईल. 20 व्या शतकाच्या मध्यापर्यंत सामाजिक, सांस्कृतिक असमानतेच्या संदर्भात आवाज उठवला गेला. पाश्‍चात्य स्त्रीवादापेक्षा भारतीय स्त्रीवाद वेगळया स्वरूपात पाहता येतो. भारतात धर्म चिकित्सा व सुधारणेच्या युगात ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, रामकृष्ण मिशन, सार्वजनिक सत्यधर्म या सर्व संस्थांच्या माध्यमातून स्त्रियांवर धर्माच्या आधारे होणारे अत्याचार, सामाजिक दुरावस्था दूर करण्याचे कार्य प्रथमत: भारतातील समाजसुधारकांनी केले. भारतीय धर्मावर आधारित सामाजिक स्वरूपाच्या अनिष्ठ प्रथा निर्माण झाल्या म्हणजेच सती प्रथा, विधवा विवाहाला बंदी, केशवपन, बालविवाह अशा अनिष्ठ प्रथेविरूद्ध पहिल्यांदा भारतामध्ये पुरूषांकडून पुढाकार घेतला गेला आहे. त्यामध्ये राजाराम मोहन रॉय, गोपाळ हरी देशमुख, महात्मा फुले, रानडे, आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे व काही

त्यांच्या कुटुंबातील महिलांनी उदा. सावित्रीबाई फुले पंडीता रमाबाई, ताराबाई शिंदे अशा महिलांनी सुद्धा भाग घेतला आहे. भारतातील स्त्रीवादी समाजसुधारकांनी स्त्रीच्या शिक्षण आणि स्त्री-पुरूष समानता यावर आधारित प्रसार केलेला दिसून येते. भारतातील स्त्रियांवर होणारे अन्याय, अत्याचार, स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक, स्त्रियांना असलेल्या अधिकारांची जाणीव करून देणे याकरिता भारतातील स्त्रीवादी चळवीळीत ज्यांनी योगदान दिले आहे त्याचा आढावा घेणे योग्य वाटते.

**मुख्य टीप :**

स्त्रीवादी चळवळ ही स्त्रीवादाच्या सैद्धांतीक / तत्वज्ञानाच्या विचारांचा विस्तार अ्राहे. स्त्रीवादी चळवळीच्या माध्यमातून लिंगभाव असमानता जाणून घेणे, स्त्रियांच्या हक्कांवर भर देणे, स्त्री-पुरूष यांच्यात सामाजिक, आर्थिक व राजकीय समानता आणणे,

**स्त्रीवादाचा अर्थ :**

स्त्रियांचे हक्क आणि अधिकार यांचे समर्थन करणारा विचार प्रवाह होय. भारतातील समाजव्यवस्थेत असलेली असमानता दूर करण्याच्या मानसिकतेने संघटित झालेला समूह म्हणजे स्त्रीवाद होय.

1) सुमती लांडे "स्त्री पुरूषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुर्नविचार म्हणजे स्त्रीवाद होय".

2) डेल्मर "स्त्री-पुरूष संबंधातील परस्पर विरोधात स्त्रीवादी चळवळ निर्माण झालेली आहे. आपल्यावर होणाऱ्या जुलुमाविरूद्ध स्त्रीने केलेला प्रतिवाद म्हणजे स्त्रीवाद होय."

3) विद्युत भागवत "स्त्रीवाद ही संकल्पना स्त्रियांच्या समस्यासंबंधी सर्वसमावेशक अशी मांडणी आहे."

4) विद्या बाळ "स्त्रीवर ती केवळ एक स्त्री आहे म्हणून लादलेल्या बंधनापासून स्त्रियांची मुक्ती करणे म्हणजे स्त्रीवाद होय."

5) रजिया पटेल "स्त्रियांना स्वतंत्रपणे आपल्या हक्कासाठी, आत्मसन्मानासाठी लढा देणे म्हणजे स्त्रीवादी होय."

स्त्री-पुरूष यांच्या भेदातून निर्माण होणारी, समाजातील भेदात्मक नियमातून निर्माण होणारी लिंगभेदात्मक असमानतेची दरी, यातून निर्माण होणारे स्त्रीविषयक प्रश्न, स्त्रियांना दिली जाणारी दुय्यम वागणूक या विरूद्ध संघटितरित्या केलेला संघर्ष, प्रतिवाद म्हणजे स्त्रीवाद होय.

**अभ्यासाची उद्दिष्ट्ये :**

1) स्त्रीवादी विचारधारा याचा आढावा घेणे.
2) स्त्रीवादी चळवळींचा उदय व विकासाचा अभ्यास करणे.
3) स्त्रीवादाचा अर्थ जाणून घेणे.
4) भारतातील स्त्रीवादी चळवळीचा आढावा घेणे.
5) स्त्रीवादी चळवळीच्या यथापयशाची कारणे शोधणे.

**स्त्रीवादी चळवळीचा उदय व विकास :**

पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये स्त्रीवादी विचार 18 व्या शतकापासूनच मांडण्यात आले. विशेषत: 1792 मध्ये मेरी वुलस्टन क्राफ्ट यांनी Vindication on the Rights of Women (स्त्रियांच्या हक्काची पायमल्ली) हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यांनी या ग्रंथात स्त्रियांच्या खालावलेल्या हीन दर्जाविषयी माहिती समाजापुढे ठेवून स्त्रियांना पुरूषाप्रमाणे शिक्षण व चांगली वागणूक मिळाली पाहिजे. म्हणजे त्या कार्यक्षम, उत्तम नागरीक बनू शकतील असे मत मांडले. 1869 साली जॉन स्टुअर्ट मील यांनी "Subjection of Women" या ग्रंथात स्त्री स्वातंत्र्य चळवळीचे समर्थन करून स्त्री शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहे. विवाह संस्था, कुटुंबसंस्था व पारंपरिक भूमिकेचे उदात्तीकरणास

मिल यांनी विरोध केला आहे. विवाह संस्थेच्या माध्यमातून स्त्रीच्या स्वातंत्र्य, समता व व्यक्तीत्वाची उपेक्षा होऊन तिला गुलामासारखे जगणे भाग पडले आहे यास मील यांनी विरोध केला आहे.

अमेरिकेत 1848 मध्ये स्त्रियांच्या नेत्या एलीझाबेथ कॅंडी स्टॅटन आणि ल्युकेशिया मॉट यांनी न्यूयॉक येथे स्त्रियांचा एक भव्य मेळावा भरवीला होता. या मेळाव्यात स्त्री स्वातंत्र्याविषयी सेनेका फॉल्स जाहीरनामा प्रसिद्ध केला. हा जाहीरनामा स्त्री हक्क चळवळीतील एक अत्यंत महत्त्वाचा दस्तावेज मानला जातो. संपत्तीचा वाटा, घटस्फोटाचा हक्क, व्यवसाय स्वातंत्र्य, समान व योग्य वेतन इत्यादी स्वातंत्र्याविषयी मागण्या या जाहीरनाम्यात करण्यात आल्या. 1866 मध्ये स्त्री कार्यकर्त्यांनी मताधिकारासाठी लढा दिला असता, केवळ कृष्णवर्णीयांना मताधिकार मिळाला. त्यामुळे स्त्री मताधिकाराची चळवळ सुरू राहिली. तेव्हापासून 1920 पर्यंत स्त्रियांनी मताधिकारसाठी संघर्ष केला आणि 1920 पासून स्त्रियांना मताधिकार मिळाली.

अमेरिकन राज्यक्रांती व फ्रेंच राज्यक्रांतीमुळे 18 व्या शतकात फ्रान्समध्ये स्त्री हक्क चळवळीस चालना मिळाली. फ्रान्समधील स्त्रियांनी जास्तीत जास्त मानवी हक्काची मागणी केली. फ्रेंच स्त्रीवादी विदुषी सिमॉन दि बोव्हा यांनी The Second Sex या ग्रंथात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारावर भाष्य केले. स्त्री-पुरूषांत शारीरिक भेद कसे आहेत व त्या बरोबरच त्याला सांस्कृतिक भेद कसे चिकटलेले असतात हे स्पष्ट केले आहे. स्त्री-पुरूष भेदाबाबत असे म्हणतो की, “कोणी स्त्री म्हणून जन्माला येत नाही, तर नंतर ती स्त्री बनविली जाते.

हेलेन सिक्सन यांनी des-demmes या ग्रंथात स्त्रीवादाचे विश्लेषण केले आहे. पुरूषाचे वर्चस्व, स्त्रियांचे गौणत्व अशा पारंपरिक विचारसरणीचा उलगडा केला आहे. जीवन, सत्ता, आणि उत्साह यांचा स्त्रोत म्हणजे स्त्री स्वातंत्र्य होय. स्त्रीवादी विचारवंत मोनिका थ्रेलकॉल यांनी स्नेनमधील स्त्रीवादी राजकारण आणि सामाजिक बदल या लेखात स्पेनमधील स्त्रीवादी चळवळीचे स्वरूप आणि कार्य यांचे स्पष्टीकरण केले आहे. ल्यूसी कॉमिसार यांनी Feminism या ग्रंथात स्वीडनमधील स्त्री हक्क चळवळीचे कार्य स्पष्ट केले आहे. स्वीडनमध्ये लिंगभेदाचे उच्चाटन झाल्यामुळे स्त्री-पुरूष समतेचे तत्व प्रत्यक्षात आले.

**भारतातील स्त्रीवादी चळवळ :**

हिंदू समाजातील अनिष्ट प्रथेविरोधात प्रथमत: राजाराम मोहन रॉय यांनी 1815 मध्ये आत्मीक सभा स्थापन करून सती प्रथेविरूद्ध सुधारणा चळवळ सुरू केली. त्यानंतर 1818 मध्ये बंगालमध्ये सती पद्धतीवर बंदी घालण्यात आली. त्याचवेळी ब्राह्मो समाजाच्या सदस्यांनी लेडीज सोसायटी स्थापन करून स्त्री शिक्षणाची सुरूवात केली. बाळशास्त्री जांभेकर आणि विष्णूशास्त्री पंडीत यांनी स्त्री स्वातंत्र्याविषयी आपल्या शतपत्रे, दर्पण, प्रभाकर या वृत्तपत्राद्वारे विचार मांडले. स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा फुले यांनी 1848 साली पुणे येथील मुलींचा पहिली शाळा स्थापन केली. सत्यशोधक चळवळी द्वारे सामाजिक अन्याय व धर्माच्या नावावर चालणारे शोषण या विरूद्ध आवाज उठविला. पुढे 19 व्या शतकाच्या उत्तरार्धात ताराबाई शिंदे यांनी स्त्रियांवरील अन्याय, बालविवाह, विधवा पुनर्विवाह या संबंधीचे विचार मांडले. 1882 साली त्यांनी स्त्री-पुरूष तुलना हे पुस्तक लिहून पुरूषी वर्चस्वावर प्रखर टीका केली. 1899 साली पंडीता रमाबाई यांनी बालविववाहसारख्या अनिष्ट चालीरितीपासून सुटका करण्यासाठी विधवांना शिक्षण देण्याचे कार्य केले. 1920 ते 1947 हा कालखंड स्त्री हक्क चळवळीच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांमध्ये सामाजिक व राजकीय हक्कांची जाणीव निर्माण करून देण्याचे कार्य केले. त्यांनी हिंदू स्त्रियांची उन्नती, अवनती, जातीसंस्थेचे उच्चाटन या ग्रंथातून त्यांनी आपली तात्वीक भूमीका मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाद्वारे स्त्रियांना मूलभूत हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबर दलित स्त्रियांना समाजकारणात व राजकारणात लढण्याची, समतेची, स्वातंत्र्याची प्रेरणा दिली.

महात्मा गांधीजींच्या राजकीय क्षीतीजावरील उदयानंतर स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय सहभागाला एक वेगळे परिमाण प्राप्त झाले. स्त्रिया निर्भय होण्यासाठी स्त्रियांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात येऊन कार्य केले पाहिजे. महात्मा गांधीजीनी राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांना मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेतले. सामाजिक व राजकीय जागृतीमुळे स्त्रियांच्या संघटना उभ्या राहिल्या. यातून 1924 साली अखिल भारतीय महिला परिषद स्थापन झाली.

1975 ते 1985 हे दशक यूनोने आंतरराष्ट्रीय महिला दशक जाहीर केले. दरम्यान पाश्चात्य स्त्रीवादाचा प्रभाव भारतीय स्त्रियांवर काही अंशी झाला. त्यामुळे भारतीय स्त्री हक्क चळवळ 1975 नंतर अधिक गतीशील झाली. संपूर्ण देशभर स्त्री संघटना कार्यरत झाल्या. महिला दक्षता समिती, स्त्री संघर्ष समिती, स्त्री उवाच बलात्कार विरोधी मंच, नारी समता मंच, युवा संघर्ष वाहीनी, तलाकमुक्ती मोर्चा, चिपको आंदोलन समिती, विमोचन, श्रमिक मोर्चा, स्त्री शक्ती संघटना, मोलकरीण संघटना, समाजवादी महिला गट इत्यादी महिला संघटना कार्यरत आहेत. या संघटनेचे जाळे भारतभर पसलेले आहेत. भारतातील सर्वच ठिकाणी स्त्रियांच्या संघटना कृतीशील आहेत. या संघटनांमधून स्त्रियांची चळवळ उभी राहिल. मधून मधून सामूहीक पातळीवर आणि बहुतांश वेळी स्वतंत्रपणे या संघटना कार्यरत असतात. त्यांनी स्त्रियांवरील अत्याचाराचा प्रश्न या संदर्भात बायकांना केली जाणारी मारहाण, बलात्कार, हुंड्यापायी होणारे खून, मुलीचे गर्भपात, वेश्या व्यवसाय इत्यादी प्रश्नांवर सती संघटना आवाज उठवितात. स्त्रियांच्या आर्थिक प्रश्नासंदर्भात, कामाच्या ठिकाणी समान प्रतिष्ठा, कार्यालय व कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेची हमी, समान कामाला समान दाम, पाळणा घरासारख्या खास सोयीची मागणी, बाळंतपणाच्या रजेची काटेकोरपणे अंमलबजावणी व त्यात मुदतवाढ इत्यादी प्रश्न हाती घेतलेले दिसतात. स्त्रियांच्या आरोग्याचा प्रश्न, स्त्रियांना स्वत:च्या शरीराच्या रचनेचे प्रक्रियेचे भान करून देणे, आरोग्य शिक्षण, कॉस्मेटीकच्या अती वापराने उद्भवणारे प्रश्न इत्यादी विषयाचा आंतरभाव होतो. स्त्रियांचे कायदेशीर व घटनात्मक हक्क, वारसा आणि संपत्तीचे हक्क, पोटगी, हुंडाविरोधी चळवळ, सती, जुबानी तलाक, देवदासी यासारख्या अनिष्ठ प्रथांच्या विरोधात स्त्री संघटना जाणीव जागृतीला महत्त्व देतात. घरकाम करणाऱ्या मोलकरणी यांची संघटना, आशा वर्कर म्हणून काम करणाऱ्या आरोग्य सेविका, अंगणवाडी, बालवाडी व प्राथमिक शाळेत खाऊ शिजवणारी महिला कर्मचारी वर्ग, खाजगी काम करणाऱ्या महिलांच्या अनेक प्रश्नावर महिला संघटना कार्य करताना दिसून येतात.

**सारांश :**

भारतातील स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास करताना भारतामध्ये विकसीत झालेल्या स्त्रीवादाच्या दृष्टीने ज्यांनी ज्यानी लिंगभाव या विषयी चिंतन केले त्यांच्या विचाराच्या अभ्यासाची गरज आहे. भारतातील जो मुख्य प्रवाहातील स्त्रीवाद होता तो म्हणजे स्त्री आणि पुरूष यातील समानता आणता येईल या विषयी होता. भारतातील सामाजिक संघटनेच्या कृतीवर विचारमंथन करणारा स्त्रीवाद आहे. भारतीय स्त्रीवादाचा विचार करत असताना फुले, शाहू, आंबेडकर, आगरकर, ताराबाई शिंदे, पंडीता रमाबाई यांचा विचार महत्त्वाचा ठरतो. 1970 च्या दशकात भारतीय समाज व्यवस्थेमध्ये खाजगी व सार्वजनिक जीवनात होणारे शोषणाच्या पार्श्वभूमीवर अनेक संघटना व गट स्थापन झालेल्या आहेत. 1974 मध्ये “भारतीय समाजातील स्त्रियांच्या दर्जा समानतेच्या दिशेने” या अहवालाद्वारे असे निदर्शनास आणले गेले की, खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात सर्वच स्तरावर स्त्रियांचा दर्जा दुय्यम आहे. 1999 च्या दशकात दलित, आदिवासी, मुस्लीम स्त्रियांकडून त्यांच्या स्त्री संघटनेकडे अनेक प्रश्न उभे केले आहेत. 20 व्या शतकात मुख्य प्रवाहातील स्त्रीवादी चळवळीमध्ये फूट पडून अनेक संघटना निर्माण होताना दिसतात. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातील आर्यवादी स्त्री चळवळीचे स्वरूप बदलून आज बहुजनवादी स्त्रीवादी संघटना उदयाला आलेल्या दिसतात. भारतात स्त्रियांनी आपले विविध प्रश्न सोडविण्यासाठी वेगळया व स्वतंत्र

संघटना स्थापन करून नवीन स्त्रीवादी चळवळ उभी केली. एकंदरीत पाहता भारतातील स्त्रीवादी चळवळीवर पाश्चात्य स्त्रीवादाचा प्रभाव अजूनही दिसून येतो.

**निष्कर्ष :**

1) स्त्रीवाद ही एक विचारधार आहे÷

2) समाजामध्ये स्त्रियांना पुरूषाबरोबर सामाजिक दर्जा प्राप्तीसाठी स्त्रीवादी चळवळ उभी आहे.

3)पाश्चिमात्य स्त्रीवाद हा स्त्रियांचे हक्क व अधिकार याविषयी समर्थन करते.

4)पाश्चिमात्य स्त्रीवादामध्ये तात्वीक आधार आहे.

5)भारतीय स्त्रीवादी चळवळ ही सामाजिक सुधारणेवर आधारली आहे.

6)भारतातील स्त्रीवादी चळवलीच्या नेत्यामध्ये एकवाक्यतेचा अभाव दिसून येतो.

7)भारतातील स्त्रियांच्या वेगवेगळया प्रश्नासंबंधी वेगवेगळया विविध स्त्रीवादी संघटना निर्माण झाल्या आहेत.

8)भारतातील स्त्रीवादी चळवळ बऱ्याचवेळी सुधारणावादी किंवा कल्याणकारी संस्था बनू लागतात.

9)स्त्रियांच्या संघटनामध्ये बहुतांशी उच्च वर्गातील-जातीतील उच्च शिक्षीत आणि शहरी पार्श्वभूमी असलेल्या स्त्रिया जास्त आहेत. त्यांची समाजात वावरण्याची क्षेत्रे मर्यादित असतात.

10)स्त्रीवादी चळवळ ही अजूनही समाजाच्या तळागाळापर्यंत पोहचलेली दिसून येत नाही.

**संदर्भ सूची**

1)भागवत विद्युत - स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन, पुणे.
2)Fireston, Shulamith, The Femine Mytique, Harmondsworth : Penguin Books, 1979, Reprint (1963).
3)Fireston, Shulamith, The Dialetic of Sex : The Cast of Feminist Revolution, Forgmore : Paladin, 1973.
4)विनोबा भावे - स्त्री शक्ती, सर्व सेवा संघ प्रकाशन, वाराणसी, 1982.
5)डॉ. छाया दातार - स्त्री समस्या वैचारिक प्रवास व वादविवाद, नवभारत, मार्च/एप्रिल 2007.
6)माया पंडीत - पाश्चात्य स्त्रीवादी समीक्षा प्रतिष्ठान, जुलै/ऑक्टो. 1994.
7)सदावर्ते प्रीती - स्त्रीवाद एक विचार, स्त्रीवाद शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, 2007.
8)सौ. सुधा रिसबूड - भारतीय स्त्री : एक मीमांसा, स्नेहल प्रकाशन, पुणे, एप्रिल 2013.
9)डॉ. सदानंद मोरे, हिंदू धर्म आणि स्त्री, संदर्भासहीत स्त्रीवाद, शब्द पब्लिकेशन, मुंबई, 2014.
10)मृणाली जोगळेकर - स्त्री अस्मितेचा अविष्कार, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

ISSN : 2278-9308
March, 2022

# मानवी हक्क आणि महिलाचे कायदेविषयक अधिकार

प्रा. लक्ष्मण मारोती घोटेकर
राज्यशास्त्र विभाग, पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविदयालय प्रवरानगर

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकापासून मानवी हक्कांचा किंवा मानवाधिकारांचा जोरदार पुरस्कार केला जाऊ लागला आहे. मानवी हक्क आणि विकास यांचे जवळचे नाते आहे. सामान्य लोकांमध्ये मानवी हक्कांबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी व विकासाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहणे हे आजच्या काळात आवश्यक आहे. समाजातील सर्व घटकांमध्ये स्वतःच्या हक्कांविषयी जाणीव निर्माण करणे यामध्ये विशेषतः स्त्री-पुरुष, विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, सर्वसामान्य नागरिक, शासन कर्ते, युवक, कामगार अशा सर्व समावेशक दृष्टीकोनातून मानव अधिकार विचार केला जातो. मानवी हक्कांबद्दल संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासूनच विशेष महत्त्व देण्यात येऊन लागले आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनद मध्ये मानवी हक्क' व 'मुलभूत स्वातंत्र' यांचा आग्रह धरण्यात आला असून त्याच्या स्थापनेसाठी प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यामुळे मानवी हक्काचे महत्त्व अधोरेखित होण्यास खूप मदत झाली आहे. मानवी हक्क हे मानवाच्या जीवनाचे अविभाज्य भाग आहेत. प्रत्येक व्यक्तीला 'मनुष्यप्राणी' या नात्याने हे हक्क नैसर्गिकरित्या प्राप्त झाले आहेत. म्हणून मानवी हक्काशिवाय कोणत्याही व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घेणे शक्य होणार नाही. इतकेच नव्हे तर हक्काशिवाय व्यक्तीला चांगल्या प्रकारचे जीवन जगणेही शक्य होणार नाही. अशा सर्व गोष्टींचा विचार करून संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १० डिसेंगर १९४८ ला मानवी अधिकारांचा जाहिरनामा घोषित केला.

**हक्क म्हणजे काय ?**

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून मानवी हक्कांची चर्चा करताना समाजातील सर्वसामान्य व्यक्तीच्या दृष्टिने मानवी हक्कांना महत्त्व का दिले जाते? हे जाणून घेणे जास्त गरजेचे आहे. समाजशास्त्रात हे मान्यच केले आहे की, मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजाचा एक घटक या नात्यानेच आपले सामाजिक जीवन जगत असतो. मानवी जीवनाच्या विविध गरजा या परस्परांबलंबी असतात. व्यक्तीला समाजात राहूनच या गरजांची पूर्तता करणे शक्य होते. मानवाच्या समाजातील वास्तव्यामुळे त्याच्या व्यक्तीमत्त्वाची जडणघडण होत असते. म्हणजेच मानवाचे एका जैविक प्राण्यापासून सामाजिक प्राण्यात रुपांतर होण्याचे कार्य त्याच्या समाजातील अस्तित्वामुळेच साध्य होत असते. यासाठी समाजशास्त्रातील सामाजिकरणाची प्रक्रिया फार महत्त्वाची मानली जाते. समाजीकरणाच्या प्रक्रियेमुळेच मानव समाजशील व्यक्ती बनतो. सामाजिक जीवन जगताना समाज व्यक्तीला स्वैर जीवन जगण्याची परवानगी देत नाही. सामाजिक जीवनाच्या काही अटी व नियम असताना त्यांचे पालन करणे ही समाजातील सर्वच व्यक्तींची जबाबदारी आहे. मानवला आपल्या प्राथमिक किंवा भारताची राज्यघटना व तिच्यामध्ये अंतर्भूत मूलभूत हक कर्तव्ये तसेच राज्याची मार्गदर्शक तत्त्वांच्या अनुषंगाने प्रमाणित चौक अभ्यासावी लागते. भारतीय राज्यघटनेच्या समुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या मसुदा समितीने तयार केलेली २६ नोव्हेंबर १९४९ ला घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र यांनी स्वाक्षरी केलेली व २६ जानेवारी १९५० सा अंमलात आलेली भारतीय राज्यघटना मानवी हक्कांच्या संदर्भातील केवळ भारतच नव्हे तर जगाच्या दृष्टीने महत्वाचा असा दस्तएवज आहे. कारण अमेरिका व आर्यलंड या देशांच्या राज्यघटनेनंतर जगात समान कायदा असलेल्या देशातील व न्याय हक्काचे विधेयक अंतर्भूत असणारी केवळ तिसरी लिखित राज्यघटना होती. मानवी हक्कांच्या संदर्भातून राज्य घटनेचे महत्व अथवा प्रमाणितता घटनेच्या सरनाम्यातूनच स्पष्ट होते. त्याचबरोबर घटनेतील कलम १४ ते ३२ मध्ये स्पष्ट केलेले मूलभूत अधिकार व कलम ५१ (क)मध्ये सांगितलेली मूलभूत कर्तव्ये तसेच कलम ३६ ते ५१ मध्ये स्पष्ट केलेली 'मार्गदर्शक तत्वे' यातून मानवी हक्कांच्या संदर्भातील भारतातील घटनात्मक चौकट स्पष्ट होते.

भारतीय राज्यघटना या घटनात्मक कायद्याबरोबरच मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी भारतात वेळोवेळी अनेक कायदे पारित करण्यात आले आहेत. त्याचबरोबर राष्ट्रीय मानवी हक्क आयोगा'ची स्थापना करून त्याच्या माध्यमातून ही भारतात मानवी हक्कांची जपणूक व संवर्धनाचा प्रयत्न होत आहे. म्हणूनच भारतातील मानवी हक्कांच्या संदर्भातील प्रमाणित चौकट व अमलबजावणी यांचा अभ्यास करताना यासंदर्भातून घटनात्मक चौकट तिच्यातील मूलभूत अधिकार, मूलभूत कर्तव्ये आणि त्यांच्यातील अंतरसंबध तसेच राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचा अभ्यास करावा लागेल. त्याच बरोबर मानवी हक्कांच्या संरक्षणासाठीचे विशेष कायदे व मानवी हक्कांच्या अंमलबजावणीसाठीच्या राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाचा अभ्यास करावा लागेल.

**मानवी हक्कांना कायदेशीर संरक्षण विशेष कायदे ( Statutory Protection of Human Rights Special laws)**

अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या प्राथमिक गरजा आहेत. अलिकडे शिक्षण व आरोग्य या गरजाही प्राथमिक गरजा म्हणून मानल्या जातात. या गरजा तसेच याशिवाय इतर काही गरजा आहेत की ज्यांची पूर्तता होणे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असते. या सर्व गरजांचा विचार करता त्यांची विभागणी शारीरिक गरजा, मानसिक गरजा, सामाजिक गरजा व आर्थिक गरजा अशी करता येईल. या सर्व गरजा परस्पर सहकार्यातून, परस्परावलंबनातून व एकूणच समाजाकडून होणे अपेक्षित व आवश्यक असते. तो प्रत्येक व्यक्तीचा हक्क असतो. कारण प्रत्येक व्यक्तीला व्यक्ती म्हणून जन्मतः काही हक प्राप्त झालेले असतात. हेरॉल्ड लास्की म्हणतात, 'ज्या परिस्थितीच्या घटकांशिवाय व्यक्तीला आपली सर्वागिण प्रगती साध्य करता येत नाही, त्या परिस्थितीच्या घटकांना मानवी हक्क असे म्हणतात."

थोडक्यात सर्व व्यक्तींना व्यक्ती म्हणून मानवी हक प्राप्त असतात, परंतु लिंग, वय, धर्म, वंश, जात इत्यादी भेदभावामुळे प्राप्त मानवी हक्क सर्वजण उपभोगू शकत नाहीत. यामध्ये स्त्रिया, बालके, वृद्ध, कामगार, कैदी, अपंग व्यक्ती इत्यादींच्या प्रामुख्याने समावेश होतो. या घटकांच्या बाबतीत होणाऱ्या मानवी हक भंगाच्यामुळे त्यांना व्यक्ती म्हणून किमान जीवन जगता येत नाही. व्यक्ती म्हणून जगण्याचा विकास पावण्याचा अधिकारच नाकारला जातो. म्हणूनच प्रत्येक व्यक्तीला प्राप्त मानवी हा त्याला खरोखरीच उपभोगता यावयाचे असतील, त्या मानवी हक्कांचा भंग व्हायचा नसेल तर त्यांसाठी कायद्याची आवश्यकता भासते. कारण, कोणत्याही मानवी हकाची प्रत्यक्ष अंमलबजावणी अथवा उपभोग क्षमता ही त्या हक्कांना कायद्यामध्ये विकसीत करण्यावर अवलंबून असते. म्हणूनच बेन्थम यांच्या मते, 'कायदद्याने मान्य केलेली, स्वीकृती दिलेली व्यक्तीची मागणी म्हणजे अधिकार होय. म्हणूनच मानवी हक्कांना कायद्याचे संरक्षण, पाठबळ प्राप्त होणे आवश्यक असते. म्हणूनच मानवी हक्कांच्या घटनात्मक संरक्षणासंबंधी भारतात विशेष कायदे करण्यात आले आहेत ते पुढीलप्रमाणे:

**मानवी हक्कांच्या घटनात्मक संरक्षणासंबंधी भारतातील विशेष कायदे -**

भारतात मानवी हकांच्या घटनात्मक संरक्षणासंबंधी अनेक कायदे करण्यात आले आहेत. विशेषतः स्त्रीया, बालके, कामगार, अपंग, वृद्ध, अल्पसंख्यांक इत्यादी घटकांच्या हक्कांची पायमल्ली होण्याचे जास्त प्रमाण लक्षात घेता त्यासंदर्भात विविध कायदे करण्यात आले.

**अ) महिला संदर्भातील विशेष कायदे -**

केवळ भारतातच नव्हे तर जागतिक स्तरावर स्त्री-पुरुष असा लिंगभेद करून 'स्त्री' ला केवळ 'स्त्री' आहे म्हणून अनेक मानवी हक्कापासून वंचित ठेवले जाते. तिच्या मानवी हक्कांची पायमल्ली केली जाते. म्हणूनच भारतात यासंबंधी अनेक कायदे करण्यात आले आहेत.

**१. सतीप्रथा बंदी कायदा १८२९**

सतीप्रथेने विधवा स्त्रीला जगण्याचाच अधिकार नाकारला होता. या अमानवी प्रथेविरुद्ध राजाराम मोहन रॉय यांनी जनआंदोलन सुरू केले. या प्रथेला धार्मिक आधार नसल्याचे सांगितले. ब्रिटिश शासनाचे या अमानवी प्रथेकडे लक्ष वेधले. लॉर्ड विल्यम बेंटिकने १८२९ ला सतीप्रथाबंदी कायदा प्रथम संमत केला. या कायद्यानुसार पती निधनानंतर त्याच्या पत्नीला म्हणजे विधवेस सती जाणे, तिला सती जाण्यास भाग पाडणे, सतीप्रथा चालू रहावी तसेच सती जाण्यास कोणत्याही प्रकारची मदत करणे, विधवेस सती जाण्यास प्रवृत्त करणे इत्यादी कृत्य बेकायदेशीर ठरवून ही प्रथा कायद्याने बंद केली.

**२. हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८८६**

हिंदू स्त्रीस पती निधनानंतर सती जाणे किंवा त्याची विधवा म्हणून उर्वरीत आयुष्य जाणे, तेही केशवपन करुन, त्याच बरोबर अनेक बंधने तिच्यावर लादली जात व त्या बंधनात आयुष्य जगणे क्रमप्राप्त ठरत. विधवेचे आयुष्य म्हणजे पदोपदी वेदना, अपमान, छळ इ. भरलेले असे. माणूस म्हणून जगण्याचा अधिकारच हिरावला जात असे. १८८६ ला 'हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा १८८६ नुसार विधवा स्त्री व तिच्या आई-वडीलांना विधवेच्या पुनर्विवाहासंबंधी काही अधिकार देण्यात आले. या कायद्याने हिंदू विधवा स्त्रीस पुनर्विवाहाचा अधिकार प्राप्त झाला. यातून जन्मलेल्या संततीस कायदेशीर मान्यता देण्यात आली. स्त्री अज्ञानी व पहिल्या पतीबरोबर शारिरीक संबंध आले नसतील तर पुनर्विवाहासाठी आई, वडिल इ. जवळच्या नातेवाईकांची संमती आवश्यक मानली गेली तर ती सज्ञान असेल व प्रथम पतीबरोबर शारिरीक संबंध आले असतील तर ती स्वइच्छेने इतरांच्या संमतीशिवाय पुनर्विवाह करू शकेल इत्यादी.

**३.विवाह प्रतिबंधक कायदा**

भारतात बालविवाहाची प्रथा मोठ्या प्रमाणात होती. मुला-मुलींची सहाख्या, सातव्या वर्षातच नव्हे तर अगदी पाळण्यातही विवाह लावले जात असत. या प्रथेचा विपरीत परिणाम स्त्रीच्या आरोग्यावर होत असे. म्हणून

प्रथम १८७२ ला बालविवाह प्रतिबंधक कायदा करून विवावाहाची वयोमर्यादा मुलीस १४ व मुलांस १८ वर्ष करण्यात आली. पुन्हा १९२१ ला ती १२ करण्यात आली. यावरती उमटलेल्या तीव्र प्रतिक्रिया मुळे पुन्हा ती १४।१८ कायम केली. १९२९ ता पुन्हा यासंबंधी कायदा करण्यात आला. नंतर १९७८ स्वतंत्र भारतात यासंबंधीचा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार मुलीचे १८ व मुलाचे २१ अशी वयोमर्यादा करण्यात आली. तसेच या वयोमर्यादेचा भंग करणारा विवाह बालविवाह समजण्यात आला. यासंबंधीत पालकांना त्यासाठी कायद्याने जबाबदार धरण्यात आले.

**४. हिंदु उत्तराधिकारी कायदा १९५६ :**

हिंदू स्त्रीयांना कायद्याने मालमत्तेत वाटा अथवा अधिकार या कायद्याने प्राप्त झाला. या कायद्यानुसार स्त्रीला आई, पत्नी व मुलगी म्हणून संपत्तीत समान वाटा मिळाला. पत्नीस तिच्या मृत पतीच्या संपत्तीत वाटा मिळालाच. शिवाय मृत मुलाच्या आईस तिच्या विधव सून व नातवंडाच्या बरोबरीने वाटा मिळाला. तसेच वडिलांच्या संपत्तीत त्यांच्या मुलींनाही वाटा मिळाला.

**५. हिंदू दत्तक आणि पालनपोषण कायदा १९५६**

या कायद्यानुसार मुलाप्रमाणेच मुलीलाही दत्तक घेता येऊ लागले. विधवा स्त्री ही एखाद्याला आपला वारस म्हणून दत्तक घेऊ शकेल, तसेच स्त्री व पुरुष अशा दोघांनाही मुलांच्या पालनपोषणाचा अधिकार समान असेल. त्याचबरोबर पत्नी, विधवा मुलगी, वृद्ध आई-वडील, अज्ञान मुले आणि आश्रित व्यक्तींनाही मालमत्तेत वाटा याकायद्यानुसार मिळू शकतो.

**६. अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा १९५६**

या कायद्यानुसार मुलींचा अनैतिक व्यापार व वेश्याव्यवसाय हा गुन्हा मानण्यात आला. यामध्ये वेश्यावृत्तीला स्विस तयार करणे, प्रोत्साहन देणे, यांचा समावेश होतो. यासाठी कैद व आर्थिक दंड अशी शिक्षेची तरतूद या कायद्यात आहे.

**७. हुंडा प्रतिबंधक कायदा १९६९**

भारतात समाज मग तो शहरी असो किंवा ग्रामीण, अशिक्षित असो किंवा सुशिक्षित, उच्चवर्गीय असोत किंवा कनिष्ठ या सर्वात विवाहावेळी वधूपक्षाकडून वरपक्षाला रोख रक्कम, सोने, इतर संपत्तीच्या स्वरुपात जी संपत्ती द्यावी लागते, त्या प्रवेस हुंडा प्रथा म्हणतात. या प्रथेमुळे वधूपक्षाचे शोषण व वधूचा छळ मोठ्या प्रमाणात होत होता आहे. अशा स्वरूपाच्या शोषणाला प्रोत्साहन देणाच्या कारण ठरणाऱ्या प्रथेला नष्ट १९८१ हा कायदा आला. त्यानुसार हुंडा घेणारा व हुंडा देणारा अशा दोघांना अपराधी मावण्यात आले व शिक्षेची तरतूद करण्यात आली.

**८. मातृत्वविषयक कायदा १९२९**

स्त्रयांना व्यवसाय घरकाम करून करावी लागते. यातच ती गरोदर असेल तर तिला आवश्यक पुरेशी विश्रांती व सुरक्षितता मिळाली नाही. तिच्या व तिच्या बाळाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. अनेकदा ते दगावतात. हे होऊ नये म्हणून हा कायदा संमत केला गेला. या कायद्यानुसार स्वीला प्रसुतीपूर्व व प्रसूतीनंतर पगारी रजा दिली जाईल. हा कालावधी संपल्यानंतर (सहा-सहा आठवड्यांचा) आठ आठवड्याची संगोपन रजाही मिळेल. शिवाय स्त्रीचा गर्भपात होऊन ती आजारी पडल्यास एक महिन्याची रजा मिळेल. प्रसूतीपूर्व नंतर वैद्यकीय सेवा सुविधा मोफत दिली जाईल. स्त्री बाळंतपणाच्या रजेवर असताना तिला नोकरीवरून कमी करता येणार नाही. तसेच गर्भवती स्त्रीच्या आरोग्यावर व गर्भावर विपरित परिणाम होईल असे काम तिला देण्यास या कायद्याने प्रतिबंध केला. १९६१ ता प्रसूतिविषयक सहाय्य कायदा सुधारीत स्वरूपात संमत झाला.

**९. कारखाना कायदा १९४८**

या कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांच्या हक्कांच्या संरक्षणाची काळजी घेण्यात आली आहे. या कायद्यानुसार कामाच्या ठिकाणी तीस किंवा तीसपेक्षा जास्त स्त्री कामगार असतील तेथे स्वतंत्र पाळणाघराची व्यवस्था, स्त्रियाकरिता स्वतंत्र स्वच्छता गृहाची व्यवस्था बंधनकारक करण्यात आली. स्त्रियांची कामाची वेळ सकाळी नऊ ते संध्याकाळी सात या दरम्यानची असावी. एकूण नऊ तासापेक्षा जास्त काम त्यांना देण्यात येऊ नये. स्त्री कामगारांना अशा प्रकारे संरक्षण इतर अनेक कामगार कायद्यातून देण्यात आले आहे. उदाः मळे व्यावसायविषयक कायदा १९५१ इ.

**१०. जन्मपूर्व निदान तंत्रज्ञान**

नियमन व गैरवापरास प्रतिबंध कायदा १९९४ देशात मुलींचा जन्मदर सातत्याने घटत होता. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भलिंग चाचणी घेतली जाऊन मुलगी असेल तर तिला जन्मापूर्वीच मारले जाते. यासाठी हा कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार गर्भवती महिलेस सोनोग्राफी सेंटरमध्ये नेऊन मुलगा की मुलगी आहे हे

पहाणे, हे पाहण्यासाठी गर्भवती स्त्रीवर दबाव टाकणे, तिचा छळ करणे इ. गुन्हा समजण्यात आला. या कृत्यामध्ये सामील सर्वांना शिक्षेची तरतूद आली. २० सप्टेंबर १९९४ ला हा कायदा संपूर्ण देशात लागू केला तरी महाराष्ट्रात मात्र तो पूर्वीच १९८८ ला लागू करण्यात आला होता. हा कायदा लागू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य.

**११. महिला संरक्षण अधिनियम २००५ (कौटुंबिक हिंसाचार कायदा)**

देशात घरगुती हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांची संख्या खूपच जास्त आहे. बलात्कार, पत्नीला मारहाण हुंडाबळी, शारिरीक व मानसिक छळ यांना तिला सामोरे जावे लागते. देशात तब्बल ३७% महिला बळी पडताता. घरगुती हिंसाचारापासून स्त्रियांना संरक्षण प्राप्त व्हावे म्हणून हा कायदा आला. या कायद्यानुसार स्वीचा शारिरीक, लैंगिक, मानसिक, शाब्दीक, भावनिक, आर्थिक छळ करणे, छळाची धमकी देणे म्हणजे कौटुंबिक हिंसाचार मानण्यात येतो. यानुसार असा हिंसाचार करणाऱ्या व्यक्तीला शिक्षा व आर्थिक दंडाची तरतूद आहेच. शिवाय या कामी नियुक्त सुरक्षा अधिकाऱ्याने कामात कसूर केल्यास त्यासही कैद व आर्थिक दंडाची शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

**१२. बलात्कार विरोधी कायदा २०१२**

या कायद्यानुसार १८ वर्षांखालील मुलीवर बलात्कार केल्यास १० वर्षे ते जन्मठेप व दंड, सामुहिक बलात्कार केल्यास २० वर्षे ते जन्मठेप व दंड, सार्वजनिक जागी विवस्त्र केल्यास तीन सात वर्षे व दंडाची शिक्षेची तरतूद असून बलात्काराचा दुसऱ्यांचा गुन्हा केला असल्यास जन्मठेप किंवा फाशीची शिक्षा देण्यात येते. तसेच या गुन्ह्यातील पिडीत महिलेची साक्ष व उलटतपास गुन्हेगाराची तपास, उलटतपास याबाबत अनेक नवीन तरतुदी करण्यात आल्या.

**१३. लैंगिक छळ विरोधी नवीन कायदा २०१३**

कामाच्या ठिकाणी स्त्रीवर होणाऱ्या लैंगिक छळाच्या विरोधी हा कायदा असून, शारिरीक संपर्क व प्रणयचेष्टा, लैंगिक सुखाची मागणी विनंती, अश्लील साहित्य प्रदर्शन, अश्लील शेरेबाजी व हावभाव याबरोबरच तिला त्यासाठी आमिष दाखवणे अथवा धमकावणे यास लैंगिक छळवार समजण्यात येते. त्यासाठी वरील वेगवेगळया प्रकारच्या गुन्ह्यासाठी वेगवेगळया शिक्षा व दंडाची सोय करण्यात आली आहे. एवढेच नव्हे तर कारखाना मालकाने यासंबंधी योग्य ती कार्यवाही व सहकार्य न केल्यास त्याला दंडात्मक शिक्षा होते.

**१४. राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम १९९०**

सन १९९० हा अधिनियम संसदेत समंत होऊन त्यावर राष्ट्रपतींची मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार ३१ जानेवारी १९९० ला राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. या आयोगाला न्यायालयासारखे अधिकार असून कालखंड तीन वर्षाचा असतो. आयोगात एक अध्यक्ष, पाच सदस्य व एक सदस्य सचिव असतो. या आयोगाची प्रमुख कार्ये म्हणजे १. महिला संरक्षणासाठीच्या कायद्याचे परीक्षण करणे व त्रुटी आढळल्यास त्यात संशोधन करण्यास सरकारला साहाय्य करणे. २. महिलांना देण्यात येणाऱ्या कायदेशीर मदतीचा आढावा घेणे, त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासनास सूचना करणे. ३. महिला अत्याचार प्रकारणाचा शोध घेणे व त्याची चौकशी करणे. ४. सुधारगृह, कारागृहातील स्त्रीयांच्या स्थितीची पहाणी, त्यांच्या पुनर्वसन व सुधाराविषयी शिफारस करणे. ५. महिला विकास कार्यक्रम प्रक्रियेत सहभागी होणे इत्यादी.

**१५. महिला हक्क व संविधानातील तरतुदी**

भारतीय संविधानातील मुलभूत हक, मार्गदर्शक तत्त्वे यातून तसेच इतर विविध कलमातून महिला हक्क मेक्षणाची तरतुद घटनाकारांनी केली आहे. त्यातील काही तरतूदी पुढीलप्रमाणे:

१ . कलम १४ नुसार कायद्यासमोर सर्वजण समान असून स्त्री-पुरुष असा भेदभाव केला जाणार नाही. २. कलम १५ नुसार लिंगाच्या आधारे भेदभाव करण्यात प्रतिबंध ३. कलम १६ नुसार नोकरी व सेवा मध्ये स्त्री पुरुषांना समान संधी ४. कलम ३९ (३) नुसार स्त्री व पुरुषांना समान कामासाठी समान वेतन, यामध्ये स्त्री-पुरुष भेदभाव केला जाणार नाही. ५. कलम ५१ अ (क) नुसार स्त्रीयांची अप्रतिष्ठा, अपमान होईल असे वर्तन कोणाही नागरिकांनी करू नये इत्यादी. उपरोक्त कायद्याशिवाय पुढील कायदेही स्त्रीयांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी भारतात करण्यात आले.

१६. महिला हक संरक्षण कायदा १९९०

१७. पंचायत राज्य संस्था व नागरी स्थानिक संस्थात महिलांना १/३ आरक्षण

१८. समान वेतन कायदा १९७६ १९८७

१९. धर्मातरीत व्यक्तीविवाह विच्छेद कायदा १८६६

२०. घटस्फोट कायदा १८६९

२१. मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३

२२. आनंदी विवाह कायदा १९०९

२३. मुस्लीम स्त्री घटस्फोट हक्क संरक्षण कायदा १९८६

२४. महाराष्ट्र देवदासी प्रतिबंधक व निर्मूलन कायदा २००५

२५. मानसिक आरोग्य कायदा १९८७
२६. कुटूंब न्यायालय कायदा १९८४
२७: देवदासी समर्पण प्रतिबंधक कायदा १९९४.

**समारोप**

वरीलप्रमाणे सांगितलेल्या घटनात्मक तरतुदींव्यतिरिक्त स्त्रियांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी त्यांच्यावरील अन्यायाचे करण्यासाठी केंद्र तसेच राज्यशासनानी अनेक कायदे केले आहेत. त्यामध्ये कौटुंबिक मालमत्तेत स्त्रियांना समान स्त्री-पुरुषांना समान कामाबद्दल समान वेतन, हुंडा घेण्यास प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध लैंगिक अत्याचाराविरा प्रसूती काळात स्त्री कर्मचाऱ्यांना रजेचा अधिकार, गर्भलिंग चिकित्सा प्रतिबंधक कायदा, विनयभंग प्रतिबंधक देवदासी प्रथा विरोधी कायदा असे अनेक कायदे केले आहेत. जोडीला महिलांवर होणाऱ्या अत्याचारांची दखल घेण्यासाठी तसेच त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी 1990 साली राष्ट्रीय महिला आयोग स्थापन केला. त्याचप्रकारे महाराष्ट्र शासनाने 1993 साली महाराष्ट्र महिला आयोग स्थापन केलेला आहे. या सर्व कायदेशिर तरतुदी असल्यातरी पुरूषांची मानसिकता बदलण्यासाठी करणे गरजेचे आहे. स्त्री पुरुष समानता पुरुषाच्या मनामध्ये खोलवर रुजली पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

१. नि. सबनिस, मानवी हक्क संरक्षण
२. व्ही. बी. पाटील, मानवी हक्क, के सागर पब्लिकेशन, पुणे
३.चंद्रकांत मिसाळ, मानवी हक्क व जबाबदाऱ्या, व्हिजन पब्लिकेशन, पुणे
४. भारतीय संविधान,समता प्रकाशन नागपूर
5. Devindra Singh, Human Rights in India, Central Law Publication

# महिलाचा राजकीय सहभाग : एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ.बसवेश्वर पांडागळे**
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,ओंदे ता.विक्रमगड जि.पालघर

**प्रस्तावना**

भारतात अगदी प्राचीन काळापासून स्त्रियांना समाजात महत्त्वाचे स्थान आहे ऋग्वेदात महिलांना राजकारणात स्थान असल्याचेही दिसून येते उपनिषद् आणि पुराण काळात ते कायम होते. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात अनेक भारतीय स्त्रियांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवलेला आहे. भारताच्या इतिहासात महिलांचा राजकीय सहभाग होता आणि स्वातंत्र्यानंतरही अनेक महिलांनी राजकारणातील महत्त्वाची पदे भूषविली आहेत. प्राचीन भारतात अनेक गणराज्य होती व त्याचा कारभार स्वतंत्र होता.

इ.स. बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरांनी महानुभाव मंडपाच्या माध्यमातून स्त्रियांना सामाजिक धार्मिक व राजकीय सहभाग दिला होता. व याच काळात राज्यकारभाराची सत्तासूत्रे महिलांच्या हाती गेल्याचेही दिसून येते. याच काळात राणी रझिया ने सत्तेची सूत्रे हाती घेतली होती. सोळाव्या शतकातील आणखी एक नाव म्हणजे राणी चांदबीबी होय. सतराव्या शतकात प्रत्यक्ष राज्यकारभार न करताही राजकारणाला नवी दिशा देणाऱ्या राजमाता जिजाबाई यांचे नाव सुवर्णाक्षरांनी नोंदवावे लागते. त्यानंतर पुण्यश्लोक आहिल्याबाई होळकर व कर्नाटकातील कित्तूरची राणी चन्नम्मा यांची नावे प्राधान्याने येतात.

जगातील अनेक देशात पंतप्रधानांपासून ते अध्यक्ष पदापर्यंत महत्त्वाची पदे महिलांनी भूषविली आहेत. त्यात प्रामुख्याने इंग्लंडच्या मार्गारेट थॅचर, श्रीलंकेच्या श्रीमाओ बदारनायके, चंद्रिका कुमारतुंगा, इस्रायलच्या गोल्ड मीर,पाकिस्तानच्या बेनझीर भुत्तो, बांगलादेशच्या खलिदा जिया,शेख हसीना व म्यानमारच्या आंग सान सू की यांची नावे प्राधान्याने येतात.

स्वातंत्र्योत्तर काळात महिलांचा राजकारणातील सहभाग स्त्री नेतृत्व म्हणून पंतप्रधान इंदिरा गांधी, राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील,काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री मायावती दिल्लीच्या मुख्यमंत्री शीला दीक्षित राजस्थानच्या मुख्यमंत्री वसुंधरा राजे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जयललिता सुषमा स्वराज, लोकसभेच्या पहिल्या महिला सभापती मीराकुमार महिला अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा उल्लेख करावा लागेल. तर महाराष्ट्राच्या राजकारणात मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर प्रभा राव शालिनीताई पाटील, वसुधा देशमुख, शोभाताई फडणवीस, मिनाक्षी पाटील, विमल मुंदडा, सूर्यकांता बाई पाटील, फौजिया खान,पंकजाताई मुंडे,सुप्रिया सुळे पवार, मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर या महिलांनी आपला प्रभाव सिद्ध केला आहे स्त्रियांचा राजकारणातील हा सहभाग पाहिला असता राजकीय पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील महिलांचाच यात सहभाग असल्याचे दिसून येते. परंतु प्रत्यक्षात स्त्रियांचा राजकारणातील सहभाग हा सार्वत्रिकरित्या वाढत नाही हे वास्तव परिस्थिती आहे.

**अभ्यासाची उदिष्टे -**

१.स्त्रियाचा राजकारणातील सहभाग व त्यांच्या भूमिकांचा आढावा घेणे.
२. महिलांमध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक सक्षमीकरणाची जाणीव निर्माण करणे.
३. महिलांचा राजकीय सहभाग वाढावा यासाठी झालेले प्रयत्न व त्यांचा विस्तृत अभ्यास करणे.
४. महिला आरक्षण व महिला सक्षमीकरण यांचा सहसंबंध अभ्यासणे.
५. स्त्री पुरुष समानता राजकारणात कितपत यशस्वी झाली याचा अभ्यास करणे.

भारतात महिलांचा राजकीय सहभाग हा अल्पच राहिलेला आहे. महिलांची एकूण लोकसंख्या व त्यांचा राजकारणातील सहभाग यांचे प्रमाण परस्पर विरुद्ध राहिलेले आहे. महिलांच्या राजकीय सहभागास येथील सामाजिक व आर्थिक परिस्थिती कारणीभूत राहिलेली आहे. महिलांच्या राजकीय सहभागाची सुरुवात भारतात स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या सहभागाने झालेली आहे. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्याच्या आंदोलनात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. सविनय कायदेभंग व भारत छोडो आंदोलनात महिलांचा सहभाग उल्लेखनीय राहिलेला आहे. स्वातंत्र्यलढ्यात पुरुषाच्या बरोबरीने आपली जबाबदारी पार पडणाऱ्या महिला स्वातंत्र्यानंतर मात्र राजकीय क्षेत्रातून पूर्णपणे अलिप्त झाल्याचे दिसून येते.

१९५२ ची पहिली सार्वत्रिक निवडणूक यात २२ महिला प्रतिनिधी निवडून आल्या तर २०१९ च्या १७ व्या लोकसभा निवडणुकीत ७२४ महिला निवडणुकीत उभ्या होत्या. त्यांच्या पैकी ७८ महिला निवडून आल्या

आहेत. लोकसभेच्या एकूण ५४३ सदस्यांपैकी महिला प्रतिनिधींची संख्या ७८ एवढी अल्प आहे. याचा अर्थ महिलांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात संसदेत प्रतिनिधित्व मिळालेले नाही. याचे मुख्य कारण भारतातील अर्थव्यवस्था व राजकीय व्यवस्था आजही महिलांचे नेतृत्व मान्य करण्यास तयार झालेली नाही. महिलांचा राष्ट्र-राज्य सहभाग वाढावा यासाठी १९९६ मध्ये महिला आरक्षण विधेयक मांडले होते परंतु दुर्दैवाने या विधेयकाला अजूनही संसदेची मान्यता मिळालेली नाही. यावरून आपणास पुरुषप्रधान मानसिकताच अधोरेखित होताना दिसून येते. वर्तमान काळातील भारतीय राजकीय परिस्थिती पाहता महिला प्रतिनिधींचे प्रमाण वाढविण्यासाठी त्यांना राजकीय आरक्षण मिळणे काळाची गरज झालेली आहे.

**राजकीय आरक्षण व महिला सक्षमीकरण**

महिलांच्या सक्षमीकरणाकरीता त्यांचा राजकीय सामाजिक व आर्थिक सहभाग वाढवणे आवश्यक आहे. भारतीय स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी अडथळे पाहिले असता एकविसाव्या शतकातही महिलांना आजही दुय्यम दर्जा, रूढी, प्रथा, परंपरा व धार्मिक पगडा या बाबत समाजाची मानसिकता नकारात्मक होताना दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर महिला स्वतःच्या अधिकाराबाबत जागरूक आणि सजग होताना दिसून येत आहेत. आता आपण महिलांच्या राजकीय सहभागाच्या अशा टप्प्यात पोहोचलो आहोत की प्रसारमाध्यमे प्रभावीपणे कार्यरत आहेत फेसबुक व्हाट्सअप ट्विटर इंस्टाग्राम यांचा वापर करून महिला राजकारणातील आपली अभिव्यक्ती प्रभावीपणे ठरवत आहेत. भारतीय संविधान व कायदा हे समाज परिवर्तनाचे परिणामकारक माध्यम ठरले आहे. त्यात ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे महिलांच्या राजकीय आरक्षणाबाबत व महिलांना सक्षम करण्याचा मार्ग खुला झाला आहे.

लोकशाही शासन व्यवस्था सुदृढ आणि यशस्वीपणे राबविण्यासाठी सर्व नागरिकांचा राजकीय व्यवस्थेत समान सहभाग असणे आवश्यक आहे. समता हे लोकशाहीचे व्यवच्छेदक वैशिष्ट्य आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष समान सहभागासाठी भारतासारख्या विकसनशील देशामध्ये महिलांसाठी राजकीय आरक्षणाची आवश्यकता आहे सामाजिक व आर्थिक मागासलेपण राजकीय आरक्षणाचा निकष असतो. त्यामुळे सामाजिक व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या व राजकीय दृष्ट्या कमकुवत असलेल्या समाजाच्या या वंचित घटकांसाठी राजकीय आरक्षण हा त्यांना राजकीय न्याय देण्याचा एक प्रशस्त मार्ग आहे. पंचायतराज व्यवस्थेमध्ये महिलांना मिळालेले आरक्षण हा त्यांचा राजकीय सहभाग वाढवत आहे ही महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने स्वागतार्ह बाब आहे.

**महिला आरक्षणाची तरतुद**

महिलांना लोकसभा व विधानसभेत ३३ टक्के आरक्षण देण्याबाबतचे विधेयक संसदेत प्रलंबित असतानाच महिलांचा स्थानिक राजकारणातील सहभाग वाढावा व त्यांना आत्मविश्वासाने राजकारणात सहभागी होता यावे व त्यांना लोकशाहीचे प्रशिक्षण मिळावे व स्थानिक विकासात महिलांचा देखील सहभाग वाढावा यासाठी १९९२ मध्ये ७३ वी व १९९३ मध्ये ७४ वी घटना दुरुस्ती ने महिलांचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या त्रिस्तरीय संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षणाची तरतूद केली गेली या घटनादुरुस्तीनुसार.

१. जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या प्रत्येक संस्थांमधील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या एकूण जागा पैकी एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव असतील.

२. तसेच या त्रिस्तरीय रचनेतील एकूण पदांपैकी ३३टक्के सभा अध्यक्षांची पदे देखील महिलांसाठी राखीव ठेवली आहेत.

३. नागरी स्थानिक संस्थांमध्ये म्हणजेच महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत यातील एकूण सदस्यसंख्येच्या ३३ टक्के जागा या महिलांसाठी राखीव आहेत.

४. तसेच नागरी संस्थांमधील एकूण सभा अध्यक्षांच्या पदांपैकी ते ३३ टक्के पदे ही महिलांसाठी राखीव ठेवली आहेत.

महाराष्ट्र शासनाने २०११ साली ३३ टक्के आरक्षणा ऐवजी महिलांना ५० टक्के आरक्षणाची तरतुद करण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात स्थानिक संस्थांमधील थेट निवडणुकीच्या माध्यमातून भरावयाच्या एकूण जागांपैकी ५० टक्के पदे ही महिलांसाठी आरक्षित ठेवली आहेत. महिलांचा राजकारणातील सहभाग वाढावा यासाठी करण्यात आलेल्या प्रस्तुत तरतुदी त्यांच्या राजकीय सक्षमीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहेत.त्यामुळे महिलांचा ग्रामीण तसेच नागरी संस्थांमधील सहभागात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. अनेक महिला राजकीय पदावर अत्यंत जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडताना आज दिसून येत आहेत. चूल आणि मूल ही ओळख असलेल्या महिला आज चार भिंतीच्या बाहेर स्वतःची राजकीय ओळख निर्माण करण्यासाठी तसेच महिलांना राजकीय दृष्ट्या सक्षम करण्यासाठी प्रस्तुत तरतुदी साह्यभूत ठरत आहेत. परंतु काही प्रमाणात याबाबत महिलांमध्ये जाणीवेचा अभाव देखील दिसून येतो. त्यामुळे स्थानिक संस्थांमधील महिला आरक्षणाचा परिणाम सकारात्मक व नकारात्मक दोन्ही बाजूने तपासणे आवश्यक ठरते.

**राजकीय आरक्षणाचे मूल्यमापन :**

महिलांना मिळालेल्या राजकीय आरक्षणास २०१७ मध्ये २५ वर्षे पूर्ण झाली या निमित्ताने अनेक शासकीय अशासकीय संस्थांनी याबाबत सर्वेक्षणे केली व आरक्षणाचे महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने काय परिणाम होत आहेत याबाबत निष्कर्ष मांडले आहेत. याबाबत केंद्रीय पंचायतराज मंत्रालयाने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमधून मिळालेल्या राजकीय आरक्षणाबाबत केलेल्या सर्वेक्षणात पुढील सकारात्मक निष्कर्ष मांडले आहेत.

१. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील राजकीय आरक्षणामुळे महिलांचा एकंदरीत राजकीय सहभाग वाढला आहे. हा सहभाग पूर्वी मतदान करणे एवढाच मर्यादित होता. व या राजकीय आरक्षणामुळे महिला निवडणुकीत सहभागी होत आहेत.

२. अनेक महिला सरपंच, पंचायत समितीच्या सभापती, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा, महापौर या भूमिकांमधून राजकीय पदे सक्षमपणे भूषवित आहेत.

३. महिलांचा या संस्थांमधील निर्णय प्रक्रिया, अंदाज अंदाजपत्रकावरील चर्चा व प्रशासकीय कार्यामधून सहभाग वाढत आहे.

४. स्थानिक संस्थांमधील आरक्षणामुळे देशाच्या अनेक भागातून महिला चे राजकीय नेतृत्व उदयास येत आहे.

वरील सकारात्मक बदल ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांबाबत दिसून येत असले. तरी आरक्षणाचा प्रत्यक्ष वापर रबरी शिका म्हणून होत आहे. असेही चित्र देशातल्या अनेक भागात पहावयास मिळते आहे. महिलाच्या राजकीय आरक्षणाच्या नकारात्मक बाजूचे मूल्यमापन करणे ही आवश्यक ठरते.

१. महिलांना राजकीय आरक्षण मिळाले परंतु प्रत्यक्षात प्रस्थापित राजकीय कुटुंबातील महिला प्रतिनिधी पुढे येत आहेत त्यामुळे सर्वसामान्य महिलांना फारसा लाभ झालेला नाही.

२. राजकीय पदावरील महिला सभा अध्यक्षाचे अधिकार या महिला प्रतिनिधी ऐवजी त्यांच्या कुटुंबातील पुरुष व्यक्तीकडून वापरले जातात.

३. महिलांना राजकीय अनुभव कमी असल्यामुळे त्यांच्यामार्फत योग्य निर्णय घेण्याची शक्यता कमी असते.

४. अनुसूचित जाती-जमातीच्या महिला सदस्यांचे अधिकार प्रत्यक्षात गावातील प्रतिष्ठित व प्रस्थापित पुरुषाकडून वापरले जातात.

उपरोक्त दोन्ही बाजू या आरक्षणाबाबतच्या वास्तव परिस्थितीचे द्योतक आहेत. परंतु वर्तमान राजकीय वातावरणाचा विचार करता महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी त्यांना आरक्षणाची आवश्यकता ही काळाची गरज आहे असे स्पष्टपणे दिसून येते.असे असले तरी आज निवडून आलेल्या स्त्रिया अधिक सक्षमपणे आणि आत्मविश्वासाने कार्य करताना दिसतात. उदा. गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यातील स्त्रियांनी दारूबंदी बाबत मोठे यश मिळविले हजारो स्त्रियांचे संसार उद्ध्वस्त करणाऱ्या दारू च्या विरोधात सत्ता हाती आल्यामुळे त्यांनी हा प्रश्न अग्रक्रमाने तडीस लावला. तसेच स्त्रियांनी अर्थार्जनाच्या साधनांमध्ये सुद्धा वाढ केली आहे. बचत गट निर्माण केले, गावात सुधारणा केल्या, पाण्याचे प्रश्न मिटविले. केवळ त्याच स्वयंपूर्ण झाल्या नाहीत तर त्यांच्या प्रयत्नामुळे गाव स्वयंपूर्ण झाले. गावात स्वच्छता व साक्षरता वाढायला लागली. हे सकारात्मक बदल पाहून काही गावातील लोकांनी ऐतिहासिक व क्रांतिकारक निर्णय घेतला तो म्हणजे निवडणुका न घेता एक मताने महिलांच्या हातात ग्रामपंचायत सोपविली बिनविरोध निवडून आल्यामुळे मिळालेला दहा हजाराचा पुरस्कार ग्रामविकासासाठी खर्च केला जाऊ लागला.विटनेर चोपडा या गावात शेतकरी संघटनेच्या नेत्या इंदिराताई पाटील यांनी १९९० मध्ये स्त्रियांचे पॅनल उभे केले आणि सर्वच्या सर्व महिला निवडून आणल्या हा एक क्रांतिकारक इतिहास झाला आहे.

आरक्षणाचा मूळ उद्देश महिलांना राजकीय प्रक्रियेत सहभागी करून घेणे हा जसा आहे तसाच महिलांच्या नेतृत्वाचा विकास करणे हाही आहे.ग्रामपंचायत मधून निर्माण झालेले नेतृत्व हळूहळू विकसित होऊन पंचायत समिती, जिल्हा परिषद, विधानसभा व लोकसभा असे टप्पे या महिला पार पाडत आहेत. आणि काही ठिकाणी तसे घडलेली आहे परंतु बहुतांश वेळा मात्र निवडून आलेल्या स्त्रिया नंतरच्या काळात राजकारणातून बाजूला पडल्याचे दिसून येते विशेषता राखीव प्रभाग खुला झाल्यानंतर क्वचितच स्त्रिया खुल्या प्रभागातून निवडणूक लढवतात त्यामुळे त्यांच्या अनुभवाचा फायदा इतरांना होताना दिसून येत नाही.

महिलांच्या राजकीय सहभागातून महिला सक्षमीकरणाची कशी गरज निर्माण झाली हे आपणास दिसून येते म्हणून महाराष्ट्र शासनाने आठ मार्च २००१ पासून महिला सक्षमीकरणाचे धोरण जाहीर केले आहे. त्यात त्यांनी महिलांच्या काही घटकांना प्राधान्याने महत्त्व दिल्याचे दिसून येते ते खालीलप्रमाणे.

१. बालविवाह, देवदासी, गर्भजल परीक्षा, लैंगिक छळ याविरुद्ध कायदेशीर उपाययोजना करुन न्यायालयातील विलंब दूर करणे.

२. महिला व बाल कल्याणासाठी नगरपालिका व महानगरपालिकेकडून व्यापारी तत्त्वावर ३० टक्के गाळे महिलांना देणे तसेच कल्याण अंतर्गत खर्चात ५ टक्क्यांवरून १० टक्के पर्यंत वाढ करणे.
३. सार्वजनिक ठिकाणे, शाळा, महाविद्यालय येथे मुलींच्या संख्येच्या प्रमाणात स्वच्छतागृह बांधणे.
४. कृषी,उद्योग, कापड कारखाने, अंगणवाडी प्रकल्प, सकस आहार योजना राबवणे इत्यादी यातून महिलांमध्ये स्वयंपूर्णता व आत्मनिर्भरता यासारखे गुण वाढीस लागणे अपेक्षित आहे.
५. राज्य महिला कोषाची स्थापना करून महिला विशेष घटक योजना नुसार लघु पत पुरवठा करणे.
६. महिला संरक्षण विधेयक तयार करून राज्य महिला आरक्षणात वाढ करणे.
७. राष्ट्रीय उत्पन्नात गृहिणीच्या घर कामाचे मूल्य ठरविणे.
८. घर जमीन या मिळकतीवर पतीबरोबर पत्नीचेही संयुक्त नाव देणे पोडगी कायद्यात दुरुस्ती करणे.
९. स्वयं शिक्षण व स्वयंसहायता गट स्थापन करणे.

**सारांश -**

भारत स्वातंत्र्याचा ७५ वा अमृत महोत्सवी वर्ष साजरा करत आहे. या पार्श्वभूमीवर लोकसभेत एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात ७८ महिला निवडून आल्या आहेत म्हणजेच १४ टक्केच महिलांचे प्रतिनिधित्व लोकसभेत आहे.महिलांचे प्रमाण ५० टक्के असताना लोकसंख्येच्या प्रमाणात पुरुषांचे प्रतिनिधित्व मात्र ८६% आहे. हा आलेख निश्चितच समानतेचे अधिष्ठान असलेल्या लोकशाही शासन पद्धतीत उचित नाही तेव्हा महिलांसाठी राखीव मतदारसंघ ठेवून ते ३३ टक्के आरक्षण कायम झाले तर आजचे विषम चित्र बदलू शकेल.लोकसभेत ५४३ सदस्य आहेत जर ३३ टक्के आरक्षण मिळाले तर जवळपास १८० महिला लोकसभा सदस्य होतील. महाराष्ट्राच्या विधानसभेत २८८ सदस्यसंख्या आहे त्यापैकी ९६ महिला विधानसभा सदस्य बनतील.त्यामुळे राजकीय निर्णय प्रक्रियेत महिलांना स्थान प्राप्त होईल. त्यांची प्रतिष्ठा आणि सन्मान अधिक उंचावेल. म्हणून भारतातील महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आरक्षणाला पर्याय नाही. भारतातील ही सामाजिक स्थिती लक्षात घेता सर्व स्तरावर स्त्रियांचे अधिक प्रतिनिधी असणे लोकशाहीच्या दृष्टीने, महिलांचा राजकीय सहभाग व सक्षमीकरणाच्या दृष्टीने आवश्यकच आहे.

**संदर्भ सुची:-**

१.दामले सुवर्णा, महिला आरक्षण सत्तेच्या सोंगाड्या, लोकसत्ता, चतुरंग लेख,६ जानेवारी २०१८.
२.Saxena K.S., Women's political participation in India ,Sublime publication,Japur.
३. प्रा.जवंजाळ शकुंतला, पंचायत राज व्यवस्थेतील महिला राजकीय आरक्षण आणि महिला सक्षमीकरण.२६ एप्रिल २०१८.
४. विचारमंथन ,१४ वी लोकसभा निवडणूक २००४ एक विश्लेषण.
५. पाटील भारती, पंचायती राज संस्थांमधील स्त्रियांचा सहभाग.
६.प्रा.डॉ. सुनील शिंदे.,प्रा.डॉ. संतोष कोल्हे,महाराष्ट्राच्या राजकारणातील स्त्रियाची भुमिका, २६ एप्रिल २०१८.

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील डॉ. ॲनी बेझंट यांचे योगदान

**Dr.Madhukar Vithoba Jadhav**
Assisent Professor ,Department of History, Y.C.College, Halkarni,Chandgad,Kolhapur

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात इंग्रज सत्तेविरुध्द लढणा-यांमध्येअनेक रणरागिणी होत्या. त्यांचे योगदान सुवर्णाक्षराने नोंद करण्यासारखे आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढयामध्ये स्त्री शक्तींचा सहभाग सुरुवातीपासुनच होता. भारताच्या स्वातंत्र्यलढयामध्ये अनेक महिला क्रांतिकारकांनी आपल्या संसारावर तुळशीपत्र ठेऊन देशसेवेला अजरामर केले. भारताच्या स्वातंत्र्यलढयाचा इतिहास वेग-वेगळया आंदोलनांनी भरलेला आहे. मवाळवाद, जहालवाद, महात्मा गांधी यांची अहिंसा, सत्याग्रह, संविनय कायदेभंग चळवळ व क्रांतिकारकांची सशस्त्र कांतिकारी चळवळ या प्रकारच्या लढयामुळे भारत देश ढवळून निघाला. अशा आंदोलनांनी इंग्रजी राजवटीच्या विरोधात भारतीयांनी दीर्घकाळ लढा दिला भारतीय .क्रांतिकार्यामध्ये महिला क्रांतिकारकांनी केलेले कार्य अव्दितीय असेच आहे महिला तरूण चळवळीमध्ये स्वातंत्र्य भारतातील .क्रांतीकारकांचा सहभाग हे एक वेगळे वैशिष्ट्य आहे . क्रांतीकार्यामध्ये तरूण जसे पुढे होते ही तरूणी त्याचप्रमाणे .क्रांतीकार्यामध्ये मागे नव्हत्या. त्यांनीही क्रांतीकार्यामध्ये स्वतःला झोकुन देऊन भारताचा स्वातंत्र्यलढा चालविला .

लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली, त्यातुन ब्रिटीशांचा साम्राज्यवाद व फोडा आणि राज्य करा ही निती भारतीयांना समजून आली मनामध्ये भारतीयांच्या त्यामुळे .असंतोष निर्माण झालाब्रि.टिशांच्या विरोधी स्त्री पुरुप-क्रांतीकारक रस्त्यावर उतरले. स्वदेशी आंदोलनात स्त्री वर्गानी सक्रिय सहभाग नोंदविण्यास सुरूवात केली परदेशी . करणे जाळपोळ मालाची, गुप्त कट रचने, गुप्त बातम्यांची देवाणकरणे घेवाण-, भूमिगत क्रांतीकारकांना जेवण व शस्त्रास्त्रे पुरविणे, तुरुंगात गेलेल्या क्रांतीकारकांच्या घरी अन्न त्यांना व पुरविणे धान्य -आधार देणे, रास्ता रोको आंदोलन करणे, खेडयातील लोकांना स्वातंत्र्य चळवळीची माहिती देणे, सरकारी इमारतीवर रात्री-अपरात्री तिरंगा फडकविणे इ जोमाने अतिशय कार्य .क्रांतिकारक करीत होते भारतमातेच्या .क्रांतीकारकांना विविध प्रकारची मदत करण्यावरोवरच स्त्री क्रांतीकारकांनी हातात वंदुक घेऊन क्रांतीकार्यामध्ये सहभागी होऊन देशासाठी हसत हसत-हौतात्म्य स्विकारले .

'राष्ट्रपिता महात्मा गांधीजीच्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या आगमनानंतर मोठया प्रमाणात स्त्रीया राष्ट्रीय आंदोलनात सहभागी झाल्या.सुत कातणे, विदेशी कापड्याची होळी करणे, दारू दुकानासमोर निर्दशने करणे या कार्याव्दारे स्त्रीया देशसेवा करू लागल्या. इ अधिवेशनात येथील कलकत्ता कॉंग्रेसच्या राष्ट्रीय च्या १९१७ .सन. यांमध्येस्त्रि मिळाल्यामुळे प्रतिनिधित्व सरकारातुन स्थानिक आणि आला देण्यात अधिकार मतदानाचा स्त्रियांना हजार एक त्यातुनच उतरल्या स्वातंलढयात त्या होऊन जागृतीस्त्रीयांनी इय मुंबई मध्ये १९२९.सन.ेथे प्रिन्स ऑफ वेल्स च्या आगमनाच्या विरोधात भाग घेतला.क्रांतीकारक चित्तरंजन दास यांच्या पत्नी वासंती देवी त्यांची वहिण उर्मिला देवी व भाची सुनिता यांनी कलकत्यातक्रांतीकार्यात भाग घेवुन स्वातंत्र्य चळवळीला बळ दिले. त्यानंतर संपूर्ण भारतभर स्त्रीयांनी क्रांतीकार्यात सहभाग नोंदविलास्त्री चळवळीत कायदेभंग सविनय .यांचा सहभाग आणखीनच वाढलामुंबई ., बंगाल, मद्रास, अलाहाबाद, दिल्ली व लाहोर या प्रांतातील स्त्री क्रांतिकारकांनी तीव्र आंदोलन करून ब्रिटीशांना सळोकीपळो करून सोडले.

अवंतिकाबाई गोखले, कमलादेवी चटटोपाध्याय, हंसाबेनमेहता, उर्मिला देवी, ॲनी बेझंट,कस्तुरबा गांधी, वासंती देवी, अनुसयाबेन साराभाई, कमला नेहरू, सरोजिनी नायडू, मीनाबेन पटेल, सुचाता कृपलानी, अमृता कौर, अरुणा असफअल्ली, दुर्गादेवीचाफेकर, प्रेमा कंटक, सुशीला पै, ज्योतिमयी देवी, हेमप्रभा दास, सुधाताई जोशी, मेहताबेन पटेल, सुचिता कृपलानी, मिरदुला साराभाई, मातागिनी हिजरा, मिरा बेन आदि अनेक स्त्रियांनी स्वातंत्र्य लढ्यात पुढाकार घेऊन अतुल धैर्य दाखवुन मोटा पराक्रम केला .

परदेशी असूनही भारतीय स्वातंत्र्य संग्रामध्ये भाग घेऊन श्रेष्ठ कामगिरी करणा-या लढवय्या स्त्री क्रांतिकारक म्हणजे डॉ. ॲनी बेझंट होत.डॉ. ॲनी बेझंट या स्त्री क्रांतिकारक मुळच्या परदेशातील आर्यलंड या देशाच्या रहिवासी होत. मूळ आर्यलंड देशाच्या असणा-या डॉ. ॲनी बेझंट यांचा जन्म १ ऑक्टोबर, १८४७ रोजी झाला. डॉ. ॲनी बेझंट ह्या धर्माने ख्रिचन होत्या. डॉ. ॲनी बेझंट व त्यांच्या पतीचे वैचारिक मतभेद झाल्यामुळे त्यांनी आपल्या पतीपासून घटस्फोट घेतला. संसारिक जीवनाचा त्याग करून त्यांनी स्वातंत्र्य कार्याला व समाज सेवेला सुरुवात

केली. इंग्लंडमध्ये त्यांनीआपल्या कार्यातून समाज सेवेला महत्त्व प्राप्त करून दिले. प्रारंभी त्यांनी तेथील कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १८८३ साली डॉ. ॲनी बेझंट भारतात आल्या व त्या भारतीय संस्कृतीशी एकरूप झाल्या. भारतीय संस्कृतीची महानता त्यांना पटली. त्यातून डॉ. ॲनी बेझंट यांनी भारत भूमीलाच आपली कर्मभूमी मानले. भारतीयतत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला. डॉ. ॲनी बेझंट यांनी भारतीय तत्वज्ञान जगात सर्वश्रेष्ठ असल्याने ठामपणे सांगितले. डॉ. ॲनी बेझंट यांच्या कार्याला भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. भारतीय संस्कृती एवढी महान आहे की, भारत देशावरती कोणाचेही पारतंत्र्य असू नये. भारत देश स्वतंत्र असावा असे त्यांचे ठाम मत होते. डॉ. ॲनी बेझंट थिऑसॉफीकल सोसायटीच्या २५ वर्षे अध्यक्ष होत्या. इंग्रजांच्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी व भारताला स्वराज्य मिळावे यासाठी त्यांनी इ. स. १९१३ साली अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे सभासदत्व स्विकारले. भारतीय पारतंत्र्य विरोधी आवाज उठवण्यासाठी व इंग्रजांचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी त्यांनी मद्रास प्रांतामध्ये कॉमन विल हे वृत्तपत्र सुरु केले. एवढेच नव्हे तर भारतीय स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यासाठी त्या इंग्लंडल्या गेल्या व तेथे त्यांनी भारतीय स्वातंत्र्याचा प्रचार आणि प्रसार केला. इंग्लंडमधून भारतात परत आल्यानंतर त्यांनी न्यू इंडिया हे वृत्तपत्र सुरु करून भारतीय स्वातंत्र्य लढ्याला गती दिली.

डॉ. ॲनी बेझंट यांनी इंग्रज सत्तेच्या विरोधात संघर्ष करण्यासाठी दि. १ सप्टेंबर, १९१६ साली ऑल इंडिया होमरूल लीगची स्थापना केली. होमरूल लीगच्या माध्यमातून भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. होमरूल लीग या संघटनेचा मुख्य उद्देश स्वराज्य मिळविणे हा होता. स्वशासन प्राप्त करण्यासाठी होमरूल चळवळीने खूप मोठी आंदोलने केली. डॉ. ॲनी बेझंट यांनी स्थापन केलेल्या होमरूल लीगचा मुख्य उद्देश स्वराज्य मिळवणे हाच होता. होमरूल लीगच्या प्रसार व प्रचारासाठी संपूर्ण भारतभर डॉ. ॲनी बेझंट यांनी दौरा केला. संपूर्ण भारतभर होमरूल लीगच्या शाखा स्थापन केल्या. डॉ. ॲनी बेझंट यांनी स्वत: भारतभर दौरे करून आपल्या तुफानी व ओजस्वी भाषणांनी भारतीयांची मने जिंकली. भारतीयांमध्ये स्वातंत्र्य विषयी जागृती निर्माण केली. भारतीयांच्या मनामध्ये स्वातंत्र्याची ज्योत पेटविली. संपूर्ण भारत देशामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. होमरूल लीगच्या कार्याबद्दल पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात " होमरूल आंदोलनामुळे संपूर्ण देशातील तरुण युवकांमध्ये विजेच्या वेगाने उत्साह व स्फूर्ती निर्माण झाली. मी इच्छा अशी व्यक्त करतो कि, या उर्जेचा परिणाम भविष्यात चांगला होवो".

होमरूल लीगच्या आंदोलनाचा भारतीय जनतेच्या मनावर मोठा परिणाम घडून आला.सर्वच स्तरातून होमरूल लीगला पाठिंबा मिळू लागला. त्यामळे इंग्रजांनी हे आंदोलन चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला.आंदोलकांची इंग्रजांनी धरपकड करण्यास सुरुवात केली. डॉ. ॲनी बेझंटव त्यांच्या सहका-यांना पकडून जेलमध्ये टाकण्यात आले. इंग्रज सरकारच्या या धोरणाला संपूर्ण भारत देशातून विरोध झाला. तरुण युवकांमध्ये असंतोष निर्माण झाला. भारतातील संपूर्ण जनता व अखिल भारतीय कॉंग्रेस आणि युवक वर्ग डॉ. ॲनी बेझंट यांच्या बाजूने उभा राहिला. डॉ. ॲनी बेझंट व त्याच्या सहका-यांची ताबडतोब जेलमधून सुटका करावी असे जाहीर केले. डॉ. ॲनी बेझंट यांनी सुरु केलेल्या होमरूल लीगच्या आंदोलनामुळे संपर्ण भारत भर तरुणांच्यामध्ये जोश व उत्साह निर्माण झाला. अमेरिका, इंग्लंड या देशामध्ये ही डॉ. ॲनी बेझंट यांनी सुरु केलेल्या होमरूल लीगच्या आंदोलनाचे पडसाद उमटले.

न्यूयार्क, सन फ्रान्सिस्को या ठिकाणीही होमरूल लीगची स्थापना करून तेथे यंग इंडिया वृत्तपत्र सुरु केले. तेथे या वृत्तपत्राने महत्त्वपूर्ण कार्य केले. डॉ. ॲनी बेझंट यांनी इंग्लंड बरोबर पत्रव्यवहार करून भारताला स्वातंत्र्य देणे किती गरजेचे आहे हे सांगितले. इंग्लंडमधील उदारमतवादी जनतेने डॉ.ॲनी बेझंट यांच्या या स्वातंत्र्यलढ्याला पाठिंबा दिला. डॉक्टर आणि पेशंट यांच्या कार्याची दखल घेऊन इ.स. १९१७ला अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले. सरोजिनी नायडू, महात्मा गांधीजी,डॉ. ॲनी बेझंटयांच्या संपर्कात आल्यानंतर त्या महात्मा गांधीजी आणि अखिल भारतीय कॉंग्रेसच्या समर्थक बनल्या. त्यांनी होमरूल लीगच्या प्रसारासाठी देशभर दौरे केले.

मद्रास प्रांतातील होमरूल लीगचे अध्यक्ष सर सुब्रह्मण्य अय्यर यांनी इ.स.1917 साली अमेरिकेचे अध्यक्ष विड्रो विल्सन यांना पत्र लिहून स्वातंत्र्य लढ्याला सहकार्य करण्याची विनंती केली . सर सुब्रमण्यम अय्यर यांनी त्या पत्रात म्हटले होते."आम्ही आज गुलामगिरीत आहोत. तुम्ही आम्हाला स्वराज्याचे आश्वासन दिल्यास आमच्या देशातील लाखो सैनिक युद्ध आघाडीवर पाठविले जातील". तरसर सुब्रह्मण्य अय्यर यांनी पाठविलेल्या या पत्राला इंग्लंड, अमेरिकेमध्ये फार प्रसिद्धी मिळाली.होमरूललीगच्या आंदोलनातून भारत स्वातंत्र्याच्या दिशेने धावू लागला असे म्हटले तरी ते सत्यच आहे. अशा महान नेत्या डॉ. ॲनी बेझंटयांचा इ.स. १९३३साली मृत्यू झाला.

डॉ. ॲनी बेझंट यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळी मध्ये होमरूळ आंदोलनाच्या माध्यमातून स्वराज्य मिळवण्यासाठी भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये नवचैतन्य आणले. स्वातंत्र्य संग्रामाची पार्श्वभूमी डॉ. ॲनी बेझंटयांनी सुरू केलेल्या होमरूल लीगची आंदोलने सुरू झाली. भारतीय स्वातंत्र्य संग्रामामध्ये स्त्री क्रांतिकारकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये स्त्री क्रांतिकारकाच्याशौर्याला व त्यागाला वरचे स्थान आहे.डॉ. ॲनी बेझंट यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्री क्रांतिकारक म्हणून श्रेष्ठ स्थान आहे. होमरूल लीगच्या माध्यमातून भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले.

**संदर्भ सूची :**

१) Brown J.Y, Gandhi: Prisoner of Hope, London, 1989, P - 57.
२) देशपांडे प्र. न, (संपा) संशोधक, धुळे, सप्टेंबर २००६, पृष्ठ २९.
३) Ray B.M, The Freedom Movement and Feminist Consciousness in Bengal, New Delhi 1995.p - 185
४) बंद्योपाध्याय, प्लासी ते विभाजन तक, नवी दिल्ली, २०१०, पृष्ठ ४२४.
५) Forbes G, Women in Modern India, New Delhi, 1998, P - 125.
६) सक्सेना शंकर, क्रांतिकारी आंदोलन का इतिहास, जयपूर, २०१०, पृष्ठ १२७-१२८.
७) कवि माधवी, १०१ श्रेष्ठ महिला, लातूर, २०१०, पृष्ठ ५३.
८) पाटील पद्मजा, भारतीय इतिहासातील स्त्रीया , कोल्हापूर, २00७, पृष्ठ २४९.
९) गोस्वामी सुधा, भारतवर्ष की चर्चित महिलाएँ, आगरा, पृष्ठ १५०
१०) माने रणजित [संपा], भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्रियांचे योगदान, २०१८, कोल्हापूर, पृष्ठ १७५.
११) बिपीन चंद्र, इंडियाज स्टगल फॉर इंनडिफेन्स, दिल्ली, १९९०, पृष्ठ २९६.
१२) शिंदे व गव्हाणे, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, औरंगाबाद, २०१५, पृष्ठ २९८.
१३) गोवर बी. एल, आधुनिक भारताचा इतिहास, नई दिल्ली, २००३, पृष्ठ ३९९.
१४) दिक्षित न. सी. आधुनिक भारत, नागपूर, २००३, पृष्ठ ३२०.
१५) रोडे सोमनाथ, आधुनिक भारत, नागपूर, १९९८, पृष्ठ २८८.
१६) देवगिरीकर त्र्य. र. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास, नागपूर, १९८६, पृष्ठ २३२.
१७) जावडेकर रा. द. आधुनिक भारत, पुणे, १९३८, पृष्ठ ४५०.
१८) पारसनीस द. बा. झाशीची राणी, पुणे, २०१३.
१९) बारगळ एस. एम. अर्वाचिन भारत, नागपूर, १९८८, पृष्ठ ४७६.
२०) पवार जयसिंग, आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास, नागपूर, १९९८, पृष्ठ २०९.
२१) वाळिंबे वि. स. सत्तावन ते सत्तेचाळीस, पुणे, १९९७, पृष्ठ १०१३.
२२) भिंडे गजानन, आधुनिक भारताचा इतिहास, पुणे, २००४, पृष्ठ ३८६.
२३) जोशीबी. आर व इतर, सामाजिक ज्ञानकोश, पुणे, २००७, पृष्ठ २१.
२४) गवाणकर रोहीणी, कॅप्टन लक्ष्मी व राणी झाशी रेजिमेंट, साधना, पुणे, १९९८
२५) बिपन चंद्र, इंडियाज स्टगल फॉर ईडीपेंडन्स, न्यू. दिल्ली, २००३, पृष्ठ ५६१.
२६) तपस्वी निलिमा, रणरागिणींचा आदेश, पुणे, २०११.
२७) झांबर स. ध, महान भारतीय क्रांतिकारक, १९७०, मुंबई.
२८) मांडे प्रमोद , स्वातंत्र्य संग्रामातील समिधा, पुणे, १९९८.
२९) सरकार सुमित, आधुनिक भारत, दिल्ली, १९९९.
३०) देसाई नयनतारा, रणरागिणी, पुणे, २००९.
३१) आचार्य धनंजय, भारतीय क्रांतीयुध्द, नागपूर, २००९.
३२) गाठाळ एस. एस, भारतीय राष्ट्रीय चळवळीचा इतिहास, औरंगाबाद, २०११.

# महिला सबलीकरण आणि ऐतिहासिक परीप्रेक्षातील स्त्रियांचे जीवन

**प्रा.डॉ. अब्दुलसमद बादशाह शेख**
महिला महाविद्यालय औरंगाबाद

**प्रस्ताविक :**

भारतीय इतिहासात/भारतीय संस्कृतीत अगदी प्रारंभ काळापासून म्हणजेच वैदिक काळापासून खेल आदाचे स्थान प्राप्त झालेले आहे. वेदकाळ,उपनिषद काळात स्त्रीजीवनाचा सर्वार्थाने विकास होत असल्याचे दिसून येते. कोणत्याही कालखंडात समाजजीवनाच्या समृद्धीचा व प्रगतीचा विचार करायचा झाल्यास त्या काळातील स्त्री जीवन कितपत समृद्ध होते स्त्रियांना समाजाकडून दिली जाणारी वागणूक व त्याअनुषंगाने स्त्री चे प्रकट होणारे व्यक्तिमत्व हा त्या काळातील सामाजिक सुधारणेचा निकष मानला जातो. म्हणूनच जो देश, जो समाज स्त्रियांना सन्मानाने वागवितो तो देश तो समाज प्रगतीपथावर आहे असे मानले जाते. या दृष्टीने महिला सबलीकरणाचा विचार केल्यास वैदिक काळात व त्यानंतरच्याही काळात स्त्री जीवनाच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने सुवर्णयुग होते असे म्हणता येईल. कारण एखाद्या सुसंस्कृत घरात एखादी अविवाहित विदुषी असल्यास तिच्या रूपाने घरात लक्ष्मीच वावरत असल्याचे म्हणत व हि गोष्ट या कुटुंबासाठी प्रतिष्ठेची बाब असे. त्या स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा परिपूर्ण व सर्वांगीण विकास घडवून आणणे यासाठी त्यांच्या योग्य शिक्षणाची सोयही केली गेल्याचे दिसून येते. पुरुषांपेक्षा कुठल्याही बाबतीत शिक्षणाच्या कमी संधी स्त्रियांना नव्हत्या व त्यामुळेच ती सुशिक्षित बनली व कुठल्याही बाबतीत तिच्या व्यक्तीमत्वात न्यूनगंड निर्माण झाला नाही. किंवा पुरुषांना राजकीय जीवनात अप्रत्यक्षपणे स्थैर्य निर्माण करण्यात मदत करत. पुरुष हि पत्नी किंवा कन्येचे सहकार्य घेत.

**महिला सबलीकरण / सक्षमिकरण संकल्पना :**

स्त्रियांमध्ये आत्मविश्वास व अधिकार याविषयी जागृकता व अन्यायाशी लढण्याची ताकद निर्माण करणे जेणेकरून आपल्यावर होणाऱ्या आर्थिक, सामाजिक आणि पारंपारिक भेदभावांना ओळखूनत्यांचा प्रतिकार करेल अशी महिला तयार करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय.

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी पोषक वातावरण तयार करून त्या प्रवाहात महिलांना आणणे म्हणजेच महिला सक्षमीकरण होय असे म्हणता येईल. अबला महिलांना सबळ करून त्यांना पुरुषांच्या बरोबरीने आणणे हे महिला सबलीकरणाचे प्रमुख उद्दिस्ठे आहे.

साधारण स्त्रियांची स्थिती सुधारणे असा महिला सबलीकरणाचा अर्थ घेतला जातो.

काळानुरुप स्त्रियांच्या स्थितीत व त्यांच्या जीवनात अनेक बदल घडून आलेले आहेत सर्वच काळात समान स्त्रीजीवन नव्हते.

**महिलासबलीकरण अर्थ:**

महिलासबलीकरणात त्या स्वतःच्या आयुष्याबद्दलचा निर्णय स्वतः घेऊ शकतील तसेच सामाजिक निर्णय प्रक्रियेत सहभागी होतील, जेथे स्त्रियांच्या अधिकाराचा व्यक्तिश: संबंध येतो.

सामाजिक, आर्थिक आणि राजकीय अधिकाराचा संबंध येतो. त्यांचे कुटुंबाप्रतीचे कार्य व जबाबदारी, समाजप्रतीची जबाबदारीची निश्चित होते, ज्या ठिकाणी त्यांना लैंगिक व सामाजिक शोषणाची भीती राहत नाही, ज्या ठिकाणी त्यांच्या घारावरील हक्क व मुलांबाबतचा पालकत्वाचा अधिकार त्यांना प्राप्त होते. अशी परिस्थिती म्हणजे महिला सबलीकरण होय.

महिला सबलीकरण हि एक व्यापक संकल्पना असून ती जाणीवपूर्वक घडवून आणण्याची प्रक्रिया होय. वैचारिक क्षमतेच्या अभावी तिला दुर्बल घटक ठरविले गेले.

१) स्त्री व्यक्तिमत्व विकासास समान संधी देणे म्हणजे महिला सबलीकरण.

२) स्त्रियांमध्ये सकारात्मक मानसिकता विकसित करणे म्हणजे सक्षमीकरण.

३) स्त्रियांच्या निर्णय क्षमतेत वाढ करून तिला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार बहाल करणे म्हणजे महिला सबलीकरण.

एक मानव घटक या अर्थाने जे स्वातंत्र्य व अधिकार सर्वसामान्यांना मिळतात देखील मिळणे व त्यांना वापर करता येणे म्हणजे महिला सबलीकरण होय.

**प्राचीन काळातील स्त्रीजीवन :**

इतिहासाचा मागोवा घेतला तर असे लक्षात येते कि, संस्कृतीच्या निर्मितीचे श्रेय स्त्रीला दिले जाते. प्राचीन सिंधू संस्कृतीत श्रीचे स्थान पूजनीय होते व मातृसत्ताक कुटुंब पद्धतीत होती.

स्त्रियांना शिक्षनाचा अधिकार होता व त्याद्वारे त्या आपला विकास करत होत्या. लोपमुद्रा अपाला गार्गी मैत्रयी अशा विद्वान स्त्रीचा प्राचीन काळात होऊन गेल्या. प्रभावती गुप्ता, संघमित्रा नागणीका यांनी इतिहासात आपल्या कार्य कर्तुत्वाचा ठसा उमठवला. स्मृतीकाळात मानूने स्त्रियांना वेदाभ्यास करण्याचा अधिकार नाकारला. स्त्रियांना सामाजिक स्वातंत्र्य दिले नाही. पुरुषप्रधानता निर्माण केली. स्त्री जीवन बंदिस्त बनले. चूल व मुल हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र ठरले. अनेक बंधन स्त्रीवर पुरुषप्रधान संस्कृतीत टाकली गेली अज्ञानाचा अंधारकोठडीत स्त्री बंदिस्त जीवन जगू लागली. सतीप्रथा , बालविवाह, जरठकुमारी विवाह, केशवपन प्रथा, सक्तीचे वेधव्य स्त्री शिक्षणावर बंदी या अनिष्ठ रुढीपरंपरांनी स्त्रीजीवन व्यापले होते.

मुस्लीम काळात स्त्रीचा दर्जा घसरलेला होता. पडदा पद्धत, शिक्षणाचे अत्यल्प प्रमाणात यामुळे तिचे स्थान गौण होते. सनातन काळात अल्तमशची पत्नी शाह तुर्कान हिने प्रथम राजनीतीत सहभाग घेतल्याचे उदा. होय. नंतर रझिया सुल्तानच्या रूपाने एका स्त्रीने अत्यंत कर्तबगारीने दिल्लीचे तख्त सांभाळले ३ वर्ष ६ महिने या काळात तिने संपूर्ण इतिहासावर आपला प्रभाव पाडला पण एका स्त्रीच्या कर्तुत्वापेक्षा समाजाने नेहमीच तिच्या चारित्र्याला अधिक महत्व दिले राझीयाच्या चारित्र्याला अधिक महत्व देऊन स्त्री जातीत जन्माला आल्याने तिच्या सर्व गुणांची माती झाली एक स्त्रीने राज्य करणे मध्ययुगीन समाजाला मान्य न झाल्याने तिचे पतन झाले. एकूणच मध्ययुगीन स्त्रीचा दर्जा फारसा उच्च नव्हताच. एकत्र कुटुंबात चूल व मुल या कार्यक्षेत्रातच तिला रमावे लागे.बहुपत्नीत्वाची पद्धत, सती प्रथा व बहुतांश स्त्रियांना शिक्षण मिळत नसे. राणी कर्णावती, चांदबीबी,दुर्गावती अशा काही मोजक्या स्त्रिया सोडल्यास राजकारणातही स्त्रियांचा फारसा सहभाग नव्हता.

**ब्रिटीश काळातील स्त्रीजीवन :**

ब्रिटिशांनी भारतात सत्ता निर्माण केल्यानंतर स्त्रीजीवनात परिवर्तन घडून आले स्त्रियांसाठी जाचक असलेल्या अनेक प्रथा कायद्याने ब्रिटिशांनी बंद केल्या. इंग्रजी शिक्षणाची सुरुवात भारतात केली. स्त्री शिक्षणासाठीही त्यांनी प्रयत्न केले मिशनऱ्यांनी अनेक शाहा काढल्या व शैक्षणिक विकास घडवून आणला. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले त्यांच्या शैक्षणिक कार्याचागौरव हंटर कमिशनने केला. ब्रिटिशांनी महिला विकासासाठी विशेष प्रयत्न केले नसले टर त्यांनी केलेल्या अनिष्ठ प्रथा बंदी कायद्यामुळे स्त्रीजीवनात परिवर्तन घडवून आले.

**इतिहासाच्या पारीपेक्षातून स्त्रीअभ्यास :**

भारतीय इतिहासात प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातील स्त्रियांच्या लेखनाचे संशोधन सुरु झाले आहे. उदा.- कलहणाच्या 'राजतंरागिनी' मधील स्त्रीविषयक दृष्टीकोन ताराबाई शिंदे यांचे 'स्त्री-पुरुष तुलना', संत कवयित्रीचे लिखाण, लाक्षमिबाई टिळक यांचे आत्मचरित्र धार्मिक इतिहास, तत्वज्ञान साहित्य यामध्ये झालेले लिखाणही पूर्वग्रहदुषित व पुरुषकेंद्र असू शकते. मौखिक इतिहासातील अनेक म्हणी, वाक्यप्रचार, लोकगीते यातूनही स्त्री कर्तुत्वाचा दर्जा कमीच राहतो. उदा.- नाव सोनुबाई हाती कथलाचा वाळा, "बायकांची अक्कल गुडघ्यातच", बायको गेली तर, पाठीवरचा गोंडा गेला, बहिण गेली तर, नाकाचा शेंडा गेला, अशा अनेक म्हणी स्त्रियांना कमी दर्जा देणाऱ्या आहेत.

इतिहासलेखनात अनेक युद्धाची वर्णने मिळतात. त्यामध्ये स्त्रियांचा उल्लेख 'राणी दासी इतपतच राहतो'. पुरुषांबरोबर वेगवेगळया उल्लेखांची गरज मानली जात नाही. दशरथाकडून कैकयीने तीन वर मागितल्याने रामायण घडले हा उल्लेख म्हणून दशरथाने युद्ध जिंकले व तिला वर दिले याचा उल्लेख ब-याचदा हेतूपुरस्परपणे टाळला जातो. थोडक्यात 'ज्ञाननिर्मिती' ही पुरुषच करतात. कारण मनुस्मृतीकाराने हा अधिकार स्त्री व शूद्रांना दिलाच नव्हता. शिकणे, शिकविणे या सर्व पुरुषी मक्तेदारीच्या गोष्टी मानल्या गेल्या. म्हणून मध्ययुगीन काळात सामान्य स्त्रिया यापासून वंचित राहिल्या. ब्रिटीशांच्या आगमनानंतर पाश्चात्य विचारसरणीच्या प्रभावाने यात बदल घडून आला. याचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

**इतिहासाच्या परीप्रेक्षातून स्त्रियांचे जीवन:**

स्त्रियांच्या दृष्टीकोनातून केलेल्या अभ्यासामुळे स्त्रियांची स्थिती, समस्या, त्याबद्दलची सजगता निर्माण होणे शक्य होते. इतिहासविषयातील स्त्री अभ्यासामुळे काही गोष्टी लक्षात येतात.इतिहास काळातील प्रत्यक्ष साधनांचा अपुरेपणा जाणवत असला तरी लोकपरंपरेतून आलेले साहित्य, म्हणी, वाक्प्रचार, डायऱ्या, आठवणी, आत्मकथा, न अभ्यासलेली साधने यांच्या सहाय्याने स्त्रियांच्या स्थितीबद्दल संघर्षाबद्दल माहिती मिळविण्याचे काम

इतिहास संशोधक करीत आहेत. इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र अशा अनेक विषयातील परंपरागत सिद्धांताची सत्यता तपासली जात आहे.

पुरुषवर्गात, नोकरशाहीत, समाजातील विविध स्वरांमध्ये स्त्रियांबद्दलची संवेदनशिलता जागृत करण्याचे प्रयत्न होत आहेत. कायद्यात बदल केले जात आहेत व कायद्यांची अंमलबजावणी होण्यासाठी स्वतः स्त्रीला शेवटच्या थरापर्यंत चळवळीच्या माध्यमातून जागृत केले जात आहे. आज स्त्रिला स्वतंत्रपणे एकत्र येऊन संघर्षाचे प्रयत्न करून स्वतःचे आधार व सामर्थ्य मिळवू लागल्या आहेत. म्हणूनच स्त्री अभ्यासाचा खरा अर्थ म्हणजे भूतकाळातील इतिहासाची पुर्नबांधणी म्हणजेच जुन्या लिहिलेल्या इतिहासाचे पुनरावलोकन व पुनर्लेखन तसेच स्त्रीवादी दृष्टीकोनातून हा भूतकाळाशी पुढील पिढ्यांसाठी कधीही न संपणारा संवाद आहे.

**निष्कर्ष:**

शासकीय पातळीवर महिला सक्षमीकरणाचे प्रयत्न होत असेल तरी जोपर्यंत स्त्रियांमध्ये जागृती होत नाही शिक्षणाचा प्रसार होत नाही. निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढत नाही त्याबरोबरच मुलींच्या जन्माचे महत्व पटत नाही. तोपर्यंत महिला सबलीकरण घडवून येणार नाही. विकासाच्या सर्व संधी स्त्रियांकरिता उपलब्ध आहेत त्यांचा लाभ घेवून स्वतःचा मानसिक, आत्मिक, नैतिक, आर्थिक विकास त्यांनी साधने आवश्यक आहे. स्त्री घातकी समाजरचनेचा चक्रव्यूह फोडून बाहेर पडणे आवश्यक आहे. स्त्रियांना सबळ बनवणारे महात्मा ज्योतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांच्या सारखे युगपुरुष पुन्हा स्त्रीयांच्या पाठीशी उभे राहणे आवश्यक आहे. स्त्रियांना समाजात संरक्षण, प्रतिष्ठा महत्व व ज्ञान मिळाल्यास महिला सबलीकरण घडून येईल.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

□) सामुदायिक विकास विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण – डॉ. उज्वला वैरागडे, विद्या बुक्स औरंगाबाद २०१२.

□) भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास – डॉ. कठोर अनिल एज्युकेशन पब्लिशर्स पृ.क्र.५.

□) भारतीय इतिहासातील स्त्रिया- डॉ. जाधव शोभना, डॉ. पाटील पद्मजा, फडके प्रकाशन कोल्हापूर.

□) आधुनिक भारताचा इतिहास – डॉ. वैद्य सुमन साईनाथ प्रकाशन नागपूर पृ.क्र.३२५.

□) महिला सबलीकरण स्वरूप व समस्या – डॉ. शुभांगी गोटे-गव्हाणे वरद पब्लिकेशन औरंगाबाद २००४.

□) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास -गाठाळ एस.एस. कैलास पब्लिकेशन औरंगाबाद.

स्त्री चळवळीची वाटचाल-भागवत कमल प्रागतिक प्रकाशन पुणे.

# शिवरायांची नातसून जिजाबाई साहेब: एक ऐतिहासिक अभ्यास

डॉ. विनोद संभाजी सोनवणे
इतिहास विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, ओंदे

**प्रस्तावना :**

करवीर छत्रपतति घराण्याच्या इतिहासात रणरागिणी ताराबाई साहेबयांच्या नंतर हुषार, मुत्सदी आणि राजकारणात तरबेज असलेल्या महाराणी जिजाबाई साहेब. छत्रपती संभाजीराजे (दुसरे) म्हणजे छत्रपती शिवरायांचे नातू व छत्रपती राजाराम महाराजांचे सुपुत्र. छत्रपती संभाजीराजे (दुसरे) पत्नी जिजाबाई साहेब होत्या.

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती मध्ये करवीर (कोल्हापूर) राज्यचा राणी जिजाबाई साहेब यांच्या राजकीय कारकिर्दीवर प्रकाश टाकण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत संशोधनाच्या गुहीतके मध्ये महाराणी जिजाबाईच्या कारकिर्दीत करवीर राज्याचा विस्तार जरी झाला नाही, तरी त्यांच्यामुळेच या राज्याचे सार्वभौमत्व टिकून राहिले.

प्रस्तुत शोधनिबंधात सामाजिक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचा वापर करण्यात आलेला आहे.

**राणी जिजाबाई साहेब :**

छत्रपती संभाजीराजे (दुसरे) म्हणजे छत्रपती शिवरायांचे नातू व छत्रपती राजाराम महाराजांचे सुपुत्र. करवीरकर संभाजीराजे छत्रपती यांचे एकूण सात विवाह झाले होते. महाराणी जिजाबाई या संभाजीराजेंच्या चौथ्या पत्नी होत्या. जिजाबाई ह्यांचा विवाह इ.स. १७२७ मध्ये झाला होता. छत्रपतींचे जहागिरदार नरसोजीराव शिंदे सेनाखासखेल तोरगलकर यांच्या त्या कन्या होत्या आणि येसाजी शिंदे यांच्या बहिण होत्या

**स्वतंत्र शिक्का :**

संभाजी महाराजांच्या हयातीतच त्या राज्यकारभारात लक्ष घालत असत. शिवछत्रपतींच्या मातोश्री जिजाऊसाहेब यांच्या नंतर शिवपुत्र संभाजी महाराज यांच्या पत्नी महाराणी येसुबाई साहेब यांचे स्वतंत्र शिक्के असल्याची नोंद आहे. पण ते शिक्के उमटवलेला एखादे समकालीन पत्र अद्यापी उजेडात आलेले नाही.महाराणी ताराबाई साहेबांनी स्वतंत्र राज्य स्थापन केले तरीही आपल्या मुलाच्या नावानेच त्यांनी राज्यकारभार केला. परंतु महाराणी जिजाबाईंचा स्वतंत्र शिक्का होता व स्वतःच्या शिक्क्याने त्या राज्यकारभार करीत असत. महाराणीसाहेबांचा शिक्का असलेली अनेक ऐतिहासिक कागदपत्रे आज उपलब्ध आहेत.

**करवीरची रक्षणकर्ती जिजाबाई साहेब :**

संभाजीराजेंनी एकूण ४६ वर्षे राज्य केले. संभाजीराजे हे सर्वाधिक काळ राज्यकारभार करणारे छत्रपती होते.कोल्हापूर राज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांचे निधन २०डिसेंबर १७६० रोजी टोप गावानजीक असलेल्या माळावर झाले. त्यांच्या मृत्यूनंतर कोल्हापूर राज्य सुरक्षित ठेवण्याची सर्व जबाबदारी महाराणी जिजाबाई यांच्यावर पडली. जिजाबाई राज्यकारभारात १७४५ सालाच्या आधीपासूनच लक्ष घालत असत असे दिसते. अनेक ठिकाणी संभाजीराजेंच्या बरोबर त्यांचाही उल्लेख पत्रव्यव्हारात करण्यात आलेला आहे.

संभाजीराजेंच्या निधनानंतर कोल्हापूरचे व पेशव्यांचे संबंध बिघडले. जिजाबाईंना पेशव्यांच्यावर पूर्वी जी शंका येत होती, ती आता खरी ठरत होती.संभाजीराजेंना पुत्रसंतती नव्हती त्यामुळे कोल्हापूरच्या गादीवर आपल्या मर्जीतला, प्रभावातला दत्तक बसवून करवीर राज्य गिळंकृत करण्याचा पेशव्यांचा डाव होता. त्यावेळी पेशवे पदावर नानासाहेब होते. नानासाहेबांचे याआधी संभाजीराजेंशी चांगले संबंध असले तरी जिजाबाईंना त्यांच्यावर विश्वास नव्हता. जिजाबाईंनी महादजी भोसले मुंगीकर यांचा भाऊ उमाजी भोसले यास गादीवर बसवावे, असा आग्रह पेशव्यांनी धरला. त्याला जिजाबाईंनी विरोध करताच, तो विरोध मोडुन काढण्यासाठी पेशव्यांनी पाच-सहा हजार फौजेसह विसाजी नारायण व सदाशिव अवधुत या इचलकरंजीच्या सरदारांना पाठवले.

आपल्या मर्जीत असणाऱ्या उमाजीलाच गादीवर बसवायचे यासाठी पेशव्यांनी सर्व उपाय योजले आणि ते न जमल्यास कोल्हापूर राज्य जप्त करण्याचे ठरवले.

**नारायणराव व्यंकटेश घोरपडे यांना पत्र :**

जिजाबाईंच्या समोर मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. नानासाहेब पेशव्यांनी वेळोवेळी दिलेली वचने आणि आश्वासने खोटी ठरली याचा जिजाबाईंना अनुभव आल्यावर त्यांनी पेशव्यांच्या कृतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

त्यांनी इचलकरंजीचे जहागिरदार नारायणराव व्यंकटेश घोरपडे यांना पत्र पाठवून पेशव्यांच्या विसंगत धोरणाचा निषेध नोंदवला.

२० जानेवारी १७६१ रोजी पाठवलेले पत्र पुढील प्रमाणे होते,*"राजमान्य राजश्री नारायणराव व्यंकटेश यासी श्रीमंत महाराज मातुश्री जिजाबाई साहेब यांनी आज्ञा केली ऐसीजे,तुम्ही राजश्री बापूजी विठ्ठल यासमागमे विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ कळाला. राजश्री प्रधान पंतांनी (नारायणराव पेशवे) परामर्षाचे पत्रही न पाठवता (संभाजीराजेंच्या निधनानंतर सात्वंनपत्र) इकडील बंदोबस्तास राजश्री हरीराम व विसाजी नारायण या समागमे फौज देऊन पाठवून दिल्हे. तेव्हा साहेबांच्या व प्रधानपंताच्या ऋणानुबंधास सीमा आहे. राजश्री स्वामी (संभाजीराजे) जागृत (जिवंत) असता प्रधानपंतांनी संधान रक्षून आणशपथ घेवून साहेबाशी अंतर करु नये याप्रमाणे वचनासी गुंतले असता याप्रमाणे मजकूर घडून आला. राजश्री रघुनाथ पंतासही वर्तमान प्रधानपंत करवीरास आले असता कोणे प्रकारे वचनासी गुंतले ठाऊकच आहे. चिरंजीव कुसाबाई (संभाजीराजेंची सातवी राणी) गरोदर आहेत. राजश्री स्वामी यांच्या आज्ञेवरुन आम्ही चवघी राण्या आहो. असे असता या प्रकारे लौकिक केला. बरे,उत्तम. सर्व क्रियेवरी गोष्टी आहे. जेथून क्रियाच राहिली तेथे काय बोलावे. साहेब इच्छामरणी आहेत.सुखेनैव जे होणे ते होवो. तुम्ही पुरातन सेवक. तुम्ही येऊन परामर्ष करावा हे उचित होते. अजून तुम्ही राजश्री रघुनाथपंत यासी सांगून लौकिक निवारे ते करणे."*

अशाच प्रकारचे एक पत्र जिजाबाईंनी बाबूराव राम फडणीस (गोपिकाबाईंचा कारभारी) यांना लिहिले होते. त्यात त्यांनी कोल्हापूर राज्याच्या बाबतीत पेशव्यांनी स्विकारलेल्या धोरणाबद्दल अतिशय नापसंती व्यक्त केली. आपण ज्यांना बंधू म्हटले त्यानेच विश्वासघात करावा याबद्दल अत्यंत खेदही प्रदर्शित केला. संभाजीराजे यांच्याशी केलेले करार पेशव्यांनी मोडले याविषयी निषेध दर्शविला आणि शेवटी आलेल्या संकटाला तोंड देण्याची तयारीच दाखवली होती.

पेशव्यांनी मैत्रीची वचने देऊन ती मोडली. एवढेच नव्हे तर संभाजीराजे यांच्यानंतर कोल्हापूर राज्य मोडण्याचे कृत्य आरंभिले ही घटना कोणालाही संताप वाटावा अशीच होती. विशेषत: संभाजीराजेंची धाकटी राणी कुसाबाईसाहेब या गरोदर असताना पेशव्यांनी असे वर्तन करावे ही गोष्ट जिजाबाईंसारख्या राज्यकर्त्या स्त्रीला जिव्हारी लागावी यात वावगे काहीच नव्हते. संभाजीराजेंच्या मृत्युनंतर राजघराण्याचा परामर्श घेऊन सांत्वन करण्यासाठी 'पंतप्रधान' पेशव्यांनी स्वत: यावे अशीच कोणाचीही अपेक्षा होती; पण तसे न घडता उलट त्यांनी फौज पाठवावी यातच त्यांचा हेतु स्पष्ट झाला होता.

**पेशव्यांनी पाठवलेल्या फौजेचा पराभव :**

जिजाबाईंनी एकीकडे राज्य मोडण्यास आलेल्या फौजेला पेशव्यांनी मागे घ्यावे म्हणुन प्रयत्न चालवले आणि त्याच वेळी त्या फौजेशी सामना देण्याची तयारीही चालवली. दरम्यानच्या काळात वाटाघाटीचे आणि काही प्रदेश स्वाधीन करण्याचे वरकरणी देखावेही केले आणि अचानक एके दिवशी आपली फौज पाठवून पेशव्यांनी पाठवलेल्या फौजेचा पराभव केला. जिजाबाईंच्या मुत्सद्देगिरीची आणि पराक्रमाची कल्पना या प्रसंगाने पेशव्यांना चांगलीच आली. त्यानंतर घडलेल्या घटना पेशव्यांना केलेल्या प्रभावी प्रतिकाराच्या निदर्शक होत्या. याच सुमाराला उत्तरेत पेशवे पानिपतच्या संकटात सापडले होते.

२५मे१७६१ रोजी कुसाबाईसाहेब प्रसुत झाल्या. त्यांना मुलगा झाला असे वृत्त जिजाबाईंनी जाहीर केले. नानासाहेब पेशव्यांनाही त्या प्रमाणे त्यांनी कळवले. दरम्यान नानासाहेब पेशवे निधन पावले.प्रत्यक्षात कुसाबाईंना पुत्र झाला नव्हता. त्यांना मुलगी झाली होती. दरम्यानच्या काळात आपली लष्करी तयारी करता येईल, कदाचीत पेशवे उत्तरेच्या राजकारणात अडकतील. त्याचा फायदा आपल्याला घेता येईल असे अंदाज जिजाबाईंनी आपल्या मनाशी बांधले असावेत. म्हणून तुर्तास वेळ मारुन नेण्यासाठी कुसाबाईंना मुलगा झाल्याचे जिजाबाईंनी जाहीर केले.हे नंतर स्वत: जिजाबाईंनी माधवराव पेशव्यांकडे मान्य केले.

**दत्तक पुत्र घेण्याबाबत अडचणी :**

कुसाबाईंना मुलगी झाली हे आज ना उद्या जगजाहीर होणार हे उघड होते. पण पेशव्यांचे 'पुत्रसंतान नाही' या सबबीखाली राज्य जप्त करण्याच्या प्रयत्नांना यामुळे तात्पुरता विराम मिळाला.

कुसाबाईंना मुलगी झाल्यावर कोल्हापूर राज्यासाठी दत्तक घेण्याचा प्रश्न पुन्हा वर आला. पेशव्यांची इच्छा उमाजी भोसलेला गादीवर बसवण्याची होती. आपले राज्य स्वतंत्र आहे. तेव्हा या राज्याचा वारस ठरवण्याचा निर्णय आपणच स्वतंत्रपणे घेऊ शकतो, अशी जिजाबाईंची धारणा होती आणि ती चुकीची नव्हती.

"शरीफजीच्या वंशातील शहाजी भोसले खानवटकर इंदापुर परगण्यात राहात होते. त्यांचा मुलगा माणकोजी यास दत्तक घ्यावे अशी संभाजीराजे यांची आज्ञा होती. त्यांच्या आज्ञेला अनुसरुनच दत्तक घेतला पाहिजे असा आग्रह जिजाबाईंनी धरला. त्यानुसार त्यांनी खानवटकरांकडे आपले विश्वासु सरदार पाठवले.

शहाजी भोसले खानवटकरांना हा सर्व बेत मान्य झाला पण त्यांनी एक अट घातली, "पंतप्रधान पेशवे यांची या गोष्टीस सल्ला पाहिजे. सबब त्यांचे पत्र आम्हास आणावे म्हणजे चिरंजीवास हवाली करतो." असे त्यांनी कळवले. मात्र पेशव्यांनी आपल्या मनसुब्याप्रमाणे सातारा व कोल्हापूर ही दोन्ही राज्ये एक केली तर आपल्या मुलाचे भवितव्य काय अशीही त्यांना पुढची भिती शहाजी भोसले यांना वाटत होती.

**पेशवा माधवराव व राणी जिजाबाई भेट :**

महाराणी जिजाबाईसाहेब जेजुरीत आल्याचे माधवराव पेशव्यांना समजल्यावर माधवराव व रघुनाथराव हे जिजाबाईंना भेटण्यासाठी जेजुरीला आले. या भेटी प्रसंगी पेशवे महाराणीसाहेबांस म्हणाले, "सातारा व कोल्हापूर ही दोन्ही राज्ये पृथक नसून वास्तविक एकच आहेत. कौटुंबिक कारणानी द्वैतभाव होता तो संपला." हे ऐकताच जिजाबाई प्रचंड चिडल्या व बोलल्या, “असे आहे तर राज्य आपले स्वाधीन करुन घ्या आणि आमची खर्चाची वगैरे बेजमी करुन महायात्रेची तयारी करा. आपण पुत्रवतच असून आपणास महाराजांनी दिलेले राज्याचे अधिकारी करुन घ्यावे."

जिजाबाईंच्या या पावित्र्यामुळे माधवराव पेशवे चांगलेच अडचणीत आले. अगोदरच साताराचे दत्तक प्रकरण समाधानकारकपणे सुटलेले नव्हते. त्यामुळे पेशव्यांवर बदनामीचे प्रसंग येत होते. नानासाहेब पेशव्यांच्या निधनानंतर पेशव्यांच्या कारभाराची घडी विस्कटली होती. पानिपत येथे झालेल्या पेशव्यांच्या पराभवामुळे महाराष्ट्रातील समाजजीवन अस्थिर बनलेले होते. माधवराव पेशव्यांचा अद्याप पुरेसा जम बसलेला नव्हता. त्यातच रघुनाथराव पेशव्यांच्या भाऊबंदकीमुळे पेशवे घराण्यात अंतर्गत कुरबुरी सुरु झाल्या होत्या. पेशवे अडचणीत येत आहेत हे पाहून दक्षिणेकडील अनेक संस्थाने डोके वर काढू लागली होती. अशा परिस्थितीत कोल्हापूरचे आणखी एक नवे प्रकरण उपस्थित झाल्यास असलेल्या संकटात आणखी भर पडेल याचा अंदाज पेशव्यांना आल्यामुळे माधवराव पेशव्यांनी महाराणीसाहेबांनी त्यांच्या इच्छेनुसार दत्तक घेण्यास संमती दर्शविली आणि महाराणीसाहेबांस सन्मानाने पुण्याला आणले.

जिजाबाईंच्या मनात नेमके काय आहे ते जाणून घेवून त्यांच्या मर्जीप्रमाणे गादीच्या वंशजाचा प्रश्न निकालात लावावा व जिजाबाईंची परत खाजगी रवानगी पन्हाळयाला करावी या हेतूने पेशवे पुन्हा आईसाहेबांच्या (जिजाबाईंच्या) भेटीला गेले.पुण्याच्या मुक्कामात जिजाबाईंची विशेष काळजी पेशव्यांकडून घेण्यात आली. पेशव्यांनी त्यांना एक वाडा मोकळा करुन दिला. बरोबरच्या सरदार मानकरी लोकांचीही चांगली सोय करण्यात आली. दररोज खर्चास दिड हजार रुपये पोहचते होत असत. पेशवे नित्य भेटीस जात असत. जिजाबाईंनी दत्तक प्रकरणी पेशव्यांशी सविस्तर बोलणी करुन दत्तकाचे कागदपत्र पुरे केले व त्या कोल्हापूरास परत आल्या.

**दत्तकविधानाचा समारंभ :**

साताऱ्यास खोटा प्रकार झाला तो सर्वांच्या प्रत्ययास आला. याउपर त्या विषयीचा आक्षेप न करता आपले विचारे बाईसाहेब यांनी पुत्र घेतला हाच प्रतिपद्य करावा." पेशव्यांनी अशा प्रकारे स्पष्ट संमती दर्शविल्या मुळे शहाजी भोसले खानवटकरांचे समाधान झाले आणि त्यांनी आपला मुलगा दत्तक देण्याचे आनंदाने मान्य केले.

पेशव्यांनी आईसाहेबांस दोन लक्ष रुपये किमतीचा पोषाख व दोन लक्ष रुपये खर्चास दिले.जिजाबाईंनी पन्हाळयाला पोहचताच दत्तकविधानाचा समारंभ मोठ्या थाटाने पार पाडला. "शरीफजीच्या वंशातील शहाजीराजे भोसले खानवटकर इंदापुर परगण्यात राहात होते. त्यांचा मुलगा माणकोजी यास दत्तक घेण्यात आले. दि. २२ सप्टेंबर १७६२ रोजी नामकरण करुन 'शिवछत्रपति' हे नामाभिधान ठेवले. त्यानंतर पाच दिवसांनी म्हणजे विजयादशमीच्या मुहूर्तावर यथाविधी शिवाजी महाराजांना सिंहासनारुढ केले.

राज्यारोहणाचा समारंभ आटोपल्यावर जिजाबाईंनी पेशवे, निजाम, हैदर अली आणि जवळपासची इतर संस्थाने यांना योग्यतेनुसार वस्त्रे, अलंकार आज्ञापत्रांसहित पाठवली. त्यांच्याकडूनही पोषाख, अलंकार विनंतीपत्रांसह आले. हैदर अलीकडून पोषाख, जवाहिर, घोडे व 'बाळसुंदर' या नावाचा हत्तीभेटीदाखल आला होता.

या समारंभास सुमारे चार लक्ष रुपये खर्च झाला. महाराज सिंहासनाधिश्वर होईपर्यंत आईसाहेबांच्या नावाने शिक्का मोर्तब व कागदपत्रे होत असत ते बंद करुन महाराजांच्या नावे म्हणजेच "क्षत्रियकुलावतंस श्रीराजा

शिवछत्रपति" या नावाने सर्व राज्यकारभार सुरु करण्यात आला. ते कोल्हापूरचे छत्रपती शिवाजीराजे दुसरे म्हणून प्रसिध्द झाले होते.

**कोल्हापूरचे आरमार शक्तीशाली बनवले :**

महाराणी जिजाबाईंनी आरमारावर लक्ष केंद्रित करून आरमाराची सामर्थ्य वाढवले होते. कोल्हापूरचे आरमार हे स्वतः छत्रपती महाराजांच्या संपूर्ण नियंत्रणाखाली होते, हे या आरमाराचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. सिंधुदुर्गसारखा भक्कम जंजिरा छत्रपतींच्या ताब्यात होता आणि हे ठिकाण पश्चिम किनाऱ्यावरील मोक्याचे ठिकाण असल्यामुळे पोर्तुगीज व इंग्रजांना या किनाऱ्यावर वाहतूक करताना या आरमाराचा धाक वाटायचा. महाराणी जिजाबाईंनंतर कोल्हापूरच्या गादीवर आलेले छत्रपती शिवाजीराजे दुसरे यांनीदेखील आरमारी आघाडी उत्तमरित्या सांभाळली. पश्चिम किनारपट्टीवर आपला प्रभाव कायम राखत कोल्हापूरचे आरमार इंग्रज व पोर्तुगीज जहाजांकडून महसूल गोळा करीत असे. पोर्तुगीज कोल्हापूरच्या छत्रपतींना वार्षिक खंडणी द्यायचे. शिवाय याकाळात कोल्हापूरच्या आरमाराचे आखाती राष्ट्रांशी व्यापारी संबंध असल्याचे व यानिमित्ताने कोल्हापूरच्या छत्रपतींची जहाजे आखाती राष्ट्रांत जात असल्याचेही उल्लेख आढळतात.

आंग्रेंच्या पारिपत्यानंतर शिवरायांनी स्थापिलेले 'मराठा आरमार' नामशेष झाले असे अनेक इतिहासकार ठासून सांगत असतात. मराठा आरमार या संज्ञेतून अनेकांनी श्री शिवछत्रपतींचा वारसा असलेल्या करवीर छत्रपतींच्या आरमारास बेदखल केले आहे.

**योग्यता :**

इ.स. १७७३मध्ये राणी जिजाबाईचा मृत्यू झाला. आंग्रेंच्या आरमारानंतरही सुमारे अर्धे शतक पश्चिम किनारपट्टीवर अधिपत्य गाजविणाऱ्या करवीर राज्याच्या आरमाराचा वैभवशाली इतिहास तसेच महाराणी जिजाबाई साहेबयांनी पेशव्यांच्या शहाला प्रतिशह देऊन शेवटी आपल्या पसंतीचाच वारस करवीर गादीवर बसवून राज्याचं स्वातंत्र अबाधित ठेवले.करवीर राज्याचे रक्षण करून आपली योग्यता व कर्तबगारी सिद्ध केली.जिजाबाई साहेब यांच्या वैभवशाली व संघर्षमय इतिहास दुर्लक्षित करुन चालणार नाही.

❖ **संदर्भ -**


□. श्री. सरदेसाई गो.स. - मराठी रियासत - खंड १
□. कोलारकर शरद (१९९८) : मराठ्यांचा इतिहास (१६००-१८१८), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर,
□. पवार जयसिंगराव, (२००१), मराठी सत्तेचा उदय, पुणे.
□. श्री. वाकसकर वि.स. - शिवछत्रपतींची ९१कलमी बखर.
□. शिवचरित्रप्रदीप - भा.इ.सं.मं., पुणे
□. सेनापती घोरपडे घराण्याची कैफियत.
□. कोल्हापूर प्रांताचा अर्वाचिन इतिहास,
□. मराठी रियासत : उत्तर विभाग ३,
□. करवीर सरदारांच्या कैफियती, पृष्ठ ४७,
ऐतिहासिक लेख संग्रह : खरे, भाग ११,
करवीर रियासतीची कागदपत्रे : भाग १,

# मार्क्सवादी स्त्रीवाद : संकल्पना आणि स्वरूप

प्रा डॉ .वृषाली लक्ष्मीकांत फुके
राज्याशस्त्र विभाग प्रमुख ,श्री शिवाजी महाविद्यालय परभणी .

स्त्रीवादी विचारधारेमध्ये कार्ल मार्क्सचा सिद्धांत आणि विचार अत्यंत महत्त्वाचा ठरतो. मार्क्सने साम्यवादी विचारसरणीच्या आधारे स्त्रीवादी तत्वज्ञानाची व स्त्री प्रश्नांची उत्तरे शोधली आहेत. कार्ल मार्क्सने मग तो द्वंदात्मक भौतिकवाद , वर्गसंघर्ष सिद्धांत किंवा अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत या सारखे अनेक सिद्धांत मांडून या वर्गातील नाहीरे वर्गाच्या शोषणाची मीमांसा केली आहे. या सर्व सिद्धांतातील साम्य म्हणजे मार्क्सने आर्थिक घटकांना आणि उत्पादनाच्या साधनांना व त्याच्या विषम वाटणीवर भर दिला आहे. नाही रे वर्ग असो किंवा स्त्री असो त्यांच्या वरील अन्यायाचे कारण आर्थिक आहे असे मार्क्सने सांगितले. मार्क्सवादी स्त्रीवादाच्या मते विषमतेचे मूळ कारण भांडवलशाही व्यवस्था आहे, या व्यवस्थेमुळेच स्त्री पुरुषातील सामाजिक संबंध संपले व विषमतेला सुरुवात झाली. भांडवलशाही व्यवस्थेत व्यक्तीला वर्ग जाणीव आकार देत असते असे मार्क्स म्हणतो. मार्क्सवादी स्त्रीवादाच्या संकल्पनेत भांडवलशाही उत्पादन पद्धती ही , स्त्रियांच्या दुय्यम स्थानाला विशेष जबाबदार आहे आणि त्यामुळेच स्त्रियांचे शोषण हा वर्ग संघर्षाचा पर्यायाने भांडवलशाही व्यवस्थेचा परिणाम आहे। जशी जशी खाजगी संपत्ती निर्माण झाली तशी तशी स्त्रियांच्या शोषणाला सुरुवात झाली. त्यामुळे भांडवलशाही अर्थ व्यवस्था जोपर्यंत समाप्त केली जाणार नाही तोपर्यंत स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार व शोषण समाप्त होणार नाही .मार्क्सवादी स्त्रीवादाचे स्वरूपच असे आहे की त्यात स्त्रियांचे शोषण थांबविण्यासाठी त्यांना उत्पादन प्रक्रियेत सहभाग मिळावा हे अपेक्षित आहे. उत्पादन संबंधाचे सामाजिकीकरण स्त्रियांसह व्हावे ,पुरुषांच्या बरोबरीने उत्पादन प्रक्रियेत त्या आल्यास त्यांची उपेक्षा थांबून, स्त्रीयांचा सर्वांगीण विकास होऊ शकेल आणि म्हणूनच त्यांचे क्षेत्र कुटुंबा पुरते मर्यादित ठेवण्याला मार्क्सवादी स्त्रीवाद विरोध करतो. त्याच प्रमाणे उत्पादन साधनांच्या वितरणावर ज्याप्रमाणे सामाजिक, राजकीय आणि बौद्धिक जीवनाची संपूर्ण प्रक्रिया अवलंबून असते त्याचप्रमाणे स्त्रियांना मिळणारे हक्क त्यांना असलेले अधिकार आणि सन्मानपूर्वक वागणूक देखील आर्थिक घटकावर अवलंबून असते असे मार्क्सवादी विवेचनात आढळते.

मार्क्सवादी स्त्रीवादाचा पाया कार्ल मार्क्स आणि फेडरीक एंजल्स यांनी घातला. कुटुंब, खाजगी मालमत्ता आणि राज्य यांचा उगम (Origin of family , private property and state) या ग्रंथात स्त्रीवादी विचारसरणीची मांडली केली आहे. खरेतर मार्क्सच्या लिखाणात जेवढा विचार सर्वहारा वर्गाच्या क्रांतीचा आहे तेवढा स्त्री-पुरुष समानतेचा नसला तरी , स्त्रीवादी विचारांमध्ये मार्क्सच्या विचारांचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. कारण मार्क्स सर्वहारा वर्गाच्या क्रांतीची गरज का पडली यासाठी ज्याप्रमाणे इतिहासाचे दाखले दिले त्या प्रमाणेच स्त्रियांच्या पारतंत्र्याचा आणि अधिकाराच्या उल्लंघनालाही इतिहासाचा दाखला देतात. इतिहासाच्या सुरुवातीच्या काळात मातृसत्ताक समाजव्यवस्थेत लैंगिक संबंधामध्ये मुक्तता आणि स्त्रीला निवडीचे,जीवन जगण्याचे स्वातंत्र्य होते. घरावर, कुटुंबावर स्त्रीचे नियंत्रण होते, परंतु शेतीच्या शोधानंतर ही व्यवस्था पितृसत्ताक झाली. मार्क्स आणि फेडरीक एंजल्सच्या मते, कुटुंबात भांडवलदार पुरुष तर स्त्री ही श्रमिक असते. पुरुषांनी स्त्रियांवर एक पतीकत्व लादले. विवाहाचा हा अनैसर्गिक प्रकार असून पुरुषप्रधान समाजाने तो स्त्रियांवर लादला. संपत्तीचा वाटेकरी आणि त्याचा मालक केवळ पुरुषच असू शकतो यासाठीची व्यवस्था पुरुषसत्ताक समाजामध्ये विकसित करण्यात आली.

त्यामुळेच ज्याप्रमाणे समाजात आहे रे व नाही रे हे दोन वर्ग निर्माण झाले त्याच प्रमाणे, मालमताधारक पुरुष आणि मालमत्ता हीन स्त्रिया असे दोन वर्ग निर्माण झाले. या वर्गात अर्थातच स्त्रियांचे शोषण होत होते ,त्याचे कारण त्यांच्याकडे असलेला मालमत्तेचा अभाव हे होते. स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्याच्या अभावी अधिकाधिक पारतंत्र्य मिळत गेले॰ हार्टमन यांनी मार्क्सवादी स्त्रीवादाचे विश्लेषण करत असताना व्यवस्था आणि भांडवलशाही यामधील परस्पर संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की पुरुषप्रधान समाज व्यवस्थेमध्ये भांडवलशाहीचा विकास झाला त्यामुळे कामाचे ठिकाण किंवा घर या ठिकाणी लिंगभेदावर आधारित श्रमविभाजन मोठ्या प्रमाणात झाले. मार्क्सने देखील आपल्या वर्ग संघर्षाच्या सिद्धांतात सामाजिक वर्गातील आर्थिक दडपशाहीवर आधारित ही रचना असल्याचे सांगितले.

स्त्रीवादी विचारायावर भाष्य करताना मार्क्सवादी स्त्रीवाद म्हणतो की ,स्त्रियांना मिळालेला दुय्यम दर्जा हा जीवशास्त्रीय प्रक्रियेचा परिणाम नसून , तो सर्वसाधारणपणे इतिहासात सापडणाऱ्या सामाजिक व्यवस्थेचा परिपाक आहे. स्त्रियांचा दुय्यम दर्जा हा अपरिवर्तनीय मानला जातो , मात्र खरे तर तसे नसून या व्यवस्थेत बदल करता येतो. दुसरे म्हणजे, समाजाने कुटुंब व्यवस्थेला एक मूलभूत संस्थात्मक व्यवस्था असे मानून त्यासाठी कायदेशीर मान्यता दिली आहे. मानव शास्त्रज्ञ व पुराणवस्तू शास्त्रज्ञ यांच्यामते हा दावा चुकीचा आहे. कुटुंबाला कायदेशीर मान्यता म्हणजे कळत नकळतच कुटुंबातील स्त्री-पुरुषांच्या असमानतेवर आधारलेल्या संबंधांना मान्यता दिल्यासारखे आहे. स्त्रियांच्या कुटुंबातील दुय्यम स्थानाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आपणच मान्यता देत असतो असे यावरून स्पष्ट होते. म्हणजेच मार्क्सवादी स्त्रीवादाच्या मते कुटुंब पद्धती आणि आर्थिक, सामाजिक वर्ग यांचा घनिष्ठ संबंध आहे. समाजात वर्ग व्यवस्था आहे ही व्यवस्था विषम असून स्त्री पुरुष विषमतेवर आधारित ही वर्ग व्यवस्था आहे,असे मार्क्सवादी स्त्रीवाद म्हणतो. म्हणजेच या स्त्रीवादाच्या मते स्त्रियांचे शोषण केंव्हा सुरू झाले याचे उत्तर देताना , जेव्हापासून वैयक्तिक संपत्ती हा विचार आला तेव्हापासून स्त्रियांचे शोषण सुरू झाले असे मार्क्सवादी स्त्रीवाद म्हणतो. कारण उत्पादनाच्या साधनांवर ज्या थोड्या लोकांचा प्रभाव होता ते पुरुष होते त्यामुळेच ही पुरुषप्रधान संस्कृती उदयाला आली. याचाच अर्थ भांडवलशाही हीच पितृसत्ताक समाजाच्या मुळाशी आहे. त्यामुळे जर प्रत्येक वर्ग समुदायातील स्त्रियांना अन्यायापासून मुक्ती हवी असेल तर त्यासाठी भांडवलशाही व्यवस्था उद्ध्वस्त करावी लागेल असे मार्क्सवादी स्त्रीवाद म्हणतो. साम्यवादी समाजरचनेमध्ये कोणत्याही प्रकारचे आर्थिक परावलंबन असत नाही. परिणामी स्त्रियासुद्धा आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होऊन शोषणापासून मुक्त होतील .मार्क्सवादी स्त्रीवादानुसार महिलांना काम करता येणे , अर्थार्जन करता येणे ही गोष्ट त्यांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देणारी आहे. कारण स्त्रियांच्या दुर्दशेचे एकमेव अकारण उत्पादन व्यवस्थेची संरचना आहे जी की, विषमतेवर आधारित आहे. उत्पादनाच्या साधनांवरील नियंत्रण हळूहळू स्त्रियांना त्यांच्या हक्कावरील नियंत्रणात रूपांतरित होत असते. त्यामुळे स्त्रियांना त्यांचे हक्क प्राप्त करून घेण्यासाठी भांडवलशाही व्यवस्था आणि पितृसत्ताक समाजव्यवस्था यांच्यातील एकी तोडली पाहिजे असे मार्क्सवादी स्त्रीवाद म्हणतो.

मानवी जीवनाच्या इतिहासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर स्त्रियांचे शोषण जन्माला आले हा टप्पा खाजगी संपत्तीच्या उदयाचा होता . ही शोषण व्यवस्था कमी किंवा नष्ट करायची असेल तर ज्या व्यवस्थेत शोषण केले जाते ती व्यवस्थाच नष्ट झाली पाहिजे किंवा ती व्यवस्था नष्ट करावी लागेल. म्हणूनच आर्थिक दृष्ट्या स्त्रियांना सक्षम करणारी साम्यवादी समाजाची उभारणी करावी असे मार्क्सवादी स्त्रीवादाला वाटते. समाजात प्रत्येक स्त्रीला रोजगार उपलब्ध झाला तर त्यामुळे स्त्रियांचे आर्थिक परावलंबन नष्ट होऊन स्त्रिया आर्थिक दृष्ट्या सक्षम बनतात. घरकाम व मुलांचे संगोपन ही कौटुंबिक जबाबदारी केवळ स्त्रियांची न राहता कुटुंबातील प्रत्येकाची ही सामुदायिक जबाबदारी असून ती सर्वांनी मिळून पार पाडली पाहिजे असे साम्यवादी समाजरचनेत झाल्यामुळे पारंपारिक

जबाबदारीपासून स्त्रिया मुक्त होतील. श्रमाच्या बाजारपेठेत स्त्रियांचा सहभाग वाढेल आणि स्त्रिया स्त्री-पुरुषाच्या या वर्ग संघर्षात किती प्रमाणात सहभागी होतात यावर स्त्रीमुक्तीचे यश अवलंबून आहे असे मार्क्सवादी म्हणतात . विवाह संस्थेचा उदय खाजगी मालमत्तेशी जोडला आहे. कुटुंबात पुरुष भांडवलदार आणि स्त्री श्रमिक असते. संपत्ती पुरुषांनाच हस्तांतरित व्हावी अशी एक प्रकारची व्यवस्था करण्यात आली असल्यामुळे कुटुंबात आणि पर्यायाने समाजात आर्थिक दृष्ट्या संपन्न आणि मालमत्ताहीन स्त्रिया असे दोन वर्ग निर्माण झाले. अशा प्रकारच्या या समाजात स्त्रियांचे शोषण होत होते ,विशेषतः ज्या कुटुंबात संपत्ती आहे तेथे स्त्रियांचे शोषण अधिक झाले तर, या उलट जिथे श्रमिक वर्गातील स्त्रिया आहेत त्यांचे शोषण कमी झाले . कारण श्रमिक वर्गातील स्त्रिया या स्वतः सार्वजनिक क्षेत्रात काम करून अर्थार्जन करतात व त्या कमी प्रमाणात पुरुषांवर अवलंबून असतात. त्यामुळे जिथे स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य तिथे स्त्रिया आर्थिक दृष्ट्या सक्षम झाल्या आणि तिथे स्त्रियांचे शोषण कमी झाले असे मार्क्सवादी स्त्रीवाद म्हणतो. मार्क्सवादी स्त्रीवादी दृष्टिकोनातून पाहिल्यास भांडवलशाही व्यवस्थेत स्त्रियांच्या आर्थिक परावलंबित्वामुळे त्यांच्यावर होणारा अन्याय वाढला. भांडवलशाही व्यवस्थेला स्त्रियांनी घरात राहून घरातली कामे करणे हे अधिक योग्य वाटते त्याचे कारण म्हणजे स्त्री घरात राहिल्यामुळे पुरुषांना घर कामापासून मुक्ती मिळते आणि ते सार्वजनिक क्षेत्रात जास्त चांगले काम करू शकतात आणि उत्पादन वाढीस हातभार लावतात. एका अर्थाने स्त्रिया घरातली बाजू सांभाळत असल्यामुळेच पुरुष चांगले काम करू शकतात . पर्यायाने स्त्रीयाचे देखील उत्पादन क्षेत्रातील योगदान मोठे आहे , परंतु त्याची दखल घेतली जात नाही. म्हणूनच स्त्री वर्गावर त्यामुळे अन्याय होतो.

स्त्रियांनी सार्वजनिक क्षेत्रात काम करणे स्त्रीवाद महत्त्वाचे मानतो परंतु त्यासाठी घरकामाच्या मोठ्या जबाबदारीतून तिची सुटका होणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास कौटुंबिक जबाबदारीतून मुक्त न करता सार्वजनिक उद्योगात स्त्रीला कामगार बनवणे म्हणजे तिचे शोषण अधिक तीव्र करणे होय . यासाठी मार्क्सवादी स्त्रीवाद घरकाम सामुदायिक रीतीने व्हावे यासाठी आग्रही आहे. म्हणजेच कुटुंबाच्या पातळीवर स्त्री-पुरुष विषमतेवर आधारित असणारे वर्तन आहे त्याचा प्रभाव सार्वजनिक क्षेत्रात देखील पडतो याची चिकित्सा मार्क्सवादी स्त्री वादाने सार्वजनिक जीवनात केली आहे. काही पदे ही स्त्रियांना कार्य करण्यासाठी चांगले असतात असे समजले जाते तर, काही उद्योग व्यवसायां मध्ये स्त्रियांनी सहभाग घेऊ नये अशी समाजाची मानसिकता असते. या मानसिकतेविरुद्ध देखील मार्क्सवादी स्त्रीवाद संघर्ष उभा करतो. श्रमाच्या बाजारपेठेत स्त्रियांचा सहभाग किती वाढतो आणि स्त्रिया वर्ग संघर्षात किती प्रमाणात सहभागी होतात यावर स्त्रीमुक्तीचे यश अवलंबून आहे असे मार्क्सवादी स्त्रीवाद म्हणतो.

थोडक्यात मार्क्सवादी स्त्रीवाद आणि स्त्रियांवरील अन्यायाची बीजे ही भांडवलशाही व्यवस्थेत रुजलेली असल्याचे सांगितले आहे. समकालीन भांडवलशाही व्यवस्थेत स्त्री-पुरुष हा लिंगभेद रुजवण्यात आला आहे. सारांश रूपाने भांडवलशाही वर्ग व्यवस्थेतून स्त्री-पुरुष असमानता अस्तित्वात आली ,समाजातील उत्पादनाची साधने व स्त्रियांच्या आर्थिक शोषणाचा अन्योन्य संबंध असून स्त्रियांचे समाजातील स्थान हे उत्पादनाच्या साधनांवर अवलंबून आहे असे मार्क्सवादी विचारवंत म्हणतात. भांडवलशाही व्यवस्था नष्ट करून समाजवादी समाजव्यवस्थेत स्त्रियांचे शोषण थांबेल असे मार्क्सला वाटते. परंतु ज्या सोवियत रशियामध्ये मार्क्सवाद अस्तित्वात आला त्या देशातील स्त्रियांना देखील दुय्यम स्वरूपाची वागणूक मिळाली असल्याचे दिसते. त्यामुळे भांडवलशाहीच्या अस्तातून स्त्री शोषण थांबेल असा आशावाद खरा नसला तरी स्त्री पुरुष समानतेसाठी स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे गरजेचे असल्याचे आज अनेक तज्ञांनी मान्य केले आहे . किंबहुना समाजात स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्याबरोबरच निर्णयाचे स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि स्त्रीवादी रूढी , प्रथा ,परंपरा ज्या स्त्रियांना दुय्यम व पुरुषांना प्रमुख दर्जा

देतात त्यांचा बिमोड करणे देखील तितकेच गरजेचे असल्याचे दिसते .मार्क्सवादी स्त्री वादाने स्त्रियांच्या आर्थिक उन्नतीचा विचार मांडून स्त्री स्वातंत्र्याची नवी दिशा दाखवली आहे.

**संदर्भ सूची :**

1. स्त्री आणि राजकारण – डॉ. प्रशांत अमृतकर
2. राजकीय सिद्धांतातील मूलभूत संकल्पना – प्रा दिगंबर आ. खेडेकर
3. राजकीय विचार प्रणाली – डॉ. शुभांगी राठी.

ISSN : 2278-9308
March, 2022

# लिंगभाव आणि स्त्रीवाद

**डॉ. चांदोजी सोपान गायकवाड**
सहाय्यक प्राध्यापक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ओंदे

**प्रस्तावना:**

प्रस्तूत शोधनिबंधात लिंगभाव आणि स्त्रीवाद या संदर्भात मांडणी करत असताना 'लिंगभाव' ही संकल्पना समजाऊन घेऊन लिंगभावातून स्त्रीवादाची चळवळ कशी पुढे आली ही मांडणी केलेली आहे. 'स्त्रीवाद' ही संकल्पना आता अभ्यासंकामध्ये परिचित झाली आहे. सुमारे चार दशकापेक्षाही जास्त या चळवळीवर विविध अंगाने अभ्यास होत आहे. स्त्रीवादाचे विविध प्रकारही अभ्यासंकानी मांडले आहेत. 'स्त्रीवाद' ही मुलत: समाजनिष्ठ अशाप्रकारची संकल्पना आहे. विशिष्ट राष्ट्रात विशिष्ट समुहात स्त्रीकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा आहे. तिला दिले जाणारे स्वातंत्र्य कोणत्या प्रकारचे आहे. ती कोणत्या सामाजिक बंधनात आहे. या वरती विशिष्ट राष्ट्रातील स्त्रीवादी भुमिकेची पायाभरणी होत असते. मुळात स्त्रीवादाची निर्मिती ही स्त्री स्वातंत्राच्या पुरस्कारातून झाली. पश्चिमेकडील राष्ट्रात स्त्री चळवळी राजकीय स्वातंत्र्याच्याप्रेरणेतून निर्माण झाल्याचे दिसून येते. साहित्यातील स्त्रीवादाची चळवळ ही सर्वंकष अशा प्रकारची स्त्रीवादी चळवळ म्हणता येईल एवढी व्याप्त ठरली. जगामध्ये शीतयुद्धाच्या समाप्ती नंतर आंतरराष्ट्रीय राजकीय परिस्थितीत स्त्रियांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने लेखनाची एक परंपरा निर्माण झाली. या लेखनात प्रामुख्याने सिंथिया एनलो, जे. ॲन.टिकनर या दोघांनी केलेले लेखन महत्वपुर्ण मानले जाते. पुढे स्त्रीवाद्यांनी स्त्रीवादी अभ्यासाच्या विविध पद्धती मांडल्या त्या पुढील प्रमाणे:

१.उदारमतवादी स्त्रीवाद
२. अलगततावादी स्त्रीवाद
३. मार्क्सवादी किंवा समाजवादी स्त्रीवाद
४. उत्तर आधुनिक व उत्तर वासाहतिक स्त्रीवाद

वरील सर्व स्त्रीवादी अभ्यासाची पायाभरणी ही प्रामुख्याने राजकीय विचार प्रणालीतून विकसित झालेली दिसून येते. मुळात राजकीय विचार प्रणाली ही समाजव्यवस्थेला आकार देत असते. त्यामुळे राजकीय स्वातंत्र्याच्या अधिकारातून निर्माण झालेली स्त्रीवादी चळवळ पुढे विविध अंगाने विकसित होत गेलेली दिसून येते. लिंगभावात्मक दृष्टीकोनातून स्त्रीला नेहमी जागतिक पातळीवर कमी लेखल्या गेले. तिच्या 'स्व' च्या अस्तित्व शोधातून स्त्रीवाद निर्माण झाला. हा अस्तित्व शोध तिला लिंगभावात्मक जाणीवेतून झाला. 'स्त्री' म्हणून तिच्या वाट्याला आलेले आयुष्य लिंगभेदाच्या पातळीवर सर्वत्र सारखेच असलेले दिसून येते. लिंगभेदाची जाणीव ही स्त्री आणि पुरुषात विषमता निर्माण करणारी आहे. विषमतेच्या जाणीवेतून स्त्रीवादाची उभारणी झाली.

**लिंगभाव संकल्पना:**

लिंगभाव आणि स्त्रीवाद ही संकल्पना समजावून घेण्याआगोदर आपणास लिंगभाव या संकल्पनेचा थोडक्यात अभ्यास करणे महत्वाचे ठरते. लिंग हा शब्द इंग्रजीतील जेन्डर या शब्दाशी निगडीत आहे. व्याकरणिक दृष्ट्या आपण लिंग म्हणजे काय हे जाणतो.पण अलीकडे समाजशास्त्रीय अभ्यासात जेन्डर अर्थात लिंग या शब्दाला खुप महत्व आलेले आहे. स्त्री आणि पुरुषातील सामाजिक अभ्यासाची दिशा म्हणून अलिकडे 'लिंगभाव' हा शब्द प्रयोग होऊ लागला आहे. स्त्रीवादाच्या अभ्यासातूनच ही नवी संकल्पना विकसित झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. स्त्री-पुरुषांच्या सामाजिक वास्तवाचे आकलन होण्यासाठी हा शब्द प्रयोग केला जातो. सामाजिक आकलनामागची प्रमुख भुमिका हीच आहे की स्त्री-पुरुषातील विषमता.

लिंगभावाची घडण ही समाजमनात होत असते. स्त्रीच्या शरीर रचनेत लिंगभावाची स्फुरणे दडली आहेत. मुळात शरीर ही नैसर्गिक निर्मिती आहे.पण स्त्री आणि स्त्रीचे शरीर हे लिंगभावाचे पुरुषसत्ताक मानसिकतेतून निर्माण झालेले सूत्र आहे.प्रत्येकजण जन्माला येताना नर किंवा मादी म्हणून जन्माला येतो. पण समाजघडणीच्या प्रक्रियेत त्याला स्त्री किंवा पुरुष म्हणून ओळखले जाते. हे ओळखले जाणे नैसर्गिक नियमांच्या पलीकडे जाते तेव्हा लिंगभावाची जाणीव विकसित होत असते. लिंगभाव ही संकल्पना प्रथम वापणाऱ्या विचारवंतातील जेष्ठ विचारवंत ॲन ओकले या म्हणतात की,"लिंगभाव ही एक सांस्कृतिक बाब आहे त्यातून स्त्री व पुरुषाची बाईपणात व

पुरुषपणात होणारी सामाजिक वर्गवारी सुचित होते. एखादी व्यक्ती स्त्री की पुरुष हे जैविक पुराव्याने ठरते. परंतु व्यक्तीचे बाईपण-पुरुषपण मात्र स्थळकाळानुरूप बदलणाऱ्या सांस्कृतिक निकषाने ठरते. म्हणजेच 'लिंग' हे वैशिष्ट्य स्थिर असते. लिंगभाव मात्र बदलत असतो हे स्वीकारायला हवे." ॲन ओकले यांच्या वरील मतावरून लिंग ही नैसर्गिक संज्ञा आहे तर लिंगभाव ही पुरुषसत्ताक मानसिकतेतून समाजनिष्ठ निर्माण झालेली संज्ञा आहे.

**लिंग म्हणजे काय?: ( Sex)**

लिंग ही नैसर्गिक संकल्पना आहे. जीवशास्त्रीय दृष्ट्या विचार करता स्त्री-पुरुषांच्या जननेन्द्रीयातील फरकामुळे लिंग ही संकल्पना विकसित झाली. लिंग नैसर्गिक असते. लिंग हे शक्यतो सहज बदलता येत नाही. म्हणजे ते स्थीर आहे. आणि ते सार्वत्रिक आहे.

**लिंगभाव: (Gender):**

लिंगभाव ही संकल्पना संस्कृतीनिष्ठ असून ती समूहवर्चस्वातून निर्माण झाली आहे.लिंगभावात सामाजिक सांस्कृतिक प्रतिबिंब पडलेले असते.लिंगभावात गुण,वर्तनप्रकार व जबाबदाऱ्या यांची स्त्री आणि पुरुष या दोघांच्याही दृष्टीकोनातून विभागणी करता येते. लिंगभाव बदलत जाणारा असतो. देश,काल .समाज या सर्वाबरोबर लिंगभाव बदलत जात असतो. पण लिंगभावात एक प्रमुख गोष्ट असते ती म्हणजे स्त्री म्हणून स्त्रीचे दुय्यमत्व. या दुय्यमत्वातूनच पुढे विविध प्रकारच्या चळवळी निर्माण झाल्या. जगातील लिंगभावाचे एक सुत्र समान असलेले दिसते आणि ते म्हणजे स्त्री ही एक उपभोग्य वस्तू आहे. या संदर्भात लॉडिया व्हॉन वेरलॉफ यांचे मत अतिशय महत्वाचे आहे. त्यांच्या मते," इतिहासात कोणत्याच सामाजिक व्यवस्थेने नैसर्गिक लिंगभेदाचा वापर,विस्तार व विकृतीकरण आमच्या समाजव्यवस्थेइतपत क्रूरपणे व सुव्यवस्थितपणे केला नसेल या व्यवस्थेने प्रथम नैसर्गिक लिंगभेद कृत्रिमपणे सामाजिक लिंगभावात रुपांतरीत केला. नरातून पुरुषत्व मादीतून स्त्रीत्व निर्माण केले. खरे तर पुरुष/नर म्हणजेच मानवजात आणि स्त्री म्हणजे केवळ मादीपण अशीच धारणा तयार केली आणि सर्वात शेवटी हे भेद निर्माण करून आता ही व्यवस्था त्यांना 'नैसर्गिक' म्हणते आणि स्त्रियांचे आर्थिक, सामाजिक शोषण करण्याची वाट मोकळी करून देते." लॉडिया व्हॉन वेरलॉफ हे मत अतिशय मुलगामी अशा स्वरूपाचे आहे. पुरुषसत्ताक मानसिकता लिंगभावात्मक जाणीव विकसित करीत असताना पुरुषी वर्चस्वाचे खेळ खेळते.

**स्त्रीवादाचे व लिंगभावाचे स्वरूप:**

लिंगभावातून स्त्रीवाद कसा विकसित होत गेला याचा अभ्यास करण्यापूर्वी आपण स्त्रीवाद म्हणजे नेमके काय? अर्थात स्त्रीवादाची संकल्पना समजावून घेऊयात.स्त्रीवादाची मांडणी करीत असताना सिमॉन दि बोव्हा यांनी म्हटले आहे , 'स्त्री ही स्त्री म्हणून जन्मत नाही तर ती घडविली जाते'. सिमॉन दि बोव्हाचे वरील वाक्य स्त्रीला लिंगभावात्मक विषमतेत कसे ढकलेले जाते. पुरुषसत्ताक मानसिकतेतून लिंगभाव विकसित होत असतो. डॉ. अश्विनी धोंगडे यांनी म्हटले आहे की, ' स्त्रीवाद म्हणजे पुरुषांना दोष देणे नाही.तर पुरुषसत्ताक व्यवस्थेला दोष देणे' आपल्या ' भारतीय भाषातील स्त्रीवादी साहित्य या ग्रंथात त्यांनी ही भुमिका मांडली आहे. वरील दोन्ही भुमिकातुन हे स्पष्ट होते की लिंगभावात्मक जाणीवेतून स्त्री –पुरुष विषमता विकसित होत गेली. स्त्रीवाद ही विचारसरणी मुळात स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी आहे. प्रस्तुत शोधनिबंधात विस्तारभयास्तव स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास करणे इष्ट नाही. लिंगभावात्मक जाणीवेतून स्त्रीवादी विचार विविध प्रकारे कसा विकसित होत गेला या संदर्भातील नवमांडणी करणे ही ह्या शोधअभ्यासाची प्रस्तुतता आहे. स्त्रीवादाचे अस्तित्व समानतेचा भुमिकेत आहे. समानता कोणत्या पातळीवर हवी आहे तर ती विविध पातळयावरती हवी आहे. माझे स्त्री म्हणून नाकारलेले सर्व अधिकार माणूस म्हणून मला हवे आहेत .मुळात स्त्री आणि पुरुष असा लिंगभावात्मक विषमतावादी विचारच तिला मान्य नाही. ती मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार करते. जागतिक पातळीवरील विषमतावादी लिंगभावाची जाणीव ती नाकारते. निसर्गाने स्त्री आणि पुरुष या दोघानाही माणूस म्हणून जन्माला घातले. जन्म देणारी स्त्री निर्मितीचे प्रतिक आहे . तिलाच लिंगभावाच्या जाणिवेतून कमी लेख्ल्या गेले. जगातील स्त्रीवादी चळवळी या प्रामुख्याने लिंगभावाच्या विषमतावादी जाणिवेतून निर्माण झालेल्या दिसून येतात. स्त्रीवादाचे अस्तित्व समानतेच्या शोधात आहे. स्त्री म्हणून मी ही स्वतंत्र आहे. मला माझ्या मुक्त मनाने व मानाने जगू द्या या समतावादी विचारात आहे.

भारतात वर्णव्यवस्थेचे प्राबल्य भारतीय समाज मनावर प्रचंड राहिलेले आहे. मनुस्मृती मध्ये तर स्त्रीला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य देऊ नये असे स्पष्टच सांगितले. तथागत सिध्दार्थ गौतम बुद्धाने आपल्या संघात इ.स.पु.६ व्या शतकात स्त्रियांना स्थान दिले. प्राचीन भारतातातील स्वयंवर पध्दती यातुनही स्त्रीप्रधान समाज व्यवस्थेचे प्रतिबिंब पडलेले दिसते. यातील अनेक बाबीवर आपणास विविध अंगाने अभ्यास करता येईल. यातून मातृसत्ताक जीवन पद्धतीत स्त्रीला मान-मरताब होता हे सिद्ध होते. मनुस्मृतीच्या अमलानंतर या देशात विविध अंगाने सामाजिक विषमता विकसित होत गेली. स्त्रीला दास-शुद्राच्या ठिकाणी गणल्या गेले.मग ती स्त्री उच्चवर्णीय असली तरी. मनुवादी विचारसरणीतून भारतीय समाजव्यवस्थेत स्त्री गुलाम बनली. एकीकडे स्त्रीला सुंदरतेचे प्रतीक मानल्या गेले तिचे शरीर म्हणजे उपभोग्य ही पुरुषी मानसिकता लिंगभावाचे प्रदर्शन करणारी आहे. राज्याच्या महालात सुंदर स्त्रिया दासी म्हणून राहत असत. राजालाही अनेक राण्या असत या सर्व तत्कालीन सामाजिक जीवनातून व्यक्त होणारा लिंगभाव हा प्रामुख्याने विषमतावादी असलेला दिसून येतो. एकीकडे स्त्रीला चंडी, महाकाली, दुर्गा अशा अनेक रूपातून पुजतं असताना तिच्याकडे लिंगभावाच्या दृष्टीकोनातून जेव्हा पाहिले जाते तेव्हा प्रचंड विषमता असलेली दिसून येते. जगातील इतिहासात जे स्त्री सामर्थ्याचे दाखले दिसतात ते अत्यंत प्रेरणादायी असले तरी एकंदरीत समाजात पुरुषी वर्चस्व जास्त असलेले दिसून येते. या सर्वामागे लिंगभावाची जाणीव हे प्रमुख कारण आहे.

जगात १७८९ साली फ्रेंचच्या राज्यक्रांतीतुन मानवी स्वातंत्र्याचा विकास झाला. ०८ डिसेंबर १९४८ रोजी प्रसिद्ध झालेला मानवी हक्काचा ३० कलमी जाहीरनामा स्त्री-पुरुष स्वातंत्र्याचे गोडवे गाऊ लागला. यातून जगातील स्त्री-पुरुष एकसमान आहेत ही जाणीव विकसित होत गेली. स्त्री-पुरुष समान आहेत या म्हणण्याला संवैधानिक आधार मिळाला. यातुन स्त्री-पुरुष समानतेच्या चळवळी निर्माण होऊ लागल्या.१७९० साली ऑलीच द गुंझ या लेखिकेने स्त्री-पुरुष समानतेची मागणी केली. १७९२ मध्ये मेरी उल्स्टोन क्राफ्ट यांनी ' The Indication Women' हा ग्रंथ लिहून स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. १८९० साली निर्माण झालेल्या 'सफ्रेजेट' चळवळीमुळे १९२० साली इंग्लंड मधील स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. स्त्रीवादी चळवळीची ही सुरुवात प्रामुख्याने लिंगभावाच्या विषमतावादी जाणिवेतून निर्माण झाली. पुढे १९४९ मध्ये 'सिमॉन दि बोव्हा' यांचा 'सेकंड सेक्स' हा ग्रंथ स्त्रीवादाची पायाभरणी करणारा ठरला. या ग्रंथाने एक नवे वैचारिक वादळ निर्माण केले. लिंगभावात्मक पुरुषी जाणीवेची चिरफाड या ग्रंथाने केली. व्हर्जिनिया वुल्फ यांच्या  या ग्रंथाने स्त्रीच्या सांस्कृतिक पातळीवर कोंडल्या जाणाऱ्या श्वासाची मांडणी केली. एका अर्थाने या ग्रंथांनी जागतिक पातळींवर स्त्रीवादासाठी एक नवे पर्यावरण उभे केले. लिंगभावाची विषमतावादी जाणीव फाडून टाकण्याचे काम या ग्रंथांनी केले.ॲलन शोवॉल्टर या अमेरिकन समीक्षकाने साहित्यातील स्त्रीवादी अभ्यासाचे  प्रकार मांडले ते असे :

१.केवळ स्त्रियांनी लेखन केलेले स्त्री-साहित्य (फिमेल)
२. पुरुष सत्ताक समाजात गौणत्व स्वीकारून राजकीय भुमिका न घेता स्त्रियांनी केलेले लेखन (फेमिनीन)
३. पुरुष सत्ताक वा लिंगवादी समाज वा विचारसरणी या विरूद्ध न डगमगता केलेले लेखन (फेमिनिस्ट)

वरील सर्व विचार प्रवाहातून पुरुषसत्ताक मानसिकतेला आव्हान दिले जात होते.एका अर्थाने जागतिक पातळीवर लिंगभावात्मक जाणिवेतून विषमतेची जी प्रचंड दरी निर्माण झाली होती ती भरून काढण्याचे काम या स्त्रीवादी विचाराने सुरु केले.

लिंगभावाची भारतातील जाणीव तर प्रचंड प्रखर असलेली दिसून येते. स्त्रीला दासी म्हणून स्वीकारण्याची परंपरा याच देशातील. सती जाण्याची प्रथा याच देशातील. केशवपनाची प्रथा याच देशातील. तिने विधवा म्हणून जीवन जगत असताना काय खावे आणि काय नेसावे ही ठरवणारी व्यवस्था याच देशातील. तिच्यावर असंख्य अत्याचार परंपरेच्या नावाखाली केल्या गेले. आणि आजही ज्ञात-अज्ञात स्वरूपात होत असताना दिसतात. म्हणून समाजात तिला अबला म्हणून ओळखले जाते. सरकार महिलांचे सबलीकरण या सारखे कार्यक्रम राबवतात. मुलगी जन्माला येऊ नये अशी मानसिकता ही याच देशात असते. या साऱ्या विविध विषमतावादी समाजरचनेतून हेच स्पष्ट होते की लिंगभावाची किती प्रखर आणि जबरदस्त पकड भारतीय स्त्री-पुरुष समाज मानसिकतेत आहे.

मनुवादी विचारसरणीने भारतीय जनमनावर प्रचंड पकड ठेवलेली आहे. त्यामुळे भारतातील स्त्रीवादाचे स्वरूप निश्चितच वेगळे आहे. इथे ताराबाई शिंदेनी १८८२ साली लिहिलेला 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ भारतीय स्त्रीवादी चळवळीचे प्रेणास्त्रोत आहे. जगातील स्त्रीवादी विचाराच्यापूर्वी ताराबाई शिंदेनी मांडलेला स्त्रीवादी विचार हा सबंध जगातील स्त्रीयासाठी महत्वपुर्ण ठरणारा आहे. लिंगभावाच्या विषमतावादी जाणिवेतून स्त्री कशी दास बनते याचे अत्यंत विद्रोही स्वरुपात विश्लेषण ताराबाई शिंदे यांनी केलेले आहे. स्त्रीवादी भुमिकेतून वैश्विक स्तरावर विविध विचारवंतानी लेखन केलेले आहे. ताराबाई शिंदे यांनी मांडलेली भुमिका लिंगभाव जाणिवेतून स्त्रीचे कसे शोषण होते आणि हे शोषण थांबविण्यासाठी स्त्री-पुरुष दोघांचीही लिंगभावात्मक जाणीव बदलणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. समानतेचे सुत्र स्वीकारणे हे दोघांचेही काम आहे.

स्त्री म्हणून जन्माला येणे हे काही पाप नाही. पण वैश्विक समाजमानसिकतेचा विचार करता स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये प्रचंड भेद-भाव असलेला आपणाला आजही दिसून येतो. स्त्री म्हणून तिच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन,तिच्या शरीराकडे उपभोगवादी वस्तू म्हणून पाहण्याची नजर. समाजमनाची ही पुरुषप्रधान मानसिकता ही लिंगभाव भावनेचे प्रतिपादन करणारी आहे. मादी म्हणजे उपभोग्य असाच दृष्टीकोन राहिला आहे. आज जागतिक बाजारात काय चालले आहे. आज जी विविध प्रकारची प्रसारमाध्यमे विकसित झाली आहेत. त्यांच्या उत्पादन विस्तारासाठी अथवा विक्रीसाठी स्त्री केंद्रस्थानी राहिली आहे. जाहिरातीत स्त्री देहाचा केला जाणारा वापर पुरुषवर्चस्ववादी भूमिकेतूनच पुढे आलेला दिसून येतो. लिंगभावाचे उन्मादी स्वरूप तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर विकसित होत गेलेले दिसून येते. आज आपण स्त्री स्वतंत्र झाली,स्त्री शिकली,स्त्री विविध क्षेत्रात पदार्पण करणारी ठरली असे म्हणतो हे चित्र आशादायी ठरत असले तरी एकंदरीत स्त्री लोकसंखेच्या प्रमाणात तिचे सर्व स्तरातील अस्तित्व पुरुषी वर्चस्वाने झाकोळलेले आहे.

स्त्रीला आपण स्त्री आहे असे जेव्हा हे वाटते तेव्हा ती लिंगभावात्मक प्रभावातून समाज मर्यादा टिकवून ठेवण्याची धडपड करते. स्त्रीवर लिंगभावात्मक मानसिकतेचा विविधप्रकारे प्रभाव पडत असतो. मी स्त्री आहे असे वाटणे म्हणजेच लिंगभाव स्वीकारणे. स्त्रीची स्त्री म्हणून नैसर्गिक ओळख होण्यापेक्षा तिची मादी म्हणून अधिक ओळख होत असते. भारतासारख्या मनुवादी विचारधारेचा प्रभाव असलेल्या समाजव्यवस्थेत स्त्रीला नेहमीच गुलाम म्हणून पाहिल्या गेले. संविधानाने स्त्री-पुरुष समान मानले दोघांनाही कायदेशीर अधिकार मिळाले. पण मनातील मनू जो पर्यंत जिवंत आहे तो पर्यंत इथल्या स्त्रीला समान पातळीवरील अधिकार मिळणे शक्य नाही. स्त्रीची गुलामी आपणाला विविध पातळयावर तपासता येते. एक प्रकारे लिंगभावाच्या जाणिवेतून परंपरेने आलेली गुलामीची मानसिकता तिने स्वीकारलेली असते. भारतीय स्त्रीयांच्या बाबतीत काही प्रमुख बाबी लिंगभावात्मक गुलामीचे दर्शन घडवितात.

**भारतीय स्त्रीचे दाग-दागिने आणि लिंगभाव:**

भारतीय स्त्री जीवनात दागिना हा प्रचंड ओढ आणि आकर्षणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. स्त्रीला आपण सुंदर दिसावे असे वाटणे नैसर्गिक आहे. पण ती सुंदर दिसण्यासाठी जे वेगवेगळया प्रकारचे दागिने निर्माण झालेले आहेत ते प्रामुख्याने पुरुषीवर्चस्ववादी भुमिकेचे समर्थन करणारे आहेत. स्त्री सुंदर दिसण्यासाठी जे नटण्याचे प्रयत्न करते त्या मानाने पुरुष कमीच नटतो. स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन कोमल,गुलाब, चवळीची शेंग अशा शब्दांनी केले जाते तर पुरुष सौंदर्य म्हणजे रांगडा,रुबाबदार,पिळदार शरीरयष्टी असलेला असा असावा असे म्हटले जाते. पुरुषाचा रुबाब तर स्त्रीचा नखरा असे शब्द प्रयोग या बाबतीत केले जातात. पुरुषी वर्चस्वातूनच ही मांडणी झालेली दिसते.

स्त्रीच्या दागिन्यातून दिसणारा लिंगभाव स्त्री-पुरुष विषमतेचे प्रतिक आहे. स्त्रीचे दागिने म्हणजे तिच्या नाकात,कानात, हातात,दंडात,गळयात, कमरेत,पायात, पायाच्या बोटात एकंदरीत नख-शिखांत तिला दागिन्याने मढविण्याचा तिला प्रकार आहे. तर मग पुरुषासाठी किती दागिने आहेत याचा विचार केला तर नगण्य. स्त्रीचे दागिने म्हणजे तिचे गुलामीचे प्रतिक आहेत. त्याच बरोबर दागिना हा तिचे सौंदर्य खुलविणारा उपहार आहे ही पुरुषप्रधान मानसिकता लिंगभावात्मक जाणिवेला खतपाणी घालणारी आहे. तिच्या कडून केले जाणारे व्रत-वैकल्ये, उपास-तापास, पती परमेश्वर ही भावना अशा असंख्य कृतीतून तिला एक प्रकारे मानसिकरित्या गुलाम बनविले आहे. आणि परंपरेच्या नावाखाली तिने हे स्वीकारले आहे. स्त्रीची वस्त्रे-प्रावरणेही लिंगभेदाच्या जाणिवेतून विकसित

झालेली दिसून येतात. मुळात वस्त्र हे शरीर झाकण्यासाठी लज्जा रक्षणासाठी वापरलं जाणारं महत्वपुर्ण साधन आहे. वस्त्रे कोणी कोणती कशी व कीती घालावीत हा त्या व्यक्तीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. परंतु पुरुष प्रधान मानसिकतेत स्त्रीच्या वस्त्र-प्रावरणाची जी लिंगभावात्मक निर्मिती केली जाते अथवा लिंगभावात्मक पद्धतीने जे प्रदर्शन केले जाते.त्यातून स्त्रीला उपभोग्य वस्तू म्हणून प्रस्तुत करण्याचा प्रयत्न होताना दिसून येतो. विविध चित्रपट, फॅशन शो अथवा अन्य उत्पादन जाहिरातीत स्त्रीला मादकता आणि सौंदर्य याच भुमिकेतून दाखविला जाण्याचा अधिक कल असतो. सामान्य जीवनातही स्त्रीने कोणती कपडे घालावीत कोणती कपडे घालू नयेत यावरतीही बंधने असलेली दिसून येतात. लिंगभेद करत असताना निर्माण होणारी ही विषमता अधिक तीव्र आणि समाजघातक असते. पुरुषी वर्चस्वाच्या मानसिकतेतून ही स्वीकारलेली विषमता लिंगभावाच्या जाणिवेतून निर्माण झालेली असते. या सर्व विषमतावादी व्यवस्थेला नाकारणारी चळवळ स्त्रीवादातून पुढे येते. स्त्रीवाद त्या समूहनिष्ठ जाणिवेतून निर्माण होत असतो. समता प्रणित मुल्यव्यवस्था ही स्त्रीवादाची आग्रही मागणी आहे. म्हणून स्त्रीवादाची मांडणी करतांना लिंगभावात्मक जाणिवांचे विश्लेषण अत्यंत महत्वाचे ठरते.

**समारोप आणि निष्कर्ष :**

प्रस्तूत शोध निबंधाच्या शोध अभ्यासातून हे सिद्ध होते की

□. लिंग ही एक जीवशास्त्रीय नैसर्गिक संकल्पना आहे.
□. नर आणि मादी हे लिंगभावाचे आदिम सुत्र आहे.
□. लिंगभाव ही विषमता दर्शवणारी मानसिकता आहे.
□. लिंगभाव वैश्विक स्वरूपात समान असलेला दिसून येतो.
□. लिंगभावाचे सामाजिक आणि सांस्कृतिक स्वरूप देश,काल आणि परिस्थितीनुरूप असते.
□. लिंगभावाच्या सामाजिक जाणिवेतून स्त्रीवाद उदयास आला
□. स्त्रीवादाच्या मुळाशी लिंगभाव आहे.
□. स्त्रीवाद हा स्त्रीच्या सर्वंकष स्वातंत्र्याचा एल्गार आहे.
□. स्त्रीवादाची विचारनिष्ठ वेगवेगळे प्रकार आहेत
□□. लिंगभावाची निर्मिती सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्थेत असते.
□□. स्त्रीवाद ही उच्चस्तरीय मानवी मुल्यांची उभारणी आहे.

**आधारभूत ग्रंथ:**

□. कमला भासीर, लिंगभाव समजून घेताना, लोकवाङ्मयगृह मुंबई
□. Oakley Ann 1995 Sex. Gender and Society England Grower publishing company.
□. Mitchell,Juliet and Cakley,Ann(Eds.), The Right and Wronges of women,Harmondsworth:Penguin Books1976 (1974).
□. Fireston, Shulamith, The FamineMytique, Harmondsworth: Penguin Books,1979 Reprint(1963).
□. Omvet Gail Violence against Women. New Movements and new Theories. Kari for Women New Delhi 1990
□. भागवत विद्युत स्त्रीवादी सामाजिक विचार डायमंड पब्लीकेशन पुणे
□. भागवत विद्युत आणि इतर(संपा) संदर्भासहित स्त्रीवाद शब्द पब्लीकेशन बोरीवली मुंबई
□. धोडंगे अश्विनी, स्त्रीवाद समीक्षा: स्वरूप आणि उपयोजन दिलीपराज प्रकाशन पुणे १९९६
□. लांजेवार ज्योती, भारतीय समाज आणि स्त्री, सुगावा प्रकाशन पुणे २००५
□□. सुमती लांडे व श्रुती तांबे (संपा), स्त्रीवाद शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर

# राष्ट्रउभारणीत स्त्री मुख्यमंत्र्यांचे योगदान एक चिकित्सा

प्रा.सुनिलदत्त गोडसे

सहाय्यक प्राध्यापक कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ओंदे

भारताला मिळालेलं स्वातंत्र आणि लोकशाहीच्या माध्यमातून आपण स्वीकारलेली स्वातंत्र, समता, बंधुता व न्याय ही चतु:सूत्री भारतीय समाजमनाचा विकास करण्यास पोषक ठरली असे आपणांस म्हणता येते स्वातंत्र्यानंतर शिक्षण हे गावखेड्यापर्यंत पोहचले. पुरुषांबरोबर स्त्रियांनाही शिक्षणाची दार खुली झाली. शहरीभागातील महिलांबरोबरच खेड्यामधील महिला शिक्षण घेवू लागली. त्यामुळे हजारोवर्षाच्या दास्यत्वातून त्याचा प्रवास मुक्तीकडे सुरु झाला हळूहळू स्त्रीची सुटका 'चूल आणि मुल' या बंदिस्त संकल्पनेतून होऊ लागली पुरुषांबरोबर स्त्रिलाही मानाचे स्थान मिळू लागले. या सर्वांचा परिपाक होवून स्त्री राजकारणात – समाजकारणात व्यवसायात दिसू लागली. एवढच काय भारतीय इतिहासाला स्त्री कर्तुत्वाची उज्वल परंपरा आहे. पंतप्रधान नेहरुंच्या निधनानंतर इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान बनल्या ज्यांचा उल्लेख भारतीय संसदेत 'आर्यन लेडी ' असा केला जात होता.. इंदिरा गांधीनी जगाच्या व्यासपीठावर भारताची वेगळी ओळख निर्माण केली. आपल्या कार्यकाळात इंदिरा गांधीनी देलेला 'गरिबी हटाओ' चा नारा आणि त्या अनुषंगाने घेतलेले निर्णय भारतातील दारिद्र्य निर्मुलनास उपयोगी ठरले अगदी सुरवातीच्या काळापासून अशी उज्वल परंपरा भारतीय समाजजीवनास प्राप्त झाली आहे.

आज स्वातंत्र्याचा पंचहात्तराव्या वर्षी आपण इतिहासाची पणे चालतो तेव्हा राष्ट्रउभारणी स्त्रियांचे कर्तुत्व आपणाला खास करून दिसून येते. आज देशात अठ्ठावीस राज्ये आणि आठ केंद्रशासित प्रदेश आहेत. या सर्व राज्यांच्याविचार केला तर बहुतांश राज्यांचे सर्वोच्च पद हे महिलेने भूषविलेले आहे. यात सुचेता कृपालीनी (काँग्रेस) उत्तरप्रदेश, नंदनी सत्पथी (काँग्रेस) ओडीसा, शशिकला काकोडकर (महाराष्ट्र गोमांतक पार्टी, गोवा, सईदा अन्वर तैमुर (काँग्रेस) आसाम, जानकी रामचंद्र (ए.आय.डी.एम.के.) तामिळनाडू, राजिंदर कौर भट्टल (काँग्रेस) पंजाब, राबडी देवी (राष्ट्रीय जनता दल) बिहार, मायावती (बहुजन समाजवादी पक्ष) उत्तरप्रदेश,सुषमा स्वराज (भारतीय जनता पक्ष)दिल्ली, उमा भारती (भारतीय जनता पार्टी ) मध्यप्रदेश, शिला दीक्षित (काँग्रेस) दिल्ली, जयललिता ए.आय.डी.एम.के. तामिळनाडू, वसुंधराराजे (भारतीय जनता पक्ष) तामिळनाडू, ममता बनर्जी (तृणमुल काँग्रेस ) पश्चिम बंगाल, आनंदीबेन पटेल (भारतीय जनता पार्टी ), गुजरात अशा प्रकारच्या महिला मुख्यमंत्र्यांची गौरवशाली परंपरा आपल्या देशाला लाभली आहे. या महिला मुख्यमंत्र्यांनी आपआपल्या कारकिर्दीत आपआपल्या राज्यांना शिक्षण, आरोग्य, रोजगार व महिला सक्षमीकरणात पुढे नेले आहे. अनेक महिला मुख्यमंत्र्यांची विकासाचे धाडसी निर्णय घेवून आपल्या राज्याला आघाडीवर ठेवण्यात मोलाची भूमिका निभावली आहे.

सुचेता कृपालानी या भारतीय संघराज्यातील पहिल्या मुख्यमंत्री ठरल्या. सुचेता कृपलानी ह्या स्वातंत्र्यसैनिक होत्या उत्तरप्रदेशच्या पहिल्या मुख्यमंत्री होण्याचा मान त्यांना मिळाला. उत्तरप्रदेशचे मागासलेपण घालविण्यासाठी उत्तरप्रदेशातील बेरोजगारी, शिक्षण व महिलांच्या न्यायहक्कांसाठी त्यांनी विषेस काम केले. भारतीय संविधानसमितीमध्ये ज्या महिला सदस्या होत्या त्यापैकी सुचेता कृपालींनीचा समावेश होता. भारतीय संविधानाला आकार देण्यामध्ये त्यांचा सिहांचा वाट होता. सुचेता कृपालींनी महिलांना लाठी चालविणे आणि कवयाती वैगरे शिकवत असत . १५ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान सभेत त्यांनी 'वंदे मातरम ' गायले

नंदिनी सत्पथी कॉंग्रेसतर्फे १९७२ च्या काळात ओरीसात मुख्यमंत्री राहिल्या नंदिनी सत्पथी ह्या ओडीशातील विद्यार्थी आंदोलनाचे नेतृत्व करीत होत्या. ओरिसातील ग्रामीणभागाच्या विकासामध्ये सत्पथीचे मोठे योगदाना होते. सत्पथीना इंदिरा गांधींच्या पहिल्या मंत्रिमंडळात सहभागी होण्याचे भाग्य लाभले होते. त्या आठ वर्षाच्या असताना ब्रिटीशांचायूनियन जॅक (ध्वज) त्यांनी खाली खेचला. विद्यार्थी दशेतच त्यांनी ओरिसातील महाविद्यालयीन शिक्षणाची वाढणारी फी विरोधात आंदोलन केले होते. त्या यशस्वी मुख्यमंत्री राहिल्या जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्यात त्यांनी स्वत:ला धन्य मानले. सत्पथी या उत्तम लेखिका होत्या त्यांनी तस्लीमा नसरीन यांच्या 'लज्जा' कादंबरीचे उडीसी भाषेत भाषांतर केले होते. शाशिकला काकोडकर ह्या गोव्याच्या पहिल्या मुख्यमंत्री होत्या. त्या महाराष्ट्र गोमांतक पार्टीच्या उमेदवार होत्या. १९७३ ते ७९ या कालावधीत गोव्याच्या त्या

मुख्यमंत्री राहिल्या. विकासविषयक दूरदृष्टी असलेल्या त्या नेत्या होत्या. त्यांच्या कार्यकाळात गोव्याच्या पर्यटनाला चांगली चालना मिळाली. स्त्री शिक्षण, महिला सबलीकरण स्त्रियांचा नोकरी व्यवसायात टक्का वाढवण्यासाठी अनेक चांगले निर्णय त्यांच्या कार्यकाळात त्यांनी घेतले सईदा तैमुर ह्या काँग्रेसतर्फे आसाम मध्ये १९८० च्या सुमारास मुख्यमंत्री राहिल्या. देशातील पहिल्या मुस्लीम स्त्री मुख्यमंत्री होण्याचा मान सईदांना मिळाला. मुख्यमंत्री होण्याआधी त्या आसाम राज्याच्या मंत्रिमंडळात सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम पहिले होते. सईदा ह्या अर्थशास्त्राच्या प्राध्यपिका होत्या त्यामुळे मुख्यमंत्री झाल्यानंतर आसाम राज्याची आर्थिक घडी उत्तम बसविण्यासाठी चांगले निर्णय घेतले काटकसरीचे धोरण राबवविले. शेतकऱ्याच्या उन्नतीसाठी शेतीसुधारण्यावर भर दिली. महिलांच्या उन्नतीसाठी छोट्या छोट्या घरगुती उद्यागांना त्यांनी प्रोस्ताहन दिले.

१९८८ साली ऑल इंडिया आण्णा द्रमुक मुन्नेन कळघम पार्टीच्या जानकी रामचंद्रन तामिळनाडूचं मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाल्या . त्या तामिळनाडूच्या पहिल्या मुख्यमंत्री होत्या. जानकी ह्या व्यवसायाने चित्रपट सृष्टीच्या कलाकार असल्याने त्यांनी फिल्म इंडस्ट्रीच्या विकासासाठी खास लक्ष दिले. शिवाय ग्रामीण विकास,ग्रामीण शिक्षण हे विषय सुद्धा त्यांनी चांगल्या पद्धतीने हाताळले. तामिळनाडू राज्याला पुढे नेण्यात त्या यशस्वी ठरल्या

राजिंदर काँग्रेस तर्फे १९९६ – ९७ दरम्यान पंजाब राज्याच्या मुख्यमंत्री राहिल्या . महिला शिक्षण, शेती सुधारणा, पिकांची हमी भाव व शिक्षण या विषयांना राजिंदर कौर भट्टलकौर भट्टल यांनी आपल्या मुख्यमंत्री काळात भर दिला. राबडी देवी ह्या राष्ट्रीय जनात दलाच्या उमेदवार असून त्या बिहारच्या मुख्यमंत्री राहिला,राबडीदेवींनासुद्धा बिहारच्या पहिल्या मुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला. राबडी देवी ह्या बिहार राज्याच्या तीन वेळा मुख्यमंत्री होत्या.बिहारच्या शेतकऱ्यांचे प्रश्न आणि बिहारचा औद्योगिक विकास याकडे राबडीदेविंनी आपले लक्ष वेधले, शिवाय स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यात प्राधान्यक्रम दिला बालविवाह व रूढी परंपरा याकडेही आपले लक्ष वेधले.मायावती ह्या बहुजन समाजवादी पार्टीचे उमेदवार म्हणून चार वेळा उत्तर प्रदेशाच्या मुख्यमंत्री राहिल्या उच्च विद्याविभूषित असणाऱ्या मागासवर्गीयांचा मायावतींनी सर्वांगीण विकास, महिलांची सुरक्षितताशिक्षण, नोकरी इ. बाबतीत त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. लोकशाही पद्धतीने कारभार करण्यावर त्यांचा भर राहिला आहे.

सुषमा स्वराज १९९८ साली दिल्ली राज्याच्या मुख्यमंत्री होत्या. त्या भारतीय जनता पक्षाच्या उमेदवार होत्या. दिल्लीतील प्रदूषण, वाहतूक कोंडी, उद्योगधंदे, महिला सुरक्षितता याविषयी अनेक चांगले निर्णय सुषमा स्वराज यांनी आपल्या कार्यकाळात घेतले, अतिशय सुविद्य आणि प्रशासकीय कौशल्य असलेले मुख्यमंत्री म्हणून त्यांनी आपली छाप पाडली.

उमा भारती (भारतीय जनता पार्टी) मध्यप्रदेशच्या सन २००३ -०४ मध्ये मुख्यमंत्री होत्या. युवक कल्याण, रोजगार निर्मिती, वनसंपदेचे रक्षण याविषयी चांगले निर्णय उमा भारतींनी आपल्या कारकिर्दीत घेतले. मध्यप्रदेश विकासात त्यांचा मोलाचा वाटाराहिला आहे.

शिला दीक्षित (काँग्रेस) दिल्लीच्या मुख्यमंत्री पदावर अधिक काळ राहिल्या. दिल्ली शहराचा विकास, शहराचे प्रदूषण, वाहतूक व्यवस्था , व्यवसाय वृद्धी, युवक कल्याण याविषयी असे अतिशय चांगले निर्णय शिला दीक्षित यांनी घेतले.

जयललिता ह्या चित्रपटसृष्टीतून येवून तीन वेळा तामिळनाडू मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्या होत्या. मागास वर्गीयांचा विकास, शेतकऱ्यांचे प्रश्न , पर्यटन, शिक्षण , बेरोजगारांना रोजगार, दारिद्र्य निर्मुलन याविषयी उत्तम निर्णय जयललिता यांनी घेतले.

वसुंधरा राजे (भारतीय जनता पार्टी) यांनी राज्यस्थानचे दोनदा मुख्यमंत्रीपद भूषविले त्यांना अटलबिहारी वाजपेची याच्या मंत्रीमंडळात सुद्धा स्थान मिळाले होते. राज्यस्थानचे मुख्यमंत्रीपदावर असताना पाणीप्रश्न रोजगार निर्मिती महिला विषयी धोरणे याविषयी चांगले निर्णय घेऊन राज्यस्थान राज्याच्या विकासात मोलाचे योगदान दिले.

ममता बॅनर्जी(तृणमुल काँग्रेस ) अनेक वर्षे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आहेत. त्याच्या नेतृत्वाखालीपश्चिम बंगाल एक औद्योगिक राज्य म्हणून वाटचाल करीत आहे. शेती सुधारणा, महिला विकास, वीज निर्मिती, पारंपारिक संसाधनांचा विकास महिला सन्मान इ. बाबतीत ममता बयांर्जीनि पश्चिम बंगालमध्ये उत्कृष्ट काम केले आहे.

आनंदीबेन पटेल या अलीकडे भारतीय जनता पार्टीच्या वतीने गुजरातमध्ये मुख्यमंत्री पद भूषवताहेत त्यांच्या नेतृत्वाखाली गुजरातने औद्योगिक विकासात आणि पायाभूत सुविधांमध्ये चांगला विकास

ISSN : 2278-9308
March, 2022

साधण्यात त्या यशस्वी झाल्या आहेत. अश्या प्रकारे ह्या सर्व महिला मुख्यमंत्र्यांनी आपल्या दृष्टीने , अथक परिश्रमाने आपल्या कल्पनेने राष्ट्राच्या विकासात अमुल्य असे योगदान दिले आहे. ते आपणास दुर्लक्षुन चालणार नाही. असे मत येथे नोंदवावेसे वाटते

**निष्कर्ष**

❖ स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थानी महिलांनी घरचा उंबरठा ओलांडून सामजिक विकासात आपले योगदान दिले.

❖ विकसित राष्ट्र उभारणीत महिलांचे अमुल्य असे योगदान मिळाले.

❖ पुरोगामी दृष्टी , आधुनिक विचारसारणी अंगीकारण्यात महिलाचा पुढाकार दिसतो.

❖ आपल्या कर्तुत्वाने महिलांना संधी मिळाल्यास त्या कोणत्याही क्षेत्रात आपला ठसा उमटवू शकतात हा संदेश जगाला दिला.

**संदर्भ**

❖ लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत वृतपत्रे

❖ लोकराज्य , योजना मासिके

❖ यांनी घडवले सहस्त्रक – संपादन मिलिंद चंपानेरकर

# मार्क्सवादी स्त्रीवादी: एक आकलन

डॉ. सूर्यकांत लक्ष्मणराव शेळके
राज्यशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय डोंबिवली (पूर्व) ठाणे – 421201

**प्रस्तावना :**

स्त्रीवाद ही 19 व्या शतकात उदयाला आलेली एक बहुआयामी संकल्पना व वैचारिक चळवळ आहे. पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत लिंगभेदाआधारे स्त्रीला तिचे माणुसपण नाकारून तिच्यावर दास्यत्व, गुलामी, दुय्यमतव लादण्यात आले. तिच्यातील मानवत्व नाकारून तिला वस्तूरूप दिले गेले. सामाजिक संकेत आणि मूल्याधारे तिला गुलाम म्हणून वागविणे कसे योग्य आहे; याचे उदात्तीकरण करण्यात आले. स्त्री शोषणास अनुकूल अशी सामाजिक व्यवस्था निर्माण करण्यात आली. अशा प्रकारच्या लिंगभेद आधारीत शोषणाविरुद्धची कृतीशील चळवळ म्हणून स्त्रीवादी विचारसारणीचा उदय, विकास झाला. 20 व्या शतकात स्त्रीवादी अभ्यासक आणि विचारवंतांनी स्त्रीवादाचा वेगवेगळया अंगांनी अभ्यास करून अनेक स्त्रीवादी सिद्धांत व दृष्टीकोण मांडले गेले. ज्यामध्ये उदारमतवादी स्त्रीवाद, समाजवादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद इ. चा समावेश होतो. प्रस्तुत शोधनिबंधात मार्क्सवादी स्त्रीवादाच्या अनुषंगाने मांडणी करण्यात आली आहे.

**स्त्रीवादी विचार – विषय विवेचन :** पृथ्वीवरील सर्व प्राण्यांमध्ये मानव हा बुद्धिमान प्राणी म्हणून ओळखला जातो. मानवाने आपल्या बुद्धिमतेने, स्वबळावर स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. प्रगती आणि विकास घडवून आणला. यामध्ये स्त्री आणि पुरुष या दोघांचेही समान योगदान व महत्वपूर्ण भूमिका आहे.मात्र मानवी संस्कृतीच्या उत्क्रांत वाटचालीत कुटुंब व्यवस्थेच्या उदयानंतर 'चूल आणि मूल' हे स्त्रीचे कार्यक्षेत्र; तर घराबाहे जाऊन उपजीविकेचे साधन मिळविणे, अर्थार्जन करणे; हे पुरुषाचे कार्यक्षेत्र ठरले. आणि यातूनच पितृसत्ताक व्यवस्थेचा उदय झाला. या व्यवस्थेतूनच स्त्री दुय्यम ठरली. त्यानंतर धर्म, जात, या व्यवस्थेच्या उदयानंतर तर स्त्रीच्या दुय्यमत्वात अधिकच भर पडली. 'समाज धर्माधिष्ठित आणि अर्थकारण, राजकारण समाजाधिष्ठित' अशा या व्यवस्थेच्या परस्पर सहसंबंधित शृंखला स्त्री प्रश्नांची गुंतागुंत वाढविणाऱ्या ठरल्या. यातूनच स्त्रीयांवर दास्यत्व, गुलामी आणि दुय्यमत्वाची पकड मजबुत करण्यात अली. जगभरामध्ये ही परिस्थिती कमी-अधिक प्रमाणात सारखीच होती. मात्र आधुनिक युगाची सुरुवात हि स्त्री मुक्तीची चाहूल होती. यामागील कारण म्हणजे विज्ञान तंत्रज्ञानाची प्रगती आणि त्यातून झालेले विविधांगी बदल आणि तसेच औद्योगिकीकरण यातून जगभर विविध क्षेत्रात झालेली परिवर्तने होत. दोन महायुद्धे, वसाहतवादी साम्राज्यातून मुक्त होण्यासाठीचे संघर्ष, सामाजिक प्रबोधनाच्या चळवळी इ. यातून दरम्यानच्या काळात आणि नंतर खूप मोठ्या प्रमाणात परिस्थिती झपाट्याने बदलत गेली. या सर्व घटनाक्रमाच्या पार्श्वभूमीवर स्त्री जीवनातही मोठ्या प्रमाणात स्थित्यंतरे घडत गेली. स्त्रियांमध्ये जागरूकता वाढत गेली. स्त्रियांनी कौटोम्बिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात स्त्री पुरुष समानता यावी यासाठी संघर्षास सुरुवात केली. या सर्व प्रक्रियेतून पाश्चिमात्य जगामध्ये स्त्रीवादी विचारसरणी मूळ धरू लागली. जोमाने वाढली आणि विकसित झाली. यातून हळूहळू स्त्रियांचे आत्मभान जागृत झाले. त्यांनी स्वतःचे मुक्तीचे लढे उभे केले. सहास्तित्वाचा हा संघर्ष अद्यापही संपलेला नाही. तो अखंडपणे चालू आहे आणि मानवी अस्तित्वासोबत चालू असणार आहे. तथापि, मानवी प्रगती व विकासाच्या उत्क्रांत संक्रमण काळात लिंग भेदाची निर्मिती, स्त्रीयांचे दास्यत्व, गुलामी, दुय्यमत्व आणि शोषण याचे मूळ शोधणे, त्याचे विश्लेषण करणे आणि त्यावर उपाययोजना करणे; यासाठी स्त्रीवादी विचाराची जी मार्क्सवादी मिमांसा आहे ती महत्वपूर्ण ठरते.

**स्त्रीवाद म्हणजे काय ? :** स्त्रीवाद म्हणजे नेमके काय? याबाबत अनेक मतमतांतरे आहेत. त्यामुळे स्त्रीवादाची निश्चित व्याख्या सांगणे अवघड आहे . तथापि, अनेक अभ्यासकांनी आपापल्यापरीने या संकल्पनेची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. यापैकी काही व्याख्या पुढीलप्रमाणे -

१. डॉ. गेल ऑम्वेट यांनी आपल्या 'स्त्रीवाद' या ग्रंथात असे म्हटले आहे कि, "लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी पूर्णपणे नष्ट करणे म्हणजे स्त्रीवाद होय."

२. वसुधा सुतार यांच्या मते, “स्त्रियांचे दुय्यमत्व व्यवस्थात्मक असून, त्याला निश्चित असे आर्थिक कारण आहे. स्त्री-पुरुष विषमतेचा प्रश्न अतिशय मूलभूत असून त्याचे स्वरूप सर्वव्यापी आहे. असे म्हणणं म्हणजे स्त्रीवाद होय.”

3. वेबस्टर शब्दकोशानुसार पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना राजकीय हक्क असणे म्हणजे स्त्रीवाद होय.

यावरून स्पष्ट होते की, स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून फारकत घेऊन स्त्रीने आपला स्वतंत्र सुभा निर्माण करणे व पुरुषांच्या विरूद्ध संघर्ष करणे नव्हे किंवा पुरुषावर वर्चस्व गाजविणे नव्हे किंवा केवळ स्त्रियांच्या हक्कांचे समर्थन करणे नव्हे. तर स्वत:च्या सामर्थ्याचा शोध घेऊन आपल्या विकासासाठी पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून जीवन जगण्याचे समर्थन करणे होय. पुरुषसत्ताक व्यवस्थेने निर्माण केलेली लिंगभेद आधारित प्रस्थापित विषमताधिष्ठित व शोषणाधिष्ठित व्यवस्था मोडून स्त्री विकासाचा मार्ग चोखाळणे होय. त्यामुळे स्त्रीवाद नैसर्गिक लिंगभेद मान्य करून लिंगभाव नाकारते. आणि स्त्रीची स्त्री म्हणून ओळख करून देणे, स्त्रीचे कुटुंबातील बरोबरीचे स्थान, स्वत:च्या शरीरावरील हक्क, आणि सामाजिक दर्जा, राजकीय संधी, आर्थिक स्वावलंबन, शैक्षणिक आणि संस्कृतिक हक्क यासाठी संघर्ष व समर्थन करणारी कृतीशील चळवळ आहे.

नव्या मांडणीतून दोन बाबी स्पष्ट दिसतात त्या म्हणजे एक तर जैविक पातळीवरील भिन्नतेच्या विश्लेषणाबाबत स्त्रीवाद असे मानतो कि, स्त्री आणि पुरुष यांच्यामध्ये भावनिक, बौद्धिक आणि मानसिक भिन्नत्व सामाजिक दृष्ट्या लादल्या गेलेल्या मूल्यांचे प्रतिबिंब असते. आणि दुसरे म्हणजे सामाजिक मूल्यांमधून स्त्रीला पुरुषापासून वेगळेपण दिले जाते. आणि त्याचा पाया स्त्रीच्या मानसिक गुणवैशिट्यामधून आणि लैंगिक भूमिकांच्या साचेबंद भुमिकांमधून घडतो. स्त्रीवादी चळवळीने आतापर्यंत विविध प्रकारच्या प्रतिकाराना तोंड दिले आहे. त्याचे विश्लेषण स्त्रीवाद करतो. त्याचबरोबर लैंगिक भूमिकांची साचेबद्धता, स्त्रियांच्या आत्मप्रतिमा आणि सार्वजनिक प्रतिमा, स्त्रीत्वाच्या सामाजिक भूमिका, लैंगिक क्रांती आणि पुरुषसत्ताक भाषेचे राजकारण इ. प्रश्न ऐरणीवर आणि आघाडीवर आहेत. यातून स्त्रीवादी विचाराने चार मुद्दावर आपले लक्ष केंद्रित केले आहे. १) स्त्रियांचे उत्पादन व्यवस्थेतील कार्य व भूमिका २) स्त्रियांची पुनरुत्पादनातील भूमिका ३) पुरुषी वर्चस्वात्मक सामाजिक संस्कृतीमधील संस्कार किंवा सामाजिकीकरणातील स्त्रियांची भूमिका ४) लैंगिकते संदर्भातील प्रश्न व समस्या.या मुद्यांना स्त्रीवादी कळवळ अग्रस्थानी मानते.

स्त्रीवादी विचारसरणी ही एक व्यापक संकल्पना आहे. स्त्रीवाद स्त्रियांच्या प्रश्नापुरताच मर्यादित विचार नसून स्त्री जीवनाच्या विविध क्षेत्रातील समग्र शोषणाच्या विरोधातील विचारसरणी आहे. स्त्रीवादाचा विकास हा स्त्रियांचे हक्क व त्यांच्यावरील अन्याय अत्याचार याना विरोध करणारी चळवळ आहे. म्हणूनच स्त्रीवादी विचारसरणी ही केवळ पुस्तकी संकल्पना नसून जीवनातील वास्तवाला थेट भिडणारी आहे. ती एक राजकीय विचारप्रणाली आहे. समाजव्यवस्थेत पुरुषाकडे नेहमीचं एक महत्वपूर्ण श्रेष्ठ व प्रतिष्ठेचा घटक म्हणून पहिले जाते; तर स्त्रियांकडे मात्र अबला, दासी अशा न्यूनतावादी आणि दुय्यम दृष्टिकोनातून पाहिले जाते. तिची कार्यक्षेत्रे ही परंपरेने नेमून दिलेली असतात. त्याशिवाय तिने कोणत्याही क्षेत्रात हस्तक्षेप करू नये. असा अलिखित नियम असतो. ती परंपरेने नेमून दिलेली कामे करत नसेल तर साम, दाम, दंड, भेद या नीतीचा वापर करून तिची अस्मिता आणि अस्तित्व दडपले जाते. स्त्रीवादी विचारसरणी या समग्र विवेकहीन विषमतावादी आणि शोषणाधिष्ठित विकृत व अमानवी विचारला नाकारते. आणि पुरुषसत्ताक स्त्रीशोषणाच्या विरुद्ध विवेकवादी विज्ञानवादी आणि मानवतावादी भूमिका घेते.

**स्त्रीवादी विचाराची पायाभूत मांडणी :** सर्वप्रथम मेरी वुलस्टोनक्राफ्टने आपल्या 'The Vindication of Rights of Women' (1792) या ग्रंथामध्ये स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. पुरुष हा विचारप्रधान, विवेकी आणि धाडसी असतो; याउलट स्त्रीही भावनाप्रधान, अविवेकी आणि नाजुक असते, हा पारंपरिक विचार त्यांनी नाकारला. स्त्री देखील पुरुषांप्रमाणे विवेकी, विचारक्षम आणि धाडसी असून तिलादेखील पुरुषांप्रमाणे स्वातंत्र्य आणि सर्व नागरी हक्क मिळाले पाहिजेत; याचा आग्रह धरला. स्त्रियांच्या गुलामगिरीविरुद्ध तिने आवाज उठवला. इंग्लंडमधील रक्तविरहित क्रांतीने (1689) आणि फ्रेंच राज्यक्रांतीने (1789) देऊ केलेले हक्क आणि स्वातंत्र्य स्त्रियांना देखील

मिळाले पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. शिक्षण आणि विकासाची संधी दिल्यास स्त्रीयादेखील पपुरुषांप्रमाणे आपली क्षमता सिद्ध करू शकतात असा दावा त्यांनी केला.

जॉन स्टुअर्ट मिल याने आपल्या 'Subjection of Women' (1861) या ग्रंथाद्वारे स्त्रियांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीचा प्रश्न ऐरणीवर आणला. कुटुंब संस्थेत स्त्रियांच्या पारंपरिक भूमिकांचे (माता-पत्नी-गृहिणी) खूपच उदात्तीकरण केले जाते. स्त्रीच्या व्यक्तिमत्व विकासाला बाधा आणणाऱ्या या कुटुंबसंस्था व विवाहसंस्था यावर त्यांनी भाष्य केले. या संस्था स्त्री स्वातंत्र्य नाकरतात. त्यामुळे स्त्रियांना गुलामगिरीचे जीवन जगावे लागते. स्त्रीमधील विविध क्षमताना संधि नाकारली जाते. त्यामुळे स्त्रियांचं विकास खुंटला आहे. अशी मांडणी त्यांनी केली.

१९४९ हे वर्ष स्त्रीवादी विचारसरणीच्या जडणघडणीतील एक महत्वपूर्ण वर्ष मानले जाते. याच वर्षी 'सिमॉन -दि- बोव्हा' या फ्रेंच विदुषींचा 'दि सेकंड सेक्स' हा मौलिक ग्रंथ प्रकाशित झाला. आणि संबंध पुरुषप्रधान सत्तेची मांडणी करणाऱ्या व्यवस्थेलाच हादरा दिला. या ग्रंथामुळे स्त्रीवादी विचारसरणीला नैतिक आणि वैचारिक पाठबळ मिळाले. म्हणूनच 'युद्धोत्तर स्त्रीवादी समीक्षेच्या शिल्पकार' म्हणून त्यांचं गौरव केला जातो. स्त्रीवादाबद्दल त्यांनी अतिशय परखड मते मांडली. "One is born a women, one becomes one" म्हणजेच बाई म्हणून कोणी जन्माला येत नाही. तर नंतर तिला बाई बनविली जाते. अर्थात स्त्री जन्मत: 'स्त्री' किंवा 'बाई' म्हणून नसते तर समाज व्यवस्था तिच्यावर 'स्त्रीपण' किंवा 'बाईपण' लादते. पुरुषसत्ताक व्यवस्था तिला त्याच भूमिकेत जगायला शिकवते नव्हे भाग पाडते. आणि धर्मव्यवस्था त्याला मूल्यबल तथा मूल्यात्मक मुलामा चढवून त्या व्यवस्थेचे मजबुतीकरण करते. यातूनच तिच्या वाट्याला हीनत्वाची आणि न्यूनत्वाची भूमिका बजावावी लागते.तिच्या जन्मापासूनच तिला 'बाई' बनविण्याची प्रक्रिया सुरु होते. तिच्यावर अणे बंधने लादली जातात. उदा. बाईने पुरुषांचे कपडे वापरू नयेत, तिने पुरुषांचे खेळ खेळू नयेत, जेवणासाठी पुरुषांच्या सोबत बसू नये, पुरुषांप्रमाणे मोठमोठ्याने बोलू नये इ. यातून तिचा नैसर्गिक विकास खुंटतो. यातून तिची अस्मिता आणि अस्तित्व पुसले जाते. त्यामुळे तिला तिची ओळख कोणाची आई, पत्नी, बहीण, मुलगी असा आधार घेत जगावे लागते. मनूने तर तिला स्वातंत्र्यच नाकारले. स्त्रीला आयुष्यात कधीही स्वातंत्र्य नसावे अशी त्याची धारणा होती. आजही भारतात ही सांस्कृतिक गुलामी संवैधानिक लोकशाही व्यवस्था स्वीकारल्याच्यानंतरही अस्तित्वात आहे. अशा या व्यवस्थेत धर्म शिक्षण समाजकारण राजकारण अर्थकारण आणि संस्कृती या सर्वच क्षेत्रात तिची भूमिका नाकारली जाते. आणि तिचा दर्जा दुय्यम ठरविला जातो. आणि पुरुषसत्ताक वर्चस्ववादी व्यवस्थेत पुरुष केंद्रस्थानी आणि स्त्री परिघावर असते.

**स्त्रीवादी विचारसरणी - मार्क्सवादी दृष्टीकोण :** कार्ल मार्क्सने उत्पादन साधनांची मालकी, उत्पादन संबंध आणि वर्गीय संघर्ष याआधारे ज्या साम्यवादी विचाराची मांडणी केली त्याआधारेच स्त्रियांच्या समस्यांचे व शोषणाचे जे विश्लेषण केले जाते त्यालाच स्त्रीवादी विचारसरणीचे मार्क्सवादी दृष्टीकोण ताठ तत्वज्ञान म्हटले जाते. तथापि, मार्क्सच्या लिखाणात स्त्री प्रश्नांची स्वतंत्रपणे चर्चा केल्याचे मात्र आढळून येत नाही. तरीही स्रियांचे प्रश्न व शोषणाचे विश्लेषण व उकल करण्यासाठी मार्क्सच्या विचाराच्या आधारे जी तात्विक मांडणी केली जाते ती महत्वपूर्ण ठरते. कार्लमार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांनी या सिद्धांताचा पाया घातला. फ्रेडरिक एंगल्स यांनी आपल्या 'कुटुम्ब, खाजगी मालमत्ता आणि राज्याचा उगम' या पुस्तकात असे स्पष्ट केले आहे की, इतिहासाच्या प्रारंभी असलेल्या मातृसत्ताक समाज व्यवस्थेत लैंगिक संबंधांमध्ये मुक्तता आणि स्त्रियांना आपल्या आवडीनिवडीप्रमाणे व इच्छेप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य होते. कुटुंब व्यवस्थेत ती प्रमुख स्थानी होती आणि तिचे कुटुंबावर नियंत्रण होते. यालाच आपण मातृसत्ताक पद्धत म्हणतो. शेतीच्या शोधानंतर जी कृषी व्यवस्था उदयाला आली त्यात मातृसत्ताक व्यवस्थेची जागा पितृसत्ताक व्यवस्थेने घेतली. यामध्ये कुटुंबाचे नियंत्रण पुरुषांकडे आले. पुरुष कुटुंबाचा प्रमुख झाला. पुरुषाने आर्थिक आणि लैंगिक अधिकार प्राप्त केले. या व्यवस्थेत स्त्रियांवर एक पतित्व लादण्यात आले. मात्र पुरुषांना अनेक स्त्रियांशी विवाह करण्याची मुभा होती. भांडवलशाहीच्या उदयानंतर स्त्री सामाजिक उत्पादन आणि घरकाम या दोन्ही पातळीवर कार्य करूनही दुय्यम समजली जाऊ लागली. म्हणून भांडवलशाही विरुद्ध कामगारांच्या संघर्षात स्त्रियांनी सहभाग घ्यावा. या संघर्षात मातृत्व, बालसंगोपनच्या जबाबदारीचे सामाजिकीकरण व्हावे अशी मांडणी एंगल्सने केली.

हाथडी हार्टमननेही मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी केली. त्यांनी पुरुषसत्ताक व्यवस्था आणि भांडवलशाही यामधील परस्परसंबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. भौतिकवादी ऐतिहासिक विश्लेषणाआधारे हार्टमनने असे

म्हटले आहे की, पुरुषप्रधान समाज व्यवस्थेमध्ये भांडवलशाचा विकास झाला. त्यामउळे घर आणि कामाचे ठिकाण या ठिकाणी लिंगभेदा आधारे श्रमविभाजन मोठ्या प्रमाणावर झालेले दिसते. १९९० च्या दशकात फ्रान्समधील भौतिकवादी स्त्रीवादी विचारवंत ख्रिस्तीन डेक्सी यांनी आणि तसेच सिल्व्हिया वालबी यांनी १९८६ साली केलेल्या अभ्यासाच्या आधारे घरगुती उत्पादनाच्या चौकटीत स्त्रियांचे शोषण झाले त्यामुळे त्या दुय्यम ठरल्या. असे स्पष्ट केले.

मार्क्सच्या वर्गीय शोषण आणि वर्ग संघर्षाच्या सिद्धांतातच स्त्री शोषण आणि त्याची उकल हेही अनुस्यूत असल्याने मार्क्सवादी स्त्रीवादी सिद्धांताची मुळे तथा बीजे मार्क्सवादी विचारसरणीत सापडतात. त्यामुळे मार्क्सवादी स्त्रीवादी सिद्धांताचा पाया कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स यांनी घातला हे स्पष्ट होते. आणि त्यानंतर मार्क्सवादी दृष्टिकोनाच्या आधारे अन्य मार्क्सवादी विचारवंताने स्त्रीवादी समस्या व शोषण आणि त्याची उकल करण्याचा खोलवर आणि व्यापकपणे प्रयत्न केला. आणि आज स्त्रीवादी मार्क्सवादी सिद्धांत केंद्रस्थानी आला. कार्ल मार्क्स आणि एंगल्स यांचा मुख्य भर जरी आर्थिक तथा वर्गीय शोषणाकडे असला तरी त्यांनी वेळोवेळी लिंगभेद आणि त्यावर आधारित लैंगिक दडपशाही व शोषण यावरही भाष्य केले. एंगल्स यांनी लिहिलेल्या 'The Origin of Family, Private Property and The State' यामध्ये त्यांनी स्त्री शोषणाचे मूळ आणि त्याची कारणमीमांसा केलेली दिसते. एंगल्स म्हणतो कि -

१. स्त्रियांचा दुय्यम दर्जा हा जीवशास्त्रीय प्रक्रियेचा परिणाम नसून; (जो की सर्वसाधारणपणे अपरिवर्तनीय मानला जातो.) सामाजिक व्यवस्थेचा ऐतिहासिक परिणाम आहे. आणि तो मानव निर्मित असल्याने त्या संबंधीच्या व्यवस्थेत परिवर्तन करणे शक्य असते.

२. स्त्रियांच्या दुय्यम दर्जाचा संबंधात्मक आणि सापेक्षात्मक आधार हा कुटुंब संस्था आहे. मुळात Family (कुटुंब) हा शब्द लॅटिन भाषेतून आला असून त्याचा अर्थच मुळी 'सेवा करणे' असा होतो. सर्व प्रकारच्या गुंतागुंतीच्या या कुटुंब संस्थेकडे पाहता ही संस्था म्हणजे वर्चस्व आणि लीनता याचे प्रतीक आहे. हे वर्चस्व आणि लीनता पुरुषी आणि स्त्री संबंधात्मक होती आणि यातूनच स्त्री दमन सुरु झाले.

३. समाजाने कुटुंब व्यवस्थेला, ही एक मूलभूत संस्थात्मक व्यवस्था आहे, असे मानून त्यासाठी कायदेशीर मान्यता प्रदान केली. याचा अर्थ कुटुंबाला कायदेशीर मान्यता म्हणजे नकळत कुटुंबातील स्त्री-पुरुष यांच्या असमानतेवर आधारलेल्या संबंधांना मान्यता आहे. आणि अशाप्रकारे स्त्री दमनाला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आपण मान्य करतो हेच त्यातून स्पष्ट होते.

४. कुटुंब संस्थेसारख्या संस्थेचा नाश करणे म्हणजे एंगल्सच्या मते "स्त्री लिंगाचा ऐतिहासिक प्रभाव होय" किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे स्त्री- पुरुष समानता प्रस्थापित करण्यात आलेले अपयश होय. असे अमान्य करावे लागेल.

५. भांडवलशाहीमध्ये कामगारांचे शोषण करण्याच्या प्रवृत्तीमध्ये वाढ झाली व त्यातून गुंतागुंतीची व संमिश्र वर्चस्ववादी व्यवस्था आकाराला आली. हे वर्चस्व प्रामुख्याने वर्ग संबंधापुरते मर्यादित असल्याने राजकीय व्यवस्था ही या सर्व वर्चस्ववादी व्यवस्थांचे सुरक्षा कवच ठरले. कुटुंब व्यवस्था सुद्धा स्त्री-पुरुष यांच्या संबंधात वर्चस्व - लीनता या दोन्ही बाबींना महत्व प्राप्त होऊन ते स्त्रीच्या दमन प्रक्रियेचे कार्यक्षेत्र बनले.

**स्त्रीवाद - समकालीन मार्क्सवादी दृष्टिकोन :** समकालीन मार्क्सवादी स्त्रीवादी विचारवंत असे मानतात की, स्त्रीवादी विचारसरणीची बीजे मार्क्सने मांडलेल्या वर्ग व्यवस्थेच्या मूलभूत संरचनेत सामावलेली असून विशेषतः समकालीन भांडवलशाही वर्ग व्यवस्थेच्या संरचनेत सामावलेली आहेत. वर्ग व्यवस्थेत जो लिंग भेद रुजविण्यात आला तो समकालीन भांडवलशाही वर्ग व्यवस्थेत माध्यम वर्गीयांचा उदय झाल्यावर हे माध्यम वर्गीय स्वतः उत्पादक आणि संघटनात्मक औद्योगिक उगमस्रोतांचे, कृषी व्यापारीकरणाचे आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापाराचे मालक बनले. या व्यवस्थेत मध्यमवर्गीय स्त्रिया ह्या स्वतः मालमत्ताधारक नव्हत्या तर त्या स्वतःच त्यांच्या पतीची देखील मालमत्ता होत्या व गुलाम होत्या. म्हणून त्यांचा विनिमय होत असे. मध्यमवर्गीय स्त्रिया त्यांच्या पतीची अर्थात मालकाची भावनात्मक सामाजिक व लैंगिक सेवा करीत. सारांश, भांडवलशाही वर्गीय व्यवस्थेत मध्यम वर्गीयांच्या समावेशाबरोबरच स्त्री-पुरुष भेदभाव व असमानता अस्तित्वात आली.

भांडवलशाही व्यवस्थेत प्रारंभीच्या काळात लैंगिक विषमता आणि असमानता पगारी वर्गात मोठ्या प्रमाणात आढळत होती. स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करून सुद्धा तिच्या दुय्यम दर्जामुळे पुरुषांच्या तुलनेत तिला कमी वेतन दिले जात असत. हा जो भेद आहे लिंगभेदाला प्रोत्साहन व वाव देणारा ठरला. त्यामुळे नोकरदार

स्त्री ही तिच्या पतीच्या दृष्टीने उत्पादन प्रक्रियेचे एक साधन असून तिची स्थिती गुलाम तथा दास्य ससदृश्य ठरली. याठिकाणी साहजिकच लिंग समानतेचा खीळ बसली. आज सर्वत्र 'समान कामासाठी समान वेतन' या तत्वाचा स्वीकार करण्यात आला असला तरी मानसिकता मात्र लिंगभेदाची कायम आहे असे मार्क्सवाद मानतो.

भांडवलशाही व्यवस्थेत श्रमाचे मूल्ये नाकारले जाते. श्रमिक कष्टकरी कामगारांचे वस्तूकरण केले जाते. मार्क्सवादाने माणसाच्या वस्तुकरणावर जे भाष्य केले आहे ते स्त्रीवादी आकलनाच्या दृष्टीने फार महत्वाचे आहे. आजचा काळ हा खाजगीकरण उदारीकरण आणि जागतिकीकरण काळ आहे. हे खा.उ.जा.चे मॉडेल म्हणजे जगव्याप्त भांडवलशाहीचे आक्राळ विक्राळ रूप आहे. या नवभांडवलशाहीमध्ये स्त्रीकडे उपभोगाची वस्तू म्हणून बघण्याचा दृष्टिकोन अधिक गडद झाला आहे. 'विश्वसुंदरी' 'जगतसुंदरी' यासारख्या सौंदर्य स्पर्धांचे आयोजन म्हणजे स्त्रियांच्या वस्तुकरणाचे आधुनिक रूपच आहे. त्याचबरोबर भांडवलशाही ही आभासी जगाची निर्मिती करत असते. चित्रपट, मालिका, जाहिराती आणि वृत्तपत्रे या आभासी जगातील स्त्री दर्शन म्हणजे स्त्रीयाना क्रयवस्तू बनविल्याचे स्पष्ट होते. तिच्या या वस्तूकरनाची प्रक्रिया तिला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ती उपभोगाची वस्तू ठरविण्यामध्ये यशस्वी होताना दिसते. अर्थात काळ आणि परिस्थिती बदलली तरी स्त्रीकडे बघण्याची मानसिकता आणि दृष्टिकोन ती अबला, गुलाम, दासी उपभोगाची वस्तू असून यातून तिचे लिंगभेद आधारित शोषण कायम असल्याचे आकलन आपल्याला मार्क्सवादी दृष्टिकोनातून प्राप्त होते. आणि स्त्रीवादी विचाराची मांडणी करणाऱ्या मार्क्सवादी विचारवंतांनी जी मांडणी केली की, 'लिंगभेद' ही जीवशास्त्रीय प्रक्रियेतून आकाराला आलेली घटना नसून वर्ग व्यवस्थेच्या संरचनात्मक भेदाचा तो अपरिहार्य परिणाम आहे; हे स्पष्ट होते.

**निष्कर्ष :**मार्क्सवादी विचाराने उत्पादन साधनांची मालकी, उत्पादन संबंध आणि समाजाची वर्गीय रचना याविषयी जे मानवी संबंधांचे मूलभूत विश्लेषण केले आहे; त्यात जात, धर्म, लिंग, भाषा आदिच्या परस्परसंबंधांची उकलही केली आहे. त्यामुळे लिंगभेद आधारित स्त्री शोषणाची समस्याही त्यात अन्युस्यूत आहे. मार्क्सने आपल्या साम्यवादी विचारसरणीच्या अनुषंगाने जी मांडणी केली; त्यात त्यांनी स्त्रीवादी विचाराची कुठेही स्वतंत्रपणे मांडले केली नसली; तरी एंग्ल्स आणि इतर मार्क्सवादी विचारांच्या भाष्यकारानी स्त्रियांच्या शोषणाचे जे विश्लेषण केले आहे ते आजही महत्वपूर्ण असून स्त्री समस्याचे मूळ त्याची व्यामिश्रता व गुंतागुंत याचे आकलन आणि सोडवणूक होण्यास मदत होते.

**संदर्भ ग्रंथ :**

**1.**भागवत विद्दुत (2004),'स्त्री प्रश्नांची वाटचाल', प्रतिमा प्रकाशन, पुणे.

**2.**ऑम्वेट गेल, स्त्रीवाद: स्त्रीमुक्तीचा आशय',लांडे सुमति, तांबे श्रुति, (संपा.) स्त्रीवाद, शब्दालय प्रकाशन, श्रीरंपूर, 2007

**3.**गोखले करुणा (2010), बोव्हा सिमोन : दी सेकंड सेक्स (अनुवाद), पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

4.भागवत विद्दुत (1997),'महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने', समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

5.माने रचना (2013),'स्त्री संकल्पना आणि स्वरूप', अक्षर दालन, कोल्हापूर.

6.सुमंत यशवंत,'स्त्रीमुक्तीकडून मनव्मुक्तीकडे', मिळून साऱ्याजणी (मासिक जाने. ते जून 1999), पुणे.

7.नाईक शोभा (2007),'भारतीय संदर्भातून स्त्रीवाद', लोकवाङ:मय गृह, मुंबई.

8.रेगे शर्मिला (2010),'स्त्रीवाद: जागतिक, स्थानिक, द्वैतच्या पलीकडे', क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.

# शाश्वत विकासात पद्मश्री तुलसी गौडा व पद्मश्री राहीबाई पोपरे यांचे योगदान.

**प्रा.बनसोडे राहुल प्रकाश**

कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय औदे, ता. विक्रमगड, जिल्हा: पालघर , महाराष्ट्र

**प्रस्तावना:**

शाश्वत विकास यालाच आपण निरंतर विकास असेही संबोधित करता येईल. चिरकाल टिकणारा विकास जर घडवून आणायचं असेल तर आपणास शाश्वत विकासाची कास धरणे आवश्यक आहे. एकविसाव्या शतकात निर्माण झालेली जगाच्या तापमानामध्ये वाढ ही समस्या, कुठेतरी शाश्वत विकासाकडे दुर्लक्ष केल्याची प्रचिती आहे, याची अभ्यासकांना,संशोधकांना सातत्यपूर्ण जाणीव होत असते. म्हणजेच अलीकडच्या कालखंडामध्ये शाश्वत विकासाची गरज निर्माण झाली आहे, असे निश्चित सांगता येईल.शाश्वत विकास अस्तित्वात आणण्यासाठी आपणास अनेक वेगवेगळया अंगानी प्रयत्न करण्याची गरज असते. निसर्गाचे कोणतेही नुकसान न करता,विकासात्मक कामे करणे,आपल्या अर्थव्यवस्थेचा विकास घडून आणणे, या अर्थाने शाश्वत विकासाची संकल्पना सदरील संशोधनाच्या माध्यमातून पुढे येणार आहे. शाश्वत विकास या संकल्पनेमध्ये स्त्रियांचे खूप मोठे योगदान आहे. स्त्रीने केवळ चूल आणि मुल या संकुचित आणि नकारात्मक विचार शक्ती मध्येच गुंतून रहावे, असे तथाकथित पुरुषी मानसिकतेला वाटत असे, यातून बाहेर पडण्यासाठी खूप मोठा संघर्ष त्यांना करावा लागला आहे. स्त्रीमुक्तीचा विचार म्हणजेच स्त्रीवाद आहे, स्वातंत्र्याने, मुक्तपणे स्वतःचे निर्णय स्वतः घेण्यासाठी स्त्रियांनी केलेला तो संघर्ष आहे, त्या संघर्षाला आपण स्त्रीवाद असे म्हणतो. तिला मुक्तपणे जगता आलं पाहिजे,मोकळा श्वास घेता आला पाहिजे, यासाठी तिने उभारलेला जो संघर्ष आहे. तो संघर्ष स्वतः जगत जगत एक आदर्श निर्माण केला,सामाजिक लढा उभा केला, हा लढा उभा करत असतानाच शाश्वत विकास देखील तिच्या हातून होत आहे, हे अत्यंत उल्लेखनीय व आशावाद निर्माण करणारे चित्र एकविसाव्या शतकात दिसून येते.

● **संशोधनाचा उद्देश:**

1) शाश्वत विकासाचा व स्त्रिया यांचा संबंध अभ्यासणे.

2) बीजमाता राहीबाई पोपरे व फॉरेस्ट इनसाइक्लोपीडिया तुलसी गवडा यांचे संयुक्त राष्ट्र संघटनेने ठरवून दिलेले सतरा ध्येय आहेत यांच्यातील सहसंबंध अभ्यासणे.

● संशोधन पद्धती: सदरील शोध निबंध लिहिण्यासाठी संशोधकाने प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची माहिती व साधन वापरले आहेत.

एकविसाव्या शतकातील अशा दोन स्त्रियांची नावं स्त्री वादातूनच शाश्वत विकास साध्य करताना दिसून आल्या. आणि त्यांच्या कार्याची दखल केंद्र सरकारने घेऊन त्यांना पद्मश्री पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ज्यांना मदर ऑफ सीडस या नावाने संपूर्ण जगभरामध्ये ओळखली जाते एक आदिवासी आणि निरक्षर महिलेने शाश्वत विकासासाठी केलेले फार मोठे योगदान आहे.

1) राहीबाई पोपेरे (जन्म : इ.स. १९६४) या महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील कोंभाळणे या गावातील महिला शेतकरी आणि पारंपरिक बियाणांच्या वाणांच्या संरक्षक-संवर्धक आहेत. देशी वाणांच्या बियाण्यांची जपणूक केल्याबद्दल राहीबाई यांना भारत सरकारने इ.स. २०२० साली पद्मश्री पुरस्कार दिला.

2) तुलसी गवडा कर्नाटक राज्यातील निरक्षर आणि आदिवासी महिलेकडून फार मोठ्या प्रमाणात वनसंपदेची लागवड होऊन निसर्ग संवर्धन या बरोबरच शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी चे योगदान उल्लेखनीय आहे.71व्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने केंद्र सरकारकडून पद्म पुरस्कारची यादी जाहीर करण्यात आली. यांच्या पैकीच एक नाव म्हणजे पर्यावरणवादी तुलसी गौडा. तुलसी गौडा यांना देशातील चौथा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मश्रीने सन्मानित केले आहे.राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी ११९ जणांना पद्म पुरस्काराने गौरव केला. पण यात एक व्यक्तीमत्व असं होतं, ज्याने रेड कार्पेटवर पाऊल ठेवताच सर्वांच्या भुवया उंचावल्या... अंगाभोवती गुंडाळलेली साधारण साडी, अनवाणी पायाने एन्ट्री आणि देशातला चौथा सर्वोच्च नागरी सन्मान... तुलसी गौडा... या ७७ वर्षीय महिलेची ओळख देशात 'एनसायक्लोपेडिया ऑफ द फॉरेस्ट' अर्थात 'जंगलाच्या एनसायक्लोपेडिया' अशी आहे.

पद्मश्री विजेत्या तुलसी गौडा या मूळच्या कर्नाटकच्या हन्नोली गावातील असून हलक्की जमातीशी संबंधित आहेत. तुलसी गौडा यांनी आपल्या कार्यकाळात तब्बल ३० हजारांहून अधिक रोपांची लागवड करत त्यांनी एक संपूर्ण जंगलच उभं केलंय. वनस्पतींच्या दीर्घ ज्ञानामुळे तुलसी गौडा यांना 'एनसायक्लोपेडिया ऑफ द फॉरेस्ट' असं म्हटलं जातं. वयाच्या १० व्या वर्षापासून त्या हे काम निस्वार्थपणे करत आहेत.

● शाश्वत विकास म्हणजे काय:

शाश्वत विकास पर्यावरणाच्या, नैसर्गिक संवर्धनाच्या संबंधात कोणतेही नुकसान होणार नाही, याची काळजी घेऊन विकासात्मक कार्य करणे आणि जे कार्य चिरकाल टिकणारी असते, या सर्व प्रक्रियेला शाश्वत विकास म्हणता येईल.

शाश्वत विकास म्हणजे असा विकास , ज्याद्वारे भावी पिढीच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेला धक्का न पोहचवता, आजच्या पिढीच्या गरजा पूर्ण करता येतील.शाश्वत विकास हा आर्थिक विकासापेक्षा मोठा आहे. कमी कालावधित झालेला विकास हा जास्त काळ टिकू शकत नाही .

थोडक्यात सध्याच्या पिढ्यांच्या (आपल्या) गरजा भागविताना पुढच्या पिढ्यांना त्यांच्या गरजा भागविण्यासाठी संसाधने (जल, जंगल, जमीन, पर्यावरण) शिल्लक राहतील, अशा पद्धतीने विकास आराखडा तयार करणे म्हणजे शाश्‍वत विकास होय.

शाश्वत विकासाचे 17 ध्येय संयुक्त राष्ट्र संस्थांनी निश्चित केली आहे. त्यातील दोन ध्येय पूर्ण करण्यासाठी कर्नाटकातील तुलसी गवडा('एनसायक्लोपेडिया ऑफ द फॉरेस्ट') व महाराष्ट्रातील राहीबाई पेपर (बीज माता) अत्यंतिक मेहनत या दोन स्त्रियांनी केली आहे, आणि सध्या ही त्या अविरतरित्या करत आहेत. संयुक्त राष्ट्र संघटनेने निश्चित केलेल्या सतरा यापैकी 2 ध्येय यावर या महिलांचं प्रचंड योगदान असल्याचे दिसून येते आणि ते सातत्यपूर्ण सुरू आहे, हे अधोरेखित करण्यासारखे आहे. 17 शाश्वत विकासाच्या उद्देशा पैकी "सर्वांना आरोग्यपूर्ण जीवन देणे, पोषण आहारा सह अन्नसुरक्षा देणे" हे उद्देश या बीज मातेकडून पूर्ण करण्यासाठी मोलाची मदत होत आहे. बीज मातेकडून आपल्या भारत देशातील जे जातिवंत बियाणे आहेत, जे आरोग्यासाठी अत्यंत पोषक आणि पर्यावरण समतोल राखण्यासाठी त्यांची खूप मदत होते त्यांचे संवर्धन बीज मातेकडून होत आहे. एक बीज बँक तयार करून ग्रामीण भागातील महिला शेतकऱ्यांना एकत्रित करून पर्यावरण संवर्धनाचे व शेती विकासाचे ,आणि महिला सक्षमीकरणाचे अशा तिन्ही आघाडीवर ही बीजमाता कार्यरत असताना दिसून येते. या बीज मातेने ग्रामीण भागातील तीन हजार महिलांना एकत्रित करून बियाणांचा बचत गट तयार केलेला आहे. याचा फायदा या भागातील महिलांचे सोबतच संपूर्ण महाराष्ट्राला पर्यायाने देशाला होतो आहे.

● देशी बियाणे आणि शाश्वत विकास व मानवी आरोग्य:

भारत हा देश जगामध्ये सर्व संपन्न व विज्ञाननिष्ठ जीवन पद्धती असलेल्या संस्कृतीचा आहे. त्याच जीवनपद्धतीचा एक भाग म्हणून जेव्हा आपण अभ्यास करत असतो तेव्हा,आपण घेत असलेला आहार व वापरत असलेले अन्नधान्य

याचा अत्यंत निकटचा संबंध आहे. अत्यंत सकस असे देशी बियाणे आपल्या भारत देशामध्ये उपलब्ध आहेत,या माध्यमातून भारतीयांना मिळत असलेला अन्नधान्य हे अत्यंत सकस व आरोग्यपूर्ण असायची, परंतु अलीकडच्या कालखंडामध्ये आधुनिकीकरणाच्या नावाखाली आपल्याकडची गुणवंत देशी बियाणांची वाण संपुष्टात येत असताना, किंबहुना काही संपुष्टात आलेली आहेत,त्याची फार मोठी किंमत आपल्या भारतीयांना ती मोजावी लागत आहे. 2019 मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने शाश्वत विकासाची 17 उद्दिष्टे निश्चित केली आहेत. याचे अनेक विपरीत परिणाम भारतीयांच्या आरोग्यावर ती झाल्याचे अनेक संशोधनाच्या माध्यमातून दिसून आले आहे. अगदी लहान वयापासून शुगरची लागण होणे, हार्ट अटॅक चे प्रमाण वाढणे, कॅन्सरचे प्रमाण वाढत जाणे यासारख्या अनेक घटना आपण दररोज अनुभवत आहोत.

आपण वापरत असलेल अन्नधान्य यामध्ये फार मोठे पद्धतीने भेसळ व जनुकीय पद्धतीने तयार केलेले बियाणे हायब्रीड पद्धतीची बियाणे वापरून मोठ्या प्रमाणात अन्नधान्य उत्पादन करण्याचा प्रयत्न केला जातो आहे, याचाच परिपाक म्हणून अशा अनेक व्याधींना आपल्या युवकांना, भारतीयांना सामोरे जावे लागत आहे.

अशा भयावह परिस्थितीमध्ये राहीबाई पोपेरे यांच्या माध्यमातून जवळपास 2000 प्रकारची बियाणं जे अस्सल देशी आहेत व ते आपल्या आरोग्यास अत्यंत समरस व उपयुक्त आहेत याचे जतन त्यांच्या माध्यमातून झालेला आहे, म्हणजेच शाश्वत विकासामध्ये त्यांचे फार मोठे योगदान आपल्याला या संशोधनाच्या माध्यमातून दिसून येते. त्या बियाणांची बँक तयार करून जवळपास तीन हजार महिला शेतकऱ्यांना एकत्रित करून, त्या बियांची जपणूक व संवर्धन त्यांच्या माध्यमातून होत आहे.दुसऱ्या बाजूला या बियाणांचा प्रसार व प्रचार त्या तीन हजार शेतकरी महिलांच्या माध्यमातून होत आहे. अत्यंत उल्लेखनीय कार्य या संशोधन निबंधामध्ये मला मांडावेसे वाटते. याच्यातून महिला सक्षमीकरण देखील मोठ्या पद्धतीनं होत आहे, अशा अनेक पद्धतीचे बहु आयामी कार्य राहीबाई यांच्या माध्यमातून होत आहे. हे कार्य पर्यावरण पोषक आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेने सांगितलेले ध्येय निश्चित साध्य करण्यासाठी, अत्यंत सहाय्यभूत व उपयुक्त आहेत असे या ठिकाणी मला म्हणावेसे वाटते.

● वनसंपदा आणि शाश्वत विकास व पर्यावरण:

जंगल संपत्ती आणि शाश्वत विकास आणि पर्यावरण यांचा अत्यंत जवळचा अविभाज्य असा संबंध आहे.नागरिकीकरणाच्या वाढत्या अवकाशात विकास आणि पर्यावरण यांच्यातील परस्परविरोधी आयामांसंबंधीचे वाद आता नवे राहिलेले नाहीत. शाश्वत विकासाच्या दिशेने प्रगती करत असताना निष्पक्षपातीपणा, क्षमता आणि शाश्वतता अशा विविध घटकांतील समतोल राखणे गरजेचे आहे. यामध्ये शाश्वत विकाससंदर्भातील १)आर्थिक प्रगती, कार्यक्षमता व स्थैर्य, २) पर्यावरणीय समस्या, संसाधने आणि कचरा आणि ३) सामाजिक सबलीकरण, संघटन आणि समावेशकता, – या तीन घटकांतील परस्परसंबंधांचे निराकरणही केले पाहिजे. 'शाश्वततेची व्याप्ती' व तिला आधारभूत असलेल्या सामाजिक घटकांतील विस्कळितपणा यावर मोठ्या प्रमाणात वादचर्चा होत असल्या, तरीही यामध्ये आर्थिक आणि पर्यावरणीय

विकासाला शाश्वत स्वरूप प्राप्त देण्यासाठी आवश्यक अशा पूर्वसूचना २०३० च्या शाश्वत विकासाच्या आराखड्याच्या (SDG) अंतर्भूत करण्यात आल्या आहेत. यामध्ये शाश्वत विकासाची १७ व्यापक उद्दिष्टे देखील निश्चित करण्यात आली आहेत. या दस्तावेजामध्ये शाश्वत विकास साधण्याच्या उद्दिष्टांपेक्षाही– समावेशकतेवर जास्त भर देण्यात आला आहे. यामध्ये समावेशक शब्दाच्या अनुषंगाने ४१ संदर्भतत्त्वांसह 'समावेशक समाज' आणि 'समावेशक वृद्धी' इत्यादी आयामांवर अधिक भर देण्यात आला आहे. शाश्वत विकास आणि समावेशक विकास यांच्यातील परस्परसंबधाबद्दल यामध्ये महत्त्वाची भूमिका मांडली गेली आहे. त्यानुसार वस्तुत: 'समावेशक विकास' हा शाश्वत विकासाचाच एक उपघटक मानण्यात आलेला असून पर्यावरणीय आणि सामाजिक क्षेत्र यांच्यातील

अन्योन्यता यातून स्पष्ट होते. मात्र वास्तवात निष्पक्षपातीपणा, सर्वसहभाग आणि सामाजिक एकोपा या घटकांना सामावून घेणारी परस्परावलंबी सामाजिक जाणीव खूपच मर्यादित आहे.

तुलसी गौडा यांच्या माध्यमातून वनसंपदा व औषधी वनस्पती यांचा फार मोठ्या पद्धतीने संवर्धन झालेला आहे, किंबहुना ती वाढ करण्यामध्ये त्यांचे फार मोठे योगदान आहे. अगदी डोंगर-दऱ्यांमधे आदिवासी भागांमध्ये या महिला निरक्षर असूनही, मिळेल त्या साधनांच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनासाठी अखंडपणे झटताना दिसून येतात, याचा खूप अभिमान आम्हा सर्व भारतीयांना आहे आणि हे जाणीवपूर्वक मला या संशोधन लेखाच्या माध्यमातून मांडव याची तीव्र इच्छा निर्माण झाली.तुलसी गौडा कर्नाटकच्या किनारी भागात असलेल्या उत्तर कन्नड जिल्ह्याच्या अंकोला तालुक्यातल होन्नाळी गावातल्या. आर्थिकरीत्या मागास अशा हालाक्की आदीवासी कुटुंबात त्या जन्मल्या, वाढल्या.डेक्कन हेराल्ड वृत्तपत्राच्या माहितीनुसार, तुलसी दोन वर्षांच्या असतानाच त्यांच्या वडिलांचं निधन झालं. आर्थिक परिस्थितीमुळे त्यांनी शाळेत प्रवेशच घेतला नाही. लहानपणापासूनच त्या आईसोबत शेतात मजुरीसाठी जायच्या.

तुलसी गौडा यांचा अत्यंत गरीब कुटुंबात जन्म झाला. आपल्या आयुष्यात तुलसी गौडा यांना शालेय शिक्षण घेता आलं नाही. त्या दोन वर्षांच्या असतानाच वडिलांचं छत्र हरवलं. त्यानंतर त्यांनी आपल्या आईसोबत एका नर्सरीत काम केलं. अत्यंत कमी वयातच लग्न झालं आणि कुटुंबाची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर आली. गौडा यांनी अत्यंत सक्रीयपणे पर्यावरण संवर्धनाचं काम केलं आणि हजारो रोपट्यांची लागवड केली. त्यांनी स्वयंसेवक म्हणून वन विभागात काम सुरू केलं आणि इथेच त्यांच्या पर्यावरण संवर्धनाच्या कामाला खरी ओळख मिळाली. त्यांना वन विभागातच महत्त्वाच्या पदावर बढती देण्यात आली आणि त्यानंतर १५ वर्षांनी म्हणजे वयाच्या ७० व्या वर्षी त्या निवृत्त झाल्या. अशा या अनमोल रत्नाचा सन्मान राष्ट्रपती भवनात करण्यात आला.
'पद्मश्री' पुरस्कारापूर्वी त्यांना 'इंदिरा प्रियदर्शिनी वृक्ष मित्र पुरस्कार', 'राज्योत्सव अवॉर्ड' आणि 'कविता मेमोरियल' यांसारख्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलंय.

अशा या दोन कर्तृत्ववान महिलांना सलाम करून संयुक्त राष्ट्र संघटनेने ठरवून दिलेले मानवी कल्याणाचे उद्दिष्ट आहेत ते उद्दिष्ट तडीस नेण्यास, पूर्ण करण्यासाठी त्यांचा अमूल्य असे योगदान आहे, असे ठामपणे याठिकाणी मान्य करावे लागते. या दोघींच्या कर्तृत्वामुळे निश्चित पर्यावरण समतोल राखून आरोग्यपूर्ण अन्नसुरक्षेचा प्रश्न पुरवण्यासाठी निश्चित मदत होणार आहे, असे याठिकाणी मला सांगावेसे वाटते. आणि या दोघी चे कार्य निश्चितच पर्यावरण समतोल समरस राहण्यासाठी साहाय्यभूत आहे , अत्यंत उल्लेखनीय आणि अतुलनीय आहे.

- **संदर्भ यादी:**

1)https://mr.m.wikibooks.org › wiki स्त्रीवाद, संकल्पना आणि सिध्दांकन - विकिबुक्स.

2)https://hi.m.wikipedia.org › wiki नारीवाद - विकिपीडिया.

3)https://mr.m.wikipedia.org › wiki शाश्वत विकास - विकिपीडिया.

4)https://youtu.be/nNyY8XAoEzU.

5)https://www.lokmat.com/maharashtra/rahibai-poparne-included-bbc-list-chedding-seed-mother-table-world/

6)https://indiadarpanlive.com › colum...इंडिया दर्पण विशेष - निसर्ग यात्री - खरी वृक्ष माता तुलसी गौडा - India Darpan Live.

7)https://www.orfonline.org › marathiशाश्वत विकासासाठी सामाजिक अंतर्भाव महत्वाचा | ORF.

8) लोकमत, लोकसत्ता, सकाळ, नियतकालिके.

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, 341 (CCCXLI)
ISSN : 2278-9308
March, 2022

# शिवकालीन स्त्री जीवन

## डॉ. श्रेया संजीव दाणी

राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे,कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,लांडेवाडी ,भोसरी, पुणे - ३९

**•गोषवारा :-**

मध्युगामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आदर्श राज्यव्यवस्थेची निर्मिती केली. तत्कालीन सुलतान आणि मोगलांच्या अत्याचारी राजवटीपेक्षा शिवाजी महाराजांचे राज्य उत्कृष्ट व उठावदार होते. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यव्यवस्थेत सर्वांगीण विकास हे ध्येय ठेवले होते. स्त्रीजीवन हा घटक समाजव्यवस्थेमध्ये महत्वपूर्ण मानला जातो.

**•प्रास्ताविक :-**

शिवाजी महाराजांची मुलकी व लष्करी प्रशासन महत्वाचे होते. राजकीय, सामाजिक, आर्थिक, लष्करी, धार्मिक परिस्थिती मध्ययुगातमहत्वाचे मानली जाते. शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीमध्ये 'समाज' या घटकाला त्यांनी अनन्यसाधारणमहत्वदिले. समाज जीवनामध्ये स्त्रीजीवन किंवा स्त्रियांची स्थिती या घटकाचा अभ्यास होणे अधिक महत्वाचे आहे.

**संशोधनाची गृहितके :-**

१) मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान अव्दितीय आहे.

२) समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न महाराजांनी केल्याचे दिसते.

३) आपल्या राज्यात स्त्रीला आदर्श जीवन जगता यावे अशी महाराजांची सदैव इच्छा असे.

४) आपल्या राज्यातही आणि शत्रु प्रांतातही स्त्रियांची अवहेलना होणार नाही यापध्दतीची वर्तणूक असावी अशा सूचना महाराजांनी दिलेल्या दिसतात.

५) **शिवकालीन स्त्रीजीवन :-**

कोणत्याही समाजाची जीवनपध्दती किंवा संस्कृती त्या समाजात स्त्रीचे स्थान कोणत्या दर्जाचे आहे यावर ठरविले जाते. स्त्रियांचा दर्जा ठरविताना तत्कालीन समाजाचे नेतृत्व करणारे विचारवंत, राज्यकर्ते तसेच अस्तित्वात असलेल्या सामाजिक संस्थांच्या अवस्थेवर अवलंबून असते. मध्ययुगीन काळात स्त्रीला समान दर्जा देण्याची वैचारिक आणि सामाजिक स्थिती नव्हती. त्यामुळे या काळातील समाजव्यवस्थेत स्त्रीला दुय्यम स्थान होते. पितृसत्ताक कुटुंब पध्दतीमुळे पुरुषांची सत्ता चालत असे. त्याचप्रमाणे समाजात किंवा राजकारणातही पुरुष वर्गाचेच वर्चस्व चालत असे.

याकाळात सर्वत्र एकत्र कुटुंबपध्दती अस्तित्वात होती. मोठ्या कुटुंबप्रमुखाला महत्त्वाचे व मानाचे स्थान असे. घरातील स्त्रियांना घरकामाबरोबरच मुले-बाळे सांभाळणे आणि शेतीच्या कामात मदत करणे ही कामे करावी लागत असत. बहुपत्नीत्वाची पध्दत असल्याने अनेक स्त्रियांना पतीसुखापासून वंचित राहावे लागत असे. ब्राम्हण वर्गात एकाच वेळी विवाह होत असल्यामुळे अनेक विधिंप्रमाणेच जन्मकुंडली, गोत्र, मुहूर्त या गोष्टींवर भर दिला जात असे. इतर वर्गात मात्र बहुपत्नीत्वाची पध्दती अस्तित्वात होती.

शिवकालीन स्त्री जीवनाचा आढावा घेताना खालील काही महत्वपूर्ण घटकांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरेल.

१) **विवाह पध्दती:-** विवाहाचे एकंदर आठ प्रकार सांगितले असले तरीही सर्वपध्दती अस्तित्वात नव्हत्या. शिवकाळात बालविवाहाची पध्दती अस्तित्वात होती. मुलीचे वय आठ वर्षे झाले म्हणजे तिचा विवाह होत असे. या पध्दतीमुळे अनेक वेळा स्त्रीवर वैधव्य पत्करण्याची वेळ येत असे. लढाईमध्ये पतीचा मृत्यू झाल्यास तरुण स्त्रियांना अपमानित वैधव्यचे जीवन व्यतीत करण्यापेक्षा सती जाणे योग्य वाटत असे. शिवकाळात सामान्यपणे बालविवाह, विषम विवाह, आसूरविवाह, राक्षसविवाह हे प्रकार अस्तित्वात होते. विधवा विवाहाचीही काही उदाहरणे आढळतात. ब्राम्हण जातीत मात्र विधवा विवाह होत नसत.

२) **बहुपत्नीत्व** :-एकंदरीत शिवकाळात बहुपत्नीत्वाच्या प्रथेला मान्यता होती. राज्यकर्ते, सरदार व सरंजामदार अनेक विवाह करीत असत. याशिवाय रखेल्याही ठेवीत असत. छत्रपती शिवाजी महाराजांनी आठ विवाह केले होते. त्यांच्या वारसांनीदेखील एकापेक्षा अधिक विवाह केले होते.

३) **घटस्फोट प्रथा** :-याकाळात घटस्फोट घेण्याची प्रथा होती. फक्तब्राम्हणवर्ग त्यास अपवाद होता. बऱ्याच वेळा पहिल्या पत्नीला घटस्फोट न देताच दुसरा विवाह केला जात असे. त्यामुळे तत्कालीन स्त्रीजीवन दयनीय होते.

४) **विधवा स्त्रियांची स्थिती** :-विधवा झालेल्या स्त्रीसंबंधी तत्कालीन समाजात असलेले विचार अत्यंत प्रतिगामी व मानवताविरोधी होते.ब्राम्हण समाजातविधवेला दिली जाणारी वागणूक अत्यंत क्लेशकारक होती. बालविधवेला देखील पुनर्विवाह करता येत नव्हता. उलट विधवा झालेल्या बालिकेला देखील ताबडतोब केशवपन करावे लागे. पतीच्या प्रेताबरोबर तिचे केस जाळण्यात येत असत.विधवेने कोणत्याहीकार्यक्रमात भाग घेऊ नये. व्रतस्थ जीवन जगावे. उपास तपास करून सामान्य स्वरूपाचे राहणीमान ठेवावे.विधवेने जर सदाचार भंग केला तर ती नरकात जाते व स्वर्गातील तिचा पती पापी ठरतो असे मानले जात असे. तिचे आईवडील व भावांचा नाश घडून येतो अशी अंधश्रध्दा अस्तित्वात होती. विधवेला तिच्या स्वतःच्या उध्दारासाठी नव्हे तर स्वर्गात असलेल्या पतीसाठी ही बंधने पाळावी लागत असत.

५) **सतीप्रथा** :- सती जाण्याची प्रथा उत्तर भारतातून दक्षिणेत आली होती. सती जाणे हे एक पवित्र कर्तव्य असे भासवले जात असे. सती जाणारी स्त्री आपल्या मातृकुल व पितृकुलाचा उध्दार करते असे सांगण्यात आले होते. स्वर्गीय सुखाचे आमिष दाखवण्यात आले होते. त्यामुळेब्राम्हण वर्गापासुन शूद्रांपर्यंत सर्वचवर्गातील सती गेलेल्या स्त्रियांची उदाहरणे आढळतात. तरीही सतीचे प्रमाण अतिशय कमी होते. अनेक सती प्रकारात पती प्रेमापेक्षा धार्मिक दडपणच अधिक जबाबदार होते असे दिसते.

६) **स्त्रियांचे अधिकार व मालमत्तेतील हक्क**:-अधिकाराच्या बाबतीतस्त्रिया तशा वंचितच असत. मालमत्तेच्या अधिकाराबाबत पतीच्या निधनानंतर तिचा हक्क अतिशय मर्यादित स्वरूपाचा होता.'मितक्षरा' आणि 'विज्ञानेश्वर' या ग्रंथात नमूद केल्याप्रमाणे पतीच्या निधनानंतर पत्नीला आपल्या पतीची सर्व संपत्ती मिळत असे. पण प्रत्यक्षात मात्र विधवा बनल्यानंतर ती पूर्णपणे आपल्या मुलावर अवलंबून असे. वारस नसलेल्या विधवेची बहुतेक मालमत्ता सरकार जमा होत असे व तिला उदरनिर्वाहापुरतीसह साधनसंपत्ती ठेवली जात असे. एकंदरीत विवाहानंतर तिला आपल्या वडिलोपार्जित मालमत्तेवरील हक्काचा त्याग करावा लागे व पती निधनानंतर मुलावर अवलंबून राहावे लागत असे.

७) **स्त्रियांचे शिक्षण व राज्यकारभारातील सहभाग** :-या काळात पुरुष वर्गालाच सहजतेने शिक्षण मिळत नव्हते, त्यामुळे स्त्री शिक्षण हे एकस्वप्नच होते. फक्त राजघराण्यातील व काही उच्च सरदार कुळातील मोजक्या स्त्रियांना लेखन, वाचन व युध्दाचे प्रशिक्षण क्वचितच मिळत असे. त्याकाळात स्त्री शिक्षण म्हणजे तसा एक अपवादच होता. राजमाता जिजाबाई व त्यांची सून व छत्रपती राजारामाची पत्नी महाराणी ताराबाई याच शिवकाळात काहीअंशी शिकलेल्या स्त्रिया होत्या.

८) **हीन समजल्या जाणाऱ्या स्त्री जाती** :-शिवकाळात स्त्रियांच्या हीन समजल्या जाणाऱ्या काही जाती होत्या, गणिका, जोगिणी, मुरळी, कुणबिनी व वेश्या अशी या स्त्रीवर्गाची नावे होती. यापैकी गणिका या उच्चवर्गियांच्या रखेल्या व नृत्य गायनातून मनोरंजन करणाऱ्या स्त्रिया होत्या. मुरळी व जोगिणी किंवा जोगतिणी या देवाला वाहिलेल्या स्त्रिया होत्या. मूलबाळ होत नसेलकिंवा झालेले मूल वाचत नसेल तर खंडोबा या देवाला पहिले मूल वाहण्यात येत असे. नृत्य गायन करून उदरनिर्वाह चालविणाऱ्या या खंडोबाच्या वाघ्या - मुरळींना विवाह करता येत नसे.जोगीण किंवा जोगतीण हीदेखील देवीला नवसानिमित्त वाहिली जात असे. कुणबीनही वरिष्ठ वर्गातील गणिकाचे काम करणारी असे. ही अधिकारी व जमिनदार देशमुख, देशपांडे यांनी बाळगलेली दासी होती. कुणबीन बाळगणे ही या कनिष्ठ व ग्रामीण सरदार जमीनदारांची एक चैनीची गोष्ट मानली जात असे.सर्वात हीन समजला जाणारा वर्ग हा वेश्याव्यवसाय करणाऱ्यांचा होता. बालविवाह व विषमविवाह पध्दतीच यास कारणीभूत होती. परंतु वेश्यांचे जीवन अतिशय वाईट असे. आयुष्याच्या शेवटी बहुतेक वेश्या भीक मागूनच आपला उदरनिर्वाह करीत असत.

अशाप्रकारे शिवकाळात स्त्रीयांचे जीवन होते. फारसे अधिकार त्यांना नव्हते हे मात्र मान्य करावे लागते.

• **मध्ययुगीन सामाजिक व धार्मिक चौकट** :-ज्याप्रमाणे मध्ययुगीन काळात सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक बाबतीत स्त्रियांची होरपळ होत असे, त्या प्रमाणे शिवकाळात स्त्रियांची एकुण स्थिती होती. भारताच्या मध्ययुगाचा विचार करता संत चळवळ आपल्या समोर उभी राहते. संत चळवळीतील स्त्रियांची नावे समोर येतात. परंतु संतपरंपरेत स्वतःसाठी अवकाश निर्माण करून घेणाऱ्यास्त्रिया हाताच्या बोटावर मोजण्याइतक्याच आहेत. सर्वसामान्य स्त्रिया यामध्ययुगीन सामाजिक चौकटीचाच भाग असल्याने दुय्यमतेचेच जीवन जगत होत्या. त्यापेक्षा निराळे काहीही असू शकत नव्हते. शिवाजी महाराजांवर सुध्दा मध्ययुगीन सामाजिक आणि धार्मिक चौकटीच्या मर्यादा होत्या. हे याबाबतीत नाकारता येत नाही.

• **शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन** :- इतिहासकार डॉ. बाळकृष्ण यांच्या मतानुसार,"शिवाजी महाराजांच्या राज्यात व परराज्यातील मोहिमांमध्ये स्त्रियांना नेहमीच आदराने वागवले जाई. स्त्रियांना कैद करायला बंदी होती.त्यांना अत्यंत सन्मानाने वागविले जात असे".

छत्रपती शिवाजी राजांचा दंडक होता की, स्वराज्यातील व परराज्यातील स्त्रियांचा आदर केला पाहिजे. राजकीय संघर्षात महिलांचा अनादर होणार नाही याची दक्षता वेळोवेळी महाराजांनी घेतलेली दिसते. महिलांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्यांना महाराजांनी कठोर शिक्षा दिल्या. शिवाजी महाराजांनी स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावण्याचे महान कार्य केले. मध्ययुगातील शिवाजी महाराज हे पहिले राजे होते की, ज्यांनी स्त्रियांच्या आत्मसन्मानासाठी मोठे कार्य केले. आपल्या मातोश्री जिजाबाई यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. ही त्याकाळातील खरोखरच एक सामाजिक क्रांती होती असे म्हणावयास हरकत नाही.

• **मूल्यमापन** :-शिवकालीनस्त्री जीवनाचाआढावा घेताना मध्ययुगीन काळातीलस्त्रीजीवन व त्याचा विचार होणे महत्वाचे आहे. वर्गव्यवस्थेनुसार विवेचन केल्यास वरिष्ठ वर्गातील स्त्रिया बऱ्यापैकी चैन विलासात आपला वेळ व्यतीत करीत असत. मध्यम वर्गातील स्त्रिया संपूर्णपणे गृहकृत्यात मग्न असत. तर कनिष्ठ वर्गातील स्त्रिया आपले घर सांभाळून उदरनिर्वाहासाठी आपल्या नवऱ्याबरोबर काम किंवा मदत करीत असत.

• **निष्कर्ष** :-कोणत्याही वर्गातील स्त्रीला धर्मशास्त्राप्रमाणे आपल्या वैवाहिक जीवनात पूर्णपणे पतीवर अवलंबून राहावे लागत असे. शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळात स्त्रियांना मानसन्मान, आदर मिळवून देण्याचा मोठा प्रयत्न केला हे जरी खरे असले तरी, शिवकालीन स्त्रियांचे जीवन हे कष्टप्रद असून त्यांना फारसे अधिकार नव्हते ही गोष्ट मान्य करावीच लागते हा निष्कर्ष काढावालागतो.

**संदर्भ ग्रंथ सूची–**

• कुलकर्णी अ. रा. शिवकालीन महाराष्ट्र, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर १९७८.
• सरदेसाई गो. स. मराठी रियासत खंड १ ते ८ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
• भावे वा. कृ. शिवराज्य व शिवकाळ, पुणे १९५७.
• जोशी एस. एन.(संपा.) छत्रपती शिवाजीराजे यांची बखर, चित्रशाळा, पुणे १९६०.
• जोशी एस. एन. मराठेकालीन समाज दर्शन, अ. वि. गृह प्रकाशन, पुणे १९६०.
• गायकवाड बी. डी., सरदेसाई, थोरात, हणमने, मराठेकालीन संस्था व विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर १९८७.
• गर्गे स. मा., इतिहासाची साधने – एक शोधयात्रा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

# सक्षमीकरण महिलांच्या सर्वांगीण विकासाचे साधन

**डॉ. सोमा पी. गोंडाणे**
राजीव गांधी कला महाविद्यालय पाटण तालुका जीवती जिल्हा चंद्रपूर - ४४२९०८

सारांश

भारतीय समाजात प्राचीन काळापासून महिलांना पुरूषांप्रमाणे समान अधिकार दिले गेले आहेत. त्यांना त्यांच्या जीवनाची प्रतिष्ठा जपण्याचा आणि सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा पूर्ण अधिकार देण्यात आला आहे. शिक्षण आणि ज्ञानविज्ञानाच्या

क्षेत्रातही महिलांना त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन आणि अभिव्यक्ती करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले आहे. महाभारत काळानंतर स्त्रियांची स्थिती खालावली, तिच्याकडून शिक्षणाचा हक्क हिरावून घेतला गेला, हळूहळू स्त्रियांची स्थिती दयनीय, चिंताजनक बनली. सध्याच्या काळात काळाच्या ओघात महिलांच्या स्थितीत खूप मोठे बदल होत आहेत. काळ बदलत आहे. अत्याचार, अत्याचारापासून मुक्त होऊन महिला जागरूक होत आहेत. आज महिला विकासात आघाडीवर आहेत. प्रत्येक क्षेत्रात ती वेगळी ओळख निर्माण करत आहे. पुरुषांच्या बरोबरीने काम करणे. आधुनिक युगातील स्त्रीचे हे रूप आहे. समाजाची प्रगती पुढे नेण्यात महिलांची मदत झाली आहे. समाजाचा सर्वांगीण विकास तेव्हाच शक्य आहे जेव्हा स्त्री आणि पुरुष दोघांचा समान विकास होईल. दोघांनाही व्यावहारिकदृष्ट्या समान अधिकार असले पाहिजेत. केवळ एका वर्गाच्या विकासामुळे समाजात असंतुलन निर्माण होईल. यासाठी महिलांमध्ये साक्षरता, जागृती, स्वावलंबन वाढवण्यासाठी समन्वित, संघटित प्रयत्न होणे गरजेचे आहे. कारण वस्तुस्थिती अशी आहे की आजही अधिक महिलांना त्यांच्या हक्कांची आणि त्यांच्या विकासासाठी केलेल्या सरकारी-निमसरकारी योजनांची पुरेशी माहिती नाही.

सशक्तीकरण ही एक प्रक्रिया आहे ज्याद्वारे एखादी व्यक्ती जागरूकता, कार्यक्षमतेच्या चांगल्या नियंत्रणासाठी प्रयत्न करून स्वतःबद्दल निर्णय घेण्यास स्वतंत्र होते. या दृष्टिकोनातून, महिला सक्षमीकरण हा सर्वांगीण आणि बहुआयामी दृष्टीकोन आहे. राष्ट्र उभारणीच्या मुख्य प्रवाहात महिलांच्या पुरेशा आणि सक्रिय सहभागावर विश्वास ठेवतो. जेव्हा महिलांना समाजात त्यांचे योग्य स्थान दिले जाते तेव्हाच राष्ट्राचा सर्वांगीण आणि सामंजस्यपूर्ण विकास होतो. त्यांना पुरुषांसोबत विकासाचे भागीदार मानले पाहिजे. सबलीकरण अंतर्गत, महिलांना त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्य, राजकीय सहभाग आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध घटकांवर छाप आणि नियंत्रण मिळते. त्याची ताकद, शक्यता, क्षमता, अधिकार आणि जबाबदाऱ्यांची जाणीव होते.

**मुख्य शब्द -** सुशिक्षित , प्रकाशमय, अर्धपोटी, पिढी, समृद्धी, प्रक्रिया, संविधान, आरक्षण

उद्देश

1) स्वत: निर्णय घेण्याची क्षमता आणि त्यासाठी पुरेशी संसाधने वापरण्याची क्षमता आहे का हे जाणून घेणे.

2) लोकशाही मार्गाने इतरांचे विचार बदलण्याची क्षमता त्यांच्यात आहे का हे जाणून घेणे.

3) सामाजिक परिवर्तनात आणि विकासात सहभागी होण्याची क्षमता आहे का हे जाणून घेणे.

4) सामूहिक निर्णय घेण्यात त्या सक्सम आहेत का हे जाणून घेणे.

**अर्थ आणि व्याख्या**

सशक्तीकरण या शब्दाचे विभाजन स + शक्ती + करण आहे ज्यामध्ये सउपसर्ग आहे. शक्ती ही एक संज्ञा आहे. हा शब्द विशेषण आणि प्रत्यय यांपासून बनलेला आहे. सशक्तीकरण याचा अर्थ ध्वनी, शक्तीसह गतिशीलता आहे सशक्तीकरण ही एक विकास प्रक्रिया आहे. कमकुवत व्यक्तीला बलवान बनवण्याची एक सतत, सतत प्रक्रिया, एक पूर्ण सक्षम व्यक्ती म्हणजे जो त्याच्या जीवनाशी संबंधित निर्णय घेण्यास पूर्णपणे स्वतंत्र असतो. ज्या सामाजिक

संदर्भात विवाह, संतती आणि व्यवसाय इत्यादी बाबींवर घर किंवा सामाजिक स्तरावर कोणताही दबाव नसतो, अशा प्रकारे महिलांच्या संदर्भात सक्षमीकरणाची संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते.

**डॉ. दिग्विजय सिंह** यांच्या मते, महिला सक्षमीकरणाचा अर्थ - सत्तास्थापनांमध्ये महिलांचा सहभाग असणे आणि निर्णय घेण्याची क्षमता निर्माण करणे हा एक सक्षमीकरणाचा उत्तम उपाय आहे अशाप्रकारे महिला सक्षमीकरणाचा अर्थ आहे . सध्याच्या व्यवस्थेला आणि समाजाच्या पद्धतीला आव्हान देण्यासाठी समान संधी, राजकीय आणि आर्थिक धोरणनिर्मितीमध्ये सहभाग, समान कामासाठी समान वेतन, कायद्यानुसार संरक्षण, पुनरुत्पादनाचा अधिकार इत्यादींचा यात समावेश होतो .

**डॉ.अरुण कुमार** सिंह यांच्या मते, महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सक्षम बनवणे जेणेकरुन त्या सहज त्यांचे जीवन व्यवस्थीत जगू शकतील.

**ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी** प्रमाणे अक्षमतेच्या स्थितीला सशक्त होण्याची क्रिया म्हणून परिभाषित केले आहे. सशक्तीकरणाचा अर्थ - सक्षम करणे, सत्ता देणे, शक्तीची कल्पना सशक्तीकरणाच्या मुळाशी आहे.

**महात्मा गांधींच्या** मते, अधिकाधिक महिलांना त्यांच्या सद्यस्थितीची जाणीव करून देण्याचा आपला पहिला प्रयत्न असायला हवा.

**प्रस्तावना**

महिला सक्षमीकरणाची संकल्पना सविस्तरपणे समजून घेतल्यावर प्रश्न पडतो की, महिला सक्षमीकरण कसे करायचे, महिला सक्षमीकरणाची संकल्पना समजून घेण्यासाठी ती बहुआयामी संकल्पना असल्याचे समजते . केवळ एकाच दिशेने प्रयत्न करून अपेक्षित यश मिळणे कठीण आहे. प्रत्यक्षात महिला सक्षमीकरणाला अनेक आयाम, अनेक दिशा, अनेक प्रकार आहेत. काही प्रमुख परिमाणे तपशीलवार समजावून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. पण महिला सक्षमीकरण आवश्यक आहे, हाही महत्त्वाचा प्रश्न आहे.

**महिला सक्षमीकरणचे महत्त्व**

कोणत्याही संतुलित समाजव्यवस्थेसाठी, विकासाच्या क्षेत्रात स्त्री आणि पुरुष दोघांचा समान सहभाग आवश्यक आहे. यामध्ये महिला सक्षमीकरणामागे पुरुष किंवा स्त्रीचे श्रेष्ठत्व सिद्ध करणे हे उद्दिष्ट नाही. उलट त्या उपाययोजनांची खात्री करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागेल. जेणेकरुन स्त्रिया आणि पुरुष समानतेने विकास साध्य करण्यासाठी योगदान देऊ शकतील, लिंगभेदापासून मुक्त वातावरण परस्पर पूरक असावे. या दृष्टिकोनातून, महिला सक्षमीकरणाचे असे अनेक आयाम आहेत, ज्यांच्या आधारे प्रेरणा आणि प्रोत्साहन देऊन महिला सक्षमीकरणाच्या दिशेने अपेक्षित परिणाम साध्य करता येतात. सशक्तीकरणाचे काही आयाम स्पष्ट करण्याचा प्रयत्न करूया.

**महिला सक्षमीकरणाचे विविध आयाम**

महिला सक्षमीकरण समजून घेण्यासाठी त्याचे विविध आयाम समजून घेणे आवश्यक आहे. या विचार धारेच्या मूळ स्वरूपात स्त्री-पुरुष यांना एकमेकांचे पूरक मानून समतावादी व्यवस्था विकसित करण्याचा उद्देश आहे, या प्रक्रियेचे अनेक आयाम आहेत, जसे की

**शैक्षणिक सक्षमीकरण**

एक सुशिक्षित स्त्री आत्मविश्वासाने भरलेली असते तसेच तिच्या ज्ञानाने तिचे कुटुंब उजळून निघते. आणि ती स्वतःलाही प्रकाशमय करते . मुलाची पहिली गुरू म्हणजेच त्याची आई जर सुशिक्षित असेल तर भावी पिढी सुशिक्षित होण्याची शक्यता अनेक टक्क्यांनी वाढते,. याशिवाय सामाजिक विसंगतींला मारण्याचे काम देखील शिक्षनातच आहे. शिक्षणाने महिलांना कुटुंबात आणि समाजात सन्मान मिळू शकतो, तसेच आर्थिक स्वातंत्र्यही मिळू शकते. महत्त्वाच्या कौटुंबिक निर्णयांवर आपले मत देण्याबरोबरच एक शिक्षित स्त्री निर्णय प्रक्रियेत सहभागी होऊ शकते हे लक्षात घेण्यासारखे आहे. आज प्रत्येक समाजात सकारात्मक बदल होताना दिसत आहेत.मुलींनी शिक्षण घ्यावे यासाठी लोक प्रयत्नही करू लागले आहेत. हे प्रयत्न करत असताना मुलीने तिची इच्छा असेपर्यंत शिक्षण घेतले पाहिजे तसेच तिचे पूर्ण शिक्षण झाल्याशिवाय लग्नाचा विचारही करता कामा नये. मानवाच्या सर्वांगीण उन्नती चे एकमेव साधन म्हणजे शिक्षण आहे हा मूलमंत्र लक्षात घेऊन महिलांच्या शिक्षणाकरीता पुढाकार घेतला पाहिजे.

**शारीरिक आरोग्य सक्षमीकरण**

याचा अर्थ बॉडी बिल्डिंग किंवा रिंगणात उतरणे असा होत नाही. या सक्षमीकरणाचा अर्थ महिलांच्या आरोग्याशी निगडित आहे. एक महिला किंवा आई ही सगळयांना आधी खायला घालते आणि मग सर्वांच्या नंतर स्वतः जेवण करत असते ती नेहमी सिळ अन्न खात असते. किंवा ती कधीकाळी अर्धपोटी ही राहत असते त्यामुळे शरीर अशक्त आणि आजारी होते. शरीराने कमकुवत असलेल्या महिलांना गरोदर असताना अनेक प्रकारच्या समस्यांना सामोरे जावे लागते. अशक्त आईचे मूलही अशक्त असते. आणि तिचे संपूर्ण आयुष्य रोगांशी लढतांना संपत असते . त्याच्या आरोग्याचा विकास होत नाही ज्यामुळे त्याचे संपूर्ण आयुष्य आणि संपूर्ण पिढी प्रभावित होते. एक स्त्री स्वतःची किंवा तिच्या कुटुंबाची काळजी घेण्यास देखील असमर्थ होते. अशा स्त्रीची पात्रता होऊनही प्रगती होत नाही. म्हणूनच त्यांनी त्यांच्या खाण्यापिण्याकडे लक्ष देताना त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे, जीवन असेल तर जग आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे.

**आर्थिक सक्षमीकरण**

आजच्या युगात प्रत्येकाने स्वतंत्र असणे गरजेचे आहे. महिलांनीही आपल्या कुवतीनुसार पैसे मिळवण्यासाठी पुढे आले पाहिजे. आर्थिकदृष्ट्या संपन्न महिला कुटुंबात समृद्धी आणतात. त्याच वेळी, ती तिची कोणतीही इच्छा स्वतःच्या इच्छेनुसार पूर्ण करण्यास सक्षम होते . आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र स्त्री वाईट काळात कोणाही समोर झुकत नाही. स्वत:चा व मुलांचा सांभाळ करण्यासाठी त्याला कोणासमोर भीक मागावी लागत नाही. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी महिला सरकारी किंवा खाजगी संस्थांमध्ये काम करण्याव्यतिरिक्त स्वतःचा व्यवसाय देखील करू शकतात. पती किंवा वडील आर्थिकदृष्ट्या संपन्न असले तर त्यांनी त्यांच्या आवडीनुसार काही काम केलेच पाहिजे. जेणेकरून त्यांना त्यांची योग्यता सिद्ध करता येईल. आणि देशाच्या विकासात हातभार लावू शकतील.

**सामाजिक सक्षमीकरण**

सामाजिक सक्षमीकरणाची प्रक्रिया कुटुंबापासून सुरू होते. कारण वेगवेगळया कुटुंबा द्वारे एक समाज किंवा समुदाय निर्माण होतो. कुटुंबातील महिलांना समानतेची वागणूक मिळाली तर ती सामाजिकदृष्ट्या सक्षम होईल. त्यासाठी कुटुंबात मुलगा-मुलगी असा भेदभाव करू नये, घरातील पुरुषाने पत्नीला नोकर न मानता सहकारी मानले पाहिजे , अभद्र वर्तनावर किंवा अपशब्द वापरण्यावर पूर्ण बंदी घातली पाहिजे , त्यांच्याशी समानतेची वागले पाहिजे, महिलेला जर अशा प्रकारची वागणूक दिली तर तिचे मनोबल वाढविण्यास मदत होते. या प्रक्रियेत समाजातील ज्येष्ठांने सहकार्याने वागले पाहिजे पाहिजे आणि मुलांना लहानपणापासूनच रस्त्याने चालणाऱ्या मुलींना किंवा आई - बहीणी सोबत कसे वागण्याचे याव्हे शिक्षण दिले पाहिजे . कारण एखादी व्यक्ती लहानपणी आपल्या कुटुंबात जे काही पाहते, ऐकते आणि समजते ते बहुतेक वेळा लहान असताना त्याची पुनरावृत्ती होते. तसेच परंपरे नुसार ज्यामध्ये महिलांना हीन किंवा नीच समजले जाते. ते बदलण्यात कुटुंबाची भूमिकाही महत्त्वाची असू शकते. सशक्तीकरण ही एक निरंतर प्रक्रिया आहे, ती व्यक्तीपासून सुरू होते आणि समाजाच्या विचारसरणीत विलीन होते. तीच विचारधारा कालांतराने विकसित होऊन जोपासली जाते . ज्याचा आपण थेट परिणाम म्हणून पाहतो. उदाहरणार्थ, काही वर्षांपूर्वी पेट्रोल पंपावर महिलांना पाहणे ही अभिमानाची गोष्ट नव्हती. आज समाजातील विविध घटकांमध्ये महिलांकडून दुचाकी चालवण्याची प्रथा सुरू झाली आहे. आज पेट्रोल पंपावर फक्त वाहन चालवत नाही, तर तिथे काम करणारी महिलाही दिसते. हि प्रथा कुठल्यातरी व्यक्तीने सुरू केली असावी . जी हळूहळू समाजात स्वीकारली जाते. आणि आता ती प्रवृत्ती जोपासली जात आहे, मग यावर कोणाचाही आक्षेप नाही.

**कायदेशीर सशक्तीकरण**

भारतीय संविधानाने स्त्री-पुरुषांना समान दर्जा दिला असून, संविधानाच्या दृष्टीने दोघेही समान आहेत. स्वातंत्र्यानंतर भारतातील महिलांची स्थिती सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. या प्रयत्नांची दोन विभागांमध्ये विभागणी करता येईल. त्या प्रयत्नांना प्रथम श्रेणीत ठेवता येईल. ज्यांनी महिलांना अत्याचार आणि अत्याचारापासून मुक्त करण्यासाठी अनेक कायदेशीर तरतुदी आणि कायदे केले आहेत. घरगुती हिंसाचाराचा कायदा हा असाच एक महत्त्वाचा कायदा आहे. दुस-या श्रेणीत ते प्रयत्न येतात, ज्यामध्ये महिलांच्या क्षमतांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रोत्साहन योजना बनवण्यात आल्या होत्या. तिच्या प्रगतीसाठी आणि विकासासाठी, स्त्रीला त्या सर्व

कायदेशीर आयामांचे ज्ञान असले पाहिजे, ज्यामुळे तिला अत्याचारातून मुक्तता मिळू शकते आणि संधींचा फायदा घेता येते.

**राजकीय सक्षमीकरण**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महिलांचे अभूतपूर्व योगदान आहे. देशाच्या राजकीय परिस्थितीत महिलांनी आपली भूमिका प्रभावी पणे सुनिश्चित कली आहे. आज विविध स्तरांवर महिला आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. राष्ट्रीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही महिलांना आरक्षण देण्याची व्यवस्था आहे, त्याचाच परिणाम म्हणजे आज महिला आपल्या कर्तृत्वाने आणि मेहनतीने राजकारणाच्या क्षेत्रात आदर्श निर्माण करत आहेत.

**भावनिक सशक्तीकरण**

स्त्री सुशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या मजबूत असली तरी भावनिक दृष्ट्या कमजोर असून ती कधी कधी चुकीचे निर्णय घेत असते. ज्यामध्ये नंतर त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.म्हणून लहानपणापासूनच मुलींना भावनिक दृष्ट्या सुदृढ बनविण्याचे कार्य कुटुंबातूनच केले पाहिजे. कुटुंबात मुलींना नेहमी नेहमी तू कमजोर आहे अशा प्रकारचे दूषण लावू नये. तू कमजोर नसून तू मजबूत आहे या भावनेतून लहानपणापासूनच मुली कडे पाहायला पाहिजे.

निष्कर्ष

महिला सक्षमीकरण हा सर्वांगीण आणि बहुआयामी दृष्टीकोन आहे. आणि राष्ट्र उभारणीच्या मुख्य प्रवाहात महिलांनीही पुरेशा प्रमाणात सक्रिय सहभाग दिला आहे. सशक्तीकरण ही एक प्रक्रिया आहे ज्याद्वारे स्त्रिया सशक्त आणि स्वतंत्रपणे जागरूक होऊन कार्यप्रणालीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रयत्न करून स्वतः निर्णय घेण्यास सक्षम होतात.महिलांचे सक्षमीकरण झाले नाही तर विकास कामात महिलांचा सक्रिय आणि अर्थपूर्ण सहभाग राहणार नाही त्यामुळे विकासाचे उद्दिष्ट साध्य होत नाही.महिला सक्षमीकरण हा एक बहुआयामी दृष्टीकोन आहे ज्यामध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय, कायदेशीर, आरोग्याशी संबंधित अनेक पैलूंचा समावेश होतो .महिला सक्षमीकरनाची आवश्यकताच नसून ती एक गरज आहे, देशात अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. अश्या ह्या अर्ध्या लोकसंख्येला समान हक्क आणि सन्मानाने जगण्याचे स्वातंत्र्य दिल्याशिवाय समाजात मोठा गुणात्मक बदल घडवून आणणे शक्य होणार नाही.

**संदर्भसूची**

1) भारतीय महिला - नही दिशाये - संपादन - रोमी शर्मा - प्रकाशन विभाग सूचना और प्रसारण मंत्रालय भारत सरकार

2) आधुनिक समाज मे स्त्री - आशाराणी व्होरा - श्री नटराज प्रकाशन साऊथ नई दिल्ली 110053

3) कार्यशील महिलाएं एवं भारतीय समाज - डॉ. सुभाष चन्द्र गुप्ता - अर्जून पब्लिशिंग हाऊस नई दिल्ली 110002

4) महिला विकासएवं सशक्तीकरण - सारिका ठाकूर - कुलसचिव महात्मा गांधी चित्रकूट ग्रामोदय विश्वविद्यालय चित्रकूट जिल्हा सतना

5) समाज राजनीती और महिलाएं दशा और दिशा - स्वप्निल सारस्वत - राधा पब्लिकेशन नई दिल्ली110002

6) महिला कल्याण आणि विकास – प्रा. सौ.माधवी कवी - विद्या प्रकाशन नागपूर440002

7) स्त्री पर्व - मंगला सामंत - सुगावा प्रकाशन सदाशिव पेठ पुणे 411030

ISSN : 2278-9308
March, 2022

# स्त्रियांचे समाजातील स्थान – काल आणि आज

**डॉ. रवींद्र भा. घागस /प्रा. प्रकाश विष्णू घरत**

सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर

**गोषवारा-**

अतिप्राचीन काळापासून समाजाच्या विविध क्षेत्रात बुद्धिमान, कर्तृत्ववान, स्त्रियांचा इतिहासात उल्लेख आढळतो. आज अनेक क्षेत्रात स्त्रियांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. बुद्धिमत्ता, शौर्यगुण, पातिव्रत्य, आदर्श मातृत्व, युद्ध कौशल्य, संघटन कौशल्य या सारख्या गुणयुक्त महिला समाजात दिसतात. त्याचप्रमाणे अनेक समस्यांनी ग्रासलेल्या महिलाही समाजात पहावयास मिळतात. समाजातील सामान्य स्त्रीचे स्थान हे पुरुषांच्या तुलनेत सर्वच देशात, सर्वच जाती धर्मात दुय्यम मानले आहे. त्यामुळे आजही स्त्रियांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

**प्रस्तावना-**

भारतीय समाजात स्त्रियांना पुरुषांप्रमाणे स्थान दिले जात नाही. तिच्यावर अनेक सामाजिक बंधने लादली जातात. धार्मिक सण, शिक्षण, नोकरी, राजकारण इत्यादी मध्ये सहभागी होण्यावर मतांतरे दिसून येतात. वेदकाळा पासून स्त्रिला स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत आहे. या संघर्षातून अनेक स्त्रियांनी खंबीरपणे स्वतःला सिद्ध केले आहे. आपल्या कर्तृत्वाचा ठसा समाजात उमटविला आहे. मात्र पुरूष प्रधान संस्कृतीमुळे समाजात पुरुषांचच वर्चस्व दिसून येते. आजही समाजात स्त्रियांचे स्थान हे दुय्यम आहे. स्त्रियांचं स्थान जर उंचवायच असेल तर, राजकारणात असणाऱ्या महिलांनीच आता महिलांच्या सबळीकरणासाठी प्रयत्न केले पाहिजेत. धर्म-जात, शहरी-ग्रामीण भाग अशा सर्वच ठिकाणी स्त्रियांवरील सामाजिक बंधने आणि अनिष्ठ रुढी व परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे सामाजिक समता निर्माण केली पाहिजे.

- **स्त्रियांचे समाजातील स्थान काल आणि आज-**

आज 21 व्या शतकात आपण वावरत आहोत मानवाने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे. अनेक शोध लावले आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाने यशाची सर्व शिखरे गाठली आहेत. समाजाच्या या प्रगतीमध्ये पुरुषांबरोबरच स्त्री वर्गाचं सुद्धा महत्त्वपूर्ण योगदान लाभले आहे. देशाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रिया वरीष्ठ पदावर कार्यरत आहेत. असे असले तरी आजही स्त्री अत्याचाराच्या अनेक घटना पहावयास व ऐकावयास मिळत आहेत. अगदी द्रौपदी पासून ते कालच्या निर्भया व आजच्या गुजरात राज्यातील सुरत येथे भरदिवसा रस्त्यात गळा चिरून मुलीची हत्या होत आहे. अशा कित्येक घटना घडताना दिसतात. या घडणा-या घटना पाहिल्या तर असे दिसते की, स्त्रियांकडे बघण्याची एक मानसिकता दिसून येते. अशा मानसिकतेतूनच या घटना घडत असतात. या मानसिकतेचा विचार करता ही मानसिकता तयार होण्याचे कारण म्हणजे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोण होय.

स्त्रियांच समाजातील स्थान पाहत असताना इतिहासात डोकावून पाहिले तर आपल्या समाजात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे स्थान पूर्वपार दुय्यमच राहिले आहे. त्यातूनच स्त्रियांच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. ह्या समस्या नेमक्या केव्हापासून झाल्या आहेल. आणि स्त्रियांचं हे स्थान समजावून घेण्यासाठी आपण त्यांचे पुढील तीन कालखंडात वर्गीकरण करू आणि स्त्रियांच समाजातील स्थान समजावून घेऊ.

**१) वैदिक कालखंडातील स्त्रियांचे समाजातील स्थान :-**

भारतीय संस्कृती परंपरेत समाजात कुटुंब संस्थेला अत्यंत महत्त्वाचे स्थान असून, त्यात स्त्रियांना केंद्रबिंदू मानण्यात आले आहे. प्राचीन काळापासून समाजात स्त्री दुय्यम स्थानी होती, असा ऐतिहासिक समज रूढ होता. मात्र वास्तविकता अशी नव्हती तर वैदिक कालखंडात स्त्रियांचे समाजातील स्थान हे पुरुषांच्या बरोबरीचे होते. समाजात स्त्रियांना मानाचे स्थान होते. कौटुंबिक व सामाजिक अनेक उपक्रमांमध्ये, कार्यक्रमांमध्ये स्त्रियांचा सहभाग असायचा अनेक धार्मिक संस्कारही मुलांप्रमाणे मुलींवरही केले जात असत. जसे उपनयन संस्कार (मुंज करणे) मुली शिक्षण घेत असत. स्वतःचे निर्णय स्वतः घेत असत, याचे उदाहरण म्हणजे स्वयंवराची प्रथा होय. स्वयंवराच्या प्रथेमुळे आपल्या लक्षात येते की, स्त्रियांना विवाह विषयक निर्णय घेण्याचे स्वातंत्र होते. पतीच्या मृत्यूनंतर पुनर्विवाह करण्याची परवानगी होती. तसेच विवाह विच्छेदनाचा अधिकार होता. त्याच बरोबर गृहास्थाश्रमातील सामाजिक व धार्मिक

कार्यात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने भाग घेत असत. थोडक्यात वैदिक कालखंडात स्त्रियांच समाजात स्थान हे पुरुषांच्या बरोबरीचे होते.

**२) वैदिक कालखंडानंतर स्त्रियांचे समाजातील स्थान-**

वैदिक कालखंडानंतरचा काळ भारतीय स्त्रीच्या जीवनातील अत्यंत अंधकारमय असा कालखंड होय. याच कालखंडात स्त्रियांची समाजातील भूमिका सीमित काढण्यात आली. मनुस्मृती आणि अन्य धर्म शास्त्राप्रमाणे स्त्रिला परावलंबी करण्यात आले. म्हणजेच तिला पुरुषांवर अवलंबून रहावे लागले. पावित्र्याच्या संकल्पनेला धर्मशास्त्रीय आधार देऊन नैतिकतेच्या व अनैतिकतेच्या संकल्पना स्त्रियांच्या मनावर रुजविण्यात आल्या. अनेक प्रकारच्या व्रत-वैकल्याची महती सांगून स्त्रिया त्यामध्ये सतत गुंतुन राहतील अशी व्यवस्था निर्माण केली. मनुस्मृती आणि धर्मशास्त्रांनी स्त्रिच्या वागण्यावर बंधने घातली, अनेक नियम केले. सामाजिक सुरक्षेच्या नावाखाली "चूल आणि मुल" इतकेच कार्यक्षेत्र स्त्रीचे ठरविण्यात आले. याच कालखंडात अनेक अनिष्ट रुढी व परंपरा निर्माण केल्या गेल्या. यामध्ये...

* देवदासी सारखी अनिष्ट प्रथा रूढ झाली.
* पती निधनानंतर सती जाण्याची पद्धत प्रस्थापीत झाली.
* केशवपन प्रथा सुरु झाली.
* विधवा-पुनर्विवाह बंदी घातली.
* हुंडा पद्धत सुरू झाली.
* बहुपत्निक प्रथा अस्तित्वात आली.
* स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले.
* मुलींचे लहान वयातच लग्न होऊ लागले (बाल विवाह प्रथा)

यासारख्या अनेक अनिष्ट रूढी व परंपरा याच कालखंडात सुरू झाल्याने समाजात स्त्रियांचे स्थान हे दुय्यम मानले गेले. त्यातूनच स्त्रियांच्या अनेक समस्या निर्माण झाल्याचे दिसून येते.

**३) आधुनिक कालखंडात स्त्रियांचे समाजातील स्थान :-**

आधुनिक समाजात स्त्री-पुरुष समानता कायद्याने मान्य केली आहे. अनेक हक्क अधिकार स्त्रियांना मिळाले आहेत. याकरिता राजा राममोहन रॉय यांच्या पासून ते महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर यांच्यापर्यंत अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली, स्त्रियांच्या समस्यांकडे समाजाच लक्ष वेधले. त्यातून स्त्रियांच्या हक्कासाठी अनेक चळवळी उदयास आल्या. महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी धोंडो केशव कर्वे या सारख्या समाज सुधारकानी स्त्री हक्कासाठी कार्य हाती घेतले. समाजात स्त्रियांच्या बाबत ज्या अनेक रूढी व परंपरा होत्या त्या विरोधात चळवळी सुरू केल्या यामध्ये सती प्रथे विरोधात राजा राममोहन रॉय, विधवा-पुनर्विवाह महत्त्व देणारे ईश्वरचंद्र विद्यासागर, स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करणारे महात्मा ज्योतिबा फुले, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी या सारख्या महान सुधारक यांनी स्त्रियांच्या सामाजिक समानतेबद्दल, शिक्षणाविषयी चळवळी सुरू केल्या. स्त्रियांना हक्क मिळाले स्त्री शिक्षण घेऊन नोकरी करू लागली, अर्थाजन करू लागल्या, अनेक क्षेत्रात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या पार पाडू लागल्या.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय संविधानाने स्त्री-पुरुष मूलभूत हक्क दिले. त्याच बरोबर अनेक अनिष्ट रूढी व परंपरा कायद्याने बंदी घातली स्त्री शिक्षण व रोजगारासाठी संधी निर्माण केल्या. मताधीकरणसारखा महत्वाचा हक्क मिळाला. हुंडा, कन्या विक्रेय, बहुपत्नीत्व यासारख्या प्रथा नष्ट केल्या. स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार दिला. मालमत्तेत कायदेशीर वाटा मिळाला. स्थानिक स्वराज्य संस्थेत राखीव जागांची तरतूद करण्यात आली. थोडक्यात स्वातंत्र्यानंतर आजच्या 21 व्या शतकात आज स्त्रियांसाठी सर्वक्षेत्र खुली करण्यात आली आहेत. यामुळे स्त्रियांनी सुद्धा आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे अनेक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे महत्त्वाच्या पदावर आपली योग्य जबाबदारी पार पाडत आहेत. गावच्या सरपंचपदापासून ते देशाचे पंतप्रधान, राष्ट्रपती पदापर्यंत मजल मारली आहे. निश्चितच आधुनिक युगात स्त्रियांच स्थान उंचावले आहे. मात्र यामुळे सर्व स्त्रियांचे प्रश्न सुटले आहेत. असे मात्र सांगता येत नाही. आजही समाजात स्त्रियांच्या समस्या आ वासून उभ्या आहे.

**सारांश** :- आज एकविसाव्या शतकातील स्त्री शिक्षण घेऊन अर्थाजन करू लागल्या आहेत. गुलामगिरीची सर्व बंधने तोडून सार्वजनिक जीवनात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या उचलत आहेत. आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. मात्र सर्व स्त्रियांचे प्रश्न सुटले आहेत असे म्हणता येणार नाही. आजही समाजात हुंडाबळी, कौटुंबिक अत्याचार, मारहाण, स्त्रियांचे अपहरण, बलात्कार करून हत्या अशा अनेक समस्या भेडसावत आहेत हे मात्र नाकारता येत नाही.

**ISSN : 2278-9308**
**March, 2022**

**संदर्भसूची :-**

१) तिची कहाणी - निरंजन घाटे - समकालीन प्रशासन
२) शिवकालीन स्त्रियांच्या अधिकारकक्षा-निलिमा भावे– पॉप्युलर प्रकाशन
३) स्त्रीमुक्ती संवर्धन -और इतिहास -रमणिका गुप्ता -सामाजिक प्रकाशन
४) स्त्रियांचे सक्षमीकरण -किरण बेदी -मेहता पब्लिशिंग हाऊस
५) महिला सबलीकरण- प्रा.डॉ. संभाजी देसाई -प्रशांत पब्लिकेशन
६) स्त्री-पुरुष तुलना -विलास खोले -प्रतिमा प्रकाशन

# स्त्रिवाद: समस्या, आव्हाने व उपाय

**कल्पना राजेश कनके -सिद्धेवाड**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग फर्ग्युसन महाविद्याल (स्वायत्त),पुणे

**गोषवारा:**

WHO IS A MAN?
WHO IS A WOMAN?
ARE WE NOT ONE?
**AS A HUMAN!!!!!!!!हा एकच सवाल तुम्हा सर्वांना आहे उत्तर-**

विसावे शतक हे पर्यायी विचारसरणीचे शतक म्हणून ओळखले जाते. माणूस हा मुक्तीचा ध्यास असलेला प्राणी आहे. त्याला लाभलेली मुक्तीची प्रेरणा ही त्याच्या विचारप्रवणतेत आहे. जेव्हापासून स्त्रियांना स्वतःची शक्तीस्थाने, दुर्बलस्थाने, संधी आणि आव्हाने यांची जाणीव व्हायला सुरुवात झाली तेव्हापासून स्त्री मुक्तीचा लढा वेगवेगळ्या पातळयांवर सुरू झाला. म्हणूनच त्यांची मुक्ती ही समतेच्या व्यापक आविष्कारासाठी आवश्यक असते. दुसऱ्या पातळीवर विकास प्रक्रियांमुळे पुढारलेपण व विशेष अधिकार प्राप्त झालेल्या वर्गातील माणसाप्रमाणेच आम्हीही माणसे आहोत आणि म्हणूनच त्यांच्या लाभातील वाटा हा आमचा रास्त अधिकार किंवा हक्क आहे व तो आम्हाला मिळालाच पाहिजे अशी मुक्तीवादी लढा करण्याची मागणी असते. एका बाजूला शोषणाच्या संदर्भात वंचिततेमधील समता अधोरेखित करतात. तर दुसऱ्या बाजूला वंचित वर्गातील माणसे व लाभधारक वर्गातील माणसे ही माणूस म्हणून समानच आहे हेही ठणकावून सांगत असतात. समाजाच्या सर्वच घटकात थोड्याबहुत प्रमाणात आत्मभान निर्माण झाल्यामुळे परिवर्तनाची विकासाची तसेच समग्र क्रांतीची विविध प्रारूप जगासमोर आली. त्यातीलच एक प्रारूप म्हणून स्त्रीवाद! समग्र स्त्री घटकांच्या विविध प्रश्नांना आव्हानांना कवेत घेणारे प्रारूप आहे. थोडक्यात ओळख आपण करून घेणार आहोत. स्त्रिया समाज घटकाच्या समोर असणाऱ्या आव्हानांची आणि त्यावरील उपायांची चर्चा करवी लागते.

**महत्त्वाच्या संकल्पना किंवा संज्ञा:** मुक्तीवाद, शासनव्यवहारा, शोषणव्यवहार, जागतिकीकरण, पितृसत्ताक व्यवस्था, बालविवाह, विवाहसंस्था, नव-सामाजिक चळवळी

**प्रस्तावना:**

युरोपीय प्रबोधनामुळे निसर्गाकडे समाजाकडे व माणसाकडे पाहण्याची नवी दृष्टी मनुष्य मात्रास लाभली. समाजव्यवस्था ही मनुष्यनिर्मित असून त्यातील सर्वात संरचना यादेखील मनुष्यनिर्मित आहेत. तेव्हा येथील शोषणाच्या, श्रमाच्या, विषमतेच्या, अन्यायाच्या पद्धती देखील समाजनिर्मितीच आहेत. त्यात आवश्यक तो बदल घडून आणण्यासाठी पीडित, वंचित, दुर्लक्षित, बहुजन समाज घटकांनी एकत्र येऊन जे लढे उभारले त्याचे संघटित स्वरूप म्हणजे चळवळी होत. या चळवळींनी विविध विचारधारा अधिक धारदार झाल्या. सैद्धन्तिक चौकटी बरोबरच उपक्रमशीलता जोपासत कालौघात प्रस्तुतही ठरल्या. काही चळवळी काळाच्या पडद्याआड गेल्या पण स्त्रीवाद हा विचार व चळवळ म्हणून आजही प्रस्तुत आहे. कारण स्त्री या समाज घटकाचे **शोषणव्यवहार** हे **शासनव्यवहार** अन **समाजव्यवहार** व्यवस्थेत कडूनही थांबलेले नाहीत.

समाजघटक कोणताही असो वेगवेगळ्या स्तरावरील आव्हानांना त्याला सामोरे जावेच लागते. पण त्यापैकी जा समाजघटकांच्या बहुविध ओळखी असतात त्या घटका समोरील आव्हाने देखील बहुविधच असतात तुम्हाला कळलेच असेल मी कोणत्या समाज घटकाबद्दल बोलणार आहे ते बरोबर स्त्रिया !!

**नव-सामाजिक चळवळी:**

स्त्रीवादी चळवळ ही नव सामाजिक चळवळी पैकी एक महत्त्वपूर्ण चळवळ आहे. ज्यातून स्त्रीवादाने कात टाकली आणि स्त्री चळवळीने प्रेरणा घेतली असा ऋणानुबंध स्त्रीवाद आणि स्त्री चळवळ यात राहिलेला आहे. नव सामाजिक चळवळीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सत्तेच्या अधिकाधिक लोकशाही करण्याची मागणी लोकशाहीची तत्वे पारदर्शी आणि उत्तरदायित्व असणाऱ्या खुल्या स्वरूपाच्या संरचनावर चळवळींचा भर दिसतो. तसेच सार्वजनिक आणि खाजगी जगण्यातील सीमारेषा पुसट होत जाणे राज्य आणि नागरी समाज यातील वाढत्या दरी मुळे चळवळी अधिकच प्रगल्भ होत जातात. स्त्रीचळवळ कधी राज्यविरोधी तर कधी तडजोड अशी भूमिका घेताना दिसते. राज्यसंस्था, राजकीय पक्ष या पलीकडे स्वत्वासाठी लोकांना संघटित होण्याच्या अवकाश प्राप्त करून

देण्याचा या नव सामाजिक चळवळी जागतिकीकरणानंतर जोर पकडू लागल्या. **गेल ऑम्वेट** यांनी सामाजिक चळवळीचे वर्णन व्यवस्था विरोधी आणि बदल घडून आणू पाहणाऱ्या संघर्षाचा अविष्कार असे केलेले आहे. एकंदरीतच स्त्रीचळवळी बरोबरच मानवी हितसंबंधाशी निगडित सर्वच इतर चळवळींचा स्त्रिया कायमस्वरूपी आग्रही राहिलेल्या आहेत दिसतात. उदाहरणार्थ पर्यावरण चळवळ, शेतकरी चळवळ इत्यादी. भारतातील स्त्रीवादाची चौकट समजून घेताना येथे पारंपारिक पितृसत्तेवर आधारित विषमतेची रचना दुर्लक्षित करून चालणार नाही. म्हणूनच स्त्रीवादी चळवळी बरोबरच येथील नव सामाजिक चळवळींना अस्मितेबरोबरच समतेचा नारा दिला आहे. एकाच वेळी स्त्रीवादी शासनव्यवहारातील उणिवांवर बोट ठेवतात दुसऱ्या बाजूला इतर व्यवस्थांचा शोषणाला विरोध करत असताना समता-स्वातंत्र्य ची मागणी करतात. शबरीमला प्रकरण, ME TOO चळवळ आत्ताचा हिजाब प्रश्न पर्यंत यावर एक नजर टाकली तरी लक्षात येतं की स्त्रिया हा या एकसंध नाहीत. त्यांचे प्रश्न देखील एकसाची नाहीत. तेव्हा स्त्रीवाद हा एकसाची कसा असेल?

विशेषतः हा जागतिक पातळीवर पाश्चिमात्य देशात 1960 नंतर आणि नव सामाजिक चळवळी उद्याला आल्या. नागरी समाजाचा घटक म्हणून स्त्रियांमध्ये आलेली आत्मभान स्वतःच्या भूमिकेविषयीची स्पष्ट जाणीव व आत्मविश्वास अशा अर्थाने स्त्रीचळवळीने स्त्रीवादाची विविध स्तरावर बांधणी करायला सुरुवात केली. काही अभ्यासकांनी लाकॉ, मौफो, मेलुच्ची यांनी सामाजिक चळवळीच्या अनेक पैलूंची उकल त्यांच्या विविध अभ्यासात केलेली आहे. सामाजिक चळवळी म्हणजे काय? तर नागरी समाज आणि राज्य यातील बदलता परस्पर संबंध अधोरेखित करणाऱ्या समूहाच्या संघटित भूमिका होत अशी व्याख्या करता येईल. उदाहरणार्थ शांततावादी चळवळी, स्त्रियांच्या चळवळी, पर्यावरणवादी चळवळी इत्यादी. स्त्रीवादी चळवळ नव सामाजिक चळवळी म्हणून आपण जेव्हा पाहतो तेव्हा तिचा प्रवास जागतिक ते राष्ट्र-राज्यांच्या स्तरापर्यंत वेगवेगळया स्वरूपात झालेला दिसतो. नव सामाजिक चळवळी या केवळ वर्गीय भाषेत बोलत नाहीत, भेदभावाचा, शोषणाच्या संस्कृती वंश, लिंगभाव यासारख्या बिगरवर्गीय संरचनांची दखल घेताना दिसतात. वर्गीय, धार्मिक, सांस्कृतिक, जातीय लढ्यापेक्षा मानवी जीवनाचे एकंदर गुणवत्ता, हक्क व स्वातंत्र्याची अबाधितता यांची मागणी यावर त्या भर देतात.

**स्त्रीवाद:**

**स्त्री प्रश्नांवर भूमिका घेणाऱ्या स्त्री चळवळीचा विचार व कृतींचा आविष्कार म्हणजे स्त्रीवाद** असे सर्वसाधारणपणे म्हणलास वावगे ठरणार नाही. भारतात पितृसत्ताक व्यवस्थेचे क्लिष्ट स्वरूप आहे. त्याचा आधार जात, धर्म, संस्कृती प्रथा-परंपरा इत्यादी आहेत. गुंतागुंतीच्या प्रश्नांवर विविध स्त्रीवादी विचार प्रवाह उभी राहतांना दिसतात. स्त्रीवाद ही विचारप्रणाली म्हणून एकसंध नाही. स्त्रीवादाचे अनेक आयाम आहेत. जर का स्त्री हा समाज घटक वैश्विक दृष्ट्या एकसंध नसेल तर तिच्या शोषणाच्या तऱ्हा देखील एकसंध नाहीत किंवा नसतात. म्हणजेच पितृसत्ताक व्यवस्था परत्वे स्त्री प्रश्न व त्याचे स्वरूप हे विभिन्न आहे. यामुळे जगभरातील स्त्रीवादी विचार प्रवाह भिन्न आघाड्यावर लढताना दिसतात. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत स्त्री-पुरुष समान प्रमाणात प्रभावित होताना दिसत नाहीत. पितृसत्ताक व धर्मसत्ताक व्यवस्थेने निर्माण केलेले साचे त्यातच किंवा निकषांच्या आधारावरच स्त्रियांना वावर करावा लागतो. त्यामुळे त्यांचे मर्यादित अवकाश असते आणि ह्याच साचेबद्धपणाला स्त्रीवाद यांनी विरोध केलेला आहे.

जागतिकीकरणानंतर स्त्री सक्षमीकरणाचे वारे वाहू लागले. अर्थकारणात, राजकारणात, प्रशासनात स्त्रियांचा वावर वाढू लागला. हे खरे असले तरी तिच्या स्वातंत्र्याची मर्यादा ही आखलेली आहे, हे वास्तव देखील नाकारता येत नाही. धर्म, संस्कृती, समाजिक प्रथा परंपरांच्या चौकटीत अडकलेल्या स्त्रिया जेव्हां विकास प्रक्रियेबरोबर जोडल्या जातात किंबहुना तसे चित्र उभे केले जात असले तरी वास्तविक पातळीवर स्त्रिया समोरील आव्हानांची जंत्री वाढतच जाताना दिसते. जागतिकीकरणाच्या प्रवाहा बरोबरच स्त्री प्रश्नांची उकल करण्याच्या भूमिकेत स्त्रीवादाने आणि आपली तंत्रे व पद्धतीत अनेक बदल केलेले आहेत. म्हणून ही विचारधारा प्रगतिशील व प्रभावी आहे. सैद्धांतिक व कृतिशीलतेच्या पातळीवर स्त्री वादात विविध मतभेदात्मक भूमिका दिसतात. परंतु अभ्यासक व कार्यकर्त्यांच्या सकारात्मक दृष्टिकोन हाया विचारधारेला अधिक अधिक प्रस्तुत ठरवतो.

**कोरोना महामारीच्या काळातील आव्हाने:**

कोरोना महामारीच्या आपत्तीमध्ये स्त्री आणि वरील बंधनात कैकपटीने वाढ झालेली दिसते आणि स्त्रियांचा सार्वजनिक जगातील वावर मोठ्या प्रमाणावर मर्यादित झाला. स्त्री-पुरुषांना घरून काम करण्याची मुभा देण्यात आली वर्क फ्रॉम होम **(Work from Home)** असं म्हणला गेलं. पण स्त्रियांच्या या बाबतीत मात्र वर्क फ्रॉम होम बरोबरच वर्क फॉर होम (**Work from Home with work for Home**) हे चित्र मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळालं स्त्रियांना एकाच वेळी घर, ऑफिस, नवरा,मुले,वृद्ध माणसे त्यांच्या सर्वच पातळीवरील गरजा आवडीनिवडी यांची पूर्तता न थकता करावी लागली. या सगळयाचा परिणाम तिच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक

परिघावर झाला. घरातील पुरुष मंडळीनी या सगळयांकडे सोयीस्कररित्या दुर्लक्ष केलेले दिसते, असे काही सर्वेक्षणत्मक अभ्यास पुढे आलेले आहेत. याचा परिणाम म्हणून **कौटुंबिक हिंसाचार** 70% नी वाढ झाली. **घटस्फोटाच्या प्रमाणातही** वाढ झाली. कारण स्त्रियांमध्ये स्त्रीवादी चळवळीने निर्माण केलेल्या आत्मसन्मानाची भावना व स्वतःची स्वायत्तता अबाधित ठेवण्याची भूमिका याचा परिणाम म्हणून घटस्फोटाच्या प्रमाणात वाढ झाली. भारतीय समाजात घटस्फोट या संकल्पनेकडे नकारात्मक पद्धतीने पाहिला जाते. त्यातही स्त्रियांनाच दोषी ठरवण्याचे वेगवेगळप्रारूपे ही निश्चित केली गेली आहेत. कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणात **मुलींच्या बाबतीत बालविवाहाचे** प्रमाण वाढलेले दिसते. कोरोना पार्श्वभूमीवर व्यवस्थेने घातलेले निर्बंध जमावबंदी, सार्वजनिक समारंभात लग्न सोहळा इत्यादी मुळे कमी खर्चात मुलींची लग्ने लावून दिल्या गेली. आम्हाला विवाह संस्थेद्वारा स्त्रियांवर होणारे अन्यायअत्याचाराकडे डोळसपणे बघता आले पाहिजे. स्त्री प्रश्नांची गुंतागुंत अधिकच वाढलेली दिसते. तिच्या सार्वजनिक व खाजगी श्रमात कमालीची वाढ झालेली दिसते. घरातील महिला **'घरीच'** आहे म्हणून पुरुष वर्गाच्या मागण्या इच्छा-आकांक्षा विकृत पद्धतीने पुढे आलेल्या दिसतात. जेव्हा हिंसा आणि असहायतेची परिसीमा गाठली जाते आणि सर्व प्रकारचे जगणे असहाय होते. तेव्हा स्त्रियांपुढे आत्महत्या व घटस्फोट हे दोन पर्याय उभे राहतात. भारतात लॉक डाऊनच्या काळात स्त्रियांनी **श्रम व हिंसा** या दोन बाबी नव्या स्वरूपात प्रकर्षाने अनुभवल्या. हे लक्षात घेता भारतीय कुटुंब व्यवस्थेतील स्त्रियांचे असलेले स्थान घरातील इतरांसाठी श्रम करणारी कोणत्याही प्रकारच्या हिंसेला प्रतिकार न करणारी केवळ **साधनमात्र** ठरलेली दिसते.

कोरोना आपत्ती काळात मोठ्या प्रमाणात **कामगाराचे स्थलांतर** झाले. यातदेखील स्त्री-पुरुष समप्रमाणात भरडले गेलेले नाहीत. तर स्त्रियाच सर्वाधिक भरडल्या गेल्या. उदाहरणादाखल एक कामगार महिला आपल्या गावी परत जात असताना रस्त्यातच प्रसूती झाली. आता हे अपयश राज्याचे आहे की पितृसत्ताक व्यवस्थेचे आहे हे बघावे लागेल. वाहने बंद असल्याने कामगाराचे जथेच्या जथे चालत पायपीट करत आपले गाव गाठण्यासाठी धडपडत होते. काहींना तर आपला जीव देखील गमवावा लागला. त्याचे चित्रीकरण व माहिती ही माध्यमांनी आपल्या सर्वांसमोर आणलेली आहे. काही अभ्यासही या प्रश्नाच्या अनुषंगाने पुढे आलेले आहे एकूणच पुरुषांपेक्षा स्त्रियांना मोठ्या प्रमाणात आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या. यात मग **असंघटित क्षेत्रातील महिला कामगारांचे** प्रश्न अजूनच गंभीर दिसतात. याचा परिणाम स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन संपले मग काय पितृसत्ताक व्यवस्थेत **'ओळख'** स्थापित करण्यासाठीचा मार्ग म्हणून आर्थिक स्वावलंबन होता तो या महामारीने हिसकावून घेतला. तेव्हा परत एकदा **परावलंबन व पारतंत्र्य** याला वेगळ्या पातळीवर सामोरे जावे लागेल. शहरातील नगरपालिकेतील 70 ते 75 टक्के **सफाई कामगार या महिला** आहेत ज्या अस्पृश्य, दलित, वंचित वर्गातील आहेत. लॉकडाउनच्या पार्श्वभूमी स्वच्छता थांबलेली नव्हती परंतु त्यांना वेदना किंवा सुरक्षा सोयीसुविधां उपलब्ध करून दिल्या गेल्या नव्हत्या. पुरेशी काळजी व्यवस्थापनाकडून घेतल्या गेलेले दिसत नव्हती. **आरोग्य क्षेत्रातील परिचारिकांचा,** ग्रामीण पातळीवर कोरोनाच्या काळात रुग्णांची देखभाल करण्याची जबाबदारी राज्याकडून टाकण्यात आलेल्या **आशा कामगार** यांची व्यवस्थेकडून झालेली अवहेलना हेही आव्हानच! आरोग्य क्षेत्रामध्ये डॉक्टर्सना पुरवल्या गेलेल्या सुरक्षा किट्स या परिचारिकांना महिलांना दिलेल्या नव्हत्या. ज्या सर्वाधिक रुग्णाच्या संपर्कात होत्या. कोरोनाच्या काळात आशा कामगारांना वेतनवाढीसाठी संप करावा लागला. ग्रामीण भागात काम करताना जी आव्हाने येत होती. ती या व्यवस्थेने समजून न घेता उलट जमाव बंदी असताना संप का केला असा आरोपही आशा कामगारांवर राज्याकडून करण्यात आला. या तिन्ही क्षेत्रातील स्त्री कामगार अहोरात्र लोकांना सेवा तर देतच होत्या. परंतु स्वतःच्या कुटुंबांच्या जबाबदाऱ्यातुन देखील त्यांची सुटका होऊ शकली नाही. यातून असं लक्षात येतं की कामाचा अतिरिक्त ताण येऊनही योग्य मोबदल्याची मागणी करायची नाही ही भूमिका स्त्रियांच्या आर्थिक व श्रमिक शोषणाचा आधार ठरते. **शिक्षणासाठी शहरात आलेल्या विद्यार्थिनींना** वसतिगृहे बंद झाल्याने घरी जावे लागले. शहरी वातावरणाच्या थोड्याशा उदारमतवादी अवकाशात वावरलेल्या मुली / स्त्रिया कोरोना महामारी च्या काळात गावाकडच्या सामंती,कठोर सरंजामी पितृसत्ताक व्यवस्थेत वेगळ्या पातळीवर शोषणाला सामोरे जावे लागेल. मुलींच्या शिक्षणात आधीच अडथळयांची शर्यत असतेच आणि त्यात महामारीने अधिकच भर घातली. ऑनलाइन शिक्षणाच्या निर्णयाने बऱ्याच मुलींचे शिक्षण थांबले. कारण त्यासाठी लागणाऱ्या स्मार्टफोन ची सुविधा मुलींच्या शिक्षणासाठी खर्च करण्याची मानसिकता आणि आर्थिक तरतूद मानसिकता ही किती टक्के पुरुषांचा वडील म्हणून राहिली आहे टक्का खूपच कमी आहे. त्याचा परिणाम म्हणून मुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागले एवढ्यावरच हे सत्र थांबले नाही तर अनेक मुलींचे विवाह झाले अल्पवयातच अपत्य संगोपनाची जबाबदारी ही आली. बाल मातांचे प्रमाण वाढले, बालमाता मृत्यूचे प्रमाण वाढले, बालकांचा मृत्यूदर दराचे प्रमाणही वाढले या सर्व टप्प्यावर प्रचंड प्रमाणात स्त्रियाची फरफट होताना दिसते.

पितृसत्ताक समाजातील रचनेवर एक नजर जरी टाकली तरी स्त्रियांचे अनेक स्तरावर केल्या गेलेले वर्गीकरण सहज लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. लॉकडाऊनच्या काळात माध्यमांनी वेगवेगळ्या पातळयांवर राजकीय अभिजनांनी केलेल्या भाषणांचा फिती ज्या मध्ये महाभारताचा, थाळीनाद लक्ष्मणरेषा कोरोना योद्धा, सप्तपदी, महाभारतातीळ युद्धासारखे कोरोना युद्ध आपण जिंकणार आहोत. पद्धतीच्या अनेक भाषणातून लोकांना परत परत पुरुषसत्ताक व्यवस्थेत स्त्रियांच्या दुय्यमत्त्वाची जाणीव धर्म आणि संस्कृतीच्या चौकटीत करून देण्याचाच नव्हे तर त्या पद्धतीच्या कृती देखील केल्या गेल्या.

अजून एका समाज घटकाची कोरोना महामारीच्या काळातील व्यथा वेदनांवर लक्ष द्यावे लागेल. तो म्हणजे एलजीबीटी क्यू **LGBTQ** (Lesbian, Gay, Bisexual, Transgender, & Queer) एलजीबीटी या समाज घटकाला आधीच उपेक्षेच्या नजरेतून पाहिले जाते. माध्यमांमध्ये हा समाज घटक कुठेच नव्हता. अतिशय मोठ्या प्रमाणात या समुदायांनी भीषणता अनुभवली सोशिओ इकॉनोमिक अँड कास्ट सन्सेस 2011 नुसार ग्रामीण भारतात ५७००८ ट्रांसजेंडर समूहाचे लोक राहतात.

**वेश्या व्यवसायात काम करणाऱ्या स्त्रियांना** वेगळयाच पातळीवर या महामारीच्या काळात सामोरे जावे लागेल. याची देखील चर्चा माध्यमांमधून फारच क्वचित प्रमाणात झाली. या समाज घटकांचे जगण्याचे प्रश्न इतके गंभीर झाले होते की त्या कुटुंबाचा भाग म्हणून आणि समाजातील वेश्या म्हणून दुःखाचा विदारक अनुभव वाट्याला आला. याच काळात नको असलेले मातृत्व, गर्भपात आणि बाळंतपणातील स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाणही वाढले याबद्दल कुठेही वाच्यता केली गेली नाही.

आपत्तीच्या काळात लिंग भावात्मक पातळीवर विचारच केला जात नाही. याकाळात अनेक संस्था संघटना स्त्री प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांच्या क्षमतेत राहुन विविध स्तरावर प्रयत्न करीत होत्या. कोरोनामुळे पुन्हा नव्याने जागतिकीकरणा नंतरचा पितृसत्ताक शोषणव्यवस्थेचा नवा चेहरा समोर आणला. याचबरोबर समाजातील **शोषणधिष्ठित सामाजिक संस्थांच्या पुनर्मूल्यांकन** आजची देखील तशी गरज आहे. राज्यसंस्थेने बरोबरच इतर उपव्यवस्था आपत्तीकाळात स्त्रियांबरोबर कश्या वागतात त्याचे परिणाम समाज म्हणून कसे येऊ शकतात याचा विचार करावा लागेल.

सारांश या विभिन्नत्वाच्या समाजजीवनात शोषणामध्ये कसे रूपांतर होतं हे दाखवून स्त्रीवादी राजकारणासाठी गरजेचं असतं आणि यातून स्त्रीवादी राजकारणाची पुनर्मांडणी होऊ शकते अशी महत्त्वपूर्ण मांडणी शर्मिला रेगे यांनी केलेली आहे. शोषणाची व आव्हानांची स्वरूप आणि तंत्र बदलतात पण ती संपुष्टात आलेली नाहीत. स्त्रीवादाचा पुढील पारंपरिक आव्हाने पुढील प्रमाणे: हुंडाबळी, स्त्री भ्रूणहत्या, स्त्रियांचा क्रय विक्रय, घटस्फोट, प्रसारमाध्यमातील स्त्री प्रतिमांचे चित्रीकरण, उपभोगवादी दृष्टीकोन, लैंगिक छळ अशा अनेक आव्हानांना पेलवताना स्त्री समाजघटक एकत्रितपणे भूमिका घेणे हे अधिक प्रस्तुत ठरते. स्त्रीवादाची प्रस्तुतता आजही आम्ही नाकारू शकत नाही. या सगळयामुळे स्त्रियांच्या स्वातंत्र्या आणि स्वावलंबनावर मर्यादा आल्या आहेत. त्या सगळयाचा विरोध करत स्त्रीवाद पर्यायी व्यवस्थांची मागणी करताना दिसतो. वरवर चित्र जरी अतिशय सकारात्मक दिसत असलं तरीदेखील अंतरंगात काहीतरी वेगळेच बघायला मिळतं. विशेषतः स्त्रियांच्या बाबतीत हे आम्हाला दुर्लक्ष करून चालणार नाही तेव्हा 'माणूस' म्हणून ओळख स्वीकारल्या जाईपर्यंतचा लढा हा अजून किती काळ द्यावा लागणार आहे हे जर का पितृसत्ताक व्यवस्थेला सांगता आलं तरच आणि तरच स्त्रीवाद हा विचार अभ्यासाची किंवा चर्चा करण्याची बाब कदाचित उरणार नाही असा आशावाद व्यक्त करून मी थांबते.

धन्यवाद

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1) संपादक, सुमती लांडे आणि श्रुती तांबे, स्त्रीवाद, पान क्रमांक ७५-७७, शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, आवृत्ती प्रथम ५ डिसेंबर २००७

2) डॉ मंगला वरखेडे, स्त्रीवाद: समीक्षेतील नव्या संकल्पना, संपादक, मनोहर जाधव, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती मार्च २००१.

3) संपादक, मुक्ता कुलकर्णी, घोटाळे विवेक ,पाटील भारत, कोरोना आपत्ती-लॉकडॉऊन आणि लोकशाहीचे अपहरण, - डॉ. दिलीप चव्हाण , कोरोना आपत्ती आणि स्त्री- पुरुष विषमता, पान क्र. ५७-७०, प्रकाशक- द युनिक फाउंडेशन, प्रथम आवृत्ती २०२१.

4) संपादक प्रा. नागोराव कुंभार, विचारशलाका (जुलै ते एप्रिल 2012) समकालीन सामाजिक समस्या विशेषांक:
- नयना आगलावे, स्त्रीभ्रूणहतेचे आव्हान, पान क्रमांक 12-14
- सुनील सा कनकटे वेश्याव्यवसायाची बदलते स्वरूप पान क्रमांक 15-24

5) संपादक प्रा. नागोराव कुंभार, विचारशलाका (एप्रिल ते डिसेंबर २०१६) समकालीन सामाजिक चळवळी विशेषांक (यशवंत सुमंत श्रद्धांजली अंक)
- चित्रा लेले, नव सामाजिक चळवळी एक आकलन, पान क्रमांक 71 ते 80 -
- विद्युत भागवत, समकालीन स्त्री प्रश्न आणि बहुविध स्त्रीवादी भूमिका
पान क्रमांक 255 ते 272
6) विद्युत भागवत, स्त्री अभ्यासक्षेत्र: आव्हाने आणि शक्यता, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यासकेंद्र, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद प्रथमावृत्ती २०१६
7) संपादक शरद जावडेकर, वसुधा जोशी, लता जाधव, रवींद्र म्हसदे, सामाजिक परिवर्तन चिकित्सा आणि भवितव्य गौरव ग्रंथ, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जानेवारी २००९,
-गीताली वि. म., स्त्री चळवळ काल आज आणि उद्या, पान क्रमांक २०० ते२१४
8) डॉ. यशवंत सुमंत, स्त्रीवादाची ओळख मराठी वाचन साहित्य मालिका क्रमांक ६
- स्त्री-मुक्तीची पहाट पान क्र. १२-३०, प्रकाशक सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे

# स्त्रीवाद आणि प्रसार माध्यमे (संजना भट : स्त्री आणि भारतीय कौटुंबिक संस्कृती)

प्रा स्वाती हरिभाऊ काटे

प्रमुख, समाजशास्त्र विभाग पीपल्स कॉलेज, नांदेड

औद्योगिक क्रांती १८ व्या शतकात घडून येण्यास सुरवात झाली. या काळात विविध वैज्ञानिक शोधही लागले. मानवी समाज संस्कृती, सामाजिक मूल्यांमध्ये खूप मोठा बदल होण्यास प्रारंभ झाला. यातूनच मानवी समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या अस्मितेला, स्वाभिमानाला सांभाळून जगता येऊ शकते याची जाणीव होण्यास सुरवात झाली. स्त्री हीदेखील घराच्या बाहेर पडून अर्थार्जन करू लागली. स्त्रियांना स्वतःच्या हक्काचे, न्यायाचे, सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी स्त्रीने स्वतः प्रयत्न करण्यास सुरवात केली. समाज सुधारकांनीदेखील स्त्रीला तिचा सन्मान मिळाला पाहिजे यासाठी कार्य केले.

भारतात ब्रिटीशांच्या आगमनानंतर भारतीय समाज जीवनात मोठ्या प्रमाणात बदल झाला. या काळात राजाराम मोहन राय, दयानंद सरस्वती, छ. शाहू महाराज, म. जोतीबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, धोंडो केशव कर्वे, विठ्ठल राकाजी शिंदे यांनी स्त्रीविकास व समता या संदर्भाने मोठे कार्य केले आहे. तसेच अनेक स्त्रियांनी देखील स्त्रीचा आत्मसन्मान जगवण्यासाठी, तिला समाजात सन्मानाने जगता यावे यासाठी कार्य केले. राजमाता जिजामाता, अहिल्याबाई होळकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले, रमाबाई आंबेडकर, कस्तुरबा गांधी या स्त्रियांनी स्वकर्तुत्वाने आपला ठसा उमटवला. या सर्वांचा आदर्श आजच्या स्त्रीने घेणे आवश्यक आहे.

आज स्त्री आणि पुरुष स्वतःच्या पद्धतीने जीवन जगू लागले आहेत. परंतु हे जीवन जगत असताना येणाऱ्या पिढीची जबाबदारी स्वीकारणे, त्यांना चांगले आदर्श संस्कार देणे आवश्यक असते. ही जाणीव ठेऊन कुटुंब संस्थेला टिकवणे देखील महत्वाचे आहे. तरच व्यक्तीचा सर्वांगीण विकास होणे श्यक्य आहे. सोबतच समाजाचा आणि शाश्वत विकास याकडेही सकारात्मक पद्धतीने लक्ष्य देणे या बाबीची जाणीव विकसित करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींसाठी प्रसारमाध्यमे कोणती भूमिका घेतात हे तपासणे गरजेचे झाले आहे. स्त्रीवाद आणि प्रसार माध्यम या शीर्षकाला घेऊन मी ' संजना भट आणि भारतीय कौटुंबिक संस्कृती' हा विषय माझ्या संशोधांसाठी निवडला.

**गृहीतके :**

१) भारतीय कुटुंब व्यवस्था ही आदर्श असे सांस्कृतिक मूल्य आहे.

२) प्रसार माध्यमांचा स्त्रियांकडे बघण्याचा कल आदरात्मक होत आहे.

३) संजना भट सारखे घर आणि कार्य ( व्यवसाय, नोकरी ) दोन्हीमध्ये समतोल साधून सक्षम समाज निर्माण होऊ शकतो.

**उद्देश :**

१) संजना भट या स्त्रीच्या कौटुंबिक जीवनाच्या अभ्यासातून भारतीय कुटुंब व्यवस्थेचा अभ्यास करणे.

२) संजना भट या स्त्रीच्या माध्यमातून प्रसार माध्यमांचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टीकोन आदरयुक्त होत आहे का हे जाणून घेणे.

३) आजच्या पती- पत्नी यांना आपले कौटुंबिक जीवन आदर्श पद्धतीने सांभाळणे शक्य आहे या संदर्भाने अभ्यास करणे.

प्रस्तुत शोध निबंधासाठी मी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा वापर केला. द्वितीय तथ्य संकलन पद्धती तसेच सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर केला. उदारमतवादी स्त्रीवाद या दृष्टीकोनातून संशोधनाचा पेपर लिहिण्याचा प्रयत्न केला.

झी या दूरचित्रवाणी वाहिनीवर 'सा रे ग म प ' हा रीयालीटी शो सुरु आहे. ज्यात १६ स्पर्धक सहभागी झालेले आहेत. हा शो गायन कलेला प्रोत्साहन देणारा आहे. ज्यामध्ये संजना भट या विवाहित स्त्रीने सहभाग नोंदवला आहे.

एका ग्रामीण भागातून आलेल्या संयुक्त कुटुंबात लहानाची मोठी झालेल्या, घरची परिस्थिती जेमतेम (आर्थिक) बरी असणार्या ठिकाणाहून आलेली संजना भट ही आज भारत देशाप्रमाणे संपूर्ण जगासाठी आदर्श बनली आहे.

संजन भट यांना लहानपणापासूनच गाण्यांची आवड होती. परंतु ती गाण्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेऊ शकली नाही. तिने गाणे ऐकून, टेलीविजन वरील कार्यक्रम पाहून गाणे शिकली. लग्नानंतर तिच्या पतीने तिला यासाठी प्रोत्साहन दिले. पती-पत्नीने एकमेकांसोबत सुखाचा संसार करणे सुरु केले. त्यांना दोन मुली आहेत. त्यांच्या जबाबदाऱ्या दोघेही अत्यंत व्यवस्थितपणे सामंजस्याने निभावत आहेत. कौटूंबिक जबाबदार्या पूर्ण करत आपल्या गायनाची आवड तिने जोपासली. कुठलेही संगीताचे शिक्षण न घेता तिने 'सा रे ग म प' या शो मध्ये खूप चांगल्या पद्धतीने आपले गाणे सदर केले. तिच्या सदरीकरणाला सर्वात जास्त लाईक मिळाल्या.

आनंदी जीवन जगता येऊ शकते. विशेषतः पती-पत्नीच्या नात्यामध्ये दोघांनीही परस्परांना समजून घेणे, एकमेकांचा आदर करणे, आवश्यक आहे. संजना भट आणि तिच्या पतीने हे सर्व जगाला दाखवून दिले आहे. संजना भट आणि तिचे पती ज्या पद्धतीने जीवन जगतात तसेच जीवन भारतातील खूप पती-पत्नी जगतात. अशा पद्धतीच्या कौटुंबिक जीवनाची नव्याने ओळख आजच्या तरुण पिढीला होणे अत्यंत आवश्यक आहे. संजना भटच्या माध्यमातून स्त्रियांच्या संदर्भाने प्रसार माध्यमांचा दृष्टिकोण बदलत आहे. तो सकारात्मक, आदराचा बनत आहे, हे लक्षात येते.

यातून खालील निष्कर्ष पुढे आले आहेत.

१. आजच्या तरुण पिढीने कौटुंबिक जीवनात परस्परांचा आदर करून जगणे शक्य आहे.

२. स्त्रीला आदर देणे, तिच्या गुण कौशल्य सादर करणे या बाबीला देखील प्रसार माध्यमे महत्त्व देत आहेत.

३. भारतीय आदर्श कौटुंबिक संस्कृतीची नव्याने सर्व जगाला ओळख होत आहे.

४. मुक्तपणा म्हणजे स्वैराचार नसून जबाबदारीने आनंदाने स्वतःचा स्वतः विकास करून जगणे असते हे यातून लक्षात येते.

५. स्त्रीचा, पुरुषांचा, येणाऱ्या भावी पिढीचा, तसेच संपूर्ण देशाचा सक्षम विकास साधण्यासाठी उदारमतवादी स्त्रीवाद महत्त्वाचा ठरतो.

# स्त्रीवाद : सिद्धांत आणि व्यवहार

**प्रा .डॉ . अर्जुन येरगे**
सहाय्यक प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग श्री संपतराव माने महाविद्यालय,खानापूर जि.सांगली -४१५३०७

---

**प्रास्ताविक -**

निसर्गतः स्त्री-पुरुष समान आहेत. परंतु जसा जसा सभ्यता व संस्कृतीचा उदय होत गेला तसतसा स्त्री व पुरुषांमध्ये भेद वाढत गेला .सर्वप्रथम पुरुषांनी सर्वच क्षेत्रात आपली मक्तेदारी प्रस्थापित केली आणि स्त्रियांचे आयुष्य मर्यादित करून टाकले, यातूनच हळूहळू पुरुषप्रधान संस्कृतीचा उदय होऊन महिलांचे सर्वच क्षेत्रातील हक्क अधिकार कमी होत गेले.स्त्रियांचे आयुष्य चूल आणि मुल इतक्या पुरते मर्यादित करण्यात आले .तिच्यावर अनेक सामाजिक-सांस्कृतिक प्रतीकात्मक बंधने लादण्यात आले. कुटुंब प्रमुख या नात्याने पुरुषांना कुटुंबातील उच्च स्थान प्राप्त झाले, पर्यायाने समाजात व इतर क्षेत्रात पुरुषांचेच वर्चस्व प्रस्थापित होऊन पुरुषप्रधान संस्कृतीचा उदय झाला व स्त्रियांना पुरुषांपेक्षा दुय्यम समजण्यात येऊ लागले

मानव सभ्यता पाषाण युगापासून अणुयुगापर्यंत खूप पुढे गेली आहे. या काळात अनेक प्राचीन संस्कृतींचा जन्म झाला आणि पृथ्वीच्या कानाकोपऱ्यात पसरला, काही राहिल्या आणि काही काळाच्या प्रवाहात वाहून गेल्या. जर आपण भारतीय सभ्यतेबद्दल बोललो, तर ती जगातील सर्वात जुनी आणि सुव्यवस्थित सभ्यता मानली जाते, जी तिच्या उच्च दर्जाच्या कुटुंब आणि सामाजिक व्यवस्थेसाठी ओळखली जाते. कुटुंब हे सर्वात लहान घटक आहे जिथे समृद्ध राष्ट्राचे सर्व घटक उपस्थित असतात. या कुटुंब व्यवस्थेच्या कार्यात महिला आणि पुरुषांचा समान सहभाग आणि समान महत्त्व आहे. पुरुष आपल्या रोजगारातून कुटुंबाचे पालनपोषण करतो, नातेवाइकांची काळजी घेतो, परंतु कुटुंब चालवण्याची खरी जबाबदारी स्त्रीवर असते, जिला सेवा, त्याग आणि करुणेची देवी म्हणतात. पण या प्रकाराची स्त्रीत्वाची व्याख्या काहीही असली तरी वास्तव काही वेगळेच असल्याचे दिसून येते. माणूस आजही तसाच आहे जसा तो पूर्वी होता, सतत प्रगतीच्या मार्गावर चालणारा, संघर्ष, शौर्य, पराक्रम, अहंकार इत्यादी गुणांनी परिपूर्ण, त्याच्याच नादात तल्लीन असतो.

**स्त्रीवाद चळवळ -**

पाश्चात्त्य देशांचा सुरुवातीचा इतिहास पाहता, स्त्रिया या फक्त चूल आणि मूल या कौटुंबिक व्यवस्थेत अडक-लेल्या होत्या. त्यांना सार्वजनिक जीवनात स्थान नव्हते. तो पुरुषांचाच अधिकार समजला जाई. मध्ययुगात स्त्रियांना संपत्तीत वाटा नव्हता आणि शिक्षणाची संधी नव्हती. स्त्रियांचे सामाजिक स्थान, समाजजीवनातील त्यांचा सहभाग आणि योगदान, त्यांचे विविध प्रश्न व समस्या इत्यादींबद्दलचे विचारमंथन अठराव्या शतकात होऊ लागले. या विचारमंथनातून स्त्रीवादी विचारधारेचा उगम झाला आणि स्त्रीशिक्षण,स्त्रियांचे राजकीय हक्क, समान संधी अशा अनेक प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले गेले. काही सुधारणावादी स्त्रियांनी स्वातंत्र्य,समता आणि नैसर्गिक अधिकार हे स्त्री-पुरुष या दोघांनाही सारखेच लागू करावेत, अशी जोरदार मागणी केली.

स्त्रियांना दुय्यमत्व देण्यामागे जे पुरुषी राजकारण आहे, त्याचा बीमोड करणे हे स्त्रीवादाचे मूळ उद्दिष्ट आहे. स्त्रीवादांतर्गत अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो. पुरुषांइतकीच स्त्रीलाही स्वतःची ओळख आहे. स्व-विकास, स्वतंत्रता यांची जरूरी आहे. स्वत्वाची ओळख, स्वायत्तता, स्वयंनिर्णय, सक्रिय सहभाग या गोष्टी स्त्रीला व्यक्ती म्हणून परिपक्व बनवितात. त्या मिळवून देण्याचा प्रयत्न स्त्रीवादी चळवळीने केला. आपल्या सांकल्पनिक, सैद्धांतिक

चौकटीमध्ये स्त्रियांना मिळणारे गौणत्व, त्यांचे केले जाणारे दमन यांचे स्पष्टीकरण, त्यामागील कारणांचे विश्लेषण स्त्रीवाद करतो. त्याचप्रमाणे हे सामाजिक वास्तव बदलण्यासाठी काय करावे, याचे विवेचनही करतो. काळानुसार स्त्रीवादी चळवळीत जहाल,मवाळ, मार्क्सवादी, पर्यावरणवादी, कृष्णवर्णीय वगैरे अनेक छटा असलेल्या विचारसरणींच्या बहुविध संघटना सामील झाल्या.

स्त्रियांना विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अनुक्रमे देशपरत्वे मतदानाचा हक्क प्राप्त झाला आणि त्यांचे काही हक्कही मान्य झाले. स्त्रीवादाचा हा प्रसार-प्रचार पाश्चात्त्य देशांतून आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेत प्रसृत झाला आणि विकसित राष्ट्रांबरोबरच त्याचे लोण अविकसित व विकसनशील देशांत पोहोचले.अविकसित व विकसनशील देशांतील स्त्रियांच्या व्यथा आणि हक्क, शैक्षणिक समस्या, सामाजिक मागासलेपणा इ. विषयांची दखल व चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने ( युनो ) कोपनहेगन ( डेन्मार्क ) येथे जागतिक परिषदेचे आयोजन केले (१९८०). या परिषदेत जे काही ठराव झाले व धोरण ठरले, त्याची प्रत्यक्षात कार्यवाही काय झाली, याविषयी १९९४ मध्ये जागतिक महिला परिषद भरविण्यात आली.एकूणच पाश्चात्त्य स्त्रीवादाच्या विचारसरणीत स्त्रीच्या व्यक्तित्वाचा मानसन्मान, सर्व प्रकारची स्वातंत्र्ये आणि समानता यांवर भर देण्यात आला आहे.

**स्त्रीवादी साहित्य-**

स्त्रीवादी साहित्य व स्त्रीवादी समीक्षा हे प्रकार स्त्रीमुक्ती चळवळीतून उदयाला आले. सीमॉन द बोव्हारने लिहिलेल्या द झि?म सॅक्स , द सेकंड सेक्स या ग्रंथापासून स्त्रीमुक्ती चळवळीचा प्रारंभ झाला, असे मानले जाते. स्त्रीवादी साहित्यात एक अभिजात ग्रंथ म्हणून तो मान्यता पावला आहे. ' शाश्वत स्त्रीत्व ' ही पूर्वग्रहदूषित संकल्पना समाजजीवनातून हद्दपार करण्यासाठी तिने या प्रबंधातून बौद्धिक व भावनिक पातळीवर युक्तिवाद मांडले. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत व पुरुषी मूल्यांच्या चौकटीत स्त्री ही पुरुषाशी अनेक नात्यांनी जखडून ठेवली जाते. त्यातही पुरुष हा मुख्य व स्त्री ही दुय्यम असा विषमभाव आहे. स्त्री–पुरुषातील ही विषमता जीवशास्त्रीय वा दैवी नसून ती संस्कृतिनिर्मित आहे. दोघांत इतर कुठलाही भेद नसताना केवळ नैसर्गिक शारीरिक रचनेतील भेदामुळे स्त्रीला दुय्यम स्थान दिले जाते. या पार्श्वभूमीवर जन्मतःच कोणी ' स्त्री ' असत नाही तर ' स्त्रीत्व ' हे समाजाने, संस्कृतीने घडविलेले असते अशा आशयाचे सीमॉन द बोव्हारचे विधान संस्कृतिनिर्मित स्त्री-पुरुष भेदावर व स्त्रीच्या दुय्यम स्थानावर अचूक शरसंधान करणारे आहे. प्रसिद्ध फ्रेंच नाटककार ऑलँप द गॉजिस हिने "डिक्लेरेशन ऑफ द राइट्स ऑफ विमेन अँड ऑफ द फीमेल सिटिझन" हा ग्रंथ लिहून स्त्रियांच्या हक्कांची जाणीव करून स्त्री ही केवळ पुरुषाबरोबर समान नसून ती त्याची सहकारी-सोबती आहे,असे ठामपणे प्रतिपादिले. याच सुमारास मेरी वुलस्टोनक्राफ्टचा "ए व्हिन्डिकेशन ऑफ द राइट्स ऑफ विमेन" हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यात मेरीने स्त्री-पुरुषांना शिक्षण, काम आणि राजकारण यांत समान संधी द्यावी; कारण त्या पुरुषांइतक्याच नैसर्गिक दृष्ट्या बुद्धिगम्य-हुशार आहेत, असे ठणकावून लिहिले. त्यांना शैक्षणिक व आर्थिक संधी आणि समान नागरी हक्क दिले, तर त्या पुरुषांएवढ्याच सक्षम व समर्थ बनतील.

एकोणिसाव्या शतकात स्थित्यंतराची-बदलाची मागणी यूरोप व उत्तर अमेरिकेत होऊ लागली. पॅरिसमधील स्त्रीवादी महिलांनी "द व्हाइस ऑफ विमेन" हे दैनिक काढले आणि स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडली. स्त्रीशिक्षण, स्त्रियांचे राजकीय हक्क, समान संधी, समान वेतन, कुटुंबांतर्गत आणि कुटुंबाबाहेरील हिंसाचार, समविभागणी अशा बहुविध प्रश्नांकडे या दैनिकाने समाजाचे लक्ष वेधले आणि स्त्रीवादाची सैद्धांतिक भूमिका मांडली. त्याच सुमारास जर्मन लेखिका लूईस डिटमर हिने "सोशल रिफॉर्म" हे नियतकालिक काढून स्त्रियांचे प्रश्न चर्चेत आणले. याच सुमारास न्यूयॉर्क राज्यातील सेनेका फॉल्स येथे स्त्रियांच्या हक्कांसाठी विद्वत्सभा भरली आणि त्यांनी अकरा ठराव या संदर्भात संमत केले. त्यांमध्ये स्त्रियांच्या मतदानाचा अधिकार हा प्राधान्याने विचारात

घेतला गेला. अशा प्रकारच्या स्त्रियांच्या परिषदा अन्य राज्यांतूनही झाल्या. त्यांतूनच पुढे एलिझाबेथ कॅडी स्टॅन्टन, मार्था राइट, सुसान अँथनी इत्यादींनी ' नॅशनल विमेन सफ्रेज असोसिएशन ' ही मतदानाच्या संदर्भात जागतिक संघटना स्थापन केली . शार्लट पर्किन्स गिलमन हिने 'विमेन अँड इकॉनॉमिक्स' (१८९८) या ग्रंथात असे प्रतिपादन केले की, जोपर्यंत स्त्रिया घरगुती काम व कुटुंब या पाशातून मुक्त होत नाहीत, तोपर्यंत त्या पुरुषांवर अवलंबून राहणार ! लिंगभेदाच्या आधारे स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते आणि सामाजिक दमनाला, अन्यायाला त्यांना तोंड द्यावे लागते. त्यासाठी पुरुषप्रधान-पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत बदल होणे आवश्यक आहे. असा समाजवादी समतेचा सिद्धांत तिने मांडला.

प्रस्थापित पुरुषप्रधान मूल्यव्यवस्थेचा प्रतिकार करणारे वा ती उलथवून टाकण्याची शक्यता व शक्ती दाखवून देणारे विपुल व वैविध्यपूर्ण स्त्री-साहित्य भारतीय भाषांमध्ये सुद्धा दिसते. विसाव्या शतकातील आधुनिक स्त्रीवादी साहित्यात कमल देसाई, गौरी देशपांडे, शांता गोखले, कविता महाजन, प्रिया तेंडुलकर, सुनंदा कुलकर्णी , मेघना पेठे, नीरजा यांच्या कथा कादंबऱ्यांनी मोलाची भर घातली आहे. कमल देसाईंच्या काळा सूर्य आणि हॅट घालणारी बाई (१९७५) या कादंबरीत प्राचीन मिथ्यकथांना नवे स्त्रीवादी अर्थ दिले आहेत. काळा सूर्य या कादंबरीची नायिका शेवटी गावातील पुरातन मंदिर तोडून टाकते आणि स्वतःही मरते. हे गिल्बर्ट-ग्यूबरच्या ' मॅडवुमन ' प्रतिमेचे मराठीतील उदाहरण म्हणता येईल. अरुणा ढेरे, गौरी देशपांडे, श्यामला वनारसे यांनी त्यांच्या साहित्यकृतींतही प्राचीन पुराणकथांचे स्त्रीवादी दृष्टि-कोणातून नवे अन्वयार्थ लावले आहेत. गौरी देशपांडे यांच्या कथा--कादंबऱ्यांत स्वतंत्र, मुक्त, प्रगल्भ स्त्रीची अनेक रूपे आढळतात. स्त्रीवादी दृष्टिकोणातून स्त्रियांचे अनेक प्रश्न व जाणिवा यांची अभिव्यक्ती, पुरुषसत्ताक व्यवस्था व पुरुषी मानसिकता यांची उपरोधपूर्ण टिंगलटवाळी, करिअरला प्राधान्य देणाऱ्या स्त्रीच्या समस्या व व्यथा यांचे प्रभावी चित्रण ही त्यांच्या स्त्रीवादी साहित्याची ठळक वैशिष्ट्ये होत. शांता गोखले यांच्या रीटा वेलिणकर या कादंबरीची मानसशास्त्रीय तसेच समाजशास्त्रीय स्त्रीवादी भूमिकेतून चिकित्सा करता येते. स्त्रीवादातील ' भगिनीभाव ' या संकल्पनेचा पुरस्कार करणारी ही कादंबरी आहे. आशा बगे यांची भूमी ही कादंबरी, तसेच प्रिया तेंडुलकरांच्या कथा ( ज्याचा त्याचा प्रश्न व जन्मलेल्या प्रत्येकाला (१९९१) हे कथासंग्रह ) यांचे मूल्यमापन भारतीय स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून करता येते. कविता महाजन यांची ब्र ही कादंबरी भारतीय व समाजशास्त्रीय अशा द्विविध स्त्रीवादी दृष्टिकोणांतून अभ्यासता येते. मेघना पेठे यांच्या लिखाणात "हंस अकेला" कथासंग्रह वनातिचरामि ही कादंबरी मुक्त जीवनपद्धती, बिनधास्त जीवनशैली यांचा पुरस्कार आढळतो. नीरजा ह्या अलीकडच्या स्त्रीवादी साहित्यप्रवाहातील एक प्रमुख व महत्त्वाच्या कवयित्री व कथाकार "ओल हरवलेली माती" कथासंग्रह असून, स्त्रीवादी जाणिवांचे विविध पैलू त्यांनी वास्तववादी, चिंतनशील पद्धतीने व्यक्त केले आहेत.

**वर्तमान स्त्रियांची स्थिती -**

आजच्या आधुनिक वैज्ञानिक युगात शेतीपासून ते अवकाशापर्यंत अनेक क्षेत्रात महिलांनी पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळवले असले तरी आजही बहुतांश महिलांना त्यांच्या मूलभूत हक्कांपासून वंचित राहावे लागत आहे. महिला सक्षमीकरणासाठी कितीही प्रयत्न केले जात असले तरी तिच्या अस्तित्वाचे सर्वात मोठे आव्हान ही स्त्री आपल्याच घरात, आईच्या उदरातून पेलत आहे. यातून ती वाचली असली तरी पृथ्वीवर आल्यानंतर तिच्यासमोर अनेक आव्हाने आहेत. भ्रूणहत्या, लिंगभेद, घरगुती हिंसाचार, हुंडा निर्यात, लैंगिक छळ, विनयभंग, शोषण, अत्याचार, बलात्कार, अत्याचार, मानसिक छळ अशा अनेक समस्या आहेत. निसर्गाने स्त्री-पुरुष समन्वय साधून सृष्टीचे सातत्य राखले. स्त्री आणि पुरुष यांच्यात शारीरिक आणि नैसर्गिक फरक आहेत, एक कठोर आणि एक मऊ, स्वभावाने अहंकारी आणि स्त्री त्याग करणारी आहे. इतिहासानुसार वैदिक काळातील स्त्रियांची सामाजिक समृद्धी

होती, स्त्रीशिक्षण, धर्मग्रंथांचा अभ्यास, यज्ञात पुरुषांचा समान सहभाग, स्वेच्छेने विवाह इत्यादी अनेक उदाहरणे आहेत.वेदोत्तर काळात विविध जातींमधील संघर्षाच्या घटनांमध्ये स्त्रियांना त्रास सहन करावा लागला. मध्ययुगीन काळात परकीय आक्रमणे आणि मुघलांच्या काळात स्त्रियांची स्थिती अत्यंत चिंताजनक होती, तेंवा ती केवळ उपभोगाची वस्तू मानली जात होती. स्वातंत्र्य मिळेपर्यंत स्त्रियांच्या स्थितीत फारशी सुधारणा झालेली नाही. मग हळूहळू अनेक महिला संघटना, विचारवंत आणि आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय पातळीवरील चळवळींनी स्त्री स्वातंत्र्य, आर्थिक ताकद,प्रतिष्ठा आणि न्याय इत्यादींसाठी प्रयत्न केले. त्यात काही सुधारणा झाली असली तरी अजूनही परिस्थिती समाधानकारक नाही

आजच्या आधुनिक समाजात महिलांची स्थिती काय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला तर निराशाच होईल.नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार, भारतात दर तासाला महिलांविरुद्ध किमान ३९ गुन्हेगारी घटना घडतात, ज्यापैकी ११ टक्के बलात्काराचे आहेत. गेल्या दशकात भारतात महिलांविरुद्ध सुमारे 2.5 दशलक्ष गुन्हे नोंदवले गेले आहेत. आणि अशीही लाखो प्रकरणे आहेत ज्यात भीतीपोटी गुन्हा घडला की स्त्रिया गप्प राहतात.भारतीय दंड संहितेतील (IPC) अनेक कलमे पुरुषांच्या चुकीच्या कृत्यांपासून महिलांचे संरक्षण करण्यासाठी लागू करण्यात आली होती, जसे की विनयभंगासाठी कलम 354 अंतर्गत दोन वर्षे, बलात्कारासाठी कलम 376 अंतर्गत सोळा वर्षांपेक्षा कमी कारावास. ची तरतूद आहे. नाबालीग मुलीवर बलात्कार करणाऱ्या गुन्हेगाराला जन्मठेपेची शिक्षा. कलम ४९८-अ अंतर्गत मानसिक छळ, कलम २९४ विनयभंग, कलम ३६३ ते ३६८, अपहरण किंवा वेश्याव्यवसाय, स्त्री भ्रूणहत्येसाठी कलम ३१२ ते ३१८ अन्वये ७ वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे. पण एवढे करूनही गुन्हेगारी वाढत आहे, गुन्हेगार आणखीनच जघन्य मार्गाने बलात्कार करत आहेत, अलीकडे लहान मुलींनाही पाशवी बलात्काराचे बळी बनवले गेले.

**सारांश -**

पुरुषप्रधान समाजात आता रक्षकच भक्षक झाल्यावर महिलांची सुरक्षा कशी करणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सरकारी योजना, पोलीस, न्यायालये, कायद्याची कलमे या सामाजिक रचनेत समाविष्ट असलेल्या केवळ औपचारिक व्यवस्था आहेत. खरे तर लोकांची मानसिकता बदलत नाही, जोपर्यंत स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणार नाही, तोपर्यंत महिलांची स्थिती सुधारणार नाही. समाजातील कोणत्याही मुलीला आपली मुलगी, बहीण अशी भावना पुरुषांमध्ये असेल तर महिलांना डोके वर करून चालता येईल. पुरुषत्वाचा अर्थ स्त्रियांचे संरक्षण आणि आदर करणे यात आहे, त्यांचे शोषण करणे ही भ्याडपणा आहे. ही भारताची ओळख आहे. "यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता" हा मंत्र कदाचित लोक विसरले असतील. जिथे स्त्रियांचा आदर असतो तिथे संस्कृतीचा उत्कर्ष होतो. आता अधिक चिंतनाची गरज आहे, स्त्री ही शक्ती आहे, तिचे नुकसान झाले तर समाज शक्तीहीन होईल, म्हणून पुरुषांना अधिक संवेदनशील व्हावे लागेल, तरच स्त्री उत्थान शक्य आहे.

**संदर्भ :**

1 . डॉ. मंगला वरखेडे, स्त्रियांची नवकथा वाटा आणि वळणे
2. डॉ. मंदा खांडगे, डॉ. लीली दीक्षित (संपा ) स्त्री साहित्याचा मागोवा, खंड २ डिसेंबर २००२ प्रथमावृत्ती.
3. नाईक, शोभा, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद, मुंबई, २००७.
4. बोव्हार, सीमॉन द अनु. गोखले, करुणा, द सेकंड सेक्स, पुणे, २०१२ .
5. भागवत, विद्युत, स्त्रीजन्माची वाटचाल, पुणे, २ ००४.
6. वरखेडे, मंगला, संपा. स्त्रीवादी समीक्षा : संकल्पना व उपयोजन, धुळे, १९९९.

# स्त्रीवाद आणि प्रसारमाध्यमे : दैनिक प्रजावणी वृत्तपत्राची भूमिका

प्रा. अंकुश सुर्यवंशी
राज्यशास्त्र विभाग ,पी.व्ही.पी.महाविद्यालय प्रवरानगर

**सारांश :**

स्त्रीवादी चळवळ हि स्त्रियांना मानवी हक्क मिळवून देणारी चळवळ आहे. आजही स्त्री जीवनात अनेक प्रश्न अस्तित्वात आहेत.स्त्री भ्रूणहत्या,आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहाला होणारा विरोध आणि त्यातून स्त्रियांचा घेतला जाणारा बळी,हुंडाबळी,मुस्लिम स्त्रीयांचे प्रश्न,दलित,आदिवासी स्त्रीयांचे प्रश्न,नोकरी व्यवसायातील स्त्रियांना दिली जाणारी दुय्यम वागणूक,त्यांचे लैंगिक शोषण या सर्व प्रश्नांचे स्त्री जीवनावर विघातक परिणाम होत आहेत. स्त्रियांच्या मुक्तीचा मार्ग आज ही धूसरच आहे. स्त्री मुक्ती चळवळीच्या संदर्भात वृत्तपत्राने बजावलेली भूमिका कितपत यथार्थ ठरली याचा शोध घेणे आवश्यक आहे.सामाजिक प्रबोधनाच्या हेतूने मराठी वृत्तपत्रे जन्माला आलेली आहेत. त्यामध्ये टीका,निंदा नालस्ती ,स्तुती अशा विविध गोष्टींना वाव मिळत गेला. बदलत्या परिस्थिती नुसार वृत्तपत्रे गतिमान होत गेली. दैनिक प्रजावणी या मराठी वृत्तपत्राने स्त्री दर्शनाचा,त्यांच्या प्रश्नाविषयीचा विचार वेळोवेळी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना**

1960 नंतर भारतीय समाज जीवनात जे अनेक नवे प्रश्न निर्माण झाले.ते प्रश्न सोडविण्यासाठी विविध चळवळींची निर्मिती झाली. समाज जीवनाच्या गतिशील झालेल्या या चळवळींची मागणी ही मानवतावादी नैसर्गिक हक्कांची प्राप्ती करणे हेच होती. त्या विविध चळवळी पैकी एक चळवळ म्हणजे स्त्रीवादी चळवळ होय. स्त्रीवादी चळवळीने स्त्री जीवन विषयक अनेक प्रश्नाविषयी संघर्ष केला. समाजात जीवन जगत असताना स्त्रियांना एक व्यक्ती म्हणून समान अधिकार मिळावा, समान प्रतिष्ठा मिळावी. हा या चळवळीचा मुख्य उद्देश आहे. स्त्रीकडे बघण्याचा सामाजिक दृष्टीकोण बदलला पाहिजे. ही या चळवळीची मागणी आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात स्त्रियांना कायदयाने समानता मिळाली.मात्र सामाजिक स्तरावर लोकांच्या मानसिकतेत बदल झाला नाही. स्वातंत्र्योत्तर कालखंडात बदलत्या परिस्थितीप्रमाणे स्त्रियांपुढील अडचणी आणि संघर्षाची क्षेत्रे बदलली. परांपरिकता आणि आधुनिकता यांच्या संघर्षात भारतीय स्त्री अडकली.ती स्वत: बदलण्याचा प्रयत्न करत असली तरी बदलत्या स्त्री जीवनाकडे बघण्याचा समाजाचा दृष्टकोन मात्र फारसा बदलला नाही.धर्मातील विविध प्रथा व परंपरांचा आधार घेवून त्यादवारे स्त्रियांना दुय्यम वागणूक देण्याचा प्रयत्न केला जातो. प्रसारमाध्यम हे सामाजिक प्रश्न मांडण्याचे व जनमानस तयार करण्याचे महत्वपूर्ण साधन आहे.त्यापैकी वृत्तपत्र या माध्यमाने सुरुवातीपासूनच स्त्रियांना बंधनात टाकणाऱ्या विविध धार्मिक प्रथा व अंध:श्रद्धांचा विरोध करून समाजप्रबोधन केलेले आहे.

**A) स्त्रीसमस्याचे स्वरूप :-**

लिंगभाव हि समाजाने,संकृतीने लादलेली संकल्पना आहे. ती बदलून लिंग-निरपेक्ष समजरचना अस्तित्वात आणणे हे स्त्री-पुरुष समानतेचे प्रमुख उद्दीष्ट आहे. पारंपारिक समाजाने स्त्री आणि पुरूषांचे केलेले ध्रुवीकरण नाकारून समाजाची पुनर्रचना करणे अभिप्रेत आहे. लिंगभेदावर आधारित संपूर्ण समाजव्यवस्था असल्यामुळे या समाजव्यवस्थेत स्त्रीयांचे समाजातील स्थान दुय्यम होवून पुरुषसत्ताक व्यवस्था प्रबळ झाली. पुरुषसत्ताक व्यवस्थेने कालानुरूप स्त्रियांवर विविध बंधने लादली.त्यासाठी धर्माच्या आधारावर विविध रूढी व परंपरा निर्माण करण्यात आल्या. धर्म,जात,रूढी व परंपरेत अडकलेल्या या समाजव्यवस्थेने स्त्रीला या व्यवस्थेत गुलाम बनविले.त्याबरोबरच या समाज व्यवस्थेचे वाहक होण्याची स्त्रीची मानसिकता सुद्धा या समाजव्यवस्थेने बनविली. भारतीय समाजात धर्मभावना हि सर्वव्यापी असल्यामुळे प्रत्येक सामाजिक प्रश्नाला धार्मिक संदर्भ असतो.त्यामुळे सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाच्या व स्त्री मुक्तीच्या चळवळीला धर्मश्रद्धेचा सतत अडथळा येतो.

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्री म्हणून दुय्यम पद्धतीने जगणे स्त्रियांना क्रमप्राप्त झाले. पुरुषसत्ताक संस्कृतीने स्त्रियांची गळचेपी केली.संस्कृतीची जोपासना करताना स्त्रियांचा बळी घेण्यात आला. येथील स्त्री हि तीन प्रकारच्या

बेडयामध्ये अडकलेली आहे. त्यातील पहिली बेडी पुरुषप्रधान संस्कृतीची आहे.दुसरी आर्थिक कुचंबनेची आहे तर तिसरी जातीव्यवस्थेची आहे.

**B) प्रसारमाध्यमाची भूमिका :-**

प्रसारमाध्यमे सामाजिक परिवर्तनासाठी जनमनाची मशागत करत असतात. त्यामुळे स्त्री प्रश्नांचे लोकजागृत्ती संबंधीचे महत्व लक्षात घेता प्रसारमाध्यमांची त्याबाबत भूमिका महत्वपूर्ण ठरते.विशेषत: वृत्तपत्रे हे प्रसारमाध्यमातील प्रथम व विश्वासाहार्य माध्यम आहे. वृत्तपत्र व्यवसाय केवळ पोट भरण्याचा एक व्यवसाय नसून ज्ञानप्रसार व समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. या दृष्टीकोणातून स्त्रियांच्या प्रश्नाविषयी सामाजिक जागृत्ती निर्माण करण्यात वृत्तपत्रांची भूमिका महत्वपूर्ण राहिलेली आहे. स्त्रियांच्या अध:पथनाची वैचारिक कारणमीमांसा करताना एका बाजूला अंधश्रद्धा व पुरुषप्रधान सरंजामी मनोवृत्ती असते तर दुसऱ्या बाजूला समाजातील रूढीप्रियता दिसते.म्हणून स्त्रियांना विविध बंधनातून मुक्त करण्यासाठी अनेक विचारवंतांनी व समाजसुधारकानी प्रयत्न केले. समाज जागृत्तीसाठी त्यांनी वृत्तपत्रांचा आधार घेतला .

1975 नंतर महाराष्ट्रात स्त्रीवादी चळवळीला सुरुवात झाली. विविध स्त्रीवादी संघटनांचे मुखपत्रे म्हणून स्त्रियांनी चालविलेली नियतकालिके निर्माण झाली. या नियतकालिकांमधून केवळ राजकीय घडामोडीवर नव्हे तर समाजकारण,अर्थकारण,स्त्रीशिक्षण,स्त्री सुधारणा याविषयी परखडपणे मते व्यक्त करताना समाजाची हानी, नुकसान होणार नाही याची काळजी घेतली. आज सुद्धा विविध वृत्तपत्रे आपापल्या पद्धतीने विविध स्त्री प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य करताना दिसतात.

**C) दैनिक प्रजावणीची भूमिका :-**

एखादे वृत्तपत्र जेंव्हा जनतेच्या जिव्हाळ्याच्या एखादया प्रश्नाचा पाठपुरावा करते व त्यासाठी चाललेल्या चळवळीचे मुखपत्र बनते त्यावेळी त्यापत्राचे अग्रलेख वाचकांमध्ये विलक्षण लोकप्रिय बनतात. अशा पत्राचा संपादक जर त्या एखादया चळवळीतला नेता असेल आणि त्याला भाषाशैलीचे वरदान असेल तर तर अशा अग्रलेखामुळे ते वृत्तपत्र सर्वांच्या आपुलकीचे बनते. दैनिक प्रजावाणीचे संपादक श्री. सुधाकरराव डोईफोडे हे शैक्षणिक काळापासून पुण्यातील राष्ट्र सेवा दलाच्या व एस. एम. जोशी यासारख्या विचारवंतांच्या संपर्कात असल्याने त्यांच्यावर राष्ट्र सेवा दलाचा व समाजवादी विचारांचा प्रभाव होता. म्हणूनच त्यांच्या अग्रलेखाचे ' अन्याय घडो कोठेही-तेथेही जाऊ धावून ' हे ब्रीद झाले होते. प्रजावाणीची सुरुवात 01 जून 1962 पासून साप्ताहिक स्वरूपात झाली. नंतर काही दिवसानंतर प्रजावाणी हे दैनिक स्वरूपात काढण्यात येऊ लागले.

प्रजावाणीच्या विशेष जिव्हाळयाचे विषय म्हणजे मराठवाड्याचा (नांदेड न वगळता) विकास होय. तसेच व्यक्तीच्या नैसर्गिक विकासाच्या आड येणाऱ्या धार्मिक अंध:श्रद्धा व जातीयवादी शक्ती याबाबत लेखन करणे होय.अन्यायाची चीड असल्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेत धर्म, रूढी व परंपरांच्या आधारे स्त्रियांना दिली जाणारी दुय्यम वागणूक हा सुधाकरराव डोईफोडे यांच्या बुद्धिमत्तेला न पटणारा असा विषय होता. म्हणून स्त्रियांना गुलाम करणाऱ्या अथवा पुरुषी वर्चस्व नियंत्रित करणाऱ्या सर्व धर्मातील रूढी व परंपरांचा अग्रलेखामधुन विरोध केला. विशेषतः इस्लाम धर्माच्या शरीयत कायद्याचा आधार घेऊन धर्मवेड्या लोकांनी जेंव्हा जेंव्हा मुस्लिम स्त्रियांना नियंत्रित ठेवण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा तेंव्हा त्याला विरोध करून प्रजावाणी अग्रलेखातून स्त्रियांची बाजू लावून धरली. एवढेच नव्हे तर मुस्लिम स्त्रियांना मुक्त करण्यासाठी पुरोगामी विचारवंत व कार्यकर्ते यांच्याकडून जेंव्हा प्रयत्न झाले तेंव्हा त्याचे स्वागत करून त्याबाबत जनजागृती करणारे लेख लिहिले. तसेच ज्यावेळी स्त्रियांनी प्रस्थापित अन्यायी समाजव्यवस्थेतील रुढींच्या विरोधात आवाज उठविला. त्यावेळी प्रजावाणीने त्याचे समर्थन करून स्त्रीचळवळींना पाठिंबा दिला. हिंदू धर्मातील स्त्रियाना अमानवी वागणूक देणाऱ्या चालीरीतीवर टीका करत असतानाच लोकांना वैज्ञानिक दृष्टीकोनही पटवून देण्याचे कार्य प्रजावाणीने केले.

**अ) हुंडा प्रथा व देवदासी प्रथा आणि दैनिक प्रजावणीची भूमिका :-**हिंदू धर्म असो की,इस्लाम किंवा ख्रिशन असो की इतर धर्म प्रत्येक धर्माची तत्वे उच्च आहेत. मात्र त्याचे पालन करणारे माणसे क्षुद्र आहेत.माणसे चुकीचे वागतात आणि त्याच्या समर्थनार्थ धर्मग्रंथातील वाक्य सोयीस्कररीत्या फिरवतात.म्हणून प्रजावणीने धर्मातील चुकीच्या रूढी विरोधात लिखाण केले. नांदेड जिल्ह्यातील महिलांनी नांदेड जिल्हा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हुंडाबळी विरोधात धरणे धरले.त्याचे जाहिर समर्थन प्रजावणीने केले. त्यानिमित्ताने संपादकीय मधून हिंदू धर्मातील हुंडा

प्रथेचे समाजातील गंभीर वास्तव समाजापुढे मांडले .धर्माच्या नावाने चालणारी हिंदू समाजातील स्त्रियांचे अस्तित्व उपभोग्य वस्तू मानणारी प्रथा म्हणजे देवदासी प्रथा होय.देवदासी या धार्मिक अंध:श्रद्धेने वेश्यावृत्ती लादलेल्या स्त्रिया. मात्र देवदासीचे व्रत' सोडले तर देवीचा कोप होईल हि भावना त्या स्त्रीच्या मनात दडून बसलेली असते. या प्रथेच्या आधारे देवदासी म्हणून त्या स्त्रियांचा उपभोग घेणारे व त्यांच्या कमाईवर जगणारे तसेच हि प्रथा टिकवून ठेवणारे धर्ममार्तंड यांना धारेवर धरून देवदासीना मुक्त करणारा विचार प्रजावाणीने संपादकीय मधून मांडला.

**ब) इस्लाम धर्मातील 'तलाक' पद्धत आणि दैनिक प्रजावणीची भूमिका :-**

धर्माच्या नावाने स्त्रियांना प्रचंड प्रमाणात दुय्यमत्व देणारी व सर्वत्र रूढ असलेली प्रथा म्हणजे इस्लाम धर्मात पाळली जाणारी 'तलाक' पद्धत होय. स्त्रियांना पूर्णत: बंधनात अडकवणाऱ्या या कालबाह्य प्रथेच्या विरोधात प्रजावणीने आक्रमक भूमिका घेतली. धर्म एकदा कांही लोकांची मक्तेदारी झाली की तो त्यांच्या फायद्यासाठी राबविण्याची बुद्धी होते. धर्मग्रंथात काहीही सांगितले असले तरी त्याचा अर्थ प्रस्थापितांच्या सोयीचाच सांगितला जातो. इस्लाम धर्मातील पुरुष सत्ताक मानसिकतेतून व शरीयतचा आधार घेवून तयार झालेली हि तलाक पद्धत बंद झाली पाहिजे.कारण तलाक हि सर्वस्वी पुरुषांच्या मर्जीची व लहरिपणाची बाब ठरली आहे.म्हणून मुस्लिम स्त्रियांनाही घटस्फोटाचा समान अधिकार मिळावा असा समानतेचा विचार अग्रलेखातून मांडला. याबाबत लढणाऱ्या मुस्लिम सत्यशोधक समजाच्या वतीने पुण्यामध्ये मुस्लिम समाजातील परितक्त्या महिलांचा मेळावा घेण्यात आला. तेंव्हा हा मेळावा घेणाऱ्या श्री.हमीद दलवाई व त्यांच्या कार्यकर्त्यांचे केले जाहिर अभिनंदन केले . त्याचबरोबर या मेळाव्यात ज्या तलाकशुदा , स्त्रियांनी पुरुषप्रधान दहशतीला न घाबरता आपली दुखे मांडण्याचे धैर्य दाखविले त्या स्त्रियांच्या हिमतींचा गौरव करणारा लेख लिहिला. अशा सुधारणा इतरांनी किंवा शासनाने लादण्यापेक्षा समाजानेच जुनाट चालीरीतीविरुद्ध उठाव करून कराव्यात अशी भूमिका घेतली. पुरुषसत्ताक इस्लामी प्रचंड दहशतीला तोंड देवूनही मुस्लिम स्त्रियांमध्ये जी नवी जागृत्ती होत आहे,त्याबाबत शासनानेही उत्साही दृष्टीकोण दाखविला पाहिजे. कारण भारतातील कामगारांना कायद्याचे जेवढे संरक्षण व शास्वती आहे, तेवढीही मुस्लिम स्त्रियांच्या जीवनात नाही.याबद्दल दु:ख व्यक्त करून ज्या देशात राष्ट्रपतीपदी मुस्लिम आहेत,त्या राजवटीत मुस्लिम स्त्रियांना न्याय मिळणार नाही तर केंव्हा मिळेल असा प्रश्न अग्रलेखातून शासनापुढे उपस्थित केला.

घटस्फोटित मुस्लिम स्त्रीला तिच्या पूर्वीच्या पतीपासून पोटगीची रक्कम मिळविण्याचा हक्क आहे. असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने शहाबानो प्रकरणांमध्ये दिला. या शहाबानो प्रकरणाचा अन्वयार्थ लावताना तोंडी तलाक पद्धत धर्माचा आधार घेऊन कशा प्रकारे महिलांचा अधिकार हिरावून घेते, स्त्रियांना पुरुषी वर्चस्वात नियंत्रित करते याचे विवेचन केले. उलट भारताच्या अविभाज्य घटक असलेल्या मुस्लिम स्त्रीला कायद्याने दिलेली व शरीयत मध्ये असलेली सवलत यादृष्टीने पोटगीकडे पहावे. समाजाचा एक भाग दुर्बल असेल तर सारा समाज व त्याप्रमाणात देश दुबळा ठरतो. आपल्या माताभगिनींच्या हिताचा तो निर्णय आहे यादृष्टीने सर्वांनी त्याकडे पहावे,असे सर्वांना आवाहन केले. तलाक बाबतीत गैरसमजमज दूर करण्यासाठी तलाक मुक्तीमोर्चा कोल्हापूर पासून सुरु होऊन संपूर्ण महाराष्ट्रात फिरणार होता. जेव्हा हा मोर्चा नांदेड शहरामध्ये येणार आला,तेंव्हा दैनिक प्रजावाणीकडून त्या स्वागत करण्यात आले. यावेळी सुद्धा 'सहृदय मुसलमान' यालेखामध्ये सर्व मुसलमान बांधवांनी तलाक बाबतीत मानवता, प्रेम, न्याय, धर्म व कायदा या सर्वांच्या प्रकाशात सदर प्रश्नांचा विचार करू आपल्याच माता-भगिनींना आधार देण्याचे पुण्य कार्य करावे, अशी सर्वांना विनंती केली .

**क) इस्लाम धर्मातील बहुपत्नित्व पद्धत आणि दैनिक प्रजावणीची भूमिका :-**

'युसुफमीयांची दुसरी शादी' या लेखामध्ये देशातील प्रसिद्ध अभिनेता दिलीपकुमार यांनी पत्नी सायराबानू यांची कोणतीही संमती न घेता एका विवाहित महिलेला तिच्या पतीपासून घटस्पोट घेऊन धर्माच्या आधारे विवाह केला. यातून स्वतःच्या पत्नीचीही प्रतारणा केली. स्त्री म्हणजे केवळ भोग्य वस्तू असा हा दृष्टिकोन होय, अशी प्रजावाणीने दिलीपकुमार यांच्यावर टीका केली. दिलीपकुमार यांच्या वर्तनाने भारतीय महिलांची गुलामगिरी तसेच धर्ममार्तंडांची चापलूसी व राजकीय नेत्यांची दुर्बलता एकाच वेळी उघड झाल्याचे स्पष्ट मत या लेखामध्ये

मांडले.या निमित्ताने इस्लाम धर्मातील बहुपत्नित्व पद्धत स्त्रियांना धर्माचा आधार घेऊन पुरुषी वर्चस्वात कशा पद्धतीने बंधिस्त केले जाते याची मांडणी केली.

**समारोप :-**

स्त्रीवादी चळवळ हि स्त्रियांच्या न्याय हक्कांसाठी लढणारी चळवळ आहे. स्त्रीवाद ही एक समाजपरिवर्तन घडवू पाहणारी राजकीय जाणीव आहे. प्रत्येक ऐतिहासिक टप्प्यावर मानवी समाजात स्त्री-पुरुषांमध्ये विशिष्ट प्रकारचा सत्तासंबंध रचला जातो. हे भान स्त्रीवादी जाणिवेमध्ये असते. संस्कृती नामक व्यवस्थेचा वापर करून स्त्रियांना ज्ञानापासून राजकारणापर्यंत आर्थिक,सामाजिक,धार्मिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये वेगळे ठेवण्यात आले. स्त्रियांच्या अपक्षेचे,अस्मितेचे,संघर्षात दडपल्या गेलेल्या भावनांचे प्रतिबिंब प्रसारमाध्यमात दिसायला हवे.दैनिक प्रजावाणीने वेळोवेळी स्त्रियांच्या मुक्ती आंदोलनाला पाठींबा देऊन समजात स्त्रीवादी जाणिवा समाजात निर्माण केलेले आहे.

स्त्रियांवरील अन्याय व अत्याचार हि नित्याची बाब झाली आहे. त्याचे प्रतिबिंब प्रसारमाध्यमातून प्रकट होणे हि सुद्धा नित्याची बाब बनलेली आहे.स्त्री चळवळीतील सखोल विचार व्यवस्थेपर्यंत पोचविण्यासाठी प्रसार माध्यमे क्रियाशील राहिली असे चित्र फारसे दिसले नाही. कांही मूलभूत प्रश्नावर आपले विचार वेळोवेळी मांडत राहिले. प्रत्यक्ष चळवळीत काम करणाऱ्या किंवा चळवळीशी बांधील सैद्धांतिक मांडणी प्रसार माध्यमातून झालेली नाही. जी काही मांडणी झालेली दिसते ती स्त्रीवाद्यांनी चालू केलेल्या नियतकालिके व मासिकांमधून झालेली दिसते.सर्व समाजातील स्त्रीयांचे प्रश्न जोपर्यंत समाज समजावून घेत नाही तोपर्यंत प्रसारमाध्यमांची स्त्रियांच्याकडे बघण्याची दृष्टी बदलणार नाही.बदलत्या परिस्थितीनुसार स्त्रिया सामाजिक,राजकीय,आर्थिक,सांस्कृतिक क्षेत्रात सर्वत्र आपले अस्तित्व दाखवत आहेत. मात्र प्रसारमाध्यमाद्वारे स्त्रीयांचे व्यावसायिक दृष्टीकोणातून विकृत चित्रण व प्रदर्शन होताना दिसते. हे चित्र बदलणे गरजेचे आहे.

**संदर्भ ;-**

1) स्त्रीवाद आणि साहित्य – डॉ. वंदना महाजन विजय प्रकाशन,नागपुर, दुसरी आवृत्ती 2015
2) स्त्रिमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा सहभाग – मंगल खिवसरा – स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद, 3 जाने 2005
3) शब्द बाण – श्री.सुधाकर डोईफोडे – निर्मल प्रकाशन, नांदेड,पहिली आवृत्ती 1997
4) दैनिक प्रजावाणी 6 डिसेंबर 1970
5) दैनिक प्रजावाणी 16 नोव्हेंबर 1985
6) दैनिक प्रजावाणी 3 जानेवारी 1973
7) दैनिक प्रजावाणी 28 नोव्हेंबर 1975
8) दैनिक प्रजावाणी 17 मार्च 1982
9) दैनिक प्रजावाणी 24 जुलै 1985
10) दैनिक प्रजावाणी 13 ऑक्टो.1985
11) दैनिक प्रजावाणी 5 नोव्हेंबर 1985
12) दैनिक प्रजावाणी 18 नोव्हेंबर 1985

# स्त्रीवाद आणि आदिवासी महिला - विशेष संदर्भ पालघर जिल्हा

**प्रा. जी.एम.घुटे**
शां. घो.कला,विज्ञान व गो.प.वाणिज्य महाविद्यालय शिवळे ता.मुरबाड जि.ठाणे

**प्रस्तावना:-**

विश्ववंदनीय स्वामी विवेकानंद म्हणतात 'महिलांची स्थिती सुधारल्याशिवाय जगाचे कल्याण घडणार नाही,केवळ एका पंखाच्या आधारे भरारी घेणे कोणत्याही पक्षाला शक्य नाही' कुटूंब,देश आणि विश्वाच्या बाबतीत नारीशक्तीचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी हे विधान पुरेसे आहे.
म्हणजे महिलांच्या सर्वांगीन विकासाशिवाय समाजाचा,राष्ट्राचा,व जगाचा विकास शक्य नाही.

स्त्रीवाद ही पाश्चिमात्य संकल्पना आहे सामान हक्क,सामान दर्जा, आणि स्वातंत्र्य या स्त्रीवादाच्या मुळ कल्पना आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीचे उद्‌द्गाते रुसो,लॉक,बेथम यांच्या विचारसरणीतून या कल्पना उगम पावल्या आहेत.पुरूषप्रधान विचारांच्या चौकटीत अडकून पडलेल्या स्वत:चा शोध घ्यायला सुरुवात केली,स्वत:च्या जाणिवांचा शोध घेतला,स्वत:चा विचार करताना मी एक माणूस आहे हा विचार पुढे आला तेव्हाच स्त्रीवाद साकारला गेला.

स्त्रीवाद ही एक विचारधारा आहे यामध्ये शोषणविरहीत,वर्ग,वर्ण,जातीविरहीत विचार अपेक्षित आहे.म्हणजे स्त्रीयांना गुलाम बनविण्याय्रा व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठविनारी विचारधारा आहे. अनादी काळापासून स्त्रीला दुय्यम स्थान देण्यात आल्याने मणुष्यजातीचा अपरीमीट हानी झाली आहे.

19 व्या शतकाच्या अखेरीस व 20 व्या शतकाच्या सुरुवातीला शैक्षणिक क्रांती घडून आली त्यामूळे जगभरातील स्त्रीयांनी स्त्रीस्वातंत्र्याचा लढा पुकारण्यात आला आम्हांला मानुस म्हणून जगु द्या असा सूर संपूर्ण विश्वत उमटला.

मात्र आदिवासी जमाती या मुळात मागासलेले जीवण जगत असल्याने त्यामध्ये असलेली पितृप्रधान संस्कृती अजून टिकून राहिली आहे. त्यांच्या समस्यांचे निराकरण झालेले नाही.त्याठिकाणी स्त्रीवाद ही संकल्पना रूजलेली नाही.काही प्रमाणात बचतगट स्थापन झाले आहेत पण बचतगटाचा उद्देश स्वावलंबन हे बय्राच महिलांना माहीत नाही.पालघर सारख्या दुर्गम भागात आदिवासी महिलाना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते आहे आणि स्त्रीवाद त्यांच्यापर्यंत कसा किवा कुठेपर्यंत पोहचला आहे यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न सदर शोधनिबंधात केला आहे.

**शोधनिबंधाचा उद्देश:-**

1. स्त्रीवाद आणि आदिवासी महिला या संकल्पनेवर प्रकाश टाकने.
2. पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या समस्यांचा अभ्यास करणे.
3. पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिलांना स्त्रीवादाचा झालेला फायदा अभ्यासने
4. पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिला सबलीकरनाचा आढावा घेणे.

**संशोधनाचे महत्व:-**

स्त्रीवादाची संकल्पना युरोपीयन राष्ट्रात रुजली,जोपासली व फोफावली त्याचा परिणाम म्हणजे युरोपियन स्त्रीयांनी केलेली प्रगती आज प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना एक पाऊल पुढे स्त्रीया आहेत.मात्र भारतासारख्या विकसनशील देशामधे चित्र वेगळे आहे आणि त्यामधेही आदिवासी महिलेचे जिवन खुप मागासलेल्या अवस्थेत आहे महिलांना पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य,समानता फक्त युरोप किंवा काही शहरामधे

मिळणे म्हणजे स्त्रीवाद नाही तर या पृथ्वीतलावरील सर्व स्त्रियांचा त्यामधे सहभाग होणे गरजेचे आहे आणि म्हणूनच पालघर सारख्या दुर्गम भागातील आदिवासी महिला आणि स्त्रीवाद यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न सदर लेखात केला आहे.

**आदिवासी महिलांच्या समस्या:-**

आदिवासी महिलांच्या समस्या सारख्या नाहीत एकाच प्रदेशात राहनाऱ्या वेगवगळ्या आदिवासी जमातीच्या महिलांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत कारण वेगवगळ्या जमातींच्या परीवर्तनाचा वेग वेगवेगळा आहे पण तरीही पालघर जिल्ह्यातील कोकणा,वारली,कातकरी,क-ठाकुर,म-ठाकुर,मल्हार कोळी,महादेव कोळी या जमातीमधील महिलांच्या समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

**1.आर्थिक समस्या:-**

आदिवासी जमाती स्थलांतरीत शेती करत होत्या पण आधुनिक काळात सरकारच्या जंगलविषयक कायद्यामुळे त्यांची स्थलांतरित शेती पध्दत बंद झाली आहे मात्र स्थलांतर व अज्ञानानामुळे त्यांच्या सुपीक जमीनी सावकार वर्गान बळकावल्या आहेत. त्यामूळे उदरनिर्वाहापुरती शेती व रोजगारासाठी स्थलांतर हे पालघर जिल्ह्यातील आदिवासीचे सूत्र बनले आहे यामध्ये आदिवासी महिला पुरुषाला बरोबरीने साथ देते मात्र पुरूषप्रधान संस्कृती असल्याने मजुरी करून मिळवलेला पैसा पुरुषांच्या हातात जातो आणि तो दारूत घालवतो काबाडकष्ट करून महिलांच्या हाती काहीच लागत नाही.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी महिला जंगलातील मोहची फुले,जांभूळ,औदुंबराची फळे,काजूची बोंडे इ.पासून दारु बनवतात व पैसे मिळवण्याचा प्रयत्न करतात पण घरातील पुरुष/नवरा व्यसनी असल्यामुळे महिलांना अर्थप्राप्ती होत नाही तसेच शासनाच्या जंगलविषयक धोरणानुसार आदिवासी महिलांवर दारु गाळण्यावर बंदी घातली आहे परीणामी स्त्रीयांच्या सबलीकरनाचा किंवा स्त्रीवादाचा पुरस्कार केला जातो त्यामध्ये आदिवासी महिला कुठे आहेत हा प्रश्न पडल्याशिवाय राहत नाही.

**2. सामाजीक समस्या:-**

प्राचीन काळी आदिवासी समाजात मातृसत्ताक कुटुंब व्यवस्था होती पण आधुनिक काळात पांढरपेश्या समाजाच्या संपर्कामुळे आदिवासी जमातीमध्येही पुरूषप्रधान कुटुंब व्यवस्था वृद्धींगत झाली व अनेक बंधनात आदिवासी महिला अडकून पडली.

यापैकी पहिली समस्या आहे ती म्हणजे बालविवाह पुर्वी आदिवासी जमातीमधे ही प्रथा प्रचलित नव्हती पण हिंदु धर्माच्या संपर्कामुळे बलविवाह होऊ लागले त्याचे गंभीर परिणाम आदिवासी जमातीमध्ये दिसुन येतात उदा.अल्पवयीन मातृत्व,घटस्फ़ोटाचे प्रमाण वाढले,कुपोषण.

कन्यामूल्य ही आदिवासी जमातीमधील दुसरी समस्या आहे.पुर्वी कन्यामूल्य वस्तूच्या स्वरूपात किवा प्रतिकात्मक स्वरुपात घेतले जात असे मात्र आधुनिक काळात कन्यामूल्य पैशाच्या स्वरूपात घेतले जाते व आदिवासीकडे पैसा नसल्याचे अनेक मुलीचे विवाह झाले नाहीत.

आदिवासीच्या गरीबीचा फायदा घेऊन अनेक आदिवासी महिलांना वेशा व्यवसाय करण्यास भाग पाडले जाते किवा धनाढ्य लोक त्यांचे लैंगिक शोषण करतात निरक्षरता व गरीबीमुळे या अन्यायाविरुद्ध ते आवज उठवत नाही.

मद्यपान ही आदिवासी महिलांची मोठी समस्या आहे पूर्वी आदिवासी लोक मोहाच्या फुलापासुन बनवलेली दारू किवा माडाची ताडी पीत ती आरोग्यास घातक नव्हती मात्र सरकारच्या जंगालविषयक धोरणानुसार आदिवासीवर बंधने आली त्यामूळे आदिवासी देशी दारु,स्पीरीट अमली पदार्थ सेवन करण्यास सुरुवात केली त्याचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम झाला अनेक लोकांना अकाली मृतु आल्याने महिलांना वैध्यव्य पत्करावे लागले त्यामूळे त्यांचे जीवन हलाखीचे बनले आहे.

**3. आरोग्यविषयक समस्या:-**

आदिवासी लोक दारिद्र्यरेषेखालचे जिवन जगत असल्याने त्याना सकस आहार मिळत नाही याचा सर्वाधीक परिणाम आदिवासी महिलांवर होतो त्याना अनेक आरोग्यविषयक समस्याना तोंड द्यावे लागते आहे आदिवासी लोक ताड,मोहाची फुले यापासून तयार केलेल्या मादक द्रव्याचे सेवन करतात या मादक द्रव्यामध्ये

विटामीण बी,विटामीण सी चे प्रमाण जास्त असल्याने त्यांच्या शरीराच्या हानी पेक्षा फायदे जास्त होते मात्र शासनाच्या जंगलविषयक कायद्यानुसार अनेक बंधने आली आहेत उपासमारी आदिवासीच्या पाचवीला पुजली असल्याने अनेक आरोग्यविषयक समस्या आहेत.

आदिवासी लोक दारिद्र्य असल्याने त्यांच्याकडे कपडे कमी असतात त्यामूळे ते स्वच्छ धुवून न घेता तेच-तेच वापारल्यामुळे त्वचारोग जडतात.तर पावसाळयात ओले कपडे वापरल्याने न्युमोनिया,ताप,सर्दी यासरखे आजार जडतात.

आदिवासी भागात शुद्ध पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही आदिवासी लोक नदी,नाला,विहिर येथील पाण्याचा वापर पिण्यासाठी करतात अशुद्ध पाण्यामुळे अनेक साथीचे रोग पसरतात महिलांची रोगप्रतीकार शक्ती कमी असल्याने महिला जास्त साथीच्या रोगाना बळी पडतात.त्याचबरोबर बऱ्याच आदिवासी भागात आरोग्य सुविधा उपलब्ध नाही,बरेचसे डॉक्टर आणि नर्सेस आदिवासी भागात जाण्याचे टाळतात किवा काही ठिकाणी आरोग्य सुविधा उपलब्ध आहे पण आदिवासी अंधश्रद्धाळु असल्यामुळे ते तिकडे पाठ फिरवून भगत,वैदू कडे जातात परिणामी अनेकांना जीव गमवावा लागतो.

**आदिवासी महिलांच्या समस्यावरील उपाययोजना :-**

डॉ.व्हेरियर इल्विन या मानववंशशास्त्रज्ञांच्या मते आदिवासीच्या अनेक समस्या या प्रगत समजाच्या संपर्कामुळे निर्माण झाल्या आहेत अधिकारी,सावकार,व्यापारी या लोकांनी आदिवासीचे शोषण केले परीणामी ते मुळ संस्कृतीपासून दूर गेले त्यांच्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी डॉ. इल्विन म्हणतात की 'आदिवासीकरिता स्वतंत्र विभाग स्थापित करावेत' जसे जंगली प्राण्यांना मुक्त संचार करण्यासाठी राष्ट्रीय उद्यान उभारली जातात तसीच कल्पना डॉ. इल्विन यांची आहे मात्र या मतला अनेक विचारवंतानी विरोध केला. महाराष्ट्रातील ठक्करबाप्पा यांनी डॉ.इल्विन यांच्या विचाराला प्रखर विरोध केला आहे.कारण संपर्कामुळेच विकासअवस्था पूर्ण होते आदिवासी जमातींचा विकास घडवून आणण्यासाठी त्यांचा प्रगत जगाशी संपर्क जुळवुन आनने खुप गरजेचे आहे.आदिवासी जमाती व त्यामधील महिलांची स्थीती सुधारणांच्या उपाययोजना पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**1.द्यकीय सुविधा:-**

आदिवासी महिलांची सर्वात मोठी समस्या म्हणजे त्यांचे आरोग्य अपुरा आहार,अशुद्ध पिण्याचे पाणी,खूप कष्ट,पतीकडुन मारहाण इत्यादी कारणामुळे आदिवासी महिलांचे आरोग्य धोक्यात आले आहे असे असताना अंधश्रद्धा, लाजाळू वृती, डॉक्टरची भीती या कारणामुळे आदिवासी महिलांनी दवाखान्याकडे पाठ फिरवली आहे त्यामूळे हा प्रश्न आधिक गंभीर बनला आहे.पालघर जिल्ह्यातील आदिवासी भागातील महिलांची प्रस्तुती घरीच होते यावेळी अनेक मातांचा मृतु होतो,अनेक बालक कुपोषित होतात

शासनाने अनेक सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे पण अधीकारी वर्गाची उदासीनता व आदिवासीचे अज्ञान या गोष्टी अडसर बनताना दिसतात. शासनाने आदिवासी महिलांचे आरोग्य सुधारन्यासाठी 'आशा स्वयंसेवीका' नेमली आहे तीचे संपूर्ण गावतील महिलांच्या आरोग्यावर लक्ष असते तसेच गर्भवती महिलांना सकस आहार मिळावा याचीही व्यवस्था केली आहे आदिवासी महिलांचे आरोग्य विषयक प्रश्न सोडवले तरच त्यांचा विकास होऊ शकतो.

**1. शैक्षणिक सवलती:-**

आदिवासी जमाती शैक्षणिक प्रगतीपासून दूर आहेत पुरूषप्रधान संस्कृती असल्याने मुलीला दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे परिणामी मुलीच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले आहे घरातील लहान मुलांना सांभाळने,जनावरं रानात घेऊन जाने, घरातील इतर कामे करणे इ. कारणामुळे मुलीना शाळेत पाठवले जात नाही किंवा थोडे शिक्षण झाल्यावर लग्न केले जाते. मुलगी परक्या घरी जाणार असल्याने तिला शिक्षण देऊन आपला काय फायदा असा

समज आदिवासी जमातीमध्ये आहे अज्ञान किवा अर्धवट शिक्षणामुळे आदिवासी महिला परावलंबी बनल्या व येथेच त्यांच्या जीवनात अनेक समस्या निर्माण झल्या.

आदिवासी मुलींना शिक्षण घेता यावे यासाठी शासनाने अनेक योजना सुरू केल्या आहेत त्याचा काही भागात किंवा काही जमतींच्या मुलीनी फायदा घेतला आहे शैक्षणिक प्रगतीचा त्यांच्या जीवनात झालेला फायदा दिसुन येतो पण काही जमाती शिक्षणाबाबत उदासिन आहेत त्या महिलांचे जीवन खुपच मागासलेले आहे.

**2. शासकीय आरक्षण:-**

केंद्र सरकार,राज्य सरकार आणि शासकीय अनुदानावर चालनाग्रा संस्थामधे 7.5% आदिवासी अनुशेष भरण्याचे बंधन आहे. काही ठिकाणी त्याकडे दुर्लक्ष केले जाते मात्र आता शासनाने आदेश काढल्याचे दिसुन येतात तरीही महिलांचे प्रमाण अत्यल्प आहे हे प्रमाण वाढल्यास शैक्षणिक आकर्षण निर्माण होऊन खग्रा अर्थाने स्त्रीवादस पोषक वातावरण निर्माण होईल.

राजकीय क्षेत्रातही आरक्षण लागू करावे काही प्रमाणात ते आहे सुद्धा पण पुरूषप्रधान संस्कृतीने ते गुरफटलेले आहे उदा.पद महिलेकडे व अधिकार तिच्या नवग्राकडे अशी वस्तुस्थिती असल्याने महिलांचे प्रश्न महिलांच्या दृष्टीकोनातून हाताळले जात नाही परीणामी आदिवासी महिलांचे प्रश्न सुटण्याएवजी गुंता वाढत चालला आहे.

**स्त्रीवाद आणि आदिवासी महिला:-**

शोषणमुक्त स्त्रीवर्ग म्हणजे स्त्रीवाद अशी कल्पना सर्वप्रथम यूरोप खंडात उदयास आली तीचा प्रसार हळुहळू जगभर झाला भारत व महाराष्ट्रातील आदिवासी महिलांपर्यंत हा स्त्रीवाद पोहचलेला दिसतो.आज पालघरसारख्या आदिवासी जिल्ह्यात स्त्रीसाक्षरतेचे प्रमाण वाढले आहे वेगवगळ्या क्षेत्रात वेगवेगळ्या पदावर आदिवासी महिला पोहचलेल्या दिसतात

तसेच मोठ्या प्रमाणात आदिवासी महिला बचत गटाची निर्मिती होउन अनेक रोजगाराभिमुख उद्योग हाती घेतले आहेत वरील सर्व गोष्टी विचारात घेतल्यास स्त्रीवादाचा स्पर्श आदिवासी महिलांना झाला आहे हे आपण नाकारु शकत नाही.

**निष्कर्ष/ समारोप:-**

स्त्रीवादाचा उगम फ्रेंच रज्यक्रांतीत झाला व हळुहळु त्याचा प्रसार झाला असला तरी भारतातील विशेषता आदिवासी स्त्री त्यापासून खुप दूर आहे कारण भारतातील आदिवासी स्त्रीयांच्या आर्थिक,सामाजीक व आरोग्यविषयक समस्या खुप विदारक आहे त्यामधून बाहेर पडण्याच्या ऊपाययोजनाची चर्चा शोधनिबंधात केली आहे.

पालघर जिल्ह्यातील आदिवासी अतिदुर्गम प्रदेशात राहतात येथील कातकरी जमात ही स्थलांतरीत आहे त्यामूळे त्यांचे जीवनमान अत्यंत हलाखीचे आहे.काही जमातीमध्ये मात्र शैक्षणिक विकास झाला आहे त्या महिलांची स्थीती बदललेली दिसते.

डॉ.इल्विनच्या मते आदिवासीच्या समस्यांचे मुळ कारण प्रगत समाजाचा सामाजीक हस्तक्षेप.त्यामूळे आदिवासी समाजाला प्रगत समाजापासून दूर ठेवने हा त्यावरील उपाय नाही. असे केल्यास आदिवासीचा विकास थांबेल आणि महिला अजून मागे फेकल्या जतील म्हणुन शासनाने आधुनिक तंत्रज्ञान,बाजारपेठा,संदेशवहन साधने आदिवासी क्षेत्राशी जोडणे आवश्यक आहे तरच आदिवासी क्षेत्राचा विकास होईल व पर्यायाने महिलांचा विकास होईल आणि खग्रा अर्थाने स्त्रीवाद आदिवासी क्षेत्रात रुजेल.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

1.भारतातील सामाजिक समस्या- डॉ. प्रदीप आगलवे,डॉ.सरोज आगलावे- श्री साईनाथ प्रकाशन,नागपुर

2. महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान- डॉ.नंदिनी तडकलकर (चौधरी)- अल्फा पब्लीकेशन्स,नांदेड

3.भारतातील महिला विकासाची वाटचाल- ज.शं.आपटे, पुष्पा रोडे- डायमंड पब्लिकेशन्स,पुणे.

4.स्त्रीमुक्तीचा क्रांतीकारी मार्ग – वळंजु तारा मधुसूदन – डायमंड पब्लिकेशन्स,पुणे

5.भारतीय स्त्रीजीवन- साने गीता-मौज प्रकाशन गृह,मुंबई 1986

6. स्त्री कर्माची धर्मकहाणी – ओलालेकर प्रशांत- ग्रंथाली प्रकाशन,मुंबई.

7. आरक्षण: धोरण आणि वास्तव- कराडे जगन्नाथ- सुगावा प्रकाशन,पुणे,

8.स्त्री विकासाच्या पाऊलखुणा-कार्वे स्वाती- प्रतिमा प्रकाशन,पुणे.

9. महिला सबलीकरण स्वरूप आणि समस्या- गोटे शुभांगी- वरद पब्लिकेशन्स,औरंगाबाद.

10.स्त्रीवाद- साखरे सीमा- सुहासिनि प्रकाशन, नागपुर.

**नियतकालिके**

1. महाराष्ट्र राज्य महिला आयोग (1998): महाराष्ट्रातील स्त्रियांचा दर्जा वस्तुस्थितीचे विश्लेशन,मुंबई.
2. महिला सबलीकरण विशेशांक(2002) महाराष्ट्र शासन,मुंबई.
3. साठे शारदा(2004) आंतरराष्ट्रीय महिला दिन विशेशांक,अंक-3,स्त्री मुक्ती संघटना,मुंबई.

# स्त्रीवाद आणि प्रसारमाध्यमे

**प्रा.संजय महेबूब तडवी**
अर्थशास्त्र विभाग , सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय,शहापूर जिल्हा.ठाणे

**प्रस्तावना:-**

समाज दर्शन मोठ्या प्रमाणावर घडवुण आणणाऱ्या कोणत्याही साधनास प्रसारमाध्यम असे म्हणतात. जगात प्रसारमाध्यमाची भूमिका ही प्रत्येक देशात वेगवेगळ्या स्वरुपाची आहे. भारताचा विचार केल्यास भारतात देखील रेडिओ, वर्तमानपत्र ,मासिक, सिनेमा तमासे, नाटक, भोगंऱ्या तसेच आजुबाजुला झडकणारे बॅनर किंवा जाहिराती इत्यादींचा समावेश प्रसार माध्यमात होतो. प्रसारमाध्यमे हे समाजात जागृती निर्माण करताना दिसुन येत असतात. त्यामुळे समाजाच्या विविध समस्या विशेष करून महिलाच्या समस्या उजागत करताना दिसून येत असतात. इतकेच नव्हेतर शिक्षण, सामाजिक हक्क मानवी हक्क इत्यादीची जाणीव समाजामध्ये प्रकारमाध्यमे करुण देतात. महिलांन संबंधीत विषय, यामाचे स्त्रीयांवरील अन्याय व अत्याचार या विषयी समाज जागृती करने हे सुद्धा प्रसारमाध्यमांचे महत्त्वाचे काम आहे. स्त्रीया विषयी प्रसारमाध्यमे सकारात्मक तसेच नकारात्मक भूमिका बजावताना दिसून येतात. प्रसारमाध्यमामुळेच उनीघाल्वा सकारात्मक भूमिकाचे महत्वाचे योगदान दिसून येतात. उदा. रमीयांच्या विविध समस्यांना विविध प्रसारमाध्यमे लिया विषयी सकारात्मक भूमिका पानांना दिसून येतात आजभारताचा विचार केला दर दोन तासान यो बलत्कार तसेच बलकारा विषयक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. परंतु अध्या समस्या आपल्या समोर येऊ देत नसतान अश्या वेळी विविध प्रसारमादचमे आपापल्या परीने प्रसारमाध्यमातून दाखविण्याचे काम विविध पद्धतीने दाखविले जातात. एकदरीत विचारकिल्यास प्रसारमादरम व स्त्रीयांच्या समस्या उजागत करण्यासाठी भारतातच तर संपूर्ण जगात प्रसार माध्यमे नियांचा विविध समध्याना वाचा फोडण्याचे काम करीत आहेत. प्रसारमाध्यमांची सिविषयी सकारात्मक भूमिका प्रसार माध्यमांनी लिया विषयी सकारात्मक भूमिका दिसून आलेली आहे मगत खाजगी प्रसारमाध्यम असो की शासकीय दोघांनी स्त्रियांचा विविध समस्या समाजापुढमायाचा प्रयत्न केला आहे.

मीयांच्या समस्यांना प्राधान्य देणे भारतातील स्मीयांना येणाचा समस्या सरकारीव प्याजगी प्रसारमाध्यमे वर्तमानपत्रे, सिनेमा नाटक तमासे तसेच इतर प्रसारमाध्यमे विविध कार्यक्रमाद्वारे प्रसाशन करीत आहेत. रसीयावर होणारे अत्याचार यांना विविध कार्यक्रमाद्वारे प्रकारीत केले जाते. त्यामुळे श्मीयांचा समस्या विषयी पोलीस, सरकार व न्यायदान संख्या लक्ष केंद्रीत करतात उदा. एखाद्या वयात्काराच्या घटनेत संबंधीत पुरुषाला गुन्हयाच्या प्रमाणापेक्षा कमी शिक्षा दिली आणि प्रसारमाचा मांनी हा विषय जनते समोर आणला तर त्याला शिक्षा दिली जाते आणि त्यामुळे समाजात गुन्हेगारी देखील कमी होतो. बहुतेकवेळेस अनेक गुन्हेगारांना पोलीस दुर्लक्षीत करतात. गुन्हेगार श्रीमंत असेल किंवा राजकीय पार्श्वभूमी असलेला असेल तर पोलीस अध्या गुन्हेगाराला शिक्षा करण्यास धजावत नाहीत. परंतु प्रसारमाश्रमामुळे हा विषय प्रखरतेने समाजापुढे मांडण्याचे काम हे प्रसार माध्यम करतांना दिसून येतात. थोडक्यात समाजासमोर सत्य आणण्याचे कार्य अनेक प्रसारमाश्रमे प्रामाणिकपणे करताना दिसून येतात. 2) रसीयांचे समाजातील स्थान उच्च करण्यासाठी प्रयत्न अनेक प्रकारचे प्रसारमाधम रखीयांचे समाजातील स्थान उच करण्याचे काम करीत आहेत. उदा- राजकारणातील सक्रीय सहभाग म्हणून मी रागांबी, सामाजिक कार्येत मदर टेरेसा, पोलीस खात्यान किरण बेदी मिश बोलनकर क्रिडा विभागात, ग.टी. उषा, औद्योगिक विज्ञान

विष्णमझुमदार तसेच समाजकार्यात मेघापाटकर, प्रतिभा शिंदे, ३० चेयोगदाना मुळे यांचे समाजातील उचकरमाचे प्रमल कले जात आहेत. यामुळे तरुणींच्या मनामध्ये नवीनचेतना किया उमेद निर्माण होईल. करिअरच्या त्याच्या अपेक्षा रुंदावतीत त्याच प्रमाणे त्या कोणत्याही प्रकारचे धाडस करण्यास पृथ्वी प्रवृत होतील. या धाडसी रसीयांचा कर्तत्वाची अधीन झाल्याणे तरुण मुलींचे पालकही त्यांना करिअनुसाठी मदत करतील त्यांना विविध भित्रात प्रवेश करण्यासाठी प्रवृतकालील33 प्रसारमादागांनी प्रसार सीयांना पगिवा देने भारतीय स्त्रीयांना भेणाऱ्या अनेक समस्या, त्यांचा होणारे अत्याचार, त्यांचा होणारा छळ इ. साठी प्रसार माध्यमांनी भारतातील रमीयांना पाठिंबा दिला तर सीमा समाजातील स्थानात नक्कीच वाढ होईल, प्रसारमाध्यमांनी मीयांचे जागृती करण्यासाठी सीमांचे विविध अधिका वह सर्व स्त्रीयांपर्यंत पोहचविला कार्य करत आहेत. रसीयांचे समाजातील स्थान, आईचे महत्व इत्यादीवर लक्ष कहीन करुण लद मे हो आई दिवस' म्हणून पाळण्य येतो अध्या अनेक उपक्रम प्रसारमाध्यमे हे नेहमी वेळोवेळी रसीयांच्या समस्यांना पाठीवी देतांना दिसुन येत असतान 4) रतीयांना प्रेरणा देणारे कार्यक्रमभारतीय प्रसारमाध्यमे विशेष करून दूरदर्शन, राहीय वाहिन्या आकाशवाणी ३४ वर वेळोवेळी रमीयांना प्रेरणा देणाचा कार्यक्रमाचे प्रसारण राष्ट्रीय वाहिन्यांवर दाखवले जात आहेत. त्यांना मोठ्या प्रमाणावर पसंती देखील दिली जात आहे. त्यामुळे भावी श्रीयांन प्रेरणा घेण्यासारखे हे कार्यक्रम आहेत. त्याचा फायदा हा लहाण मुलींवर मोठ्या प्रमाणा आ संपूर्ण भारतात रमीनांना प्रेरणा देणारे कार्यक्रम खाजगी वाहीन्यादेखील दाखवत आहेत. त्यामुळे भावी काळात अनेक रमीया विविध क्षेत्रात भरारी घेतांना दिलुन घेत आहेत. भगती, कलेक्टर एसपी अश्या महत्वाच्या हुदयावर आज खींचा विराजमान होता ना दिसुन येत आहेत.

प्रसार माध्यमांची रमीयां विषयी नकारात्मक भूमिका ज्या प्रकारे यांना प्रेरणा देणार कार्यक्रम विविध प्रसारमाधमे दाखवत आहेत. त्याच प्रमाने हेच प्रसारमाधम, रमीचा विषयी नकारात्मक भूमिका देखील दाखवताना दिसुन येत आहेत. ते आपणास खालील प्रकारे विविध मुद्याला लहाय्यनिष्ठ करता येतील.

1) रखीयांचे विकृत चित्रण :स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे असा सार्वत्रिक मान् करण्यास प्रसार माध्यमे आणि त्यातून केले जाणारे जि विकृत चित्रण जबाबदार आहे. जाहिराती लियांचे भड़क व उतजेक प्रदर्शन करण्यात आ अन्चल चित्रांम अर्धनग्नता आणि कामुक दृश्यांची रेल असते अश्या विकृत चित्रणामुळे काम- भावना विवि आणि त्यातूनच खिशावर मलाकार, विनयभंग मानसी लात्काराची भावना वाहनांना दिसून येत आहे. यासा प्रसारमाध्यमांचाच हात दिनो गोबर अनेक किया मॉडल प्रसिद्धीसाठी या कामात योगदान देन आहेत. त्यामु वातावरण निर्मामध्ये समाजात मोठ्या प्रमाणावर तिचे

श्रीयांवर अत्याचार होणान्या कार्यक्रमाचे प्रसारण अनेक प्रस्तरमालामाकुसेच माली का म रमीयांचे कडक चित्रण व नीयवरील अत्याचा दाखवले जातात, बलात्काराच्या घटना प्रसारमाहनमाम वारंवार दाखवल्या जातात. त्यामुळे पुरुषांना आयताच चुके विषय मिळतो कार्यक्रमामध्ये दाखविल्याप्रमाणे कृत्य करण्याचे तरुणांच्या मनामध्य येते. काही मित्रहर तर अगदी अलील चित्रण दाखवले जाते. दूरदर्शनील अनेक जाहिराती कुटुंबातील सदस्यांनी एकत्र बसून पाहण्यास लाज वाटते अशाच असतात दूरदरनिटील विविध कार्यक्रमांमको विनाहनाय संबधाचे उदानी आणि अवास्तव चित्रण प्रसारित करण्यात येते.

5) स्त्रीयांवरील अत्याचाराचे प्रमाण प्रसारमान्मामुळे दिवसेदिवस रमीयांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढताना दिसुन येत आहे शाखाम मोबाइल फोननी की झाल्यापासून गुगलवर मोल्या प्रमाणात अखील चित्रे बसून त्याचा परिणाम हा भारतातील संस्कृत समाजावर मोठ्या प्रात विपरीत होताना दिसून येत आहेत गुगल माल्या पालून संपूर्ण भारतान बलात्कारा सारख्या धरना मोठ्या प्रमाणात वाटत आहेतयावरील मानसीक बलात्काराची प्रमाणात वा विविध प्रसारमारंमाकडून तसेच गुळाल बट्रील विविध साईडवर नवीन पीठीत मोठ्या प्रमाणावर

स्मीया विषयी मानसीक बलात्काराची भावना जागृत होतांना दिसुन येत आहे. त्याचा परिणाम म्हणून संपूर्ण भारतात तासात प्रत्येक दिवलित किवो दिवसातील अनेक बलात्कारांचा घटना घडत आहेत त्या प्रसारमाधमांवर देखील दाखवल्या जानकारी थोडक्यात संपूर्ण भारतात प्रसारमा व रमीया यांच्यातील सह संबून हा जसाचागुला आहे. तसा वाईट देखील मोठ्या प्रमाणात आहे

रलीया आणि प्रसारमाध्यमे याचा एकंदरित विचार केल्यावर अतिर्शित येतेकी श्रीयांचा जीवनमान उंचावण्यासाठी विविध प्रसारमाध्यमे जसे स योगदान देत आहेत. तशाच योगदान तर वाढवलातर श्रीयांवरील अत्याचाराला देखील वाचा फुटल्याशिवाय राहणार नाही,

**संदर्भ ग्रंथ**

एम एसलीमन, एसजे वागमारे पायाभूतअभ्यास शेठ पटीशन मुंबई डॉ. प्रदिप भागलावे. संशोधनाच्या पद्धतीशान वतंत्रेविद्या प्रकाशन नागपूर
डॉ माहेश्वरी समाजरचना भाग्रा प्रकाशन आता डॉ. नंदकिशोर कारखानिस ग्रामीण समाजरचना, प्रशांत पलीकेशन नव्दगान डॉ. धोंगडे अश्विनी स्लीवादी समरूप दिनीपात प्रकाशनपूर्ण

प्रा. संजय महेबुब तडवी -अर्थशास्त्र विभाग
सोनुमाऊ बायत महाविद्यालय पूर तिं ठाणे Sanjay 923rg smil

# स्त्रीवाद आणि स्त्री – पुरुष समता

**डॉ.राम पांडूरंग साबदे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख ,महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

**प्रस्तावना**

स्त्रीवाद,स्त्रीमुक्तिवाद,स्त्रीशक्तीवाद अशा विभिन्न नावाने ओळखला जाणारा हा सध्या बहुचर्चित असा राजकीय विचार आहे.स्त्रियांची पुरुषी वर्चस्वापासून मुक्तता,त्यांना समान अधिकार,समान संधी व वागणूक याचे समर्थन वा आग्रह धरणारा हा विचार होऊ लागला आहे.स्त्रीवाद ही मानवी हक्काशी निगडीत असणारी विचारप्रणाली आहे.जागतिक राजकरणात आज स्त्रीवादाचा गांभीर्याने विचार होऊ लागला आहे.स्त्रीवाद ही एक बहुआयामी विचारप्रणाली म्हणून वर्तमान जगात ओळखली जाऊ लागली आहे.ही विचारप्रणाली स्त्री मुक्तीसाठी लढणार्याम चळवळीशी निगडीत आहे.या चालवळीने स्त्रीयांच्या प्रश्नांना अधिक महत्व दिले आहे.यात स्त्री-पुरुष संबंधाची पुनर्निर्मिती करण्याची मागणी केलेली आढळते.या चळवळीने पारंपरिक,सामाजिक व राजकीय सिद्धांतांना आव्हान दिले.अगदी वैदिक संस्कृतीत स्त्रियांना मानसन्मान मिळत होता.परंतु पराधिनता नष्ट करून पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांना दर्जा मिळावा,निसर्गता मानवाला मिळालेले सर्व हक्क स्त्रियांना मिळावेत,तिचे अनादिकाळापासून चालत आलेले शोषण थांबावे,मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता असावी असा स्त्रीवादी विचारप्रवाहाचा आग्रह आहे.ही एक विचारप्रणालीत्मक चळवळ असून,स्त्रिवादाशी संबंधित विचार हा स्वातंत्र्य,समता व न्यायाशी संबंधित आहे.आधुनिक काळात स्त्री-पुरुष समतेचा आग्रह धरणारी ही एक बहुचर्चित व आंतर्राष्ट्रीय स्वरूपाची चळवळ आहे.

**उद्देश्य:-**प्रस्तुत 'स्त्रीवाद आणि स्त्री-पुरुष समता'या शोध निबंधाच्या मांडणीतून स्त्रीवादी विचार चळवळीतून स्त्री-पुरुष समता विषयक कोणती तार्किक भूमिका मांडण्यात आली आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**गृहीतके:-** स्त्रीवाद ही जागतिक पातळीवरील स्वातंत्र्य,समता,न्यायाला अनुसरून स्त्री-पुरुष समतेचा आग्रह धरणारी एक महत्वपूर्ण चळवळ व विचार आहे.स्त्रियांना पुरुषांसमान सामाजिक,राजकीय व आर्थिक क्षेत्रात संधी,हक्क,दर्जा,प्रतिष्ठा,सन्मान मिळवून देण्यात स्त्रीवादाचे योगदान अद्वितीय आहे.

**संशोधन पद्धती:-**प्रस्तुत शोध निबंधाच्या अभ्यास व लेखनासाठी संशोधकाने ऐतिहासिक,वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा उपयोग केला असून सदरील अभ्यासात स्त्रोत म्हणून प्रामुख्याने द्वितीयक साधनांचा उपयोग केलेला आहे.

**स्त्रीवादाचा अर्थ:-**स्त्रीवाद ही एक बहुआयामी संकल्पना असल्यामुळे या संकल्पनेची निश्चित एकच व्याख्या करता येणे कठीण आहे.स्त्रीमुक्ति व स्त्रियांच्या हक्कांचा पुरस्कार करणारी ही एक वैचारिक चळवळ म्हणून स्त्रीवादाकडे पाहिले जाते.स्त्रीवादी चळवळीतूनच स्त्रीवादाचा जन्म झाला आहे.सर्वसाधारणपणे स्त्रीवाद म्हणजे स्त्री केंद्रीभूत असे विचार,स्त्रियांची बाजू मांडणारे,स्त्रीयांना समान संधी,प्रतिष्ठा,अधिकार याचे समर्थन करणारे विचार होय.सामाजिक पुरुष केंद्रित परंपरागत संरचनेला विरोध करून समतेचा पुरस्कार करणाऱ्या विचार संचाला स्त्रीवाद असे म्हणणे संयुक्तिक होईल.पुरुष प्रधान मनोवृत्तीच्या सामाजिक संरचनेला विरोध करून स्त्री-पुरुष समतेचा आग्रह धरणाऱ्या विचारप्रणालीला स्त्रीवाद म्हणता येईल.समजाच्याअंतर्गतधर्म,कुटुंब,जात,पंथ,वर्ण,अर्थव्यवस्था,राजकारण,व्यवसाय,नोकऱ्या,साहित्य,कला,शिक्षण या विविध क्षेत्रात पुरुषी बहुलता किंवा वर्चस्व शतकानुशतके आहे.स्त्रियांना तुच्छ व दुर्बल मानून त्यांना सर्व क्षमता असूनसुद्धा दुय्यम स्थान वरील विविध क्षेत्रात जाणीवपूर्वक देण्यात आले आहे.या पुरुषी वर्चस्वाला,पुरुषसत्ताक व्यवस्थेला विरोध करणारा विचार म्हणजे स्त्रीवाद होय.स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने प्रगती व विकासाच्या समान

संधी,शोषण आणि विषमतेवर आधारित पुरुषप्रधान सामाजिक व्यवस्थेला विरोध,लिंगभेदाला विरोध,सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या प्रमाणेच स्त्रियांना अधिकार आणि स्त्री सक्षमीकरणाचे प्रयत्न हे स्त्रीवादाचे महत्वपूर्ण तत्वे आहेत.

स्त्रीवाद ही महिलांच्या मागासलेपणाच्या विभिन्न बाजू समजून घेण्यासंदर्भातील एक गतीशील आणि निरंतर परिवर्तनशील विचार आहे.स्त्रीवादाचे आधुनिक व उत्तर आधुनिक काळात अनेक प्रवाह आणि उपप्रवाह निर्माण झालेले आहेत.कांही अभ्यासकांनी स्त्रीवादी प्रवाहाला वेगवेगळ्या विचारप्रवाहात विभाजित केलेले आहे.यात उदारमतवादी स्त्रीवाद,समाजवादी/मार्क्सवादी स्त्रीवाद,क्रांतिकारी स्त्रीवाद,संस्कृतिक स्त्रीवाद,संलैंगिक स्त्रीवाद,मनोविश्लेषनात्मक स्त्रीवाद आणि राजकीय समलिंगीकवाद इ.स्त्रीवादाच्या विभिन्न संप्रदाय विविध विषयांवर भिन्न भिन्न दृष्टीकोण असूनही एका मुख्य विषयावर त्यांचे एकमत आहे,तो म्हणजे स्त्री-पुरूषांचे वर्तमान संबंध बदलले पाहिजेत.

स्त्रीवादी चळवळीचा जन्म १८ व्या शतकात इंग्लंड व फ्रांस मध्ये झाला आणि ही चळवळ पुढे जगभर विविध देशात पसरली.ही चळवळ लिंग समानतेची पुरुस्कर्ती आहे.ही समानता यावी यासाठी सर्व स्तरामद्धे स्त्रियांच्या अधिकारात वाढ झाली पाहिजी अशी तिची मागणी आहे.

ब्रिटनमध्ये इ.स.१७९२ मध्ये **वूलस्टनक्याफ्ट** यांनी स्त्रीवादावर पहिले पुस्तक लिहिले.'A Vindications of the Rights of women' या ग्रंथात मेरी यांनी स्त्रियांच्या बाबतीत प्रचलित सर्व पारंपरिक धारणांचे खंडन करून स्त्रीला पुरुषांच्या समकक्ष मानले.मेरी यांच्या मते,स्त्रीला योग्य शिक्षण व प्रेरणा मिळाल्यास ती पुरुषांप्रमाणे किंवा बरोबरीने कार्य करू शकते.या ग्रंथात त्यांनी स्त्री व पुरूषांना समान शिक्षणाचा पुरस्कार केला.समाजामध्ये स्त्री-पुरूषांना समान दर्जा व भूमिका असली पाहिजे अशी आग्रही मागणी केली.

**जॉन स्टुअर्ट मिल** यांनी आपल्या 'Subjection of Women' (1869) या ग्रंथामध्ये स्त्री-पुरुष संबंध हे मैत्रीवर आधारलेले असणे आवश्यक आहे प्रभूत्वावर नव्हे,असे प्रतिपादन केले.मिल यांनी स्त्री-पुरुष समानतेला अनुसरून विवाह कायद्यात सुधारणा व स्त्रियांच्या समान मताधिकाराचाही पुरस्कार केला.स्त्रियांना पुरुषांसमान संधी मिळावी असा विचार आग्रहपूर्वक मांडला.मिल म्हणतो,स्त्रीयांचे परवलंबित्व,पारतंत्र्य कोणत्याही आधारावर योग्य ठरवता येत नाही.मिलने स्त्री-पुरुष समानतेवर अश्याप्रकारे विशेष भर दिलेला दिसून येतो.

आधुनिक काळात स्त्रीवादाच्या समान अधिकाराच्या आग्रही मागणीतूनच पुढे १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी स्त्रियांना कायद्याच्या आधारावर अनेक अधिकार प्राप्त झाले.जसे इ.स.१८९३ मध्ये न्यूझीलंड मध्ये ३० वर्ष वय पूर्ण करणाऱ्या महिलांना सर्वप्रथम समान मताधिकार प्राप्त झाला,इंग्लंड मध्ये स्त्रियांना १९१८ मध्ये,अमेरिकेत इ.स.१९२० मध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला.

१९ व्या शतकातील मार्क्सवाद्यांनी कुटुंब संस्था ही श्रम विभाजनाचे उगमस्थान असून ज्यात स्त्री-पुरुष संबंध हे वर्चस्व व खाजगी संपत्तीच्या कल्पनेला प्रत्यक्ष स्वरूप प्रदान करीत असते. एंजेल्सने भांडवलशाहीच्या विनाशातूनच स्त्रीस्वातंत्र्य व स्त्रिपुरुष समानतेवरील संबंधाची स्थापना होऊ शकते असे संगितले आहे.

सन १९६३ मध्ये **बेटी फ्रिडम** यांनी 'The feminine Mystque' या ग्रंथात मांडलेल्या विचारांपासून स्त्रीवादी चळवळीच्या दुसऱ्या पर्वास सुरुवात झाली असे मानले जाते.फ्रीडम व **बुवोयर** या द्वयांनी स्त्री चळवळ प्रखर बनवण्यात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. बुवोयर यांनी स्त्रियांना लिंगभेदनुसार नव्हे तर तिच्या बौद्धिक व स्वातंत्र्यानुसार ओळखले जावे.स्त्रीला दुर्बल,निराधार मानून तिच्या स्वातंत्र्याच्या व सुरक्षेच्या नावाखाली पुरुषी वर्चस्व स्थापित केले जाऊ नये तसेच शारीरिक भेद वगळता स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने किंवा समान बनू शकते असे सांगितले.फ्रिडम यांच्या मते 'स्त्री ही घराबाहेर पडून स्वताच्या पायावर उभी राहू इच्छिते त्यामुळे तिला स्त्रीपनापूरते मर्यादित ठेवणे म्हणजे तिला मानवी हक्कांपासून वंचीत करण्यासारखे ठरू शकते.

२० व्या शतकातील दुसऱ्या टप्प्यातील चळवळीने स्त्रीमुक्ति चळवळीचा पाया घातला.सन १९७० मध्ये **काटे मिलट** यांनी 'Sexual Poitics' हा ग्रंथ लिहिला.त्यात त्यांनी पित्तृसत्ताक कुटुंब पद्धती हीच खऱ्या अर्थाने स्त्रियांच्या गुलामगिरीचे व शोषणाचे मूळ कारण आहे कारण या पद्धतीत प्रत्येक बाब पुरुषांद्वारे निश्चित होत असते.स्त्रियांवर हिनपणाची/ न्यूनपनाची भावना बिंबवली जाते.स्त्रीला रूढ भूमिकेच्या साच्यात बंदिस्त केले जाते.**जर्मेन गीर** यांच्या मते,स्त्रीला काम वस्तु मानलेले आहे.यास जर्मेन यांनी विरोध दर्शविला व याविरोधी आंदोलने केली.

**व्हर्जिनीया वूल्फ** यांनी सन १९२९ मध्ये 'A Room of ones Own' या ग्रंथात स्त्री-पुरुष भेद मानवनिर्मित मानलेला आहे.त्यांच्या मते,स्त्रीच्या मनात पुरुषयांच्या क्षमतेबाबत चुकीचा ग्रह निर्माण करून दिला जातो.त्यांच्या मते,स्त्रीला कोणताही अडथळा न येता विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य मिळणे आवश्यक आहे.**सिमौन द बोव्हा** या फ्रेंच स्त्रीवादी लेखिकेने 'Second Sex'या ग्रंथामध्ये पुरुषसत्ताक विचारसरनीवर टीका करून 'स्त्री जन्म घेत नाही तर ती बनविली जाते' असे म्हटले आहे. तिच्या मते,जगात एकाच प्रकारच्या दुय्यम स्थान असलेल्या स्त्रिया निर्माण करण्यामध्ये पुरुषप्रधान व्यवस्था यशस्वी झाली.अमेरिकन स्त्रीवादी लेखिका **केट मिलेट** हिने 'Sexual Politics'या ग्रंथात पितृसत्ताक कुटुंब पद्धतीने समाजातल्या एका घटकाला कायमस्वरूपी सत्ता नाकारली व तिने सत्ता मागितल्यास तिच्या विरोधात हिंसाचार करणारी व्यवस्था आहे असे म्हटले आहे. **जर्मेन गिअर** या औस्ट्रेलियन स्त्रीवादी लेखिकेने स्त्रियांना पुरुषांवर अवलंबून राहण्याची जी सवय लागलेली आहे तीच्यातून बाहेर पडण्याचा सल्ला दिला आहे.

वरील स्त्रीवादी विचारवंतांच्या भुमिकेतून स्त्रीवाद हा स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करणारा विचार असून तो पुरुषी वर्चस्ववादाला विरोध करणारा आहे,असे दिसते.यात स्त्रीस्वातंत्र्य,स्त्री-पुरुष समानता,स्त्रियांना राजकीय अधिकाराची प्राप्ती,लिंगभेद विरहीत समाजव्यवस्था,राजकीय लाभाची प्राप्ती,स्त्री शोषण मुक्ती ई.गोष्टींचा पुरस्कार करण्यात आलेला आहे.UNO ने १९७६ हे वर्ष जागतिक महिला वर्ष म्हणून घोषित केले होते आणि १९७५-१९८४ यादशकाला महिला दशक म्हणून साजरे केले.याचप्रमाणे २० व्या व २१ व्या शतकात स्त्री-पुरुष समानतेला अनुसरून जगातील अनेक देशांनी आपल्या देशात स्त्रीला समान संधी,न्याय,प्रतिष्ठा,दर्जा मिळवून देण्याच्या दृष्टीने राजकीय,सामाजिक,आर्थिक क्षेत्रात अनेक कायदेशीर तरतुदी,कायदे बनविले आहेत.सर्वच क्षेत्रात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने आणण्याच्या प्रयत्नास एकप्रकारे गती प्राप्त होऊन स्त्रीवादी चळवळीला यशाकडे नेणारा हा बदल आहे असे म्हणता येईल.

**संदर्भ:-**

१०स्त्रीवादाची ओळख - प्रा.यशवंत सुमंत
२.राजकीय सिद्धांतातील मूलभूत संकल्पना –प्रा.दिगंबर आ.खेडेकर
३.राजकीय विचारप्रणाली-प्रा.ढोबळे डी.बी.
४.प्रमुख राजकीय विचारप्रणाली-डॉ.दाते /डॉ.ढोबळे
५.उच्चतर आधुनिक राजकीय सिद्धान्त-डॉ.एस.बी.फड
६.समकालीन जागतिक राजकारण-डॉ.शैलेन्द्र देवळानकर
७.राजनीतिक विचार विश्वकोश-ओम प्रकाश गाबा
८.राजनीति विज्ञान विश्वकोश- ओम प्रकाश गाबा

# स्त्रीवाद व आदिवासी महिला

**प्रा.सौ. आशिषा आशिष म्हात्रे (सुप्रज्ञा)**
सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर,
**सौ. अपुर्वा अमित पाटील (स्नेहल)**

वाद म्हणजे विशिष्ट वाङ:मयातील विचार प्रणालीत वादाला संप्रदाय या नावाने देखील ओळखले जाते इंग्रजीतील ISM या शब्दाला मराठीत वाद हा पारिभाषिक शब्द वापरला जातो. ज्याप्रमाणे सामाजिक,राजकीय विचार क्षेत्रात आणि सांस्कृतिक प्रवाहात विशिष्ट तत्वप्रणाली असतात. जसे Communisumसाम्यवाद, Socialismसमाजवाद,Capitilaismभांडवलवाद.

स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराची मांडणी करणारा वाद म्हणजे स्त्रीवाद होय.
स्त्रीवाद ही राजकीय विचारप्रणाली आहे. ही केवळ स्त्री जीवनाचा नव्हे तर संपूर्ण मानवी समाज व्यवस्थेच्या मूळापासून शोध घेणारी ही विचारप्रणाली आहे.

आजपर्यंत स्त्री ज्या जुन्या रुढी, चाली, परंपरांची गुलामगिरी करीत स्वत:ला झिजवत होती त्यातून तिला बाहेर काढून तिच्या विकासाच्या मार्गाचा पुरस्कार करुन तिच्या शोषणाची, तिच्यावरील अन्याय-अत्याचार केल्या जाण्याची कारणे शोधणे हे सर्वसाधारणपणे स्त्री वादाचे स्वरुप सांगता येईल. त्यामुळे ही विचारप्रणाली एकरेषीय एकतर्फी नाही. अनेक विचार प्रवाहांना आपल्यामध्ये समाविष्ट करुन घेणारे हे एक विस्तृत वर्तुळ आहे. एकमेकांशी टोकाने आणि विरोधीपणाने वागण्यापेक्षा मदतीच्या आणि सहकार्याच्या भावनेवर भर देणाऱ्या मवाळ स्त्रीवादापासून तर पारंपारिक पध्दतीने चालत आलेल्या पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेला मूळापासून उध्वस्त स्त्री तिचे हक्क अधिकार देण्याची भाषा करणाऱ्या जहाल स्त्री शक्तीवादापर्यंत अनेक भूमिकांचा या विचार प्रवाहात संघटितपणे विचार विनिमय केला जातो.

विवाहानंतर स्त्री पुरुषाच्या घरात प्रवेश करते, बाळाला जन्म देते म्हणून काय ती पुरुषांची गुलाम होत नाही तर बाळ जन्माला घालणे हे स्त्रीच्या श्रेष्ठत्वाचे प्रतिक आहे. जन्म देण्याचे महान कार्य हे परमेश्वराने स्त्रीला दिलेले आहे. यावरुनच ती किती श्रेष्ठ आहे याची कल्पना येते. अशी भूमिका घेऊन शांततामय स्त्री पुरुष समानतेचा आणि सहजीवनाचा पुरस्कार करणारी आत्मसमपर्णाची मवाळ मांडणी ही स्त्रीवादाची एक बाजू आहे. तर याच्या विरुध्द स्त्रीशक्तीवादी स्त्रीवादांची भूमिका आहे. एका शक्तिशाली व्यक्ती बळकट आणि मजबूत समाजाची निर्मिती करु शकतो अशा टोकाच्या आणि समन्वयाच्या भूमिका घेऊन स्त्रीयांनी आपले सामाजिक स्थान बळकट करण्यासाठी आणि समाजाने एक व्यक्ती म्हणून आपल्याकडे पाहिले पाहिजे असा दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी आर्थिक स्वालंबनाच्या मार्गावर वाटचाल करुन स्त्री जीवनाचा योग्य पर्याय निवडण्याचे धैर्य दाखविले आहे. आपल्या कार्य कर्तृत्वाच्या जोरावर परंपरेने चालत आलेल्या पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेला आव्हान द्यावे आणि सामाजिक शैक्षणिक रोजगार आरोग्य राजकीय इत्यादी सर्व क्षेत्रातल्या हक्कासाठी संघर्ष करावा यातूनच स्त्रीयांच्या वाट्याला आलेल्या तुच्छतेच्या वागणुकीलाआणि कनिष्ठत्वाला दुर सारुन स्त्रीशक्तीचे क्रांतीकारी दर्शन घडविणारी संघर्षशील आणि धैर्यशील भूमिका ही स्त्रीवादाची दुसरी बाजू आहे.

या दोन बाजूमध्ये पर्यावरणवादी स्त्रीवाद कृष्णवर्णीय स्त्रीवाद जहाल स्त्रीवाद, समाजवादी स्त्रीवादी, उदारमतवादी स्त्रीवाद, व्यक्तीवादी स्त्रीवाद, अस्तित्ववादी स्त्रीवाद अशा अनेक विचारसरणीचा समावेश होतो म्हणून स्त्रीवाद ही प्रकाश शाखा किंवा प्रकाश विषयावरील व्यासपीठ नसुन स्त्री-पुरुष या लिंग भावावर आधारित केल्या जाणाऱ्या भेदभावाला लढा देऊन एक मुक्तीचे वर्तुळ तयार झाले.

स्त्रीवाद ही एक आधुनिक विचार प्रणाली आहे असे मान्य केले तर त्याचा अर्थ ही विचारधारा किंवा हे केवळ स्त्री निर्मित स्त्रीसाठी आहे असा होत नाही. तर स्त्रीच्या दृष्टिकोनातून प्रत्येक गोष्टीचे अवलोकन करुन स्त्री देखील एक स्वतंत्र व्यक्ती आहे आणि व्यक्ती म्हणून जगत असताना तिच्या जीवनाचे मुल्यमापन करत स्त्री पुरुष यांच्यातील भेद दाखवून देते.

स्त्रीवादी दृष्टिकोनातून या सर्व गोष्टीकडे पाहिले तर आजचे जग हे केवळ पुरुषकेंद्री आणि पुरुषांसाठी केवळ घडविले गेलेले जग आहे. अशी समाज व्यवस्था तयार झाली आहे. त्या समाज व्यवस्थेत स्त्री ही पुरुषांसाठीकेवळ एक

उपभोगाची वस्तू म्हणून तिचा वापर करुन मनाला वाटेल ते का दूर करायचे अशी पुरुषी मानसिकता आहे. स्वाभाविकच स्त्री ही पुरुषाने वापरुन फेकून देणारे एक साधन झाले आहे.

स्त्रीला कनिष्ठ दर्जा व पुरुषांना श्रेष्ठदर्जा हे नैसर्गिक नसून या सर्व गोष्टी पुरुषांनी निर्माण केल्या आहेत.

१९६० नंतरच्या काळात स्त्रीवाद संकल्पना रुढ होण्यास प्रारंभ झाला. स्त्री-पुरुष समतेचा विचार ३०० वर्षात हळूहळू होत गेल्याचे दिसून येते. स्त्रीपुरुष समतेची ही विचारप्रणाली फ्रेंच राज्यक्रांतीतून पुढे आली. १७८९ या मानवी हक्कांचा जाहीरनामा या विचारांना प्रेरणा देणारा ठरला. १७९० मध्ये ऑलीथ गुंझ या लेखिकेने स्त्रीयांच्या हक्कांचा जाहीरनामा प्रसिध्द केला. स्त्री पुरुष ही लिंगभेदाने वेगवेगळी असली तरी समाज व्यवस्थेत त्यांना एकच समानतेने स्थान दिले गेले पाहिजे अशी मागणी केल्याचे आढळून येते. बरीच वर्ष होऊनही आजतगायत स्त्रीवादी विचार प्रणाली प्रभावी ठरली नाही.

स्त्रीवादी जाणिवेतून स्त्री आणि पुरुष दोघेही बदलतील अशी आशा आहे. नव्या तऱ्हेने लोकशाहीवादी समाजावर आधारित कुंटुब व्यवस्था निर्माण करणे. कुंटुबातही स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा देणे आणि शैक्षणिक क्षेत्रातही स्त्री पुरुष समानता असली पाहिजे अशा विविध बाबी स्त्रीवादी विचारप्रणालीत सामावल्याचे दिसते.

दोन मुद्दे महत्वाचे आहेत.

पहिला मुद्दा स्त्री असणे म्हणजे देवता आणि दासी या दोन्ही अंगानी तिचे शोषण करणे. देवता मानून दया, क्षमा, शांती किंवा सहनशीलता यांचा अंत पाहणे आणि दासी म्हणून तोंड दाबून बुक्याचा मार सहन करणे. दुसरा मुद्दा असा म्हणजे पिडीत, सहनशील, दुबळया स्त्रीचे रुप म्हणजे दास्यत्व किंवा पुरुषाचा मालकी हक्क असलेली वस्तुरुप याकडे अत्यंत वस्तुनिष्ठपणे पाहून स्त्रीवादी अभ्यासकांनी म्हटले आहे की, प्रत्येक स्त्रीने स्वत:च्या घडणीकडेही चिकित्सक पणे पाहिले पाहिजे आणि स्त्री म्हणून जन्माला आली म्हणजे ती स्त्रीवादी झाली असे नाही.

स्त्री पुरुष समानतेची विचारप्रणाली समजून घेण्यासाठी सुरुवातीचा स्वत:चा एक व्यक्ती म्हणून विचार करायला शिकले पाहिजे. स्वत:ला दु:खी आणि अन्याय अत्याचार सहन करणाऱ्या स्त्रीला जागेवर ठेवून तिने दान केलेल्या सर्व वेदांतांची जाणीव करून दिली पाहीजे. तेव्हाच आपल्याला स्त्रीवाद म्हणजे काय ते समजू शकते.

स्त्रीवाद म्हणजे पुरुषांपासून दूर जाणे त्याच्या विरुध्द वागणे नव्हे किंवा स्वत:च्या वेगळी मुभा निर्माण करणे असेही नव्हे तर परंपरेने संस्कृतीच्या हजारो वर्षापासून स्त्रीला एक व्यक्ती म्हणून, एक मानव म्हणून नकार दिला जाऊन किड्या मुग्यांप्रमाणे जगण्यास भाग पाडले. हिनतेची वागणूक दिली त्या विरुध्द उभे राहणे मानवपण नाकारुन तिला जर पशुतुल्य अवस्था प्राप्त करुन दिली आहे. त्यातून बाहेर पडुन आपले स्वत:चे हक्क अधिकार मागून घेण्यासाठी तयार केलेले व्यासपीठ.

स्त्री मोकळा श्वास घेऊन आपले जगणे शब्दांतून मांडू शकेल तोच खरा स्त्रीवाद म्हणता येईल.

स्त्रीजीवनाविषयी लिहीणे. स्त्रीजीवनातील दु:ख कारुण्य शब्दरुप करणे परंपरेने स्त्रीला नियतीच्या हातून पराभूत दाखविणे पुरुषी वर्चस्वाच्या प्रभावातून स्त्रीयाविषयी सहानुभूतीच्या दृष्टीने किंवा स्त्रीउदारकांच्या स्त्रीजीवन शब्दांकित करणे याला स्त्रीवाद म्हणता येत नाही.

ताराबाई शिंदे यांचा स्त्री-पुरुष तुलना हा दीर्घ निषेध आणि संत तुकारामाची शिष्या संत बहिणाबाई हिने आपल्या गाथेतून काही प्रमाणात बंडखोरी केल्याचे दिसते याला स्त्रीवादाचा मुळारंभ म्हणता येईल.

१९७५ नंतर युनोने १९७५ते १९८५ हे आंतरराष्ट्रीय महिला दशक जाहिर केल्यावर या दशकात जागतिक पातळीवर स्त्रीयांच्या सर्वांगीण जीवनाचा अभ्यास केला गेला. कुंटुब, समाज, संस्कृती, शिक्षण, आरोग्य, राजकारण, कार्यकारण या सर्व क्षेत्रात मी खूपच मागे असलेली दिसली आणि मग भारतातही स्त्रीयांचे सर्व क्षेत्रातील दुय्यमत्व तिचे मागासलेपण या सर्व गोष्टी उघड झाल्या.

पुरुषांनी आपल्या स्वार्थासाठी स्त्रीयांवर जी परंपरांची नियमावली लादून दिलेली होती या नियमावलीला बदलण्याचे कार्य करणारा स्त्रीवाद हा आधुनिक आणि स्त्रीदास्य विमोचनाचा विचार करणारे एक व्यापक चक्र आहे.

स्त्रीवाद हा स्त्री प्रश्नांनी भरलेला विचारमंच आहे. स्त्री आणि वाद हे दोन शब्द मिळून स्त्रीवाद हा शब्द तयार झालेला आहे. वाद म्हणजे एका विशिष्ट विचारप्रणाली आणि विचारप्रवाह होय. अमेरिकन स्त्री स्वांतत्र्याची संपुर्ण पार्श्वभूमी पाहिली तर असे दिसून येते की, इतर देशांच्या तुलनेत अलिकडे अमेरिकन मोठी स्वातंत्र्य समता, हक्क, अधिकार याबाबतीत अधिक भाग्यशाली नशीबवान दिसतो. पण तरीही एक मानव म्हणून आपले स्वातंत्र्य हक्क अधिकार मिळविण्यासाठी अमेरिकन स्त्रीयांनी मोठ्या प्रमाणात लढा संघर्ष केल्याचे दिसून येते.

आदिवासी – आर्य व द्रविड हे भारतातील दोन मोठेमानव समाज सोडून त्याच्याही पूर्वी भारतात राहणाऱ्या किंवा बाहेरच्या देशातून येऊन वने व पर्वत यांच्या आश्रयाने स्थायिक झालेल्या जमातीना वन्य जाती किंवा आदिवासी असे म्हणतात.

भारतात प्राचीन काळी प्रोटो आस्ट्रलपर मंगोलाई व नेमिस हे भिन्न लोक राहत होते. सांप्रत आपण ज्यांना आदिवासी म्हणतो त्याची उत्पत्ती वरीलपैकी कोणत्यातरी मानववंशापासून झाली असली पाहिजे हे मत आहे. आदिवासी लोक भारतातील आद्य वसाहतकार होत. आदिवासी हे सुधारलेल्या जगापासून दुर तसेच दुर्गम दऱ्या खोऱ्यात राहतात.

जातिविशिष्ट अशी एकच बोली ते बोलतात. निमिझम् या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मूळ स्त्रीचे ते अनुयायी असून ते भूतखेतांची व पितरांची पूजा करतात. शिकार, कंदमुळे, फळे व शेतात पडलेल्या दाणापिटा यावर ते आपली उपजीविका करतात. मासांहारी असतात, भटकण्याची प्रवृत्ती असते. मद्य व नृत्य याची विशेष आवड असते.

भारतीय घटनेचा अनुच्छेद ३४२ अन्वये आदिवासीचा समावेश अनुसूचित जमातीत एसटी करण्यात आला आहे.

भारतात ४६१ हून आदिवासी जमातीचा उल्लेख अनुसूचित जमातीत केला आहे. महाराष्ट्रात ४७ आदिवासीचा समावेश अनुसूचित जमातीच्या यादीत करण्यात आला आहे.

आदिवासी महिलांना कुंटुबात दुय्यम स्थान दिले जाते. आदिवासी महिलांना कुंटुबात स्थान मिळत असले तरी काम करण्याची पध्दत दणकट शरीरयष्टी, कष्टाळू वृत्ती या कारणामुळे स्थानिक मध, डिंक,हस्तकलानिर्मित वस्तू गावोगाव जाऊन विकून दोन पैसे कमवित आणि पुरुष त्या पैशावर मौज मजा करीत.

शिक्षण, आरोग्य याबाबतीत आदिवासी स्त्रीयांमध्ये कमतरता दिसून येते. स्त्री फक्त मुलांना जन्म देण्यासाठीच आहे असा विचार दृढ झाल्याचे दिसते. आश्रम शाळेमध्ये त्याच्यांवर लैगिंक शोषणचे प्रकार उघडकीस आले. आदिवासी महिलांना विनाकारण रुढी, परंपरा, चालीरिती यांना बळी पडावे लागते. भारतात ४६१ पैकी महाराष्ट्रात ४७ आदिवासी जमाती असुन प्रत्येक आदिवासी जमातीची कौटुंबिक आणि सामाजिक जडण घडण वेगळी आहे. एकाच कुळामध्ये रोटी बेटी व्यवहार केला जात नाही.

आदिवासी जमातीत स्त्रीयांची प्रसूती उकीरड्यावर केली जाते. स्त्रीला वेदना होत असल्यातरी कुणीही तिला स्पर्श करीत नाही. १०-१२ दिवसानंतर तिला स्पर्श केला जातो. तिच्या अंगावरील कपडे व अंथरुण नदीत वाहिले जाते या कारणामुळे तिला आपला जीव देखील गमवावा लागतो.

स्त्रीयांनी देवीचा साज हिरव्या रंगाचा असेल तर, हिरव्या रंगाचे कपडे परिधान करत नसे. स्त्रीयांनी बकऱ्याचे मटण खाऊ नये, कारण नैवैद्य बकरा असतो. कोंबडीची अंडी खाऊ नयेत कारण कोंबड्या हे उपजीविकेचे साधन आहे. अंगावर दागदागिने घालायला बंधन, देवघरात प्रवेश नाही, यावरील घटनांना कुठलाही पुरावा नाही. कुमारी मुलीच्या स्तनाला कुणीही हात लावला तर त्याच व्यक्तीशी तिला लग्न करावे लागत असे. पुरुषांना बहुपत्नीत्व मान्य होते. परंतु महिलांना दुसरा विवाह नसे.

देश प्रगती करीत हरितक्रांती जागतिकीकरण उदारीकरण करु लागला परंतु आदिवासी महिलांच्याउत्पन्न मिळविण्याच्या साधनात वाढ झाली नाही. परंतु २००५ पासून शासन स्तरावर प्रयत्न करण्यात आले. शासकीय योजना राबविण्यात आल्या. बाल-माता संगोपन कार्यक्रम, स्त्री भृणहत्या विरोधी जनजागृती, वैद्यकीय सुविधा, शिक्षण, स्वच्छता, आरोग्य, राहणीमान, पाणी पुरवठा सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत.

आदिवासी महिला सबल होत असतना रुढी, परंपरा, चालीरिती यांच्या बेड्या त्यांच्या पायात अडकलेल्या आहेत यामधून आदिवासी स्त्रीची सुटका नाही.

# स्त्रीवाद: समस्या आव्हाने व उपाय

**दत्ताजी हुल्लप्पा मेहत्रे**

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड ,Mob.No. 9545399480,Mail :dattajimhetre3@gmail.com

**उद्देश :**

1) स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास करणे.

2) स्त्रियांच्या दैनंदिन जीवनातील समस्यांचा शोध घेणे .

3) स्त्रियांच्या समस्यांवर उपाययोजना सुचविणे .

**गृहीतक :**

1)भारतीय स्त्रियांमध्ये स्त्रीत्वाची जागरूकता वाढत असली तरी अद्यापही अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा भारतीय स्त्रियांनी नाकारलेली नाही

2)आर्थिक स्वावलंबनशिवाय स्त्री स्वातंत्र्याची चर्चा व्यर्थ आहे.

**स्त्रीवाद म्हणजे काय :**

सर्वसाधारणपणे स्त्रीवाद म्हणजे स्त्रीकेंद्रित व्यवस्था आणण्यास कार्यरत असलेली चळवळ असे म्हणता येईल किंवा सामाजिक ,राजकीय, आर्थिक क्षेत्रात स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार करणारी विचार प्रणाली होय .थोडक्यात स्त्री पुरुष समानता हे अंतिम ध्येय असे मानणारा विचार म्हणजे स्त्रीवाद होय .पुरूषांपासून फारकत घेऊन स्त्रीने आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणे म्हणजे स्त्रीवाद नव्हे, तर स्वत: च्या सामर्थ्यांचा शोध घेऊन आपल्या विकासासाठी पुरुषांच्या बरोबरीने जीवन जगण्याचे स्त्रीवाद समर्थन करतो . .सामाजिक संकेत आणि मूल्यांच्या नावाखाली स्त्रीचे माणूस म्हणून सामाजिक स्थान व प्रतिष्ठा नाकारली गेली आणि स्त्री शोषणास अनुकूल अशी व्यवस्था जाणीवपूर्वक पुरुषप्रधान व्यवस्थेने निर्माण केले.विषमतामूलक व्यवस्था नष्ट करून स्त्रियांच्या राजकीय हक्कांबरोबरच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि स्वत: च्या शरीरावरील हक्क अबाधित ठेवून बौद्धिक आणि मानसिक विकासातून सामाजिक परिवर्तन घडवणे यासस्त्रीवाद असे म्हणतात येईल .

**स्त्रीवादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

प्राचीन काळापासून स्त्रियांना गौण स्थान दिले जाते .स्त्री जन्मापासून ते तिच्या मृत्यूपर्यंत ती वडील, पती ,भाऊ यांच्या आश्रयानेजगते. तिच्या मताला किंवा अस्तित्वाला दुय्यम दर्जा दिला जातो .या सामाजिक परिवर्तनासाठी स्त्रीवादी चळवळीचा उदय झाला .सर्वप्रथम फ्रेंच नाटककारOlympe de Gouges यांनी *डिक्लरेशन ऑफ द राइट्स ऑफ विमेन ॲन्ड ऑफ फीमेलसिटिझन*-1791,मेरी वोल्स्टनक्राफ्ट ने Vindication of *rights of women -1792* या ग्रंथामध्ये स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार केला . सुरुवातीच्या काळात स्त्री मताधिकार ,कामाचा अधिकार, स्त्री पुरुषांत समानता यांना अडथळा आणणाऱ्या कायद्यांना विरोध करण्यावर स्त्रीवाद मर्यादित होता .1920 नंतरच्या कालखंडात जहाल स्त्रीवादाची मांडणी करण्यात आली. गर्भपात ,विवाह ,मुलांना जन्म देण्याचा अधिकार याबाबतीत स्वातंत्र्य मागण्यात आले. त्याचबरोबर स्त्री श्रेष्ठत्वाचा पुरस्कार करण्यात आला.सिमॉन दि बुवायांनी *द सेकंड सेक्स* मधून स्त्रियांवरील अन्यायाला वाचा फोडली .1990 नंतर बदलत्या विश्व रचनेत स्त्रीवाद विषयक नवीन दृष्टिकोन तयार झाला स्त्री स्वातंत्र्य आणि स्त्रीमुक्ती असण्याचा अर्थ स्थळ काळ सापेक्ष लावण्यात आला. स्त्रियांच्या सामाजिक, राजकीय, नागरी हक्कांबरोबर समलिंगी हक्काची मागणी जोर धरली .थोडक्यात स्त्रीवाद ही कृतिशीलतेची अपेक्षा असणारी विचारप्रणाली असून स्त्रियांच्या हितसंबंधांचा विचाराबरोबरच पुराण धर्मग्रंथातील स्त्रियांच्या दुय्यम स्थानाला आव्हान दिले .स्त्रींची दास्यत्व किंवा देवत्व नाकारून तिला माणूस म्हणून ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न स्त्रीवादाने केला .ज्ञान, साहित्य, भाषा, शिक्षण, धर्म, कला, कायदा, अध्यात्म, नीतिव्यवस्था या घटकांचे स्त्रियांच्या दृष्टिकोनातून पुनर्मूल्यांकन केले .पुरुषप्रधान व्यवस्थेतील पुरुष केंद्रीय विचार प्रक्रियेमुळे समाजाचा वर्तुळाच्या परिघावर राहिलेल्या स्त्रीला केंद्रस्थानी आणण्यासाठी लढादिले .स्त्रीवादी विचार हा सामाजिक परिवर्तनाचा ध्यास घेऊन स्त्रीला मानवतावाद व समतावादचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याची चळवळ आहे .

स्त्रीवादामधील बदलत्या परिस्थितीनुसार काही विचार प्रवाह निर्माण झालेले आहेत त्याची चर्चा पुढील प्रकारे करता येईल

**1)उदारमतवादी स्त्रीवाद:**

माणूस हा विचारशील प्राणी आहे या गृहितकावर उदारमतवादाचे तत्त्वज्ञान आधारित आहे. पुरूषांप्रमाणे स्त्रियांनादेखील व्यक्तिस्वातंत्र्य असले पाहिजे असे मानणारा विचार म्हणजे उदारमतवादी स्त्रीवाद होय.जे एस मिल *सबजेक्शन ऑफ वुमन,* बेटी फ्रीडम यांनी *द फेमिनाइन मिस्टीक* या ग्रंथात उदारमतवादी स्त्रीवाद मांडला. उदारमतवादी स्त्रीवादाच्या पुरुषांना विरोध नाही तरपुरुषी व्यवस्थेला विरोध आहे .उदारमतवादी विचार प्रवाहातून संपत्ती, शिक्षण, व्यवसाय, मताधिकार या क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना अधिकार मिळाला पाहिजे हा विचार पुढे आला .

**2)मार्क्सवादी स्त्रीवाद:**

स्त्रियांना सार्वजनिक जीवनात हक्क प्राप्त झाली तरी स्त्रियांवर होणार्या खाजगी या विषयावरील अन्याय दूर होणार नाहीत. यासाठी व्यापक प्रबोधनाच्या गरजेतून मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी करण्यात आली. मार्क्सवादी स्त्रीवादाच्या मांडणीनुसार स्त्रियांच्या शोषणाची मूळ कारण समाजातील वर्गरचना आहे. स्त्रियांच्या शोषणाला पुरूषाचे वर्तन जबाबदार नसते तर समाजातील सामाजिक, आर्थिक संरचना कारणीभूत असते. आर्थिकदृष्ट्या उपेक्षित वर्गातील स्त्रियांना नागरी स्वातंत्र्य मिळत नाही .आर्थिक शोषणावरील वर्ग रचना नष्ट केल्याशिवाय स्त्रियांची सामाजिक समता प्रस्थापित होऊ शकत नाही .स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन वाढवून श्रमाच्या बाजारपेठेत स्त्रियांचा सहभाग किती वाटतो आणि स्त्रियांचा वर्गसंघर्षात किती प्रमाणात सहभागी होतात यावर स्त्रीमुक्तीचे यश अवलंबून आहे. रोबोट ओवेनयांनी*न्यू मॉडेल ऑर्डर्स* या ग्रंथात विवाहसंस्था नष्ट करण्याचा विचार मांडला. त्याचबरोबर रॉबर्ट ओवेन, विल्यम्स थॉमस, फ्रेड्रिक एंगल्स, या विचारवंतांना स्त्रीवादाची विश्लेषण मार्क्सवादी दृष्टिकोनातून केले .

भांडवलशाही नष्ट करून समाजवादी राजवट निर्माण झालेल्या देशात आणि आर्थिक स्वावलंबी स्त्रियांचे शोषण थांबले आहे असे नाही .

**3)जहाल स्त्रीवादी विचार प्रवाह:**

केट मिलेट, ख्रिस्तीने डेल्फाय,जर्मेनी ग्रीअर ,शुलामीथ फायरस्टोन यांनी जहाल स्त्रीवादाचा पुरस्कार केला .स्त्री शोषण करणार्या पुरुषी प्रवृत्तीविरुद्ध आक्रमक लढा देऊन संपूर्ण समाजव्यवस्था बदलण्याचा आग्रह धरणारे विचारधारा म्हणजे जहाल स्त्रीवाद होय .केंट मिलेट यांनी *सेक्स्युअल पॉलिटिक्स* या ग्रंथात वर्णन केल्याप्रमाणे गर्भधारणा, बाळंतपण, मुलांचे संगोपन या गोष्टी स्त्रियांना बंधनात ठेवणारे आहेत. म्हणून त्या नाकारल्या पाहिजेत. जहाल स्त्रीवादी कुटुंब रचनेला स्त्रियांच्या शोषणाचे प्रतीक मानतात .स्त्री यांनी कुटूंबातील श्रमाचा मोबदला दिला जात नाही. त्यामुळे स्त्रियांना आर्थिक आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळतनाही . थोडक्यात जहाल स्त्रीवाद विवाह, कुटुंब, मातृत्व या सर्व गोष्टींना शोषणाचा साधन व्यवस्था मानतो .

**भारतीय स्त्रीवाद:**

प्राचीन काळापासून धर्म, रूढी आणि परंपरा यांच्या नावाखाली स्त्रीला भारतीय समाजात दुय्यम स्थान दिले गेले. इंग्रजी शिक्षणामुळे भारतात प्रबोधन युगाची सुरुवात झाली. राजा राममोहन राय, दयानंद सरस्वती ,ईश्वरचंद्र विद्यासागर, लोकहितवादी, महात्मा फुले ,सावित्रीबाई फुले, न्यायमूर्ती रानडे ,गोपाळ गणेश आगरकर इत्यादी समाजसुधारकाने स्त्री शिक्षण ,स्त्री- पुरुष समानता स्त्रियांचे हक्क या प्रश्नावर जाणीवजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला .सतीची प्रथा विधवा विवाह बंदी, केशवपन यासारख्या स्त्री शोषण करणार्या परंपरांच्याविरोधात स्त्री चळवळ सुरू झाली. परिणामी 1829 सती बंदचा कायदा, 1856 विधवा पुनर्विवाहाचा कायदा, 1860 संमती विवाहाचा कायदा यासारख्या कायदे मंजूर करण्यात आले .विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्री सबलीकरणासाठी भारतात वेगवेगळे कायदे करण्यात आले. राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर महिला आयोगाची स्थापना, महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षण तसेच पोलीस, लष्कर ,रेल्वे, वाहतूक, दळणवळण इत्यादी पुरूषांची मक्तेदारी असणाऱ्या क्षेत्रांमध्ये संधी देण्यात आली .

**स्त्रीवादासमोरील समस्या:**

जागतिक स्तरावर स्त्रीवादी चळवळीची चर्चा होते मात्र व्यावहारिक उपाययोजना केल्या जात नाहीत. कारण स्त्रीवादामधील अनेक समस्या आहेत त्या पुढीलप्रमाणे

1) जगाच्या एकूण लोकसंख्येच्या पन्नास टक्के असणारे स्त्रियांना स्वत: चे मजबूत संघटन निर्माण करता आले नाही.
2)स्त्रीवादी चळवळीमध्ये अनेक विचारप्रवाहाचा उदय झाल्यामुळे वैचारिक एकवाक्यता दिसून येत नाही .

3)स्त्रीवादी विचारांची सैद्धांतिक मांडणी ही अपूर्ण स्वरुपाची आहे एखाद्या विकसित विचारप्रणालीप्रमाणे स्त्रीवादाला सैद्धांतिक स्वरूप देता आले नाही

4) स्त्रीवादी चळवळश्रीमंत आणि मध्यमवर्गीय स्त्रियांपर्यंतच मर्यादित राहिली आहे गरीब कष्टकरी महिलांना या चळवळीत सहभागी करून घेण्यात अपयश आले आहे .

5) समाजातील अनिष्ट रूढी , प्रथा, परंपरा आणि धर्मांधता स्त्रियांची कमी झालेली नाही.

6)बहुतांश स्त्रियांचे आर्थिक स्वावलंबन नसल्यामुळे पुरुषी वर्चस्व झुगारून देण्यास महिला तयार नाहीत .

7) अनेक स्त्रिया या स्त्रियांच्या विकासाच्या मार्गात अडथळा निर्माण करत आहेत प्रत्येक स्त्री स्त्रीचं स्त्रीत्व जपण्यासाठी प्रयत्न केला जात नाही .

8) स्त्रियांचा राजकीय सहभाग अल्प असल्यामुळे राष्ट्रीय धोरण निर्माण प्रक्रियेत स्त्रियांना गौण स्थान प्राप्त होते

9)स्त्रियांमध्ये अन्यायाला विरोध करण्याचे प्रमाण खूप कमी आहे.

**उपाययोजना:**

1) जात धर्म देश यापलीकडे जाऊन स्त्रियांचे स्वतंत्र्य संघटन निर्माण झाली पाहिजे .

2) स्त्रीवादी चळवळीत वैचारिक मतभेद असले तरी स्त्रीवादाची म्हणून एक सैद्धान्तिक चौकट निर्माण झाली पाहिजे

3)स्त्रीवादी चळवळीमध्ये गरीब, कष्टकरी, दलित, कामगार, मजूर अशा सर्व स्त्रियांना सहभागी करून घेतले पाहिजे.

4) स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढून वैज्ञानिक दृष्टी जोपासली गेली पाहिजे.

5) स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढल्यास राष्ट्रीय धोरण निर्माण प्रक्रियेत स्त्रियांना स्थान मिळेल .

**निष्कर्ष :**

1)स्त्रीवादी विचारांची सैद्धांतिक मांडणी ही अपूर्ण स्वरुपाची आहे. एखाद्या विकसित विचार प्रणालीप्रमाणे स्त्रीवादाला सैद्धांतिक स्वरूप प्राप्त करून देता आले नाही. म्हणून स्त्रीवादाचे जागतिक संघटन निर्माण झाले नाही.

2)स्त्रीवादही पुरुषांना विरोध करणारी चळवळ नसून पुरुषांच्या सहकार्याने स्त्रियांना संपत्तीतील, कुटुंबात, सामाजिक,आर्थिक, सांस्कृतिक, प्रशासकीय प्रक्रियेत समानता असावी यासाठी प्रयत्न करणाऱ्या विचार प्रवाह आहे.

3)जागतिक संघटन निर्माण करून स्त्रियांमध्ये जनजागृती निर्माण केल्यास स्त्रीवादी चळवळीला यश प्राप्त होऊ शकते

4) स्त्रियांचा राजकीय सहभाग वाढल्यास राष्ट्रीय धोरण निर्माण प्रक्रियेत स्त्रियांना स्थान मिळेल परिणामी स्त्रियांची आर्थिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीत सुधारणा होऊ शकते .

**संदर्भग्रंथ:**

1) शोभा नाईक,2007, भारतीय संदर्भातून स्त्रीवाद, लोकवाङ्मय प्रकाशन, मुंबई
2) जी. एल. शर्मा,2015, सामाजिक मुद्दे, राऊत पब्लिकेशन, जयपूर
3) रचना माने,2013, स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरूप, अक्षर दालन, कोल्हापूर
4) विद्या भागवत,1997, महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने, समाजशास्त्र विभाग,पुणे विद्यापीठ पुणे

लेखक

ISSN : 2278-9308
March, 2022

# स्त्रीवादाचा उदय व विकास: समाजशास्त्रीय अध्ययन

## डॉ. श्रीनिवास पिलगुलवार

समाजशास्त्र विभाग प्रमुख लोकमान्य महाविद्यालय ,वरोरा जि. चंद्रपूर, 442907

**प्रस्तावना :**

स्त्रीवाद एक समाजशास्त्रीय संकल्पना आहे. मानवी जीवनातील प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या अधिकारांच्या समर्थनात निर्माण झालेली एक सामाजिक चळवळ म्हणून स्त्रीवादाकडे पाहिले जाते. स्त्रीवाद हा एक असा विचार आहे, जो पुरुष आणि स्त्री या दोघांमध्ये समानतेचा स्वीकार करून स्त्रियांच्या बौद्धिक आणि व्यावहारिक सशक्तिकरणावर भर देतो. स्त्रीवाद लैंगिकतेवर आधारित भेद- भावाचा अस्वीकार करतो. हा भेदभाव स्त्रियांच्या समाजातील दुय्यम स्थितीचे प्रमुख कारण आहे. स्त्रीवादी विचारधारेची उत्पत्ती ही मुळात पितृसत्ताक समाजव्यवस्थेच्या अर्थात पुरुषप्रधान समाज व्यवस्थेला शह देण्याच्या रूपात स्त्रीवादाचा जन्म झाला आहे. स्त्रीवादाची व्याख्या मुख्यतः दोन अर्थानी केली जाते. पहिले संकुचित अर्थाने, त्यामध्ये स्त्रीवादी आंदोलन किंवा चळवळ हे स्त्रियांद्वारे स्त्रियांना समान हक्क आणि अधिकार प्राप्त करून देणारी चळवळ आहे. जो लिंगवादी सिद्धांत, पुरुषांचे प्रभुत्व किंवा वर्चस्व आणि शोषणापासून स्त्री ची मुक्ती यावर अधिक भर देते. दुसऱ्या अर्थाने स्त्रीवाद हा अंतर संबंधित संकल्पनांचा एक संच आहे याचा प्रयोग लिंग भेदावर आधारित सामाजिक यथार्थता, लिंगावर आधारित असमानतेची उत्पत्ती आणि प्रभाव, परिणामांचे अध्ययन व विश्लेषण करणे यावर अधिक भर देते. स्त्रीवादी चळवळीच्या इतिहासाची मुळे ही फ्रान्सच्या क्रांतीच्या आदर्श विचारांमध्ये दडलेली आपणास पाहावयास मिळतात. फ्रान्सच्या राज्यक्रांतीने स्त्रीवादि वातावरण निर्माण केले. या वातावरणाचा परिणाम म्हणून महिला क्रांती मध्ये सहभागी होण्यास प्रेरित झाल्या. तिकडे ब्रिटन मध्ये इसवी सन 1972 मध्ये प्रकाशित झालेले मेरी वॉलस्टोन क्राफ्ट यांचे पुस्तक 'A vindication of the rights of women' या पुस्तकामध्ये ब्रिटनच्या महिलांमध्ये स्त्रीवादाची जाणीव आणि जागृती निर्माण करणारे विचार मेरी वॉलस्टोन क्राफ्ट यांनी मांडले. या पुस्तकामध्ये महिलांचे शिक्षण, राजकारण, समान संधी आणि महिलांचे अधिकार याचे जोरदार समर्थन करण्यात आले आहे. (जादौंन,2017,पृ. क्र.144).

मानव पृथ्वीवरील सर्व प्राण्यांमध्ये बुद्धिमान प्राणी आहे. मानवाने आपल्या बुद्धिमत्तेने स्वबळावर स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले काही प्रमाणात स्वतःचा विकास घडवून आणला यात स्त्री आणि पुरुष या दोघांचेही समान योगदान आणि भूमिका आहे. मात्र मानवी संस्कृतीच्या वाटचालीत कुटुंबव्यवस्थेच्या उदयानंतर चूल आणि मूल हेच कार्यक्षेत्र महिलांचे राहिले आहे. घराबाहेर जाऊन अर्थार्जन करणे हे पुरुषाचे कार्यक्षेत्र राहिले आहे. ही व्यवस्थाच स्त्रीचे दुय्यमत्व सिद्ध करणारी ठरली आहे. पितृसत्ताक समाज व्यवस्था धर्म, जाती व्यवस्थेचा भारतीय स्त्रियांच्या दुय्यमत्वात भर टाकणारे कळीचे मुद्दे ठरले आहेत. या सर्वांचा परिणाम म्हणून स्त्रीचे जीवन गुलामा प्रमाणे झाले. जगभरामध्ये ही परिस्थिती कमी-अधिक प्रमाणात सारखीच होती. मात्र आधुनिक युगाची सुरुवात ही स्त्री स्वातंत्र्याची चाहूल होती. यामागचे मुख्य कारण म्हणजे विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेले बदल, वाढते औद्योगिकरण आणि नागरीकरण, यामुळे जगभरात विविध क्षेत्रात परिवर्तन येण्यास सुरुवात झाली. जगात झालेले दोन महायुद्धे व त्यानंतरच्या काळात जागतिक परिस्थिती झपाट्याने बदलत गेली. या सर्व घटनाक्रमाच्या पार्श्वभूमीवर स्त्री जीवनात ही स्थित्यंतरे घडत होती. स्त्रियांमध्ये जागरूकता वाढत होती, आपल्यालाही सामाजिक,

आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात पुरुषांबरोबरचे हक्क आणि अधिकार मिळावेत यासाठी स्त्रियासुद्धा संघर्ष करायला सुरुवात करु लागल्या होत्या. या सर्वांचा परिणाम म्हणून स्त्रीवादाच्या उदयाची पार्श्वभूमी तयार झाली.

मूलतः स्त्रीवादाची औपचारिकरीत्या प्रथम सुरुवात अमेरिकेमध्ये 1960 नंतर झाली. 1975 हे वर्ष युनोने **'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष'** म्हणून घोषित केले. त्यानंतर समग्र जगभर स्त्रीवादी चळवळीचा उदय आणि विकास झाला. अशा स्त्रीवादी चळवळीच्या माध्यमातून संपूर्ण जगभर स्त्रीवादी विचारांची मुहूर्तमेढ रोवल्या जाऊ लागली. यामुळे स्त्रीवादी विचारधारेला एक नवीन दिशा प्राप्त होऊ लागली. जगातील सर्वात समाजव्यवस्थेमध्ये लिंगभेदाच्या आधारावर महिलांना सर्वत्र कनिष्ठ स्थान प्राप्त झाले होते. स्त्रीच्या दुय्यमत्वाबाबत जगातील सर्व स्त्रीवादी विचारमंथन करू लागले. वास्तविक दृष्ट्या सृष्टीच्या प्रारंभीच्या अवस्थेत सर्वत्र मातृसत्ताक कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. म्हणजे सर्व अधिकार स्त्रियांना प्राप्त झालेले होते. परंतु कालांतराने पुरुषांनी आपल्या चालाख बुद्धीने स्त्रियांवर अधिराज्य गाजवायला सुरुवात केली. कालांतराने स्त्रियांवर प्रभुत्व स्थापन करून तिचे शोषण करायला सुरुवात केली. याचा परिणाम म्हणून कालांतराने स्त्री दुय्यम बनली. यासंदर्भात समाजशास्त्रज्ञ **फॅन्ड्रीक एंजेल्स** यांचे मत अतिशय महत्त्वपूर्ण आहे. "मातृसत्ताक व्यवस्थेत बदल होऊन पितृसत्ताक व्यवस्थेचा झालेला उदय हा स्त्रियांचा सर्वात मोठा पराभव आहे. वास्तविक दृष्ट्या सत्य तर हे आहे की, स्त्रियांसाठी असे स्वर्ण युग हे केवळ एक मिथक आहे." पुरुषाने स्वतःच्या सुविधेनुसार स्त्रियांना विभिन्न स्वरूपामध्ये प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यांनी स्त्रियांना आपल्या सोबत समानतेची वागणूक कधीच दिली नाही. पाश्चात्य देश असो, भारतीय समाजव्यवस्था असो स्त्री ही उपेक्षा, बंधने, शोषण आणि पुरुषी वर्चस्वाची शिकार झाली आहे. अनेक धर्म ग्रंथांमध्ये सुद्धा महिलांच्या संदर्भात उपेक्षित विचार दिसून येतात. जसे मनूच्या मते 'स्त्री ही एक निकृष्ट वस्तू आहे, तिला बंधनांमध्ये ठेवले पाहिजे.' 'रोमन कायद्यांमध्ये सुद्धा स्त्रियांना पुरुषांच्या नियंत्रणाखालीच ठेवले पाहिजे, कारण स्त्रिया मूर्ख असतात, असे म्हटल्या गेले आहे.' तसेच कुराण मध्ये सुद्धा स्त्रियांप्रती उपेक्षेची भावना दिसून येते. (खेतान,पृ.क्र.52).

स्त्रीवादाविषयी समाजात चुकीचा दृष्टिकोन निर्माण झालेला दिसतो, तो म्हणजे स्त्रीवादी आंदोलने हे पुरुषी वर्चस्वाला विरोध करणारे आंदोलने आहेत. वास्तविकदृष्ट्या ते तसे नसून सहयोगाची व सहजीवनाची मागणी करणारे ते आंदोलने आहेत. स्त्रीवाद हा पुरुष विरोधी नसून जैविक, सामाजिक, मानसिक, आर्थिक आणि राजकीय स्तरांवर स्त्रियांना जे कनिष्ठ स्थान दिले गेले आहे. ते नष्ट करून पुरुषांच्या बरोबर समानतेचे अस्तित्व तिला प्राप्त व्हावे. तिला स्वतंत्र व्यक्तीत्व प्राप्त होऊन तिची स्वतंत्र ओळख निर्माण व्हावी. हा हेतू त्यामागे आहे .

**स्त्रीवादाचा अर्थ:**

स्त्रीवाद ही अलीकडच्या काळात मांडली गेलेली एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. स्त्रीवादी अनेक प्रवाह व उपप्रवाह असलेली विचारधारा आहे. स्त्रीवादाचा शास्त्रीय अर्थ पुढील काही व्याख्यां मधून स्पष्ट होतो.

**(1) विल्सन:**

स्त्रीवाद म्हणजे एकच एक सलग सिद्धांत नसून अनेक सिद्धांताचा त्यामध्ये समावेश होतो. ही केवळ स्त्रियांचे दुय्यमत्व नष्ट करण्यासाठी आलेली जागृती नसून, स्त्रियांना त्यांच्या खऱ्याखुऱ्या क्षेत्रापर्यंत जाण्याचा मार्ग सुकर करणारी राजकीय बांधिलकी आहे.

**(2) ब्राऊन वेब्ले:**

स्त्रीवाद म्हणजे स्त्री-पुरुष संबंधातील विषमता पूर्वक व्यवहार, व्यवस्था नष्ट करून लिंगभेद निरपेक्ष समाज निर्माण करू पाहणारी एक विचार प्रणाली आहे.

**(3) लिंडा गार्डन:**

स्त्रियांचे दुय्यमत्व आणि त्यासाठी करावा लागणारा संघर्ष याचे विश्लेषण म्हणजे स्त्रीवाद होय स्त्रीवाद हा स्त्री शोषणाच्या विरोधी विचार आहे. स्त्रीवाद ही चळवळ स्त्रियांना त्यांचे मानवी हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असलेली एक नव्याने निर्माण झालेली व्यवस्था आहे. जी सामाजिक पातळीवरील असलेली व्यवहारिक लिंगभेद याची व्यवस्था नष्ट करण्यासाठी प्रयत्नशील आहे. ज्या चळवळीला आज जागतिक पातळीवर स्थान मिळाले आहे आणि आंतरराष्ट्रीय चळवळ म्हणून तिची ओळख निर्माण झाली आहे.

**पूर्व साहित्याचे अध्ययन :**

**(1) निवेदिता मेनन आणि इतर (2001):**

निवेदिता मेनन, साधना आर्य आणि जिनी लोकनीता यांनी "**नारिवादी राजनीतिः संघर्ष एवम मुद्दे**" हे पुस्तक लिहिले, या पुस्तकामध्ये स्त्रीवादाचा उदय, विकास, स्त्रीवादाचे प्रकार, पाश्चिमात्य देशात स्त्रीवादाचा उदय, समकालीन भारतातील महिलांची आंदोलने, भारतातील महिलांचे आरक्षण, भारतातील स्त्रिया आणि हिंसा इत्यादी. अशा अनेक विषयांवर महत्त्वपूर्ण लेख वेगवेगळ्या स्त्रीवादी लेखकांकडून संकलित करून पुस्तक प्रकाशित केले आहे. या पुस्तकामध्ये अतिशय विस्तृतपणे स्त्रीवादाचे उदयाची पार्श्वभूमी, स्त्रीवादाचे स्वरूप, स्त्रीवादाच्या उदयाची कारणे यावर चर्चा करण्यात आली आहे. (निवेदिता मेनन और अन्य,2001)

**(2) गोखले करुणा(2010) :**

सिमोंन द बोहुवा यांनी 1949 मध्ये " The Second Sex" नावाचा ग्रंथ लिहिला या ग्रंथास स्त्रीवादाचे बायबल असेसुद्धा म्हटले जाते, या ग्रंथाचा मराठीमध्ये अनुवाद श्रीमती करुणा गोखले यांनी केला आहे. बोहुवा यांच्या मते," **स्त्री जन्मत नाही, तर घडविली जाते** " या वाक्यावरूनच बोहुवा यांचे विचार किती क्रांतिकारी होते याचा अंदाज येतो. स्त्रीच्या दुय्यमत्वाची इतक्या विविध अंगांनी चर्चा सिमोन च्या अगोदर व तिच्या नंतरही कुणीच केली नाही. सिमोन यांनी या पुस्तकात स्त्रियांच्या संदर्भातील वास्तव आणि मिथके, स्त्री-पुरुषांशी संबंधित जीवशास्त्रीय सत्य, स्त्री आणि पुरुषांचा इतिहास, आजचे स्त्री जीवन, स्त्रियांचा विविध भूमिकांमधील वावर, आत्ममग्न स्त्री, प्रेमात पडलेली स्त्री, स्त्रीत्वाचे गुढ, इत्यादी घटकांच्या संदर्भात विस्तृत आणि अतिशय शास्त्रीय दृष्ट्या चर्चा करण्याचे काम सिमोन यांनी आपल्या पुस्तकात केले आहे. जगातील स्त्रीवादाच्या उदयास कारणीभूत असणाऱ्या साहित्यापैकी अतिशय महत्त्वपूर्ण साहित्य म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते. जगभर जो स्त्रीवादाचा उदय आणि विकास झाला त्यात या ग्रंथाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्णआहे. (गोखले,2010 )

**(3) शुभ्रा परमार (2016):**

शुभ्रा परमार यांनी "नारीवाद सिद्धांत और व्यवहार" हे पुस्तक लिहिले . या ग्रंथात त्यांनी स्त्रीवादी सिद्धांत, वेग-वेगळ्या स्त्रीवादी विचारवंतांनी स्त्रीवादाच्या अनेक प्रकारांवर आपली मांडलेली मते, वेगवेगळ्या देशातील स्त्रीवादाचा उदय आणि विकास तसेच समकालीन समाजात स्त्रीवादाचे स्वरूप कसे आहे याची चर्चा केली. अनेक राष्ट्रांमध्ये स्त्रीवादी चळवळ कशी नावारूपास आली व त्या चळवळीची व्याप्ती कशी वाढत गेली याचीही चर्चा परमार यांनी आपल्या या पुस्तकात केली आहे. स्त्रीवादी अभ्यासकांसाठी आणि स्त्रीवादाचा उदय, विकास व सिद्धांत अभ्यासणाऱ्या अभ्यासकांसाठी हा ग्रंथ अतिशय उपयुक्त आणि मार्गदर्शक आहे. ( परमार,2016)

**(4) सिंह, व्ही.& जन्मेजय, सिंह(2012) :**

व्ही. एम. सिंह आणि जन्मेजय सिंह यांनी "नारीवाद" नावाचा ग्रंथ हिंदी मध्ये लिहीला आहे. या ग्रंथामध्ये स्त्रीवादी विचाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी, वेगवेगळ्या देशांमध्ये सुरू झालेली स्त्रीवादी आंदोलने, त्या स्त्रीवादी आंदोलनाचे स्वरूप, स्त्रीवादी आंदोलने आणि महिलांचे नेतृत्व, वेगवेगळ्या देशांमध्ये स्त्रीवादाची झालेली सुरुवात,

अनेक राष्ट्रांमध्ये स्त्रियांची असणारी स्थिती म्हणजेच दर्जा आणि भूमिका इत्यादींच्या संदर्भात विस्तृत विवेचन या दोन्ही लेखकांनी केले आहे. पुढे या ग्रंथात लेखकांनी स्त्रीवादाच्या सर्व प्रकारांवर विशेष चर्चा केली आहे. स्त्रीवादाच्या प्रकारांमध्ये उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद, क्रांतिकारी स्त्रीवाद किंवा जहाल स्त्रीवाद, पर्यावरणवादी स्त्रीवाद इत्यादी सर्व प्रकारांवर विस्तृत विवेचन केले आहे. स्त्रीवादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट केल्यामुळे स्त्रीवादाचा उदय कसा झाला याची माहिती या ग्रंथातून मिळाली आहे.(**सिंह, व्ही.& जन्मेजय, सिंह,2012**)

**अध्ययनाचे उद्देश:**

(1) स्त्रीवादाचे स्वरूप जाणून घेणे.

(2) स्त्रीवादाच्या उदय व विकासाची कारणे जाणून घेणे.

**अध्ययन पद्धती:**

कोणतेही संशोधन हे वैज्ञानिक पद्धतीच्या आधारावरच करावे लागते . वैज्ञानिक पद्धतीमध्ये स्थित ज्या काही संशोधनाच्या अध्ययन पद्धती असतील त्यातल्या काही तंत्राचा किंवा घटकांचा अवलंब करून संशोधन कार्य पार पाडावे लागते. वैज्ञानिक पद्धतीच्या अभावामुळे केले गेलेले संशोधन हे संशोधन नसते. तर ते केवळ माहितीचे एकत्रीकरण असते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यासाठी अध्ययन विषयाशी निगडित ग्रंथ, प्रकाशित लेख, स्त्रीवादी लेखकांचे साहित्य इत्यादींचा उपयोग स्त्रीवादाचा उदय व विकास कसा होत गेला हे स्पष्ट करण्यासाठी करण्यात आला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण :**

स्त्रीवादाची चर्चा करताना सर्वात प्रथम स्त्रीवादी विचारांचे स्वरूप, मूलतत्वे कोणती होती? स्त्रीवादी विचारांच्या निर्मितीचा मूळ आधारभूत विचार कोणता होता. याची चर्चा तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन यामध्ये करणे क्रमप्राप्त ठरते ते पुढीलप्रमाणे,

**स्त्रीवादाची मूलतत्वे किंवा स्वरूप:**

**(1)स्त्रीमुक्ती**: स्त्रीवादी विचारसरणीने वर्तमान परिस्थितीतील स्त्रियांना पुरुषांच्या जाच आणि बंधनातून मुक्त करण्यासाठी स्त्रीवादी चळवळ उभी केली आहे. स्त्रियांना पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या पारंपारिक बंधनातून बाहेर काढण्यासाठी जोर धरला आहे. स्त्री ही अनेक पारंपरिक चालीरीती मध्ये अडकलेली आहे, स्त्रीला मुक्त करणे हे उद्दिष्टे स्त्रीवादाने ठेवलेले आहे. पुरुष प्रधान संस्कृतीत स्त्रियांचा विचार केला जात नाही. स्त्रियांनी फक्त चार भिंतीच्या आत आपले विश्व मानावे असे पूर्वीच्या काळी समजले जात होते. अबला हा तिचा जणू अलंकारच बनलेला होता. पण आधुनिक काळात स्त्रीला स्त्रीवादाच्या उदयामुळे अधिक स्वातंत्र्य दिले जात आहे. स्त्री ची सामाजिक आणि मानसिक दास्यातून सोडवणूक करणे आणि तिच्यावरील असलेल्या बंधनांना झुगारून तिला त्यापासून मुक्त करणे हे स्त्रीवादाचे पहिले महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

**(2)समानता:** स्त्रीवादी विचाराची निर्मितीच मुळात स्त्री-पुरुषांना समान अधिकार मिळावेत या विचारावर झाली आहे. सर्वच क्षेत्रात, समाजात स्त्री आणि पुरुषांना समान वाटा असावा असा विचार स्त्रीवादी मांडतात. स्त्रीवादी विचारवंतांचे असे म्हणणे आहे की, जर स्त्रियांना पुरुषांच्या बरोबर समान हक्क आणि अधिकार मिळाले तर देशाचे भवितव्य किंवा राष्ट्राचा विकास हा अतिशय जलद गतीने करता येऊ शकतो. यासंदर्भात प्रसिद्ध विचारवंत **प्लेटो** हे आपले मत स्त्रियांच्या साम्यवादा विषयीचे विचार मांडताना म्हणतात, " प्रत्येक राष्ट्रात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार दिले गेले पाहिजेत कारण स्त्रियांची एकूण लोकसंख्या ही कोणत्याही देशात 50% च्या जवळपास असते. जर ही लोकसंख्या आपण चार भिंतीच्या आतच ठेवली तर एवढी मोठी श्रमशक्ती राष्ट्राच्या विकासातील योगदाना पासून वंचित राहते, असे करणे राष्ट्रीय विकासाच्या दृष्टीने योग्य नाही." प्लेटोच्या या विचारावरून

ISSN : 2278-9308
March, 2022

आपणास असे लक्षात येते की, स्त्रीला जर पुरुषांच्या बरोबरीने समान दर्जा दिला नाही तर देशाची अर्धी शक्ती खुंटते. सर्व स्त्रीवादी विचारवंतांनी स्त्रियांना समानतेचा आग्रह धरला. स्त्रियांना सामाजिक, आर्थिक हक्काबरोबरच राजकीय हक्कांचा आग्रह धरला. स्त्रियांना मानवाधिकारासह इतर राजकीय अधिकार मिळाले पाहिजेत. यासाठी जगामध्ये अनेक लढे उभारण्यात आले. त्याचा परिणाम म्हणून जगामध्ये स्त्रियांना राजकीय हक्क मिळाले. अर्थात प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्रियांना समानतेचा अधिकार प्राप्त करून देणे हे स्त्रीवादाचे प्रभावी तत्व आहे.

**(3) पुरुषी वर्चस्वाला विरोध:** जगातील सर्व देशातील समाजव्यवस्थेत स्त्रियांना मोठ्या प्रमाणात पुरुषांकडून त्यांचे शोषण व त्रास होत असे, त्याचा विरोध करण्याचा प्रयत्न स्त्रीवादयानी केला आहे. पुरुषी समाजव्यवस्थेत स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी स्त्रियांनी संघटितपणे एक चळवळ उभारली ती म्हणजे स्त्रीवाद, स्त्रियांवर पुरुषांचे वर्चस्व हे त्यांच्या अहंभावनेतून निर्माण झालेले वर्चस्व आहे. यातून मार्ग काढण्यासाठी स्त्रीवादयानी, स्त्रीवादी विचार प्रणालीच्या क्रांतिकारी लोकांनी हे अग्रेसर पाऊल उचलले.

**(4) सामाजिक दर्जा:** पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनासुद्धा समाजात सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हे स्त्रीवादाचे प्रभावी मूळ तत्व आहे. समाजात स्त्रीला केवळ उपभोग्य वस्तू म्हणून तिच्याकडे पाहिले जाते, तिचे कार्यक्षेत्र **"चूल आणि मूल'** एवढेच मर्यादित ठेवले जाते हा दृष्टिकोन बदलला पाहिजे असा स्त्रीवादयाचा आग्रह आहे. त्यात स्त्रियांचा वाटा मोठा आहे, असे असले तरी समाजात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. म्हणून स्त्री ही सुरक्षित नाही, स्त्रियांना समाजात समानतेची वागणूक देऊन तिला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणे आणि पुरुषांच्या बरोबरीने तिचा सामाजिक दर्जा स्थापित करणे हे स्त्रीवादाचे मूलभूत तत्व आहे.

**(5) कौटुंबिक स्वातंत्र्य व हक्क:** स्त्रियांवर केवळ कौटुंबिक बंधने लादली जातात असे नाही तर या बंधनाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या अडचणींचा सामना स्त्रियांना करावा लागतो. अशीच एक महत्वाची अडचण म्हणजे स्त्रियांना कुटुंबामध्ये शैक्षणिक हक्क नाकारण्यात आलेले आहेत. स्त्रियांनी शिक्षण शिकू नये, जर ती शिकली तर अक्षरांच्या आळया होतील असा समज स्त्रियांच्या शिक्षणाबद्दल समाजामध्ये रूढ होता. तसेच स्त्रियांना कुटुंबामध्ये सर्व प्रकारचे हक्क आणि स्वातंत्र्य नाकारण्यात आले होते. वारसा हक्क, निर्णय निर्धारण प्रक्रियेतील स्त्रीचा सहभाग, कुटुंबात मुलगा आणि मुलगी यांच्यामध्ये भेद केला जातो. मुलगी जन्माला आली की तिला जीवे मारण्यात येत असे याची अनेक उदाहरणे आपणास राजस्थान मध्ये पहावयास मिळतात. मुलीचा जन्म हा पूर्वजन्मीचे पाप समजले जात असे. असा स्त्रियांबद्दलचा नकारात्मक दृष्टिकोन आणि स्त्रियांच्या हक्काच्या असणाऱ्या बाबी पासून स्त्रियांना दूर ठेवण्यात आले होते. ही पुरुषप्रधान समाजातील स्त्रियांबद्दल ची धारणा बदलण्यासाठी आणि तिला तिचे कौटुंबिक स्वातंत्र्य आणि हक्क प्राप्त करून देण्यासाठी स्त्रीवादाचा उदय झाला आहे.

**स्त्रीवादाच्या उदयाची कारणे:**

स्त्रीवाद ही एकाकी विकसित झालेली विचारसरणी नसून, तिच्या उदयाचे अनेक कारणे कारणीभूत आहेत. याचा आढावा आपल्याला स्त्रीवादी चळवळीचा अभ्यास करताना घ्यावा लागतो. पारंपारिक समाजव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान आहे, ते स्थान दुय्यम स्वरूपाचे आहे किंवा होते. त्यामधून स्त्रियांना मुक्ती मिळवून देणे तसेच स्त्रियांकडे मानवी दृष्टिकोनातून पाहण्यासाठी, त्यांना सामाजिक पातळीवर हक्क मिळवून देणे इतकेच नव्हे तर स्त्रियांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार करून स्त्रीवादी चळवळीचा प्रारंभ करण्यात आला . अशा विचारप्रणालीच्या उद्यासाठी काही कारणे कारणीभूत आहेत त्याचा आढावा पुढील प्रमाणे.

(1) अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांती (1776 व 1789): स्त्रीवादाच्या उद्याचा इतिहासाला अमेरिकन राज्यक्रांती पासून सुरुवात झाली. अमेरिकेचे अध्यक्ष जेफर्सन यांनी अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला त्यात व्यक्तिस्वातंत्र्याची सर्वांगीण चर्चा केली. या जाहीरनाम्यात स्त्री पुरुष समानता याला प्राधान्य देण्यात

आले. हीच खऱ्या अर्थाने स्त्रीवादाच्या उदयाची नांदी होती. त्यानंतर 1789 मध्ये फ्रान्सची राज्यक्रांती झाली या राज्यक्रांती नंतर फ्रान्समधील लोकांनी मानवी हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध करून समग्र मानवी विश्वाला स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या वैश्विक मूलभूत हक्कांची देणगी दिली. परिणामी येथूनच जगामध्ये स्त्रीवादाच्या उदयाला अनुकूल असे वातावरण निर्माण झाले. म्हणून अमेरिकन व फ्रान्स ची राज्यक्रांती हे स्त्रीवादाच्या उदयाचे महत्वपूर्ण कारण आहे.

**(2) राजकीय विचारवंताचे योगदान:** स्त्रीवादाच्या उद्यामध्ये राजकीय विचारवंतांचे योगदान अनन्य साधारण स्वरूपाचे आहे. **प्लेटोने** आपल्या 'Republic' या ग्रंथात आदर्श राज्याची कल्पना मांडतांना स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला आहे. तर व्यक्तिस्वातंत्र्यवादी उदारमतवादी **जे. एस. मिल** या विचारवंतांनी स्त्रियांची गुलामगिरी हा ग्रंथ लिहिला त्या ग्रंथात त्यांनी स्त्रियांच्या गुलामगिरीची कारणे सांगितली. मिल हा ब्रिटिश पार्लमेंट सदस्य असताना, इंग्लंडमध्ये स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे यासाठी House of Commence मध्ये त्यांनी आग्रह धरला. याचाच परिणाम म्हणून इंग्लंडमध्ये स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार देण्यात आला. भारतामध्ये सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजा राम मोहन राय, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा गांधी, गोपाळ कृष्ण गोखले इ. अशा देश-विदेशातील अनेक राजकीय विचारवंत व नेतृत्वाने स्त्रियांचे हक्क आणि अधिकाराच्या बाबतीत तसेच त्यांना पुरुषांबरोबरचा समानतेचा अधिकार मिळावा यासाठी आपले विचार मांडले. यामुळे जगभर स्त्रीवादी विचार उद्यास आले.

**(3) स्त्रीवादी साहित्य:** साहित्य समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. त्यामुळे स्त्रीवादी साहित्य स्त्रीवादी चळवळीच्या उद्यासाठी कारणीभूत ठरले आहे. **सिमोन द बोहुआ** यांनी 1949 मध्ये **'The Second sex'** नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाला स्त्रीवादाचे बायबल म्हणून संबोधले जाते. हा ग्रंथ स्त्रीवादी चळवळीचा धर्म ग्रंथ मानला जातो. अशाच प्रकारचे अनेक मान्यवर विचारवंतांनी स्त्रियांविषयी लिखाण करून त्यांच्या शोषणाची कहाणी जगभर पोहोचवली. भारतामध्ये स्त्रीवादी लिखाणाची जनक म्हणून ताराबाई शिंदे यांना संबोधले जाते. शिंदे यांनी त्यांच्या **'स्त्री पुरुष तुलना'** या ग्रंथात पुरुषी समाजव्यवस्थेचे मार्मिक वर्णन केले आहे. तसेच महात्मा फुले यांची शिष्या मुक्ताबाई हिने कनिष्ठ जातीतील स्त्रियांच्या समस्या एका निबंधातून मांडल्या आहेत. महात्मा फुलेंच्या लिखाणाचे अगोदर, त्यांची शिष्या मुक्ताबाई यांचा निबंध प्रकाशित झाला होता. तसेच इतर साहित्यिकांनी लेख, अग्रलेख, निबंध, कविता, कादंबरी इ. साहित्याच्या माध्यमातून जगातील स्त्रियांच्या जीवनाची व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला. ज्यामुळे समाज जाणीव जागृत झाली आणि त्यातून स्त्री स्वातंत्र्याची संकल्पना पुढे आली. त्याला अनुसरून पुढील काळात स्त्रीमुक्ती चळवळ अग्रेसर रूप धारण करू लागली.

**(4) शिक्षणाचा प्रसार:** जगामध्ये वेगवेगळया संस्था आणि संघटनांनी स्त्री शिक्षणासाठी शैक्षणिक संस्था उघडल्या आणि स्त्री शिक्षणाला चालना दिली. प्रारंभी भारतासारख्या देशात सनातनी मंडळी स्त्री शिक्षणाला विरोध करीत असे. परंतु महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुढाकारातून भारतात स्त्री शिक्षणाची दारे खुली झाली. जगातील इतर देशांमध्ये सुद्धा स्त्री शिक्षणाच्या बाबतीमध्ये एकोणिसाव्या शतकापर्यंत उदासीनताच होती. परंतु अनेक समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांसाठी शिक्षण सुरू झाले. ब्रिटिशांनी 1835 पासून मुक्त शिक्षण पद्धतीचे धोरण अवलंबिले. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात जगातील प्रसिद्ध समजल्या जाणाऱ्या Oxford, Cambridge, Bon, Barlin या विद्यापीठांमध्ये महिला शिक्षण घेऊ लागल्या. भारतात महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी 1916 मध्ये देशातील महिलांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणून पहिल्या महिला विद्यापीठाची स्थापना केली. परिणामी आज सर्व स्त्रियांना शिक्षण मिळू लागले आहे. स्त्रियांमध्ये हळूहळू जागृती होऊ लागली, आज स्त्रियांना आपल्या हक्काची जाणीव होत आहे. यामुळेसुद्धा स्त्रीवाद उदयास आला आहे.

**(5) सामाजिक सुधारणा:** जगातील सर्व देशातील समाजसुधारकांनी वेग-वेगळ्या समाजसुधारणा केल्या. समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या वाईट रूढी, प्रथा, परंपरा यांचे उच्चाटन समाजसुधारकांनी समाजसुधारणेच्या माध्यमातून केले. भारतातील आद्य समाजसुधारक राजा राम मोहन रॉय यांनी स्त्रियांच्या विरुद्ध प्रचलित असणाऱ्या अन्यायकारक सती प्रथा बंदीची चळवळ उभी करून ती अनिष्ट प्रथा बंद करण्यासाठी ब्रिटिशांकडून कायदा करून घेतला. म्हणूनच त्यांना आधुनिक भारताचे जनक म्हणून संबोधले जाते. जगामध्ये अशा सामाजिक सुधारणेच्या माध्यमातून स्त्रियांवरील बंधने व पारतंत्र्यात तिला जगण्यासाठी बाध्य करण्यात आलेल्या अनिष्ट प्रथांचे उच्चाटन करण्यात येऊ लागले. यामुळे स्त्रियांना काही प्रमाणात सामाजिक स्वातंत्र्य प्राप्त झाले. अशा अनिष्ट प्रथा व समस्यांच्या कोंडीतून स्त्रिया बाहेर पडू लागल्यामुळे त्यांना आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली. त्याचा परिणाम असा झाला की समाजात वावरताना स्त्रियांना आपल्या हक्काची जाणीव होऊन आपणही मानव आहोत. याविषयी ओळख पटू लागली, आपल्यावरती लादलेली बंधने ही मानवी आहेत याची जाणीव स्त्रियांना तसेच समाजसुधारकांना होऊ लागली. यामुळे स्त्रियांची स्थिती सुधारण्याचे प्रयत्न झाले. त्याकरिता समाजसुधारकांनी वेळोवेळी स्त्रियांच्या संदर्भातील हक्कांचे जतन करणारे कायदे निर्माण करण्यासाठी लढे उभारले. यामुळे स्त्रीवादाचा उदय झाला.

**(6) सार्वजनिक जीवनात स्त्रियांचा वाढता सहभाग:** परंपरेने चार भिंतीच्या आत डांबले गेलेली स्त्री प्रथम शिक्षणासाठी घराबाहेर पडू लागली. त्यानंतर ती हळू-हळू पुरुषांच्या बरोबरीने पुरुषांच्या सार्वजनिक जीवनात सहभागी होऊ लागली. हा पुरुषी व्यवस्थेला स्त्रियांनी दिलेला पहिला छेद होय, पहिली मात होय. आज औद्योगिकरणामुळे स्त्री अर्थार्जन करू लागली आहे. सुशिक्षित स्त्रिया सामाजिक व राजकीय जीवनात सहभाग घेण्यासाठी पुढे येत आहेत. श्रीलंकेच्या श्रीमती भंडारनायके या जगातील पहिल्या महिला पंतप्रधान झाल्या. त्यानंतर भारतात विजयालक्ष्मी पंडित या पहिल्या महिला मंत्री झाल्या. अशा तऱ्हेने जागतिक पातळीवर पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनी आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात सहभागी होऊन आपले वेगळे अस्तित्व निर्माण करू लागल्या. स्त्रियांना आपल्या मूलभूत हक्कांची जाणीव झाल्यानंतर त्यांनी ते हक्क मिळविण्यासाठी चळवळीच्या माध्यमातून प्रयत्न सुरू केले आणि त्यातूनच स्त्रीवादासारखी एक प्रभावी चळवळ उदयास आली.

**(7) महिला संघटनांचा उदय:** जगामध्ये विविध देशातील स्त्रियांनी आपले हितसंबंधाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी अनेक महिला संघटना स्थापन केल्या. **बेटी फ्रीडम** यांनी "National Organization For Women" या नावाची संघटना 1966 मध्ये स्थापन केली. त्यामुळे वेगवेगळ्या देशात स्त्रीवादाला चालना मिळाली. भारतामध्ये 1904 मध्ये स्त्री मुक्ती लढा देण्यासाठी महिला परिषद स्थापन झाली. 1917 मध्ये **[illegible]नी बेझंट** यांच्या नेतृत्वाखाली "Womens Russion Association" ही संघटना स्थापन करण्यात आली. अशा अनेक संघटनांच्या माध्यमातून स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करण्याचे काम सुरू झाले आणि यामुळेसुद्धा स्त्रीवादाचा उदय झाला.

**निष्कर्ष :**

मानवी समाज व्यवस्थेत स्त्री ही हजारो वर्षापासून गुलाम, दास म्हणून जीवन जगत आहे. समाजाने 'स्त्री' या घटकांना वगळून अनेकदा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला परंतु तो विकास सर्वांगीण ठरला नाही. अनेकदा स्त्रियांना वगळून समाज सुधारणा करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात सुधारणा सुद्धा परिपूर्ण ठरल्या नाहीत. याचे मूळ कारण म्हणजे स्त्रीवादी विचारांना महत्त्व दिल्या जात नव्हते. समाजव्यवस्थेतील कालपरत्वे अनेक बदल, परिवर्तने स्वीकारली परंतु स्त्रियांच्या संदर्भातील परिवर्तन नकार दिल्यामुळे मानवी समाजाला विकासाचा उत्कर्षबिंदू गाठता आलेला नाही. कारण समाजाच्या विकास प्रक्रियेत अर्धा सहभाग जो स्त्रियांचा आहे तो गृहीत धरल्या जात नव्हता. परिणामी विकासाला सर्वांगीण व सार्वत्रिक स्वरूप प्रदान करणे शक्य होत नव्हते. याची जाणीव जगातील सर्वच विचारवंत, समाज सुधारक, तत्वचिंतक, राजकीय नेतृत्व यांना प्रबोधन काळानंतर होऊ लागली. म्हणून समग्र

स्त्रियांना धर्म, संस्कृती, प्रथा, परंपरा यांच्या माध्यमातून जखडून ठेवले गेले होते. त्यातून त्यांची मुक्तता करण्यासाठी म्हणून स्त्रीवादी विचारांचा उदय व विकास जगभर विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात होऊ लागला. साधारणपणे 1960 नंतर जगातील सर्व समाजव्यवस्थेत स्त्रियांचे हक्क आणि अधिकार याबाबतची आंदोलने उभे राहू लागले. स्त्रीवादी साहित्यक, राजकीय विचारवंत यांचे योगदान तसेच शिक्षणाचा झालेला प्रचार-प्रसार, वेगवेगळ्या देशांमध्ये समाजसुधारकांनी स्त्रियांचे विरोधातील अनिष्ट प्रकारच्या उच्चाटनासाठी उभारलेले लढे आणि त्यानंतर स्त्रियांमध्ये जाणीव आणि जागृती निर्माण झाल्यामुळे त्यांचा सार्वजनिक जीवनातील वाढलेला सहभाग तसेच स्त्रीवादी संघटनांचा झालेला उदय यामुळे समग्र जगभर स्त्रीवादाचा उदय व विकास घडून आला आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

जादौंन, वा. सी.(2017). *नारीवादी सिद्धांतोका विकास एवं समकालीन समाज मे नारी जीवन* .KAAV International Journal of Arts,Humanities & social science, KIJAHS/APR-JUN2017/VOL-4/ISS-2/A27,ISSN:2348- 4349 Impact factor(2017) – 7.9183**.**

खेतान, प्र.(2010), *स्त्री उपेक्षिता*.

निवेदिता मेनन और अन्य.(2001). *नारीवादी राजनीतिः संघर्ष व मुद्दे*. दिल्ली, हिंदी माध्यम कार्यालय निर्देशा लय, दिल्ली विश्वविद्यालय.

गोखले,के. (2010). *द सेकंड सेक्स- सिमोन द बोहूआर*. पुणे, पद्मगंधा प्रकाशन.

परमार, एस.(2016) *नारीवादी सिद्धांत और व्यवहार*. जयपुर, रावत प्रकाशन.

सिंह, व्ही.& जन्मेजय, सिंह.**(2012) .** *नारीवाद*. जयपुर, रावत प्रकाशन.

# स्त्रीवादी चळवळ आणि घरगुती हिंसा

प्रा. दर्शना अतुल भोईर
एम. ए. , एम. एड. , डी. एस. एम , एल लक्ष्मी रतन शाह बी एड कॉलेज, चिंचघर, कुडूस.

स्त्रीवाद हि एक स्त्रियांच्या संदर्भातील सामाजिक, आर्थिक, राजकीय समान हक्कांची मागणी करणारी चळवळ आणि विचारसरणी आहे. स्त्रिवाद म्हणजे लिंगभेद झुगारून स्त्रि-पुरूष समानतेकडे वाटचाल करणारा विचारप्रवाह. सामान्यतः स्त्रिवाद हि पुरूषविरोधी चळवळ समजली जाते त्यामुळे स्त्रियांचे ऐतिहासिक दुय्यमत्व उजेडात आणून हे शोषण संपविण्याचा प्रयत्न करते. हि एक सामाजिक – राजकीय जाणिव आहे. स्त्रिवाद हि संकल्पना जरी पाश्चात्य आधुनिकतेत उदयास आली अशी सामाजिक समजूत असली तरी हि जाणिव त्यापुर्वीही वेगवेगळया कालखंडात आणि ठिकठीकाणी आढळून आलेली दिसते. म्हणून एकच स्त्रिवाद नसून अनेक स्त्रिवाद दिसून आलेले आहेत.

**स्त्रीवाद ऐतिहासिक पार्श्वभूमी –**

पाश्चात्य देशांचा सुरवातीचा इतिहास पाहता स्त्रिया या फक्त चूल आणि मूल या कौटुंबिक व्यवस्थेत अडकलेल्या होत्या त्यांना सार्वजनिक जिवनात स्थान नव्हते, तो केवळ पुरूषांचाच अधिकार समजला जाई. मध्ययुगात स्त्रियांना संपत्तीत वाटा नव्हता आणि शिक्षणाची संधी नव्हती, स्त्रियांचे सामाजिक स्थान समाज जिवनातील त्यांचा सहभाग आणि योगदान त्यांचे विविध प्रश्न व समस्या इ. बद्दलचे विचारमंथन अठराव्या शतकात होऊ लागले. या विचारमंथनातून स्त्रिवादी विचारधारेचा उगम पाश्चात्य देशांमध्ये झाला व स्त्रिशिक्षण, स्त्रियांचे राजकीय हक्क, समान संधी अशा अनेक प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधले गेले. ज्ञानाचा उदय झाला व त्याचा प्रभाव स्त्रिवादावर पडला त्यातून 'आम्ही साऱ्या एकत्र येऊन मिळून जाऊ' हि प्रबोधन काळातील स्त्रिवादी घोषणा गाजली; पण तीचे सलग्न चळवळीत कधीच रूपांतर झाले नाही. तथापी ज्ञानोदय काळातील काही सुधारणावादी स्त्रियांनी स्वातंत्र्य, समता आणि नैसर्गिक अधिकार हे स्त्रि-पुरूषांना समानपणे लागू करावे अशी जोरदारपणे मागणी केली तेव्हा प्रसिध्द फ्रेंच नाटककार ऑलॅप द गॉजिस हिने डीक्लेरेशन ऑफ द राईट्स ऑफ वुमन एँड ऑफ द फिमेल सीटीझन (१७९१) हा ग्रंथ लिहून स्त्रियांच्या हक्कांची जाणिव करून स्त्रि हि केवळ पुरूषाबरोबर समान नसून ती त्याची सहकारी – सोबती आहे असे ठामपणे प्रतिपादित केले. याच सुमारास मेरी उलस्टोन क्राफ्ट चा ए व्हिन्डिकेशन ऑफ द राईट्स ऑफ विमेन (१७९२) हा ग्रंथ प्रसिध्द झाला. त्यामध्ये मेरीने स्त्रि-पुरूषांना शिक्षण, काम आणि राजकारण यात समान संधी द्यावी कारण त्या पुरूषांइतक्याच नैसर्गिक दृष्ट्या हुशार आहेत असे ठणकावून लिहीले. त्यांना शैक्षणिक व आर्थीक संधी आणि समान नागरी हक्क दिले तर त्या पुरूषांएवढ्याच सक्षम व समर्थ बनतील असे तीने प्रतिपादित केले. त्याचा परिणाम म्हणून फ्रान्स, जर्मन आणि इटलीत वैचारीक मंथन होऊन उन्मूलन वादाच्या चळवळीस (अबॉलिशन मूव्हमेंट) चालना मिळाली.

१९ व्या शतकात स्थित्यंतराची बदलाची मागणी युरोप व उत्तर अमेरीकेत होऊ लागली. पॅरीस मधील स्त्रिवादी महिलांनी द व्हॉइस ऑफ विमेन हे दैनिक १८४८ मध्ये काढले आणि स्त्रियांच्या प्रश्नाला वाचा फोडली. स्त्री शिक्षण, स्त्री राजकीय हक्क, समान संधी, समान वेतन, कुटुबांतर्गत व कुटुंबाबाहेरील हिंसाचार अशा बहुविध प्रश्नांकडे या दैनिकाने समाजाचे लक्ष वेधले आणि स्त्रिवादाची सैध्दांतीक भूमिका मांडली. याच सुमारास जर्मन लेखिका लुईस डिटमर हिने सोशल रीफॉर्म हे नियतकालिक काढून स्त्रियांचे प्रश्न चर्चेत आणले. याच सुमारास न्युयॉर्क मधील सेनेका फॉल्स येथे स्त्रियांच्या हक्कांसाठी विद्वत्त सभा १९४८ साली भरली व त्यांनी अकरा ठराव या संदर्भात संमत

केले. त्यामध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार हा प्राधान्याने विचारात घेतला. अशा प्रकारच्या स्त्रियांच्या परिषदा अन्य राज्यातूनही झाल्या त्यातूनच पुढे एलिझाबेथ कॅडी स्टॅन्टन, मार्था राईट, सुसान एन्थॉनी इ. नी 'नॅश्नल विमेन सफ्रेज असोसिएशन' ही मतदानाच्या संदर्भात जागतीक संघटना १८६९ साली स्थापन केली. सुरूवातीला उच्चभ्रु व कामगार स्त्रियांमध्ये मतभेद झाले तेव्हा शार्लट पर्किन्स गिलमन हिने विमेन एँड इकॉनॉमिक्स हा ग्रंथ १८९८ मध्ये लिहीला. त्यामध्ये असे लिहिले की, जोपर्यंत स्त्रिया घरगुती काम व कुटुंब या पाशातून मुक्त होत नाहीत तोपर्यंत त्या पुरूषांवर अवलंबून रहाणार. लिंगभेदाच्या आधारे स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते व समाजिक दमनाला, अन्यायाला त्यांना तोंड द्यावे लागते. त्यासाठी पुरूषप्रधान – पितृसत्ताक कुटुंबपध्दतीत बदल होणे आवश्यक आहे असा समाजवादी समतेचा सिध्दांत तिने मांडला. स्त्रियांना विसाव्या शतकाच्या पुर्वाधात अनुक्रमे देशपरत्वे स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला व त्यांचे काही हक्कही मान्य झाले. स्त्रिवादाचा हा प्रसार – प्रचार पाश्चात्य देशांमधून आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरीकेत प्रसूत झाला आणि विकसीत राष्ट्रबरोबरच त्याचे लोन अविकसीत व विकसनशील देशात पोहोचले.

**स्त्रिवादाची आधुनिक वाटचाल**

स्त्रियांना दुयमत्व देण्यामागे जे पुरूषी राजकारण आहे त्याचा बिमोड करणे हा स्त्रिवादाचे मुळ उद्दिष्ट आहे. स्त्रिवादांतर्गत अनेक गोष्टींचा अंतर्भाव होतो. पुरूषांइतकीच स्त्रिलाही स्वतःची ओळख, स्वविकास स्वतंत्रता याची जरूरी आहे. स्वत्वाची ओळख, स्वायत्तता, स्वयं निर्णय, सक्रिय सहभाग या साऱ्या गोष्टी स्त्रिला व्यक्ती म्हणून परिपक्व बनवितात. त्या मिळवून देण्याचा प्रयत्न स्त्रिवादी चळवळींनी केला. आपल्या सांकल्पनिक सैद्धांतिक चौकटीत स्त्रियांना मिळणारे गौणत्व त्यांचे करण्यात येणारे दमन याचे स्पष्टीकरण स्त्रिवाद करतो. काळानुसार स्त्रिवादी चळवळीत जहाल, मवाळ, मार्क्सवादी, पर्यावरणवादी, कृष्णवर्णिय वैगरे अनेक छटा असलेल्या विचारसरणीच्या बहुविध संघटना सामील झाल्या.

स्त्रियांची चळवळ ही भारतात काही नवीन गोष्ट नाही, स्त्रिवादसुध्दा नविन नाही. १९ व्या शतकापासून भारतात ज्या स्त्री चळवळींचा उदय झाला त्यात १) सामाजिक सुधारणेच्या चळवळीला अंगभूत असलेली स्त्री चळवळ २) जातीव्यवस्थाविरोधी चळवळीची अंगभूत स्त्रि-चळवळ या दोन्ही चळवळी १९ व्या शतकात उदय पावल्या व काही प्रमाणात २० व्या शतकात चालू राहिल्या व वाढल्या. ३) ऑल इंडीया विमेन कॉन्फरन्स मध्ये सामावलेली स्त्रियांची स्वतंत्र चळवळ ४) कम्युनिस्ट व समाजवादी नेतृत्वाखालची स्त्री चळवळ ह्या शेवटच्या तीन चळवळी प्रामुख्याने २० व्या शतकात जन्मल्या व विकसित झाल्या.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्रिवादी सुधारणावादी महिला अधिक आक्रमक झाल्या. त्यांनी स्त्रियांचे दमन ऐतिहासिक दृष्ट्या पाहिले आणि ते सर्वात दुरगामी आहेत हा सिध्दांत प्रतिपादिला. या स्त्रिवाद्यांनी मातृत्व, लैंगीकता यासंबंधी अनेक महत्वाचे प्रश्न उपस्थित केले त्याप्रमाणे पितृसत्ताक कुटुंबपध्दतीत अनुस्युत असलेल्या सत्ता, स्पर्धा, श्रेणीबध्दता, वर्चस्ववाद यांचा समूळ उच्छेद करावा असे प्रतिपादन केले. 'पर्सनल इज पॉलिटिकल' (जे जे व्यक्तिगत ते ते राजकीय) अशी घोषणा करताना स्त्रियांच्या जाणिव जागृतीवर भर दिला. स्त्रिवादी चळवळ उभी राहीली तरी समाजपरंपरेतील स्त्रिप्रतिमा नाकारण्यासाठी स्त्रियांनी त्यांचे अस्तित्व मर्यादित करणाऱ्या स्त्रित्वाच्या रूढ व्याख्या नाकाराव्यात. स्त्री हि माणूस आहे म्हणून व्यक्ती या स्वरूपात तीचा विचार व्हावा. नर-नारी हि व्यवस्था नैसर्गीक आहे परंतू पुरूषप्रधान व्यवस्थेत लिंगभेदभाव मुद्दाम घडवला गेला, संस्कृतीच्या इतिहासाने स्त्रिची सांगड निसर्गाशी घातली त्यामुळे स्त्रिविषयक प्रश्नांचा विचार निसर्ग सापेक्ष केला पाहिजे. पुरूषप्रधान पध्दतीची विचारसरणी हि श्रेणीबध्द, द्वंद्ववादी आणी वर्चस्ववादी आहे त्यात स्त्रियांचे शोषणच झाले आहे. अलिकडे आधुनिकोत्तर (पोस्ट मॉडर्न) स्त्रिवाद, कृष्णवर्णी स्त्रिवाद (ब्लॅक फेमिनिझम), बहुसांस्कृतीक व वैष्वीक स्त्रीवाद असे

विविध प्रकार पुढे आले आहेत. या पश्चात्य प्रवाहासोबतच समकालीन भारतात धर्मशास्त्रकारांनी स्त्रियांना पुर्वी असलेले धार्मिक अधिकार काढून घेतले. स्त्रि-पुरूष तुलना होऊ शकणार नाही यावर भर दिला मात्र संत कवियत्रींनी तत्कालीन अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा यावर हल्ला चढवून स्त्रियांसाठी आत्मउन्नती व आत्म विकासास बळ दिले. बहिणाबाई, मुक्ताबाई, जनाबाई इ. नी या संदर्भात योगदान दिले.

१८ व्या शतकात स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते. विधवांची दयनीय स्थीती त्यात केशवपन सारख्या अनिष्ट प्रथा रूढ होत्या. विशिष्ट जातीतील स्त्रियांना पुनःर्विवाहाचा अधिकार होता पण धर्मशास्त्रकारांनी स्त्रियांना मालमत्ता, वारसा हक्क नाकारला होता. अशा परिस्थितीत अहिल्याबाई होळकर, ताराबाई इ. नी आपल्या कर्तृत्वाने स्त्रियांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला.

भारतात ब्रिटीशांची सत्ता स्थापन झाल्यानंतर त्यांनी स्त्रिउत्थानासाठी काही सुधारणा विविध धोरणे राबवली त्याचा भारतातील स्त्रिवादावर एकंदरीत परिणाम झाला. स्त्रिकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला. स्त्रियांच्या उत्थानासाठी ब्रिटीशांनी अनेक कायदे केले. सतीबंदी, स्त्रियांना शिक्षणाचा हक्क, वारसा हक्क, विधवा पुनःर्विवाह असे कायदे मंजूर केले त्यासंदर्भात भारतातील अनेक थोर समाजसुधारकांनी पुढाकार घेतला. त्यात राजाराम मोहन रॉय, इश्वरचंद्र विद्यासागर, बाळशास्त्री जांभेकर, महात्मा फुले, स्वामी दयानंद सरस्वती आदिंनी स्त्रियांचे शिक्षण, अनिष्ट प्रथा निर्मूलन व स्त्रिजीवन सुधारण्यासाठी महत्वपुर्ण योगदान दिले.

१८७१ साली मद्रासमध्ये विधवा पुनःर्विवाहास सुरूवात झाली. विरेशलिंगम पंतलू यांच्या नेतृत्वाखाली विधवा पुःनर्विवाह चळवळ सुरू झाली. महात्मा फुले यांनी विधवा स्त्रिवर झालेल्या लैंगीक अत्याचारामुळे रहाणाऱ्या गर्भाची भ्रुणहत्या होऊ नये म्हणून आधारगृह सुरू केले. १८८३ मध्ये बालहत्या प्रतिबंध गृहाची स्थापना केली. १८८९ च्या काळात महाराष्ट्रातील विधवांसाठी पहिले वस्तीगृह पंडीता रमाबाई यांनी मुंबईत सुरू केले.

यानंतरच्या काळात महात्मा गांधी, आंबेडकर, संत गाडगेबाबा यांनी स्त्रियांच्या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणन्यासाठी विचार मांडले व त्या दिशेन मोठे कार्य केले. स्वतंत्र्यप्राप्तीनंतर स्त्रियांच्या कार्यक्षेत्रात वाढ झाली. स्त्रि-पुरूष समानतेला चालना मिळाली. स्त्री अत्याचारासंबंधात सामाजिक व सार्वजनिक पातळीवर प्रश्न मांडले जाऊ लागले. पुरूषांच्या अरेरावी विरूध्द, पुरूषी अहंतेविरूध्द, पुरूषी प्रवृत्तीविरूध्द स्त्रिमुक्ती चळवळ सुरू झाली. स्त्रिया बोलू लागल्या, आपल्या व्यथा मांडू लागल्या. पाश्चात्य देशात, प्राचिन, मध्ययुगीन व आधुनिक भारतात स्त्रियांविषयी, स्त्री हक्कांविषयी, अन्यायविरोधी सामाजिक, वैचारीक प्रबोधने झाली, अनेक चळवळी झाल्या, भारतीय समाजात स्त्रिचे स्थान वेगवेगळया काळात वेगवेगळया स्वरूपाचे राहीले आहे परंतू पितृसत्ताक पध्दतीच्या प्राबल्यामुळे बहुतांश काळात स्त्रिची अवस्था अबलेसारखीच होती. तिच्यावर अनेक प्रकारे अन्याय होत होते. खरेतर आजच्या काळातही या स्थितीत खुप फरक पडला आहे असे नाही. आजही स्त्रिला हिंसाचार व अत्याचाराला तोंड द्यावे लागते.

आधुनिक काळात जगण्यातील नितिमूल्यांच्या घसरणीमुळे व वाढल्या औद्योगीक विकासामुळे स्त्रियांच्या अवहेलनेमध्ये वाढच झाली. याशिवाय ज्या कुटुंबात ज्या घरात ती स्वतःला सुरक्षित समजते त्याच कुटुंबाच्या हिंसाचारास ती बळी पडते आहे. या सर्व बाबींचा विचार करून आंतरराष्ट्रीय पातळीवर स्त्रियांवर होणारे अत्याचार व हिंसाचार रोखण्यासाठी अनेक उपाय योजले गेले. आपल्या भारतातही स्त्रिला कौटुंबिक हिंसाचारापासून सुटका मिळण्यासाठी 'कौटुंबिक हिंसाचार संरक्षण कायदा २००५' करण्यात आला आहे.

जगातल्या प्रत्येक तिन स्त्रियांपैकी एकीला तरी मारझोड होते. अमेरीकेसारख्या प्रगत देशातही प्रत्येक सेकंदाला कुठल्यातरी महिलेला धमकावणे वा मारझोड होत असते. भारतीय महिलांची स्थिती तर या पेक्षाही

ISSN : 2278-9308
March, 2022

भयानक आहे. हे अपमानजनक चित्र बहुतांश भारतीयांच्या घरात, आजूबाजूला सुरू असते. ते आपण पहात असतो व सहनही करीत असतो.

कौटुंबिक हिसाचारापासून महिलांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने संसदेने २००५ मध्ये अधिनियम मंजूर केला व ऑक्टोबर २००६ पासून तसा कायदा संपुर्ण देशभर (जम्मू-काश्मिर वगळता) देशातील सर्व राज्यांना लागू झाला. या कायद्यामुळे महिलांना कौटुंबिक हिसांचारापासून संरक्षण देण्यात आले.

स्त्रियांवर होणाऱ्या निरनिराळ्या अत्याचारापासून आणि कौटुंबिक हिंसाचारापासून तिला संरक्षण व हक्क प्राप्त करुन देण्यासाठी कायदे अस्तित्वात आले ते खलीलप्रमाणे.

1. भारतीय दंडविधान कायदा, १८६०
2. हुंडा प्रतिबंध कायदा, १९६१
3. सतीप्रथा विरोधक कायदा, १९८७
4. स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन विरोधी कायदा, १९८६
5. घटस्फोट कायदा, १८६९
6. कुटुंब न्यायालय कायदा, १९८४
7. मुस्लिम महिलांविषयी कायदा, १९८६
8. गर्भलिंग परिक्षण व गर्भपात विषयक कायदा

अशा प्रकारच्या निरनिराळ्या कायाद्यांतर्गत स्त्रियांना मिळणारे हक्क किंवा संरक्षण आणखीन प्रभाविपणे लागू होण्यासाठी हा नविन 'कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा, २००५' निर्माण झाला. कौटुंबिक हिंसा हि घरात घडते ज्याला आपण आपणा सर्वांचे सुरक्षीत स्थळ समजतो. आजपर्यंत अनेक स्त्रिविषक अत्याचार विषयक कायदे तयार झाले परंतू घराच्या चार भिंतीआड होणारा हिंसाचार आजवर उपेक्षीत राहीला होता. ज्या महिला कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडल्या आहेत त्यांना त्यांच्या अधिकाराचा वापर अधिक सहज शक्य होण्यासाठी आणि त्यांना लवकरात लवकर न्याय मिळवून देण्यासाठी हा कायदा तयार करण्यात आला आहे. आपल्या भारतीय प्रजासत्ताकाला ५६ वर्ष पुर्ण झाल्यानंतर २००५ साली अशा प्रकारचा महिलांना दिलासा देणारा कायदा अस्तित्वात आला. हा कायदा २६ ऑक्टोबर २००६ पासून लागू झाला. हिंसामुक्त जिवन हा स्त्रिचा मानवि हक्क आहे म्हणूनच कौटुंबिक हिंसाचार निःसंशयपणे तीच्या मानवी अधिकाराचा विषय आहे. तीच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण करणारा गंभीर दखलपात्र विषय आहे. म्हणून स्त्रियांच्या अस्मितेबद्दलच्या जाणिवा उंचावण्याकरीता सार्वजनिक निर्णयप्रक्रियांवर प्रभाव पाडण्यासाठी, परिणामकारक राजकीय व सामाजिक वजन कमावण्याकरीता आपले लक्ष स्त्रियांच्या विकासाकडे देणे व स्त्रियांना कौटुंबिक हिंसाचारा विरूध्द पावले उचलता यावीत व सर्व बाजूंनी होणारे स्त्री शोषण थांबविण्यासाठी आपण ठोस असे पाऊल उचलले पाहिजे असे मनापासून सुचवावेसे वाटते.

**संदर्भ**

1. विकीपिडीया
2. महाराष्ट्रातील स्त्रियांच्या चळवळीचा आढावा – विद्युत भागवत
3. कौटुंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा – २००५
4. १९ व्या शतकात उदय पावलेल्या भारतीय स्त्री चळवळी – गेल ऑमवेट – अनुवाद – भारत पाटणकर.
5. स्त्रिवाद आणि स्त्रिवादी चळवळ – डॉ. वसंती रासम.
6. भारतीय स्त्रिजीवनाची वाटचाल – तृतीय वर्ष कला इतिहास पुस्तक

# स्त्रीवादी परिप्रेक्षातून लिंगाधारित अर्थसंकल्पाचा अभ्यास

**प्रा. संतोष भावार्थे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
डॉ. शां. ध. दे. कला महाविद्यालय व वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडा.

---

**प्रस्तावना:**

आधुनिक काळातसर्वच सामाजिक शास्त्रांमध्ये स्त्रीवाद ही संकल्पना प्राधान्याने चर्चिली जाते. जगभरात अनेक चळवळींना, आंदोलनांना वैचारिक अधिष्ठान पुरविण्याचे कार्य या संकल्पनेने केले आहे. राजकारण, समाजकारण आणि अर्थकारणावर सुद्धा या संकल्पनेचा प्रभाव राहीलेला आहे. अर्थात, 'स्त्रीवाद' या शब्दाबद्दल अनेकांच्या मनात अनेक गैरसमज आहेत. त्यामुळे स्त्रीवादी लेखन करणाऱ्या काही स्त्रियाही आपण स्त्रीवादी नाही, असे सांगतात. अनेकदा एखादे आंदोलन किंवा चळवळ स्त्रियांच्या विश्वात परिवर्तन घडवून गेले असले तरी त्याला स्त्रीवादी परिप्रेक्षामध्ये बसवायचे की नाही अशा संभ्रमात लोक पडलेले दिसतात. आधुनिक काळात स्त्रीवादी साहित्य, स्त्रीवादी विचारवंत, स्त्रीवादी कार्यकर्ते, स्त्रीवादी अंदाजपत्रक अशा अनेक पैलूंनी स्त्रीवादाची चर्चा केली जात असल्याचे पाहायला मिळते. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये स्त्रीवादी परिप्रेक्षातून लिंगाधारित अर्थसंकल्पाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**परवलीचे शब्द:**स्त्रीवाद, अर्थसंकल्प, धोरणे, लिंगभाव, शोषण, जेंडर बजेट

**स्त्रीवाद:**

स्त्रीवाद हा प्रत्येक स्त्रीचा व्यक्ती म्हणून विचार करतो. त्यामुळे स्त्रीवाद ही जगातल्या प्रत्येक स्त्रीशी जोडली गेलेली कल्पना आहे असे गांधीजी म्हणत. स्त्रीवाद पुरुषांना दोष देत नाही, तर पुरुषसत्ताक व्यवस्थेला दोष देतो. पुरुषसत्ताकामुळे पुरुष हा स्त्रीपेक्षा श्रेष्ठ आहे, स्त्री ही खालच्या स्तरावर आहे, आणि स्त्री हे पुरुषाच्या भोगाचे स्थान आहे, अशी शिकवण पुरुषांच्या मनात बिंबवली जाते. आणि म्हणूनच स्त्रीवादी विचारांच्या प्रभावातून उभे राहिलेले एखादे स्त्रियांचे आंदोलन म्हणजे पुरुषांविरुद्ध सूड उगवणे नाही. स्त्रियांना न्याय हवा आहे; पण अन्यायाचा प्रतिकार अन्यायाने करता येत नाही याची स्त्रीवाद्यांना जाणीव आहे. एका दमनचक्राचे उत्तर दुसरे दमनचक्र नाही. महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, प्राचार्य गोपाळ कृष्ण आगरकर, महात्मा गांधी, दादा धर्माधिकारी, वि. का. राजवाडे आदींनी शतकापूर्वीपासून स्त्री-पुरुष समानता व स्त्रीचे स्वातंत्र्य याबद्दल अतिशय उदारमतवादी विचारांची मांडणी केली आहे. म्हणूनच स्त्रीवाद ही पाश्चात्त्य विचारसरणी आहे या म्हणण्यात अजिबात तथ्यांश नाही. प्राचीन भारतातील गार्गी, मैत्रेयी या स्त्री विदुषींच्या उदाहरणांवरून हे सिद्ध होते. सन १९७५ हे 'आंतरराष्ट्रीय महिला वर्ष' म्हणून घोषित करण्यात आले आणि १९७५ ते १९८५ हे दशक स्त्रियांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे ठरविले गेले. त्यानंतरस्त्रीमुक्ती चळवळींच्या माध्यमातून स्त्रियांसंबंधीचेशतकानुशतके दडपले गेलेले प्रश्न समोर येऊ लागले. स्त्रीमुक्ती, स्त्री-स्वातंत्र्य, स्त्रीवाद इत्यादी संकल्पना या काळात प्रचलित होत गेल्या. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रियांना दुय्यम-तिय्यम दर्जाचे स्थान दिल्याने आणि रूढ समाजव्यवस्थेत धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, भाषिक, बौद्धिक अशा सर्व व्यवस्था स्त्रियांचे शोषण करतात याची जाणीव झाल्याने, त्या व्यवस्थेविरोधात बंड करण्याच्या उद्देशाने स्त्रीमुक्ती चळवळ अस्तित्वात आली. स्त्रीचे माणूसपण नाकारून तिला जी पशुतुल्य स्थिती प्राप्त करून दिली जाते, त्याविरुद्ध लढा देत व्यक्ती म्हणून स्त्रीचे असलेले स्थान प्रस्थापित करण्यासाठी विकसित झालेली 'स्त्रीवाद' ही एक विचारप्रणाली आहे. स्त्रियांचे हक्क प्राप्त करून समाजपरिवर्तनाची अपेक्षा बाळगणारी ती एक राजकीय जाणीव आहे.

स्त्रीवादामध्ये अनेक प्रवाह आहेत. त्यापैकी काही देश-स्थळपरत्वे पुढे आलेले आहेत तर काही विचारसरणीवर आधारित आहेत. काही प्रवाह क्रियात्मक आहेत तर काही प्रतिक्रियात्मक आहेत. काही बदलत्या परिस्थितीनुसार बदलत गेले आहेत तर काही स्थितीवादी आहेत. यापैकी काही महत्वाचे प्रवाह म्हणजे- उदारमतवादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, अलगतावादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद, उत्तर-आधुनिक स्त्रीवाद

इत्यादी.[१]उदारमतवादी स्त्रीवादामध्ये स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह धरला जातो. राजकीय, प्रशासकीय, आर्थिक किंबहूना लष्करी क्षेत्रातही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने संधी मिळाव्यात अशी भूमिका उदारमतवादी स्त्रीवादी घेतात. अलगतावादी स्त्रीवाद्यांच्या मते, स्त्रिया व पुरुष यांच्यात फरक आहे. संघर्ष मिटविणे किंवा सांघिक निर्णय घेण्याची क्षमता स्त्रियांमध्ये पुरुषांपेक्षा अधिक असते. म्हणूनच सर्वच व्यवस्था या स्त्रीकेंद्री असायला हव्यात. मार्क्सवादी स्त्रीवादी आर्थिक दृष्टिकोनातून स्त्री-पुरुष विषमतेची कारणे शोधतात. त्यांच्या मते, पुरुषप्रधान व्यवस्थेत संपत्तीचा वारसा पुरुषांना मिळाल्यामुळे ते सामर्थ्यशाली बनले तर उदरनिर्वाहासाठी स्त्री पुरुषांवर अवलंबून असल्यामुळे अधिक कमकुवत बनली. समाजवादी समाजरचनेच्या स्थापनेनंतर खाजगी संपत्तीचे उच्चाटन होऊन स्त्रियांचे दास्यत्व संपुष्टात येईल असा आशावाद मार्क्सवादी स्त्रीवाद्यांना आहे. उत्तर-आधुनिक स्त्रीवादात असे अभिप्रेत आहे की, स्त्री-पुरुष यांच्यातील दरी, त्यांचे प्रश्न न संपणारे आहेत. म्हणून स्त्रियांनी स्वत:ची जीवनशैली तयार करावी, पुरुषांपासून अलग होऊन स्वत:चे जग उभारावे.

थोडक्यात, स्त्री-पुरुष समानता, पुरुषी वर्चस्ववादाला विरोध, समान हक्कांसाठी लढा स्त्रियांचा अस्तित्ववाद असे पैलू स्त्रीवादाचे दिसून येतात. त्या सर्वांमध्ये स्त्रियांच्या परावलंबित्वाला दूर करण्यासाठी त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्याला महत्व दिल्याचे दिसते. त्यादृष्टीने लिंगाधारीत अर्थसंकल्प उपयुक्त ठरू शकतो.

**लिंगाधारित अर्थसंकल्प:**

स्त्रीकेंद्रित अर्थसंकल्प म्हणजे स्त्रियांना केंद्रस्थानी ठेऊन स्त्रियांच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी जाणीवपूर्वक केलेली अर्थसंकल्पीय तरतूद होय.तो महिलांसाठी जाणीवपूर्वक तयार केलेला स्वतंत्र अर्थसंकल्प नसतो, किंवा चालू अर्थसंकल्पात मुद्दाम घातलेली भर नसते. तर यामध्ये केलेल्या तरतुदींचा लिंगभावावर होणारा परिणाम जाणून घेतला जातो. या प्रकारच्या अर्थसंकल्पामागे असणारे गृहीतक म्हणजे, अर्थसंकल्पाचा फायदा आणि परिणाम स्त्री-पुरुषांवर वेगवेगळ्या प्रकारे होतो. यामध्ये अनेकदा पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया आरोग्य, शिक्षण, आर्थिक स्तर इत्यादी आघाड्यांवर मागे पडत असल्याचे दिसून येते. त्यामुळे स्त्रियांच्या गरजांकडे विशेष लक्ष देण्याची गरज असते. त्या दृष्टीने लिंगभावाधारित अर्थसंकल्प उपयुक्त ठरु शकतो.लिंगभावाधारित अर्थसंकल्पामुळे आर्थिक धोरणांद्वारे सामाजिक विषमता आणि स्त्रियांच्या विकासाचे प्रश्न सोडवता येऊ शकतात. त्यामुळे अर्थसंकल्पीय धोरणात गुणात्मक आणि मूल्यात्मक वाढ होते. एकूणच आर्थिक धोरणाला जबाबदार आणि पारदर्शक बनवणे, लिंगभावाप्रति संवेदनशील निर्णय घेणे, महिलांच्या हक्कांचा विचार करणे हे ही शक्य होते.[२] लिंगभावाधारित अर्थसंकल्प, केंद्र व राज्य या दोन्ही पातळ्यांवर व्हावे अशी अपेक्षा असते. राज्य सरकार स्थानिकांच्या अधिक जवळ असते. त्या त्या प्रदेशांमधल्या महिलांच्या समस्या व आकडेवारी स्थानिक सरकारांना अधिक चांगल्या रीतीने माहित असतात. त्यामुळे ते लोकांचा सहभाग प्राप्त करु शकतात. लिंगभाव असमानता कमी झाल्यास देशाचा आर्थिक व सामाजिक विकास साधला जाऊ शकतो.

'लिंगभावाधारित अर्थसंकल्प' या संकल्पनेचा स्वीकार सर्वप्रथम ऑस्ट्रेलिया या देशात १९९४ साली करण्यात आला. भारतात सन २००१-२००२ च्या अर्थसंकल्पीय भाषणात प्रथमच 'जेंडर बजेट' चा उल्लेख करण्यात आला. प्रत्यक्षात सन २००४ साली जेंडर बजेटची संकल्पना भारतात स्वीकारण्यात आली. आणि २००५ पासून त्यावरचे परिशिष्ट अर्थसंकल्पाचा भाग बनले. महाराष्ट्र शासनाने २०१३ मध्ये जेंडर बजेट स्वीकारले.[३]लिंगभावाधारित अर्थसंकल्पासाठी स्वतंत्र आदेश जरी करणे, जेंडर सेल स्थापन करणे आणि जेंडर बजेट अहवाल तयार करणे या बाबी कराव्या लागतात. शासनाच्या विविध विभागांमध्ये धोरणे आखण्याच्या टप्प्यापासून 'लिंगसमभाव'या विषयावर जाणीवजागृती करण्याचे कार्य जेंडर सेल करतो. आत्तापर्यंत केंद्राच्या एकूण ५७ खात्यांमध्ये हा सेल स्थापन करण्यात आला आहे. भारतात सन २०१४ पासून महिलांच्या प्रश्नांना अर्थसंकल्पाच्या नियोजनाच्या पातळीपासूनच सामावून घेण्यासाठी आणि त्याप्रमाणे कार्यक्रमांच्या निर्मिती आणि अंमलबजावणीसाठी नव्याने तरतूद करण्यात आली आहे. कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण राखण्याच्या योजना, प्रधान मंत्री सौभाग्य योजना, प्रधान मंत्री उज्वला योजना, नारी शक्ती योजना आणि बेटी बचाओ बेटी पढाओ यासारख्या महिलालक्षी योजनांसाठी भरीव आर्थिक तरतूद केली गेली.[४]

**समापन:**

थोडक्यात, लिंगाधारीत अर्थसंकल्पामध्ये महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष आथिक तरतुदी करण्यात येतात. मात्र या प्रकारच्या अर्थसंकल्पामागे उदात्त, व्यापक भूमिका असणे गरजेचे आहे. ते केवळ 'जेंडर बजेट' न राहता 'जेंडर सेन्सिटिव्ह बजेट' होणे आवश्यक आहे.स्त्रीकेंद्री अर्थसंकल्पाबरोबरच त्याच्या तपासणीची (जेंडर ऑडीटची) व्यवस्था सुद्धा करणे आवश्यक आहे.[५]तरच त्याच्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचणे शक्य होईल.

ISSN : 2278-9308
March, 2022

**संदर्भसुची:**

१) अरुणा पेंडसे, उत्तरा सहस्त्रबुद्धे; आंतरराष्ट्रीय संबंध-शीतयुद्धोत्तर आणि जागतिकीकरणाचे राजकारण; ओरिएन्ट लॉन्गमन प्रा. लि. मुंबई;२००८; पृ.१९५)
२) https://marathi.thewire.in/lingbhaavaadharit-arthasankalp#more
३)https://dgipr.maharashtra.gov.in/sites/default/files/2020-08/Lokrajya-Marathi-March2019.pdf
४) https://marathi.thewire.in/lingbhaavaadharit-arthasankalp#more
५) https://kartavyasadhana.in/view-article/gender-budget-supriya-jaan

# स्त्रीवादी साहित्य चळवळ व स्त्रीवादी साहित्य समीक्षा

**प्रा. आर. एस. शनवार**
सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय, शहापूर, जि. ठाणे

स्त्रीवाद म्हणजे लिंगभेद झुगारून स्त्री-पुरुषसमानतेकडे वाटचाल करणारा विचारप्रवाह सामान्यतः स्त्रीवाद ही पुरुषविरोध चळवळ समजली जाते. त्यामुळे ही स्त्रियांचे ऐतिहासिक दुय्यमत्व उजेडात आणून हे शोषण संपवण्याचा प्रयत्न करते. ही एक सामाजिक, राजकीय चळवळ आहे.'चळवळ' हा शब्द Movement या शब्दावरून आला. मराठी शब्दकोशामध्ये चळवळ' म्हणजे हालचाल, उद्योग असा अर्थ पहावयास मिळतो. 'चळवळ' या शब्दात 'बदल' अथवा 'परिवर्तन' हा अर्थ ध्वनित होतो. जी स्थिती आहे; त्यापासून वेगळे होणे, जे वास्तव आहे त्यामध्ये बदल होणे. मूळ जे काही आहे त्यामध्ये परिवर्तन होणे म्हणजे चळवळ. या बदलामध्ये व परिवर्तनामध्ये जाणीवपूर्वकतेला प्राधान्य असावे लागते "चळवळ म्हणजे मनुष्य जीवनाला त्याच्या उन्नतावस्थेकडे नेणारी एक धडपड, जीवनाला वर्धिष्णु करणारी एक संघटित आचार-विचारांची संघर्षमय प्रक्रिया होय." १ डॉ. मेश्राम यांनी चळवळीकडे विधायक अंगाने पाहिले आहे. चळवळ म्हणजे धडपड, जी धडपड मानवी जीवनाला प्रगतीपथावर नेते, मानवाचे उत्थान करते. अशी धडपड ही संघटितपणे होणे आवश्यक असल्याचेही ते सांगतात. "लोकांत रक्तविहीन मार्गाने सर्व प्रकारचं परिवर्तन घडवून आणून त्यांना दु:खनिरोधाचा मार्ग दाखवणं म्हणजे चळवळ हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच त्यांच्या विचारव्यूहातून आम्हाला शिकवलं आहे.ते मूर्त स्वरूपात दिसत नसेल तर चळवळ या शब्दाला अर्थ उरत नाही."२या व्याख्येत परिवर्तन घडवून आणण्यासाठी, दुःख निवारण्यासाठी शोधलेला मार्ग आहे. विशेषतः रक्तपात न घडविता परिवर्तन व्हावे; यास चवळीत महत्व प्राप्त होते.

स्त्रीवादी साहित्य चळवळीचा उगम स्त्रीमुक्ती चळवळीत स्त्रीवादी विचारप्रणालीतून झाला. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात स्त्रीला स्वतंत्र स्थान मिळाले पाहिजे, यासाठी स्त्रीवादी विचारवंतानी लढा दिला.स्त्रियांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक कार्य करताना पुरुषप्रधान व्यवस्थेत स्त्रीची कशी दडपणूक होते, कुचंबना होते हे पटवून देण्यासाठी स्त्रीवादी विचारवंतांनी, नेत्यांनी कार्य हाती घेतले. लेखन, भाषण,सभा,बैठका, मोर्चे, धरणे, निवेदन याबरोबरच चर्चासत्रे, कार्यशाळा इ. चे आयोजनसुरू करून त्याद्वारे स्त्रियांना जागृत केले. कोणत्याही प्रकारची दडपशाही मानवी जीवनात कायमस्वरूपी टिकत नाही, याचे प्रतीक म्हणजे स्त्रीवादी चळवळ होय. स्त्रीवादी साहित्य ही स्त्रियांची वाङ्मयीन चळवळ आहे. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळाला यातून त्यांना स्वत्वाची जाणीव झाली. आपल्यावरील बंधनांची, पारतंत्र्याची जाणीवही झाली. त्यांच्या ठिकाणचा आत्मविश्वास जागृत झाला. त्यातून त्यांनी लेखनाला सुरुवात केली. स्त्रियांचे प्रश्न तसेच स्वतःचे अनुभव साहित्यातून मांडायला सुरुवात केली. आपल्या साहित्यातून स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला व पुरुषसत्ताक व्यवस्थेला नकार दिला." स्त्रीवाद ही गांधी नेतृत्व असलेली चळवळ नाही अनेक स्त्रियांनी वेगवेगळ्या पातळयांवर या चळवळीत भर घातलेली आहे. त्यामुळे ही चळवळ आणि त्यातून निर्माण झालेले सिद्धांत हे अनेक प्रवाही आहे"३

१९७५ नंतर भारतातील स्त्रीवादी विचारांना सुरुवात झाली असली तरी पाश्चात्य देशात ही सुरुवात १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात झालेली दिसते. राजकीय प्रक्रियेमध्ये स्थान मिळावे, मतदानाचा अधिकार मिळावा,मत स्वातंत्र्य मिळावे, शिक्षणात नोकरी-व्यवसायात स्थान मिळावे, संपत्ती मध्ये वाटा मिळावा अशा अनेक हक्कांसाठी पाश्चात्य देशातील (इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स) स्त्रियांना दीर्घकाळ लढा द्यावा लागला. या हक्कासाठी प्रसंगी त्यांनी तुरुंगवासही भोगला त्यामुळे त्यांच्यातील संघटित शक्ती जागृत झाली. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये मिळणारी

असमानतेची, दुय्यम स्वरुपाची वागणूक याची जाणीव झाली. स्त्रीवादी विचारसरणीच्या मुळाशी स्त्रीमुक्ती-चळवळही कारणीभूत होती. पुढे तिचे रुपांतर स्त्रीवादी विचारांमध्ये झाले. मेरी वुलस्टोन कॉफ्ट यांनी १७९२ मध्ये 'A Vindication of rights of the Women' (स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली) या ग्रंथात स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा विचार मांडला. फ्रेंच राज्यक्रांतीच्या अनुषंगाने आलेल्या 'मानवी हक्कांचे बिल' व अमेरिकेतील 'बिल ऑफ राईट्स' चा आधार घेत तिने स्त्रीच्या मानवी हक्कांविषयी या ग्रंथाद्वारे आवाज उठविला. पुरुषांप्रमाणे स्त्रियांना मानवी हक्क मागणारा हा विचार म्हणजे स्त्रीवादी विचारांच्या इतिहासाचा प्रारंभ आहे.जॉन स्टुअर्ट मिलने 'स्त्रीदास्य' या ग्रंथामध्ये स्त्रियांच्या मताधिकार हक्काचा विचार मांडला. सामाजिक सुधारणांना गती देण्यासाठी स्त्रियांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी स्त्रियांना मतदानाचा हक्क दिलाच पाहिजे असा विचार हिरिरीने मांडला. १८७९ मध्ये हेनरिक इब्सेन यांनी 'हॉल्स हाऊस' नावाचे समस्याप्रधान नाटक लिहिले. हे नाटक एक नवनाट्य होते. या नाटकातील नायिका 'नोरा' घरा विरुद्ध बंड पुकारते व शेवटी घर सोडून निघून जाते. नाटकातील हे विचार त्याकाळी नवीन होते. नोराच्या बंडामुळे त्याकाळच्या स्त्रीया प्रभावित झाल्या. त्यामुळे स्त्रियांच्या मनात वैयक्तिक स्वातंत्र्याची भावना जागृत झाली. 'नोरा' या व्यक्तिरेखेतून इब्सेनने स्त्री स्वातंत्र्याचा व माणूसपणाचा विचार मांडला. हा विचार त्याकाळी नवा होता."स्त्रीवादी चळवळीने स्त्रीयांच्या शोषणाची जी चिकित्सा केली त्यातून स्त्रियांच्या मुक्ती विषयाचा विचारव्यूह आकाराला आला. स्त्रियांची जगाकडे बघण्याची पुरुषांपेक्षा वेगळी दृष्टी स्त्रियांच्या अनुभवांचे पुरुषांपेक्षा वेगळी क्षेत्र याचा विचार यात केला गेला. स्त्रियांच्या वेगळ्या विचारदृष्टीची जाणीव होऊन निर्माण झालेले साहित्य म्हणजे स्त्रीवादी साहित्य होय".४

अमेरिकेत स्त्रीमुक्ती चळवळीला १६७४ पासून प्रारंभ झाला आणि 'स्त्रीवाद' शब्द १९६० मध्ये सर्वप्रथम वापरला. दरम्यानच्या काळात स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी खूप मोठा लढा दिला.१६७४ मध्ये मागरिट बेंटन यांनी स्त्रियांच्या मतदानाच्या हक्काची मागणी केली, पण ती फेटाळली.१७८० मध्ये केवळ संपत्ती धारक स्त्रियांना हा हक्क मिळाला. स्त्रीवाद व स्त्रीवादी साहित्य समीक्षा या संकल्पना स्त्रीमुक्ती चळवळीशी संबंधित आहेत. स्त्रीवादी समीक्षा म्हणजे साहित्याकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन आहे. स्त्रीवादी साहित्य समीक्षेचा अभ्यास करताना 'फिमेल',' फेमेनाईन' व 'फिमिनिष्ट' या शब्दांचे अर्थ समजून घेणे आवश्यक आहेत. फीमेल म्हणजे स्त्री-केवळ स्त्रियांना केलेल्या लेखनाचा यात अंतर्भाव होतो.'फेमेनाइन' म्हणजे स्त्रीप्राधान्य,स्त्रीवाद होय. यामध्ये पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेविरुद्ध राजकीय भूमिका न घेता स्त्रियांनी केलेल्या लेखनाचा समावेश होतो.

आर्यांच्या आगमनापूर्वी भारतात मातृसत्ताक कुटुंब पद्धत होती. आर्यांच्या आगमनानंतर पितृसत्ताक कुटुंब पद्धती निर्माण झाली आणि स्त्रियांचे स्थान खालवले. गौतमबुद्धांनी सर्व प्रकारची गुलामी नाकारली, भिक्षू संघात स्त्रीयांना प्रवेश, निब्बानाचा अधिकार दिला. महानुभाव काळात चक्रधरांनीही स्त्रियांना पंथात प्रवेश, संन्यासदिक्षेची परवानगी दिली. म्हणजे चार्वाक, गौतमबुद्ध,चक्रधर हे भारतीय परंपरेतील स्त्रीस्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. इंग्रजी राजवटीत राजा राममोहन रॉय यांनी सतीबंदीसाठी निकराचा प्रयत्न केला. इंग्रजांनी सतीबंदी कायदा, घटस्फोटाला मान्यता, विधवा-पुनर्विवाहास मान्यता असे स्त्रीजीवन सुधारण्याचे प्रयत्न केले. महाराष्ट्रात महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, गोपाळ गणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे,र.धों. कर्वे, शाहू महाराज अशा अनेक समाजसुधारकांनी स्त्रीजीवन सुधारणेचे कार्य केले. महाराष्ट्रामध्ये स्त्रीसुधारणेसाठी कार्य करणाऱ्या महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी एक प्रकारे स्त्रीमुक्ती व स्त्रीवादी कार्याची मुहूर्तमेढ रोवली. महात्मा फुले यांनी स्त्रीला पुरुषांपेक्षा श्रेष्ठ मानले.मुलींसाठी शाळा काढली. सावित्रीबाईंना शिक्षणाचे धडे देऊन शिक्षिका केले, बालहत्याप्रतिबंधगृहाची स्थापना केली. स्त्रियांचे शोषण करणाऱ्या चालीरितीविरुद्ध बंड पुकारले. 'पती

निधनानंतर स्त्रीने सती जायचे मग पत्नी निधनानंतर पुरुषाने सती का जाऊ नये? ' हा महात्मा फुले यांचा प्रश्न त्यांच्या स्त्री-पुरुष समानता विचाराचे द्योतक आहे. पतीच्या प्रत्येक कार्यात सक्रिय सहभाग घेणाऱ्या सावित्रीबाई याही स्त्रीवादी चळवळीच्या पुरस्कर्त्या आहेत. महात्मा फुले यांच्या विचाराने प्रभावित झालेल्या ताराबाई शिंदे लिखित 'स्त्री-पुरुष तुलना' हा ग्रंथ म्हणजे मराठीतील स्त्रीवादी विचारांचा प्रारंभ आहे.

लिंगभेदावर आधारित असे समाजाचे दोन घटक आहेत. स्त्री व पुरुष. हे घटक स्त्री व पुरुषांमधील शारीरिक भेदावर अवलंबून आहेत. सिमॉन द बोव्हानं म्हटल्याप्रमाणे,वन इज नॉट बॉर्न अ वुमन, वन बिकस्म वन- कोणी बाई म्हणून जन्माला येत नाही, पण नंतर ती बाई बनवली जाते. म्हणजे केवळ लिंगवैशिष्ट्यामुळे एखाद्या व्यक्तीवर बाईपणाच्या कल्पना लादल्या जातात. "राजकीय व तात्त्विक दृष्ट्या नामाभिधाने लावण्यापेक्षा पारंपारिक दृष्ट्या 'पुरुषी' आणि 'बाईकी' अशा विरोधात्मक ठरविल्या गेलेल्या मूल्यांवर हल्ला करणे आणि आपली राजकीय शक्ती पणाला लावून या भेदमधली वास्तवता नजरेसमोर आणणे हे अधिक जरुरीचे आहे".५ साहित्यातील स्त्री प्रतिमांमध्ये पुरुषांनी व स्त्रियांनी केलेल्या लिखाणाचा अंतर्भाव आहे. वेगवेगळया ऐतिहासिक काळातील स्त्रियांचे जीवन समाजातील व कुटुंबातील त्यांचे स्थान आणि कार्य, त्यांच्याशी घरातल्या व बाहेरच्या लोकांचे असलेले नाते संबंध, त्यांना मिळालेले शिक्षण आणि या सर्वांपेक्षा अधिक महत्त्वाचे व ज्याने वरील गोष्टी नियंत्रित होतात ती म्हणजे तत्कालीन समाजाने स्त्रियांकडून अपेक्षिलेली भूमिका यासंबंधी माहीती मिळवण्यासाठी पुस्तके वाचली जातात. लेखकाने केलेले भाष्य व त्याने स्त्रीपात्रांना दिलेली वर्तणूक यावरूनही त्या लेखकाचे स्त्रीविषयक दृष्टिकोन समजू शकतात. साहित्यातून दिसणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या सार्वत्रिक तथाकथित प्रतिमाही बाजूला काढून त्याने विच्छेदन करता येते.१९६० नंतरच्या दोन दशकांत स्त्रीवादी समीक्षेने स्त्री-पुरुषांच्या जाणवेमधील साम्यावर भर दिला. तर १९८० नंतर स्त्री व पुरुष यांच्यातील भेदांवर अधिक लक्ष केंद्रित केलेले दिसते

**संदर्भसूची:-**

१. डॉ. मेश्राम योगेंद्र, दलित साहित्य जेव्हा चळवळ बनते. पृ.क्र.२

२. कटारे मोतीराम, फुले आंबेडकरी साहित्य: आकलन आणि आस्वाद, पृ.क्र.७६

३. डॉ. महाजन वंदना व इतर,तिचा अवकाश(संपा),शब्दलय प्रकाशन,श्रीरामपूर पृ.क्र.०९

४. तैत्रव,पृ.क्र.१३

५. डॉ. धोंगडे आश्विनी, स्त्रीवादी समीक्षा स्वरूप आणि उपयोजन, दिलीपराज प्रकाशन, पुणे ,पृ.क्र.५०

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal

Impact Factor -(SJIF) –8.575,Issue NO, 341 (CCCXLI)

ISSN : 2278-9308
March, 2022

# स्त्रीवादी चळवळींचा इतिहास

**Mr. Ramdas Yede**

Department History, Sonopant Dandekar College, Palghar - 401404

लिंग ही एक जीवशास्त्रातील संकल्पना आहे. ती एक नैसर्गिक संकल्पना आहे. जीवशास्त्रानुसार पुरुष व स्त्री असे दोन लिंग प्रकार आहेत. मात्र या नैसर्गिक संकल्पनेच्या आधारे समाजामध्ये स्त्रीत्व व पुरुषत्व ह्या सामाजिक संकल्पना निर्माण झाल्या आहेत. स्त्रीत्व आणि पुरुषत्व हे सामाजिक अभिकरणातून निर्माण झालेले आहे. त्यामुळे स्थळ, काळ, वेळ यामध्ये जसजसा बदल होत गेला तसा तसा स्त्रियांचे व पुरुषांचे समाजातील स्थान यामध्ये देखील बदल होत गेला.

स्त्रीवाद म्हणजे तत्कालीन समाजात अस्तित्वात असलेला लिंगभेद झुगारून लावणारा व स्त्री-पुरुष समानतेकडे वाटचाल करणारा विचारप्रवाह. सामान्यतः जरी स्त्रीवाद ही पुरुष विरोधी चळवळ समजली जाते. त्यामुळे ही स्त्रियांचे ऐतिहासिक दुय्यामत्व उजेडात आणून हे शोषण संपवण्याचा प्रयत्न करते. ही एक सामाजिक ,आर्थिक आणि राजकीय जाणीव आहे. स्त्रीवाद म्हणजे लिंगभेदाचा विचार न करता एक माणूस म्हणून स्त्री चा चिचार करणे होय. ढोबळमानाने ही चळवळ पुरुष विरोधी वाटली तरी ती मुलतः समानतेच्या तत्वाचा पुरस्कार करते.

स्त्रीवादी चळवळ ही सतत चालणारी आहे. जसा जसा वेळ बदलतो तसाच समाज देखील बदलत असतो व स्त्रियांचे त्या समाजातील स्थान बदलते, त्यांचे प्रश्न बदलतात. स्त्रीवादी चळवळीची स्थापना कधी झाली हे सांगणे कठीण आहे, कारण महिला हजारो वर्षापासून वेगवेगळया समाज व्यवस्थेमध्ये स्वतःचे स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे. स्त्रीवादी चळवळीची सुरुवात एकोणिसाव्या शतकात युरोपात झाली. ५ ऑक्टोंबर १७८९ रोजी फ्रेंच राज्यक्रांती दरम्यान समान ध्येयासाठी एक चळवळ उभारण्यासाठी महिलांचा पहिला दस्ताऐवाजिक मेळावा झाला. या कार्यक्रमाला नंतर 'व्हर्सायवरील महिला मार्च' असे संबोधले गेले. हा मेळावा अन्नाची कमतरता, उच्च बाजारभाव आणि फ्रांस मध्ये आणखी एक दुष्काळ पडण्याची भीती यावर आधारित होता.

युरोपात सुरु झालेल्या प्रबोधनातून स्वातंत्र्य, समता व बंधुता या विचारांच्या प्रभावातून स्त्रियांच्या तत्कालीन अवस्थेकडे, त्यांच्या प्रश्नांकडे पाहण्याची एक नवी दृष्टी उदयाला आली. यातुन उदयाला आलेल्या नवीन विचारप्रवाहातून स्त्री प्रश्नांची चर्चा घडून यायला सुरुवात झाली. या चळवळीची सुरुवात 'स्त्रियांना मूलभूत कायदेशीर हक्क मिळवून देणे' या प्रश्नापासून सुरु झाली. या कालखंडात काही वर्गातील स्त्रियांना शिक्षण मिळत होते, पण सर्व क्षमता असताना देखील व्यवसाय व राजकारणाच्या क्षेत्रात दुय्यमत्व होते. स्त्रियांचे विश्व् केवळ घारापुरते मर्यादित होते. स्त्रियांकडे वस्तू म्हणून पाहण्याची समाजाची प्रवृत्ती होती. या काळातील अविवाहित स्त्री ही वडिलांची तर विवाहित स्त्री ही तिच्या पतीची मालमत्ता आहे असे समजले जात होते. या काळात प्रगत समजल्या जाणाऱ्या पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता त्यामुळे त्या दुय्यम नागरिक समजल्या जात होत्या.

स्त्रीवादी चळवळींच्या इतिहासात अनेक विचारवंतांनी लिहलेली अनेक पुस्तके महत्वाची आहेत विशेष करून स्त्री विचारवंतांनी अनेक पुस्तके लिहून स्त्रियांचे प्रश्न, स्त्री ला समाजात मिळालेले दुय्यम स्थान, कुटुंब व्यवस्थेमध्ये व पुरुषप्रधान समाजामध्ये स्त्रियांवर होणारे अन्याय जगापुढे आणण्याचा प्रयत्न अनेक विचारवंतांनी त्यांच्या पुस्तकाच्या माध्यमांतून केला. महिलांच्या हक्कांवर आणि असमानतेवर बोलणाऱ्या पहिल्या महिलांपैकी एक म्हणजे फ्रेंच नाटककार ' ओलीम्प्स डी गॉजेस' ज्यांनी १७९१ मध्ये ' 'Declaration of the Rights of Women' हा

ग्रंथ लिहिला. त्यांनी या ग्रंथात सांगितले कि, पुरुषांच्या प्रमाणेच स्त्रिया स्वतंत्रपणे जन्माला येतात म्हणून कायद्याने पुरुषांच्या समान असतात. जे नैसर्गिक अधिकार पुरुषांना आहेत तेच स्त्रियांनादेखील आहेत. मेरी वोल्टनस्क्राफ्ट यांनी 'ए व्हिण्डीकेशन ऑफ दि राईट्स ऑफ वूमेन' या पुस्तकात स्त्री स्वातंत्र्याचा व स्त्री- पुरुष समतेचा जोरदार पुरस्कार केला. स्त्री निर्णयक्षम झाली पाहिजे समाजात व राजकारणात तिला तिचे अस्तित्व निर्माण करता आले पाहिजे व त्यासाठी तिला मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे असे मत त्यांनी मांडले.

फ्रेडरिक एंगल्स यांचा 'द ओरिजिन ऑफ द फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड द स्टेट' (१९४५) या आपल्या ग्रंथात ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधारे स्त्रियांचे शोषण हे निसर्गदत्त नसून, कुटुंबव्यवस्था, खाजगी मालमत्ता व राज्यसंस्था याच्या उद्या बरोबर कसे सुरु झाले ते स्पष्ट केले आहे. एंगल्स यांच्या मते वर्ग व्यवस्थेच्या उच्चाटन झाल्यावरच स्त्रीचे पुरुषांवरील आर्थिक परावलंबित्व नष्ट होईल.

सीमाँ दि बुव्हा यांचे 'द सेकंड सेक्स' हे पुस्तक १९४९ साली प्रकाशित झाले. या पुस्तकात त्यांनी स्त्री यांना समाजात दुय्यम स्थान कसे मिळाले याचे विश्लेषण केले आहे. त्यांच्या मते, **स्त्री जन्माला येत नाही तर ती घडवली जाते**. रानटी अवस्थेत स्त्री कडे सर्व नैसर्गिक अधिकार होते. सततचे मातृत्व यामुळे स्त्रीचे जीवन मुलांचा व घराचा सांभाळ करणे इतकेच मर्यादित राहिले. शेतीचा लागलेला शोध व त्यामुळे स्थायिक झालेले मानवी जीवन यामुळे स्त्रियांचे कुटुंबात स्थान कमकुवत झाले.

जॉन स्टुअर्ट मिल यांनी ' द सब्जेक्शन ऑफ वुमेन' १८६९ या आपल्या ग्रंथात स्त्री ला देखील सामान शिक्षण देऊन सामान नागरी हक्क व आर्थिक संधी मिळाली पाहिजे असे मत मांडले. मिल च्या मते, पत्नी व माता म्हणून स्त्रीया जबाबदाऱ्या पार पडत असतात त्या कामातच स्त्रियांचा बहुतांश वेळ खर्ची पडत असतो, बोद्धिक कामे करण्यासाठी लागणारी एकाग्रता ही यामुळे हिरावून घेतली जाते. स्त्रियांना घटस्फोटाचा, नोकरी करण्याचा व संपत्तीचा अधिकार असावा. महिलांना मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी १८६८ साली विधिमंडळाचा सदस्य असताना मिलने बिल सादर केले होते, मात्र ते फेटाळले गेले. मिलच्या मते, 'पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचे अधिकार नाकारले जावे असे कोणतेही सबळ कारण नाही.'

पुढील काळात स्त्री पुरुषी वर्चस्वातून मुक्त झाली पाहिजे यासाठी अनेक लढे उभारले गेले. राष्ट्रीय अमेरिकन महिला मताधिकार संघ या संघटनेच्या प्रयत्नातून १९६९ मध्ये सर्वप्रथम वायोमिंग राज्यात महिलांना मताधिकार मिळाला. याचे पडसाद जगभरात उमटायला लागले. यापूर्वीच १८९३ मध्ये न्यूझीलंड हे महिलांना मताधिकार देणारे जगातील पहिले राष्ट्र होते.

स्त्रियांना लैंगिक स्वातंत्र्य, सामान संधी व नागरी स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी १९६० मध्ये 'नॅश्नल ऑरगॅनाझेशन फॉर वूमन' या संघटनेची स्थापना करण्यात आली. स्त्री व पुरुष यांच्यामध्ये संसाधनांचे सामान वाटप झाल्याशिवाय स्त्रियांना न्याय प्राप्त होणार नाही असे मत या संघटनेचे होते. या चळवळीतून १९६१ मध्ये अमेरिकन अन्न आणि औषध प्रशासनाने गर्भनिरोधक गोळ्यांना मंजुरी दिली. यामुळे स्वतःचे व्यवसायिक कारकीर्द सांभाळता येणे शक्यता झाले. व नको असलेले मातृत्व नाकारता नेऊ लागले. हा काळ स्त्रियांच्या पुनरुत्पादन अधिकारावर केंद्रित होता. या काळातील स्त्रीवाद्यांनी असे मत मांडले की, जन्म नियंत्रण आणि गर्भपाद हा मूलभूत अधिकार आहे.

१९७० च्या दशकात पर्यावरणीय स्त्रीवादी चळवळीला चालना मिळाली. आपल्या परिसरातील साधनसंपत्तीचा उपयोग करून मानवाने प्रगती केले. वैज्ञानिक क्रांतीनंतर भांडवलशाहीने निसर्गाची लुटालूट केली. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला. यातूनच पर्यावरवणवादी चळवळींचा उदय झाला. या चळवळींमध्ये स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. याचे उदाहरण म्हणजे आफ्रिकेतील वंगारी मथाई व भारतातील मेधा पाठकर.

१९८५ मध्ये नैरोबी येथील स्त्रीवादी परिषदेमध्ये असे अधोरेखित करण्यात आले की, तिसऱ्या जगातील स्त्रियांच्या समस्या या पहिल्या जगातील स्त्रियांच्या समस्येपेक्षा वेगळया आहेत. तिसऱ्या जगातील स्त्रियांचे प्रश्न जास्त गंभीर आहेत.१९९७ मध्ये 'थर्ड वेव्ह फाउंडेशन' ची स्थापना करण्यात आली. लिंग, वांशिक, आर्थिक आणि सामाजिक न्यायासाठी काम करणाऱ्या गटांना आणि व्यक्तींना हे फाउंडेशन समर्पित होते.

स्त्रीवादाच्या वेगवेगळ्या चळवळीतून युरोपात व अमेरिकेत राजकीय प्रतिनिधित्वाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात सुधारणा घडून आल्या. १९९३ पर्यंत सिनेटमध्ये ५ महिला सदस्यांना सामील करून घेण्यात आले. १९९३ च्या कौटुंबिक वैद्यकीय रजा कायद्याने कर्मचाऱ्यांना वैद्यकीय आणीबाणीसाठी बिनपगारी राजा घेण्याची परवानगी मिळाली. अत्याचारांचा सामना करण्यासाठी १९९५ मध्ये 'महिला हिंसाचार कायदा मंजूर करण्यात आला.
अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने 2004 च्या कायद्याने अर्धवट जन्म व गर्भपात बंदी आणि गर्भपाता वरील निर्बंधांना मान्यता दिली होती. या विरोधात वॉशिंग्टन डीसी मध्ये ‘मार्च वुमेन्स’ आंदोलन सुरु झाले. यात सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. मोर्चातील प्रतिसादाने प्रजनन अधिकाराचा मुद्दा स्त्रियांकरिता किती महत्त्वाचा आहे हे दाखवून दिले याचा परिणाम म्हणून गर्भपात निर्बंध कायद्यात सुधारणा करण्यात आली.

२००६ रोजी तराना बर्के यांनी myspace नावाच्या सामाजिक माध्यमाचा वापर करून शाररीक अत्याचाराविरुद्ध Me too या शब्दाचा प्रथम वापर केला होता. एका १३ वर्षाच्या मुलीला तिच्यावर झालेल्या अत्याचारा विषयी विचारले असता तिने me too या शब्दाचा वापर केला होता, तेव्हापासून अनेक सामाजिक मध्यमांद्वारे अनेक स्त्रियांनी या me too शब्दाचा वापर करून आपल्यावर झालेल्या अत्याचारांची माहिती सांगण्यास सुरु केली.२०१७ रोजी अमेरिका अभिनेत्री अलिसा मिलानो हिने # me too चा वापर एक चित्रपट निर्मात्यासाठी केला तेव्हा ही चळवळ प्रसिद्ध झाली.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच पूर्वेकडील वसाहती स्वातंत्र्यासाठी आंदोलन करू लागली. या वसाहती मधील स्त्रियांचा स्वातंत्र्य आंदोलनातील हस्तक्षेप महत्वाचा आहे. चीनमध्ये 20 व्या शतकापूर्वी महिलांना पुरुषांपेक्षा भिन्न समजले जात असे. चीनमध्ये स्त्रीवादाची सुरुवात १९११ मध्ये झालेल्या चीनी क्रांतीने झाली.
भारतातील स्त्रीवाचा इतिहास तिन टप्प्यात विभागाला जाऊ शकतो. पहिला टप्पा १९ व्या शतकाच्या मध्यापासून सुरु झाला. जेव्हा सुधारणावद्यन्निओ महिलांसाठी शिक्षण सुरु केले तसेच, महिल्यांच्या समाजातील ज्या विविध प्रथा होत्या त्यामध्ये सुधारणा घडवून आणल्या. दुसरा टप्पा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनांच्या काळात सुरु होतो. या कालखंडात महिलांनी वेगवेगळ्या स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग घेतला तसे अन्ने बझेत या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस च्या पहिला महिला अध्यक्ष होता. या काळात गांधीजींनी सुरु केलेल्या अनेक आंदोलनात महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. तिसरा टप्पा स्वातंत्रोत्तर काळात सुरु होतो. ज्यामध्ये महिलांचे समाजातील स्थान, राजकीय सहभाग आणि आर्थिक स्वातंत्र्य यासाठी आंदोलने झाली.

भारताच्या संदर्भाने विचार केला असता १९८०-९० च्या दशकात बलात्काराच्या विरोधात राष्ट्रीय निषेध नोंदवले गेले होते. त्या कालखंडात अनेक भारतीयांच्या मानसिकतेत ढोंगीपणा आणि महिलांच्या स्वतःच्या बलात्कार यामध्ये दोषी पणाचे अनेक प्रकरण पुढे आले. याविरुद्ध त्यांनी आंदोलने केली याचे उत्तम उदाहरण म्हणजे हेतल पारखे भावरी देवी आणि प्रतिभा मूर्ती यासारख्या बलात्कार प्रकरणामुळे देशभर निदर्शने झाली त्यामध्ये भारतीय महिलांना कायदेशीर विजय मिळाला याचा परिणाम भारतातील राजकीय क्षेत्रावर घडून आला व भारताच्या राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व वाढले. 1995 मध्ये मायावती पहिल्या अनुसूचित जातीच्या मुख्यमंत्री झाल्या एकोणीशे नव्याणव मध्ये सोनिया गांधी पहिल्या महिला विरोधी पक्षनेत्या मधल्या 2007 मध्ये प्रतिभाताई पाटील या भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती झाल्या आणि मीराकुमार पहिल्या महिला सभापती

झाल्या भारतातील स्त्रियांना अजुनही शिक्षणाचे अनुपलब्धता मालमत्तेवर अल्पाधिकार घरगुती हिंसाचार आणि काही वेळा नावांसाठी लैंगिक छळ अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहेत.

अविकसित व विकसनशील देशांतील स्त्रियांच्या व्यथा आणि हक्क, शैक्षणिक समस्या, सामाजिक मागासलेपणा इ. विषयांची दखल व चर्चा करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने ( युनो ) कोपनहेगन ( डेन्मार्क ) येथे जागतिक परिषदेचे आयोजन केले (१९८०). या परिषदेत जे काही ठराव झाले व धोरण ठरले, त्याची प्रत्यक्षात कार्यवाही काय झाली, याविषयी १९९४ मध्ये जागतिक महिला परिषद भरविण्यात आली.

एकूण पाश्चात्त्य स्त्रीवादाच्या विचारसरणीत स्त्रीच्या व्यक्तित्वाचा मानसन्मान, सर्व प्रकारची स्वातंत्र्ये आणि समानता यांवर भर देण्यात आला आहे; तथापि भारतात स्त्री विरुद्ध पुरुष अशी भावना भारतीय संस्कृतीत कधीच नव्हती. उलट, स्त्रियांच्या उद्धाराचे प्रयत्न राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, आगरकर, न्यायमूर्ती रानडे, महर्षी कर्वे इ. पुरुषांनीच मोठ्या प्रमाणात सुरू केले. कुटुंबसंस्थेला भारतीय संस्कृतीत अनन्यसाधारण महत्त्व असल्याने पती, पिता, भाऊ, मामा, काका या नातेसंबंधांतून स्त्री-विकासाचे मार्ग खुले झालेले दिसतात. व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा व्यापक समाजहितासाठी त्याग करण्याची परंपरा भारतात असल्याने स्त्रीवादाची भूमिका भारतीय परिप्रेक्ष्यात पाश्चात्त्यांच्या विचारांपेक्षा वेगळी करण्याची गरज भासते. तरी अंतिमतः स्त्रीवादाचा साकल्याने विचार केल्यास, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समता व आत्मनिर्भरता या गोष्टी स्त्रीउद्धारासाठी अपरिहार्य ठरतात.

**संदर्भ**

1.भसीन कामाला : लिंगभाव समजून घेताना
2.भागवत विद्युंत : स्त्रीवादी सामाजिक विचार
3.सिमोन दि बोहुवर : दि सेकेंद सेक्स
4.सुमंत यशवंत : स्त्रीवाद – उदारमतवादी आणि मार्क्सवदी
5.भोसले नारायण: जात वर्गलिंगभाव इतिहास मीमांसा

ISSN : 2278-9308
March, 2022

# स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांचा राजकीय सहभाग महिला सबलीकरणाचा एक प्रयत्न

**प्रा.डॉ.दयानंद माधवराव गुडेवार**

सहाय्यक प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख,उज्वल ग्रामीण महाविद्यालय, घोणसीता. जळकोट, जि. लातूर

**प्रस्तावना**

प्राचीन काळापासून भारतीय स्त्रीला दुय्यमत्वाचे जीवन मिळालेले आहे. खरी-खुरी प्रगतीही सर्व मानव जातीला समानतेची संधी देण्यात सामावलेली आहे. परंतु, रुढीप्रिय भारतीय समाजाने भारतीय महिलांना अशा संधीपासून दूरच ठेवण्यामध्ये धन्यता मानली आहे. त्यामुळेच भारतीय महिलांची सामाजिक, आर्थिक, राजकीयव धार्मिक स्थिती हा नेहमी चर्चेचा विषय ठरलेला असतो. कोणत्याही समाजाचे आरोग्य आणि सुख निर्देशांक कशामध्ये आहे? हे जर समजून घ्यायचे असेल तर, त्या समाजातील महिलांची स्थिती पाहावी लागेल! यात कोणतीही शंका नाही. समाजातील महिलांच्या स्थितीचे मोजमाप करण्यासाठी त्या समाजातील महिलांचे स्थान व त्यांना देण्यात येणारी राजकीय संधी, याचाही विचार करावा लागतो. याच अनुषंगाने महात्मा गांधीजींनी असे म्हटले होते की, "महिलांचे राजकीय स्थान बळकट करून त्यांची स्थिती उंचावल्याशिवाय भारताचे अस्तित्व टिकणार नाही."

आपला भारत देश हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असणारा देश आहे. भारताच्या राज्यघटनेने प्रौढ मताधिकाराद्वारेसार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक, गणराज्याची स्थापना करण्याचा उद्देश बाळगलेला आहे. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान, पंडित जवाहरलाल नेहरू यांनी असे म्हटले होते की, "लोकतंत्र का अर्थ केवल राजनितिक एवं आर्थिक ही नही है, अपितु कुछ - कुछ मानसिकता से भी है। अर्थात, लोकतंत्र में प्रत्येक व्यक्ती को आर्थिक एवं राजनीतिक क्षेत्र में समानता के अवसर मिलने चाहिए।" अशा अनेक महान व्यक्तींच्या विचारांचा विचार करून भारतात स्थानिक शासनाची सुरुवात करण्याचा विचार झाला.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1) स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास करणे.
2) स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.
3) स्थानिक स्वराज्य संस्था आणि महिला सबलीकरण यांचा संबंध तपासणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधनाच्या द्वितीय सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. त्यासाठी वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट, विविध प्रकारचे अहवाल इत्यादींचा वापर करण्यात आलेला आहे.

**गृहीतकृत्ये**

1) स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामीण भागासाठीच्या विकासासाठी वरदान ठरत आहेत.
2) स्थानिक स्वराज्य संस्थेमुळे महिलांचा राजकीय सहभाग शक्य झाला आहे.
3) स्थानिक स्वराज्य संस्थेमुळे महिलांचे सबलीकरण होण्यास मदत झालेली आहे.

**संशोधनाचे महत्त्व**

प्राचीन काळामध्ये उच्च वर्गातील भारतीय महिलांची स्थिती बरी होती. परंतु जसेजसे काळ बदलत गेला, तसे - तसे भारतीय समाजाने स्त्रीला अधिक दुय्यमत्व देण्याचा प्रयत्न केला. भारतीय स्त्रियांना सैद्धांतिक पातळीवर व कायद्याच्या बाजूने अधिक मजबूत व संरक्षित करण्याचा प्रयत्न केला जात असला तरी, वस्तुतः भारतीय समाज व भारतीय समाजाची मानसिकता भारतीय स्त्रीला दुय्यम दर्जाची वागणूक देण्याची एकही संधी सोडताना दिसून येत नाही. भारतीय स्त्रियांचे राजकीय सहभागातील मूलभूत प्रश्न कोणते? त्यांच्या अडचणी कोणत्या? महिला सबलीकरणासाठी शासन कोणते प्रयत्न करत आहे? या व अशा अनेक बाबींवर प्रकाश टाकण्यासाठी हे संशोधन महत्त्वपूर्ण आहे.

**महिला सबलीकरणाचा मागोवा**

संपूर्ण जगामध्ये स्त्री-पुरुष विषमता कोणत्या ना कोणत्या प्रकारे आजही अस्तित्वात आहे. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे स्त्रियांची दुय्यम भूमिका आणि स्थान हे स्त्रियांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण करीत आहेत. पावलो फ्रीरे यांनी, "महिला सक्षमीकरण" ही संकल्पना सर्वप्रथम मांडली. तसेच, "अबला महिलांना सबला करण्यासाठी

त्यांना समान संधी दिली पाहिजे." हा विचार मांडला. 18 व्या शतकात ब्रिटिश लेखिकामेरी वुलस्ट्रोन क्राफ्टचे, "A vindication of the rights of women withstrictures on political and moral subjects"(1792)हे महिला सबलीकरणाचे समर्थन करणारे पहिले पुस्तक मानले जाते.देवी सुमती यांनी या प्रश्नावर बोलत असताना असे म्हटले की, Gender bias and discrimination against women begins from the day the female child is born, since and over whelming preference in our society is bestowed on the male child. Poor childhood care of education and lack of other supporting factors adverselyaffect the growth and personality of women. Economic dependence, dowry, violence against women and many other socoi-psychological factors make her position more vulnerable and prone to exploitation. That is why empowerment of women is very necessary and is the most discussed termnow a days, and it has many dimensions such as inheritance and ownership of property, sexuality, equality in all social, economic and political spheres. Empowerment of women refers to creating a situation in which they can decide their own density and also participate as equal partners in various developmental activities.म्हणजेच, "स्त्रीच्या जन्मापासूनच लिंग भेदभाव करून तिची उपेक्षा केली आहे. पुरुष वर्गाने निर्माण केलेली समाज रचना लिंग भावनेवर आधारित असून तिला पूर्णपणे परावलंबी केले. त्यात तिचे मन असे घडविले आहे की, पुरुष वर्गाने जी प्रतिमा उभी केली आहे, त्यापेक्षा वेगळे व स्वतंत्र अस्तित्व आपले आहे. याबाबतचे भान तिला राहिले नाही. तात्पर्य, सुरुवातीपासूनच पुरुष वर्गाने स्त्रियांना कमी लेखून त्यांचे क्षेत्र चूल व मूल यापुरतेच मर्यादित केले आहे. स्त्रीला फारशी बुद्धी नसते. ती शारीरिकदृष्ट्या दूर्बल व कोमल असते.त्यामुळे ती सार्वजनिक जीवनात टिकू शकत नाही. पुरुष वर्गाचा हा अहंभाव स्त्री-पुरुष विषमतेला कारणीभूत ठरला.यावर उपाय म्हणून, 1975 मध्ये युनोच्या पुढाकाराने मेक्सिकोमध्ये जागतिक पातळीवर जी पहिली महिला परिषद झाली. त्यात सरकार आणि बिनसरकारी परिषद असे दोन विभाग करून महिलांच्या प्रश्नावर सखोल चर्चा करण्यात आली. या परिषदेच्या निमित्ताने विविध देशातील सरकारानी आपला सहभाग नोंदवला. तसेच अनेक स्वयंसेवी संस्थांनी (NGO) सहभाग नोंदवल्याने याला सरकारी व बिनसरकारी संस्थांचा सहभाग असे म्हटले गेले.

महिला सबलीकरण ही संकल्पना 1985 मध्ये नैरोबी येथील जागतिक महिला परिषदेमध्ये उदयास आली. 'Women's rights are human rights'ही घोषणा 1994 मध्ये बीजिंग परिषदेमध्ये देण्यात आली. संयुक्त राष्ट्र संघटनेने 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी हक्काची सनद मंजूर केली.त्यात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क दिले. जगामध्ये सर्वप्रथम महिलांना मतदानाचा अधिकार न्यूझीलंड या देशाने 1893 मध्ये दिला. अमेरिकेने 1920 मध्ये तर, भारताने 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीच्या प्रसंगाने महिलांना मतदानाचा अधिकार दिला.

**महिला सबलीकरणाचा अर्थ :-**

महिला सबलीकरण म्हणजे त्यांना स्वावलंबी बनवणं असा ढोबळ मानाने अर्थ काढता येईल. महिला सबलीकरण या शब्दाची फोड केल्यास महिलांना सबल करणारी म्हणजेच दुर्बलता नष्ट करणारी, तिच्या शरीर, मन व बुध्दीत स्वत्वाची जाणीव व स्वतःबद्दल जागृतता निर्माण करून त्यादृष्टीने स्त्रियांच्या विकासासाठी प्रयत्न करणे होय.

**1) ऑक्सफर्ड डिक्शनरीमध्ये,**

"महिलांचे सबलीकरण म्हणजे त्यांना नैसर्गिक, कायदेविषयक, नैतिक अधिकार देणे होय." महिला सबलीकरण ही एक दीर्घ स्वरूपाची प्रक्रीया असल्याचे सांगितले आहे.

**2) व्हिनेसा ग्रिफेन**

"स्त्रीच्या अंगी निर्णय घेण्याची, नियंत्रण करण्याची, संघटन करण्याची क्षमता, मतप्रदर्शन करणे, कृतिशील कार्यक्रम घडवून आणणे, लोकसंपर्क, आर्थिक व्यवहार, आवड पूर्ण होणे यास महिला सक्षमीकरण असे म्हणतात."

3) **ब्राऊन बेब्लेन**

"स्त्री सबलीकरण म्हणजे, स्त्री-पुरुष संबंधातील विषमतापूर्वक व्यवस्था नष्ट करून लिंगभेद विरहित निरपेक्ष समाज निर्माण करू पाहणारी एक चळवळ होय."

**महिला सबलीकरणाचे उद्दिष्टे**

1) महिला सबलीकरणाच्या माध्यमातून राष्ट्राचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न करणे.
2) स्त्री-पुरुष समतेवर आधारित सामाजिक व्यवस्थेची निर्मिती करणे.
3) स्त्रियांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळवून देणे.

**महिला सबलीकरणाची साधने**

1) भारतीय महिलांचे आर्थिक परावलंबित्व दूर करण्याचा प्रयत्न करणे.

2) महिलांच्या हितासाठी शासन यंत्रणेवर दबावतंत्राचा वापर करणे.

3) महिलांना विविध प्रकारचे सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करणे.

७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायतीराज संस्थांमध्ये (जि.परिषद, पं.समिती आणि ग्रामपंचायतीमध्ये) महिलांना ३३% आरक्षण देऊन म. गांधीच्या विचारातील, "ग्रासरुट डेमोक्रसी" प्रत्यक्ष साकार झाली. कित्येक वर्षापासून भारतीय समाजामध्ये आणि राजकारणामध्ये महिलांची स्थिती अनेक दृष्टीने मागासलेली होती. अनेक रुढी, प्रथा, परंपरामध्ये महिला गुंतलेली होती. महिलांचा विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने कोणत्याही प्रकारचे वातावरण प्राचीन काळामध्ये नव्हते. तरीदेखील काही स्वकीय आणि परकीय समाजसुधारकांनी स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. देशाच्या स्वातंत्र्यानंतर लोकशाही व लिखित राज्यघटनेचा स्वीकार करुन भारताने राज्यघटनेच्या माध्यमातून पारंपारिक पद्धतीचे स्त्री - पुरुष विषमतेचे सर्व भेद नष्ट करुन स्त्री - पुरुषांना समान स्वरुपाचे अनेक राजकीय हक्क व अधिकार मान्य केले. या हक्कांच्या माध्यमातून पुरुषाबरोबरच स्त्रियांचादेखील राजकीय विकास होण्यास मदत होणे आवश्यक होते. तरीदेखील स्त्रियांचा राजकीयदृष्ट्या फारसा विकास होऊ शकला नाही. राजकीय विकास, महिलांचा राजकीय सहभागआणि नेतृत्व निर्माण होण्यासाठी 73 व्या घटनादुरुस्तीची नितांत गरज होती.15 ऑगस्ट1947 ला भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळाले होते. परंतु महिलांच्या दृष्टीने 73 वी घटनादुरुस्ती आणि महिला आरक्षण म्हणजे खऱ्या अर्थाने हे स्वातंत्र्य आहे. त्याचप्रमाणे सध्याच्या महाराष्ट्रातील महिलांच्या 50% आरक्षणामुळे देशभरात महिलांसाठी आनंदाचे दिवस आले आहेत.

**महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांतील महिला आरक्षणाच्या तरतूदी :-**

भारतीय राज्यघटनेच्या कलम 40 मध्ये राज्यांच्या धोरणासंबंधीच्या मार्गदर्शक तत्वापैकी एक तत्व समाविष्ट करण्यात आले असून, त्यामध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, "The state should take steps to organise village panchayats and endow them with such powers and authority as may be necessary to enable them to function as units of self-government."म्हणजेच, "राज्य हे ग्रामपंचायती संघटित करण्यासाठी उपाययोजना करील व त्यांना स्वराज्याचे मूल घटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यासाठी आवश्यक असे अधिकार व प्राधिकार बहाल करील."भारत सरकारने नियमित निवडणूका, अनूसूचित जाती/जमाती, इतर मागास वर्ग व महिला यांना पुरेसे प्रतिनिधित्व देणे,तसेच पंचायतीराज संस्थांचे आर्थिक बळ वाढविणे यासारख्या गोष्टींची तरतूद करण्यासाठी 73 वी घटनादुरुस्ती करुन अधिनियम 1992 ची निर्मिती केली. हा अधिनियम 24 एप्रिल 1993 पासून अंमलात आला आहे. त्यानंतर पंचायतीराज संस्थामध्ये महिलांसाठी 33% आरक्षणाची तरतुद करण्यात आलेली आहे.73 व्या घटनादुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थेतील तिन्ही स्तरांमध्ये म्हणजेजिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यामध्ये एकूण सदस्यसंख्येच्या 1/3 जागा व पदे महिलांसाठी राखीव ठेवण्यात येत आहेत. परंतु भारतातील अनेक पुरोगामी घटक राज्यांनी आपापल्या घटक राज्यांमध्ये महिला आरक्षणाची टक्केवारी वाढवलेली आहे. त्यात बिहार, हिमाचल प्रदेश, केरळ, राजस्थान या पाठोपाठ आता महाराष्ट्र राज्यानेही सन 2011 च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 19, दि. 21 एप्रिल 2011 अन्वये,मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 कलम 10 (2) मधील खंड (ब), (क), (ड) मध्ये सुधारणा करण्यात आली असून, स्त्रियांकरिता ग्रामपंचायतीच्या एकूण जागांच्या 1/2 जागा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागास प्रवर्गातील स्त्रियांकरिता राखून ठेवलेल्या जागा धरून) स्त्रियांसाठी राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. थोडक्यात, महाराष्ट्रातील त्रीस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील तीन स्तरांमध्ये सध्या स्त्रियांसाठी 1/2 म्हणजे 50 टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे.त्यामुळे आता कोणत्याही जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यातील सदस्य संख्येचा विचार केल्यास 50 % महिला आरक्षणाने अर्ध्या पेक्षा जास्त महिला सदस्य पहायला मिळत आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिलांच्या आरक्षणामुळे खालील बदल पाहायला मिळतो.**

1) महिलांच्या राजकीय सहभागामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

2) समाजातील दुर्बल व वंचित घटकांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रतिनिधित्व मिळत आहे.

3) भारतीय समाजामध्ये स्त्री - पुरुष समानता निर्माण करण्यासाठी चांगली मदत होईल.

**निष्कर्ष**

1) भारतीय महिलांमध्ये शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण आहे.

2) महिलांच्या कौटुंबिक जबाबदारीमुळे त्या राजकारणाकडे अधिक लक्ष देऊ शकत नाहीत.

3) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पदाच्या कार्याचे प्रशिक्षण व माहिती सर्व महिलांना देणे आवश्यक आहे.

**समस्या**

1) भारतीय संसदेमध्ये महिलांसाठी आरक्षणाची सोय नाही.

2) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदांमध्ये महिलांना अल्प प्रतिनिधित्व दिले जात आहे.

ISSN : 2278-9308
March, 2022

3) भारताच्या विविध राजकीय पक्षामध्ये महिला नेतृत्वाला अतिशय कमी संधी दिली जाते.

4) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रीक निवडणुकीतील खुल्या प्रवर्गातील जागेवर किंवा महिलांसाठी राखीव नसलेल्या जागेवर महिला उमेदवारांचे विजयाचे प्रमाण अत्यल्प आहे.

**उपाय**

1) स्त्री-पुरुष समानतेसाठी शासकीय पातळीवरून अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे.

2) स्त्रियांवरील अत्याचार कमी करण्यासाठी पुरुषांनी पुढाकार घ्यायला पाहिजे.

3) बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक परावलंबित्व दूर करण्याचे जास्तीचे प्रयत्न करणे गरजेचे आहे.

4) महिलांचे आर्थिक परावलंबित्व दूर करण्यासाठी छोट्या - छोट्या कुटीर उद्योगांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक मदत, कमी व्याजदराने कर्ज, अधिक मुदतीचे कर्ज देणे गरजेचे आहे.

5) महिलांसाठी खास प्रशिक्षण वर्ग व नेतृत्व विकासासाठी मेळाव्यांचे आयोजन करावे.

**संदर्भ**

1) डॉ.आर.पी.जोशी व डॉ.रुपा मंगलानी (सं), 'भारत मे पंचायतीराज,'राजस्थान हिंदी ग्रंथ अकादमी जयपूर, तृतीय संस्करण 2010.

2) डॉ. प्रज्ञा शर्मा, 'भारतीय समाज में नारी', पॉइंटर पब्लिशर्स जयपूर, 2001.

3)डॉ.अनिलकठारे,'भारतीय स्त्री चळवळीचा इतिहास', एज्युकेशन पब्लिशर्स औरंगाबाद, 2013.

# स्त्रीवाद आणि महाराष्ट्रातील आदिवासी स्त्री

श्री. भोये दत्तात्रेय रघुनाथ

सहाय्यक प्राध्यापक (इतिहास विभाग) रयत शिक्षण संस्थेचे, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा, जिल्हा – पालघर, ४०१ ६०४.

**सारांश:-**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रातील स्त्रीवादी विचारवंतांनी व संघटनांनी भारतातील विविध जाती-धर्मातील स्त्रीयांच्या अनेक सामाजिक व धार्मिक प्रश्नांना वाचा फोडल्याचे दिसून येते. परिणामी त्यांना त्यात यशही आले. परंतु महाराष्ट्रातील आदिवासी संस्कृतीत स्त्रियांचे स्थान कश्या प्रकारचे आहे आणि महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रीयांच्या समस्यांकडे स्त्रीवाद्यांनी दुर्लक्ष केल्याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे.

**मुख्य शब्द –** देज, गोटूल, धवलेरी.

**प्रस्तावना:-**

"स्त्रीवाद म्हणजे खाजगी, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय पातळीवर होणाऱ्या स्त्रियांच्या शोषणाबद्दल जाणीव निर्माण होणे / करणे आणि त्याबरोबरच शोषनाविरोधी झगडण्याची तयारी असणे म्हणजे स्त्रीवादाचा अंगिकार करणे होय." स्त्रीवाद संकल्पना हि एक सामाजिक चळवळ आहे.

१९६० नंतर स्त्रीवाद या संकल्पनेचा उदय पाश्चिमात्य देशात झाला. या देशातील समकालीन स्त्रीवादाने स्त्री-पुरुषांमध्ये येणारा लिंगाधीष्ठीत साचेबद्धपणा, पुरुषांच्या स्त्रीविषयी प्रतिमा, स्त्रीयांची पारंपारिक कामे, लैंगिक क्रांतीची कल्पना, समान कामाचा हक्क, प्रभावी संततीप्रतिबंधक साधने, नीती-अनीतीवर आधारित मुल्यव्यवस्थेचे उच्चाटन, कुटुंबाची रचना बदलने अश्या विविध प्रश्नांना हात घातला. तसेच उदारमतवादी, जहाल, मार्कवादी आणि समाजवादी आह्या पाश्च्यात्य स्त्रीवादी विचारप्रवाह उदयास आले. परंतु हे विचारप्रवाह भारतीय परिस्थितीत फारसे उपयोगी पडत नाहीत. १९७५ च्या सुमारास आंतरराष्ट्रीय महिला वर्षाच्या निमित्ताने भारतीय स्त्रीयांचा पाश्चात्य स्त्रीमुक्तीवादी चळवळीशी व विचारांशी संपर्क आला. त्यानंतर भारतात १९८० च्या सुरुवातीला मुंबईतील 'स्त्रीमुक्ती संघटना', हैद्राबादमधील 'प्रोग्रेसिव्ह ओर्गनायझेशन ऑफ वुमेन', दिल्लीतील 'स्त्रीसंघर्ष आणि महिला दक्षता', मद्रासमधील 'पेन्नूरामाई इय्यकम' अश्या अनेक संघटना निर्माण झाल्या तसेच महाराष्ट्रातही फोरम अगेन्स्ट ऑपरेशन, स्त्री-मुक्ती संघटना, मैत्रिणी, नारी समता मंच, क्रांतिकारी महिला संघटना, श्रमिक मुक्ती संघटना, फोरम अगेन्स्ट रेप, तलाक मुक्ती मोर्चा समिती अश्या अनेक संघटना उदयास आल्या.

या संघटनांनी स्त्रीयांवरील अत्याचाराचा प्रश्न या संदर्भात बायकांना केली जाणारी मारहाण, बलात्कार, हुंड्यापायी होणारा खून, मुलींचे गर्भपात, सक्तीने वेश्या व्यवसाय, सती, स्त्रीयांच्या आरोग्याचा प्रश्न, कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेची हमी, समान कामाला समान दाम, देवदासी अश्या अनेक प्रश्नांना हात घातला, परंतु या समस्या आदिवासींमध्ये नसल्याचे दिसत नाहीत. तसेच या महाराष्ट्रातील संघटनांचा आदिवासी स्त्रीयांबाबत काही जास्त महत्वाची भूमिका व कार्य केल्याचे दिसत नाहीत किंवा अजूनही समाजाच्या तळागाळापर्यंत हि चळवळ पोचली नाही.

**। संशोधनाची उद्दिष्टे: -**

१) भारतातील व महाराष्ट्रातील स्त्रीवादी संघटना आणि त्यांची स्त्री प्रश्नाबाबतची भूमिका तपासणे.

२) महाराष्ट्रातील आदिवासींमध्ये आदिवासी स्त्रीचे स्थान तपासणे.

३) महाराष्ट्रातील आदिवासी महिलांच्या समस्या व त्या समस्यांच्या बाबतीत स्त्री संघटनांच्या भूमिकाच आढावा घेणे.

**II संशोधन पद्धत व साहित्याचे परिशीलन: -**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. तसेच सदर संशोधनासाठी दुय्यम साधनांचा वापर केला आहे. शासकीय अहवाल, वर्तमानपत्रे, संदर्भ ग्रंथ व इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

**III महाराष्ट्रातील आदिवासी: -**

सह्याद्री, विंध्य, सातपुडा या पर्वतरांगांनी आणि घनदाट जंगलांनी व्यापलेल्या प्रदेशात महादेव कोळी, कोकणा, ढोर कोळी, वारली, कातकरी, ठाकूर, पवार, भिल्ल या आदिवासी जमाती वास्तव्य करून राहतात. दुर्गम भागात राहत असल्यामुळे शहरी जीवनाशी सबंध तुटलेला आहे, त्यामुळे त्यांची स्वतःचीच आचार-विचार पद्धती तयार झालेली आहे.

**i आदिवासी संस्कृतीमध्ये आदिवासी स्त्रीचे स्थान: -**

महाराष्ट्रातील आदिवासी अडाणी असला तरी ते आदिवासी स्त्रीयांना कानिष्ठतेची वागणूक देत नाही. आदिवासी संस्कृतीमध्ये आदिवासी स्त्रीचे स्थान पुढीलप्रमाणे नमूद करता येईल.

**१) समानतेची वागणूक: -**

इतर जाती-धर्मातील लोकांप्रमाणे आदिवासींमध्ये मुलगा किंवा मुलगी सा भेदभाव केला जात नाही. या संस्कृतीमध्ये मुलगी हि आर्थिकदृष्ट्या जमेची बाजू असते. त्यामुळे त्यांच्यामध्ये मुलगी किंवा मुलगा दोघांनाही समान वागणूक मिळते. आदिवासींमध्ये जन्माला मुला-मुलींचे सारख्याच पद्धतीने स्वागत होते. त्यामुळे आदिवासींमध्ये स्त्री-भ्रुण हत्या, गर्भपात यांसारखे प्रकार बघावयास मिळत नाहीत.

हिंदू समाजात मात्र उलट परिस्थिती दिसते. मुलगा हा कुळाचा वंश मानल्याने व म्हातारपणी आई-वडिलांचा आधार असल्याने मुलींपेक्षा मुलांचे कौतुक जास्त होते. घरामध्ये तसेच समाजात दोघांनाही वेगवेगळया प्रकारची वागणूक मिळते. परिणामी गर्भपात, स्त्री-भ्रुण हत्या यांसारखे प्रकार बघावयास मिळतात.

**२) स्वातंत्र्य: -**

वयात आलेल्या आदिवासी मुली व मुले एकत्र येतात. त्यांना तेथे भावी जीवनामध्ये कसे वागायचे याचे शिक्षण मिळते. थोडक्यात मुला-मुलींना वागण्या-बोलण्यामध्ये बरेच स्वातंत्र्य दिलेले असते. या स्वातंत्र्याचा गैरफायदा त्यांच्याकडून घेतला जात नाही. दिवाळी, होळी, अखाजा (अक्षय तृतीय) या सणांच्या दिवशी मुली आणि मुले एकत्र येवून रात्रभर नाच-गाणे करतात. आदिवासी मुलींच्या तुलनेत इतर जाती-धर्मातील मुलींना कमी स्वातंत्र्य असल्याचे बघावयास मिळते.

**३) नवरदेव (मुलगा) निवडीचे स्वातंत्र्य: -**

भावी मुलाच्या निवडीबाबत आदिवासी मुलींना बरेच स्वातंत्र्य असते. मुलीला मुलगा निवडण्याच्या प्रथेला 'गोटूल प्रथा' असे म्हंटले जाते. लग्नाच्या बाबतीत घरातील करती व्यक्ती पुढाकार घेत असली तरी लग्न हे मुलगा आणि मुलगी यांच्या विचार-विनिमयानेच ठरते. आदिवासी मुलीचे लग्न हे १५ ते २० वर्षाच्या दरम्यान होत असतात. आदिवासींमध्ये लग्न लावण्याचे काम म्हातारी स्त्री करत होती, तिला 'धवलेरी' असे म्हंटले जाई. लग्नाच्या प्रसंगी मुलीच्या आई-वडिलांना मदत म्हणून मुलाच्या कुटुंबाकडून धान्य दिले जाई, त्या प्रथेला 'देज' असे म्हंटले

जाई. त्यामुळे वाहरू सोनवणेसारखे आदिवासी कार्यकर्ते अभिमानाने सांगतात कि, आदिवासी हुंड्यासाठी स्त्रियांचे बळी घेत नाही.

इतर जातीत मुलीला मुलगा निवडीचे अस्वातंत्र्य, हुंडाप्रथा अस्तित्वात आहेत.

**४) लग्नानंतर आदिवासी स्त्री-जीवन: -**

लग्नानंतर आदिवासी स्त्री नवीन जीवनाला सुरुवात करते. तिला पत्नीची भूमिका आणि मातेची भूमिका पार पदवी लागते. तिला नवऱ्याच्या बरोबरीने घरात स्वातंत्र्य असते. दिवाळी, होळी, आखाजा या सणासुदीला ती जाहीरपणे नाचते, गाणे गाते तसेच काही स्त्रीया धुम्रपान व दारूचे सेवनही करतात. तसे इतर जाती-धर्मात फारसे बघायला मिळणे कठीण आहे.

**५) घटस्फोट व पुनर्विवाह: -**

आदिवासी स्त्रीला घटस्फोट घेण्याच्या बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य असते. नवऱ्याचा जाच, त्याचे नपुसंकत्व ही घटस्फोट घेण्यामागची करणे आहेत. घटस्फोट घेतलेली स्त्री तिच्या मनानुसार पुनर्विवाह करू शकते किंवा अगोदरच्या नवऱ्यापासून जर मुले झालेली असती तर त्यांची हेळसांड होवू नये व भविष्यात आपले मुलाच्या मोठेपणात चांगले दिवस येतील या विचाराने ती लग्न करत नाही, थोडक्यात पुनर्विवाहाबाबत तिला पूर्ण स्वातंत्र्य असते.

आदिवासी समाजात विधवा स्त्री व सुहासिनी यांच्यात फारसा फरक केला जात नाही, तसेच विधवा स्त्री पुनर्विवाह सुद्धा करू शकते.

इतर जाती-धर्मात विधवा स्त्रीचे जीवन एकाकी पडल्याचे दिसते.

**६) आर्थिक सहयोग: -**

आदिवासी समाजामध्ये स्त्री-पुरुषांनी कोणती कामे करावीत हे ठरलेलेअसते. शेतातील व घरातील हलकी-सलकी, सहज करता येण्याजोग कामे स्त्रीया करतात, तर अवघड कामे कामे पुरुष करतात. असे असले तरी अनेकदा पुरुषांना करावी लागणारी कामेही स्त्रीया करतांना दिसतात.

जेव्हा आपण आदिवासी स्त्रीच्या जीवनामध्ये येणाऱ्या विविध अवस्थांचा किंवा आदिवासी संस्कृतीमध्ये आदिवासी स्त्रीचे स्थान याबाबत अभ्यास करतो तेव्हा असे लक्षात येते कि, तुलनात्मकदृष्ट्या आदिवासी स्त्री हि हिंदू समाजातील स्त्रीपेक्षा वरीलप्रमाणे स्वातंत्र्य उपभोगातांना दिसते.

**ii आदिवासी स्त्रीयांच्या समस्या: -**

इतर स्त्रीयांपेक्षा आदिवासी स्त्री बऱ्याच प्रमाणात स्वातंत्र्य आहे. याचा अर्थ असा नाही कि, आदिवासी स्त्रीला कोणत्याच समस्या नाहीत. तीलांही समस्या आहेत, परंतु त्या समस्यांकडे महाराष्ट्रातील स्त्रीवादी संघटनांनी किंवा विचारवंतांनी फारसे लक्ष दिल्याचे दिसत नाही.

**१) आरोग्यविषयक समस्या: -**

आरोग्यविषयक समस्या आदिवासी स्त्रीयांपुढील एक ज्वलंत समस्या आहे. आदिवासी संस्कृतीमध्ये आदिवासी स्त्री जमेची बाजू असल्यामुळे तिला अनेक कष्टाची कामे करावी लागतात. गरोदरपणातही तसेच बाळंतपणातही ती अनेक आवाज कामे करत असते, त्यातच तिला अपुरे अन्न मिळत असल्याने तिला अशक्तपणा व इतर शारीरिक दुर्बलता येते. त्याचबरोबर स्त्रियांना इतर गुपारोग होत असतात, परंतु त्या सांगण्यास लाजत असतात. परिणामी त्यांना मृत्युला सामोरे जावे लागते.

**२) निरक्षरतेचे प्रमाण: -**

निरक्षरतेचे प्रमाण आदिवासी भागात जास्त प्रमाणात दिसून येते. पुरुष आणि स्त्री आदिवासींमध्ये स्त्रीयांच्या निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. आदिवासी जमाती ह्या आर्थिकदृष्ट्या दारिद्रयरेषेखाली असल्यामुळे मुली आपल्या आई-वडिलांना मदत कारीत असतात. त्यामुळे त्या निरक्षर राहतात.

**३) आदिवासी स्त्रीयांवर होणारे अत्याचार: -**

आदिवासी स्त्रीयांवर जमीनदार, घरकाम करणाऱ्या स्त्रीचा मालक, जंगल अधिकारी, समाजसेवक वैगेरे मंडळी आदिवासी स्त्रीयांवर बलात्कार, छेडछाड करत असतात.

वरीलप्रमाणे आदिवासी स्त्रीच्या अनेक समस्या आहेत परंतु भारतातील व विशेषतः महाराष्ट्रातील स्त्रीवादी संघटनांनी व विचारवंतांनी २१ वे शतक उजाडले तरी ग्रामीण, डोंगराळ, जंगलात रहाणाऱ्या आदिवासी स्त्रीयांच्या समस्यांकडे लक्ष न देता हिंदू, मुसली, बौद्ध अश्या धर्मातील स्त्री व मध्यमवर्गीय स्त्री यांच्यास समस्या सोडविल्याचे आपणास बघावयास मिळते.

**IV निष्कर्ष: -**

१) स्त्रीवादी विचारवंतांनी व चळवळींनीभारतातील इतर जाती-धर्मातील व मध्यमवर्गीय स्त्रीयांच्या सामाजिक व धार्मिक प्रश्नाची दाखल घेतली आहे.

२) महाराष्ट्रातील इतर जाती-धर्मातील स्त्रीयांच्या तुलनेत महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रीयांना आदिवासी समाजात चांगली वागणूक दिली जाते.

३) आदिवासी संस्कृतीमध्ये आदिवासी स्त्रीची भूमिका महत्वाची आहे.

४) स्त्रीवाद्यांनी महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रीयांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले आहे.

**संदर्भसूची**

१) 'आदिवासी महिलांची स्थिती – मूल्यमापन अहवाल', आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, २००४.

२) डॉ. गारे गोविंद, 'महाराष्ट्रातील आदिवासी जमाती', कोंन्टीनेंटल प्रकाशन, २०१९.

३) 'महाराष्ट्रातील आदिवासी, त्यांचे सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे प्रश्न आणि कल्याणाच्या योजना', आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे, १९७९-८०.

४) महाराष्ट्र टाईम्स, 'आदिवासी स्त्री: मातृसत्ताक ते कुपोषण', २२ ऑक्टोबर, २०१७.

५) डॉ. महाजन जयश्री, प्रा. बडगे सागर, 'आदिवासी समाज – प्रश्न आणि आव्हाने', अथर्व पब्लिकेशन, जळगाव, २०१७.

६)भागवत विद्युत, 'स्त्री-प्रश्नाची वाटचाल: परिवर्तनाच्या दिशेने', प्रतिमा प्रकाशन पुणे, २००९.

७) रानडे प्रतिभा, 'स्त्री प्रश्नांची चर्चा: एकोणिसावे शतक', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५.

८) डॉ. वाघमारे प्रदीप (संपा.), 'आधुनिक महाराष्ट्रातील शोषित अंकित समूह – समस्या, संघर्ष आणि प्रतिकार', अखंड पब्लिकेशन हाउस, दिल्ली, २०२१.

९) साने गीता, 'भारतीय स्त्रीजीवन', मौज प्रकाशनगृह, मुंबई, दुसरी आवृत्ती, १९९७.

# स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांचा सहभाग

प्रियांका विनायक पाटील
सहाय्यक प्राध्यापक
कणकवली कॉलेज कणकवल सिंधुदुर्ग , मोबा.नं.7887545677 ,Email Id - devshripa15@gmail.com

**प्रस्तावना :-**

१५ ऑगस्ट १९४७ नंतर एक सार्वभौम राष्ट्र म्हणून जगाच्या नकाशावर भारताचे स्थान अधोरेखित झाले. १८८५ ते १९४७ हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा गौरवशाली कालखंड म्हणून उल्लेखला जातो. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही सर्वात मोठी लोकचळवळ होती. या चळवळीत स्त्रियांचा सहभाग लक्षणीय होता. पण त्यांच्या सहभागाचा इतिहास १९७५ नंतर अक्षरबद्ध होऊ लागला. १९७५-८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकात भारतातील व भारताबाहेरील संशोधक स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाबद्दल लिहू लागले. पण हा इतिहास सुद्धा बऱ्याचदा उच्च वर्गातील स्त्रियांच्या सहभागापूरताच मर्यादित राहीला. कामगार शेतकरी वर्गातील ज्या स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीत प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहभाग दिला त्यांचा इतिहास साधनाअभावी उपेक्षित राहीला. पण १९२० ते १९४७ या महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली कालखंडात स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचा सहभाग लक्षणीय ठरला.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१) भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचा सहभाग समजून घेणे.

२] स्वातंत्र्य् आंदोलनातील स्त्रियांवरील महात्मा गांधींच्या विचारांचा प्रभाव जाणून घेणे.

३) स्वातंत्र्य चळवळीतील स्त्री संघटन अभ्यासणे.स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचे योगदान समजून घेणे.

● **स्वातंत्र्य आंदोलनातील स्त्री सहभाग :-**

वंगभंग आंदोलनानंतर स्त्रियांनी जाहिरपणे ब्रिटिश विरोधी आंदोलनात भाग घेण्यास सुरुवात केली. १९२० ते १९४७ मध्ये गांधीजींच्या नेतृत्वामुळे सर्व स्तरातून भारतीय स्त्रिया स्वातंत्र्य चळवळीत आल्या. त्यांचे प्रेरणास्थान महात्मा गांधीच होते. गांधीजींना स्त्रीशक्तीची प्रथम जाणीव आफ्रिकेत झाली. आफ्रिकेतील सत्याग्रहाचे नेतृत्व करताना गांधीजींनी स्त्रियांना पाहिले तेव्हा त्यांना जाणवले की, 'पुस्तकी विद्येने नव्हे तर सहनशक्ती व विश्वास यातून निर्माण झालेले कणखर मन हे नेतृत्वासाठी जरुरी आहे. १९१७ मध्ये गुजरातच्या खेडा जिल्ह्यातील 'करबंदी सत्याग्रह व १९१९ साली बिहारमधील चंपारण्य जिल्ह्यातील निळीच्या शेतातील इंग्रज मळेवाल्यांविरुद्ध झालेला लढा व त्यातील स्त्रियांचा सहभाग यातून गांधीजींना स्त्रीशक्तीची जाणीव होऊ लागली.'

रौलेट कायद्याविरुद्ध गांधीजींनी सत्याग्रह पुकारला. त्यावेळी अनुसुया बेग सारख्या स्त्रियांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. १३ एप्रिल १९१९ रोजी जालियनवाला बागेत जनरल डायरने केलेल्या हत्याकांडात स्त्रिया व मुली मिळून ४२ जण मृत्युमुखी पडले. सरोजिनी नायडू होमरुल लीगच्या प्रतिनिधी बनून इंग्लंडला गेल्या असताना तिथे त्यांनी जालियनवाला बाग हत्याकांडाबद्दल निर्भयपणे भाषण केले व साऱ्या जगाचे लक्ष या गोष्टीकडे वेधले.

अहिंसात्मकरित्या आंदोलनाचा राष्ट्रव्यापी कार्यक्रम १९२० नंतर महात्मा गांधींनी जाहिर केला. यावेळी मुंबई व गुजरात प्रांतात अनेक स्त्रिया कस्तुरबांच्या नेतृत्वाखाली आंदोलनात सहभागी झाल्या. यामध्ये चरखा वर्ग चालविणे, स्वयंसेविकांचे गट तयार करणे, स्वदेशी कापड, बांगड्या वापरण्याबद्दल घरोघरी जाऊन स्त्रियांच्यात जागृती करणे, इ. कार्यक्रमांचे नियोजन स्त्रियांकडून केले गेले. यशोदाबाई भट्ट, राधाबाई आपटे यांनी किर्तनाच्या माध्यमातून शहरांत व खेड्यात जागृती घडवून आणण्याचे कार्य केले. गांधीजींच्या विधायक कार्यक्रमात आपण मागे नाही हे या दशकातील स्त्रियांनी सर्व प्रकारच्या कार्यक्रमात यशस्वीरित्या भाग घेऊन सिद्ध केले.

प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारत भेटीच्या वेळी सुद्धा मुंबईतील १००० महिलांनी निदर्शने केली. महात्मा गांधींनी भारतभर स्त्रियांच्या सभेत भाषणे केली. रामायण, महाभारतातील स्त्रियांच्या कर्तृत्वाची उदाहरणे त्यांच्यासमोर ठेवली व त्यांच्यातील अस्मिता जागृत करण्याचे काम केले.

१९३० मध्ये सविनय कायदेभंगाच्या चळवळीचा निर्णय महात्मा गांधींनी घेतला. १२ मार्च रोजी ७८ सहकाऱ्यांसमवेत साबरमती आश्रमातून गुजरात किनाऱ्यावरील २४१ मैलांचे अंतर पायी चालून दांडी येथे मिठाचा कायदा मोडावयाचा असे ठरले. या दांडी यात्रेत सरोजिनी नायडूंचा सहभाग महत्त्वाचा होता. ६ एप्रिल १९३० ला मिठाचा कायदा मोडण्यात आला. गांधीजींच्या अटकेनंतर धारासना सत्याग्रहाची सुत्रे सरोजिनी नायडू यांनी आपल्या हाती घेतली. युनाटेड प्रेसचे अमेरिकन वार्ताहर बेट मिलर यांनी या घटनेचे वर्णन केले आहे. सत्याग्रहाच्या पहिल्या दिवशी जमलेल्या सत्याग्रहींना सरोजिनी नायडूंनी सांगितले की लाठीमार झाला तरी प्रतिकारासाठी हात उचलू नये. धारासनात सत्याग्रहींची अलोट ध्येय, निर्भयता, मृत्युला हसतमुखाने सामोरे जाणे याचा सर्वांनाच अचंबा वाटला. मिलर लिहितात, "१८ वर्षाच्या पत्रकारितेच्या काळात विविध देशातील २६ जनआंदोलने पाहिली पण धारासनासारखा सत्याग्रह पाहिलाच नाही."

१९४० सालच्या वैयक्तिक सत्याग्रहात महाराष्ट्रातील पहिली स्त्री सत्याग्रही पद्माताई हशेलीकर ह्या होत्या. दारु दुकानावरील मोर्चे, मिठाचा सत्याग्रह, खादी तयार करणे आणि वापरणे या गोष्टी गांधींनी स्त्रियांवर सोपवल्या. कमलादेवी चट्टोपाध्याय व अवंतिकाबाई गोखले यांनी अमृतसर हत्याकांडाची आठवण म्हणून मुंबईच्या चौपाटीवर मिठाचा कायदा मोडला. घागरीतून समुद्राचे पाणी आणून त्याचे मीठ करुन ते रस्त्यावर विकले. कमलादेवींना अटक व शिक्षा झाली. कस्तुरबांच्या नेतृत्वाखाली ठाण्याजवळील कळवे येथे स्त्रियांनी सत्याग्रह केला. स्त्रियांनी दारोदारी हिंडून स्वदेशी माल वापरण्याची विनंती केली. सरोजिनी नायडूंच्या नेतृत्वाने अनेक स्त्रिया चळवळीत ओढल्या गेल्या. सत्याग्रहाच्या चळवळीत अपूर्व असे दृश्य स्त्रियांच्या सहभागाने निर्माण झाले. सुभाषचंद्र बोस यांच्या सहकार्याने ललिता घोष या ऑक्सफर्ड मध्ये शिकलेल्या शिक्षिकेने १९२८ मध्ये महिला राष्ट्रीय संघाची स्थापना केली. स्त्रियांचा दर्जा सुधारल्याखेरीज देश सुधारणार नाही अशी या संघटनेतील स्त्रियांची भूमिका होती. चित्तगाव शस्त्रागाराच्या हल्ल्यात अनेक क्रांतीकारी महिलांनी सहभाग घेतला. मिदनापूर, नौखाली येथील स्त्रियांनी मिठाच्या सत्याग्रहात भाग घेतला. ओरिसा, आसाममध्ये रमादेवी चौधरी, नेपाळमधील सावित्रीदेवी यांनी ठिकठिकाणी दौरे काढून असहकार चळवळ व स्वदेशी वस्तु वापरण्याविषयी जागृती निर्माण केली. मध्य प्रांतात अनसुयाबाई काळे असहकार चळवळीत अग्रभागी होत्या.

१९३०-३१ च्या सत्याग्रह आंदोलनात जवळजवळ १ लाख लोकांना अटक झाली. त्यापैकी १७ हजार स्त्रिया होत्या. गांधींनी स्त्रियांच्या या त्यागाचे व साहसाचे कौतुक केले. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनातही स्त्रियांचा सहभाग उत्स्फुर्त राहीला. ग्रामीण भागातील स्त्रियासुद्धा या आंदोलनात सहभागी झाल्या. अनेकजणी लाठीमार व गोळीबार सामोऱ्या गेल्या. सातारच्या प्रतिसरकाराच्या चळवळीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे अनेक स्त्रिया सहभागी झाल्या. अरुणा असफ अली, सुचेता कृपलानी, उषा मेहता यांनी भुमिगत राहून नेतृत्व दिले.

अशा प्रकारे १९२० ते १९३० सालापर्यंत गांधींनी केलेल्या अनेक सत्याग्रहांत स्त्रियांनी भाग घेतला. त्यांचे योगदान स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाचे ठरले.

**निष्कर्ष :-**

पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्रियांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. सत्याग्रह केले. तुरुंगवास भोगले. भुमिगतांना लपविले. गुप्तहेरगिरी केली. पैसाअडका, दागदागिने स्वातंत्र्य चळवळीला अर्पण केले. पुरुषांपेक्षा आपण कमी नसुन काकणभर सरसच आहोत हे सिद्ध कले. भारतीय स्त्रियांचा स्वातंत्र्य लढ्यातील सहभाग हे इतिहासातील महत्वाचे पान आहे. या देशाचे स्वातंत्र्य अशा ज्ञात व अज्ञात स्त्रियांच्या त्यागावरच उभे आहे. पण तरीही आज अनेक स्त्रियांची इतिहासात नोंद नाही. पुराव्याअभावी त्यांचे कार्य आजही दुर्लक्षित राहिले आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) डॉ.सौ.पद्मजा पाटील व डॉ.सौ.शोभना जाधव, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर

2) तर्कतीर्थ श्री.लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोष खंड 1 ते 16 महाराष्ट्र राज्य संस्कृती साहित्य मंडळ, मुंबई 1976

3) डॉ.देशपांडे बा.अ.महाराष्ट्राच्या कतृत्वशालिनी, पुणे 1994

4) नागोरी एस.एल., भारतीय स्वतंत्रता आंदोलन में महिलाओं का योगदान, सुरभि पब्लिकेशन, जयपूर 1997

# मार्क्सवादी आणि समाजवादी स्त्रीवाद

डॉ. मनीषा काशिनाथराव पाटील
श्री. गुरुबुद्धी स्वामी महाविद्यालय, पूर्णा

प्रस्तावना

स्त्रीवाद ही पाश्चिमात्य संकल्पना आहे समान हक्क समान दर्जा आणि स्वातंत्र्य या स्त्रीवादाच्या मूळ संकल्पना आहेत फ्रेंच राज्यक्रांती चे उदगाते रुसो लोक बेंथम यांच्या विचारसरणीतून या कल्पना उगम पावल्या आहेत पुरुषप्रधान विचारांच्या चौकटीत अडकून पडलेल्या स्त्रियांनी स्वतःचा शोध घ्यायला सुरुवात केली स्वतःच्या शक्तीच्या जाणिवा त्यांना झाल्या स्वतःचा विचार करताना मी एक माणूस आहे हा विचार पुढे आला तेव्हाच स्त्रीवाद साकारला गेला स्त्रीवाद स्त्रियांच्या विचारधारेला काही मूलभूत विचारधारेची बैठक असते त्या विचाराच्या दिशेवरून तो वाद किंवा विचारधारा ठरते स्त्रीवादी ही विचारधारा याच पद्धतीची आहे यामध्ये शोषण रहित वर्ग वर्ण जातीभेद विरहित विचार अपेक्षित आहेत म्हणून स्त्रियांना गुलाम बनविणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठविणारे विचारधारा आहे उत्क्रांतीच्या टप्प्यात स्त्रीची मानवी क्षमता थांबविली गेली माणसाच्या वंशाचा अर्धा भाग केवळ गृहिणी बाई म्हणून घरात डांबून ठेवून मनुष्य जातीची प्रचंड हानी झाली स्त्रीचे दुय्यमत्व व अधम पतन हे लग्न आणि स्त्री-पुरुष संबंधातील स्त्रीच्या भूमिकेलाच दुय्यम पणा आणू लागले त्यामुळे स्त्रियांच्या मुक हुंदक्यांना शब्दरूप देणाऱ्या स्त्रियां बद्दलच्या पूर्वग्रह दूषित ते पलीकडे पाहू शकणाऱ्या व त्यांच्या हक्कासाठी झगडणाऱ्या बुद्धिमान स्त्रियांची गरज निर्माण झाली एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकात शिक्षणाने क्रांती केली औद्योगिक क्रांती पेक्षा ही क्रांती जास्त महत्त्वाची आहे धार्मिक अत्याचार अन्याय शोषण या बाबत यांनी जगभर बंड पुकारले म्हणून स्त्री स्वातंत्र्याचा लढा हा मानवमुक्तीचा आणि क्रांतीचा लढा होय आम्हाला माणूस म्हणून जगू द्या असा सूर संपूर्ण विश्वात उमटला भारतीय समाजात स्त्रीवादाचा विचार केल्यास समाजाच्या सर्वच क्षेत्रात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते स्त्रियांचे हे दुय्यम स्थान व्यवस्थात्मक स्वरुपाचे आहे आज पर्यंत सत्ता वंचित व प्रतिष्ठा वंचित स्त्रिया राहिल्या आहेत स्वातंत्र्यानंतर स्त्रियांनी विविध क्षेत्रात प्रवेश केला असला तरी त्या अजूनही पुरुषाच्या तुलनेत कितीतरी मागे आहेत लिंग भेदातून निर्माण होणाऱ्या विषमतेला छेद देण्यासाठी त्याला राजकीयदृष्ट्या संक्रमित करण्यासाठी काय केले पाहिजे याविषयी यातून मार्गदर्शन होते जीवनाच्या सर्व क्षेत्रात होणारे स्त्रियांचे शोषण व दुय्यमत्व नष्ट करणे हा स्त्रीवादाचा उद्देश आहे

**उद्देश:**

1) मार्क्सवादी स्त्रीवाद अभ्यासणे

2) समाजवादी स्त्रीवाद अभ्यासणे

**1) मार्क्सवादी स्त्रीवाद:**

कार्ल मार्क्स च्या साम्यवादी विचारसरणीच्या आधारे मार्क्सवादी स्त्रीवाद हे तत्त्वज्ञान स्पष्ट केले जाते मार्क्सच्या लिखाणात मात्र प्रश्नांची चर्चा केलेली आढळत नाही फ्रेडरिक एंगल्स यांनी द ओरिजिन ऑफ द फॅमिली प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड द स्टेट या पुस्तकात स्पष्ट केलेला आहे त्यात ते स्पष्ट करतात की इतिहासाच्या प्रारंभी असलेल्या मातृसत्ताक समाजात लैंगिक संबंधामध्ये मुक्तता आणि स्त्रीला निवडीचे स्वातंत्र्य होते घरावर स्त्रीचे नियंत्रण होते शेतीच्या शोधानंतर ही व्यवस्था पितृसत्ताक झाली या व्यवस्थेत स्त्रीवर एक पत्तीतत्वाचीचाल लादली गेली मात्र पुरुषांना अनेक स्त्रियांशी विवाहाची मुभा होती पुरुषाने आर्थिक लैंगिक अधिकार मिळविले भांडवलशाहीच्या उदयानंतर स्त्री सामाजिक उत्पादन व घर काम या दोन्ही पातळीवर कार्य करूनही दुय्यम ठरली म्हणून भांडवलशाही विरुद्धच्या कामगाराच्या संघर्षात स्त्रियांनी भाग घ्यावा या संदर्भ या संघर्षात मातृत्व बाल

संगोपनाच्या जबाबदारीचे सामाजिकीकरण व्हावे[1]या पद्धतीने एगल्स ने हि माडणी केलेली आहे. हायडी हार्टमनने ही मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी केली आहे तिने पुरुषसत्ताक व्यवस्था आणि भांडवलशाही यामधील परस्पर संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला ऐतिहासिक विश्लेषण आधारे हार्ट मनने मांडले की पुरुषप्रधान समाज व्यवस्थेमध्ये भांडवलशाहीचा विकास झाला यामुळे घर आणि कामाचे ठिकाण या ठिकाणी लिंगभेदाद्वारे श्रमविभाजन मोठ्या प्रमाणावर झालेले दिसते 1990च्या दशकात फ्रान्समधील भौतिकवादी स्त्रीवादी ख्रिस्तीन डेकली हिने तसेच सिल्व्हीया वाल्बी (१९८६) या दोन अभ्यासकांनी घरगुती उत्पादनाच्या चौकटीत स्त्रियांचे शोषण झाले त्यामुळे त्या दुय्यम ठरल्या[2]अशी मांडणी केली ऐतिहासिक भौतिकवादाचाआधार घेत मार्क्सवादी स्त्रीवादाची मांडणी या पद्धतीने झालेली दिसते.

2) **समाजवादी स्त्रीवाद:**

मार्क्सवादी स्त्रीवाद व जहाल स्त्रीवाद या दोन विचारसरणी तील टोकाची भूमिका व दोष टाळून या विचारसरणीमध्ये सुवर्णमध्य गाठण्याचे कार्य समाजवादी स्त्रीवादात झाले आहे अलेक्झांडा कोलान्ता या यांनी समाजवादी क्रांतीच्या संघर्षाच्या चौकटीत समाजवादी स्त्रीवादाची मांडणी केली आर्थिक परावलंबन घरगुती गुलामगिरी याप्रमाणेच प्रेम लैंगिक भावनिकता स्त्रीला गुलाम बनविते त्यामुळे क्रांतीतून स्त्रियांचा प्रश्न सुटेल असे त्यांना वाटत नाही यासाठी प्रचलित नैतिकता पुरुषधार्जिण्या नैतिकतेचा त्याग इत्यादी उपाय त्या सुचवितात कोलान्ता यांच्याप्रमाणेच इम्मा गोल्डमन यांनीही प्रेमातील असूया या घटकामुळे च मालकीची भावना व पुरुष धार्जिणेहितसंबंध तयार होतात असे मत मांडले[3] बोल्शेविक क्रांती नंतर व्हात अमिर लेनिन यांनी कोलान्ता यांना कोम्मिसार मधील समाज कल्याण खात्यातील पद दिले त्यामार्फत कोलान्ता यांनी स्त्रियांना समान संधी अपत्यांच्या संगोपनासाठी समुदाय केंद्र शाळा आणि नर्सरीसाठी केंद् आदी उपक्रम राबविले गर्भपात आणि घटस्फोट यांना परवानगी दिली मात्र लेनिनच्या मृत्यूनंतर यांची बहुतेक धोरणे रद्द केली स्त्रियांवर ची कौटुंबिक जबाबदारी स्त्रियांवरच राहिली[4] मार्क्सवादी स्त्री वादातील लिंगभाव आंधळेपणा मुळे असंतुष्टता निर्माण झालेल्या स्त्री वाद्यांची परिनिती समाजवादी स्त्री वादात झाली समाजवादी स्त्रीवाद म्हणजे मार्क्सवादी पोथीनिष्ठता आणि स्त्रीवादी विश्लेषण यातील वाढत जाणारी दरी यांना स्पष्ट करणारी संज्ञा होय जागतिक पातळीवर स्त्री समस्यांना घरकाम अपत्य संगोपन इत्यादी कामे असतातच पुरुषांपेक्षा स्त्रियांना कमी सत्ता संपत्ती आणि आराम मिळतो समाजवादी स्त्री वादाने मार्क्सवादांच्या मर्यादा सांगण्यासाठी दोन बाबी सांगितल्या आहेत १) पुरुष शाही व भांडवलशाही या दुहेरी व्यवस्थेत स्त्रियांचे शोषण होत असते अशा पुरुष शाही व्यवस्थेने निर्माण केलेल्या भांडवलशाहीत ही स्त्रियांचे शोषण होत असते कुटुंब व्यवस्था म्हणजे भांडवलशाही व्यवस्थेचाच एक भाग होय २) पुरुषशाहीव भांडवलशाही या दोन भिंन्न नाही तर एकच आहेत. भांडवलशाही ही पुरुषांनीच निर्माण केलेली आहे स्त्रियांना श्रमविभागणी मध्ये सातत्याने दुय्यम अनुत्पादक बाबीकडे वळविल्या जाते.

स्त्रीवादी विचारसरणीतील अनेक प्रवाह पुढे येत आहेत. मला सर्वात जवळचा प्रवाह वाटतो तो समाजवादी स्त्रीवादी दृष्टीकोन म्हणजेच sodalist feminism जोपर्यंत वर्ग वर्ण व जातीभेद नष्ट होत नाहीत तोपर्यंत खऱ्या अर्थाने स्त्री काही मुक्त होऊ शकणार नाही तेव्हा सामाजिक बदल होणे अत्यंत गरजेचे आहे वर्ग संघर्ष एकट्याने पुढे न जाता त्याला स्त्रीवादाची जोड हवी स्त्रीमुक्ती शिवाय वर्ण वर्गभेद समूळ नष्ट होणार नाहीत तेव्हा अशा प्रकारची मांडणी भारतातील स्त्री वादातील प्रमुख प्रवाहाच्या हाती असावी असे वाटते जसजसे आपण बदलतो तस तसे आपले अनुभव वेगळे वाटू लागतात ही एक आपली स्वतःशी आजूबाजूंच्या व्यक्तीशी व समाजाशी सततची देवानघेवान आहे ज्यातून तुम्ही एक नाते निर्माण करता त्यातून आयुष्यातील सुसंगती वाढते एखादा प्रसंग सुसंगत किंवा विसंगत असल्याने फारसा फरक पडत नाही एकूण आयुष्यातील स्त्री वादाशी सुसंगत व विचाराशी प्रामाणिकता जास्त महत्त्वाची एखादा प्रसंग जो feminist नव्हता तो लपवणे म्हणजे अप्रामाणिकता आहे. त्यात कमीपणा वाटण्यासारखे काही नाही त्याऐवजी तो सर्वांशीshare केला मांडला व त्यावर चर्चा केली तर विसंगती

दूर होऊन सुसंगती येऊ शकते जसजसे आपणस्त्रीवादी होतो. तशा आपल्यातील स्त्रीत्वाच्या लहरी व वैशिष्ट्ये कितपत कमी होतात तेही पाहिले पाहिजे उदाहरणार्थ पुरुषांच्या श्रमविभागणी मध्ये सहभाग हवा यावर सर्वांचे एकमत आहे पण fuse बदलणे अकाउंट्स व बँकेची कामे करणे ही पुरुषी कामे आपण तितक्याच तत्परतेने करतो का नसेल तर पुरुषातील पुरुषीपणा बद्दल आपण इतके रागावू नये पूर्वी हे पटले नसते पण आता असे वाटते की पुरुषीपणा व स्त्रीत्व हे नैसर्गिक नसून समाजानेpolarize केलेले गुणदोष असतील तर स्त्री-पुरुषांनी आचार विचाराच्या देवाणघेवाणीतून आपल्या आयुष्यातील सुसंगती वाढवावी खरं म्हणजे स्त्रीवादाची एकच एक अशी होमोजीनियस संकल्पना सांग न अवघड आहे कारण त्यामध्ये अनेक वेगवेगळ्या परंपरा आहेत वेगवेगळे तात्विक विवेचन केलेल आहे. कार्यक्रमाच्या पातळीवर वेगळेपणा दिसतो या सगळ्यांचा लसावि काढता येईल कोणत्याही समाजामध्ये काही विशिष्ट संरक्षणामुळे संकल्पनांमुळे काही विशिष्ट कल्पना प्रणालीमुळे काही विशिष्ट व्यवहारामुळे अन्याय होत असतो आणि ह्या अन्यायाच्या विरुद्ध झगडण्याची भूमिका घेऊन उभे राहणे म्हणजे स्त्रीवाद ती वेगवेगळ्या सिद्धांताने मधून प्रणाली मधून आलेली असली तरी समान भूमिका गृहीतक सर्वांच्या जवळ आहेत असं मला वाटतं स्त्रिया च्या वर अन्याय होतो तो मग लैंगिक असेल आर्थिक असेल सामाजिक असेल सांस्कृतिक असेल तो मान्य करून म्हणजेच तो आहे हे मान्य करून त्याच्याविरुद्ध झगडणं जग बदललं अधिक निरोगी करण्यासाठी धडपडणं समानतेवर आधारित समाजरचनेचा आग्रह धरण म्हणजेच स्त्रीवाद असे मला वाटते.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) गीथा, व्ही,'उत्पादन पुनरुत्पादन आणि पितृसत्ता:'जागतिक चर्चा विश्व'चव्हाण, प्रवीण (स्वैर अनुवाद), पितृसत्ता समजून घेताना, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे, विद्यापीठ पुणे, सहाय्याने उच्च शिक्षण उपक्रम नवाज बाई रतन टाटा ट्रस्ट, प्रकाशन वर्ष २०१०, पृष्ठ क्रमांक-७१ ते ७३

2) स्टे व्ही, जॅक्सन,'स्त्रीवादी सामाजिक सिद्धांत'भागवत विद्युत, (स्वैर अनुवाद), स्त्रीवादी सिद्धांकन, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र पुणे, विद्यापीठ पुणे, सहाय्याने उच्च शिक्षण उपक्रम नवाज बाई रतन टाटा ट्रस्ट, प्रकाशन वर्ष-२०११, पृष्ठ क्रमांक-१२४,१२५

3) गिथा, व्ही,' उत्पादन पुनरुत्पादन आणि पितृसत्ता:'जागतिक चर्चा विश्व', चव्हाण, प्रवीण (स्वैर अनुवाद), पितृसत्ता समजून घेताना, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र पुणे, विद्यापीठ पुणे, प्रकाशन वर्ष-२०१०, पृष्ठ क्रमांक-७३,७४

4) चव्हाण, प्रवीण (स्वैर अनुवाद), प्रारंभीचे स्त्रीवाद: संदर्भ साहित्याचा वेद, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र पुणे, विद्यापीठ पुणे सहाय्याने शिक्षण उपक्रम नवाज बाई रतन टाटा ट्रस्ट, प्रकाशन वर्ष

# स्त्रीवादाची ओळख

## डॉ. शिल्पा शेटे

श्री पद्ममणि जैन कला व वाणिज्य महाविद्यालय,पाबळ,ता. शिरूर, जी. पुणे.

स्त्रीवाद म्हणजे स्त्रीच्या दृष्टिकोनातून जीवनाच्या सर्व पैलूंवर टाकलेला दृष्टिक्षेप. एक जाणीव आहे. ते एक जीवनविषयकतत्त्वज्ञान आहे. तो एक सैद्धांतिक दृष्टिकोन आहे. त्याचप्रमाणे ती संघटित कृतीसाठी साददेखील आहे. त्यामुळे स्त्री-पुरुषांनी स्वतंत्र व्यक्ती म्हणून सन्मानाने जगण्यासाठी सर्व सामाजिक संस्थांचा केलेला पुनर्विचार आणि पुनर्रचना, म्हणजे स्त्रीवाद.[i]"स्त्रीवाद'ही परिपूर्ण आणि स्वयंभू नाही. स्वातंत्र्य, समानता आणि संधी यांचा तीन संदर्भात आणि शोषणाच्या संदर्भात स्त्रियांच्या विशिष्ट प्रश्नांचा विचार स्त्रीवादात होतो. या सर्वांबरोबरच व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्त्रीवाद यांचा अतिशय घनिष्ट संबंध आहे. स्त्रियांचा पुरुषप्रधानतेविरुद्धचा लढा आणि स्त्री म्हणून केल्या जाणाऱ्या शोषणाविरोधी लढा व्यक्तिस्वातंत्र्याशी जोडलेला आहे.[ii] स्त्रीवाद चळवळ म्हणजे स्त्रियांनी स्त्रियांसाठी चालविलेली चळवळ नव्हे. ती मानवमुक्तीच्या चळवळीतील एक प्रवाह आहे.[iii]

स्त्रीवादी चळवळीच्या प्रामुख्याने तीन लाटा निर्माण झाल्या. त्यातील पहिली लाट ही स्त्रीमुक्तीची होती. दुसरी लाट ही जहाल विचारसणीची होती तर तिसरी लाट ही समन्वयाकडे जाणारी होती.

स्त्रीवादाची पहिली लाट १९ व्या शतकात सुरू झाली होती त्याचे स्वरूपस्त्रिमुक्ती व त्यांना विविध अधिकार मिळावेत असे होते. उदा. स्त्रियांना शिक्षणाचे हक्क मिळाले पाहिजेत यासाठी विचार व नंतर प्रयत्न केले जात होते. पाश्चात्त्य देशांतस्त्रिमुक्तीआंदोलनाने वातावरण ढवळून निघत होते. उत्क्रांती होत होती. उदा. मेरी वूल्स्टनक्राफ्ट यंनी 'Vindication of the rights of women'(स्त्री हक्कांचे समर्थन) हे पुस्तक १७९२ मध्ये प्रकाशित केले.[iv] हे पुस्तक म्हणजे स्त्रीमुक्ती लढ्याची पहिली संहिता ठरली. यानंतरजॉन स्टुअर्ट मिल यांनी 'Subjection of Women' या नावाने जो ग्रंथ लिहिला, त्यात त्यांनी स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी केली.[v]१८६७ साली स्त्रियांना मतदानाचा अधिकार असावा अशी त्यांनी भूमिका घेतली.[vi] पण तरीही प्रत्यक्षात युरोपातील स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार मिळायला बराच काळ जावा लागला.इंग्लंडसारख्या लोकशाहीप्रधान राष्ट्रात स्त्रिया मतदानाचा हक्क मिळावा म्हणून आंदोलन करताना दिसतात. म्हणजे इंग्लंडमध्ये लोकशाही असूनही स्त्रियांना नागरिकत्वाचे अधिकार नव्हते, असे दिसते. स्त्रियांनी उग्र आंदोलन केल्यानंतर स्त्रियांना १९२८ मध्ये मतदानाचा अधिकार मिळाला.[vii] अमेरिकेत हा अधिकार १९२० मध्ये मिळाला,[viii] तर फ्रान्समध्ये तो मिळायला १९४५ साल उजाडावे लागले.[ix]पाश्चात्त्य देशांमध्ये प्रत्येक गोष्ट स्त्रियांनी आंदोलन करुन मिळविली आहे. कामाचे तास, मजुरीतला भेदभाव इ. या सर्व गोष्टी स्त्रियांच्या अधिकारासाठी भांडणे हे पहिल्या लाटेत अभिप्रेत होते. याला आपण साकल्याने स्त्रीमुक्तीवादी म्हणूयात.याला जरी आपण स्त्रीवाद म्हणत असलो, तरी खरे तर हा स्त्रीमुक्तीवाद आहे.स्त्रीवाद नव्हे. पण १९६० नंतर हे चित्र बदलताना दिसते. विचारात काही मूलभूत क्रांती होताना दिसते.पाश्चात्त्य देशांच्या प्रमाणे भारतातही पहिला लाटेत थोडाफार फरकाने हेच घडले आहे. उदा. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळावा. घटस्फोटाचा अधिकार मिळावा. सतीबंदी इ.

खऱ्या अर्थाने स्त्रीवाद हा १९६० नंतर दिसतो. तो फार वेगळा आहे. स्त्रीमुक्ती म्हणजे जेथे जेथे स्त्रीवर बंधने टाकली त्यातून त्याची मुक्तता होणे. स्त्रीवाद म्हणजे अधिक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे.स्त्रीवाद हा एक विचार आहे एक जाणीव आहे.स्त्रीवादामध्ये स्त्री व पुरुष यांच्यात एक प्रकारचा सत्तासंघर्ष आहे. लिंगभावाचे राजकारण सुरू आहे व या लिंगभावाच्या राजकारणामध्ये स्त्रीला स्वतंत्र, बलिष्ठ स्थान प्राप्त करून देणे हे स्त्रीवादाचे ध्येय्य आहे. लिंगभाव म्हणजे स्त्री-पुरुष यांच्यातील नैसर्गिक भेद हे शारीरिक भेद आहेत, पण त्यापलीकडे जाऊन संस्कृतीने काही भेद निर्माण केले आहेत, त्याला आव्हान हा स्त्रीवाद देतो. त्याला लिंगभाव हा शब्द वापरला आहे. म्हणजे मुलगा व मुलगी यांच्यात काही शारीरिक भेद असतात, मात्र या पलीकडे जाऊन संस्कृतीने काही भेद लादलेले आहेत. याबाबत 'द सेकंड सेक्स' या पुस्तकात सिमोन द बोव्हुआर म्हणतात,"स्त्री ही जन्मत नाही, तर घडविली जाते. समाज जे गुणविशेष स्त्रीमध्ये गृहीत धरतो त्यांतील फारच थोडे प्रत्येक स्त्रीमध्ये निसर्गतः असतात. स्त्रीची बहुसंख्य वैशिष्टेही समाजाने तिच्यामध्ये जबरदस्तीने रुजवलेली असतात."[x]या पुस्तकात सिमोन द बोव्हुआर यांनी अतिशय मुलभूत मांडणी केली आहे. जन्मत:च मुलींवर ती आदर्श स्त्री बनविण्याचे संस्कार केले जातात. थोडक्यातस्त्री व पुरुष यांच्यातील नैसर्गिक भेदापलीकडे 'स्त्रीत्व' आणि 'पुरुषत्व' हे भेद संस्कृतीने म्हणजेच कृत्रिमरीत्या तयार केले आहेत, असे दिसते. या सर्व लिंगभावातून निर्माण होणाऱ्या रचना आहेत त्या कोटींना स्त्रीवाद आव्हान देतो. त्यांचे म्हणणे हे

ही Gender Politics(लिंगभावाचे राजकारण) सुरू आहे. ते संस्कृतीच्या सर्व क्षेत्रात सुरू आहे. एखादी गोष्ट आपोआप आलेली नाही. वर्षानुवर्ष संस्कृतीच्या राजकारणात उतरून पुरुषाने मिळवलेले वर्चस्व आहे. मग यात पुरुषसत्ताकवादी केवळ पुरुष नसतो,स्त्री पण असते. कारण तिच्या मनावर तो संस्कार वर्षानुवर्षे झालेला असतो.[xi] याचा स्त्रीला पॉलिटिक्समध्ये तोटाही झाला आहे आणखी एक तोटा होण्याची गोष्ट म्हणजे मुलाला जन्म देणे व वाढविणे या गोष्टी नैसर्गिक रित्या अंगावर पडल्यामुळे ही स्त्रीची काहीशी पीछेहाट झाली आहे. पण याच्या पलीकडे जाऊन संस्कृतीची राजकारणे चालली आहेत ते अधिक महत्त्वाची आहेत. कारण ती संस्कार करतात आणि एकदा संस्कार झाला की मग स्त्री स्वतः पुरुषप्रधान रचनेची समर्थक बनते. उदा. राज्य दोन प्रकारे केली जाते व दुसरे संमतीने. पोलिसी बळ, उपद्रवमूल्य वापरून एखाद्या समूहावर जबरदस्तीने राज्य करणे म्हणजे सत्तीनेराज्य करणे.सत्तीने राज्य करण्यातील समस्या म्हणजे दडपल्या गेलेल्या व्यक्ती व गटअसंतुष्ट असतो व तो बंड करू शकतो ही भीती कायम वर्चस्ववादी गटाच्या मनात राहते. गुलामाने बंड करू नये म्हणून तो संमतीने राज्य करण्यासाठी व्यवस्था निर्माण करतो. व गुलामांना गुलामगिरीच छान वाटू लागते. तो गट अशी संस्कृती निर्माण करतो की गुलामांना गुलामगिरीची जाणीव होणार नाही, उलट त्याला भूषणास्पद वाटेल. हा सांस्कृतिक राजकारणाचा भाग आहे राजकारणात सर्वात गंभीर भूमिका धर्म बजावतो. उदा. भारतामध्ये वडाला फेरा मारणे, जन्मोजन्मी हाच पती मिळावा ही भावना असणे, हे हजारो वर्ष आपल्या संस्कृतीने रूजवलेले आहे. परिणामी त्या स्त्रियांना आपण गुलाम आहोत असे वाटतच नाही उलट त्यांना ती भूषणावह वाटते. आपण कोणाचे तरी दुय्यम स्थान स्वीकारले आहे व पतीला परमेश्वर मानतो,याची लाज वाटत नाही, कारण ते धर्माने शिकविले आहे.

सांस्कृतिक अवकाशात लिंगभावाचे राजकारण सुरू आहे. ते सौंदर्याच्या क्षेत्रातही सुरू आहे.सर्वत्रच पुरुष हे स्त्रीला वस्तू म्हणून पाहततात, असेस्त्रीवाद्यांना वाटते. म्हणजे मुले आपापसांत चर्चा करताना मुलींवर कॉमेंट करताना त्यांच्या मनातील भावना दिसतात.त्यां कॉमेंट्स केवळ शारीरिक असतात. जणूकाही स्त्रीला केवळ शरीरच आहे व तिला मन नाही.स्त्रीवाद्यांच्या मते आजच्या जगातील सौंदर्याच्या ज्या कल्पना आहेतत्या सर्व पुरुषप्रधान आहेत. सौंदर्याच्या सर्व कल्पना पुरुषी आहेत. उदा. स्त्रियांची फिगर अशी असावी हे मुख्यतः पुरुषाने ठरवली यातूनच युरोपात सुरू झाली त्यांची वस्त्रे उदाहरणात ब्रा हजारो स्त्रियांनी एकत्र करून जाळणे त्यामागे त्यांची भूमिका अशी की आमच्या सौंदर्याच्या कल्पना आम्हीच ठरवू.[xii]

योनीशुचिता ही एक सामाजिक संकल्पना आहे. यात असे गृहीत धरले आहे की स्त्रीची योनी एक पवित्र गोष्ट आहे. तिचा संपर्क फक्त त्या स्त्रीच्या पतीशीच (तोही पहिल्याच. तोच तिचा शेवटचा पती असायला हवा.) यायला हवा. मात्र त्या योनीचा संपर्क जर परपुरुषाशी (मग तो जबरदस्तीने कां येईना !) आला तर ती भ्रष्ट होते. म्हणून स्त्रीच्या पतीचा मृत्यू झाला किंवा घटस्फोट झाला तर तिचे परत लग्न होणे अवघड आहे. कुमार अवस्थेतील मुलगा सहजासहजी अशा मुलीला स्वीकारत नाही. यामागे अर्थातच योनीशुचितेचीच कल्पना आहे. याबाबत नेमका पुरुष मोकळा आहे. आपल्या भाषेत योनीशुचिता हा शब्द येतो पण शिस्नशुचिता असा शब्द येत नाही. याचा अर्थ उघड आहे की पुरुष आणि विवाहपूर्व कितीही संबंध ठेवले तरी चालतात, पुरुषाचे लफडे असेल तर लग्नाला अडचण येत नाही, मात्र एखाद्या मुलीचे विवाहपूर्व संबंध असतील तर मात्र तिच्या लग्नात अडचणी येतात. कारण तिथे योनीचेपावित्र्य गृहीत धरले गेले आहे, म्हणजे तिचा दुसऱ्या पुरुषाशी संबंध येता कामा नये. सती जाणे हा या बाबतीत टोकाचा निर्णय आहे. तिथेही योनीशुचितेचीच कल्पना आहे. योनीशुचितेची ही बंधने मुख्यतः स्त्रियांवर आहे व ज्या समाजात स्त्रिया ही बंधने पाळत नाही, त्यांना वाईट चालीच्या मानले जाते. म्हणून आपण जेवढे उच्च जातिकडे जाऊ केवढी ही बंधने अधिकाधिक गडद होत जातात. एखाद्या स्त्रीवर बलात्कार झाला तरी तिचा काहीही दोष नसतो, परंतु तरीही लोक त्या विरोधी केस करायला घाबरतात. कारण तिलाच दोषी धरले जाणार याची तिला खात्री वाटते, म्हणून ती तक्रार करत नाही. कारण समाज मानतो की तिची इज्जत गेली आहे. योनीशुचितेच्या कल्पनेमुळे बळी असणारी स्त्रीच भ्रष्ट समजली जाते.

लैंगिकतेवर नियंत्रण स्त्री-पुरुषांच्या लैंगिक भावना ही नैसर्गिक गोष्ट आहे, परंतु त्याचे नियम, संकेत, परंपरा इ. पुरुषांनी बनवले आहेत. ते सांस्कृतिक आहेत.योनीशुचिता, पातिव्रत्य, सती इ. द्वारे स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला गेला आहे.आजही मुलं भावना व्यक्त करताना एखादी मुलगी आवडल्याची किंवा ती मिळावी अशा भावना सहज व्यक्त करतात.याउलट मुलींनी असे म्हटले तर ते फारच वाईट,अपवित्र समजले जाते.हा सर्व स्त्रियांच्या लैंगिकतेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न आहे. हे नियंत्रण जसे इहलोकात आहे, तसेच स्वर्गात पण आहे. तिथे पुरुषांच्या लैंगिक सोयी सुखी आहेत, मात्र स्त्रियांसाठी नाहीत; हे सर्वच धर्मात आहे.

उपभोग या गोष्टीलाच स्त्रीवादी नकार देतात. उपभोग आणि संभोग या शब्दात फरक आहे. स्त्रीला तिची लैंगिक अभिव्यक्ती करता आली पाहिजे. ते वाईट मानले गेले नाही पाहिजे, हा स्त्रीवाद्यांचा मुद्दा आहे. एक प्रकारचे लैंगिक नियंत्रण लादणे हे पुरुषप्रधान संस्कृतीने केले आहे. त्याविरुद्ध हा वैचारिक लढा आहे. कधी कधी स्त्रीवाद्यांनी

याविरुद्ध टोकाचे उपाय सांगितले. म्हणजे काही स्त्रीवाद्यांनी अशी घोषणा केली, की आम्हाला पुरुषांबरोबर लग्नच करायचे नाही. आम्ही एक वेळ तसे राहू परंतु हेट्रोसेक्शुअल संबंध हा नकोच अशी भूमिका त्यांनी घेतली. मग आम्ही एक वेळ होमोसेक्शुअल राहू पण आम्ही पुरुषांशी लग्न करणार नाही. या टोकाच्या भूमिका झाल्या. म्हणजे प्रत्येक चळवळीत अशा टोकाच्या भूमिका घेण्याची वेळ येते. धर्म, संस्कृती. भाषा इ. संदर्भात जी चिकित्सा पद्धती विकसित केली त्याला खऱ्या अर्थाने स्त्रीवाद म्हणता येईल.किंवा हा स्त्रीवादी पद्धतीने एखाद्या गोष्टीचे मूल्यमापन करणे असे म्हणता येईल. हे स्त्रीमुक्तीवादापेक्षा थोडेसे वेगळे वळण आहे. भाषेबाबत त्यांनी काहीवेगळ्या भूमिका घेतल्या आहेत.उदा. स्त्रीवाद्यांनी'बंधुता' या शब्दाला आक्षेप घेतला आहे. कारण तो पुरुषवाचक शब्द आहे. त्यात नकळतपणे स्त्रीचे अदृश्यीकरण होते आहे व त्याची पुनरावृत्ती इतिहासात व वांङ्मयातही होते. तिचे अस्तित्व नाकारले जाते. या सर्वांच्या विरोधात स्त्रीवाद आहे. जहालस्त्रीवाद १९६० ते १९९० या काळात चालत राहिला.

१९९०नंतर तिसरी लाट आली. या लाटेचे वैशिष्ट्ये काय होते, तर चिकित्सापद्धती तशीच आहे. मात्र टोकाच्या गोष्टी काढल्या गेल्या उदा. हेट्रोसेक्शुअल संबंध म्हणजे रेप असतो ही भूमिका,ब्रा बर्निंग सारख्या  चळवळी बंद झाल्या. चिकित्सा पद्धती मात्र तशीच राहिली. मूलभूत बदल झाले नाहीत. या फेजचे वर्णन असे केले गेले 'नॉट माय मदर्स सिस्टर' म्हणजे मी माझ्या आईची मुलगी आहे, बहिण नाही. म्हणजे मी त्या पुढच्या पिढीची आहे. मी टोकाच्या गोष्टी करणार नाही.उदा. मला आनंद मिळत असेल तर मी पुरुषांशी संबंध ठेवेन. हवे तेव्हा संबंध ठेवण्याचे हवे तेव्हा संबंधातून मुक्त होण्याचे, लैंगिक अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असले पाहिजे. मला लैंगिक दृष्ट्या नकार देण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे अशी भूमिका घेतली जाते. ही तिसरी लाट होती व सध्या ती चालू आहे.

एकूणच स्त्रीवादात धर्म, समाजव्यवस्था, संस्कृती, परंपरा, भाषा, लैंगिकता इ. सर्व क्षेत्रातील पुरुषप्रधानतेची चिकित्सा करणे अभिप्रेत आहे. व या लिंगभावी संघर्षात तिला पुरुषांच्या बरोबरीचे स्थान मिळवून देणे हे स्त्रीवादाचे उद्दिष्ट आहे.

---

[i]संपा. सुमती लांडे, श्रुती तांबे,स्त्रीवाद, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००७, प्रस्तावना, पृ. १.

[ii]कित्ता, पृ. ४९.

[iii]कित्ता, पृ. ५२.

[iv]मंगला सामंत, स्त्री-पर्व, नेटवर्क प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००८, पृ.१३०, १३१.

[v] डॉ. यशवंत सुमंत, मिळून साऱ्या जणी, फेब्रुवारी १९९९, पृ.२२.

[vi] पूर्वोक्त, स्त्री-पर्व, पृ.१२८.

[vii]सिमोन द बोव्हुआर, अनु. करुणा गोखले, द सेकंड सेक्स, पद्मगंधा परकाश, पुणे, २०१०पृ.१८०.

[viii]पूर्वोक्त, मिळून साऱ्या जणी, पृ.२३.

[ix]पूर्वोक्त, द सेकंड सेक्स, पृ.१७९.

[x]कित्ता., पृ.२४५.

[xi]मराठी विश्वकोश https://vishwakosh.marathi.gov.in/23570/

[xii]कित्ता.